म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ५२२

REFBK-0005489

रशियांतील राज्यक्रांति.

लेखक :
पांडुरंग वासुदेव गाडगीळ,
वाङ्मयविशारद.
'समाजवादाचा ओ ना मा' या पुस्तकाचा कर्ता.

REFBK-0005489

किंमत २॥ रुपये]

[९-१०-३६

प्रकाशक :
यशवंत गोपाळ जोशी
७२३ सदाशिव, पुणें २.



मुद्रक :
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ५१३ शनवार, पुणें २.

अनुक्रमणिका

प्रकरण		पृष्ठ
१	विसाव्या शतकाच्या तोंडाशीं	१
२	क्रांतीचा पहिला धक्का	२०
३	रशियन राज्यक्रांतीची वैचारिक पार्श्वभूमि	५४
४	क्रांतीची पीछेहाट	१०९
५	क्रांतिकारक चळवळींचा पुनरुद्भव	११६
६	महायुद्ध व मार्क्सवाद्यांतील आंदोलनें	१२२
७	झारिस्ट रशिया व महायुद्ध	१३८
८	झारशाहीचा पाडाव व भांडवलशाहीची डळमळीत सत्ता	१५२
९	क्रांति आणि प्रतिक्रांति यांची रस्सीखेच	२०८
१०	यशस्वी बोल्शेव्हिक क्रांति	२२८
११	रशियन राज्यक्रांतीचें वैशिष्ट्य	२४७
१२	जगांतील पहिलें सोव्हियट राज्य	२८३
१३	जागतिक कम्युनिस्ट क्रांतीचें भवितव्य	३१३

— कांहीं साधन-ग्रंथ —

Russia—Makieve & O'hara
Brief History of Russia Vol. II—Pokrovsky
Illustrated History of Russian Revolution Vol. I
Basic Principles of Scientific Socialism—Sachs
Karl Marx—Lenin

Communist Manifesto by Marx and Engles
—Edited by Ryazanoff

Paris Commune—Lenin
'Eighteenth Brumaire' of Louis Bounaparte
—Karl Marx

History of Bolshevism—Arthur Rozenberg
Lenin—D. S. Mirsky
Bolshevism : Theory & Practice—Dr. Valdemar Gurian
Revolution of 1905—Lenin
What is to be done?—Lenin
Capitalism, Communism and the Transition
—Emile Burns

History of Russian Revolution Vols. I, II, III—Trotsky
The Tasks of the Proletariat in our Revolution—Lenin
Leninism Vols. I, II—Stalin
Wage-Labour and Capital—Karl Marx
Fascism and Social Revolution—R. Palme Dutt
State in Theory and Practice—H. J. Laski
Prospects of Industial Civilization
—Bertrand Russel

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ५४८
संग्रह शाखा

रशियांतील राज्यक्रांति

प्रकरण १ लें

विसाव्या शतकाच्या तोंडाशीं

झारिस्ट रशियाचें मागसलेपण

झारच्या अमलाखालील रशियाचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें ८५ लक्ष चौरस-मैल होतें. १९१७ सालीं राज्यक्रांति होऊन बोल्शेव्हिक सरकारला जर्मनीशीं जो तह करावा लागला त्यानें महायुद्धांत पराभूत झालेल्या इतर कोणत्याहि राष्ट्रापेक्षां रशियाचा मुलूख अधिक कमी झाला; तरी पण एकंदर रशियाच्या क्षेत्रफळापैकीं सुमारें तीन टक्के क्षेत्रच कमी झालें. एकंदर जगाचें क्षेत्रफळ सुमारें पांच कोटि चौरसमैल असून एकटा रशिया देश त्याचा सहावा हिस्सा भरतो. देश एवढा अफाट व त्यांत भौतिक संपत्तिहि विपुल; पण तो अगदीं १९१७ सालीं राज्यक्रांति होईपर्यंत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, अमेरिका वगैरे आधुनिक सुधारलेल्या राष्ट्रांच्या मानानें संपत्त्युत्पादनांत, राज्यपद्धतींत व युद्धशास्त्रांत बराच मागसलेला होता. कांहीं अंशीं रशियाचा भूविस्तार हाच रशियाच्या मागसलेपणास कारण झाला होता. फिन्स, हंगेरियन्स, सर्वियन्स, झेच्स्, स्लोवॅक्स्, पोल्स वगैरे आजच्या पश्चिम युरोपांतील (फ्रान्स, जर्मनी, ऑस्टिया वगैरे) राष्ट्रीयकांचे पूर्वज फार पूर्वीपासून रशियांत होते. पश्चिम युरोपांत हे राष्ट्रीयक येऊन, रोमन साम्राज्याच्या ऱ्हास-

कालांत त्यांनीं नैसर्गिक मर्यादांनीं विभागलेलीं आजचीं युरोपियन राष्ट्रें निर्माण केलीं. रोमन संस्कृतीचे अवशेष अशा उत्पादनपद्धति, राज्यपद्धति, चालीरीति यांचा वारसा त्यांना मिळाला. शेतीचीं क्षेत्रें आकुंचित असल्यानें शेतीच्या पद्धतींत सुधारणा होऊन उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न होऊं लागला. शेतींत न मावूं शकणारीं माणसें व्यापारांत व हस्तव्यवसायांत पडलीं. राज्यें अनेक झालीं, त्यामुळें शहरें अनेक झालीं, व तेथें सेनापति, सैन्य, इतर अधिकारी व दरबारी माणसें यांचेप्रमाणें व्यापारी, हस्तव्यवसायी कारागिरांचे संघ व मागाहून हस्तव्यवसायी माणसांना मजुरीनें नेमून त्यांच्याकडून कामें करवून घेणारे यंत्रपूर्व कालांतील कारखानदार हेहि राहूं लागले. यामुळें व्यापारी, कारागीर व हस्तव्यवसायी मजूर नेमणारे कारखानदार हे वर्ग पश्चिम युरोपांत मध्ययुगाचे शेवटीं प्रबळ व राज्यसंस्थेचे प्रतिस्पर्धी, आणि अर्थात् तिचे नियामकहि बनले.

पण रशियांतील परिस्थिति याहून भिन्न होती. ज्या स्लाव व इतर वंशांनीं युरोपियन रशियांत वसाहत केली त्यांच्यापूर्वी हा देश रानटी टोळ्यांनीं तुडविला असल्यानें त्यांना सुसंस्कृतीचा वारसा असा कांहींच मिळण्यासारखा नव्हता. लोकसंख्या वाढली म्हणून अथवा राज्यसत्तेच्या व सरदारांच्या जुलुमास भिऊन शेतकरी या विस्तीर्ण देशावर केवळ दूरदूर पसरत सुटले. यामुळें शेतीचा विस्तार झपाट्यानें वाढला तरी तिची सुधारणा झाली नाहीं. उत्तरेकडे, व उरल पर्वत ओलांडून पूर्वेकडे जंगलें जाळीत, तोडीत शेतकऱ्यांनीं शेतीचा प्रसार केला. दक्षिणेकडे मोठमोठे पठार व्यापून तेथें त्यांनीं आपले नांगर घातले. यामुळें पश्चिम युरोपप्रमाणें मोठमोठीं शहरें अथवा कारागीरसंघ रशियांत निर्माण झाले नाहींत. हिंदुस्थानांत, चीनमध्यें व ईजिप्तमध्यें शेतकऱ्यांच्या खेड्यांतूनच घरोघर त्यांच्या खेड्यांच्या गरजा भागविण्यापुरते हस्तव्यवसाय चालत, तसा प्रकार रशियांतील विस्तीर्ण प्रदेशांत होता. पश्चिम युरोपशीं त्यांचा व्यापार पुष्कळ चाले. यामुळें व्यापारी-वर्ग निर्माण होऊं लागला होता. पण तो वर्ग मुख्यतः रशियांतील शेतीचें उत्पन्न युरोपांत पाठवून त्याच्या मोबदला कारागिरीचे युरोपीय पदार्थ रशियांत आणून विकी व नफा मिळवी. रशियाची उत्पादन-पद्धति सुधारण्यास तो वर्ग उपयोगी पडला नाहीं.

भूदासपद्धतीचा शेवट

रशियांत शेतकऱ्यांस शेतीचें उत्पन्न भरपूर मिळे व त्यांतून तो आपल्या गरजेपेक्षां अधिक उरे तें युरोपांत धाडी, असें नव्हे. तर सावकारांचें कर्ज, जमिनदारांचा खंड व सरकारी कर यांची नाण्यांत भर करण्यासाठीं पोटास चिमटा घेऊन शेतकऱ्यास आपल्या जमिनीचें उत्पन्न व्यापाऱ्यांस विकावें लागे आणि युरोपांतून येणारे कारागिरीचे पदार्थ मात्र जमिनदार, सरदार बादशहा व त्यांचे दरबारी यांच्या चैनीसाठीं येत असत. शेत कसणारीं कुळें सरंजामदारांच्या घराण्यांस व त्यांच्या जमिनीस वंशपरंपरा बांधलेलीं असत. या पद्धतीस भूदासकृषिपद्धति (सर्फडम्) म्हणतात. अठराव्या व एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं पश्चिम युरोपांत ही एक प्रकारची गुलामगिरीची पद्धति नष्ट होऊन व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली भांडवलवाल्यांची यांत्रिक कारखानदारी तेथें जारी झाली होती. व्यक्तिस्वातंत्र्यानें व्यक्तीचा दर्जा वाढून पुढें यंत्रोपयोगानें व शास्त्रीय शोधांनीं पश्चिम युरोपांत युद्धकलेंतहि वाढ झाली. पण रशियांत भूदासपद्धतीची गुलामगिरी १८६१ पर्यंत कायम होती, व यांत्रिक उत्पादनास फारशी सुरुवातहि न झाल्यानें युद्धकला मागसलेली होती. क्रिमियन युद्धांत (१८५३–५६) इंग्रज-फ्रेंचांच्या सैन्यापुढें व तोफखान्यापुढें रशियाचा जेव्हां धुव्वा उडाला तेव्हां आपण पश्चिम युरोपापेक्षां मागसलेले असून शेतकऱ्यांच्या गुलामगिरीवर आधारलेली आपली समाजव्यवस्था, या गुलामगिरीचा शेवट केल्याशिवाय, प्रबळ होणार नाहीं, ही गोष्ट त्या वेळचा झार दुसरा अलेक्झांडर यास स्पष्ट दिसली; व त्यानें भूदासपद्धतीचा शेवट करणारा कायदा १८६१ त मंजूर करून रशियास आधुनिक सुधारणेच्या शिखरावर पोंचविण्याचें प्रस्थान ठेविलें.

आर्थिक उत्पादनांत विलक्षण क्रांति

यानंतरच्या चाळीस वर्षांत रशियांतील आर्थिक उत्पादनांत विलक्षण क्रांति झाली. पश्चिम युरोपांत भूदासपद्धति बंद पडल्यानंतर यांत्रिक कारखानदारीचें युग सुरू होण्यास कित्येक दशकांचा काळ जावा लागला होता. पण रशियांत या दिरंगाईची जरूर पडली नाहीं. भूदासपद्धति कायद्यानें रद्द

झाल्यामुळें स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांपैकीं पुष्कळसे शेतकरी मजूर होऊन यांत्रिक कारखानदारीचा रशियांत पाया घालण्यास कारणीभूत झाले.

येथपासून भांडवलशाहीचें मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक उत्पादन झपाट्यानें सुरू झालें. ही वाढ इतकी पुष्कळ झाली कीं १९व्या शतकाच्या शेवटच्या तीस वर्षांत रशिया हें सरंजामी समाजपद्धतीचें राष्ट्र मानण्यापेक्षां मुख्यतः भांडवलशाहीचें राष्ट्रच मानण्यांत येऊं लागलें. भांडवलवाल्यांचे मोठमोठे कारखाने, खाणी, आगगाड्या, पूल, इमारती यांसारखीं भव्य कामें, यांचीं जाळीं ठिकठिकाणीं पसरलीं गेलीं. यांत कांहीं कांहीं कारखान्यांत अथवा बांधणीकामांत दहा दहा हजारपर्यंत मजूर नेमलेले असत. एवढा भांडवलशाहीचा प्रचंड व्याप अगदीं थोड्याच अवधींत रशियांत पसरला.

या वाढीची कल्पना येण्यासाठीं पुढील तुलनात्मक माहिती पाहण्यासारखी आहे. १८९० ते १८९९ या कालांत इंग्लंडांत १८, अमेरिका ५०, जर्मनी, ७२, फ्रान्स ३१, बेल्जम ३२ व रशिया १०८ असें खाणींतून काढलेल्या लोखंडाचें प्रमाण होतें.

खाणींतून निघणाऱ्या कोळशाच्या वाढीचें प्रमाण इंग्लंडचें २२, अमेरिका ६१, जर्मनी ५२, फ्रान्स २६, ऑस्ट्रियाहंगेरी २६, बेल्जम ८ तर रशिया १३१ असें होतें.

तेलाच्या निपजेंत रशियास फक्त अमेरिका हा एकच प्रतिस्पर्धी होता. १८९० ते १८९९ या कालांत अमेरिकेंतल्या तेलाची निपज ९ टक्क्यांनीं वाढली तर रशियांतल्या तेलाची १३२ टक्क्यांनीं वाढली. १८९० चे सुमारास रशिया व अमेरिका यांच्या तेलाचे निपजेंत रशियाचें तेल ३७·७ टक्के व अमेरिकेचें ६२·३ टक्के होतें. १८९९ सालीं हें प्रमाण उलटें लागून रशियाचें तेल ५७·३ टक्के व अमेरिकेचें तेल ४२·७ टक्के भरलें.

विसाव्या शतकाचे आरंभीं कापसाच्या धंद्यांत रशियाचा नंबर इंग्लंड व अमेरिका यांखेरीज कोणत्याहि राष्ट्रांच्या वर लागत होता.

हें वर्णन प्रचंड धंद्यांचें आहे. यांची वाढ होत असतांना लहान व मध्यम आकारमानाच्या धंद्यांचा मोठ्या धंद्यांशीं होणाऱ्या चढाओढींत जो विध्वंस इतर सर्व देशांत झाला, तसा तो रशियांतहि झाला. १८६६ सालीं १०० हून अधिक कामगार असणाऱ्या कारखान्यांपैकीं एक हजार कामगार असणाऱ्या

कारखान्यांत एकंदर कामगार-संख्येच्या २७ टक्के कामगार होते. १८७९ सालीं हें प्रमाण ४० टक्के झालें व १८९० सालीं ४६ टक्के झालें. १८९४ सालीं ६८ कारखाने फार प्रचंड होते व १५६ त्या मानानें लहान होते. या १५६ कारखान्यांत जितके मजूर होते त्याच्या तिप्पट मजूर ६८ प्रचंड कारखान्यांत होते. याचा अर्थ असा, कीं रशियांत कारखानदारी जी वाढली ती मुख्यतः एकदम प्रचंड प्रमाणांत वाढून इंग्लंड, अमेरिका येथल्यासारखे प्रचंड कारखाने रशियांत निर्माण झाले.

एवढी प्रचंड वाढ व तीहि जलद, मुख्यतः रेल्वेमुळें झाली. रशियन जमिनदाराला पैसा दिसूं लागला व त्याचा मोह उत्पन्न झाला. शेतकऱ्यांस पिळून काढून मिळविलेलें धान्य युरोपांत पाठवून त्याचे पैसे करणें किफायतीचें झालें. ही किफायत रेल्वेनें हें धान्य युरोपांत पोंचविल्यास पुष्कळ वाढेल असें पाहून रशियन सरकारनें धान्याच्या मोठमोठ्या प्रदेशापासून काळा समुद्र व बाल्टिक समुद्र यांचे किनाऱ्यांवरील बंदरांना जोडणाऱ्या रेल्वे बांधल्या. तसेंच देशांतल्या देशांत कारखान्यांचा माल शेतकऱ्यांकडे व शेतकऱ्यांचा माल कारखान्यांकडे पोंचविण्यासाठीं रेल्वे बांधाव्या लागल्या. १८६० चे सुमारास रशियांत फक्त एक हजार मैल रेल्वे होती. १८७० चे सुमारास ती ७ हजार मैल झाली. १८८० चे सुमारास ही रेल्वे १४ हजार मैल झाली. १८९० चे सुमारास १८ हजार मैल झाली व १९०० चे सुमारास २८ हजार मैल झाली. रेल्वे बांधण्यामुळें रेल्वेस लागणारा निरनिराळा माल करण्याचे कारखाने काढावे लागले. एंजिनें, रूळ, डबे करण्याचे कारखाने निघाले. स्टेशनांच्या इमारतींचें लोखंडी व इतर सामान करण्याचे कारखाने निघाले. इमारतींचीं कामें वाढलीं. हा सर्व पसारा आटोपणारा मजूरवर्ग एकत्र एकत्र राहूं लागला. यामुळें त्यांच्या गरजा भागविण्यासाठीं मोठमोठ्या बाजारपेठा निर्माण झाल्या. या कामगारांना कपडे, बूट व इतर रोजच्या उपयोगाचे पदार्थ लागत. या मजुरांच्या वसाहतींपासून खेडीं दूर दूर असून खेड्यांत तयार होणाऱ्या हस्तव्यवसायोत्पन्न मालापेक्षां प्रथम युरोपांतील कारखान्यांतला माल रेल्वेनें आणणें व मग रशियांतच कारखाने उभारून तेथेंच तो बनविणें स्वस्त पडूं लागलें; म्हणून त्या मालांचे कारखाने निघाले. अशा प्रकारें जमिनदारांचीं धान्यें युरोपांत पोंचविण्यासाठीं जी आगगाडी आली तिनें मागून आपल्याबरोबर

कारखानदारी-प्रधान भांडवलशाहीची अगदीं नवी समाजघटना रशियांत आणून रुजविली व तिच्या वेलानें हां हां म्हणतां रशियाचें जीवन जखडून टाकलें.

या कारखानदारीच्या वाढीस रशियांतील बेकार व कंगाल शेतकऱ्यांच्या अगदीं हलक्या मजुरीच्या दरानें विशेष मदत झाली. कारण पश्चिम युरोपांत मजुरीचे दर जास्त असल्यानें धनोत्पादनाचा खर्च फार येई व नफा कमी उरे. पण रशियांतील स्वस्त मजुरीमुळें उत्पादनाचा खर्च कमी होऊन नफ्याचा संभव वाढला; आणि नफ्याच्या लोभानें युरोपांतील नफाळू भांडवलदारांची संपत्ति रशियाकडे भांडवलरूपानें धांवून आली.

नवी आर्थिक घटना व जुनी समाजघटना यांचा विरोध

आर्थिक उत्पादनाच्या क्षेत्रांत हें जें स्थित्यंतर घडून येत होतें, त्यानें समाजघटनेचें रूपहि पालटून टाकलें. थोडथोड्या शेतकऱ्यांनीं व सरदारांनीं बनलेलीं व अफाट प्रदेशावर पसरलेलीं असंख्य लहान लहान खेडीं आणि या सर्वांवर अनियंत्रितपणें राज्य करणारा मॉस्कोचा झार यांचे दरम्यान यांत्रिक भांडवलशाहीमुळें भांडवलवाले कारखानदार व त्यांच्या कारखान्यांत राबण्यासाठीं फार मोठ्या संख्येनें एकत्र राहणारा मजूरवर्ग हे दोन प्रचंड वर्ग निर्माण झाले. संपत्तीचें उत्पादन व विनिमय हा जो समाजांतला फार मोठा व्यवहार त्याचें केन्द्रीकरण संघटित अशा भांडवलदारांचे हातीं स्वाभाविकच झालें. मोठमोठ्या कारखान्यांतून फार मोठ्या प्रमाणावर एकत्र येऊन व राहून काम करणाऱ्या मजुरांतहि संघशक्तीची जाणीव उत्पन्न झाली. अशा या नव्यानें जागृत होऊं लागलेल्या जनतेमधील जागृतीस व राजकीय हक्कांच्या मागण्यांस अनुरूप होईल अशा प्रकारें राज्यसंस्थेचें रूप जर बदललें तर, म्हणजे या नवीन जागृत व संघटित वर्गांचें नियंत्रण राज्यसंस्थेवर आलें तरच ती राज्यसंस्था मजबूत, कार्यक्षम व चिरस्थायी होते. पण रशियांतील झार राजांनीं अनियंत्रित सत्तेचा मोह व तीवरील आपली पक्कड राजसिंहासन उलथून पडेपावेतों सोडली नाहीं. पाश्चिमात्य देशांतील नव्या सुधारणा जरूरीपुरत्या घ्याव्या, पण राजांनीं प्रजेस राजकीय हक्क

देणें ही पाश्चिमात्यांस मान्य असलेली गोष्ट आपण कधींहि मान्य करूं नये असें रशियन बादशहांचें सनातन तत्त्व होतें.

अठराव्या शतकाच्या आरंभीं पीटर दि ग्रेट हा जगद्विख्यात झार होऊन गेला. रशिया युरोपला लगत असल्यामुळें पीटरला परचक्राची नेहमीं भीति वाटे. म्हणून त्यानें पाश्चिमात्य शस्त्रास्त्रें व युद्धकला रशियांत आणून अगदीं नव्या पद्धतीचें कवायती सैन्य तयार केलें. हें सैन्य पाश्चिमात्य राष्ट्रांचा पराभव करण्याइतकें प्रबळ कधींच झालें नाहीं; तरी प्रजेंतील असंतोष झोडपून काढण्यास त्याचा चांगला उपयोग होऊं लागला. प्रजेवर राजाचा अंमल दृढ करून करवसूली सख्तपणें करतां यावी यासाठीं त्यानें सरंजामदारांचे राजकीय अधिकार कमी करून पगारी नोकरशाहीकरवीं राज्य करण्याची राज्यकारभारपद्धति रशियांत सुरू केली. यामुळें चाकावर धाव आवळून बसावी असा राजकीय अंमल प्रजेवर दृढतेनें बसला व प्रजेच्या कर्तृत्वाची विकासशीलता असेल नसेल ती सर्वस्वीं खुंटली. प्रजेस राजकीय स्वातंत्र्यासारखे हक्क देण्याची गोष्ट 'उदारात्मा' (ग्रेट) म्हणून नांवाजलेल्या या पीटरला करावीशी वाटली नाहीं. पीटरनंतरच्या काळांत दुसरी कॅथरीन ही एक उदार गणली गेलेली राणी झाली. पण हिनेंहि प्रजास्वातंत्र्याच्या दृष्टीनें कांहींहि केलें नाहीं. प्रजेच्या राजकीय स्वातंत्र्याचा विकास करणें ही गोष्ट कांहीं अंशीं राज्यकर्त्यांना अशक्यच होती असेंहि दिसतें. राजा म्हणजे सर्वतंत्र—स्वतंत्र हें तत्त्वतः खरें होतें; पण मुलकी नोकरशाही, सरंजामदारवर्ग व सैन्याधिकारी आपापल्या हक्कांस जपत, व प्रजेनें राजाच्या प्रेरणेनेंहि त्यांचें अतिक्रमण करूं नये, अथवा तें क्षम्य मानूं नये यासाठीं राजासहि ते धाक दाखवीत; शेतकरी हा असंघटित, दुबळा होता; आणि अज्ञान व हताशा यांमुळें जीविताविषयीं कांहींसा बेफिकीर असल्यानें त्याला राजकीय हक्कांची फारशी जाणीव व पर्वाहि नव्हती.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत औद्योगिक क्रांति होऊन भांडवलदार व मजूर हे जागृत वर्ग निर्माण झाले तरी झार बादशहांनीं आपला सत्तालोभ सोडला नाहीं, अथवा राज्यव्यवस्था बदलली नाहीं. उलट आतां भांडवलदार व मजूर या वर्गांच्या दुहीचा आपली सत्ता अनियंत्रित ठेवण्याकडेच त्यांनीं उपयोग करून घेतला. कारण मजूरवर्गाच्या चढाईस भिणारे

भांडवलदार, मजुरांस दडपून टाकण्यासाठीं अनियंत्रित राज्यसत्तेचें पाठबळ हवें म्हणून, तोपुढें मान तुकविण्यास नेहमींच तयार असत. झार हा पंधरा कोटी प्रजेचा बादशाहा; पण त्यास राज्यव्यवहाराचे नियम राजानें पाळावे याची फिकीरच नसे. १८९७ सालीं काउंट विट्टे हा राज्याचा फडणीस होता. त्या सालच्या बजेटांत 'मिनिस्ट्री ऑफ कोर्ट' या खात्याचा खर्च समाविष्ट करावा असा झारनें त्यास लेखी हुकूम पाठविला. असें करणें कायद्यास धरून नाहीं असें विट्टेनें झारला कळविलें. तेव्हां झारनें आपला हुकूम मागें न घेतां हुकुमाची बातमी फक्त गुप्त राखावी असें विट्टे यांस फर्माविलें; व पुढें कायद्याच्या पुस्तकांतून 'मिनिस्ट्री ऑफ कोर्ट' चा खर्च बजेटांत घालण्याबद्दलच्या हरकतीचें कलम नव्या आवृत्तीचे वेळीं मुकाट्यानें काढून टाकण्यांत आलें. प्रधानमंडळाचे घटक हे झारचे व्यक्तिशः नोकर असत. मुख्य प्रधान असा कोणीच नसे. एकंदर राज्यकारभारांत झारचें कर्तव्य, जबाबदारी व हक्क कोणते याची प्रधानांना कधींच चांगलीशी कल्पना आली नाहीं. स्वतः दिलेले हुकूम झार हवे तसे, हवे तेव्हां फिरवी, व ते फिरविण्यापूर्वीहि स्वतःच त्यांचा भंग करी. नोकरशाहींतील नोकऱ्या बादशहाच्या खुषमस्कऱ्यांना अथवा खुषमस्कऱ्यांकरवीं मिळत. यामुळें लाचारीच्या करामतीवर नोकऱ्या मिळविणाऱ्या नोकरवर्गाला झार प्रजातंत्र नसून अनियंत्रित असणेंच इष्ट वाटे. खालच्या दर्जाच्या सरदारवर्गातूनच मुख्यतः नोकरशाहींत भरती होत असे. खालच्या दर्जाच्या नोकरांना पगार थोडे असत. तेव्हां मूळचे सरदारघराण्यांतील हे नोकर प्रजेची लांचाच्या रूपानें लूट करून आपल्या मिजाशी सांभाळीत.

'प्रजेचा असंतोष नाहींसा करण्याचें साधन म्हणजे पोलिसांचा बडगा' एवढें राज्यशास्त्र या नोकरशाहीस माहीत असे. प्रजेस आपल्या हक्कांची शिकवण देणाऱ्यांचे मार्गे गुप्त पोलीस सावलीसारखा असे व चळवळ्यांना केवळ संशयावरूनहि सैबेरियाच्या जंगलांत हद्दपार करण्यांत येई.

दुसऱ्या अलेक्झांडरनें भूदासपद्धति बंद केली खरी; पण प्रजेचा असंतोष शमला नाहीं. अलेक्झांडर स्वतः अत्याचारी तरुणांच्या बाँबगोळ्यांस १८८१ सालीं बळी पडला. १८८१-९४ या कालांत तिसरा अलेक्झांडर हा झार होता. याच्याहि खुनाचे अनेकदां प्रयत्न झाले. पण त्यानें त्यापासून कांहींच बोध घेतला नाहीं.

"एकतंत्रसत्ता हीच खरी सत्ता असून तींतच सामर्थ्य असतें; आणि प्रजेच्या कल्याणासाठीं या अनियंत्रित सत्तेचें रक्षण केलेंच पाहिजे" असें तो म्हणे. याच्या अमदानींत पोलिसांची सत्ता इतकी वाढली होती कीं, सभा व संस्था बंद करणें आणि बेकायदा ठरविणें, कोणासहि पकडणें, एखाद्यास अधिकारावरून काढणें, एखाद्यास कोर्ट-मार्शल करणें अथवा हद्दपार करणें हे सर्व अधिकार पोलिसांस देण्यांत आले. प्रजेंतला असंतोष वाढतो हें पाहून तिसऱ्या अलेक्झांडरनें खेड्यापाड्यांतून न्यायखातें जवळ जवळ बंद करून 'झेम्स्की नॅचाल्निकी' नांवाचे स्थानिक अधिकारी खेड्यापाड्यांतून नेमले आणि त्यांच्या हातीं न्याय, पोलीस व राज्यकारभार हीं सर्व खातीं सोपविलीं. खेड्यापाड्यांतून 'झेमस्टोव्ह' नांवाचीं स्थानिक स्वराज्य कौन्सिलें असत. पण यांच्यातहि प्रजास्वातंत्र्याच्या चळवळी वाढतात असें पाहून झारनें त्यांच्या निवडणुकीची व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली जुनी पद्धत बदलली व सरदार-वर्ग व सरकारी गुमास्ते हेच बहुसंख्यपणें निवडून येतील अशी पुनर्घटना केली. शाळा, कॉलेजें, विद्यापीठें यांतून असंतोष पढविला जातो असें वाटून तो थांबविण्यासाठीं १८८४ सालीं झारनें विद्यापीठांवर नियंत्रण घालणारे कायदे केले. त्यामुळें प्रोफेसरवर्गाचें स्वातंत्र्य पूर्णपणें नष्ट झालें. यापुढें प्रोफेसरांच्या नेमणुका सरकारकडून होऊं लागल्या. इन्स्पेक्टरांचेकडे शाळा-तपासणीबरोबर विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्याची गुप्त पोलिसाची कामगिरीहि सोंपविण्यांत आली. स्त्रियांना उच्च शिक्षणास मुळींच वाव नव्हता. गरीब वर्गाच्या मुलांना दुर्घ्यम शिक्षण मिळण्यास अनेक अडचणी घालण्यांत आल्या. झेमस्टोव्हज्करवीं शेतकऱ्यांतून शिक्षणप्रसार होण्यास अनेक प्रतिबंध निर्माण करण्यांत आले. वाचनालयें व प्रौढांचे व्यासंग-वर्ग काढण्यास प्रधान-मंडळाची परवानगी लागूं लागली. लोकमतास दडपण्याचे अनियंत्रित अधिकार आणि राज्ययंत्रास कार्यक्षम व कोणत्या तरी एका शिस्तींत ठेवील अशा निश्चित शासनप्रबंधाचा अभाव, यांमुळें राज्यकारभारांत जुलूम, अव्यवस्था व लांचलुचपत यांचा बुजबुजाट झाला होता. एकाच कार्यासंबंधीं एकाच अधिकाऱ्याच्या हातीं एकाच वेळीं चार चार परस्परविरुद्ध हुकूम पडत. कोणत्याची बजावणी करावी याचें त्यास कोडें पडे. पण वरिष्ठांची इतराजी न

होईल अशा प्रकारें कोणत्याहि हुकुमाची बजावणी केली व त्या योगें प्रजेवर जुलूम झाला तर त्याची पर्वा करण्याचेंहि त्यास कारण नसे.

एकोणिसाव्या शतकांतील विचारक्रांति

पण स्वातंत्र्यासाठीं हळूहळू जागृत होऊं लागलेल्या लोकमतास अशा प्रकारें दडपून टाकण्याचे प्रयत्न सरकारनें कितीहि कसोशीनें व व्यापकपणें केले तरी त्यांत त्यांना फारसें यश आलें नाहीं. रशिया हा देश युरोप व आशिया यांचे दरम्यान आहे. म्हणून या दोहोंतील 'चांगल्या' गोष्टींचाच तेवढा स्वीकार करून 'वाईट' गोष्टी टाकाव्या अशी पीटर दि ग्रेट याची आकांक्षा होती. सरंजामदारांच्या हातीं फारशी राज्यसत्ता न देतां पाश्चिमात्य तऱ्हेनें शिक्षण घेतलेली नोकरशाही नेमून तिच्यामार्फत सर्व सत्ता एकमुखी करावी, यासाठीं तरुणांना पाश्चिमात्य विद्या व कला यांचें शिक्षण द्यावें, तसेंच युद्धकला श्रेष्ठ दर्जाची करावी व तिच्या बळावर मुलुखगिरी करून व्यापाऱ्यांना नवीं नवीं क्षेत्रें मिळवून द्यावीं हें पाश्चिमात्यांच्या अनुकरणानें करणें त्यास इष्ट वाटे. पण प्रजास्वातंत्र्याच्या पाश्चिमात्य चळवळी या अनिष्ट असून त्यामुळें बेबंदशाही होईल, यासाठीं त्या बाबतींत पाश्चात्यांचें अनुकरण न करतां राजा व प्रजा यांचे संबंध पिता-पुत्रासारखे असावे, राजानें प्रजेचा सांभाळ करावा आणि प्रजेनें राजाज्ञेस निमूटपणें मान वाकवावी हें पौरस्त्य मतच पीटरला अधिक पसंत होतें.

"फक्त कांहीं थोडींच दशकें आपणांस पश्चिमेची गरज आहे, पुढें आपण तिकडे पाठ फिरवूं" असें पीटर याच अर्थानें म्हणे. पण नोकरशाहीचें सुदृढ राज्य व्हावें व व्यापारधंद्यांची भरभराट व्हावी म्हणून पाश्चिमात्य विद्या, कला व शास्त्रीय शिक्षण यांचा प्रसार रशियन तरुणांत पीटरनें सुरू केल्यावर त्यामुळेंच उत्पन्न होणारी विचारक्रांति व प्रजास्वातंत्र्याची लालसा कायमची थोपविणें राज्यकर्त्यांना अशक्य होतें. यामुळें या शिक्षणाबरोबर लोकस्वातंत्र्याकांक्षेचें बीजहि १८व्या शतकांतच रशियांत वाढीस लागलें. १८व्या शतकाच्या अखेरीस फ्रान्समध्यें समाजक्रांति व राज्यक्रांति होऊन क्रांतिकारक फ्रेंचांची स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यासंबंधींची घोषणा नेपोलियनच्या भरारीबरोबर आगीप्रमाणें युरोपभर पसरली. आणि तिची आंच रशियांतील

सरंजामदारांतील तरुणांसहि लागल्यावांचून राहिली नाहीं. १९व्या शतकाच्या आरंभीं नेपोलियनशीं लढण्यासाठीं जे तरुण युरोपांत गेले व रशियन भूमीवरहि त्याच्याशीं झगडले, त्यांना आपण स्वदेश-स्वातंत्र्यासाठीं झगडत आहों असें वाटत असे. अशा सरंजामदार व जमिनदार तरुणांचा सैन्यांत मोठाच भरणा असे. नेपोलियनचा मोड झाल्यावर यांना जेव्हां स्वदेशीय राजकारणांत कांहींच स्थान मिळेना, प्रजेवर राजाचा व नोकरशाहीचा प्रखर जुलूम होत आहे हें जेव्हां त्यांनीं पाहिलें त्या वेळीं ज्या उच्च तत्त्वांसाठीं आपण झगडलों तीं या राज्यकर्त्यांच्या गांवींहि नाहींत हें पाहून त्यांना त्वेष आला. उच्च भावनांचा हा उपमर्द सहन करणें हें त्यांना घोर अपमानाचें वाटलें. "स्वदेशासाठीं आम्हीं रक्त सांडलें, जुलुमी अशा परकी सुलतानांपासून आम्हीं स्वदेशाचें रक्षण केलें, पण आमचे हे घरचे सुलतानहि आम्हांवर जुलूमच करीत आहेत" हें त्यांना असह्य झालें. अशा कांहीं सैन्यांतील तरुण अधिकाऱ्यांनीं १४ डिसेंबर १८२५ रोजीं बंड उभारून आम्हांस सनदशीर राज्यघटना पाहिजे अशी मागणी केली. हें बंड 'डिसेंब्रिस्ट' बंड म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. यांना जनतेचा पाठिंबा नव्हता. स्वतः बंडवाल्यांची संख्याहि थोडी होती; व शस्त्रास्त्रसाधनेंहि त्यांजवळ फारशीं नव्हती. आपला पराभव होणार हें त्यांना स्वतांलाहि माहीत होतें. पण उच्च तत्त्वांचा झारकडून होणारा उपमर्द आणि जुलुमाखालीं चेंगरल्या जाणाऱ्या प्रजेची स्वास्थितीबद्दल उदास व हताश वृत्ति या दोहोंचीहि त्यांस चीड आली, आणि कांहीं तरी घनघोर दिव्य करून आपण सगळा देश "हादरून टाकूं" व "आपल्या अपयशानें इतरांना उज्ज्वल उदाहरण घालून देऊं" एवढ्याच आशेनें उघड्या डोळ्यांनीं त्यांनीं बंड उभारलें. बंडाचा तात्काल मोडहि झालाच. पण त्यांनीं पेटविलेली स्वातंत्र्य-लालसेची ज्योत जागृत व सुशिक्षित तरुणांत कायम राहिली. या दृष्टीनें त्यांना 'यश'हि आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं!

सुशिक्षितांचा असंतोष व त्यांची जनतेकडे वळलेली दृष्टि याचें प्रतिबिंब एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील वाङ्मयांत ठळकपणें दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें. डॉ. पिरोगोव्ह, कौंट टॉलस्टॉय, उशिन्स्की, स्टॉयुनिन वगैरे लेखकांनीं कथा व निबंध यांनीं जनतेची दुःस्थिति वाचकवर्गापुढें मांडून तरुणांचीं मनें समाजसुधारणेच्या व राजकीय स्वातंत्र्याच्या आकांक्षांनीं भारून टाकलीं.

स्थानिक स्वराज्य कौन्सिलें, म्हणजे झेमस्टोव्ह्ज, यांत पुष्कळसा वरिष्ठवर्गीयांचाच भरणा असे. पण त्यांतील तरुणांचीं अंतःकरणें स्वातंत्र्याच्या लालसेनें व जनताप्रेमानें चेतल्यामुळें त्यांनीं शिक्षणप्रसाराचें फार मोठें काम हातीं घेतलें. नवीन उदयास येणाऱ्या भांडवलदारवर्गासहि आपल्या भरभराटीसाठीं जनतेची उत्पादनशक्ति वाढविणें इष्ट होतें; म्हणून त्यांनीं या शिक्षणप्रसारास सढळ हातानें मदत केली. १८७४ चे सुमारास खेड्यापाड्यांतून सुमारें २३ हजार शाळा झेमस्टोव्ह्जमार्फत स्थापल्या गेल्या होत्या आणि सुमारें दहा लक्ष प्रौढ व लहान स्त्री-पुरुष विद्यार्थी या शाळांतून शिकत होते. हा शिक्षणप्रसारच असंतोषाचें बीज पेरतो या भीतीनें तिसऱ्या अलेक्झांडरनें पुढें या शिक्षणसंस्था बुडविल्या.

दहशतवादी तरुणांचा संप्रदाय

झारशाही उलथून पाडून राज्यक्रांति करावी असें मानणाऱ्या व त्यासाठीं अहर्निश झटणाऱ्या तरुणांची संख्या मात्र नेहमींच फार थोडी होती. राज्यक्रांतीच्या कल्पनाहि बऱ्याच अपक्व होत्या. कोणत्याहि स्वरूपाची उघड चळवळ करणें शक्य नसल्यानें आपले हेतु जनतेस उघडपणें कळवून जनतेचा पाठिंबा मिळविणें क्रांतिवादी तरुणांस अशक्य होतें. लोकांना हवें तरी काय व त्यांची मनःस्थिति कोणत्या प्रकारची आहे, याचें या तरुणांना प्रत्यक्ष अनुभवानें आकलन करून घेण्यास कधींच संधि मिळाली नाहीं. यामुळें झार व अधिकारी यांचा जुलूम एवढाच त्यांच्या डोळ्यांत एकसारखा सलत राहिला. हे अधिकारी व झार मारून टाकिले अथवा त्यांना दहशत घातली कीं सर्व परिस्थिति जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें क्षणार्धांत उत्कृष्ट होईल असें त्यांस वाटे, आणि म्हणून इतकें श्रेष्ठ फल पदरीं पाडून घेण्यासाठीं साधनें या नात्यानें कितीहि अनन्वित कृत्यें करावीं लागलीं तरी त्यांत गैर नाहीं असें त्यांचें मत झालें. सरकारी अधिकारी व झार यांच्या खुनांचे अनेक प्रयत्न या क्रांतिकारक तरुणांतूनच झाले. दुसरा अलेक्झांडर अशा दहशतवादी तरुणांच्या बाँबगोळ्यांस बळी पडला, व तिसऱ्या अलेक्झांडरच खून करण्याचाहि प्रयत्न झाला. प्रसिद्ध अनार्किस्ट रशियन पुढारी बकुनिन यास मुळीं कोणतीच शासनसंस्था जगांत राहूं नये असें वाटत असून तो अशा

दहशतवादाचाच पुरस्कर्ता होता. या दहशतवाद्यांचें वर्तन विचारी लोकांस पसंत नव्हतें; पण लोकदुःखनिवारणासाठीं दुसरा इलाज कोणता, हेंहि त्यांना सांगतां येत नसे व म्हणून या दहशतवादी पंथाबद्दल हे विचारवंत लोक गुप्त अथवा उघडपणें सहानुभूति दाखवीत. व्हलाडिमीर कोरोलेको यानें आपल्या आठवणींत टॉलस्टॉयची एक मुलाखत दिली आहे, तींत टॉलस्टॉयनें दहशतवाद्यांशीं मतभेद दर्शवूनहि त्याबद्दल सहानुभूति व्यक्त केल्याचें आढळून येतें.

अहिंसावादाचीं एकांतिक पुरस्कर्तीं माणसें हीं अशा प्रकारें वैतागानें बोलूं लागलीं तेव्हां परिस्थिति फार भयंकर झाली असली पाहिजे हें झार बादशहांना पटावयास हवें होतें. पण दडपशाहीनें सर्व बस्तान नीट बसलें असा त्यांचा विश्वास असल्यानें त्यांनीं लोकमत समजून घेण्याची फारशी पर्वा कधींच केली नाहीं.

शेतकरीवर्गाची परिस्थिति

क्रांतिकारक तरुणांचा असंतोष हें झारिस्ट रशियाचें खरें संकट नव्हतें. एकंदर समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था जी मुळांतच किडली होती, त्याचें तें फक्त निदर्शक चिन्ह होतें. एकंदर समाजाचा मुख्य आधार म्हणजे शेतकरीवर्ग. महायुद्ध सुरू होण्यापूर्वीपर्यंत यांत्रिक कारखाने पुष्कळच वाढले होते; तरीसुद्धां शेंकडा ८३ इतकी लोकसंख्या शेतीवर जगत असे. कमालीचें दारिद्र्य व कमालीचा जुलूम हाच या प्रचंड वर्गाचा भोगवटा होता. प्राचीन काळीं शेतकरी नव्या नव्या वसाहती पसरी व ग्रामसंस्था स्थापून राहात. या ग्रामसंस्थांना 'मीर' ही संज्ञा होती. निरनिराळ्या खेड्यांतून सारा गांव मिळून ग्रामसंस्थेतर्फे सरकारांत कर भरी. यामुळें करवसुली करणें सरकारास फार सोपें असे. करवसुली झाली कीं पुन्हा पुढील सालच्या करवसुलीच्या वेळेपर्यंत राजाशीं किंवा अधिकाऱ्यांशीं शेतकऱ्यांचा संबंध येत नसे. पुढें पश्चिम युरोपाशीं संबंध वाढूं लागला व वाढत्या लष्कराची गरज भासूं लागली. सैनिक व पैसा यांची गरज व निकड वाढली, तेव्हां सोळाव्या शतकांत झार बादशहांनीं पराक्रमी सेनापतींना खेड्यांतील जमिनी बहाल करण्याचा सपाटा चालविला. सैन्यास माणसें मिळविणें हें मुख्य काम या नव्या जमिनदारांकडे

असे. आपल्या जमिनी या नव्या जमिनदारांना दिल्या, याची शेतकऱ्यांस प्रथम दखलच नव्हती; पण हळूहळू या जमिनदारांच्या मालकीचा कांच शेतांच्या व शेतकऱ्यांच्याहि मानेभोंवतीं आवळूं लागला व शेतकरी हा भूदास म्हणजे एक प्रकारचा गुलाम झाला. त्याचें व्यक्तिस्वातंत्र्य पार नष्ट झालें. पीटर थी ग्रेटच्या अमदानींत पाश्चिमात्य पद्धतीचें लष्कर व पाश्चिमात्य पद्धतीची करडी नोकरशाही सुरू झाली. पण त्यामुळें राज्यकारभाराचा खर्च मात्र चौपट वाढून करभारहि चौपट झाला, अर्थात् कर देण्याचें त्राण लोकांत नसल्यामुळें त्यांच्यावरील जुलुमास सीमा राहिली नाहीं. १८व्या शतकाच्या आरंभापर्यंत कर वसूल करणारे अधिकारी नेमलेले असत. ते करवसुलींत अतिशय क्रूरतेनें वागत. पुढें करवसुली जमिनदारांकडे आली, पण जुलूम वाढला, कमी झाला नाहीं. शेतकरी हा जवळजवळ कुत्र्या-गाढवासारखा जमिनदाराच्या मालकीचाच होता. त्याची गुरांप्रमाणें विक्री करण्यांत येई. काम चुकविल्याबद्दल त्यास मरेपर्यंत फटके मारणें हा प्रकार अगदीं सामान्य असे. सैबेरियाच्या बर्फमय प्रदेशांत केवळ्याहि किरकोळ गुन्ह्यांसाठीं त्यास हद्दपार केलें जाई. "सगळ्या जमिनदारांना खूष करण्याचा हा सोप्यांत सोपा मार्ग आहे" असें न्यायाधिकारी आपल्या कृत्याचें समर्थन करीत. एकंदर शेतकऱ्यांपैकीं दोनपंचमांश शेतकरी अशा प्रकारें जमिनदारांचे गुलाम असत. बाकीचे सरकारी जमिनीवरील शेतकरी, स्वतंत्र वसाहतवाले वगैरे असत. पण करभार असह्य होऊं लागल्यामुळें सर्वांची स्थिति अधिकाधिक वाईट होत गेली.

शेतकरीस्वातंत्र्याचा कायदा अपायकारक ठरला

१८६१ सालीं शेतकऱ्याची गुलामगिरी रद्द करण्यासंबंधीं दुसऱ्या अलेक्झांडरनें कायदा करून सुमारें सव्वादोन कोटि स्त्री-पुरुष शेतकऱ्यांना जमिनदारांपासून व्यक्तिस्वातंत्र्य मिळवून दिलें. पण यानें शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिति सुधारण्यापेक्षां अधिकच वाईट झाली. व्यक्तिस्वातंत्र्य पावलेल्या या शेतकऱ्यांना जमिनी मिळवून देणें अवश्य होतें. पण त्या जमिनी जमिनदारांपासून काढून घेऊन शेतकऱ्यांस देण्याचें धैर्य सरकारास होईना. म्हणून शेतकऱ्यांची गुलामागिरी संपली, पण त्याचा परिणाम आपणांस जमिनींतून अजीबात हुसकून लावण्यांत आलें, एवढाच शेतकऱ्यांस दिसला.

त्याची कांहीं तरी सोय लावणें भागच म्हणून जमिनदारांच्या जमिनींतील शेंकडा ३४ इतकी नापीक जमीन शेतकऱ्यांस हस्तेबंदीनें विकत घेतां येईल अशी सोय करण्यांत आली. पण या जमीनखरेदींत शेतकऱ्यांस जितकें करकचून बांधण्यांत येईल तेवढें बांधण्यांत आलें. शेतकऱ्यास व्यक्तिस्वातंत्र्य व मालकीची जमीन मिळाली म्हणजे तो जमिनदाराच्या जमिनी करणार नाहीं हीं जमिनदारांस भीति होती. तेव्हां जमिनदारांनीं ज्या नापीक जमिनी शेतकऱ्यांस विकल्या, त्या लहान लहान तुकड्यांच्या व दूरदूर अंतरावरच्या विकल्या. मूठभर जमिनदारांच्या मालकींत शेंकडा ६६ टक्के इतकी व तीहि सुपीक जमीन असे. उलट कोट्यवधि शेतकऱ्यांस बाकीची व अगदीं नापीक जमीन मिळून तिचेहि इतके लहान लहान व दूरदूरचे तुकडे शेतकऱ्यांस मिळाले कीं जमिनदारांच्या जमिनी ते मागतील तितक्या वाढीच्या खंडानें घेणें शेतकऱ्यांना भाग पडूं लागले. करभार कमी झाला नाहीं व ग्रामसंस्थेतर्फे (मीरतर्फे) कर घेण्याची पद्धत सरकारास सोइस्कर असल्यामुळें, मध्यंतरीं शेतकऱ्याच्या गुलामगिरीच्या काळांत या गुलामांपुरती लुप्त झालेली, ही सामुदायिक करपद्धति पुन्हा जारी झाली. यामुळें कायद्याच्या भाषेंत व्यक्तिशः स्वतंत्र झालेला शेतकरी आर्थिक दृष्ट्या हरळीच्या मुळीसारखा जमिनींत रुतून राहिला. शहरांतील कारखान्यांना मजूर लागत, ते, खेड्यांतून जमीन विकत घेतां न आल्यामुळें बेकार होणाऱ्या शेतकऱ्यांतून मिळत; पण या बाबतींत ग्रामसंस्थेचा काच फार भयंकर असे. शेतकऱ्यांची संख्या कमी झाल्यास जमीन कसली जाणार नाहीं व कर सहन करणाऱ्यांचा आंकडा कमी होईल म्हणून ग्रामसंस्थाधिकारी अगदीं नाइलाज झाल्यावांचून कोणास ग्रामसंस्था सोडून जाऊं देत नसे. पळून जाणाऱ्या शेतकऱ्यांना वाटेल तितक्या कडक शिक्षा करण्याची सत्ता या ग्रामसंस्थांना होती. ग्रामसंस्था म्हटली कीं, तेथें स्वायत्तता, सौख्य हीं असावयाचींच व पूर्वी सगळ्या ग्रामसंस्थांतून तीं असत असा एक रूढ समज आहे. पण इतिहासाचा अनुभव या समाजास फारसा आधार देणारा असल्याचें आढळून येत नाहीं.

कोणतीहि अर्धवट सुधारणा समाजाचें सुख न वाढवितां उलट दुःखांत भर घालते ही गोष्ट १८६१ सालीं शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट झाल्यानंतर दिसून आली. जमिनदाराचे गुलाम असलेल्या शेतकऱ्यांना कसें तरी का

होईना, पण सक्तीनें पोसणें येवढी तरी जबाबदारी जमिनदारवर्गावर होती तीहि यानंतर राहिली नाहीं. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीस अवश्य इतकी जमीन त्यांना द्यावयाची तर त्यांसाठीं जमिनदारांच्या जमिनी हिसकून घेणें अवश्य होतें, पण एवढें धैर्य झारला नव्हतें. यामुळें जमिनदारांच्या जमिनी हिसकून न घेतां शेतकऱ्यांना फक्त व्यक्तिस्वातंत्र्य देऊन त्यानें 'तडजोड' केली. या तडजोडीनें शेतकऱ्याच्या गुलामगिरीच्या संसाराची फक्त मोडतोड केली. त्यास नवीन संसार उभारतां आला नाहीं. एकाद्या पक्ष्यास पिंजऱ्यांतून काढून अफाट समुद्रावरील आकाशांत सोडून द्यावें तशी रशियन शेतकऱ्याची १८६१ च्या कायद्यानें दशा झाली. पिंजऱ्यांतल्या कैदखान्याबरोबरच तेथला त्याचा आधारहि सुटला व भयाण आकाशांत तो निराधारपणें फिरूं लागला. पंख दमले कीं समुद्रांत मृत्यु, अशी त्याची अवस्था झाली. शेतकऱ्यांच्या जमिनी व जमिनदारांच्या जमिनी यांत भयंकर अंतर असे. जास्तींत जास्त आठ-आठ नऊ-नऊ एकरांचे शेतकऱ्यांच्या जमिनींचे तुकडे असत, तर वीस-वीस हजार एकरांची एकेका जमिनदाराची जमीन असे. सुमारें ७०० जमिदारांना प्रत्येकाच्या मालकीची सरासरी ८०००० एकर जमीन होती. या ७०० जमिनदारांची एकंदर जमीन ६ लक्ष लहान शेतकऱ्यांच्या एकंदर जमिनीच्या तिप्पट होती. करमाराचें प्रमाण असें होतें कीं "शेतकऱ्यांना जेथें एक रुबल द्यावा लागतो तेथें जमिनदारांना एक कोपेकहि (रुबलचा शंभरांश) द्यावा लागत नाहीं" असें जमिनदारांपैकींच काहीं परोपकारी गृहस्थांनीं १८६१ नंतर उत्पन्न झालेल्या परिस्थितीची चौकशी करून पुढें जाहीर केलें होतें. अशा परिस्थितींत शेतीची सुधारणा होऊं शकली नाहीं हेंच स्वाभाविक होतें. शेतीची उन्नति कशी झाली आहे हें पाहण्यासाठीं नमुन्यादाखल १२००० इस्टेटी तपासण्यांत आल्या; त्यांत असें आढळून आलें कीं उत्तम सुपीक अशा काळ्या जमिनीपैकीं निम्म्या जमिनीवर गुरेंच नव्हतीं. आणि बाकीच्या निम्म्या जमिनीवरील शेतकऱ्यांना शेत कसण्याचीं मालकीचीं साधनें नसत. "यावरून उघड असें अनुमान निघत होतें, कीं मोठमोठ्या जमिनी बाळगणारे जमिनदार मोठ्या प्रमाणावर शेतीची सुधारणा मुळींच करीत नसत." यामुळें खंडानें शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीचें उत्पन्न वाढविणें कधींच शक्य नसे. जमिनदारांचा खंड मात्र शेतकऱ्यांतील चढाओढीनें ठरत असल्यामुळें

जमिनीसाठीं हपापलेला शेतकरी अर्धपोटीं राहण्यास तयार होऊन जास्तींत जास्त खंडाच्या करारावर जमीन कसण्यास घेई. यामुळें गुलामगिरीपूर्वीच्या काळापेक्षां जमिनदारांना आपल्या इस्टेटींचें उत्पन्न अधिक मिळूं लागलें. आणि कदाचित् यामुळेंच त्यांना जमिनीची सुधारणा करावीशी वाटली नाहीं. कांहीं शेतकरी कुळें स्वखर्चानें जमिनीचा मगदूर वाढवीत. पण खंडाच्या चढाओढीच्या तत्त्वामुळें कांहीं दिवसांनीं त्याचें फल खंडवाढीच्या रूपानें जमिनदारांना मिळे. कांहीं शेतकऱ्यांनीं आपली मालकीची शेती सुधारून आपणांस उच्च दर्जा मिळविला होता. यामुळें शेतकऱ्या-शेतकऱ्यांतहि उच्चनीच दर्जा निर्माण झाला होता. पण "शेतकऱ्यांतील हा वर्गभेद व आर्थिक विषमता हें या काळाचें विशेष लक्षण नव्हतें. एकंदर सर्व शेतकरीवर्ग व एकंदर जमिनदारवर्ग यांमधील विरोध हाच अतिशय प्रखर होता. कारण अनियंत्रित चढाओढीच्या खंडानें जमीन लावण्याची पद्धत व मालकीची जमीन वाढविण्याच्या संधीचा अभाव अशा परिस्थितींत चांगल्या शेतकऱ्यांना अगदीं थोड्या मर्यादेपलीकडे आपल्या शेतीची सुधारणा करणें अशक्य होतें. यामुळें खेड्यांतील धनिक व दरिद्री शेतकरी आणि त्यांवर पोसले जाणारे व्यापारी वगैरे वर्ग जमिनदारी पद्धति उलथून टाकण्यासाठीं एकसारखा झगडा चालवीत." (इलस्ट्रेटेड हिस्टरी ऑफ् रशियन रेव्होल्यूशन, खंड १ ला.)

कामगारवर्गाची हलाखी

१८६१ नंतर कारखान्यांची वाढ झपाट्यानें झाली असें मागें सांगितलें. पण त्याबरोबरच मजूरवर्गाची स्थिति मात्र मुळींच सुधारली नाहीं. सरकार हें जसें शेतकऱ्यांचें 'माबाप' तसेंच तें मजुरांचेंहि कां नव्हे, असें सरकारला वाटे. 'मजुरांच्या हितसंबंधांचें रक्षण करणें हा तर सरकारचा मुख्य हेतु आहे' असें सरकार म्हणे. पण "प्रत्यक्ष व्यवहारांत या शब्दांचा अर्थ अगदीं निराळा होई. सशस्त्र पोलीस व लष्कर, धरपकडी आणि हद्दपारी हीं साधनें संपाविरुद्ध वापरलीं जाऊन या प्रकारें मजुरांचें 'रक्षण' करण्यांत येई." (रशिया–मॅकीव व ओहारा कृत.) १८८० पूर्वीं कारखानदार व मजूर यांचे संबंध नियंत्रित करण्याचे कायदेच नव्हते. कारखान्यांतून जी "अन्याय्य,

निर्दय, अमानुष पिळणूक चाले" ती पाहून कारखान्यांचे सरकारी तपासनीस आश्चर्यचकित होत. मजुरांना चुक्याबद्दल दंड किती करावा याला सीमाच नव्हती. ४० टक्क्यांपर्यंतहि मजुरी दंडादाखल कापली जाई. पगार बहुतेक कारखान्यांत नियमितपणें मिळत नसत. मजुरांना लागणारा पुष्कळसा माल कारखान्यांच्या दुकानांतून मजुरांस विकण्यांत येई व त्याच्या किंमतींत मजुरी वळती केली जाई. या दुकानांतून माल अगदीं वाईट ठेविलेला असून १०० टक्केपर्यंतहि नफा कारखानदार मारीत. परिस्थिति असह्य होऊन कामगारसंघटना व चळवळी बळावल्यामुळें १८८१ ते १८८६ या काळांत लहान-मोठे सुमारें ५० संप झाले. त्यांत ८८००० मजुरांनीं भाग घेतला होता; त्यामुळें सरकारनें या कामीं थोडथोडें लक्ष घालावयाचें ठरवून मुलांच्या नोकऱ्यांवरील नियंत्रणाचे कायदे केले. पण त्यांत सुद्धां मजुरांची स्थिति सुधारावी हा मुख्य हेतु नसून 'मालाची निपज इतकी वाढली आहे कीं त्यांनीं बाजार तुंबले आहेत, तेव्हां निपज घटविली पाहिजे' हा मुख्य हेतु होता. मजुरांचे संप दडपण्यास पोलीस व लष्कर यांचा सर्रास उपयोग करण्यांत येई. पंण हें अपुरें आहे असें सरकारलाच दिसूं लागलें. यासंबंधीं झारचा गृहमंत्री आपल्या रिपोर्टांत लिहितो, "स्थानिक अधिकाऱ्यांच्या चौकशीवरून असें समजून येत आहे कीं, या संपाचें स्वरूप पुढें फार भयंकर होईल. कामगार व कारखानदार यांचे संबंध नियंत्रित करणारे कायदे नसल्यामुळें हे अनर्थकारक संप होत आहेत. संप बंद पाडण्यास लष्कराचा उपयोग करावा लागतो, यावरूनच हें उघड दिसत आहे कीं, कारखानदारांच्या अनियंत्रितपणास आळा घालून हल्लींचे दुःखकारक प्रकार नच घडतील अशी व्यवस्था करण्यासाठीं कायदा केला पाहिजे."

गृहमंत्र्यांच्या शिफारशीवरून १८८६ सालीं कायदा झाला. त्याचा हेतु कारखानदार व कामगार यांमधील करारावर, अमर्याद दंड करणें, पगार अडकवून ठेवणें वगैरे बाबतींत कामगारास संरक्षण मिळेल अशा प्रकारें, नियंत्रण घालणें हा होता. पण या कायद्यांतहि निःपक्षपात नव्हता. कामगारांस जाच होईल व कारखानदारांस सवलत मिळेल असें त्याचें स्वरूप होतें. उदाहरणार्थ, हा कायदा मोडणाऱ्या कामगारास गुन्हेगार ठरवून तुरुंगांत डांबण्यांत येई. आणि कारखानदारास मात्र दंडावर निसटून जातां येई. असली सौम्य

शिक्षाहि कारखानदारास केली जात नसेच. कारखानदारावर कायद्याची नीट बजावणी होत नाहीं असे म्हणणारे १९०१ सालीं सुमारें २०००० अर्ज सरकारकडे आले. चौकशीअंतीं या सर्व तक्रारी खऱ्या असल्याचें आढळून आलें. मजुरांना संघ स्थापण्याचा हक्क नव्हताच. संप करणें ही गुन्हेगारी असून त्यासाठीं सैबेरियांत हद्दपार केलें जाई. मजुरांचीं वसतिस्थानें हीं उकिरडे व ड्रेनेज यांच्या प्रतिकृति असत. त्यांत माणसें किड्या-मुंग्यांसारखीं कोंबलेलीं असत. कारखानदार व कामगार यांचेमध्यें मध्यस्थी करून तंटे कमी करावे म्हणून १८८१ सालापासून नेमलेल्या तपासनीस अधिकाऱ्यांनींच हीं वर्णनें दिलीं आहेत. असे अधिकारीहि अगदीं थोडे नेमलेले असत. २००० कारखान्यांना एक मुख्य तपासनिस व एक उपतपासनीस असे अवघे दोन अधिकारी होते. या तपासनिसांनाच जे मजूर व मजूरपुढारी क्रांतिकारक असतील त्यांची वर्दी गुप्तपणें पोलीसला देण्याचें काम पुढें सांगण्यांत येऊं लागलें. कारखान्यांच्या कायद्यांचा मुख्य हेतु शांतता राखणें व कारखानदारांच्या हितसंबंधांचें रक्षण करणें हाच होता. या कार्यासाठीं स्वतंत्र पोलीसखातें निर्माण करण्यांत आलें होतें. या खात्याकडे व कारखानदारांकडे क्रांतिकारक मतप्रचारावर टेहळणी ठेवण्याचें काम सोंपविलेलें असे. अर्थात् "मजूरवर्ग व त्यांचे पुढारी एक प्रकारच्या गुप्त कारस्थानाच्या वातावरणांत वावरत. कोणतीहि उघड चळवळ अथवा संघटना त्यांस करतां येत नसे. उपासमार, छळ व कैदखाना हाच त्यांचा जीवनक्रम असल्यानें त्यांना राष्ट्रीय आर्थिक उन्नतींत अथवा अवनतींत कांहींच ममत्व नसे. यामुळें क्रांतिकारक मतें शिकविणाऱ्या पुढाऱ्यांचे विचार त्यांनीं भक्तिभावानें ऐकले यांत कांहींच नवल नाहीं." (रशिया –मॅकीव व ओहारा कृत.)

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं..... नं.

प्रकरण २ रें

क्रांतीचा पहिला धक्का (१८९५-१९०५)

रशियांतील चौदापंधरा कोटि जनता विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत केवढ्या भयंकर जुलुमाखालीं भाजली जात होती आणि शेतीच्या मागसलेपणामुळें तिचें दारिद्र्यदुःख किती दुर्धर होतें, याची कांहींशी कल्पना पहिल्या प्रकरणांत दिली आहे. हें दारिद्र्य व हा जुलूम इतर राष्ट्रांत कधींच नव्हता असें नव्हे. पण इतर राष्ट्रांत लोकमताचा विजय होऊन अथवा त्यांचें सरकारवर वजन पडून जुलूम व दारिद्र्य मधून मधून थोडथोडें कमी होत असे. रशियांत असा लोकसुखाचा व लोकस्वातंत्र्याचा 'क्रमविकास' जवळ जवळ कधींच झाला नाहीं. लांडगा आला कीं कोंकरें सैरावैरा पळूं लागतात, तसें झारचा जुलूम असह्य झाला अथवा लोकसंख्येच्या वाढीमुळें एकाच जमिनींत उपासमारीनें घेरलें कीं शेतकरी नांगर हातीं धरून सपाट प्रदेशावर दूर दूर वसाहतीस जाई. झारचा जुलूम व दारिद्र्य तेथेंहि त्यास गांठीत. याच क्रमांत झारच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं शेतकऱ्यांच्या जमिनी राज्यसत्तेनें बळकावून शेतकऱ्यांस गुलाम केलें. वांझोट्या धरणीशीं अहर्निश झगडण्यांत गुंतलेल्या शेतकऱ्यांस आपण स्वतंत्र होतों म्हणजे काय होतों व गुलाम झालों म्हणजे आतां झालें काय, हें कधीं उमगलेंच नाहीं; अथवा उमगलें असल्यास त्याविरुद्ध झगडण्यास तो असमर्थ होता.

अनियंत्रित सत्तेविरुद्ध पहिले हल्ले

या जुलुमी राज्यसंस्थेस व समाजसंस्थेस विरोध झालाच नाहीं असें नव्हे. शेतकऱ्यांतच एखादा कर्तबगार व शूर पुढारी निघे आणि तो शेतकऱ्यांचा जमाव करून बंड उभारी. सतराव्या व अठराव्या शतकांत अशीं बंडें झालीं, पण सरकारनें तीं मोडलीं. आणि बंडाचीं पाळेंमुळें खणून काढण्यासाठीं बंडखोरांच्या अनन्वित कत्तली केल्या. उत्तरोत्तर पश्चिम

युरोपांतील नोकरशाही पद्धतीचा कारभार व युद्धाचीं सुधारलेलीं साधनें रशियन सरकारनें जारी केल्यामुळें शेतकऱ्यांना विरोधास त्राणच उरलें नाहीं. फ्रान्सच्या राज्यक्रांतीपासून युरोपीय तरुणांचीं डोकीं स्वातंत्र्याच्या प्रेमानें भणाणून गेलीं. रशियांतील खुद्द सरदार व जमिनदार-घराण्यांतील तरुणांचीं मनें या स्वातंत्र्यप्रेरणेनें जुलुमी राज्यसत्तेविरुद्ध बिथरलीं. शाळांतून, विद्यापीठांतून युरोपीय इतिहासाचें जें शिक्षण त्यांस मिळालें त्यामुळें राज्यसत्तेस नियंत्रण घालून शेतकऱ्यांस स्वातंत्र्य मिळवून देण्याचें त्यांनीं वेड घेतलें. यासाठीं गुप्त मंडळ्या स्थापन होऊं लागल्या. वरिष्ठ वर्गांतील शेंकडों तरुण स्त्रीपुरुष शेतकऱ्यांत जाऊन मिसळून त्यांची सेवा करूं लागले. वरिष्ठवर्गांतील भावनाप्रधान तरुण स्त्रीपुरुषांनीं शेतकऱ्यांच्या जीवनाशीं समरस होण्यासाठीं त्यांच्याशीं शरीरसंबंधहि जोडले. जुलुमी सत्तेचा प्रतिकार करण्याचा नक्की मार्ग कोणता याची त्यांस फारशी कल्पना नव्हती. फक्त एक प्रकारची उदात्त स्वार्थत्यागाची भावना त्यांच्या अंतःकरणांत असे. जुलुमग्रस्त जनतेच्या जीविताशीं समरस होण्याची तीव्र तृष्णा त्यांस लागली होती. पी. लावरोव्ह हा भावनाप्रधान लेखक लिहितो, "माझ्या आयुष्यांत ज्या सुखसोई मला मिळाल्या, जी विचारसरणी मी माझ्या बुद्धिद्वारा मिळवूं शकलों त्या सर्वांचा मोबदला लक्षावधि गरिबांच्या कष्टांनीं, यातनांनीं व रक्तपातानें दिला आहे. पूर्वी झालें तें झालें. माझा त्यास इलाज नाहीं. असली घोर किंमत द्यावी लागली म्हणून मला झालेला लाभ मीं टाकून द्यावा असेंहि नव्हे. पण मला संस्कृति म्हणून कांहीं मिळाली असेल तर येथून पुढें जनतेचें दुःख कमी करण्याचे कामींच मी माझ्या शिक्षणाचा व्यय करणें हें माझें कर्तव्य आहे." अशा त्यागाच्या व जनतासेवेच्या भावनेनें प्रेरित होऊन १८२५त मागें सांगिलेलें 'डिसेंब्रिस्ट' बंड तरुण सैनिकांनीं केलें. या तरुण क्रांतिकारकांच्या गुप्त संस्थांना शस्त्रास्त्रें व बाँबगोळे वगैरे करण्याची कला पश्चिम युरोपांतून चोरून मारून पुरविण्यांत येई. झार बादशहा, जुलुमी अधिकारी व जुलुमी सरदार हे या गुप्त मंडळ्यांतील तरुणांच्या बाँबगोळ्यांस व पिस्तुलांस बळी पडत होते. अशा अत्याचारी प्रयत्नांनंतर सरकारतर्फे भयंकर प्रकारें सूडहि घेण्यांत येई. पण सरकारच्या प्रचंड सामर्थ्यानें क्रांतिकारकांचा बीमोड कधींच झाला नाहीं; तसेंच क्रांतिकारकांच्या बाँबगोळ्यांनीं त्या त्या व्यक्ति गेल्या तरी

प्रकरण २ रें

क्रांतीचा पहिला धक्का (१८९५-१९०५)

रशियांतील चौदापंधरा कोटि जनता विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत केवढ्या भयंकर जुलुमाखालीं भाजली जात होती आणि शेतीच्या मागसलेपणामुळें तिचें दारिद्र्यदुःख किती दुर्धर होतें, याची कांहींशी कल्पना पहिल्या प्रकरणांत दिली आहे. हें दारिद्र्य व हा जुलूम इतर राष्ट्रांत कधींच नव्हता असें नव्हे. पण इतर राष्ट्रांत लोकमताचा विजय होऊन अथवा त्यांचें सरकारवर वजन पडून जुलूम व दारिद्र्य मधून मधून थोडथोडें कमी होत असे. रशियांत असा लोकसुखाचा व लोकस्वातंत्र्याचा 'क्रमविकास' जवळ जवळ कधींच झाला नाहीं. लांडगा आला कीं कोंकरें सैरावैरा पळूं लागतात, तसें झारचा जुलूम असह्य झाला अथवा लोकसंख्येच्या वाढीमुळें एकाच जमिनींत उपासमारीनें घेरलें कीं शेतकरी नांगर हातीं धरून सपाट प्रदेशावर दूर दूर वसाहतीस जाई. झारचा जुलूम व दारिद्र्य तेथेंहि त्यास गांठीत. याच क्रमांत झारच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं शेतकऱ्यांच्या जमिनी राज्यसत्तेनें बळकावून शेतकऱ्यांस गुलाम केलें. वांझोट्या धरणीशीं अहर्निश झगडण्यांत गुंतलेल्या शेतकऱ्यांस आपण स्वतंत्र होतों म्हणजे काय होतों व गुलाम झालों म्हणजे आतां झालें काय, हें कधीं उमगलेंच नाहीं; अथवा उमगलें असल्यास त्याविरुद्ध झगडण्यास तो असमर्थ होता.

अनियंत्रित सत्तेविरुद्ध पहिले हल्ले

या जुलुमी राज्यसंस्थेस व समाजसंस्थेस विरोध झालाच नाहीं असें नव्हे. शेतकऱ्यांतच एखादा कर्तबगार व शूर पुढारी निघे आणि तो शेतकऱ्यांचा जमाव करून बंड उभारी. सतराव्या व अठराव्या शतकांत अशीं बंडें झालीं, पण सरकारनें तीं मोडलीं. आणि बंडाचीं पाळेंमुळें खणून काढण्यासाठीं बंडखोरांच्या अनन्वित कत्तली केल्या. उत्तरोत्तर पश्चिम

युरोपांतील नोकरशाही पद्धतीचा कारभार व युद्धाचीं सुधारलेलीं साधनें रशियन सरकारनें जारी केल्यामुळें शेतकऱ्यांना विरोधास त्राणच उरलें नाहीं. फ्रान्सच्या राज्यक्रांतीपासून युरोपीय तरुणांचीं डोकीं स्वातंत्र्याच्या प्रेमानें भणाणून गेलीं. रशियांतील खुद्द सरदार व जमिनदार-घराण्यांतील तरुणांचीं मनें या स्वातंत्र्यप्रेरणेनें जुलुमी राज्यसत्तेविरुद्ध बिथरलीं. शाळांतून, विद्यापीठांतून युरोपीय इतिहासाचें जें शिक्षण त्यांस मिळालें त्यामुळें राज्यसत्तेस नियंत्रण घालून शेतकऱ्यांस स्वातंत्र्य मिळवून देण्याचें त्यांनीं वेड घेतलें. यासाठीं गुप्त मंडळ्या स्थापन होऊं लागल्या. वरिष्ठ वर्गांतील शेंकडों तरुण स्त्रीपुरुष शेतकऱ्यांत जाऊन मिसळून त्यांची सेवा करूं लागले. वरिष्ठवर्गांतील भावनाप्रधान तरुण स्त्रीपुरुषांनीं शेतकऱ्यांच्या जीवनाशीं समरस होण्यासाठीं त्यांच्याशीं शरीरसंबंधहि जोडले. जुलुमी सत्तेचा प्रतिकार करण्याचा नक्की मार्ग कोणता याची त्यांस फारशी कल्पना नव्हती. फक्त एक प्रकारची उदात्त स्वार्थत्यागाची भावना त्यांच्या अंतःकरणांत असे. जुलुमग्रस्त जनतेच्या जीविताशीं समरस होण्याची तीव्र तृष्णा त्यांस लागली होती. पी. लावरोव्ह हा भावनाप्रधान लेखक लिहितो, "माझ्या आयुष्यांत ज्या सुखसोई मला मिळाल्या, जी विचारसरणी मी माझ्या बुद्धिद्वारा मिळवूं शकलों त्या सर्वांचा मोबदला लक्षावधि गरिबांच्या कष्टांनीं, यातनांनीं व रक्तपातानें दिला आहे. पूर्वी झालें तें झालें. माझा त्यास इलाज नाहीं. असली घोर किंमत द्यावी लागली म्हणून मला झालेला लाभ मीं टाकून द्यावा असेंहि नव्हे. पण मला संस्कृति म्हणून कांहीं मिळाली असेल तर येथून पुढें जनतेचें दुःख कमी करण्याचे कामींच मी माझ्या शिक्षणाचा व्यय करणें हें माझें कर्तव्य आहे." अशा त्यागाच्या व जनतासेवेच्या भावनेनें प्रेरित होऊन १८२५त मार्गे सांगिलेलें 'डिसेंब्रिस्ट' बंड तरुण सैनिकांनीं केलें. या तरुण क्रांतिकारकांच्या गुप्त संस्थांना शस्त्रास्त्रें व बाँबगोळे वगैरे करण्याची कला पश्चिम युरोपांतून चोरून मारून पुरविण्यांत येई. झार बादशहा, जुलुमी अधिकारी व जुलुमी सरदार हे या गुप्त मंडळ्यांतील तरुणांच्या बाँबगोळ्यांस व पिस्तुलांस बळी पडत होते. अशा अत्याचारी प्रयत्नांनंतर सरकारतर्फे भयंकर प्रकारें सूडहि घेण्यांत येई. पण सरकारच्या प्रचंड सामर्थ्यानें क्रांतिकारकांचा बीमोड कधींच झाला नाहीं; तसेंच क्रांतिकारकांच्या बाँबगोळ्यांनीं त्या त्या व्यक्ति गेल्या तरी

राज्यसंस्थेचें व समाजसंस्थेचें जुलुमी स्वरूपहि बदललें नाहीं. अजगरांप्रमाणें क्रूर पण सुस्त अशा अवस्थेंत ती कित्येक शतकें राहिली. पुढें तिचा नाश झाला तोहि एकादा जुनाट किल्ला धरणीकंपानें एकदम जमिनदोस्त व्हावा तसा अकस्मात् झाला.

जी ही झारशाही कित्येक शतकें बलिष्ठ व अप्रतिहत राहिली, तिच्या नाशास १८९६ सालीं झार, दुसरा निकोलस, गादीवर बसल्यापासून सुरुवात झाली; आणि खुद्द त्याच्याच अमदानींत एकदां १९०५ सालीं व पुन्हा १९१७ सालीं असे दोन धक्के बसून निकोलस, त्याचें सर्व घराणें व झारशाही हीं सर्व दुसऱ्या धक्क्यासरशीं धुळीस मिळालीं. यांतील वैशिष्ट्यच हें होतें कीं, जें क्रांतिकर्म असंघटित व अशिक्षित शेतकरी आणि केवळ मूठभर व लोकांचा पाठिंबा नसलेले दहशतवादी तरुण करूं शकले नाहींत तें, यांत्रिक उत्पादनानें औद्योगिक क्रांति घडून आल्यावर, तिच्या पोटीं उदय पावलेल्या संघटित, वर्गजागृत व कार्यतत्पर अशा मजूरवर्गानें ध्येयवादी व क्रांतिशास्त्र-निपुण अशा पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं आणि शेतकऱ्यांचें साहाय्य घेऊन घडवून आणलें.

कामगारांकडून संघटित प्रतिकाराची सुरुवात

एकंदर रशियन समाजसंस्था व राज्यसंस्था अतिशय मागासलेली असतांना यांत्रिक उत्पादनाची वाढ मात्र रशियांत झपाट्यानें होत गेली व तिच्या बरोबरच यांत्रिक कारखान्यांतील कामगारांची वाढ व संघटना बळावत चालली. हा जो पालट समाजजीवनांत घडून येत होता त्याच्या स्वरूपाचें आकलन राज्यकर्त्यांना झालें नव्हतें. १८९५ पर्यंत कामगारांचे संप व दंगे यांची झळ रशियन कारखान्यांना लागली होती, पण ते सर्व संप सरकारास फारच थोड्या परिश्रमानें मोडतां आले. यामुळें त्याबद्दल सरकारी अधिकारी बेफिकीर असत. कारखान्यांच्या तपासनिसांना लिहिलेल्या एका गुप्त पत्रकांत त्यावेळचा झारचा फडणीस लिहितो—

"सुदैवानें पश्चिम युरोपांत जसा कामगारवर्ग आहे तसा तो आमच्या येथें नाहीं; म्हणून कामगारांचा अवघड प्रश्नहि येथें नाहीं. रशियाच्या भूमींत या गोष्टी निर्माण होणारच नाहींत."

स्थळ प्रत
ता.
डा ण.

यानंतर दोन वर्षांचे आंतच गृहमंत्र्यानें प्रांतिक गव्हर्नरांना पुढीलप्रमाणें खलिता लिहिला. तो म्हणतो—

"ज्या ज्या भागांत कामगारांची पुष्कळ वस्ती आहे त्या त्या शहरांत कारखान्यांतील कामगारांचे व खाजगी कारागिरांचे संप ही नित्याची बाब होऊन बसली आहे. यांत ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, कामगारांनीं अलीकडे लढाऊ तुकड्या (फाइटिंग स्क्वॅड्स) निर्माण करण्याचा प्रघात पाडला आहे. जे दुर्बल असतात अथवा ज्यांचा काम करण्याचा हट्ट असतो अशांना या तुकड्या धाक दाखवून अथवा ठोकून काढून संपांत सामील करून घेतात. संपाविरुद्ध प्रचार करणाऱ्यांवर, पोलिसांना चहाड्या सांगणाऱ्यांवर अथवा संपवाल्या पुढाऱ्यांची माहिती कारखानदाराना देणाऱ्यांवर भयंकर अत्याचार करण्यांत येत व प्रसंगीं त्यांचे खूनहि होत."

(ब्रीफ हिस्टरी ऑफ रशिया, खंड २—पोक्रॉव्हस्की कृत)

१८९६ सालीं झार, दुसरा निकोलस, गादीवर आला व कारखान्यांतील कामगारांच्या भयंकर संपांस सुरुवात झाली. झार गादीवर बसल्यामुळें आनंदोत्सवाप्रीत्यर्थ कारखाने कांहीं दिवस बंद ठेवण्यांत आले. पण कारखाने बंद असलेल्या मुदतींत कामगारांचा पगार देण्यांत आला नाहीं, म्हणून कामगारांनीं संप केले. सरकारी माहितीप्रमाणें १९ कारखाने संपांमुळें बंद पडले व एकंदर १५००० मजूर संपांत सामील होते. सुताच्या व कापडाच्या गिरण्यांतील कामगार संपावर गेले, तरी पोलाद वगैरे धातूंच्या कारखान्यांतील कामगार संपांत सामील झाले नाहींत याबद्दलच अधिकारी आपली पाठ थोपटून घेत. वस्तुस्थिति फार भिन्न होती. संपावर गेलेल्या कामगारांची संख्या ३५००० वर गेली होती. धातूच्या कारखान्यांतील कामगार संपावर गेले नव्हते खरे; पण त्यांनीं आपल्या रोजमुऱ्यांतून फंड उभारून कापडाच्या व सुताच्या गिरणींतील संपावर गेलेल्या कारखान्यांतील कामगारांना मदत केली. कांहीं कारखान्यांतून या वेळीं दोन आठवड्यांवर संप टिकला याचें हेंच कारण होतें. या संपांचे बाबतींत गृहमंत्र्याला दिसून आलेल्या कांहीं विशेष गोष्टी त्यानें वर उल्लेखिलेल्या पत्रकांत नमूद करून ठेविल्या आहेत. तो म्हणतो—

"या संपांत खालील गोष्टी ठळकपणें नजरेस आल्या. सर्व संपवाल्यांनीं

ज्या मागण्या मागितल्या त्या व्यवस्थित तयार करून मांडल्या होत्या. आपापली भूमिका सर्वांनीं मोठ्या हट्टानें व एकजुटीनें कायम ठेविली होती. बाह्यतः शांततेचा देखावा जो त्यांनीं सतत कायम ठेविला होता तोहि लक्षांत भरण्यासारखा होता."

संपाची प्रथा वाढत चालली तसतशी ही शांततेच्या देखाव्याची प्रथा शिस्तीनें वाढत चालली. यामुळें दंगा मोडण्याचे निमित्तानें पोलिसांना मजुरांस बडविण्यास संधि मिळेना. यारोस्लाव्हल येथील एका संपांत कामगारांनीं फक्त थोडीशी गर्दी केली, त्याबरोबर दडपशाहीस हपापलेल्या प्रांतिक गव्हर्नरानें लष्कराची तुकडी मागवून मजुरांवर गोळीबार करविला. त्यांत तेरा मजूर ठार झाले. या गोळीबाराबद्दल 'बहोत खाशी' म्हणून दुसऱ्या निकोलसनें सैनिकांच्या पराक्रमाचें अभिनंदन केलें. राज्यारोहणसमारंभाचे सुटींतील पगार मागण्यासाठीं केलेल्या संपांत कामगारांनीं इतरहि मागण्या उगवून घेतल्या. कामगारांच्याकडून रोज चौदा चौदा तास काम करून घेण्यांत येई. गिरण्यांतील कोष्ट्यांनीं साडेदहा तासांचा दिवस असावा अशी मागणी केली. शेवटीं १८९७ (जून २) सालीं साडेअकरा तासांचा दिवस असावा असा कायदा झाला. पण त्याच वेळीं जादा काम करून घेण्याची कारखानदारांना सवलत मिळाली व कामगारांचे कामाचे तास कमी करणारा कायदा व्यवहारांत निकामी झाला. या कायद्यानें एक प्रकारें कामाचे तास कमी करण्याची कारखानदारांना हवी असणारी सवलतच मिळाली असें पोक्रॉव्हस्की म्हणतो. यांत्रिक उत्पादन जितक्या झपाट्यानें वाढत होतें, तितक्या झपाट्यानें गिऱ्हाईक वाढत नव्हतें. यामुळें पुष्कळ काळ मजुरांस राबवून व माल निपजवून तो शिल्लक ठेवणें हें हळूहळू कारखानदारांनाच नको झालें होतें. म्हणून कामाचे तास कमी करून जरूर तेव्हां हवें तेवढें अधिक काम घेण्याची सवलत कारखानदारांना हवी होती. कामाचे तास कमी झाले कीं त्या प्रमाणांत मजुरी हटविण्यास त्यांना मुभा हवी होती. नेमकी ही सर्व सवलत या कायद्यानें त्यांना मिळाली. कामगारांनाहि हें कपट कळत नसे असें नाहीं. म्हणून संप करावयाचे ते पगारवाढीसाठीं, सुटींच्या पगारासाठीं अथवा कपात होऊं न देण्यासाठींहि करावे असें त्यांचें धोरण असे. १८९५ ते १९०४ या काळांत १७६५ संप झाले. त्यांपैकीं १०७१ संप निव्वळ मजुरीच्या मुद्द्यावर

झाले. १८९७ सालीं एकंदर ६०००० संपवाल्यांपैकीं ४७००० कापडाच्या कारखान्यांतील होते. धातूच्या कारखान्यांतील फक्त ३००० च होते. हे सरकारी आंकडे असून खरे आंकडे यापेक्षां फार अधिक होते. पण निरनिराळ्या मजुरांचें प्रमाण कळण्यास हेहि आंकडे उपयुक्त आहेत. कारण संपाचें स्वरूप भडक न दिसावें म्हणून सरकारनें जे आंकडे कमी दाखविले ते सर्वत्र सारखेच कमी दाखविले आहेत. १८९९ सालीं ही स्थिति पालटली. या वेळीं एकंदर संपवाल्यांची संख्या कमी होती, पण त्यांचें प्रमाण उलटलें. या वेळीं कापड कारखान्यांतील १५००० संपवाले होते; तर धातूंच्या कारखान्यांतील २०००० होते. १९०३ सालीं हें प्रमाण आणखी याच दिशेनें वाढलें व कापडाच्या कारखान्यांतील मजुरांची संख्या २०००० असतां धातूच्या कारखान्यांतील मजुरांची संख्या ३१००० झाली. हें आंकडेहि सरकारीच आहेत. स्वतंत्र चौकशीवरून १९०३ सालीं संपवाल्यांची एकंदर संख्या २२५००० वर गेली होती असें आढळतें. धातूच्या कारखान्यांतील कामगारांची संपवाल्यांत अधिकाअधिक भरती होणें याला कामगार व कारखानदार यांच्या लढ्याच्या विकासाच्या दृष्टीनें विशेष अर्थ होता. धातु-कामगारांची परिस्थिति कापड-कामगारांपेक्षां चांगली होती. कापड-कामगारांना दर माणशीं १९०० सालीं दरसाल १७० रुबल्स मिळत, तर धातु-कामगारांना ३४१ मिळत. उलट १८९७ सालापर्यंत कापड-कामगारांना रोज १२ ते १४ तास काम करावें लागे, तर धातु-कामगारांना ११ तासच करावे लागे. त्यानंतर कामाचे तास उतरविण्यांत आले तरी हें प्रमाण कायम राहिलें. अशा प्रकारें धातु-कामगारांची परिस्थिति अधिक चांगली असतांहि संपवाल्यांत त्यांची भरती अधिकाअधिक होऊं लागली. याचा अर्थ असा होता कीं, बेकारी, कामाची अनिश्चिति, मजुरीचा अनियमितपणा व तोकडेपणा, राहणीची हलाखी ही सर्व परिस्थिति सर्वच मजुरांना सारखीच असह्य होऊं लागली होती.

'आर्थिक' झगडा 'राजकीय' झाला

एखाद्या कारखान्यांतील मजुरांनीं आपल्याच गाऱ्हाण्यापुरता संप केला म्हणजे त्यास केवळ 'आर्थिक' संप असें मानण्यांत येई. पण सर्वच कारखान्यांतील कमी-अधिक चांगल्या परिस्थितींतील कामगारांत संप-प्रवृत्ति

वाहूं लागली म्हणजे संपांचें हें 'आर्थिक' स्वरूप जाऊन त्यांस 'राजकीय' स्वरूप येई. याचें कारण असें होतें, कीं सर्वच भांडवलदार व सर्वच कामगार यांचें द्वंद्व माजल्यामुळें भांडवलदार हे सरकारच्या बंदुकांची मदत संप मोडण्यास घेत, आणि भांडवलदारवर्ग पराभूत झाल्यास मजूरवर्ग झारशाहीस उध्वस्त करतील या भीतीनें सरकारहि भांडवलवाल्यांच्या साहाय्यास आपली दंडशक्ति देत असे. साहजिकच यामुळें कामगारांचा लढा हा केवळ 'आर्थिक' लढा नसून झारशाहीशीं लढा आहे असें त्यास स्वरूप आलें. मजूरवर्गापेक्षांहि झारशाहीलाच लढ्याच्या या स्वरूपाची जाणीव अधिक तीव्रतेनें होऊं लागली. कामगारांच्या संघटना व संप हें मुळीं बेकायदेशीरच असत. यामुळेंहि कामगारांच्या कोणत्याहि संघटनेस सुरुवात होतांच कायद्याच्या मर्यादेचें उल्लंघन होऊन त्यास राजकीय स्वरूप येई. धातु-कारखान्यांतील कामगार संपांत सामील होऊं लागल्यामुळें कामगारचळवळीचें बळ अतोनात वाढलें. मुख्यतः रेल्वेचें सामान तयार करण्याच्या निरनिराळ्या कारखान्यांमधील कामगार या संपांत असत. कामाच्या सोईसाठीं व कामगारांची संघटना विसकटावी म्हणून कामगारांची निरनिराळ्या खात्यांत व कारखान्यांत बदली करण्यांत येई. पण यामुळें सर्वच कामगारांत असंतोष व संघटितपणा यांचा प्रसार होऊन संपाची आग एका विभागांत लागली, कीं लागलीच सर्वच विभागांत तिचा प्रसार होऊं लागे. कामगारांच्या मागणीचें स्वरूप निव्वळ 'आर्थिक' म्हणजे विशिष्ट गाऱ्हाण्यांपुरतें असतें तेव्हां त्या मागणीच्या शक्याशक्यतेचा, म्हणजे विरुद्ध पक्षास आपली मागणी मान्य करणें शक्य आहे कीं नाहीं याचा विचार कामगार करीत असतात. पण अशा विवेचक मागण्या धुडकावल्या जाऊन असंतोषाची आग भयंकर भडकली व सार्वत्रिक झाली म्हणजे कामगारांत एक प्रकारची आडवणुकीची वृत्ति निर्माण होते. 'आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट काँग्रेस'नें आठ तासांचा दिवस असावा अशी मागणी जगांतील कामगारांस शिकविली होती. रशियांत संप सार्वत्रिक व वरचेवर होऊं लागल्यानंतर रशियन कामगारांनींहि ही आठ तासांची मागणी उचलून धरली. ही मागणी पश्चिम युरोपांत मान्य झाली नव्हती. रशियन कामगारांची उत्पादनशक्ति फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी येथील कामगारांच्या मानानें कमी

असल्यानें तेथील कारखानदारांनींहि ही मान्य न केलेली आठ तासांची मागणी रशियन कारखानदारांनीं सुखासुखी मान्य करणें शक्य नव्हतें. म्हणून कामगारांनीं संप करावे व पोलिसांनीं त्यांना झोडपून काढावें हाच क्रम एकसारखा सुरू झाला. पण तेवढ्यानें संपाची प्रवृत्ति मागें हटेना. संपवाल्यांना 'सोशल् डेमोक्रॅटिक' या मार्क्सिस्ट क्रांतिवादी मताचे पुढारी मिळूं लागले. यांनीं भांडवलशाही, झारशाही, धर्म, कुटुंबसंस्था या सर्वांवरच हल्ला चढवून एकंदर राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था बदलल्यावांचून कामगारांचीं दुःखें संपणार नाहींत, असा मतप्रचार सुरू केला व दिवसानुदिवस दैनंदिन आयुष्यक्रमांतलीं सामान्य दुःखेंहि दूर होईनात हें पाहून कामगारांना क्रांतिकारक पुढाऱ्यांचीं एकांतिक मतें सयुक्तिक वाटूं लागलीं. यामुळें विशिष्ट गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं संपांचा उपयोग होत नाहीं, पण समाजसंस्था उलथून पाडण्यास, निदान बरीचशी बदलण्यास संपच केले पाहिजेत असें कामगारांच्या मनानें घेतलें. यामुळें संपांची सांथ सार्वत्रिक झाली व कामगारांच्या मागण्या एकसारख्या एकांतिक व निकराच्या होऊं लागल्या.

संप फोडण्यासाठीं पोलिसांच्या कारवाया

क्रांतीचें वेड डोक्यांत घेतलेला कामगार दडपशाहीला दाद देत नाहीं हें पाहून आपणहि मतप्रचाराचें काम करावें व संपप्रवृत्तीचा बीमोड करावा अशी कल्पना मॉस्को येथील राजकीय पोलिसखात्याचा मुख्य झुबाटोव्ह याच्या सुपीक डोक्यांतून निघाली. आजवर कामगारांनीं संघ स्थापणें हें बेकायदा होतें; पण झुबाटोव्हनें सरकारवर वजन घालून "सोसायटी फॉर दि म्युच्युअल को-ऑपरेशन ऑफ दि वर्कर्स इन् एंजिनियरिंग इंडस्ट्री" (एंजिनियरिंगच्या धंद्यांतील कामगारांचें परस्पर साहाय्यकारी मंडळ) ही संस्था काढून १९०२ सालीं (१४ फेब्रुवारी) सरकारमान्य करून घेतली. फक्त मजुरांनाच या संस्थेचे सभासद होतां येई. बुद्धिजीवी वर्गातील लोकांना (चळवळ्यांना) या संस्थेंत मज्जाव होता. कारण क्रांतिकारकांपासून मजुरांना दूर राखण्यासाठींच ही संस्था काढण्यांत आली होती. अर्थात् क्रांतिविरुद्ध मतें कामगारांना शिकण्यास मिळावीं यासाठीं कारखान्यांचे तपासनीस, पोलिस व धर्माधिकारी-

वर्ग यांस या संस्थेचे सभासद करण्याची मुभा होती.* या संस्थेचा खजिना पोलीसच्या नियंत्रणाखालीं ठेवण्यांत आला. संस्थेचे नियम व पोटनियम पोलिसअधिकाऱ्यांस दाखवून त्यांजकडून मंजूर करून घेण्यांत येऊं लागले. चीफ पोलीस आपला प्रतिनिधि संस्थेच्या सभेस पाठवी व तो स्वतः जातीनें हजर राहिल्यास त्याला एकट्याला तीन मतांचा अधिकार असे. संस्थेच्या कौन्सिलचे सभासद भलतेच लोक होऊं नयेत म्हणून या कौन्सिलची नेमणूकहि त्यानें केली. ही नेमणूक मात्र सर्वसाधारण सभेंत निवडलेल्या प्रतिनिधींतून केली. अशा प्रकारें प्रस्थापलेल्या या कामगारसंघाच्या ५०००० सभासदांची सभा १९ फेब्रुवारी रोजीं दुसऱ्या अलेक्झांडरच्या थडग्यासमोर प्रार्थना करण्यास जमली होती.

पोलिसांच्या व कारखानदारांच्या दुर्दैवानें या संस्थेपासून कामगारांच्या झगड्यास मदतच मिळाली. क्रांतिविरोधी मतें कामगारांत पसरावयाचीं व तीं त्यांना पटवावयाचीं तर त्यांच्या आर्थिक मागण्यांचें कांहीं तरी समाधान करणें भाग होतें. कामगारांचें आर्थिक समाधान करावयाचें म्हणजे भांडवलदारांनीं मजूरवर्गाच्या सुखासाठीं जास्त पैसा खर्चून त्या योगें आपला उत्पादनखर्च वाढविणें भाग होतें. पण यामुळें भांडवलावरील नफ्याचें प्रमाण कमी होऊन परदेशांहून नफ्याचें लोभाने येणाऱ्या भांडवलाचा झरा आटत जाईल ही कारखानदारांस भीति वाटे. यामुळें कामगारांचीं 'आर्थिक' गाऱ्हाणीं दूर करण्याचें भांडवलदार नाकारीत, तेव्हां सोशल डेमोक्रॅट पक्षांतील क्रांतिकारकांपासून मजुरांचीं मनें मागें वळविण्यासाठीं पोलिसांनीं स्वतांच मजुरांपुढें क्रांतीच्या बाता झोकण्यास सुरुवात केली. "तुम्ही त्या क्रांतिकारकांचें न ऐकण्याचें वचन द्याल तर सरकार तुम्हांसाठीं वाटेल तें करील; सरकार कारखाने मालकांकडून काढून घेऊन कामगारांच्या हवालीं करणार आहे" असेंहि पोलीस व्याख्यानांतून सांगूं लागले. यामुळें 'झुबाटोव्हिस्ट' कामगार

* पोक्रॉव्हस्की म्हणतो, "१९१७सालीं गुप्त पोलीस व धर्माधिकारी यांना बोल्शेव्हिकांनीं एकाच प्रकारचे वैरी लेखलें, हा कांहीं त्यांचा नवा शोध नव्हता. सोळा वर्षांपूर्वी कामगारांना क्रांतिविरोधी पाठ पढविण्यास ते स्वतांच एकजूट झाले होते."

"आपली गुलामगिरी संपली मालक व गुलाम असे संबंध असलेले दिवस संपले, मधमाशांनीं मध गोळा करावा आणि इतरांनीं तो खावा हे दिवस आतां राहिले नाहींत, आतां आपण मालक होणार" असें मानूं लागले. क्रांतिकारकांच्या वर्चस्वापासून मजूरवर्ग दूर राहावा यासाठीं त्याचें समाधान करण्याचे प्रयत्न कारखानदार मुळींच करीत नाहींत, आणि पोलिसला मात्र निर्दयपणें मजुरांवर बडगा चालविण्यास सांगतात यामुळें पोलिसहि चिडले व ते संपवाल्यांना संपाचे कामीं केव्हां केव्हां मदतहि करूं लागले. तेव्हां कारखानदारांना झुबाटोव्हची संस्था ही एक पीडाच आली असें वाटूं लागलें. त्यांनीं फडणिसाकडे झुबाटोव्हविरुद्ध तक्रारहि केली; त्याचा परिणाम होऊन झुबाटोव्ह याला कामावरून कमी करण्यांत आलें. पण त्याच वेळीं कामगार-संघ स्थापणें हें मात्र कायदेशीर ठरविण्यांत आलें. (जून १९०३.)

संपांस क्रांतिकारक स्वरूप आलें

अर्थात् एवढ्यानें कामगारांतील संपप्रवृत्ति नाहींशी होऊं शकली नाहीं. या सुमारास ही संपाची लाट फार जोरानें वाढत होती. या संपांचें स्वरूप फक्त काम बंद पाडणें एवढेंच राहिलें नाहीं. संपवाल्यांच्या मागण्या ज्याप्रमाणें एकांतिक म्हणून क्रांतिकारक स्वरूपाच्या होऊं लागल्या, त्याप्रमाणें एकंदर जनसमाजच हादरून जावा असें व्यापक व भीषण स्वरूप संपांस येऊं लागलें. या संपांनीं क्रांतिकारक चळवळीची भूमिका कशी धारण केली हें सांगतांना पोक्रॉव्हस्की लिहितो—

"या शतकारंभीच्या पहिल्या पहिल्या सालांत कामगार-चळवळ दोन पावलें पुढें सरली. संपवाले कामगार कारखान्यांतील कामें थांबविल्यावर कारखान्यांच्या इमारतींतून आपल्या चाळींतून आणि खेड्यांतून बाहेर पडून आपला असंतोष व्यक्त करण्यासाठीं शहरांच्या रस्त्यांतून जमावानें येऊं लागले ही पहिली महत्त्वाची गोष्ट. दुसरी गोष्ट अशी कीं, त्यांच्या झगड्याचें स्वरूप कामगार विरुद्ध कारखानदारांचे हस्तक असें न राहतां कामगार विरुद्ध झारिस्ट सरकारचें हस्तक असें होऊं लागले. संपवाल्यांनीं असंतोष-निदर्शनें* आरंभलीं. सरकारचें सशस्त्र सैन्य व सशस्त्र पोलीस यांविरुद्ध

*डेमॉन्स्ट्रेशन्स = जमावानें सभा भरविणें, विशिष्ट घोषणा ओरडणें, घोषणा

ही साऱ्या रशियन जनतेची प्रतिक्रिया आहे असें स्वरूप या निदर्शनांस येऊं लागलें.....भांडवलवाल्या वर्गांतलीं माणसें व सामान्य जनताहि हीं निदर्शनें पाहण्यास जमत. त्यांच्या मनावर यांचा परिणाम होऊं लागला. नदीस बांधलेलें एखादें धरण कोसळून पडून पाण्याचे लोटच्या लोट अकस्मात् वाहूं लागावे अशीं हीं दृश्यें वाटत. कामगारांचा प्रचंड समुदाय व त्यांना पाहावयास जमलेली गर्दी यांपैकीं कोणीहि कोझॅक घोडेस्वार आले तरी त्यांना भिईनासे झाले व ठोशास ठोसा देऊं लागले. अखेर पोलिसांकडून शस्त्रसंपात झाल्यावरच गर्दी मोडत असे. पण दुसरे दिवशीं पुन्हा ती जमे व आधल्या दिवसाहून तिला अधिकच भरती येई. पुनःपुनः घडणाऱ्या या देखाव्यामुळें झारशाही ही अमर आहे, ही जी लोकांतील सुप्त भावना ती मात्र साफ साफ नाहींशी झाली. 'आतां फक्त या विरोधाचें माप भरण्याचाच काय तो प्रश्न आहे, हीच चळवळ अशीच वाढत पंधरापट, वीसपट मोठी झाली, कीं राज्यक्रांति सत्यसृष्टींत अवतरलीच म्हणून समजा' असें लोक बोलूं लागले. सामान्य जनतेवर हा असा परिणाम झालाच. पण ज्या भांडवलवाल्यांना रशियन झारशाही ही अजिंक्य आहे असें वाटत असे म्हणून तिच्यापुढें ते चळचळ कांपत व तिच्या बळावर मजुरांची निर्लज्जपणानें पिळणूक करीत त्यांना सुद्धां आपला झार 'देव' नव्हे व झारशाही अमर नव्हे असें वाटूं लागून कांहीं तरी सनदशीर राज्यघटना त्याच्यापासून हिसकून घेणें अशक्य नाहीं असें ते आपसांत बोलूं लागले." (ब्रीफ हिस्टरी ऑफ् रशिया, खंड २, पोक्रॉव्हस्की कृत.)

क्रांतीला वाचा फुटली

१९ फेब्रुवारी* हा १८६१ त शेतकऱ्यांची गुलामगिरी रद्द करणाऱ्या

लिहिलेलीं निशाणें घेऊन प्रमुख रस्त्यांनीं गर्जना करीत मिरवणुकी काढणें वगैरे. प्रदर्शन शब्दास एक विशिष्ट अर्थ आलेला असल्यानें 'डेमॉन्स्ट्रेशन'ला निदर्शन हा शब्द येथें योजिला आहे.

* १९१८ च्या १८ जानेवारीपर्यंत रशियांतील कॅलेंडर म्हणजे कालगणनापद्धति ख्रिस्तशकाच्या जुन्या पद्धतीची असून युरोपच्या मागें १३ दिवस होती. उदाहरणार्थ, युरोपात नोव्हेंबर ७ तारीख असे त्या दिवशीं रशियांत ऑक्टोबर २५ तारीख असे.

सं.
ता.

कायद्याचा वाढदिवस. त्याच्या चाळिसाव्या वाढदिवशीं म्हणजे १९ फेब्रुवारी १९०१ रोजीं कामगारांनीं फार मोठें असंतोषनिदर्शन स्वारकॉव येथें केलें. मोठ्या प्रमाणावरील असें हें पहिलेंच निदर्शन होतें. त्याची सांथ लगेच चोहोंकडे पसरली. ता. २३-२६ फेब्रुवारी या चार दिवस विद्यार्थ्यांनीं सभा, मिरवणुकी, घोषणा वगैरे प्रकारांनीं मॉस्को येथें प्रचंड व मोठीं परिणामकारक असंतोषनिदर्शनें केलीं. यांतून कामगार सामील झाले व त्यामुळें त्यांना क्रांतिकारक उठावाचें स्वरूप आलें. "क्रांतीला वाचा फुटली असें या निदर्शनांवरून वाटलें." हजारों कामगार व विद्यार्थि यांच्या जमावानें पुनः पुन्हा पुढें चाल करून चाबूक घेऊन जमावावर धावणाऱ्या कोझॅक घोडेस्वारांना मागें हटाविलें. जमावाचा रस्ता रोखून (बॅरीकेड) जमाव मोडण्याचे प्रयत्न मॉस्को येथें सुरू झाले. मार्च व मेमध्यें पीटर्सबर्ग येथें मोठमोठीं निदर्शनें झालीं. तेथें 'अबुकोव्ह' कारखान्यांतील कामगार व पोलीस यांच्या रस्त्यावर मारामाऱ्याच झाल्या. सहा कामगार मेले व आठ जखमी झाले. पोलिसांनाहि बेदम मार बसला. एप्रिलमध्यें टिफ्लिस येथें व डिसेंबरमध्यें एकॅटेरीनोस्लाव्ह येथें सदर प्रकारचीं निदर्शनें झालीं व वरील प्रकारांची सर्वत्र आवृत्ति झडली. १९०२ च्या नोव्हेंबरांत रोस्टॉव्ह येथें झालेल्या संपांनीं—

"कामगारचळवळीचें स्वरूप पूर्णच क्रांतिकारक केलें; नेहमींप्रमाणें संप रेल्वेच्या कारखान्यांत सुरू झाला व आगीसारखा इतर सर्व कारखान्यांत पसरला. कामगारांचा दृढनिश्चय इतका जबर दिसला कीं, एक आठवडाभर अधिकारी त्यांच्या वाटेस जाण्यास धजावत ना? 'कांहीं अदृष्टपूर्व, अश्रुतपूर्व असें आज रशियांत घडत आहे' असें त्या वेळच्या एका लेखकानें या संपासंबंधीं लिहून ठेवलेलें आढळतें. रोज उघड्या मैदानावर सभा होत. कित्येक हजारांचा लोकसमुदाय, मोठ्यानें श्वासोच्छ्वासहि न करतां, झारिस्ट अंमल, अधिकाऱ्यांचा अनियंत्रित कारभार, न्यायकोर्टीचा पक्षपात, भांडवलवाल्यांकडून होणारी पिळणूक या सर्वांच्या धिक्कारांनीं भरलेलीं सोशल् डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुढाऱ्यांचीं भाषणें ऐके. 'आपणांस राजकीय स्वातंत्र्य नको काय?' असे प्रश्न हे वक्ते आपल्या भाषणांतून श्रोत्यांना विचारीत, व 'हो हो हवें हवेंच' असा प्रचंड घोष श्रोत्यांतून निघून आकाश दणाणून सोडी. हे

अदृष्टपूर्व देखावे पाहण्यास शहरांच्या कोनाकोपऱ्यांतूनहि सर्व वर्गांचे लोक सभास्थानीं धावून येत. दुकानांतील कामगार, व्यापारी, अधिकारी, सर्वजण आपापले धंदे सोडून सभांना जात. घरंदाज मानलेल्या घरांतील स्त्रियाहि आपल्या गाडया सभांच्या आसपास उभ्या करून दुर्बिणींतून या अदृष्टपूर्व उत्साहाचें व असंतोषाचें अवलोकन करून आपलें कुतूहल शमवीत. पोलिस व कोझॅक घोडेस्वार हेहि चातकांप्रमाणें सोशल् डेमोक्रॅटिक पुढाऱ्यांचीं भाषणें माना वर करकरून ऐकत. आतां करावें तरी काय, याचाच अधिकाऱ्यांना या प्रकारापुढें उलगडा होईना. शेवटीं त्यांच्या अकलेची कळी उकलली. चाबूक व तरवारी एवढ्यांनीं भागत नाहीं; बंदुकी चालविल्या पाहिजेत असें त्यांना वाटलें. एका सभेवर अधिकाऱ्यांनीं हा बंदुकांचा प्रयोग करून पाहिला. कोझॅक्सच्या बंदुकींतून सुटलेल्या गोळ्यांनीं सहा कामगार मेले, बारा जखमी झाले; पण गोळीबार करून घोडेस्वार निघून गेले व सभा मात्र चालूच राहिली. १९०२ सालीं रशियन कामगार हा झारशाहीचा राजनिष्ठ प्रजानन राहिला नव्हता ही गोष्ट या प्रकारानें उघड झाली." (ब्रीफ हिस्टरी ऑफ रशिया, खंड २—पोक्रॉव्हस्की कृत)

१९०३ मध्यें ही असंतोषाची आग ओडेसापासून बाकूपर्यंत सगळ्या दक्षिण रशियाभर पसरली. या वेळीं सगळ्या कारखान्यांतून सार्वत्रिक संप झाला. असा हा सार्वत्रिक संप रशियांत पहिलाच होता. त्यांत दोन लक्षांहून अधिक कामगार सामील झाले होते. त्यांनीं सगळ्या सामाजिक जीवनाचें रूपच पालटून टाकलें. वर पोक्रॉव्हस्कीनें उल्लेखिलेला समकालीन लेखक वर्णन करतो—

"संप चालू असतां मोठमोठ्या शहरांना विलक्षण स्वरूप आलें. दुकानें, कचेऱ्या, वर्कशॉप्स बंदच पडलीं. ट्रॅम बंद, गाड्या बंद, वर्तमानपत्रेंहि बंद. आगगाडया स्टेशनांतून व बोटी बंदरांतून झोपा घेत होत्या. मालांचे पर्वत प्लॅटफॉर्मवर पडून होते. अन्न भयंकर महाग झालें. भाकरी, मांस कांहींच मिळेना. भाकरीच्या एका तुकडयासाठीं तंटे होऊं लागले. विजेचे, गॅसचे दिवे थंड झाले. रस्त्यांतून रात्रीं जिकडे तिकडे नुसता अंधार! घरांतून सुद्धां फक्त मिणमिण जळणाऱ्या मेणबत्त्यांचा अंधुक प्रकाश दृष्टीस पडे. रस्त्यावरला कचराहि झाडला जाईना. व्यापार व उद्योगधंदे बंदच झाले. पण सार्वजनिक जीवन

यामुळें मृत झालें होतें असें नव्हे. तें अत्यंत चैतन्यमय झालें होतें. हजारों कामगार रस्त्यावरून गर्दी करून भटकत. मोकळी व प्रशस्त जागा दिसली, कीं एकादा सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा वक्ता लाल निशाण फडकावून व्याख्यान देऊं लागे. पोलीस व सैनिकांच्या तुकड्यांनीं या सार्वत्रिक गर्दींत भर घातली होती. क्रांतिकारक गीतांनीं व घोषणांनीं वातावरण निनादित झालें होतें." (पोक्रॉव्हस्कीनें घेतलेला उतारा)

१९०१ सालच्या मॉस्कोंतील संपाच्या निदर्शनांत फक्त कांहीं थोड्या कामगारांची गर्दी असे. त्यांचें सौम्य स्वरूप होतें. त्यांचे पुढारी भांडवलवाल्यांतील बुद्धिमान तरुणहि असत. पुढें पीटर्सबर्गमधील ओबुखोव कारखान्यांतील कामगारांनीं बंडखोरीची वृत्ति धारण केली. त्यांना वायबॉर्ग विभागांतील कामगारहि येऊन मिळाले. अजून हे संप एकाच शहरांत होते; पण दक्षिण रशियांत त्यांची आग पसरल्यावर तिला सार्वत्रिक स्वरूप आलें. आतां ती मूठभर असंतुष्ट कामगारांची चळवळ राहिली नसून, सगळा कामगारवर्ग तिच्यांत सामील झाला आहे हें उघड झालें. झुबाटोव्ह पक्षाचे संघहि या संपांत एका 'शॅयेविच' नामक पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं सामील झाले. शॅयेविचला हा संप नको होता; कामगारांचें पुढारीपण पत्करून व त्यांच्या पोटांत शिरूनच त्यांना संपांपासून परावृत्त करावें असा त्यानें मोठ्या चाणाक्षपणानें डाव आंखला होता; पण त्याचे दांत त्याच्या घशांत जाण्यास फारसा वेळ लागला नाहीं. एका जाहीर सभेंत भाषण करतांना शॅयेविच म्हणाला,

"भाई हो, तटाला टकरा देऊन डोकीं फोडून घेण्यापेक्षां युक्तीनें तटाला खिंड पाडणें हें अधिक इष्ट नाहीं काय?"

"छे हो! छे! तटाला टकरा देऊन डोकीं फोडून घेणें हेंच बरें" अशी एकच आरोळी श्रोत्यांतून उठून वक्त्याचें काळीज भेदून गेली.

शेतकऱ्यांच्या असंतोषाचा भडका

शहरांतून कामगारांचा असंतोष भडकत होता, तसाच खेड्यांतून शेतकऱ्यांचा असंतोषहि भडकूं लागला. १९००पासून १९०४अखेर सुपीक जमीन व नापीक जमीन असलेल्या प्रदेशांत मिळून शेतकऱ्यांचे सुमारें ६७०

दंगे झाले. यांपैकीं ५७१ दंगे सुपीक प्रदेशांत होते. १९०२ सालीं या दंग्यांना अतिशय ऊत येऊन एकट्या त्या सालांत ३४० दंगे झाले. हे मुख्यतः पोल्टाव्हा, खार्काव्ह व कांहीं कमी प्रमाणांत सॅराटोव्ह या परगण्यांत झाले. मार्चअखेरीस दंगे सुरू होऊन एप्रिलच्या आरंभीं दंग्यांचा शेवटहि झाला. अगदीं थोड्या प्रदेशांत व अगदीं थोड्या वेळांत या दंग्यांचा भडका मात्र फार भयंकर उडाला. हा प्रदेश सुमारें दीड लक्ष लोकसंख्येचा होता. या प्रदेशांतील प्रत्येक शेतकरी दंग्यांत सामील झाला. पोल्टावा परगण्यांतील पुरोहितांच्या ५४ इस्टेटी व खारकॉव परगण्यांतील २८ इस्टेटी शेतकऱ्यांनीं पाडून जाळून जमिनदोस्त करून टाकल्या. 'वणव्यानें रान जाळल्यानंतर जाळायलाच कांहीं नाहीं म्हणून जसा वणवा विझावा' त्याप्रमाणें सर्व इस्टेटींचा विध्वंस करून विध्वंस करायला कांहीं नाहीं म्हणून शेतकरी विराम पावले; आणि हें सगळें इतकें झटपट उरकलें गेलें, कीं झारचे सरकारी अधिकारी दंग्याच्या जागीं येईपर्यंत शमवायला दंगा राहिलाच नव्हता. खार्काव्हचा सरकारी वकील लिहितो, "एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, पोल्टाव्हा परगण्यांतील दंगे व लूटमार सरकारी अधिकाऱ्यांनीं थांबविली नाहीं. लुटारूंनीं आपण होऊनच ती बंद केली."

शेतकऱ्यांत क्रांतीचा मतप्रसार

दंगेखोरांवर खटले भरण्यास तीन सरकारी वकील आणण्यांत आले होते. त्यांनीं क्रांतिकारक सुशिक्षितांच्या मतप्रसारानें दंगे होतात असें मत दिलें. एका वकिलानें पोलिसांना सांपडलेलीं सोळा क्रांतिकारक पत्रकें कोर्टांत पुराव्यादाखल हजर केलीं. क्रांतिकारकांचा मतप्रसार हें कांहीं अगदींच खोटें कारण नव्हतें. पण जाळायला जळण नसलें तर अग्नि दुर्बल असतो त्याप्रमाणें नुसत्या मतप्रसारकांच्या मतप्रसारानें दंगे झाले हें म्हणणेंहि फोल होतें. दंगेखोरांच्या मॅक्सिमोकाव् या खेड्यांतील पाटलानें कोर्टांत दिलेली साक्ष या दृष्टीनें फार बोधप्रद होती. तो म्हणतो—

"आमचें जीवन जर थोडें अधिक सुखदायक असतें तर कोणत्याहि पुस्तकांत कांहींहि लिहिलें असतें तरी त्याचा कांहींहि परिणाम झाला नसता. खरें दुःख हें आहे कीं, आम्हांस जमीन नाहीं, दाणा नाहीं, खोपट्यांना गवत नाहीं,

लाकूड नाहीं, गुरांना चरणीला कुरण नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत वैरणीविना आमचीं गुरें पटापट मेलीं. गेल्याच वर्षी ३०० गुरें होतीं; पण यंदां १००हि राहिलेलीं नाहींत. मेंढ्या तर औषधालाहि नाहींत. जमीन कसण्यासाठीं नांगर वगैरे औतें घेण्याचें आम्हांस सामर्थ्यच नाहीं. मग आम्ही जमिनीची मशागत तरी चांगल्या प्रकारें करणार कशी ? केरकचरा, पालापाचोळा, काटक्या, शेण यांचें खत आम्हांला शेतावर घालतांच येत नाहीं; कारण या वस्तु आम्हांला जळण म्हणून जाळून टाकाव्या लागतात. सालोसाल दाणागोटा कमती होत आहे. आम्ही अर्धपोटीं आहों. डिसेंबर आला कीं आम्ही खंक होतों."

सरकारी वकिलांनाहि चौकशीअंतीं दारिद्र्य व कर्ज देण्याचा बोजा शेतकऱ्यांवर असह्य आहे हें कबूल करावें लागलें;—

"१९०० सालीं हिंवाळी पिकांच्या जमिनीवर ९४ टक्के व उन्हाळी पिकांचे जमिनीवर १२३ टक्के खंड वाढविण्यांत आला होता...आणि अशा वाढत्या खंडानें प्रत्येक शेतकऱ्याला मिळणारी जमीन सालोसाल कमी होत आहे. चालू १९०२ सालीं पिकें चांगलीं आहेत. पण म्हणून खंडहि वाढला आहे." ....."पोषक अन्न पुरेसें न मिळाल्यानें शेतकऱ्यांत रातांधळेपणाचा रोग पसरत आहे."

अर्थातच दारिद्र्य इतकें भेसुर असल्यामुळें असंतोष भडकण्यास क्रांतिकारकांच्या मतप्रसाराचा विशेष उपयोग झाला हें मात्र खरें. सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी, सोशल डेमोक्रॅट्स, युक्रेन नॅशनॅलिस्ट वगैरे क्रांतिकारक पक्षाचे स्वयंसेवक क्रांतिकारक मतार्चीं पत्रकें शेतकऱ्यांत शिरून गुप्तपणें त्यांना वाचून दाखवीत. त्यांना एकजुटीचें शिक्षण देत. "तुम्ही मनांत आणल्यास झारशाही, धर्मगुरुशाही, भांडवलशाही, या सर्वांचा सहज निःपात होईल. उठा, मेकडासारखें झारला भितां काय ? कायदा हातांत घ्या म्हणजे यश तुमचेंच आहे" असें ते त्यांस शिकवीत असत. प्रचारकांच्या शिकवणीचा शेतकऱ्यांच्या मनावर बराच परिणाम झाला व तो खटल्यांतील जबान्यांतूनहि दिसून आला. लिसिच्या नामक खेड्यांत हा मतप्रचार बराच खोल रुजला होता. सरकारी दुय्यम वकील तक्रार करतो—

"सर्व पुराव्याचे धागेदोरे लिसिच्यापर्यंत सांपडतात, पण पुढें अदृश्य

दंगे झाले. यांपैकीं ५७१ दंगे सुपीक प्रदेशांत होते. १९०२ सालीं या दंग्यांना अतिशय ऊत येऊन एकट्या त्या सालांत ३४० दंगे झाले. हे मुख्यतः पोल्टाव्हा, खार्काव्ह व कांहीं कमी प्रमाणांत सॅराटोव्ह या परगण्यांत झाले. मार्चअखेरीस दंगे सुरू होऊन एप्रिलच्या आरंभीं दंग्यांचा शेवटहि झाला. अगदीं थोड्या प्रदेशांत व अगदीं थोड्या वेळांत या दंग्यांचा भडका मात्र फार भयंकर उडाला. हा प्रदेश सुमारें दीड लक्ष लोकसंख्येचा होता. या प्रदेशांतील प्रत्येक शेतकरी दंग्यांत सामील झाला. पोल्टावा परगण्यांतील पुरोहितांच्या ५४ इस्टेटी व खारकॉव परगण्यांतील २८ इस्टेटी शेतकऱ्यांनीं पाडून जाळून जमिनदोस्त करून टाकल्या. 'वणव्यानें रान जाळल्यानंतर जाळायलाच कांहीं नाहीं म्हणून जसा वणवा विझावा' त्याप्रमाणें सर्व इस्टेटींचा विध्वंस करून विध्वंस करायला कांहीं नाहीं म्हणून शेतकरी विराम पावले; आणि हें सगळें इतकें झटपट उरकलें गेलें, कीं झारचे सरकारी अधिकारी दंग्याच्या जागीं येईपर्यंत शमवायला दंगा राहिलाच नव्हता. खार्काव्हचा सरकारी वकील लिहितो, "एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, पोल्टाव्हा परगण्यांतील दंगे व लूटमार सरकारी अधिकाऱ्यांनीं थांबविली नाहीं. लुटारूंनीं आपण होऊनच ती बंद केली."

शेतकऱ्यांत क्रांतीचा मतप्रसार

दंगेखोरांवर खटले भरण्यास तीन सरकारी वकील आणण्यांत आले होते. त्यांनीं क्रांतिकारक सुशिक्षितांच्या मतप्रसारानें दंगे होतात असें मत दिलें. एका वकिलानें पोलिसांना सांपडलेलीं सोळा क्रांतिकारक पत्रकें कोर्टांत पुराव्यादाखल हजर केलीं. क्रांतिकारकांचा मतप्रसार हें कांहीं अगदींच खोटें कारण नव्हतें. पण जाळायला जळण नसलें तर अग्नि दुर्बल असतो त्याप्रमाणें नुसत्या मतप्रसारकांच्या मतप्रसारानें दंगे झाले हें म्हणणेंहि फोल होतें. दंगेखोरांच्या मॅक्सिमोकाव् या खेड्यांतील पाटलानें कोर्टांत दिलेली साक्ष या दृष्टीनें फार बोधप्रद होती. तो म्हणतो—

"आमचें जीवन जर थोडें अधिक सुखदायक असतें तर कोणत्याहि पुस्तकांत कांहींहि लिहिलें असतें तरी त्याचा कांहींहि परिणाम झाला नसता. खरें दुःख हें आहे कीं, आम्हांस जमीन नाहीं, दाणा नाहीं, खोपट्यांना गवत नाहीं,

लाकूड नाहीं, गुरांना चरणीला कुरण नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत वैरणीविना आमचीं गुरें पटापट मेलीं. गेल्याच वर्षी ३०० गुरें होतीं; पण यंदां १००हि राहिलेलीं नाहींत. मेंढ्या तर औषधालाहि नाहींत. जमीन कसण्यासाठीं नांगर वगैरे औतें घेण्याचें आम्हांस सामर्थ्यच नाहीं. मग आम्ही जमिनीची मशागत तरी चांगल्या प्रकारें करणार कशी ? केरकचरा, पालापाचोळा, काटक्या, शेण यांचें खत आम्हांला शेतावर घालतांच येत नाहीं; कारण या वस्तु आम्हांला जळण म्हणून जाळून टाकाव्या लागतात. सालोसाल दाणागोटा कमती होत आहे. आम्ही अर्धपोटीं आहों. डिसेंबर आला कीं आम्ही खंक होतों."

सरकारी वकिलांनाहि चौकशीअंतीं दारिद्र्य व कर्ज देण्याचा बोजा शेतकऱ्यांवर असह्य आहे हें कबूल करावें लागलें;—

"१९०० सालीं हिंवाळी पिकांच्या जमिनीवर ९४ टक्के व उन्हाळी पिकांचे जमिनीवर १२३ टक्के खंड वाढविण्यांत आला होता...आणि अशा वाढत्या खंडानें प्रत्येक शेतकऱ्याला मिळणारी जमीन सालोसाल कमी होत आहे. चालू १९०२ सालीं पिकें चांगलीं आहेत. पण म्हणून खंडहि वाढला आहे." ....."पोषक अन्न पुरेसें न मिळाल्यानें शेतकऱ्यांत रातांधळेपणाचा रोग पसरत आहे."

अर्थातच दारिद्र्य इतकें भेसुर असल्यामुळें असंतोष भडकण्यास क्रांतिकारकांच्या मतप्रसाराचा विशेष उपयोग झाला हें मात्र खरें. सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी, सोशल डेमोक्रॅट्स, युक्रेन नॅशनॅलिस्ट वगैरे क्रांतिकारक पक्षाचे स्वयंसेवक क्रांतिकारक मतार्ची पत्रकें शेतकऱ्यांत शिरून गुप्तपणें त्यांना वाचून दाखवीत. त्यांना एकजुटीचें शिक्षण देत. "तुम्ही मनांत आणल्यास झारशाही, धर्मगुरुशाही, भांडवलशाही, या सर्वांचा सहज निःपात होईल. उठा, मेकडासारखें झारला भितां काय ? कायदा हातांत घ्या म्हणजे यश तुमचेंच आहे" असें ते त्यांस शिकवीत असत. प्रचारकांच्या शिकवणीचा शेतकऱ्यांच्या मनावर बराच परिणाम झाला व तो खटल्यांतील जबान्यांतूनहि दिसून आला. लिसिच्या नामक खेड्यांत हा मतप्रचार बराच खोल रुजला होता. सरकारी दुय्यम वकील तक्रार करतो—

"सर्व पुराव्याचे धागेदोरे लिसिच्यापर्यंत सांपडतात, पण पुढें अदृश्य

होतात. तेथले एकजात सर्व शेतकरी तोंडांस कुलूप घालून कानांवर हात ठेवितात. अलेसेयेंको हा खार्कार्व्ह विद्यापीठांतील एक विद्यार्थी दंगेखोरांच्या एका गटाचा पुढारी आहे; त्याच्या हालचालींविषयींची माहिती पडताळून पाहण्यासाठीं लिसिच्या येथील शेतकरी साक्षीस आणले, पण काय? अळीमिळी गोपचिळी; कांहीं सुद्धां पत्ता लागूं देत नाहींत."

शेतकऱ्यांची विचारसरणी

अर्थात् क्रांतिकारकांची शिकवण दंग्यास कारणीभूत झाली तरी क्रांतिकारकांचे सगळे विचार शेतकऱ्यांस समजतहि नव्हते व मान्यहि होत नव्हते. पुस्तकांत काय शिकविलें आहे याची त्यास फारशी दखल व फिकीर नसे. आपणास जमीन पाहिजे, त्यासाठीं हा झगडा आहे, एवढेंच पुस्तकांत लिहिलें आहे असें शेतकरी मानीत होता.

" खेड्यांतील कचेऱ्यांतून हीं पुस्तकें आतां तुम्हांला मिळतील. त्यांत सांगितलें आहे तें इतकेंच, कीं जमिनी काढून घ्या. त्या काढून घेऊन शेतकऱ्यांना वाटून देण्याची तजवीज हे (क्रांतिकारक) विद्यार्थी करीत आहेत."

दंग्याच्या पहिल्या दिवशीं कच खाणाऱ्या शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यासाठीं एक शेतकरी म्हणाला—

" भिऊं नका, धीर धरा, जमीनवांटणी मे च्या १ ल्या तारखेस (आंतरराष्ट्रीय मजूरदिन) सुरू होईल. ती अगदीं झटपट उरकली जाईल व आपणांपैकीं प्रत्येकाला ९ डेझिअटिन जमीन मिळेल."

जमिनीच्या लोभापलीकडे क्रांतिकारक पुढाऱ्यांचें राजकारण नेमकें काय आहे हें त्यांना उगमत नसे.

'शेतकरी उपाशी राहतां उपयोगी नाहीं' असा झारचा सख्त कायदा आहे अशी शेतकऱ्याची दृढ समजूत होती. शेतकऱ्याचा राग झारवर मुळींच नव्हता. तो त्याचा 'माबाप', त्याचें दैवत होता. अधिकारी, जमिनदार, सरदार, धर्मगुरु हेच लबाड व हेच शेतकऱ्याचे शत्रु आहेत असें तो मानी. आपले दंगे हे या वर्गाविरुद्ध असून झारला हे वर्ग अनावर झाले असल्यानें झारच्याच इच्छेनें आपले दंगे होत आहेत असें शेतकऱ्यांना वाटे. दंगे मोडण्यासाठीं सैनिक आले व गोळीबार करण्याचा धाक घालूं लागले, म्हणजे—

"मूर्ख आहांत झालें, गोळीबार करण्याची तुमची छातीच नाहीं, झारनें गोळीबार करण्यास तुम्हांस प्रतिबंध केला आहे" असें शेतकऱ्यांचा जमाव ओरडे. इतकेंहि करून गोळीबार झाला (आणि तो होईच), कित्येक शेतकरी मेले व जखमी झाले म्हणजे "आतां उद्यां आपला झार या सैन्याधिकाऱ्यांना या गोळीबाराबद्दल कडक शिक्षा केल्यावांचून राहणार नाहीं" अशी शेतकरी खात्री बाळगून असत.

दंग्यांबद्दल शेतकऱ्यांवर सूड

या दंग्यांचा उपशम झाल्यानंतर अधिकाऱ्यांनीं शेतकऱ्यांवर अमानुषपणें सूड उगविला. सरकारी वकिलांनींच लिहून ठेविलें आहे,—

"पीटर फीजम वीस आरोपींतर्फे बोलत होता. 'आम्हांला प्रत्येकाला २०० फटके मारले. मी स्वतः, फटके मारल्यानंतर, कित्येक तास बेशुद्ध होतों.' तो विचारतो, 'इतक्या सगळ्या लुटारूंमध्यें आम्हांलाच निवडून काढून ही अमानुष शिक्षा दिली तीं काय म्हणून? पांच महिन्यांचा तुरुंगवासहि आम्हांला भोगावा लागला आणि आतां तिसऱ्यांदा आम्हांवर पुन्हा खटला भरला आहे.' 'कोझॅक घोडेस्वार आमच्या घरांतून फुकट धान्य लुटून नेतात, ही त्यांना कोणी परवानगी दिली?' आरोपींनीं विचारलें..... एका पासष्ट वर्षांच्या शेतकऱ्याला ६५ फटके मारण्यांत आले. श्चेटिना आपल्या साक्षींत सांगतो. 'पहिल्यानें मला वेतानें २०० फटके देण्यांत आले. मी बेशुद्ध झालों तेव्हां मला घरीं नेण्यांत आलें. मागून दोन पोलीस माझ्या घरांत घुसले. त्यांनीं पुन्हा मला घोड्याच्या कमचीनें बेदम झोडपून काढलें'."

लोकांचा असा अमानुष छळ चाललेला पाहून एक शेतकरी पोलिसावर ओरडला,

"अरे, ज्या झारची तुम्ही अशी नोकरी करतां तो झार आहे तरी कोण? लोकांना असें छळणें बरें दिसतें का तुम्हांला? त्यांचे असे हाल तुम्ही अधिकारी कां होऊं देतां?"

पण या भाषणांत झारचा उर्मटपणानें उल्लेख करून या शेतकऱ्यानें अधिकाऱ्यांचा अधिक्षेप केला, या 'भयंकर' गुन्ह्याबद्दल त्यास तेथल्या तेथें २५०

फटक्यांची शिक्षा सुनावून बजावण्यांतहि आली. दुसऱ्यांना फटके मारलेले पाहून एका शेतकऱ्यानें दोनदां गळफांस लावून घेतला, इतकी त्याला जगण्याची भीति वाटली. 'फटके मारल्यानंतरहि आपल्याला हे फटके मारतात तरी कां,' याचाच शेतकऱ्यांना बोध होत नसे. खटला चालू असतां आरोपीकडे पाहून सरकारी वकिलांसहि दया येई. एक सरकारी वकील लिहितो— "खटल्याचे वेळीं माझ्यासमोर जे आरोपी दिसतात त्यांचें चित्र अगदीं करुणास्पद आहे. त्यांच्या दुःस्थितीमुळें ते पार खचून गेले आहेत. कित्येक तर कोर्टांत रडतात. त्यांच्या अंगांवर नुसतीं हाडें उरलीं आहेत व त्यांवर चिंध्या पसरल्या आहेत."

आरोपीस कांहीं प्रश्न विचारल्यावर त्याची परिस्थिति ऐकून न्यायाधीशाचें अंतःकरण उद्वेगानें भरून येई. त्याच्या हातून त्या वेळीं काम होत नसे म्हणून तो विश्रांति घेई. 'जरा मन स्वस्थ करूं दे' असें तो म्हणे. या सगळ्या जुलुमाचा व छळाचा परिणाम काय झाला ? पुन्हा एकदां सरकारी वकिलाचेंच मत ऐका;—

"कोर्टांत व कोर्टाबाहेर दिसणाऱ्या माणसांच्या रांगांतील चेहरे मीं निरखून पाहतों, त्यांच्या कोर्टांतील जबान्यांकडे व त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देतों, तेव्हां मला वाटतें कीं, भीतीनें हे शेतकरी अगदीं गर्भगळित झाले आहेत हें खरें, पण झाली ही शिक्षा योग्य आहे अशी त्यांची खात्री झालेली दिसत नाहीं. ...अधिकाऱ्यांबद्दल त्यांना अत्यंत अविश्वास वाटतो. त्यांच्यापासून शेतकरी मनानें दूरदूर जात आहेत."

इतका छळ झाल्यावर दंग्यांबद्दल शेतकऱ्यांवर नुकसानभरपाई लादण्यांत आली. ८ लक्ष रुबल नुकसानभरपाई द्यावी असा मध्यवर्ती सरकारचा हुकूम झाला. फटके मारणें जसें सोपें होतें तसें भरपाई वसूल करणें मात्र सोपें नव्हतें. "सर्व झेम्स्कीनॅचॅल्निकी अधिकाऱ्यांनीं एकमतानें सांगितलें कीं, भरपाई ग्रामसंस्थांकडून सक्तीनें वसूल केल्यास शेतकरी अधिकच चिडतील. त्याच्या परिणामाची जबाबदारी आपण घेऊं शकत नाहीं. शिवाय प्रत्यक्ष वसूलींत ज्या अडचणी येतील त्याहि दूर करण्याची जबाबदारी आपण घेऊं शकत नाहीं." एका जमिनदारानें सांगितलें कीं, "भरपाई सक्तीनें वसूल करण्याचा

प्रयत्न केल्यास धर्माधिकारीवर्ग व शेतकरी यांमध्यें एवढी भयंकर तेढ वाढेल कीं त्यापायीं धर्माधिकारीवर्गास गांव सोडून जावें लागेल."
शेवटीं १९०४ सालीं सरकारनें भरपाईचा हुकूम रद्द करून माफी दिली. पण तोंवर वसुली अशी एक कोपेकहि झाली नव्हती.

दंग्यांत सामील झालेले शेतकरी हे निवळ 'भिकारडे' नव्हते. सरकारी वकील लिहितो, "यांची राहणी सभ्यतेची, नियमितपणाची आहे. शेतकऱ्यांच्या बँकांतून पैसे कर्जाऊ घेऊन त्यांनीं जमिनी खरेदी केल्या आहेत. गेलीं तीन वर्षें त्यांना व्याज देतां आलें नाहीं. 'पण तेवढ्यासाठीं जमिनी जप्त करूं नका' असें ते बँकांना सांगत आहेत."

शहाणा मंत्री व मूर्ख राजा

कित्येक गांवचे पाटील व बरीच जमीन असलेले शेतकरीहि दंग्याचे पुढारी होते. वणव्यांत ओल्या लाकडाचा निखारा व्हावा त्याप्रमाणें मूळचा निरुपद्रवी शेतकरी असंतोषानें एकजात पेटला होता. विद्यार्थ्यांचा असंतोष अथवा मजुरांचाहि असंतोष दडपून टाकणें कठिण नसतें; पण शेतकरी असंतुष्ट राहिला तर तें कांहीं चांगलें लक्षण नव्हे हें झारलाहि कळत होतें. म्हणून विट्टे या फडणिसास शेतीच्या धंद्याच्या गरजा काय आहेत हें पाहून शिफारशी करण्यास फर्माविण्यांत आलें. विट्टे हा अत्यंत शहाणा व दूरदर्शी मुत्सद्दी होता. पण म्हणूनच मूर्ख झारचें व त्याचें जमेना. विट्टेच्या योजना किचकट असून झारच्या बुद्धिकोशांत शिरण्यासारख्या नव्हत्या. प्रजेचा असंतोष पाहून झार फक्त घाबरला व हताश झाला. दुसरा अलेक्झांडर जसा बाँबगोळ्यास बळी पडला तसे आपणहि पडणार ही धास्त झार दुसरा निकोलस यानें घेतली. शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्यापेक्षां आपला खुनापासून बचाव करणें ही गोष्ट निकोलसला अधिक महत्त्वाची वाटली. म्हणून विट्टेपेक्षां गुप्त पोलिस अधिकाऱ्यांची तो अधिक मनधरणी करूं लागला. सिपायगिन या गृहमंत्र्याचा बाल्माशोव्ह नामक विद्यार्थ्यानें खून केला तेव्हां प्लीव्ह नामक मंत्री झारनें त्याचे जागीं नेमला. हा पूर्वी पोलीसखात्यांत अधिकारी होता. त्यानें शेतकऱ्यांचे दंगे बडवून काढले होते. म्हणून तसल्याच साधनांवर त्याचा भरंवसा होता. त्यानें विट्टेबद्दल झारचें मत कलुषित करून त्याचें वजन झारपाशीं

शून्य करून ठेविलें. तेव्हां या सगळ्या दीडशहाण्यांच्या प्रभावळींत आपली अक्कल व्यर्थ आहे असें पाहून विट्टेनें परराष्ट्रीय राजकारणाचें कांहीं तरी निमित्त सांगून राजीनामा दिला.

* * *

शेतकरी व कामकरीवर्गांची ही असंतोषाची आग अशी भडकत जाऊन १९०५ सालीं तिनें क्रांतिकारक स्वरूप धारण केलें. १९०४ च्या फेब्रुवारींत रशियाचें जपानशीं युद्ध सुरू झालें. या युद्धांत रशियास पहिल्यापासूनच अपयश येत जाऊन सैन्यांत असंतोष माजला. यामुळें १९०५ सालचे संप व दंगे यांना, त्यांत शेतकरी-कामकऱ्यांबरोबरच सैनिकहि सामील झाल्यामुळें, सार्वत्रिक बंडाचें स्वरूप आलें. जानेवारीपासून डिसेंबरपर्यंत वर्षभर सरकार-विरुद्ध शेतकरी-कामकरी या स्वरूपाचा झगडा तीव्रतेनें चालू राहून या सालच्या धक्क्यानें झारशाही मोडून पडली नाहीं, तरी ती इतकी खिळखिळी झाली, कीं या वेळीं गेलेला तोल तिला पुन्हा कधींच सावरतां न येऊन पुन्हा दुसरा धक्का बसतांच ती कोलमडून पडली व तिचा चक्काचूर झाला. या सालच्या सर्व भयंकर प्रकारास ता. ९ जानेवारी रोजीं कामगारांच्या जमावानें जॉर्ज गेपॉन या भिक्षूच्या नेतृत्वाखालीं झारच्या चरणीं राजनिष्ठापूर्वक एक अर्ज देण्याचा प्रयत्न केला, त्यामुळें व तेव्हांपासून सुरुवात झाली.

जॉर्ज गेपॉन व त्याचें धोरण

जॉर्ज गेपॉन हा एक सुमारें ३५ वर्षांचा तरुण भिक्षु (प्रीस्ट) झुबाटोव्हचा हस्तक होता. झुबाटोव्हनें क्रांतिकारक मतप्रचारापासून कामगारांस परावृत्त करण्या-साठीं पोलिसांच्या नेतृत्वाखालीं जसे राजनिष्ठ कामगारसंघ काढले त्याचप्रमाणें झुबाटोव्हच्या प्रेरणेनें जॉर्ज गेपॉन यानें १९०३ सालीं 'यूनियन ऑफ् फॅक्टरी वर्कर्स' नांवाचा कामगारसंघ काढला. १९०४च्या एप्रिलमध्यें त्याला कायदेशीर मान्यताहि मिळाली. नोव्हेंबरच्या सुमारास या संघाच्या वायबोर्ग, वॅसिल्येविच बेट, नेव्स्की, कोल्मॉस्क, नार्वा, रोझ्टेवेन्स्क, मॉस्को, कॉल्पिनोव्ह, सेस्ट्रोरेट्झ्क व पीटर्सबर्गचें उपनगर इतक्या ठिकाणीं शाखा व उपशाखा पसरल्या होत्या. यांपैकीं एकट्या वायबोर्ग शाखेंत २००० सभा-सद असून सर्व संघांत सुमारें ९०००० सभासद होते, सर्व शाखोपशाखांना

वाचनालयें व पुस्तकालयें होतीं. मोठमोठ्या प्रोफेसरांकडून जगाचें आर्थिक प्रश्न, इतिहास, भूगर्भशास्त्र अशा जाड्या जाड्या विषयांवर सभासदांसाठीं व्याख्यानें केलीं जात. मात्र संघाचें राजानिष्ठा हें निरपवाद धोरण असल्यानें झारशाहीविरुद्ध चकारशब्द काढण्यासाहि बंदी असे.

१९०५च्या आरंभीं रूसो-जपानी युद्धांत होत असणाऱ्या पराभवानें सर्व देशभर राजकीय परिस्थितीबद्दल असंतोष वाढूं लागला होता. या सालीं कांहीं तरी भयंकर घालमेल देशभर होणार असें उघड दिसत होतें. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या क्रांतिकारक विचारसरणीचा कामगारांच्या मनावर विशेषच परिणाम होऊं लागला होता. लोकांना थोडें चिथावून, चिडवून मग बेदम झोडपून काढण्याची संधि सरकारहि मोठ्या आतुरतेनें पाहत होतें. त्यांच्या दुर्दैवानें ही आत्मघातक संधि त्यांना लवकरच आणून दिली.

१९०४ च्या डिसेंबरमध्यें पीटर्सबर्गमधील पुटिलॉव्ह कारखान्यांतील चार कामगारांना कारण न सांगतां एकदम हाकून लावण्यांत आलें. हे कामगार गेपॉनच्या कामगारसंघाचे सभासद होतें. सहजच गेपॉननें कारखान्याच्या डायरेक्टरकडे रदबदली केली, पण उपयोग होईना. फुलॉन या पोलिस चीफकडेहि त्यानें तक्रार केली, पण तिचाहि उपयोग झाला नाहीं. तेव्हां गेपॉनच्या संघांतील कामगार चिडीस पेटले. ता. १ जानेवारी १९०५ रोजीं सर्व पुटिलॉव्ह कारखान्यांतील कामगारांनीं संपावर जाण्याचा निश्चय केला. त्यांत गेपॉनच्या संघांतील कामगारहि सामील झाले व ३ तारखेस संपास सुरुवात झाली. संपाचें पुढारीपण गेपॉनच्या स्थानिक शाखेकडे आलें. त्यांनीं संपवाल्यांच्या म्हणून ज्या मागण्या मांडल्या त्या केवळ विनाकारण हाकून लावलेल्या चार कामगारांना न्याय मिळावा एवढ्याचपुरत्या नसून (१) आठ तासांचा दिवस (२) कामाच्या दिवसांतून तीन पाळ्या (३) पुरुषांना ६६ टक्के व स्त्रियांना १०० टक्के पगारवाढ (४) कारखान्यांत आरोग्य व सुखसोई यांची वाढ वगैरे रशियन भांडवलशाहीच्या मुळाला हात घालणाऱ्या मागण्याच त्यांनीं कारखानदारांपुढें मांडल्या. गेपॉनचें नेमस्त धोरण सोडून कामगार क्रांतिवादाच्या जाळ्यांत सांपडले आहेत असा याचा उघड अर्थ होता. पण गेपॉननें आशा सोडली नाहीं. कामगारांनीं क्रांतिकारक मागण्या मागितल्या तरीहि त्यांचें पुढारीपण आपण सोडूं नये

असा त्यानें हिय्या धरला व सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत संघटना पुरेशी नसल्यामुळें गेपॉनला पुढारीपण मिळविण्यांत यशहि आलें. 'प्युटिलॉव्ह आपलें मागणें मान्य करीत नाहीं, इतर कारखानदारहि आपलें ऐकत नाहींत, पण आपण झारला शरण जाऊं' असें त्यानें कामगारांना जागोजाग फिरून व्याख्यानें देऊन सांगितलें. कारखानदार व कामगार भांडले तरी कामगारांची राजनिष्ठा नष्ट होऊं नये अशी गेपॉनची खटपट चालू होती. ख्रिस्ती लोकांचें धर्मचिन्ह जो 'क्रॉस' तो घेऊन कामगारांनीं राजवाड्याकडे मिरवणुकीनें जावें व झारला भेटीस बोलावून त्याच्या चरणीं अर्ज सादर करावा असें गेपॉननें ठरविलें व कामगारांनीं त्यास संमति दिली. "पण झारनेंहि न ऐकलें तर?" कामगार शंका काढीत. आपली विनंति झार अमान्य करणारच नाहीं" असें गेपॉन त्यांना सांगे.

पण शंकेखोर बिकट होते.

"पण झार ऐकणारच नाहीं; आणि त्यानें न ऐकलें म्हणजे मग काय?" हा प्रश्न ते विचारीत. गेपॉन यास कांहीं तरी उत्तर देणें भागच होतें. तेव्हां राजनिष्ठेचा प्रचार करूं पाहणारा गेपॉन प्रश्न-प्रतिप्रश्नांच्या कोंडींत सांपडून— "जर झारहि आपलें ऐकणार नसेल तर—तर मग आम्हांला झारच नको!" अशीं उत्तरें नाइलाजानें देऊं लागला. त्यामुळें मात्र हा आपला निर्वाणीचा सोबती आहे असें कामगारांना वाटूं लागलें.

"जरूर पडेल तर आम्ही सर्व प्राणार्पणहि करूं; हे पवित्र भिक्षो, या थोर कृत्यांत आमचा पुढारी हो, आमचे तुला पूर्ण धन्यवाद आहेत!" असें म्हणून सर्व कामगार त्यास उत्तर देऊं लागले. कामगारांचीं अंतःकरणें उत्साहानें भरून गेलीं होतीं. "कित्येक उत्साहानें सद्गदित झाले, जमिनीवर पाय आपटूं लागले, भिंतीवर मुठी आवळून मारूं लागले, आकाशाकडे बाहु उभारून 'आम्ही अखेरपर्यंत डरणार नाहीं' अशा त्यांनीं शपथा घेतल्या."

झारशाहीची आत्माहुति मागणारा अर्ज

हा सर्व उत्साह वास्तविक नम्र अर्ज करण्याच्या मिरवणुकीसाठींच होता. पण १९०२ सालीं दुसऱ्या अलेक्झांडरच्या थडग्यापुढें कामगारांनीं राजनिष्ठायुक्त प्रार्थना जशी केली तशी प्रार्थना त्यांस आतां करावयाची नव्हती.

झारच्या चरणीं नम्रतापूर्वक केलेल्या अर्जांत त्यांनीं प्रचलित राज्यसंस्था व समाजव्यवस्था यांच्या खालीं नांगर घालून त्या खांदून काढा व त्यांचें स्वरूप बदलून टाका असेंच पर्यायानें म्हटलें होतें. झारच्या चरणीं जो अर्ज सादर करण्यासाठीं मिरवणूक निघावयाची होती त्या अर्जांत अर्जदार कामगार लिहितात,

मा-बाप,

"आम्ही कामगार, पीटर्सबर्गचें नागरिक, आपल्या चरणीं आलों आहों; आम्ही दुर्दैवी, तुच्छ लेखलेले गुलाम आहों; अनियंत्रित सत्ता व जुलूम यांखालीं आम्ही चिरडलों आहों; जेव्हां आमचा सर्व धीर खचला तेव्हां आम्हीं काम थांबविलें आणि ज्या अत्यावश्यक गोष्टीवांचून मानवी जिणें हा आम्हांस नरकवास होत आहे अशा कांहीं गोष्टी आम्ही त्यांच्याजवळ मागितल्या. पण त्यांनीं त्या मागण्या मान्य केल्या नाहींत. आम्हीं कसेंहि वागलों, तरी त्यांत त्यास कायदेभंग दिसूं लागला. आम्ही कित्येक हजार कामगार आपल्या चरणीं आलों आहों. माणसाला योग्य असें कांहींहि अधिकार आम्हांला नाहींत. सर्व रशियाभर जनतेची हीच स्थिति आहे. तुमच्या अधिकाऱ्यांच्या दुष्कृत्यांमुळें ही गुलामगिरी आमच्या कपाळीं आली आहे.....आपण उदार होऊन या वेळीं सार्वत्रिक माफी जाहीर करा, नागरिकस्वातंत्र्य, चरितार्थयोग्य मजुरी, शेतकऱ्यांना जमिनींची हळूहळू वाटणी, सार्वत्रिक व समान मतदानाच्या तत्त्वावर राज्यघटनापरिषद वगैरे आमच्या मागण्या मान्य करा. ...महाराज, आपल्या प्रजेस मदत नाकारूं नका, तुम्ही आणि आम्ही तुमचे प्रजाजन यांच्यामध्यें ज्या भिंती उभ्या आहेत त्या पाडून टाका. आमच्या मागण्या अमलांत येण्यासाठीं अधिकाऱ्यांना हुकूम द्या आणि त्या हुकुमाची तामिली करून घेण्याची शपथ घ्या. यामुळें तुम्ही रशियास सुखी कराल. पण तुम्ही जर हें सर्व करणार नसाल तर मग आम्ही याच जागीं प्राणार्पण करण्यासहि सिद्ध झालों आहों. कारण एक तर स्वातंत्र्य व सुख मिळवूं किंवा मृत्यूच्या भेटीस जाऊं; आम्हांस तिसरा मार्ग नाहीं!"

या सर्व मागण्या अनियंत्रित झारशाहीस आत्महत्या करावयास लावणाऱ्या होत्या. पण रशियन प्रजा सुखी व्हावयाची असेल तर अनियंत्रित

झारशाहीचा शेवट करण्यावांचून सुटका नाहीं हें लोकांना पटूं लागल्याचा तो पुरावा होता. अनियंत्रित राजसत्ता नष्ट करून प्रजेच्या हातीं राज्यकारभार द्या व जमिनदारांच्या जमिनी शेतकऱ्यांच्या हवालीं करा, अशा या मागण्या होत्या. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुढाऱ्यांनीं व इतर कार्यकर्त्यांनीं कामगारांत हिंडून हिंडून त्या त्यांस पढविल्या होत्या. राज्यसंस्थेंत व समाजव्यवस्थेंत असे एकांतिक फरक झाल्यावांचून आपलीं लहानसान दुःखें निवारलीं जाणार नाहींत हें कामगारांस कळूं लागलें होतें. म्हणून गेपॉननें झारला नम्र अर्ज करण्याची सूचना केली; ती मान्य करूनहि कामगारांनीं या अर्जांत या एकांतिक स्वरूपाच्या मागण्यांचाच समावेश केला.

विनंतिअर्जास गोळीबारानें उत्तर

९ जानेवारी रोजीं अर्जाची मिरवणूक निघणार असें ठरल्यावर आधले दिवशीं रात्रीं झारनें ग्रँड ड्यूक वॉल्डेमीर या सेनापतीस " जमावाची बंडखोरवृत्ति मोडण्यासाठीं जरूर तर त्याच्या हाताखालील सर्व सैन्याचा त्यानें हवा तसा उपयोग करावा" म्हणून सर्वाधिकारी नेमलें. त्यानें पूर्वतयारी म्हणून रातोरात आपल्या सैन्याच्या सर्व तुकड्या पीटर्सबर्गमध्यें जमविल्या व सारें गांव व्यापून टाकलें. सर्व ठिकाणचे पहारे दुप्पट केले. निरनिराळ्या विभागांत अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. रणवेषांत अधिकाऱ्यांनीं सर्वकडे तपासणी चालू केली. थोडक्यांत म्हणजे जानेवारी ९ च्या सकाळीं सरकार कामगारांशीं लढाई देण्यासाठीं सज्ज होऊन राहिलें आहे असा देखावा जनतेच्या दृष्टीस पडला.

रविवार ता. ९ जानेवारी रोजीं पीटर्सबर्ग येथें गेपॉनच्या नेतृत्वाखालीं कित्येक हजार कामगार अनेक तुकड्यांनिशीं झारला अर्ज घेऊन जाण्याच्या मिरवणुकीस निघाले. क्रांतिकारक घोषणा, क्रांतिकारक निशाणें असें त्यांत कांहींहि नव्हतें. गांवांतील निरनिराळ्या विभागांतून मिरवणुकी निघून त्यांनीं झारचें निवासस्थान जो 'विंटर पॅलेस' त्यासमोरील चौकांत जमावयाचें, तेथें झारला भेटीस बोलावून त्याचे चरणीं वर उल्लेखिलेला अर्ज दाखल करावयाचा अशी योजना होती. झार कामगारांचा अर्ज स्वीकारण्यास आला असतां त्याच्या जिवास मुळींच धोका पोंचणार नाहीं अशी हमी घेण्यांत

आली होती; पण झारनें स्वतःऐवजीं सशस्त्र सैनिक कामगारांच्या 'स्वागता'स पाठविले. नार्वा टॉवरपासून सुमारें ३०० कदमांपर्यंत सैनिकांनीं मिरवणूक येऊं दिली. नंतर घोडेस्वार एकदम गर्दीत घुसून त्यांनीं तरवारी चालविल्या. लगेच पायदळ सैनिकांनीं गोळीबाराच्या फेरी झाडल्या. पळापळ सुरू झाली. घोडेस्वारांनीं पळणारांचा पाठलाग करून त्यांना जखमी केलें व जखमी झालेल्यांना भोसकून ठार मारलें. शहराच्या दुसऱ्या भागांतहि मिरवणुकीवर हल्ले झाले. श्चूजलबर्ग विभागांत गोळीबार झाला असतां कित्येक कामगारांनीं छातीवरील शर्ट फाडून उघड्या छात्या सैनिकांपुढें केल्या. "भाई हो, आम्ही मरूं पण मागें हटणार नाहीं" अशी त्यांनीं मरतां मरतां गर्जना केली. ट्रोइट्स्की पुलावर गोळीबार झाल्यावर घोडेस्वारांनीं मिरवणुकींतील बायकामुलांवर घोडे घातले. व्हॅसिल्व्हेस्की बेटावर कामगारांनीं सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे नेतृत्वाखालीं प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं सरकारी शस्त्रागारें लुटून शस्त्रास्त्रें हस्तगत केलीं, त्यांनीं टेलिग्राफचे खांब उपटून व मोठमोठ्या फळ्या घेऊन त्यांच्या साह्यानें सैनिकांचीच वाट अडविली व दगड, विटा बंदुकीच्या गोळ्या यांनीं घोडेस्वारांचा प्रतिकार केला. अर्थात् शेवटीं कामगारांस मागें परतावेंच लागलें. या सार्वत्रिक कत्तलींत १००० लोक प्राणांस मुकले व २००० जखमी झाले. अशा प्रकारें या 'रक्तमय रविवारा'चा (ब्लडी संडे) शेवट झाला.

पीटर्सबर्गची आग रशियाभर पसरली

पण या रक्ताच्या पुरांतून क्रांतीचा महापूर जन्म पावला. सगळा रशिया या कत्तलीनें चवताळून गेला. पीटर्सबर्गमधील बहुतेक कामगारांनीं दहा दिवसपर्यंत संप पुकारला. ही संपाची लाट वॉर्सा, लोड्झ, रिगा इतक्या दूरवर पसरली. सर्वत्र पोलीस व लष्कर यांशीं कामगारांच्या मारामाऱ्या झाल्या. शेकडों वर्षांचा झारवरील विश्वास या एकाच दिवसांत जळून खाक झाला. हळूहळू रशियाभर जेथें जेथें शहरें व कारखाने होते तेथें तेथें कामगार संप करून आपल्या गाऱ्हाण्यांची दाद मागूं लागले. आणि कारखानदारांबरोबरच पोलिसांशींहि झगडा सुरू झाल्यामुळें त्यांनीं आर्थिक मागण्यांबरोबर राजकीय हक्कांच्या मागण्या मांडण्यास सुरुवात केली. वॉस्नेसेन्स्क येथील संप एक

आठवडाभर चालला होता. त्यांत ५०००० कामगार सामील झाले. पोलीस व लष्कर यांपुढें सर्वत्रच कामगारांस माघार घ्यावी लागली. पण पराभूत कामगारांनीं आपलें असंतोषाचें लोण फेब्रुवारी व मार्च महिन्यांत शेतकऱ्यांत पसरविलें. मांच्युरियांत चालू असलेल्या रूसो-जपानी युद्धांत होत असलेल्या पराभवानें व तेथून परत आलेल्या शेतकऱ्यांतील रिक्रूटांनीं सांगितलेल्या हकीकतींनीं शेतकरी आधींच त्रस्त झाला होता; त्यांत पीटर्सबर्गमधील कामगारबांधवांच्या कत्तलीची भर पडली. यामुळें मध्य रशिया, पोलंड, पश्चिमेकडील इतर प्रांत, बाल्टिक प्रदेश, कॉकेशस प्रदेश या सर्व प्रदेशांत शेतकऱ्यांनीं दंगे करून जमिनदारांच्या इस्टेटी पाडून, जाळून उध्वस्त केल्या. या दंग्यांत शेतमजुरापासून घरंदाज शेतकऱ्यांपर्यंत सर्व सामील होते. सुमारें एकसप्तमांश रशियाभर व शेतीच्या प्रमुख भागांत हे दंगे झाले. या दंग्यांतून शेतकऱ्यांच्या संघटनेच्या प्रश्नास जोर मिळून 'अखिल रशियन शेतकरी संघ' ही गुप्त संस्था ३१ जुलै १९०५ या दिवशीं स्थापन झाली. शेतकऱ्यांना जमिनदारांच्या जमिनी वाटून देणें व राज्यघटनापरिषद बोलावणें हे दोन हेतु या संघानें आपलें ध्येय म्हणून ठरविले. अर्थात् शेतकऱ्यांना घटनापरिषदेपेक्षां जमिनीचा प्रश्नच महत्त्वाचा वाटत होता. पण ९ जानेवारीच्या कामगारांच्या अर्जांत याच दोन मागण्या प्रमुख होत्या. या गोष्टी लक्षांत घेतां सर्व जनतेचें सामाजिक व राजकीय ध्येयावर कसें एकमत होऊं लागलें होतें हें चांगलें दिसून येतें.

सैनिक झारशाहीवर उलटले

शेतकरी व कामकरी या वर्गांत जो हा असंतोष पसरला तो तसाच शेतकरी-कामकरीवर्गांतूनच निर्माण होणाऱ्या सैनिकांतहि पसरला. काळ्या समुद्रावरील सशस्त्र क्रूझर पॉटेम्किन यावरील खलाशांनीं शिधा पुरेसा व चांगला वाटला जात नाहीं या कारणासाठीं बंडाचें निशाण उभारलें. या खलाशांत सोशल डेमोक्रॅट पक्षानें पुष्कळ मतप्रसार केला होता. येथील सैनिकांनीं बंड पुकारतांच आपल्या अधिकाऱ्यांना पकडलें व ओडेसा येथील संपवाल्यांना आपली सहानुभूति असल्याचें जाहीर केलें. एका खलाशाचा अधिकाऱ्यांनीं खून केला होता. त्याच्या शवास किनाऱ्यावर

आणून खलाशांनीं मोठ्या इतमामानें मूठमाती दिली, आणि पुन्हा तें क्रूझर समुद्रांत हाकारलें. त्यावर हल्ला करण्यास झारनें दुसरीं जहाजें १७ जून रोजीं पाठविलीं; पण पॉटेम्किनवरील खलाशांनीं आपलें क्रूझर सरळ त्या जहाजांजवळ नेऊन त्यांवरील खलाशांना आपणांस सामील होण्याची विनंति केली. 'जॉर्जी पॉबेडो नोसेट्झ्' या प्रचंड जहाजावरील खलाशी जहाज घेऊन बंडवाल्यांना येऊन भिळाले, पण लवकरच त्यांनीं बंडवाल्यांना सोडलेंहि. बंड यशस्वी होत नाहीं असें पाहून पॉटेम्किनवरील खलाशी २५ जून रोजीं रुमानियन अधिकाऱ्यांचे हातीं गेले. तेथून कांहीं लोक रशियन सरकारच्या ताब्यांत गेले व दुसरे कांहीं निसटून विदेशीं पसार झाले. पॉटेम्किनवरील खलाशांचा मोड झाला तरी शेतकरी व कामकरी यांचे सैनिकांशीं समान हितसंबंध असून एका वर्गाचा असंतोष तोच सर्वांचाहि असंतोष ही गोष्ट जनतेस कळून आली. तसेंच सैन्य व आरमार या बलावर झारशाही अजिंक्य आहे असा एक लोकांत खोल रुजलेला समज होता; पण सैन्य व आरमार हें बल झारचें नसून लोकांचें आहे, शेतकरी-कामकऱ्यांतूनच निर्माण झालें आहे व योग्य तऱ्हेनें आवाहन केलें असतां तें शेतकरी-कामकऱ्यांना आपल्या बाजूनें झगड्यांत उपयोगी पडेल ही जाणीव जनतेंत 'पॉटेम्किन'च्या बंडानें उदित केली.

कामगारांचा सार्वत्रिक संप व बंड

१९०५ च्या क्रांतींतील जानेवारीपासून जून-जुलैपर्यंतचा हा पूर्वार्ध झाला. उत्तरार्धास सप्टेंबरपासून सुरुवात झाली. या संपाचें स्वरूप अधिक प्रखर असून त्यांचें राजकीय सार्वत्रिक संपांत रूपांतर झालें. आगगाड्या तारायंत्रें वगैरे राष्ट्राच्या प्राणभूत धंद्यांतील कामगार त्यांत सामील झाले व शेवटीं सैनिकांनींहि बंड केलें, इतकें या उत्तरार्धाचें स्वरूप भयंकर होतें.

सप्टेंबरअखेरीस मॉस्को येथील छापखाना-कामगारांच्या संपानें या उत्तरार्धास सुरुवात झाली. पीटर्सबर्ग येथें पूर्वार्धांत झालेल्या उठावणीचा यांचेवर कांहींच परिणाम झालेला नव्हता. त्यांच्या आर्थिक अडचणींनीं या वेळीं त्यांना संपास प्रवृत्त केलें. एकंदर ५० छापखान्यांतील ६००० कामगारांनीं एका दिवशीं एकदम संप पुकारला. त्यांच्या मागण्या प्रथम आर्थिक

स्वरूपाच्या होत्या. पण झारशाहीविरुद्ध घोषणा करण्याची तयारी त्यांनीं दर्शविली. २५ सप्टेंबर रोजीं पावबिस्किटांच्या कारखान्यांत संप सुरू झाले. यापैकीं फिलिप्पॅव्ह या कारखान्यांतील कामगारांची व सैनिकांची चकमक झाली. कामगारांनीं बंदुका चालवून सैनिकांच्या हल्ल्यास तोंड दिलें. ऑक्टोबरच्या आरंभीं पीटर्सबर्गमधील छापखाना-कामगारांनीं मॉस्को येथील आपल्या बांधवांना सहानुभूति दाखविण्यासाठीं संप केले व त्यांत सरकारी छापखान्यांतील कामगारहि सामील झाले. तेव्हां गोदी-कामगारांनींहि संप पुकारले आणि इतर कारखानेहि संपावर गेले. जूनच्या संपांत मध्यवर्ती संघटना निर्माण झाली नव्हती. पण रेल्वेंतील प्रचंड संपानें सर्वच संपांना एक संघटित स्वरूप येऊं लागलें. २० सप्टेंबरला सरकारी रेल्वेच्या कामगारांनीं 'कॉन्फरन्स फॉर दि रिव्हिजन ऑफ् दि रेग्युलेशन फॉर दि कॉंट्रिब्यूटरी पेन्शन फंड' नांवाची संस्था काढली. 'पेन्शन फंडाचे नियम बदलून घेणें' एवढेंच या संस्थेचें सौम्य कार्य होतें. पण कामगारांचा एकंदर नूर अतिशय प्रखर होता. लवकरच या संस्थेस 'फर्स्ट डेलिगेट-कॉंग्रेस ऑफ् दि वर्कर्स रेप्रेझेंटेटिव्ह्ज् (कामगारमुखत्यारांची पहिली कॉंग्रेस) असें नांव मिळालें. या संस्थेच्या चळवळी सरकारच्या डोळ्यांत खुपूं लागल्या. उलट इतर कामगारवर्गांत त्यांचेबद्दल सहानुभूति वाढूं लागली. शेवटीं ६ ऑक्टोबर रोजीं या कॉंग्रेसचे कांहीं प्रतिनिधि सरकारनें पकडले. तेव्हां रेल्वे-कामगारांनीं प्रचंड प्रमाणावर संप पुकारला. मॉस्को व पीटर्सबर्ग येथें येणाऱ्या सर्व रेल्वेवरील कामगार, पोस्ट व टेलिग्राफ ऑफिसांतील कामगार, छापखाने, गिरण्या व इतर कारखाने यांतील कामगार हे सर्व संपावर गेले व या संपास राजकीय सार्वत्रिक संपाचें स्वरूप आलें.

"ऑक्टोबरमधील या सार्वत्रिक राजकीय संपांत सगळ्या रशियांतील कोणत्याहि मोठ्या कारखान्यांतील कामगार सामील झाल्यावांचून राहिले नाहींत. रेल्वेची हालचाल बंद पडली. वर्तमानपत्रें बंद पडलीं. रस्त्यांवरील दिवे बंद होते. बाजारांत नवा मालच येईना. सगळेच कामगार संपावर गेल्यामुळें सरकारचीं व खाजगी संस्थांचीं रोजचीं कामेंहि थंडावलीं. विद्यापीठांतून उत्साही, क्रांतिकारक मताच्या विद्यार्थ्यांची गर्दी झाली. शहरांतील चौकांतून सैनिक व पोलिस यांना लोकांच्या गर्दीपुढें मागें हटावें

लागलें. हजारोंच्या गर्दीनें रोज असंतोषनिदर्शनें (डेमॉन्स्ट्रेशन्स) होत होतीं. ती खरोखर अखिल जनतेकडूनच होत असलेली क्रांति होती. निवळ आर्थिक मागण्या मागें पडून, आठ तासांचा दिवस, सार्वत्रिक मताधिकार, घटनापरिषद या मागण्या संपवाल्यांनीं पुढें मांडल्या. सभा व निदर्शनें यांच्या शेवटीं संपवाले आणि सैनिक व पोलिस यांचेमध्यें सशस्त्र चकमकी झडत." (इलस्ट्रेटेड हिस्टरी ऑफ रशियन रेव्होल्यूशन, खंड १ ला.)

ऑक्टोबरच्या १० तारखेस खार्कॉव येथें, ११ तारखेस पेकॅटेरिनोस्लाव्ह येथें व १६ तारखेस ओडेसा येथें कामगार व सैनिक यांनीं एकमेकांस अडवून चकमकी केल्या. या सार्वत्रिक संपांत आजवर नसलेले कित्येक वर्ग सामील झाले. पण एकंदर संपाचें पुढारीपण सर्वत्र कामगारांच्या हातीं येऊन संपाचें मध्यवर्ती नियंत्रणहि कामगारांनींच केलें.

सोव्हियट संस्थेचा जन्म

हें मध्यवर्ती नियंत्रण व नेतृत्व करण्यासाठीं 'सोव्हियट ऑफ वर्कर्स डेप्युटीज्' (कामगार प्रतिनिधिमंडळ) ता. १३ ऑक्टोबर रोजीं पीटर्सबर्ग येथें निर्माण झालें, हें ऑक्टोबरच्या सार्वत्रिक संपाचें वैशिष्ट्य होय. संपवाल्या प्रतिनिधींचें 'सोव्हियट' नेमून त्याच्या नेतृत्वाखालीं व शिस्तीखालीं प्रचंड प्रमाणावरील राजकीय संप चालविण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. तिसऱ्या दिवशीं १०० कारखान्यांचे २२६ प्रतिनिधि या सोव्हियटवर आले. लवकरच या पद्धतीवर मॉस्को येथेंहि सोव्हियट निर्माण झालें.

कामगारांचा यज्ञ; भांडवलदारांना फल

असंतोष हटत नसून वाढतो आहे असें पाहून १७ ऑक्टोबर रोजीं सरकारनें नमतें घेण्याचें ठरविलें व एक जाहीरनामा काढला. त्यांत लोकांची स्वातंत्र्याची मागणी मान्य करण्याचें कबूल केलें असून स्टेट ड्यूमा नांवाचें पार्लमेंट प्रजेस देण्याचें जाहीर करण्यांत आलें. कामगारांना प्रतिपक्षी आपल्यापुढें नमल्याबद्दल उत्साह वाटला. पण मिळालेली देणगी ही फोलकट होती हेंहि त्यांस उघड दिसलें. संप चालूच ठेविल्यास आणखी यश येईल अशी

आशा वाटून सोव्हियटनें संप चालूच ठेवण्याचा सल्ला दिला. २० ऑक्टोबरला प्रसिद्ध झालेल्या 'वर्कर्स डेप्युटीज् सोव्हियट न्यूज्' या सोव्हियट वृत्तपत्रामध्यें पुढील मजकूर होता—

"आम्हांस राज्यघटना देण्यांत आली असें सांगण्यांत येत आहे. 'स्वातंत्र्याची घटना' आम्हांस मिळाली; पण सभागृहाभोंवतीं सैनिकांचा पहारा बसणार आहे. 'भाषणस्वातंत्र्य' मिळालें; पण सेन्सॉरची सत्ता पूर्ण अनियंत्रित आहे. आम्हांस 'शिक्षण-स्वातंत्र्य' जाहीर करण्यांत आलें आहे; पण विद्यापीठांवर सैनिकांचा पहारा राहावयाचा आहे. आम्हांस 'व्यक्तिस्वातंत्र्य' मिळालें आहे; पण पकडलेल्या माणसांनीं तुरुंग तुडुंब भरून वाहत आहेत. आम्हांस 'सनदशीर घटना' मिळाली; पण अनियंत्रित सुलतानीहि शिल्लक आहेच. वा, छान छान! सर्व कांहीं दिलें आहे—आणि उलट कांहींहि दिलें नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे!"

या तर्व तक्रारींचें मूळ असें होतें, कीं ड्यूमा जरी देण्यांत आली होती तरी तिचे कायदे झारवर मुळींच बंधनकारक नव्हते. शेतकरी-कामकरी या प्रचंड वर्गास मताधिकार मिळण्याची सोय झाली नव्हती. ज्या ड्यूमाचा कायदा अनियंत्रित झारला बंधनकारक नाहीं ती भांडवलवाल्यांनींहि मान्य करूं नये असें सोशल डेमोक्रॅट पक्षाचा प्रमुख पुढारी लेनिन हा सांगत होता. लेनिनच्या सांगण्याचा भांडवलवाल्या वर्गावर कांहींच परिणाम झाला नाहीं. कामगारवर्ग आपला लढा चालवून झारशाहीला नमवीत आहे हा देखावा भांडवलवाल्यांस प्रथम इष्ट वाटत होता व ही संधि साधून सनदशीर राज्यघटनेची मागणी भांडवलदारवर्गानें झारपुढें मांडली. १७ डिसेंबरच्या जाहीरनाम्यांत झारनें ड्यूमा देण्याचें जाहीर करतांच भांडवलदारवर्गास 'आपण जिंकलीं' असें वाटून, संपवाल्यांना जी कांहीं पैशाची वगैरे मदत ते देत असत ती त्यांनीं बंद केली; ज्या ड्यूमाच्या कायद्यांचें झारवर बंधन नाहीं अशी ड्यूमा भांडवलदारवर्गास पूर्णपणें मान्य होणारी होती असें नव्हे, पण संपवाल्या मजुरांच्या मागण्या इतक्या क्रांतिकारक स्वरूपाच्या होत्या, कीं त्यांत झारशाहीबरोबर भांडवलशाहीचीहि आहुति पडणार होती. आणि संपास इतकें भयंकर स्वरूप आलेलें होतें, कीं लवकरच तो झोडपून न काढल्यास सैन्यांतहि बंड होईल, व मग कोणाचाच त्यापुढें निभाव लागणार नाहीं हें भांडवलवाल्यांना

दिसलें. तेव्हां झारनें प्रातिनिधिक सत्तेचें डयूमा हें सोंग उभें केलें होतें. हाहि केवळ मजुरांच्या हालअपेष्टांनीं व प्रतिकारानें आपणांस फुकटांत मिळणारा फायदा कांहीं लहान नव्हे असा पोक्त विचार भांडवलदारवर्गानें केला व मजूरवर्गाकडे पाठ फिरवून झारकडे आपलें तोंड फिरविलें.

अखेरची हातघाई व कामगारांचा पराभव

भांडवलदारवर्गानें संपवाल्या कामगारांना सोडलें; पण त्याचबरोबर शेतकरीवर्गातून कामगारांना सक्रिय पाठिंबा मिळाला. जानेवारी-फेब्रुवारींतल्या शहरांतील कामगार-संपानंतर खेडोपाडीं शेतकऱ्यांत जशी असंतोषाची लाट उसळली तोच प्रकार या वेळींहि झाला. मध्य रशिया, बाल्टिक प्रदेश, पोलंड, कॉकेशस वगैरे विभागांत पूर्वीच्या तिप्पट क्षेत्रांत दंगे झाले. दंग्याचें भयंकर स्वरूप पाहून सरदार व जमिनदार आपलीं घरेंदारें टाकून पळून गेले. त्यांच्या सुमारें दोन हजार इस्टेटी शेतकऱ्यांनीं उध्वस्त करून टाकल्या. इकडे कामगारांचें संख्याबल वाढतच होतें. २६ ऑक्टोबरला कॉन्सडॅट्ट येथें असलेल्या सैनिकांच्या तुकडीनें बंड केलें. त्या तुकडींतील शंभरांहून अधिक लढाऊ खलाशांना व सैनिकांना कोर्टमार्शलनें शिक्षा देण्यांत आल्या; पोलंडमध्यें लष्करी कायदा पुकारण्यांत आला. तेव्हां ता. १ नोव्हेंबर रोजीं रशियाभर सार्वत्रिक राजकीय संप संपवाल्यांनीं जाहीर केला. हा संप ता. ७ पर्यंत अत्यंत जारी होता. ता.१५ नोव्हेंबर रोजीं काळ्या समुद्रांतील 'ओट्चॅकोव्ह' या लढाऊ जहाजावरील खलाशांनीं बंड उभारलें. नेव्हल लेफ्टनंट श्मिड्ट हा त्याचा पुढारी होता. जहाजावर लाल निशाण उभारण्यांत आलें. पॉटेम्किन, नीस्टर वगैरे आणखी कांहीं जहाजें बंडांत सामील झालीं. बंडवाल्यांनीं अधिकाऱ्यांना पकडलें. अर्धा दिवस बंडवाल्यांची सरशी होती. पण पुढें त्यांवर इतर सरकारी जहाजांनीं हल्ले करून त्यांचा मोड केला. इकडे गिरण्या, कारखाने आगगाड्या, पोस्ट-ऑफिसें वगैरे सर्व ठिकाणीं कामगार हे आपल्या सोव्हिय-ट्स्च्याच हुकुमांची बजावणी करतात व झारचें राज्य नष्टच झालें आहे असें कामगार मानतात असें अधिकाऱ्यांनीं पाहतांच सभा उधळून लावणें व पुढाऱ्यांची सरसकट धरपकड करणें हें काम अधिकाऱ्यांनीं धडाक्यानें सुरू केलें.

२२ नोव्हेंबरला कामगारांनीं बँकांतून आपले पैसे काढून घेऊन व

आपला पगार सोन्याच्या नाण्यांत रोख मागून सरकार व भांडवलदार यांवर आर्थिक बहिष्कार पुकारावा असें पुढाऱ्यांनीं ठरविलें. सरकारनें क्रुस्टलॅव्ह नोसार या सोव्हियटच्या अध्यक्षाला अटक केली. तेव्हां २७ नोव्हेंबरला कामगारांनीं सशस्त्र बंड उभारावें असाच ठराव त्या सोव्हियटनें मंजूर केला. २ डिसेंबरला सोव्हियटनें आर्थिक बहिष्काराचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. ३ तारखेस सरकारनें सर्व सोव्हियट सभासद पकडले. तेव्हां संपाची वावटळ पुन्हा जोरावली व ६ डिसेंबरला मॉस्को येथील दीड लक्ष कामगार संपावर गेले. ता.७ ला सोव्हियटच्या हुकुमावरून मॉस्को येथें सार्वत्रिक संप जाहीर करण्यांत आला तेव्हां सरकारनेंहि भयंकर उग्र रूप धारण केलें. संपावर गेलेले कामगार व सैनिक या पुढाऱ्यांची बैठक एका पाठशाळेंत भरली असतां सैन्यानें त्या शाळेस वेढा देऊन बैठक बरखास्त करण्याचा हुकूम केला. पण पुढाऱ्यांनीं तो न मानल्यामुळें सैनिकांनीं दुसऱ्या मजल्यावर गोळीबार करून तावदानें फोडलीं, कांहीं पुढाऱ्यांचे बळी घेतले आणि बैठक उधळून लावली. १० डिसेंबरपासून सैनिक व नागरिक यांत जवळ जवळ युद्धच जुंपलें. कामगारांनीं पडक्या घरांचे वांसे, तुळया, फर्निचर वगैरेंनीं जागोजाग सैन्याचे रस्ते अडाविले व लाल निशाणें उभारलीं. त्यांना नागरिकांकडूनहि मदत होऊं लागली. तेव्हां सैन्यानें रस्तोरस्तीं गोळीबार चालू केला. सैनिकांना फितुर करण्याचे, त्यांना बंडवाल्यांच्या पक्षास ओढून घेण्याचेहि अनेक प्रयत्न कामगारांनीं केले. १० डिसेंबर रोजीं दोन कामगार-मुली लाल निशाणें घेऊन "आम्हांला ठार माराल तरी आम्ही निशाणें सोडणार नाहीं!" असा घोष करीत कोझॅक घोडेस्वारांस सामोऱ्या गेल्या. तेव्हां कोझॅक शरमले. त्यांनीं घोडे मागें फिरविले आणि कामगारांनीं त्यांच्या नांवानें जयघोष केला. आपल्या १५००० सैनिकांपैकीं ५००० वरहि विश्वास ठेवणें अवघड आहे असें सेनापति डुबॅसोव्ह यास वाटत होतें. मॉस्को येथील प्रेस्निया व श्रूका या विभागांत कांहीं काळ कामगारांचेंच राज्य होतें. पण १८ तारखेस सैनिकांनीं या विभागास गराडा घालून त्यांना शरण यावयास लावलें. तेव्हां १९ डिसेंबरला मॉस्को सोव्हियटनें संप थांबल्याचें जाहीर केलें. बंडाची आग इतरत्रहि जोरांत पसरली होती. टिमर्निक येथें तर जवळ जवळ प्रतिस्पर्धी राज्य निर्माण होऊन सरकारी गुप्त हेरांना तुरुंगांत

टाकण्यासाठीं तुरुंगहि तयार झाला होता. नोव्हरोस्सिक येथें सैनिकांनीं बंड उभारून गांवाचा ताबा घेतला होता. निकोलेव्ह व पायंटिगोर्स्क येथेंहि असेच प्रकार झाले. पण रूसो-जपानी युद्ध थांबल्यावर झारनें सर्व शक्ति एकवटून प्रजेवर दडपशाही केली. विदेशी भांडवलवाल्यांनीं झारला कर्जें देऊन बंड शमविण्यास मदत केली. यामुळें अखेर सर्वत्र संपवाल्यांना व बंडवाल्यांना माघार घ्यावी लागली आणि झारशाहीवर आलेलें एक महा-संकट भांडवलवाल्यांना डयूमा हें पार्लमेंटचें बाहुलें देऊन टाकतांच टळलें असें झारला वाटलें.

प्रकरण ३ रें

रशियन राज्यक्रांतीची वैचारिक पार्श्वभूमि

प्रजेच्या हक्कांची धर्मशास्त्रांत उपेक्षा

" शिक्षा करण्यास पात्र नाहीं अशांना शिक्षा करशील व जे शिक्षेस पात्र आहेत अशांना शिक्षा करणार नाहींस तर, हे राजा, तुझा सर्वनाश होईल " अशा प्रकारचे उपदेश प्राचीन धर्मग्रंथांतून राजधर्मप्रकरणीं ऋषींनीं राजांना दिले आहेत. राजा जुलुमी निघाला तर प्रजा त्याचें शासन झुगारून देऊन त्याचा विध्वंस करते, हा अनुभव अतिप्राचीन काळापासून सर्वत्र आला आहे. त्यामुळेंच राजास असा उपदेश देण्यांत येई. पण जुलुमी राजा निघाला तर प्रजेनें बंड करावेंच करावें आणि तें अमुक पद्धतीनें करावें हें मात्र तितक्याच आग्रहानें फारसें कोठें सांगितलेलें नाहीं. याचें कारण असें असावें कीं, राज्यसंस्था नष्टच झाली तर चोहोंकडे अंदाधुंदी माजून जीवित, वित्त व अब्रू नष्ट होईल ही विचारवंतांस भीति वाटत असे. यामुळें राज्यसंस्था थोडीफार अन्यायी असली तरी तिचें शासन अप्रतिहत असावें हेंच एकंदरींत समाजाच्या कल्याणाचें मानण्यांत येई. राज्यकर्तेहि आपल्या शासनास विघ्न आणतील अशा व्यक्ति व संस्था यांना डोकें वर काढूं देत नसत. या व इतर कारणांमुळें राज्यसंस्था जशा सुसंघटित असत, न्यायानें वागण्याची व अन्याय करण्याचीहि राज्यसत्तेची संघटना जशी पद्धतशीर असे तशी जुलुमी राजांस प्रतिकार करून नवी राजवट उभारण्याचें शास्त्र अथवा पद्धति कोणी घालून ठेविलेली नसे अथवा त्यासाठीं कायम स्वरूपाच्या संस्थाहि नसत—जगूं दिल्या जात नसत. वरिष्ठ वर्गांनीं आपल्या जमिनी काढून घेतल्यामुळें शेतकऱ्यानीं बंडें केल्याचे व पुष्कळदां राज्यसंस्था यशस्वितेनें हाणून पाडून आपल्या जमिनींचे ताबे परत मिळविल्याचे प्रकार इतिहासांत सर्व देशांत, सर्व काळीं आढळले आहेत व राजानें जुलूम केला व इतर कोणत्याहि उपायांनीं

तो जुलुमापासून परावृत्त झाला नाहीं तर प्रजेनें बंड करणें हें कोणी फारसें गैर मानलेलें नाहीं. सदनशीर चळवळींचें माहेरघर अशा इंग्लंडांतहि प्रजाजनांनीं बंडें करून व राजांना त्यांच्या दुष्कृत्यांचें प्रायश्चित्त देऊन आपलें स्वातंत्र्य स्थापित केलें आहे. पण त्याबरोबरच राजधर्माचें जसें एक शास्त्र बनलें होतें व राजांना तें शिकविलें जाई तसें प्रजाधर्मांतील राज्यसंस्थेस पद्धतशीर प्रतिकार करण्याचें कर्तव्य धर्मशास्त्रकारांकडून कधीं 'कर्तव्य' म्हणून प्रतिपादिलें जात नसे अथवा 'शास्त्र' म्हणून पढविलेंहि जात नसे.

यामुळें इतिहासकालांत बंडें हीं बहुधा अव्यवस्थित झालीं आहेत. तीं पुष्कळदां दडपलींच गेलीं आहेत, अपयश आलें तेव्हां व यश आलें तेव्हांहि बंडवाल्यांनीं अनेक प्रमाद व जुलमी राजापेक्षांहि जुलमी कृत्यें केलीं आहेत आणि त्यांच्याहिपेक्षां अधिक क्रूरतेनें राज्यकर्त्यांनीं बंडवाल्यांवर व जनतेवर सूड उगविला आहे. म्हणून केवढ्याहि भयंकर जुलमी राजापेक्षां बंडाचाच धाक सामान्य जनतेस जास्त वाटे. अथवा बंडवाल्यांच्या हेतूंचें आकलन होऊं न शकल्यानें प्रजा बंडवाल्यांबद्दल उपेक्षावृत्ति दाखवी. रशियाचा इतिहास या सर्वत्र सामान्य असलेल्या घटनेस अपवाद नव्हता. १८२५त 'डिसेंब्रिस्टां'चें बंड झालें असें जें मागें सांगितलें तें सरदार घराण्यांत जन्म पावलेल्या, सैन्यांत हुद्द्याचीं कामें केलेल्या व तत्कालीन युद्धशास्त्रांत परिणत असून प्रत्यक्ष अनेक युद्धें केलेल्या अशा सैन्याधिकाऱ्यांनीं केलें होतें. पण त्यांत सुद्धां संघटना, कौशल्य, समयज्ञता, यश येण्याजोगें अचूक धोरण वगैरे कांहींहि दिसून आलें नाहीं. इतकेंच काय पण आपणांस यश येणार नाहीं असें ठाऊक असूनच बंडवाल्यांनीं बंड केलें व केवळ आपल्या असंतोषाचें वैतागानें प्रदर्शन करावें एवढीच नम्र आकांक्षा त्यांनीं बाळगिली होती. कौंट टॉलस्टॉय वगैरे सत्पुरुषांनीं व समाजशास्त्रज्ञांनीं जनतेच्या दुःखांकडे व तिच्यावरील जुलुमाकडे विचारवंतांचें लक्ष वेधून या अवस्थेचा शेवट केला पाहिजे अशीं मतें प्रतिपादिलीं. पण राजसत्तेकडून होणारा जुलूम व हिंसा हीं जशीं त्यांस असह्य वाटत त्याप्रमाणें बंडवाल्यांकडून होणारी हिंसा, जुलूम व प्रमाद हींहि त्यास तितकींच असह्य वाटत. यामुळें उभयपक्षीं होणाऱ्या या जुलुमाचा व या हिंसेचा शेवट कसा करावा याचें व्यवहार्य तंत्र टॉलस्टॉय यांस सांगतां आलें नाहीं. राज्यसंस्था हीच सर्व जुलुमाचें कारण आहे असें त्याचें मत होतें; पण ती नाहींशी व्हावी कशी व

एक नाहींशी झाल्यावर दुसरी न यावी कशी, राज्यसंस्थाहीन समाजसुव्यवस्था कशी निर्भावी या प्रश्नाचें उत्तर त्यानें नीटसें दिलेलें नाहीं. एकादा झार अथवा एकादा अधिकारी जुलुमी निघाला तर, मोठें बंड होण्याऐवजीं त्याचा एकट्याचा खून होई. झार पहिला पॉल याचा त्याच्या हातून छळ पावलेल्या एका सैनिकानें भरदरबारांत खून केला होता; पण एवढ्यानें राजवटीचा जुलुमी गुण बदलत नसे.

रशियांतील पहिले क्रांतिकारक

गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत राजकीय जुलुमाचा शेवट करण्यासाठीं संघटितपणें प्रयत्न करणाऱ्या संस्था स्थापन होऊं लागल्या. राजसत्तेचा जुलूम नष्ट करण्याच्या कांहींशा पद्धतशीर प्रयत्नास येथूनच सुरवात झाली असें म्हणतां येईल. असे प्रयत्न करण्यांत टॉलस्टॉयप्रमाणें राज्ययंत्र नको म्हणणारे, पण त्यासाठीं हिंसाच केली पाहिजे, नीति-अनीति झुगारून दिली पाहिजे असें मानणारे बकुनिन व त्याचे अनुयायी अराजकवादी (अनार्किस्ट) हे प्रमुख होते. तसेच गुप्त कट करून व अधिकाऱ्यांचे खून करून जुलुमी राजयंत्र सुधारूं पाहणारा 'नेरॉड्निकी' हाहि एक पंथ याच काळांत प्रबळ झाला होता. याला राज्यसंस्था नको होती असें नव्हे, पण जुलुमी अधिकाऱ्यांना शासन करून धाकाच्या जोरावर राज्ययंत्र सुधारतां येईल असें त्यास वाटे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत औद्योगिक क्रांति होऊन जे नवीन कारखाने निर्माण होऊं लागले होते, त्यामुळें शेतकऱ्यांचें जुनें-पुराणें जीवन ढासळूं लागलें होतें व कामगारांच्या जगांत नव्या प्रकारचीं दुःखें निर्माण झालीं होतीं. ही नवीन आर्थिक घटना या नेरॉड्निकी पंथास अनिष्ट वाटे. खेड्यापाड्यांतून ज्या ग्रामसंस्था असत म्हणून मागें सांगितलें तो समाजव्यवस्थेचा उत्तम नमुना असें त्यांचें मत होतें. समाजावर होणारा जुलूम हा एका बाजूनें जुनी जुलुमी जमिनदारी व दुसऱ्या बाजूनें तितकीच जुलुमी कारखानदारी यांचा परिणाम आहे, यांचा दोहोंकडून शेवट केला कीं, खेड्यांतील ग्रामसंस्था म्हणजे जमिनीची सामुदायिक मालकी, वापर व भोगवटा—म्हणजेच त्यांच्या मतें, 'कम्युनिझम्' हा भूलोकीचा स्वर्ग आहे असें ते मानीत. पण ज्या शेतकऱ्यांच्या हितासाठीं ही नेरॉड्निकी

स्थळ प्रत
ता.
ठा पं.

चळवळ असे त्यांना या चळवळीचा कधींच उमज पडला नाहीं व त्यांनीं या चळवळीबद्दल सहानुभूतिहि कधींच दाखविली नाहीं.

प्रजेस प्रतिकाराचें शास्त्र सांगणारा पंथ

१८९५पासून जी कामकऱ्यांची व शेतकऱ्यांची चळवळ एकदम उसळल्यासारखी दिसते ती चळवळ मात्र खास जनतेनें केली असल्याचें दिसून येतें. प्रथमतः सामान्य आर्थिक मागण्यांत उगम पावून तिनें राजकीय क्रांतीचें स्वरूप धारण केलें. १९०५ सालीं या चळवळीचें स्वरूप इतकें व्यापक व उग्र झालें, कीं झारचें सिंहासन या वेळीं हादरलेंच. याच चळवळीचा दुसरा धक्का १९१७ सालीं पुनः झारशाहीला बसला. त्यासरशीं ती धुळीलाच मिळाली व इतिहासांत अभिनव असा एक राज्यप्रकार रशियांत निर्माण झाला. ही चळवळ इतिहासक्रमास धरून व शास्त्रशुद्ध होती असें तिच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असून प्रजेनें जुलमास प्रतिकार केव्हां करावा, कसा करावा, प्रजेंतल्या कोणत्या वर्गास तो करतां येतो, राज्यसत्ता कोणाच्या हातीं वेळोवेळीं असते, समाजक्रांति कशी होते वगैरे सर्व घटनांचें त्यांनीं शास्त्रच बनविलें आहे. राज्यसत्तेस प्रतिकार करून क्रांति घडवून आणण्याचें शास्त्र सांगण्याचा इतिहासांत हा पहिलाच प्रयत्न आहे. हें क्रांतिशास्त्रच १९०५ व १९१७ च्या क्रांतीची पार्श्वभूमि असून रशियन क्रांतींतील अनुभवानेंच तें विकास पावलें, परिणत झालें व त्यास जागतिक महत्त्व आलें आहे. ज्यांना अशा प्रकारची क्रांति घडवून आणावयाची असते त्यांनींच नव्हे तर ज्यांना ती ठेचून टाकावयाची असते अथवा ज्यांना तिचे अनर्थ टाळून मानवजातीचें अवस्थांतर सुखमय करावें असें वाटत असतें अशा सर्वांना प्रथम या क्रांतिशास्त्राचें म्हणजे अन्याय-प्रतिकारशास्त्राचें स्वरूप काय हें समजून घेणें अपरिहार्य आहे, ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे.

या अन्याय-प्रतिकारशास्त्राचा आद्यप्रणेता कार्ल मार्क्स होय. मार्क्स व त्याचा आजन्म सहकारी फ्रेडरिक एंजल्स या दोघांनीं मिळून आयुष्याच्या सुरवातीपासून, समाजक्रांति होत असते कशी व ती घडवून आणावी कशी या गोष्टीचा निदिध्यास घेऊन व आयुष्यभर अवलोकन, अभ्यास व चळवळी करून या शास्त्राचे स्थूल व सूक्ष्म नियम बांधले. रशियन क्रांतीचे पुढारी व

मार्क्सचे अनुयायी लेनिन, ट्रॉट्स्की, स्टॅलिन वगैरेंनीं या शास्त्राचा व्यावहारिक उपयोग करून क्रांति घडवून आणली व हें शास्त्र आपल्या अनुभवांनीं संशोधून आणखी परिणत केलें. सर्वच भौतिक शास्त्रांप्रमाणें हें समाजक्रांति शास्त्रहि अपूर्ण असून रोज नवनव्या अनुभवांनीं तें अधिकाधिक पूर्ण करीत जावें असें या क्रांतिकर्त्या पुढाऱ्यांचें म्हणणें असतें.

कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंजल्स

मार्क्स व एंजल्स हे अनुक्रमें १८१८ व १८२० सालीं जर्मनींतील ट्राइन प्रांतांत जन्मले. दोघांनाहि चांगल्या प्रतीचें शिक्षण मिळालें होतें. शिक्षण संपतांच त्यांनीं तारुण्याच्या ऐन सुरवातीस क्रांतिकार्यास सुरवात केली. त्यांनीं मूळ निर्माण केलेल्या व आयुष्यभर संशोधून परिणत केलेल्या या क्रांति-शास्त्रास त्यांनींच 'शास्त्रशुद्ध समाजवाद' (सायंटिफिक सोशॅलिझम) अथवा कम्युनिझम् असें नांव दिलें आहे. "सर्व मानवजातीचा प्राचीन अथवा अर्वाचीन इतिहास हा वर्गलढ्यांचा इतिहास आहे" असें मार्क्स व एंजल्स यांनीं १८४८ मध्यें प्रसिद्ध केलेल्या 'कम्युनिस्ट जाहिरनाम्यांत' एक महत्त्वाचें वाक्य आहे. मार्क्स व एंजल्स यांनीं आयुष्यभर जें पुष्कळ लिखाण केलें व चळवळीहि केल्या त्यांत मजूरवर्गानें एकजूट होऊन भांडवलशाहीचा पाडाव करावा व नवीन वर्गहीन समाजव्यवस्था निर्माण करावी अशी अनुक्रमें विध्वंसक व विधायक कार्यें प्रतिपादिलीं. त्यांत विध्वंसक कार्य हें निकडीचें असल्यानें त्यावरच त्यांनीं सहजच विशेष भर दिला. यामुळें "मार्क्स व एंजल्स हे मानवजातींत कलह लावणारे दैत्य होऊन गेले, इतिहासांत स्नेह, प्रेम, औदार्य, त्याग या भावनांनीं मानवजातीनें जीं पवित्र व देदीप्यमान कृत्यें केलीं तीं न दिसतां फक्त या सर्वांच्या मानानें कमी असलेला मानवजातींतील कलह मात्र यांना ठळकपणें दिसला, यामुळें त्यांची बुद्धि व दृष्टिकोन मुळांतच विकृत होतीं, यासाठीं त्यांची शिकवण व त्यांच्या चळवळी विषवल्लीप्रमाणें मुळासकट खणून काढून, भाजून, जाळून टाकल्या पाहिजेत," असें जगांतील मोठमोठ्या लोकांनीं गेलीं पन्नास वर्षें प्रतिपादिलें आहे. पण असें मत बनणें हा पूर्वग्रहदोषाचा सदोष दृष्टिकोनाचा परिणाम आहे. मार्क्स व एंजल्स हे दोघेहि अत्यंत विद्वान, रसिक, कोमल व प्रेमळ अंतः-

करणाचे असे होते. मानवजातीच्या इतिहासांत स्नेह, प्रेम, औदार्य यांनीं झालेलीं उदात्त कृत्यें त्यांस अमान्य नसून अशा प्रकारच्या थोर सद्गुणांस अखिल मानवजात अतिशय मोठ्या प्रमाणांत पात्र आहे असें ते आग्रहपूर्वक सांगत; आणि या गुणांचा योग्य परिपोष व विकास होण्यासाठींच समाजाची चालू व्यवस्था बदलणें अवश्य आहे असें त्यांना वाटलें व त्यासाठीं त्यांनीं सारा जन्म स्वार्थत्यागपूर्वक खपून जिवापाड मेहनत केली.

भांडवलशाहीचे अनर्थ व त्यांस प्रतिकार करण्याचे उपाय

मार्क्स व एंजल्स यांच्या आयुष्याच्या आरंभीच्या काळीं इंग्लंडांत मोठ्या प्रमाणावर व जर्मनींतील व्हाइन प्रांतांत लहान प्रमाणावर यांत्रिक कारखान्यांची प्रचंड वाढ होऊं लागली होती. तीमुळें माणसांची उत्पादनशक्ति जरी वाढत होती तरी कारखान्यांचें भांडवल ज्यांच्या मालकीचें असे त्यांनीं खेड्यापाड्यांतील लहान उद्योगधंद्यांशीं आपल्या यांत्रिक कारखान्यांच्या जोरावर चढाओढ करून ते खेड्यांतील धंदे नष्ट केले. हे धंदे मेल्यानें बेकार झालेलें कारागीर कारखानदारांच्या दारीं काम मागण्यास आले असतां त्यांच्यामधील चढाओढीचा गैरफायदा घेऊन कमींत कमी मजुरीवर कारखानदार मजुरांस राबवीत व अफाट नफा मिळवीत. यामुळें, माणसाची संपत्ति निर्माण करण्याची शक्ति वाढत असून हीहि संपत्ति थोड्या भांडवलवाल्यांच्या हातीं एकत्रित होई. यामुळें बहुसंख्य समाजाचें दारिद्र्य वाढूं लागलें. यांत्रिक कारखान्यांमुळें शहरांत व त्यांतील कारखान्यांत माणसांची गर्दी होऊन माणसांची राहणी गलिच्छ व रोगट होऊं लागली. ज्यांचेजवळ संपत्तीचें केन्द्रीकरण होऊं लागलें त्यांनीं संपत्तीच्या बलावर राज्ययंत्रें काबीज करून बलिष्ठ केलीं व बहुसंख्य समाजास आपल्यावर कोसळणाऱ्या आपत्तीस म्हणजेच तिचें कारण जी भांडवलशाही तीस प्रतिकार करणें अधिकाधिक अशक्य केलें. ज्या या अनिवार दुःखापुढें मानवजात अधिकाधिक हताश होऊं लागली तीस उपाय काय करावा या प्रश्नाकडे पुष्कळ विचारी, विद्वान, चळवळ्ये व रॉबर्ट ओवेनसारखे परोपकारी ब्रिटिश भांडवलवाले या सर्वांचें लक्ष वेधलें. यांपैकीं बहुतेकांना वैयक्तिक सद्गुण जर वाढले तर भांडवलशाहीमुळें दुःखें वाढण्याचें कांहींच कारण नाहीं असें वाटत असून रॉबर्ट ओवेन या भांडवलवाल्यानें

स्वतः स्वार्थत्यागपूर्वक मजुरांची परिस्थिति आपल्या कारखान्यांतून सुधारिली व इतर मांडवलवाल्यांना थोर अंतःकरणाचें उदाहरणहि घालून दिलें. दुसऱ्या कांहीं विचारवंतांना यांत्रिक कारखानदारी हीच वाईट असें वाटे व पुन्हा यंत्रपूर्वकालीन उत्पादनपद्धति अमलांत आणल्यावांचून मानवजात सुखी होणार नाहीं असें ते प्रतिपादीत.

या सर्वांहून मार्क्स व एंजल्स यांची विचारसरणी भिन्न होती. समाजव्यवस्था ही त्यांतील व्यक्तींच्या बरेवाईटपणावरच केवळ अवलंबून नसून त्या व्यवस्थेच्या विशिष्ट गुणधर्मानेंच तिची स्थिति, प्रगति अथवा अधोगति घडत असते असें त्यांचें मत होतें. आधिभौतिक शास्त्रांच्या संशोधनालयांत वस्तूचे गुणधर्म काय आहेत हें पाहून मग त्या वस्तूचें रूपांतर त्या गुणधर्मांच्या ज्ञानाच्या जोरावर कसें करतां येईल हें शास्त्रज्ञ पाहत असतात. एखादी प्रचंड शिळा एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणीं ढकलीत नेणें असल्यास कोणत्या बाजूनें ती ढकलली असतां सहज पुढें सरेल अथवा कोलमडेल हें आपण पाहतों. ही शिळा आपणास अमुक एका जागीं न्यावयाची आहे हें आपलें मुख्य उद्दिष्ट असून त्या धोरणानें अमुक बाजूनें व अमुक उपायांनीं ती पुढें सरेल अगर कोलमडेल याच तिच्या विशिष्ट गुणधर्माकडे आपण पाहतों. मार्क्सनें समाजक्रांतीचा जो विचार केला व त्यासाठीं समाजाचे जे विशिष्ट गुणधर्म निरखिले त्यांत ही पद्धति त्यानें अवलंबिलेली दिसते.* भांडवलशाही-

*भांडवलशाहीचा पाडाव करणें हें मार्क्सचें उद्दिष्ट होतें. त्यासाठीं भांडवलशाहीच्या गुणधर्मांचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास करून त्यानें कॅपिटल हा सुमारें अडीचहजार पृष्ठांचा त्रिखंडात्मक ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचें उद्दिष्ट सांगतांना भांडवलशाहीचा 'गतिधर्म' (लॉ आफ् मोशन) कसा कसा आहे हें आपणास सांगावयाचें आहे, असें मार्क्सनें कॅपिट्ल्च्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. जडवस्तूचें रूपांतर, अवस्थांतर अथवा स्थलांतर एंजिनियरांना करावयाचें असतें. म्हणून जडवस्तूच्या गतिशास्त्राचा अभ्यास एंजिनियरांना करावा लागतो. मार्क्स तात्कालिक मानवसमाजाचें रूपांतर करूं चाहत होता. यासाठीं त्यानें तत्कालीन म्हणजे भांडवलशाही समाजघटनेच्या गतिधर्माचा अभ्यास केला व रूपांतरपद्धति सुचविली. यासाठीं ईस्टमननें मार्क्सला समाजक्रांतीचा एंजिनियर असें म्हटलें आहे.

मुळें मानवजातीचें उत्पादनसामर्थ्य वाढत असतांहि जें दारिद्र्य व दुःख वाढतें आहे ही अवस्था कशी बदलतां येईल ? हा प्रश्न मार्क्सनें आपल्या आयुष्याच्या सुरुवातीस आपल्या मनास विचारला.

"तत्त्ववेत्त्यांनीं जग कसें कसें आहे हेंच आजवर परोपरीनें सांगितलें. आपणापुढील मुख्य कार्य तें जग आहे कसें हें पाहण्याचें नसून तें बदलण्याचें आहें." असें मार्क्सनें फरबाचवरील आपल्या निबंधांत लिहिलें असून जग बदलण्याची ही कल्पनाच त्याच्या साऱ्या आयुष्याचें केंद्र झाली आहे. जग कसकसें आहे हें नुसतें मजेनें पाहत न बसतां तें बदलणें हें कार्य त्याचें उद्दिष्ट असल्यानें बदललें जाण्याचा गुण मानवसमाजांत कोठें आहे हें त्यानें इतिहासांत शोधलें.

मार्क्सच्यापूर्वीची तत्त्वप्रणालिका

जग, मानवजात मुळीं बदलते आहे कीं नाहीं हाच मार्क्सचेपूर्वी वादग्रस्त प्रश्न होता. फ्रान्समधील जडवाद्यांचें (फ्रेंच मटीरियालिस्ट) म्हणणें असें होतें कीं, पदार्थमात्राचे मूल गुणधर्म जे आहेत ते निश्चित आहेत व ते कधींहि बदलूं शकत नाहींत. यामुळें जड अशा पदार्थमात्राशींच जखडलेलें मानवी जीवन तरी उत्तरोत्तर बदलणार, विकसत जाणार हें खरें कसें ? पदार्थांची रचना व संघटना माणसानें वरचेवर बदलली तरी हे पालट, सृष्टीचे मूल गुणधर्म बदलणारे नसल्यानें वर्षाचे ऋतु बदलले तरी दरसाल जसे तेच तेच ऋतु पुनःपुनः येतात, दिवसामागून रात्र व रात्रीमागून दिवस हा जसा एकसांच्या पाठशिवणीचा कधींच न संपणारा एकच एक खेळ अखंड चालतो. तसेंच मनुष्य आपल्या कर्तृत्वानें भोंवतालच्या सृष्टींत जरी पालट करीत असला तरी तेच तेच पालट पुनः पुनः करणें एवढेंच त्यास शक्य आहे असा यांचा युक्तिवाद होता. हे जडवादी तत्त्ववेत्ते व्यक्तिस्वातंत्र्यवादी असून राजांचा, सरदारांचा व धर्मगुरूंचा विचाराच्या व आचाराच्या क्षेत्रांतील जुलूम फ्रान्समध्यें राज्यक्रान्ति घडवून आणून त्यांना नष्ट करावयाचा होता. पण अशा स्वातंत्र्याचा उपयोग त्यांच्या दृष्टीनें इतकाच होता, कीं पदार्थधर्मांचें ज्ञान मिळवावें, त्यांच्या गुणधर्मांच्या ज्या अपरिहार्य मर्यादा असतील त्या समजल्यावर त्यांत ज्या प्रकारें सुखानें राहतां येईल असा

प्रयत्न करावा, अपरिहार्यता जी असेल ती स्वतः समजून घ्यावी पण तिला शरण जाऊन दिवस-रात्रीप्रमाणें त्याच त्याच अवस्थांतरांचा फेरा करीत स्वस्थ राहावें.

हा जडवाद हेगेल या जर्मन तत्त्ववेत्त्यानें अमान्य केला. त्याचें म्हणणें असें कीं, पदार्थधर्म बदलत नाहींत अशी जरी भौतिकशास्त्राची प्रतीति असली व त्यामुळें त्यांनींच जखडलेलें मानवी जीवनहि बदलणें शक्य नाहीं असें अनुमान होत असलें तरी इतिहासाची साक्ष तशी नाहीं. दिवस-रात्र, संवत्सरांतील ऋतु, वृष्टि-अवर्षण, झाडें-नद्या-सरोवरें यांचीं अवस्थांतरें जरी पुनःपुनः तशींच येत असलीं तरी मानवसमाजाचीं अवस्थांतरें तशींच होत नाहींत. इतकेंच नव्हे तर जड सृष्टीच्या अवस्थांतरांचा क्रमहि मनुष्य बदलून टाकतो. एके काळीं मनुष्य फळमुळांवर व श्वापदांवर जगणारा होता. ती अवस्था सोडून तो शेतकरी झाला. असें करण्यांत त्यानें सृष्टीपासून आपली पोषक द्रव्यें मिळविण्याची शक्ति वाढविली; वनांत एकटेपणानें राहण्याचें सोडून विवाहसंस्था निर्माण करून तो राहूं लागला. गुलामगिरीची समाज-व्यवस्था त्यानें निर्माण केली. एकाच समाजांत कलह माजून त्या समाजाचा विध्वंस होऊं नये म्हणून त्यानें राज्यसंस्था निर्माण केली, नद्यांना धरणें बांधून, कालवे काढून, डोंगर फोडून, अग्नीस गुलाम करून सृष्टिक्रमहि बदलला. वगैरे हीं जीं समाजव्यवस्थेंतील व जड सृष्टींतील अवस्थांतरें माणसानें निर्माण केलीं तीं दिवसरात्रीसारखीं अथवा संवत्सरांतील ऋतूं-सारखीं फिरून फिरून तींच तींच येणारीं नसून एकीच्या पुढील दुसरी अवस्था ही पहिलीचा विकास होता, ती सुधारणा होती. आणि तिच्या पुढील येणारी नवी अवस्था परत पहिलीच्या दिशेनें जाणारी नसून मागील अवस्थेंत पुन्हा सुधारणा करणारी होती. पदार्थधर्म जर न बदलणारे तर पदार्थांशींच जखडलेल्या मानवाचें जीवन विकसत आलें हें कसें? असा प्रश्न हेगेलनें उपस्थित केला; व त्याचें उत्तर त्यानें असें दिलें कीं, माणसाची कल्पनाशक्ति ही अखिल विश्वाची प्रेरक शक्ति असून उत्तरोत्तर विकास करणें हा तिचा गुण आहे. या प्रतिपादनामुळें हेगेलें यास 'आयडियालिस्ट' (अध्यात्मवादी) असें संबोधिलें जातें.

मार्क्सचें तत्त्वज्ञान

मार्क्सला फ्रेंच मटीरियालिस्टांचा जडवाद मान्य नसून मानवसमाज उत्तरोत्तर विकसत जातो व आपल्याबरोबर सृष्टीचें रूपहि पालटीत असतो, हें हेगेलचें मत मान्य होतें. पण तो मानवाची कल्पनाशक्ति, मन-बुद्धि-अहंकार हा संघ (कॉन्शसनेस) पदार्थधर्मापासून स्वतंत्र आहे हें मानण्यास तयार नव्हता. मन-बुद्धि-अहंकार या संघास कर्तृत्व व ज्ञातृत्व येण्यास डोळ्यांनीं पाहिलें पाहिजे, कानांनीं ऐकलें पाहिजे, जिव्हेनें चाखलें पाहिजे, नाकानें हुंगलें पाहिजे व त्वचेनें स्पर्शिलें पाहिजे. इंद्रियें व त्यांचे विषय (इंद्रियें व इंद्रियार्थ) यांचा हा संनिकर्षच मन-बुद्धि-अहंकार या संघाच्या ज्ञानास व कर्तृत्वास कारण आहे असें त्यास उघड दिसलें. पण इंद्रियांचे 'अर्थ' म्हणजे जड पदार्थजात हे तर जड, निश्चित गुणधर्माचे. तेव्हां या इंद्रियार्थ-संनिकर्षानें (इंद्रियें आणि जड सृष्टि यांच्या संबंधानें) मानवसमाजाची उत्तरोत्तर प्रगति होतें हें कसें? अचल अशा शिळेस बांधलेलें जनावर पळून कसें जाऊं शकेल? फ्रेंच मटीरियालिस्टांपुढें हेगेलनें मांडलेलें हें कोडें पुनः मार्क्सपुढेंहि उभें राहिलें. त्याचें उत्तर मार्क्सनें असें दिलें कीं, चरितार्थसाधनें सृष्टीपासून अधिकाधिक यशस्वितेनें मिळविणें ही इच्छा मानवविकासाला प्रेरक आहे. यासाठीं मनुष्य आपली धनोत्पादनाचीं साधनें व त्यास जरूर त्याप्रमाणें आपली सामुदायिक संघटनाहि बदलतो. युद्धासाठीं एके काळीं वापरण्यांत येणारीं धनुष्यबाण, गदा वगैरे हत्यारें जाऊन त्या जागीं बंदूक, तोफ वगैरे हत्यारें आलीं म्हणजे सैन्यरचनाहि बदलावी त्याप्रमाणें उत्पादनाचीं साधनें बदललीं कीं समाजघटनाहि बदलते. निवळ शिकारीवर जगून रानोमाळ भटकणाऱ्या माणसांत विवाहसंस्था रूढ झाली नसेल. ती शेतीचा उत्पादन-प्रकार रूढ होऊन निर्माण झाली. शेतीच्या कष्टमय जीवनांत गुलामगिरी निर्माण झाली. पुढें वाहतुकीचीं व दळणवळणाचीं साधनें वाढलीं, व्यापार वाढला, युद्धाचे प्रसंग वाढूं लागले, राज्यसंस्था दृढावत गेली, माणसाच्या कर्तृत्वाची, अहंकाराची व स्वाभिमानाची गरज अधिकाधिक वाढली. यामुळें गुलामगिरी हळूहळू मागें पडून स्वतंत्र व स्वाभिमानी अशा माणसाचें उत्पादनकर्तृत्व व

युद्धकर्तृत्व वाढलें.* पुढें यांत्रिक, शास्त्रीय शोध लागून निवळ कष्टमय शेतीवर जगणारा मनुष्य कारखान्यांत अधिक उत्पादनक्षम झाला. त्याबरोबरच राज्यकर्त्यांची व सरदारांची शेती सोडून तो कारखान्यांत आला यामुळें खेडीं व सरदारशाही मागें पडून शहरें उभारलीं गेलीं. हा क्रम पुष्कळ तपशीलानें व नीट सुसंगतपणें मांडतां येईल. तो स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. पण यासंबंधीं जें एक विचारसूत्र मार्क्सनें सांगितलें आहे, त्याचें भाषांतर येथें देतों. या सूत्रानुसार इतिहासाचें संशोधन करण्याची प्रवृत्ति अलीकडे वाढत असून त्याचाच अभ्यास करूं इच्छिणाऱ्यांनीं त्या दृष्टीनें इतिहास स्वतंत्रपणें वाचला पाहिजे. प्रस्तुत पुस्तकांत मार्क्सचें एतत्संबंधींचें विचारसूत्र काय आहे तें पाहणें व त्या धोरणानें या पुस्तकाचा विषय समजून घेणें एवढेंच उद्दिष्ट आहे.

मार्क्सिसस्ट पंथाचें मतसूत्र

'क्रिटिक ऑफ् पोलिटिकल इकॉनमी' या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत मार्क्स लिहितो,—

"सामुदायिकपणें चरितार्थसंपत्ति निर्माण करीत असतां, माणसामाणसांत कांहीं निश्चित स्वरूपाचीं नातीं आवश्यकतया निर्माण होतात. त्यांत माणसांच्या इच्छेचा अथवा अनिच्छेचा कांहींहि संबंध नसतो. कारण माणसाच्या उत्पादनशक्तीचा विकास ज्या दर्जास पोंचलेला असतो त्या दर्जास आवश्यक व अनुरूप असेच हे संबंध असतात. चरितार्थसंपत्ति निर्मिण्यासाठीं म्हणजे धनोत्पादनासाठीं जे हे संबंध—उत्पादनसंबंध—निर्माण होतात त्या सर्व संबंधांची बेरीज हीच समाजाची आर्थिक संघटना म्हणून संबोधिली जाते. याच भूमिकेवर न्याय व राज्य यांची संघटना उभारली जाते. आणि या आर्थिक संघटनेचें जें रूप तें स्वतःचें रूप अशी त्या समाजास जाणीव होत असते. सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, धनोत्पादनाचा जो प्रकार

* आर्थिक परिस्थिति बदलून गुलामगिरीची आवश्यकता राहिली नाहीं म्हणून गुलामगिरी नष्ट होऊं शकली हें म्हणणें, भांडवलशाहीचा तत्त्ववेत्ता लॉर्ड मोर्ले यानेंहि आपल्या 'डॉक्ट्रिन ऑफ लिबर्टी' या निबंधांत मान्य केलें आहे.

अस्तित्वांत असेल तोच सामाजिक, राजकीय व बौद्धिक जीवनाच्या क्रियांना तदनुरूप वळण देत असतो. आपण मूळचे अमुकच प्रकारचे आहों अशा जाणिवेनें तसें असण्यासाठीं समाज झटतात म्हणून त्यांना अमुक एक विशिष्ट रूप आलेलें असतें असें नव्हे. वस्तुस्थिति याच्या उलट असतें. समाज जसे घडलेले असतात तसे ते घडले म्हणजे आपण तसे आहों अशी जाणीव त्यांना उत्पन्न होते. समाजाच्या धनोत्पादन शक्तींचा विकास होत असतां एक वेळ अशी येते, कीं ज्या उत्पादनसंबंधांत या शक्तीचा आजवर विकास झालेला असतो त्याच प्रचलित उत्पादनसंबंधांशीं म्हणजे कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें तर धनोत्पादनसाधनांच्या मालकीच्या पद्धतीशीं या विकासी उत्पादनशक्तींचा विरोध उत्पन्न होतो. जे प्रचलित उत्पादनसंबंध आजवर उत्पादनशक्तीच्या विकासाचेंच स्वरूप असतात तेच आतां त्या विकासी शक्तींच्या पायांत बेड्या ठोकतात; आणि मग एक सामाजिक क्रांतीचा काल-खंड सुरू होतो, आर्थिक संघटनेचा पाया बदलतो व त्याच्यावरील (न्याय-पद्धति व राज्यपद्धति यांची) संघटना कमीअधिक वेगानें बदलते. असे पालट घडत असतांना त्यांतील आधिभौतिक व आध्यात्मिक (बौद्धिक व मानसिक) पालट आपण भिन्नपणें ध्यानांत घेतले पाहिजेत. आधिभौतिक पालट होतात ते धनोत्पादनपद्धतीच्या आर्थिक परिस्थितींत होत असतात. भौतिक शास्त्रांतील निर्णयाप्रमाणें हेंहि अचूकपणें सांगतां येतात. बालाच विकास असें म्हणतां येईल. न्यायविषयक, राजकीय, धार्मिक, कलाबुद्धिविषयक, तत्त्वज्ञानविषयक, थोडक्यांत म्हणजे आध्यात्मिक स्वरूपाचे जे पालट होतात, त्यांचीं जुनीं स्वरूपें व नवीं स्वरूपें यांतील विरोधांची माणसास जाणीव होऊन व जुन्या स्वरूपांशीं झगडून माणसें नवीं स्वरूपें प्राप्त करून घेतात. या झगडयास वर्गलढ्याचें, क्रांतीचें स्वरूप येतें.

"एकाद्या व्यक्तीच्या स्वतांसंबंधींच्या मतावरून आपण त्या व्यक्तीबद्दल आपलें मत बनवीत नाहीं; त्याप्रमाणेंच संक्रमणकाळीं कोणत्याहि समाजास स्वतांस जें हवें असें वाटत असतें त्यावरून त्या संक्रमणाचें स्वरूप अजमावतां येत नाहीं. उलट आपणांस जें हवें असें त्या समाजास वाटत असतें तें त्यास कां हवें असें वाटतें याचा खुलासा त्याच्या भौतिक जीवनांत जे विरोध उत्पन्न

झालेले असतात त्यांवरून—विकासी उत्पादनशक्ति व प्रचलित उत्पादन-संबंध यांत अनुभवास येणाऱ्या विरोधांवरून करून घ्यावयाचा असतो. एकाद्या समाजाचें स्वरूप कोणतेंहि असो, त्याच्या उत्पादनशक्तींचा ज्यांत विकास होणें शक्य आहे त्या सर्वांचा विकास होण्याचें कार्य संपल्यावांचून तो समाज नष्ट होत नाहीं. जुन्या समाजसंस्थेच्या गर्भांत नव्या व उच्च दर्जाच्या समाज-व्यवस्थेस आवश्यक अशी भौतिक परिस्थिति परिपक्व होईपर्यंत नवी व उच्च दर्जाची समाजव्यवस्था स्थापिली जाणें शक्य नसतें; म्हणून जीं ध्येयें प्राप्त करून घेणें माणसांना शक्य असतें व ज्यांच्या प्राप्तीसाठीं जरूर असणाऱ्या कर्तृत्वाचें शिक्षण माणसांना मिळालें असतें, अशावांचून अन्य ध्येयें सिद्ध करण्याच्या मार्गे माणसें कधींच लागत नाहींत. सूक्ष्म परीक्षणांतीं असें दिसून येईल, कीं विकासी उत्पादनशक्ति व प्रचलित उत्पादनसंबंध यांचा विरोध नष्ट करण्याची भौतिक अनुकूलता उत्पन्न होईपर्यंत अथवा ही अनुकूलता चांगली वाढीस लागेपर्यंत हा झगडाच उत्पन्न होत नाहीं."

इतिहासाचा आर्थिक दृष्ट्या(वरील मतसूत्रानुसार)उलगडा

मानवसमाज हा स्थायी नसून बदलणारा आहे, त्यांत क्रांति होते व ती विशिष्ट कारणांनीं व विशिष्ट पद्धतीनें होते असें मार्क्सनें या मतसूत्रांत सांगितलें आहे. भांडवलशाही समाजाच्या उदयकालाचें पृथक्करण त्यानें या मतसूत्रास धरूनच केलें असून त्याच्या विनाशाचें अनुमानहि त्यांत बांधून ठेवलें आहे आणि भांडवलशाहीच्या दुःखानें त्रस्त झालेल्या वर्गांनीं तिचा अंगभूत विनाशधर्म ध्यानांत घेऊन त्या धोरणानें तिचा विनाश करावा असें प्रतिपादिलें आहे. भांडवलशाही समाजरचना जी निर्माण झाली, तो, मार्क्सच्या मतें, सरंजामी पद्धतीहून अधिक उच्च अशा अवस्थेंत समाजाचा विकासच होय. सरंजामी पद्धतींत शेतकरी हा सरंजामदाराच्या जमिनीस बांधलेला होता, तो भू-दास होता. त्या वेळची आर्थिक रचना सामान्यतः आपापल्या खेड्यापुरती स्वयंपूर्ण होती. शेतीची उत्पादनाचीं साधनें अगदीं ओबडधोबड होतीं. प्रवासाच्या सोयी कमी होत्या. सरंजामदार हा मालक व शेतकरी हा त्याचा गुलाम हा आर्थिक संबंध, उत्पादन-साधनें ओबडधोबड व मालाच्या ने-आणीच्या सोयी अगदीं कमी अशा उत्पादनप्रकारावर

आधारलेला होता. पुढें मालाच्या ने-आणीच्या सोयी वाढल्या, म्हणून मालाची मागणी वाढली, शेतींत सुधारणा होऊं लागली, हस्तव्यवसायांचेच धंदे व्यापारी पुष्कळ भांडवल एकदम खर्चून व पुष्कळसे हस्तव्यवसायी कारागीर एकत्र मजूर म्हणून आणून मोठ्या प्रमाणावर करवूं लागले. अधिकाधिक भांडवलानें अधिकाधिक माल निर्माण करण्याच्या पद्धतींत भौतिक शास्त्रें व यंत्रें यांच्या संशोधनाची वाढ होऊन त्याची उत्पादनाच्या वाढीस मदत झाली. हें सर्व काय घडत होतें ? हा उत्पादनप्रकारांत बदल होत होता. ओबडधोबड साधनांनीं शेती करावी, ओबडधोबड साधनांनींच ग्रामिकांना लागणारा इतर माल तयार करावा, सगळें गांवानें निर्मावें व गांवानें खावें असा उत्पादनप्रकार मागें पडून मोठ्या प्रमाणावर सुधारलेलें उत्पादन व मालाची दूरवर वाहतूक अशी उत्पादनप्रकारांत क्रांति झाली होती. यामुळें मार्क्सच्या वरील मतसूत्रांत सांगितल्याप्रमाणें उत्पादनप्रकाराच्या पायावर आधारलेले जुने उत्पादनसंबंधहि बदलणें अपरिहार्य झालें होतें. यांत्रिक कारखान्यांतून मालाची प्रचंड प्रमाणावर उत्पत्ति करणाऱ्या भांडवलदारांना अतिशय कमी मजुरीवर राबणारे व आपसांत चढाओढ करून कमी मजुरी घेण्यास तयार असणारे असंख्य बेकार मजूर हवे असत. म्हणून त्यांनीं व्यक्तिस्वातंत्र्याच्या घोषणेस पाठिंबा दिला व सरंजामदारांच्या गुलामगिरींतून शेतकरी मोकळा झाला. सरंजामदार मालक व शेतकरी गुलाम हा उत्पादन-संबंध नष्ट झाला. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर तिचें राज्यसत्तेवर वजन वाढूं लागून सरंजामदारांचें राजकीय वर्चस्वहि आर्थिक वर्चस्वाबरोबर नष्ट होऊं लागलें आणि धार्मिक भावनाहि नष्ट होऊन मनुष्यानें पैशालाच परमेश्वर केलें. या क्रांतीसंबंधीं मार्क्स कम्युनिस्ट जाहिरनाम्यांत लिहितो--

"ज्या ज्या ठिकाणीं भांडवलदार सत्ताधीश झाला तेथें तेथें त्यानें सरंजामी सत्ता व खेड्यांतील जुने आर्थिक संबंध धुळीस मिळविले, 'निसर्गतः वरिष्ठ' मानल्या जाणाऱ्या सरंजामदारानें भूदासाभोंवतीं बांधलेले पाश भांडवलदारानें तोडून टाकले. माणसामाणसांत नागडा स्वार्थ व भावनाहीन अशी रोख देव-घेव उत्पन्न केली. सत्त्वशील वीरत्व, दाक्षिण्यपूर्ण उत्साह आणि अगडबंब भावनावशता हीं सर्व स्वार्थबुद्धीनें केलेल्या आंकडेमोडीच्या थंड पाण्यांत बुडवून टाकिलीं."

सरंजामदारांबद्दलची स्वामिनिष्ठा, धर्मगुरूंबद्दलची धर्मनिष्ठा हीं सर्व बुडवून ज्या भांडवलशाहीनें मनुष्याला निवळ नागडा स्वार्थ शिकविला ती भांडवलशाही सरंजामी पद्धतीहून अधिक श्रेष्ठ हें कसें? मार्क्सचें उत्तर असें आहे, कीं जमिनी कसण्याचें काम शेतकऱ्यांस करावें लागे; पण सरंजामदारांनीं तरवारीच्या जोरावर जमिनीची मालकी शेतकऱ्यांकडून हिरावून घेतली. त्यांच्या श्रमावर सरंजामदार जगत असत. शेतकरी वरचेवर संघटना करून सरंजामदारांविरुद्ध बंडें करीत. त्यांना पुष्कळदां अपशय येई. ज्या ज्या वेळीं जय येई त्या त्या वेळीं ते सरंजामदारांस हुसकून लावून शेतकऱ्यांत जमिनी वाटून घेत असत. पण उत्पादन-प्रकार अधिक श्रेष्ठ झालेला नसल्यानें कदाचित् त्या शेतकऱ्यांतूनहि अथवा बाहेरच्या लुटारूंतून पुन्हा नवे सरंजामदार निर्माण होत व शेतकऱ्याच्या कपाळची राजकीय, धार्मिक, आर्थिक गुलामगिरी टळत नसे. भांडवलशाहीनें सरंजामदारांच्या गुलामगिरींतून शेतकऱ्याचा मोक्ष केला व शेतकऱ्याचा जो मजूर झाला त्याचें उत्पादन-सामर्थ्य वाढवून ओबडधोबड उत्पादनपद्धतींत शेतकरी जो अगदीं सृष्टीचा गुलाम होता त्यास सृष्टीवर प्रभुत्व मिळवून दिलें. यांत्रिक उत्पादन व शहरी राहणी यांमुळें, त्याच्या भोंवतालचें जुनें शून्यमय वातावरण नष्ट होऊन त्याचा बौद्धिक विकासहि झाला. यामुळें सरंजामी पद्धतीपेक्षां भांडवलशाही श्रेष्ठ असें मार्क्सचें म्हणणें आहे. पण एवढ्यावरून मजुराची गुलामगिरी संपली असें तो मानीत नाहीं. जें झालें तें, त्याच्या मतें, इतकेंच कीं, "धार्मिक व राजकीय भ्रमाखालीं दडलेली पिळणूक बंद होऊन राजरोस, निर्लज्ज, प्रत्यक्ष व पाशवी अशी पिळणूक सुरू झाली." (कम्युनिस्ट जाहीरनामा). खाजगी धंदे बुडाल्यामुळें मजुरांना कारखान्यांखेरीज पोट भरण्याचें साधन नाहींसें झालें. आपसांतील चढाओढीमुळें मजुरीचे दर उतरले, थोड्या माणसांकडून थोड्या वेळांत पुष्कळ माल निर्माण करण्याचा गुण यंत्रांत असल्यामुळें कारखानदारांस नोकरी मागणाऱ्या सर्व मजुरांची गरज न राहून बेकारी माजली; आणि सरंजामदारानें कितीहि पिळलें, छळलें तरी शेतांत पिकलें म्हणजे पोटभर भाकरीची तरी निश्चिति होती तीहि आतां व्यक्तिस्वातंत्र्य पावलेल्या मजुराला राहिली नाहीं. कारखान्यांतला माल व रानांतलें पीक दूर देशचा व्यापारी पैसे मोजून नेऊं लागला; पण बेकारीमुळें पैसा नसलेला मजूर अन्नवस्त्राच्या राशीपुढें त्याविना तडफडूं

लागला. भांडवलशाही जसजशी जगावर पसरत चालली तसतसें हें दुःखहि जगभर पसरलें. पुढें या पसाऱ्यांतच भांडवलशाहीचा अंत होणार असें मार्क्स सांगतो. मालाची पैदास कितीहि धडाक्यानें झाली तरी कमींत कमी मजुरी व बेकारी जगभर माजल्यामुळें माल न खपून त्याचे ढिगाचे ढीग पडून राहतील, भांडवलशाही आंतबट्ट्यांत येऊं लागेल. यामुळें मानवजातीचें दारिद्र्य वाढूं लागून उत्पादनसामर्थ्याच्या वाढीमुळें मानवसमाजाचा जो विकास होत होता तो खुंटेल. या ठिकाणीं, मार्क्सनें वरील मतसूत्रांत सांगितल्याप्रमाणें, विकासी उत्पादनसामर्थ्य व प्रचलित आर्थिक संबंध म्हणजे 'भांडवलाचे मालक व त्या भांडवलावर श्रम करणारे मजूर' हा जो आर्थिक संबंध यांत विरोध उत्पन्न होईल. ज्या थोड्या लोकांच्या मालकींत जमिनी व कारखाने असतील ते उत्पादनाचा खर्च कमी व्हावा म्हणून यंत्रें वाढवून मजुरांची संख्या व मजुरीचे दर कमी कमी करतील. यामुळें समाजाचें दारिद्र्य वाढेल, माल खपणार नाहीं व उत्पादनसामर्थ्याची वाढ खुंटून अथवा त्याची पिछेहाट होऊन मानवजातीचें दारिद्र्य आणखी वाढत जाईल. याला उपाय वाढत्या उत्पादनसामर्थ्यास विरोध करणारी जमीन व कारखाने वगैरे उत्पादनसाधनांवरील मालकशाही रद्द करून, म्हणजे केवळ नफ्याच्या लोभानेंच संपत्ति निर्माण व्हावी ही समाजव्यवस्था बंद करून, एकंदर माणसांची धनोत्पादन शक्ति वाढली असल्यानें सर्वांनाच अधिक धनाचा लाभ व्हावा, कामाचे तास व दगदग कमी व्हावी अशी समाजव्यवस्था निर्माण करावी असें मार्क्सचें म्हणणें आहे. भांडवलशाहीस हाणून पाडून नवीन समाज निर्मिण्याचें हें कार्य मजूरवर्गानें करावें असें तो म्हणतो. शेतकरी हा सरंजामदाराशीं कित्येक वर्षें वर्गलढा करीत होता. शेवटीं भांडवलदार त्याच्या साहाय्यास धावून आला तेव्हांच त्यास यश आलें. पण यामुळें भांडवलशाहीच्या उदयकालीं शेतकऱ्याचा मजूर होऊन त्याचें दुःख मात्र वाढलें. तरी पण सरंजामी समाजाचा पाडाव व्हावा तो झाला हें योग्यच झालें. आतां उत्पादनसामर्थ्य इतकें वाढलें आहे कीं, तें वाढण्यास भांडवलशाहीची जरूर राहिली नाहीं; इतकेंच नव्हे तर भांडवलशाही ही धनोत्पादनाच्या वाढीस अडथळाच होत आहे; तेव्हां मजूरवर्गानें भांडवलशाहीविरुद्ध वर्गयुद्ध चालवून तिला हाणून पाडावी असें मार्क्सचें म्हणणें आहे. प्रथम मानवसमाजाचा विकास करणें व पुढें ह्या समाजाच्या

विकासास अडथळा आणणें हाच भांडवलशाहीचा 'गतिधर्म' (लॉ ऑफ् मोशन) कसा आहे हेंच मार्क्सनें सर्व 'कॅपिट्ल्' ग्रंथभर तपासून दाखविलें आहे.

प्रेम, स्नेह, स्वार्थत्याग या उदात्त भावना मार्क्सला इतिहासांत न आढळतां वर्गकलहच तेवढा दिसला हें खरें नाहीं. तर त्यानें त्यावरच आपल्या कार्याच्या दृष्टीनें विशेष भर दिला हें खरें आहे. पण त्याचेंहि कारण असें कीं, कांहीं एका मर्यादेपर्यंत पुरेशी चरितार्थसाधनें माणसास उपलब्ध असल्याशिवाय प्रेम, स्नेह, स्वार्थत्याग यांसारख्या सांस्कृतिक सद्गुणांचा विकास होणेंच काय, पण सामान्य सुखानें जगणेंहि अशक्य असतें. भांडवलशाहीच्या पूर्वी व भांडवलशाही-कालांतहि उत्पादनसाधनें आपल्या हातीं दाबून ठेवून गरिबांच्या श्रमाच्या जोरावर मूठभर धनवंतांनीं आपला सांस्कृतिक विकास केला व बहुसंख्य समाजाला आपलीं धनोत्पादनसाधनें मूठभर लुटारूंपासून परत घेण्यासाठीं झगडणें, पराभूत होणें, संधि येतांच पुनः झगडणें, यशस्वी होणें व पुनः नव्या लुटारूंपुढें पराभूत होणें यावांचून वेगळा इतिहासच घडवितां आला नाहीं. सांस्कृतिक इतिहास मूठभर लोकांनीं घडविला. बहुसंख्य समाजाच्या कपाळीं वर्गलढा चालविणें एवढाच भोगवटा आला होता. "वर्तमान व भूतकालाचा सर्व मानवेतिहास वर्गकलहाचाच आहे" असें मार्क्स म्हणतो तें या अर्थानें. मजुरांनीं भांडवलशाहीचा पाडाव केल्यावर समाजसत्ता स्थापन केली म्हणजे मग हा वर्गकलह संपेल असें त्याचें भाकित आहे. भांडवलशाहीचा पाडाव करण्यास कारखानदारीमुळें संघटित व सुबुद्ध होणारा मजूरवर्गच अधिक पात्र आहे. कारण सर्व धनोत्पादनघटना त्याच्या हातीं असून त्यानें संघटना केल्यास भांडवलवाल्याच्या हातून अर्थसत्ता व राज्यसत्ता हिरावून घेणें त्यास फारसें कठीण नाहीं असें मार्क्सचें म्हणणें आहे. भांडवलशाहीचा विकास होतांहोतांच तिची प्रगति कशी खुंटेल व अखेर मजुरांच्या हातून नाश कसा होईल हें सांगतांना कॅपिटल् ग्रंथाच्या पहिल्या खंडांत मार्क्स लिहितो—

"एक भांडवलवाला दुसऱ्या पुष्कळशा भांडवलवाल्या बांधवांना चढाओढींत लोळवितो; अशा प्रकारें थोड्या भांडवलवाल्यांकडून पुष्कळ भांडवलवाल्यांस कफल्लक केलें जाऊन संपत्तीचें केन्द्रीकरण थोड्याथोड्यांच्या हातीं होत असतां संपत्त्युत्पादानाचें कार्य वाढत्या प्रमाणांत मजुरांच्या सहकारितेनें

होऊं लागतें. त्याचबरोबर संपत्त्युत्पादनाचीं उपकरणें अधिकाधिक शास्त्रशुद्ध केलीं जातात. जमिनीची मशागत अधिकाधिक पद्धतशीरपणें होऊं लागते. मजुरांचीं हत्यारें, सहकारितेनेंच तीं वापरतां येतील, असें रूप धारण करूं लागतात. सामुदायिक श्रमामुळें संपत्त्युत्पादनसाधनांची काटकसर होते. जगाच्या बाजारांत जगांतील सर्व माणसें खेचलीं जातात आणि म्हणून भांडवलशाही वाढत्या प्रमाणांत आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करते. उत्पादनसाधनें अधिकाधिक कार्यक्षम होत असतां चढाओढीच्या बळावर थोडे भांडवलवाले इतरांस पराभूत करून भांडवलशाही समाजांतले सर्व फायदे गिळंकृत करतात. अशा प्रकारें या भांडवलशाही सुलतानांची संख्या कमी कमी होत असतां दुसऱ्या बाजूस दारिद्र्य, जुलूम, गुलामगिरी, अधःपात व पिळणूक हींहि वाढत असतात; पण त्याचबरोबर कामगारवर्गाचा संतापहि तीव्र होत असतो. या वर्गाची संख्या वाढत असते, त्यांच्यांत शिस्त उत्पन्न होत असते. भांडवलशाहीच्या विशिष्ट उत्पादनप्रकारामुळेंच त्यांच्यांत ही संघटना निर्माण होत असते. भांडवलाच्या केन्द्रीकरणामुळें जी उत्पादनपद्धति सुधारत गेली तिची वाढ यापुढें त्याच भांडवलाच्या अतिकेन्द्रीकरणाच्या अडसरापुढें खुंटते. धनोत्पादन साधनांचें केन्द्रीकरण व संपत्तीचें सामुदायिक उत्पादन या दोहोंची वाढ इतकी पुष्कळ होते, कीं यापुढें भांडवलशाहीच्या कवचांत तीं मावूं शकत नाहींत; म्हणून मग तें कवच फुटतें. भांडवलशाही मालकी पद्धतीच्या मृत्यूची घंटा वाजूं लागते. ज्यांनीं जगास कफल्लक केले तेच शेवटीं कफल्लक होतात."

कामगार-क्रांति कशी करावी

मजूरवर्गानें अशा प्रकारें भांडवलशाहीचा पाडाव करून कोणत्या प्रकारची राज्यव्यवस्था निर्माण करावी यासंबंधीं कम्युनिस्ट जाहिरनाम्यांत मार्क्स-एंजल्स लिहितात, "……कामगारक्रांतींतील पहिलें कार्य मजूरवर्गास राज्यकर्ता बनविणें, लोकशाही स्थापणें हें—". भांडवलवाल्यांचीं धनोत्पादनसाधनें हिरावून घेतलीं म्हणजे आपोआपच त्यांची सत्ताहि नष्ट होईल व मजूर हे बहुसंख्य असल्यानें निवळ बहुमताच्या जोरावरहि खरीखुरी लोकशाही निर्माण करतां येईल असा या वचनाचा अर्थ होता. पण पुढें फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियननें लोकमतास फसवून स्वतांस फ्रेंच प्रजासत्ताकाचा अध्यक्ष

निवडून घेतलें व पुढें अनेक अनन्वित कृत्यांनीं प्रजासत्ताक बुडवून स्वतांस बादशहा म्हणून राज्याभिषेक करून घेतला. त्या वेळेपासून मार्क्सचा लोकशाहीवरील विश्वास उडत चालला. तिसऱ्या नेपोलियनच्या या अधिकार-बळकावणीसंबंधीं लिहिलेल्या 'एटीन्थ ब्रूमायार' या पुस्तकांत 'नुसतें राज्ययंत्र मजुरांनीं जिंकणें पुरें नसून त्याचा संपूर्ण विध्वंस केला पाहिजे' असें मत मार्क्सनें दिलें. पुढें लॅसलेच्या गोथा कार्यक्रमावर टीका करतांना, व १८७० च्या पॅरिसकम्यूनचा पराभव झाल्याच्या अनुभवावरून मजुरांनीं भांडवलवाल्यांचें राज्य जिंकावें, त्याचा पूर्ण विध्वंस करावा व मजुरांची मुखत्यारी (डिक्टेटरशिप ऑफ् दि प्रॉलेटॅरियट) त्या जागीं स्थापन करावी असें मार्क्सनें सांगितलें आहे.

मार्क्सवादाची पीछेहाट

मार्क्स १८८३ सालीं मृत्यु पावला व एंजल्स १८९५ सालीं वारला. दोघांनाहि त्यांच्या डोळ्यांपुढें त्यांनीं प्रतिपादिलेली कम्युनिस्ट क्रांति पहावयास मिळाली नाहीं. उलट त्यांच्या मताची मार्क्सच्या मृत्यूनंतर व एंजल्सच्या हयातींतच पीछेहाट झाली. मार्क्स व त्याचे सहकारी यांनीं जगांत कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा प्रसार करून शक्य तेथें क्रांति घडवून आणण्यासाठीं १८६४ सालीं आंतरराष्ट्रीय मजूरसंघ (फर्स्ट इंटरनॅशनल) स्थापन केला होता. तो आठ वर्षांत मोडून गेला. मार्क्सच्या मृत्यूनंतर १८८९ सालीं दुसरा आंतरराष्ट्रीय मजूरसंघ (सेकंड इंटरनॅशनल) स्थापन झाला. याच्या संस्थापकांना आंतरराष्ट्रीय क्रांतीबद्दल मुळींच आस्था अथवा तिच्या शक्यतेबद्दल विश्वास नव्हता. एंजल्सचा जर्मन शिष्य बर्न्स्टेन यांस एंजल्सनें आपली सर्व लायब्ररी दिली व आपणास करतां न आलें तें कम्युनिस्टक्रांतीचें कार्य बर्न्स्टेन व कॉट्स्की यांनीं करावें अशी इच्छा प्रदर्शित केली होती. पण या दोघांनींहि मार्क्सच्या लिखाणाचे अर्थ फिरविले; क्रांतीची परिस्थिति यापुढें येणार नसून मार्क्सिस्ट मताची दुरुस्ती (रिव्हिजन) करावी असें बर्न्स्टेन म्हणूं लागला. आंतरराष्ट्रीय महायुद्ध झाल्यास त्यांत कामगारांनीं भाग घेऊं नये. भांडवलवाले आपल्या स्वार्थासाठीं आंतरराष्ट्रीय युद्धें लढतात व एका देशांतील मजूर दुसऱ्या देशांतील आपल्या बांधवांचा नाहक नाश करतात, म्हणून युद्ध सुरू झाल्यास आपापल्या

राज्यकर्त्यांशीं कामगारांनीं असहकार करावा असा ठराव बेसल येथें १९१२ सालीं भरलेल्या दुसऱ्या इंटरनॅशनलच्या परिषदेनें केला. पण १९१४ सालीं महायुद्ध सुरू होतांच बेसल परिषदेचा निर्णय धाब्यावर बसवून सर्व देशांतील कामगार आपापल्या देशांतील भांडवलवाल्या सरकारतर्फे रणांगणावर आले व शत्रु-राष्ट्रांतील कामगारबंधूंचे गळे कापून त्यांच्या रक्तांत त्यांनीं दुसरी इंटरनॅशनल बुडवून टाकली. अशा रीतीनें मार्क्सवाद मेला, कायमचा गाडला गेला असें सुखमय दृश्य भांडवलवाल्या राष्ट्रांच्या नजरेस महायुद्धाच्या सुरुवातीस पडलें. यामुळें १९१७ सालीं जेव्हां रशियांत कामगारक्रान्ति झाली त्या वेळीं भांडवलशाही राष्ट्रांतील मोठमोठे मुत्सद्दी आपण जागे आहों कीं स्वप्नांत आहों याची खात्री करून घेण्यासाठीं डोळे चोळीत होते व अंगास चिमटे काढीत होते.

रशियांतील नेरॉड्निकी पंथ

मार्क्सच्या हयातीअखेरीस युरोपियन राष्ट्रांत मार्क्सवादास उतरती कळा लागली व त्याचें डोकें आतां लौकर वर निघणें शक्य नाहीं असें वाटूं लागलें होतें; पण त्याच वेळीं रशियासारख्या प्रचंड पण मागासलेल्या देशांत मार्क्सवादाचें बीं रुजलें व अवघ्या पस्तीस वर्षांत त्याचा प्रचंड वृक्ष झाला.

मार्क्सच्या अखेरीच्या दिवसांत रशियांत मागें उल्लेखिलेला नेरॉड्निकी पंथ जोरांत असून सुशिक्षित तरुणांच्या मनावर त्याची विलक्षण छाप होती. मोठमोठ्या जमीनदार, सरदार, पुरोहित, लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांची तरुण मुलें व मुली नेरॉड्निकी पंथाच्या क्रांतिकार्यांत माग घेत असत. आर्थर रोझेनबर्ग लिहितो—

"रशियांत एकंदर परिस्थिति निकरावर आणण्यास सुशिक्षित बुद्धिवान वर्ग विशेष तऱ्हेनें कारण झाला. बहुतेक सुशिक्षित व जहाल (रॅडिकल) मताचे तरुण हे सरदार घराण्यांतील असत. बाप पोलिसांचा मुख्य अधिकारी अथवा गव्हर्नर या नात्यानें आपल्या कचेरींत कामकाज पाहत असतां त्याची मुलगीच रस्त्याच्या कोपऱ्यावर अधिकाऱ्यांवर बाँब फेकीत आहे असे प्रकार नेहमीं अनुभवास येत. रशियन सरदारवर्गाचा बौद्धिक व सामाजिक इतिहास पाहिला तर सरदारवर्गाचा नाश सरदारवंशांतीलच माणसें

करीत आहेत असें आढळून येतें. बापजाद्यांनीं जें जें उभारलें व पूज्य मानलें त्या त्या सर्वांचा त्यांच्या तरुण सुशिक्षित वंशजांनीं विध्वंस केला. .....या नेरॉड्निकी पंथाचें वैशिष्ट्य असें होतें कीं झार व त्याच्या सरकारचा द्वेष त्यांच्या रोमरोमीं भिनला असून रशियावर—विशेषतः रशियाच्या शेतकरी-वर्गावर त्यांची गाढ निष्ठा होती. झारची पाशवी नोकरशाही सत्ता उलथून पाडणें व देशांतील बहुसंख्य अशा शेतकरीवर्गाच्या हातीं सत्ता येईल असें लोकराज्य स्थापणें हें त्यांचें ध्येय होतें....शेतकऱ्याची गुलामगिरी व झारशाही नष्ट झाल्यावरहि शेतकऱ्यांची ग्रामसंस्था शिल्लक उरेल व तिच्या आधारावर 'शेतींतील समाजसत्तावाद' (ॲग्रेरियन सोशॅलिझम्) निर्माण करतां येईल अशी त्यांची कल्पना होती. .....मूर्ख व अशिक्षित अशा रशियन शेतकऱ्यास हें सर्व ज्ञान आपोआप कळणें शक्य नाहीं हें उघड होतें आणि म्हणून स्वार्थत्यागी व बुद्धिवान सरदारवर्गीय तरुण जनतेकडे धावले. ते खेड्यांत राहून शेतकऱ्यांस आपलें तत्त्वज्ञान शिकवीत व क्रांतीची तयारी करीत राहूं लागले. अशा प्रकारें सुशिक्षित तरुणांचा एक क्रांतिकारक पक्ष रशियांत उदयास आला. त्यानें आपल्या जीविताची, धनाची, कशाचीहि आपल्या क्रांतिकार्यापुढें तमा धरली नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांवर व राजघराण्यावर दहशतीचे उपाय अमलांत आणण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. तो मॉस्को व पेट्रोग्रॅड येथें जितक्या निकरानें आपल्या कार्यांत झगडे तितक्याच निकरानें स्वित्झर्लंडमध्यें पळून गेला असतां किंवा सैबेरियांत हद्दपार झाला असतां झगडत असे. पक्षांतील सभांत चर्चा करतांना, अथवा बेकायदा ठरलेल्या वृत्तपत्राच्या संपादकीय टेबलावर लिहितांना तो जितक्या कळकळीनें आपलें कार्य करीत असे तीच कळकळ तुरुंगांत असतांना अथवा फांसावर लटकतांनाहि त्याचे अंतःकरणांतून जात नसे. या नेरॉड्निक चळवळीनें असा एक धंदे-वाईक क्रांतिकारकांचा वर्ग तयार केला, कीं त्याला क्रांतीखेरीज आयुष्यांत दुसरें कांहीं मिळवावयाचें आहे असें वाटतच नसे आणि लोकसेवेच्या कार्या-साठीं तो आपलें शिरकमल हातावर घेऊन सदासर्वकाळ सिद्ध असे. अर्थात् हीं माणसें सामान्य शेतकऱ्यांहून संस्कृतीनें अतिशय दूर व श्रेष्ठ होती. क्रांति-प्रेम व वीरत्व हा या नेरॉड्निक तरुणांचा फार मोठा गुण होता. या नेरॉड्निक

पंथीयांनाच पुढें सोशल रेव्होल्यूशनरीज् असें नांव मिळालें" (हिस्टरी ऑफ् बोल्शेव्हिझम्—आर्थर रोझेन्बर्ग)

या नेरॉड्निक अथवा सोशल रेव्होल्यूशनरी पंथाचा मोठा दोष हा होता, कीं शारशाहीचा पाडाव करून जी समाजव्यवस्था त्यांना निर्माण करावयाची होती तीसंबंधीं त्यांच्या मनांत गोंधळ होता. भांडवलशाही पद्धतीच्या औद्योगिक क्रांतीच्या दाढेंत रशिया सापडल्यावांचून राहणार नाहीं, जुन्या तऱ्हेच्या ओबडधोबड शेतीप्रधान समाजव्यवस्थेला यापुढें रशियांत वैभवानें जगतां येणें शक्य नाहीं हें त्यास स्पष्ट दिसत असतांहि केवळ हटवादानें ते हें अमान्य करीत. अपरिहार्यतेनें रशियावर पसरत असलेल्या औद्योगिक भांडवलशाहीमुळें कोणते सामाजिक पालट घडून येत आहेत याचा विचार अथवा त्याचा फायदा घेण्याची पर्वा ते करीत नसत. यामुळे पिस्तुलें, बाँबबोळे व गुप्त कट यांतून त्यांचें मन बाहेर निघालेंच नाहीं.

रशियांत मार्क्सिस्ट पंथाचा उदय

रशियांतल्या मार्क्सिस्टांचा पंथ अर्थातच या 'सोशल रेव्होल्यूशनरी' पंथाहून अगदींच भिन्न होता. शेतकरी त्याच्या उत्पादनप्रकारामुळेंच असंघटित व अप्रबुद्ध असल्यानें तो समाजक्रांतीचें कार्य पुढारीपणानें कधींहि करूं शकणार नाहीं हें त्यांना पटलें होतें. तसेंच यांत्रिक कारखानदारीमुळें कामगार हा अधिक संघटित, अधिक सुबुद्ध, प्रतिकारक्षम व समाजाच्या आर्थिक सांगाड्याचीं मर्मस्थानें हातीं पकडून बसलेला असल्यानें समाजक्रांति घडवून आणण्यास हाच वर्ग समर्थ आहे हें, मार्क्सचे अनुयायी या नात्यानें, त्यांचें ठाम मत होतें. रशियांतील मार्क्सिस्ट पंथाचा आद्य संस्थापक जॉर्ज प्लेखॅनॉव्ह यानें १८८९ सालीं दुसऱ्या इंटरनॅशनलच्या पहिल्या काँग्रेसमध्यें भाषण करतांना—"रशियांतील क्रांतिकारक चळवळ ही कामगारांची क्रांतिकारक चळवळ झाली म्हणजेच यशस्वी होईल. रशियास दुसरी गति नाहीं व असणेंहि शक्य नाहीं" असें भाकित सांगितलें. रशियांत कामगारांनीं पुढें खरोखरच क्रांतिकार्य हातांत घेतलें त्या वेळीं प्लेखॅनॉव्हनें कच खाल्ली. पण त्यानें १८८९ सालीं केलेलें भाकित अक्षरशः खरें ठरलें. इतकेंच नव्हे तर तो १९१८ सालीं वारल्यामुळें हें आपलें भाकित खरें झालेलें त्यास पाहावयासहि मिळालें. जॉर्ज

प्लेखॅनॉव्ह, पॉल एक्सलरॉड आणि व्हीरा झासुलिच या त्रिवर्ग मार्क्सिस्टांनीं परदेशांत असतांना मार्क्सच्या मताचा रशियांत प्रसार करून क्रांतीसाठीं कामगारांची संघटना करण्याकरितां 'लिबरेशन ऑफ लेबर ग्रुप' या नांवाची संस्था स्थापन केली. पण लवकरच कामगारक्रांतिकार्याचें पुढारीपण प्लेखॅनॉव्हकडून लेनिनकडे गेलें व त्यानें पंचवीस वर्षें तें आपणाकडे ठेवून कामगारक्रांतिहि करून दाखविली.

व्हलाडिमीर इलिच उलियानॉव्ह ऊर्फ लेनिन

लेनिनचें मूळचें नांव व्हलाडिमीर इलिच उलियानॉव्ह असें होतें. तो १८७० त जन्मला. व्हलाडिमीरसुद्धां तीन भाऊ व तीन बहिणी अशीं हीं सहा भावंडें. यांचा बाप इल्यानिकोलेविच उलियानॉव्ह हा सिंब्रिस्क परगण्यांत प्राथमिक शाळांचा इन्स्पेक्टर होता. व्हलाडिमीरला सिंब्रिस्क हायस्कुलांत प्राथमिक शिक्षण मिळालें. त्याचा वडील भाऊ अलेक्झांडर हा नेरॉड्निकपंथी असून त्यानें झार तिसरा अलेक्झांडर याचा खून करण्याच्या कटांत भाग घेतला होता. पण तो कट अयशस्वी होऊन अलेक्झांडर उलियानॉव्ह १८८७त फांशीं गेला. अलेक्झांडरमुळें येथून पुढें या कुटुंबाचा फार छळ झाला व उरलेलीं सर्व भावंडें पुढें क्रांतिकारक झालीं. व्हलाडिमीर हा अलेक्झांडरचा भाऊ म्हणून त्यास हायस्कूलच्या शेवटच्या परीक्षेस बसण्यास सरकारनें परवानगी नाकारली. पण शाळेच्या हेडमास्तरानें रदबदली करून ही परवानगी पुन्हा मिळविली. त्याप्रमाणें व्हलाडिमीर परीक्षेस बसून पहिला आला व त्यास पहिल्या नंबरचें बक्षिसहि मिळालें. त्याच वर्षी कझान-विद्यापीठांत तो मॅट्रिक परीक्षा पास झाला. पुढें डिसेंबरांत कझान येथील विद्यार्थ्यांनीं राजकीय असंतोषामुळें दंगे केले. व्हलाडिमीरचा त्यांत फारसा संबंध नव्हता. पण तो अलेक्झांडरचा भाऊ आहे ही गोष्ट पोलिसच्या आठवणींत होती. म्हणून दंगेखोरांच्या पुढाऱ्यांबरोबर व्हलाडिमीरलाहि पोलिसांनीं पकडून कोकुश्किनो या त्याच्या मामाच्या गांवीं हद्दपार केलें. परत विद्यापीठांत प्रवेश मिळण्याची त्यानें खूप खटपट केली; पण यश आलें नाहीं. शेवटीं १८९० सालीं बाहेरचा विद्यार्थी म्हणून त्यास कायद्याच्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली. त्याप्रमाणें तो १८९१ सालीं पीटर्सबर्ग विद्यापीठाच्या परीक्षेस

बसला व पासहि झाला. नंतर समारा येथें त्याचे वडील राहात असल्यामुळें तेथेंच त्यानें एका बॅरिस्टराचे हाताखालीं वकिली सुरू केली. तेथें एक वर्ष-भर धंदा केल्यावर १८९३च्या सप्टेंबरांत तो पीटर्सबर्गला वकिलीसाठीं आला पण पुढें त्यानें लवकरच वकिली करण्याचें सोडून सोशॅलिस्ट मतप्रसाराच्या कामास स्वतःस सर्वस्वीं वाहून घेतलें.

मार्क्सिस्ट चळवळीस प्रारंभ

१८८८ त कोकुश्किनो येथें असतां व्हलाडिमीरनें मार्क्सचा कॅपिटल ग्रंथ वाचण्यांत पुष्कळ काळ घालविला व मार्क्सचीं मतें त्यास पटूं लागून एन्. ई. फिडोसियेव्ह यानें कझान येथें काढलेल्या एका मार्क्सिस्ट मंडळास तो मिळाला. पुढें समारा येथें त्यानें कांहीं सुशिक्षित तरुणांना एकत्र करून मार्क्सिस्ट मंडळ काढलें. येथें नेरॉड्निक पंथाचीं मतें कशीं चुकीचीं आहेत हें दाखविणारें एक पत्रक त्यानें लिहिलें. त्याचें मार्क्सवादावरील हें पहिलेंच लेखन होय. कझान व समारा येथें कारखानदारी फारशी नसल्यानें कामगार-वर्ग अगदीं थोडा होता. पीटर्सबर्ग येथें कारखाने पुष्कळ म्हणून कामगारहि पुष्कळ होते; म्हणून १८९३ सालीं व्हलाडिमीर पीटर्सबर्गला आल्यावर त्याला सर्व वेळ मार्क्सवादाचा प्रसार करण्याइतकें भरपूर काम मिळालें.

१८९३च्या पावसाळ्यांत व्हलाडमीर उलियानॉव्ह पीटर्सबर्ग येथें आला. येथें कामगारांची संख्या व सुशिक्षित तरुणांची संख्याहि मोठी असल्या-मुळें कामगार चळवळीचें व मार्क्सवादी विचारसरणीचें येथें केंद्र होतें. सुशिक्षित मार्क्सिस्टांचें येथें दोन गट होते. एक 'कायदेशीर' व दुसरा 'बेकायदा' गट होता. 'कायदेशीर' गटाचा पुढारी पीटर स्ट्रुव्ह हा होता. सरंजामी समाज मोडून भांडवलशाही येणें हें क्रमप्राप्तच आहे व ती समाजा-ची प्रगति आहे हें जें मार्क्सचें मत तेवढ्यापुरताच मार्क्सवाद त्यास मान्य असून, रशियांत भांडवलशाही येत आहे ही चांगली गोष्ट आहे, असें हा गट मानी व भांडवलशाहीचा अंत करण्याचें मार्क्सचें कम्युनिस्ट मत, नुकतीच भांडवलशाही सुरू झालेल्या रशियांत गौण आहे असें स्ट्रुव्ह व त्याचे अनु-यायी समजत. व्हलाडिमीर 'बेकायदा' गटांत सामील झाला. या 'गटा'ची पीटर्सबर्गमध्यें 'फाइटिंग यूनियन फॉर दि लिबरेशन ऑफ दि वर्किंग क्लास'

(कामगारांच्या स्वातंत्र्यासाठीं लढणारा संघ)या नांवाची संस्था असून भांडवलशाही उलथून पाडण्याचें मार्क्सचें कम्युनिस्ट मत यास महत्त्वाचें वाटे. बोल्शेव्हिक अमलांत पुढें मोठ्या अधिकारावर चढलेले लिऑनिड क्रेझिन,क्रेझी झेनोव्ह्स्की वगैरे कम्युनिस्ट पुढारी या संघाचे सभासद असून त्यांची व व्हलाडिमीरची या वेळींच गट्टी जमली. नॅडेझदा कॉन्स्टॅन्टिनोव्हा क्रूप्स्काया या तरुणीशीं व्हलाडिमीरचा याच संघांत प्रथम परिचय झाला. हिनें पुढें व्हलाडिमीरशीं विवाह करून व सर्व सुखदुःखांत, वनवासांत व राजवाडयांत त्याच्या संगतींत सुखानें राहून त्याला लेखनाच्या, चळवळीच्या व मतप्रसाराच्या कामीं बहुमोल मदत केली. व्हलाडिमीर ऊर्फ लेनिन याच्याइतकीं संकटें व जबाबदारीचीं कामें इतिहासांत फार थोडयांवर आलीं व अशा सर्व संकटांत व जबाबदारीच्या कामांत इतका दीर्घ काळपर्यंत पतीशीं एकनिष्ठेनें व निपुणतेनें सहकार्य करणारी क्रूप्स्कायासारखी स्त्री अलीकडील इतिहासांत बहुधा दुसरी झालीच नाहीं.

व्हलाडिमीर पीटर्सबर्गला येण्यापूर्वीच तो मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानांत व आंकडेवार माहितींत मोठा विद्वान आहे अशी त्याची ख्याति झालेली होती. " पीटर्सबर्गमध्यें कार्यकर्त्यांशीं जेव्हां त्याचा परिचय झाला तेव्हां तो नुसता गाढ विद्वानच नव्हे तर त्याचे अंगीं दुर्दम हिंमत व स्वमताबद्दल बिनतोड आत्मविश्वास असल्याचेंहि कार्यकर्त्यांना आढळून आलें." पीटर्सबर्गमधील कार्यकर्त्यांच्या गटांत तो शिरला तों एकदम त्यांतील ठळक पुढारीच ठरला. या वेळीं कामगारांत मार्क्सवादाचा निव्वळ तात्त्विक मतप्रचार चाले. हें धोरण बदलून त्यानें संघाकरवीं कामगारांत त्यांच्या दैनंदिन आयुष्यांतील गाऱ्हाणीं दूर करून घेण्यासाठीं लढा चालविण्याची चळवळ चालू केली. " कामगारांना अगदीं खेळीमेळींत आणून तो त्यांचा विश्वास संपादन करी. त्याचें शिक्षणाचें काम उलटसुलट चाले. तो त्यांना शिकवी व त्यांच्यापासून स्वतां शिके. मार्क्सिस्ट मताचीं मूलतत्त्वें तो त्यांना शिकवी व त्यांच्याजवळून एकंदर कामगारांच्या परिस्थितीचें शिक्षण मिळवी." (मिर्स्कीकृत लेनिनचें चरित्र)

मजूर हे अशिक्षित, यांना मार्क्सिझमचीं अवघड तत्त्वें कशीं कळणार? चार ठोकळ गोष्टी सांगाव्या म्हणजे झालें; असें पुष्कळ कार्यकर्त्यांना वाटे.

व्हलाडिमीरला हें मत मान्य नव्हतें. तो कामगारांतील हुशार कामगार निवडून काढी व त्यांना सुशिक्षित मार्क्सिस्टांप्रमाणें मार्क्सचें तत्त्वज्ञान, त्याच्या खाणाखुणा व खाचाखोचा पढवून अगदीं तज्ज्ञ बनवीत असे. १८९४-९५ त या मार्क्सवादी कार्यकर्त्यांनीं पुष्कळ लेखन केलें. सेन्सॉरचा कांच अतिशय असल्यानें हें सर्व लेखन निवळ तात्त्विक, अगदीं प्रोफेसरी घाटाचें व थाटाचें असे; पण व्हलाडिमीर उलियानॉव्हला इतका थाट जमला नाहीं. कितीहि छपविली तरी 'सिंहाची नखी ऐन वेळीं बाहेर येईच'. स्ट्रुव्ह, प्लेखॅनॉव्ह व उलियानॉव्ह यांनीं लिहिलेलें एक पत्र उलियानॉव्हच्या लेखनामुळें जप्त झालें. त्याचें बेकायदा लिखाणच पुष्कळ असून ते हेक्टोग्राफवर छापलें जाई व गुप्त पत्रकांच्या स्वरूपांत त्याचा कामगारांत प्रसार केला जात असे. या वेळीं "लोकांचे मित्र कोण ?..." या नांवाचें त्यानें एक फार महत्त्वाचें पत्रक लिहिलें. मार्क्सिस्ट क्रांतिवादाचें शास्त्रशुद्ध स्वरूप सांगणारें रशियांतलें असें हें पहिलेंच पत्रक होतें. रशियांत भांडवलशाही कशी वाढत आहे, शेतीची परिस्थिति काय आहे वगैरे रशियाच्या आर्थिक परिस्थितीची या पत्रकांत सूक्ष्म चिकित्सा असून नेरॉड्निकी मताच्या प्रसारानें समाजाची पीछेहाट कशी होईल हें त्यानें या पत्रकांत दाखविलें आहे. त्याचप्रमाणें मार्क्सिस्ट मत वेदवाक्याप्रमाणें चिकित्सा न करतां वंद्य मानण्याची गरज नसून तें शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान आहे व परिस्थितीच्या दृष्टीनेंच तें योग्य असल्यामुळें ग्राह्य आहे असें त्यानें या पत्रकांत दाखविलें आहे. मिस्कीनें लेनिनच्या चरित्रांत घेतलेला खालील उतारा या पत्रकाचा शेवटला भाग असून 'नंतर घडलेल्या रशियन इतिहासाचें सारांशरूपानें त्यांत भाकितच करून ठेविलें आहे.' उलियानॉव्ह लिहितो,—

"कारखान्यांतील कामगारांवरच सोशल डेमोक्रॅट (रशियन मार्क्सिस्ट आपणांस या वेळीं सोशल डेमोक्रॅट म्हणवून घेत.) कार्यकर्त्यांचें लक्ष असून त्यांच्यामध्येंच ते आपल्या साऱ्या चळवळी करितात. पुढें ज्या वेळीं कामगारांतील विशेष सुबुद्ध झालेले कामगार शास्त्रशुद्ध समाजवादाच्या कल्पना व कामगारवर्गाच्या इतिहासांतील कर्तव्याचें ज्ञान आत्मसात् करितील, ज्या वेळीं त्यांचे विचार सर्व कामगारांत पसरतील, आणि ज्या वेळीं कामगार हे आपल्या भरभक्कम संस्था स्थापन करून त्यांच्या द्वारा तुटक तुटकपणें निर-

निराळ्या जागीं चाललेले आर्थिक लढे एकास एक जोडून त्या सर्वांस एका संघटित वर्गजागृत लढ्याचें रूप देतील—त्या वेळीं रशियन कामगार लोकशाहीसाठीं झगडणाऱ्या वर्गांचें पुढारीपण घेऊन अनियंत्रित राजसत्ता उलथून पाडतील आणि नंतर रशियन कामगारवर्गाना (जगांतील इतर कामगार वर्गाबरोबरच) यशस्वी कम्युनिस्ट क्रांतीच्या राजरस्त्यावर नेऊन सोडतील."

१८९५ त व्हलाडिमीरला एक जिवावरचें दुखणें येऊन गेलें. त्यांतून निभावल्यावर त्यानें हवापालट करण्यासाठीं परदेशीं जाण्याची परवानगी मिळविली, व तो स्वित्झर्लंडमध्यें गेला. तेथें प्लेखॅनॉव्ह व 'लिबरेशन ऑफ लेबर' संघाचे इतर सभासद यांशीं लेनिनचा परिचय झाला. प्लेखॅनॉव्हच्या मनावर व्हलाडिमीरनें चांगलीच छाप टाकली. त्यानें पीटर्सबर्गला परत येतांच एक गुप्त छापखाना चालवावा व वृत्तपत्र चालवावें असें त्या सर्वांनीं ठरविलें, व त्याप्रमाणें व्हलाडिमीर छापखान्याचें साहित्यहि घेऊन आला. 'वर्कमेन्स कॉज' (कामगारकार्य) नांवाच्या एका वर्तमानपत्राचा पहिला अंक छापून वाटण्यासाठीं तयारहि करण्यांत आला होता. इतक्यांत पोलिसनें 'फाइटिंग यूनियन'वर छापा घालून वृत्तपत्राचें सर्व अंक जप्त केले व सभासदांसहि पकडलें. क्रूप्सकाया व इतर कांहीं सभासद या धरपकडींतून निसटले व व्हलाडिमीर पकडला गेला. राजकीय गुन्हेगारांचे खटले त्या वेळीं कोर्टांत न चालतां झारच्या इच्छेप्रमाणें त्यांची व्यवस्था होई. यामुळें व्हलाडिमीरला कित्येक दिवस विनाचौकशी अटकेंत राहावें लागलें. तुरुंगांत असतां गुप्तपणें बाहेरच्या कामगारकार्यार्शी त्यानें उत्तम प्रकारें संबंध ठेवला असून तो अतिशय क्षोभकारक अशीं पत्रकेंहि बाहेर लिहून पाठवीत असे. १८९६ च्या मेमध्यें पीटर्सबर्गमध्यें जो मोठा संप घडून आला त्याचीं सूत्रेंहि व्हलाडिमीरनें तुरुंगांतून चालविलीं, इतकें गुप्त दळणवळणाचें तंत्र या कार्यकर्त्यांनीं त्या वेळीं परिपूर्ण केलें होतें. या अटकेंत असतांच त्यानें 'रशियांतील भांडवलशाहीची वाढ हा ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली व सैबेरियांत तो संपविला. शेतकरीवर्गाचें स्वरूप भांडवलशाहीमुळें कसें पार पालटलें आहे व शेतकऱ्यांकडे यापुढें समाजक्रांतीचें पुढारीपण कसें येऊं शकत नाहीं हें 'नेरॉड्निक' अथवा 'सोशल रेव्होल्यूशनरी' मत खोडून काढण्यासाठीं त्यानें माहितीपूर्ण युक्तिवादानें त्या पुस्तकांत विशद केलें.

व्हूलाडिमीर सैबेरियांत हद्दपार झाला

१८९७ च्या जानेवारींत व्हूलाडिमीर उलियानॉव्हची शिक्षा ठरली. त्यास पूर्व-सैबेरियांतील येनिसि नदीच्या उत्तर-खोऱ्यांतील मिनुसिंस्क जिल्ह्यांत शूशेन्स्कोये गांवीं तीन वर्षेपर्यंत हद्दपार करण्यांत आलें. त्यास स्वतांच्या खर्चानें व पहारेकऱ्यांवांचून प्रवास करण्यास परवानगी मिळाली. क्रूप्सकायाहि लवकरच पकडली जाऊन तिलाहि तीन वर्षांची हद्दपारी झाली व तीहि शूशेन्स्कोये गांवीं आली. तेथें पुढील जुलैमध्यें व्हूलाडिमीरशीं तिचा विवाह झाला. सैबेरियांत असतांच भांडवलशाहीची वाढ हें पुस्तक व्हूलाडिमीर यानें संपविलें. तसेंच 'रशियन सोशल डेमोक्रॅट्सचें कार्य' हें पत्रकहि लिहिलें. तें १८९८त प्रसिद्ध झालें. येथौल फुरसतींत त्यानें विद्याभ्यास पुष्कळच केला. 'कामगारसंघ चळवळीचा इतिहास' हें सिड्ने व बिअॅट्रिस वेब यांचें पुस्तक व इतर कांहीं पुस्तकें यांचीं त्यानें भाषांतरें केलीं. फावल्या वेळांत तो शिकारीस जाई व बुद्धिबळें खेळे. या खेळांत तो फार निष्णात होता. शूशेन्स्कोये येथें असतांच व्हूलाडिमीर जे लेख लिही ते प्रसिद्ध झाल्यावर त्यांचा लेखक कोण हें कोणास कळूं नये म्हणून तो त्या खालीं 'निकोलाय लेनिन' अशी सही करूं लागला. या नांवानेंच तो नंतर प्रसिद्धि पावला.

लेनिन व इतर कार्यकर्ते हद्दपार झाल्यामुळें चळवळीस मोठाच धक्का बसला. मागें राहिलेल्यांपैकीं ९ सभासदांनीं मिन्स्क येथें आपली एक कॉंग्रेस भरवून 'सोशल डेमोक्रॅटिक पक्ष' रीतसर स्थापन केला. लागलीच या सर्व सभासदांस पकडण्यांत आल्यामुळें या कॉंग्रेसचें कार्य पुढें चाललें नाहीं. तथापि त्यांनीं एक जाहीरनामा काढलाच. त्यांत—

"रशियन भांडवलशाहींत आतां क्रांति घडवून आणण्याची हिंमत राहिलेली नाहीं. यापुढें झारशाही उलथून पाडून जी पहिली क्रांति घडवून आणावयाची ती भांडवलशाही स्वरूपाचीच असेल, तिनें भांडवलशाहीचीच वाढ होईल हें खरें. पण ही क्रांति घडवून आणण्याचें महत्त्वाचें कार्य करण्यास कामगार हाच समर्थ आहे."

असें एक महत्त्वाचें विधान केलें होतें. सोशल डेमोक्रॅट पक्षाच्या पुढील इतिहासांत या विधानास फारच महत्त्व आलें. या जाहिरनाम्याचा लागलीच फारसा परिणाम झाला नाहीं. कामगारांचें संप सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेतृत्वाखालीं होत असत व त्यामुळें मजुरी वाढविणें वगैरे किरकोळ मागण्या निरनिराळ्या कामगारगटांना पृथक्‌पणें पूर्ण करून घेतां येत असत. उलट संपास राजकीय स्वरूप येतेंसें दिसलें, कीं पोलिसांकडून कामगारांचा छळ सुरू होई. यामुळें निरनिराळ्या 'आर्थिक' कारणांपुरतें संप करून राजकीय क्रांतीचा झगडा दूर लोटावा असें म्हणणारा एक 'आर्थिक' गट सोशल डेमोक्रॅट पक्षांतच निर्माण झाला. जुन्या नेरॉड्‌निक पंथांतील कांहीं कार्यकर्ते नुसत्या कामगारांवरच भर न देतां 'बहुसंख्य श्रमजीवी वर्गाचा' उद्धार करण्याची घोषणा करून 'सोशल रेव्होल्यूशनरी' अथवा 'सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी' हें नांव धारण करून पुढें आले. सोशल डेमोक्रॅट पक्षाचे पुढारी मोकळे नसल्यानें व ते मुख्यतः कामगारांवरच भर देणारे असल्यानें बहुसंख्य समाजांतून 'सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी' पक्षास अधिकाअधिक पाठिंबा मिळूं लागला.

'इस्क्रा' पत्र निघालें

या वेळीं लेनिन सैबेरियांतच होता. सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरींना पाठबळ मिळत असलेलें ऐकून त्यास आपल्या पक्षाच्या भवितव्याबद्दल भीति वाटली व त्यानें सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाविरुद्ध एक जाहिरनामा लिहिला. त्यावर मिनुसिन्स्क जिल्ह्यांत हद्दपारीवर असलेल्या इतर १७ डेमोक्रॅटांच्या सह्या होऊन तो प्रसृत करण्यांत आला. १९००सालाचे आरंभीं लेनिनची हद्दपारीची मुदत संपून तो परत आल्यावर पिस्कोव्ह येथें त्यास राहण्यास परवानगी मिळाली. तेथें सैबेरियांतून परत आलेल्या व इतर कांहीं सहकाऱ्यांबरोबर त्याचा विचारविनिमय झाला. लेनिन, मार्टोव्ह व पेट्रोसेव्ह या तिघांनीं युरोपांत जाऊन 'लिबरेशन ऑफ लेबर' गटाशीं संबंध ठेवावा व सोशल डेमोक्रॅट पक्षाचें एक वर्तमानपत्र काढावें असें या विचारविनिमयांत ठरलें. त्याप्रमाणें ही सर्व मंडळी म्युनिच (बव्हेरिया) येथें गेली व तेथें १९०० च्या अखेरीस त्यांनीं 'इस्क्रा' (ठिणगी) नांवाचें पत्रहि सुरू केलें. याच्या प्रति गुप्तपणें रशियांत पाठविल्या जाऊन वाटल्या जात असत. लेनिनमागून

कांहीं दिवसांनीं क्रूप्सकायाहि सैबेरियांतून परत आली व युरोपांत लेनिनच्या सहकार्यास आली. म्युनिच येथें बव्हेरियन पोलिसांचा ससेमिरा पाठीस लागल्यामुळें 'इस्क्रा' हें पत्र पुढें लंडन येथें नेण्यांत आलें. हें पत्र 'सोशल डेमोक्रॅट पक्षाचे असून, 'सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी' व नेमस्त 'आर्थिक' पंथ यांचेविरुद्ध त्याचा कटाक्ष होता. 'इस्क्रा'चे संपादकवर्गांतच पुढें फूट पडून हा अंतःकलह विकोपास गेल्यावर लेनिनला पुढें वेगळें वर्तमान-पत्र काढावें लागलें. पण ही माहिती देण्यापूर्वी, लेनिननें १९०२सालीं वर्गलढा चालविण्यासंबधींचीं धोरणें कशीं असावीं याचें स्पष्टीकरण करणारें 'आपल्या कार्याची दिशा' (व्हॉट इज टु बी डन्?) नांवाचें एक महत्त्वाचें पत्रक प्रसिद्ध केलें, व जें या कलहास मुख्यतः कारण झालें, त्याची माहिती करून घेऊं.

लेनिननें आंखलेली 'कार्याची दिशा'

'क्रांतिकारक पुढाऱ्यांचा शिरोमणि जो लेनिन त्याच्या मनोभूमिकेवर इतकां उत्कृष्ट प्रकाश पाडणारें दुसरें लिखाण सापडणेंच कठीण आहे' असें मिर्स्की या पत्रकाबद्दल लिहितो. लेनिननें पुढें स्थापन केलेल्या 'बोल्शेव्हिक पक्षाचा परिचय या पत्रकावरून उत्तम प्रकारें होऊं शकतो' असें या पत्रका-संबंधीं डॉ. गुरियनचें मत आहे. या पत्रकाचें वैशिष्ट्य सांगतांना डॉ. गुरियन म्हणतो, " जनतेला राजकीय नेतृत्वाची जरूरी आहे याबद्दल लेनिनची किती तीव्र खात्री झाली होती हें या पत्रकावरून दिसून येतें. सोशॅलिस्ट पद्धतीचा विचार करण्याचें सामर्थ्य कामगारांत अंगचेंच असतें असें जें मत असे तें त्यानें झिडकारलें असून सुशिक्षित बुद्धिमंतांनीं कामगारांस सोशॅलिझम् पटविला पाहिजे असें त्यानें प्रतिपादिलें आहे. बहुसंख्य जनतेच्या आंधळ्या भावनोद्रेकाचा उदोउदो करणें हें आपल्या पक्षाचें प्रमुख कार्य असें तो मानीत नाहीं. उलट पक्षानें जनतेचें पुढारीपण घेऊन त्यांना चळवळीचें शिक्षण दिलें पाहिजे असें तो सांगतो. ...रशियन क्रांतिकारकांना आपल्या कर्तव्याबद्दल लेनिननें जी समज दिली आहे ती महत्त्वाची आहे. रशियन कामगारवर्गानें झारिस्ट सरकार उलथून पाडलें म्हणजे सर्व जगांतील काम-गारांचें पुढारीपण त्याकडे येईल असें त्याचें मत होतें. रशियांतील विशिष्ट

परिस्थिति ध्यानांत घेऊन त्यानें पक्षाच्या कर्तव्याबद्दल आपली कल्पना बनविली आहे." (बोल्शेव्हिझम्,–थिअरी ॲन्ड प्रॅक्टिस–डॉ. वाल्डेमार गुरियन कृत)

हें सर्व पत्रक मुळांतूनच जरूर वाचण्यासारखें आहे. निवळ मराठी वाचकांच्या सोयीसाठीं जरा विस्तारानें त्यांतील कांहीं उतारे येथें देतों. लेनिन लिहितो,—

"क्रांतिकारक तत्त्वज्ञानावांचून क्रांति होऊंच शकत नाहीं.....आणि प्रगतिपर अशा तत्त्वज्ञानांवर निष्ठा असणाऱ्या पक्षासच क्रांतीचें पुढारीपण घेतां येईल ...सनदशीर राज्यघटना असलेल्या देशांत सोशॅलिझम्विरुद्ध असणाऱ्या कायद्यांशीं कामगारांना जितक्या निकरानें झगडावें लागतें त्याहून अधिक निकारानें येथील राक्षसी सरकारशीं येथल्या कामगारांस झगडावें लागणार असून त्यांस पुष्कळच अधिक कठोर कसोटीस उतरावें लागणार आहे. इतर देशांतील कामगारांपुढें जे निकडीचे प्रश्न आहेत त्यांहून रशियन कामगारांपुढील निकडीचे प्रश्न फारच अधिक क्रांतिकारक स्वरूपाचे आहेत. झारिस्ट सरकार हें युरोपियन व आशियाटिक सुलतानीचा बालेकिल्ला असून तो हाणून पाडण्याचें कार्य रशियन कामगारांनीं पार पाडल्यास त्यांचेकडे जगांतील इतर कामगारांच्या आंतरराष्ट्रीय क्रांतिकार्याचें पुढारीपण येणार आहे.

"१८९६ चे संप सर्व देशभर पसरले. यावरून पुनरुज्जीवित होणारी लोकांची चळवळ किती दृढमूल झाली हें स्पष्टपणें दिसून आलें. लोक 'आपोआप' चळवळी करतात असें जें सांगण्यांत येतें तें वर्णन यांस लागू पडेल. पण 'आपोआपपणांत' (स्पॉंटेनिइटी) वेळोवेळीं फरक पडत गेला आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. गेल्या शतकाच्या साठीं-सत्तरींत झालेल्या संपांत कामगारांनीं यंत्रांचाच विध्वंस केला, असें त्या वेळच्या 'आपोआप'-पणाचें स्वरूप होतें. या मानानें नव्वदींत झालेले संप हे अधिक 'जागृत' स्वरूपाचे होते. (यांत कामगारांनीं यंत्रशक्तीवर आपला राग न काढतां कामाचे तास कमी करून घेणें, मजुरी वाढवून मागणें, वगैरे मागण्या केल्या होत्या.) यावरून असें उघड दिसतें, कीं ज्याला आपण 'आपोआप'पणा म्हणतों ती अर्धवट सुप्त अशी वर्गजागृतिच असते. ...अगदीं प्राथमिक अवस्थेंत कामगारांना सामुदायिक प्रतिकाराचें महत्त्व कळलें नसलें तरी त्या-वांचून अन्य गतिच नाहीं एवढें तरी त्यांना वाटलें खास. त्यांच्यावर जुलूम

करणारी राज्यसंस्था व समाजसंस्था शाश्वत आहे ही त्यांची भावना नष्ट झाली आणि वरिष्ठांपुढें निमूटपणें मान लवविण्याचें त्यांनीं टाकून दिलें. यासंबंधीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे, कीं हा सर्व निराशेचा व सूडबुद्धीचा उद्रेक होता. त्यांत लढा चालविण्याची बुद्धि नव्हती. पण नव्वदींतल्या संपांत आपणांस लढा चालवावयाचा आहे अशी जागृत भावना कामगारांत स्पष्टपणें दिसून आली. उदाहरणार्थ—कामगारांनीं आपल्या मागण्या निश्चित स्वरूपांत पुढें मांडल्या होत्या. संपाची वेळ विचारपूर्वक ठरविण्यांत आली होती. इतर ठिकाणीं लढे कसकसे चालविण्यांत आले याचीं उदाहरणें समजून घेऊन चर्चा करण्यांत येई, वगैरे. पूर्वी झालेलीं बंडें हीं जुलूमग्रस्त प्रजेची केवळ खळबळ होती. उलट अलीकडे पद्धतशीरपणें झालेले संप हे, अपूर्णावस्थेंतले का असेनात पण, वर्गजागृत कामगारांचे लढे होते. ते अपूर्णावस्थेंतलेच होते हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. तेवढ्यांचाच विचार केला तर कामगारांनीं आपलीं गाऱ्हाणीं दूर करण्यापुरते ते लढे 'कामगारसंघलढे' (ट्रेड यूनियन स्ट्रगल्स) या स्वरूपांत चालविले होते. ते 'राजकीय स्वातंत्र्याचे लढे' (सोशल डेमोक्रॅटिक स्ट्रगल्स) नव्हते. कामकरी व कारखानदार यांच्यांत वर्गविरोध आहे अशी कामगारांना जाणीव होत असल्याचें त्या लढ्यांवरून दिसून आलें. पण सबंध प्रचलित राजकीय व सामाजिक घटनेशींच आपल्या हित-संबंधाचा विरोध आहे या गोष्टीची जाणीव कामगारांना झाली नव्हती व होणें शक्यहि नव्हतें. यासच, त्यांना राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याची जाणीव (सोशल डेमोक्रॅटिक कॉन्शसनेस) नव्हती असें मी म्हणतों. याच अर्थानें नव्वदींतले संप ही त्यांनीं जुन्या काळच्या बंडाच्या मानानें पुष्कळच प्रगति दाखविली, तरीहि, केवळ एक स्वयंस्फूर्त चळवळ (स्पुअर्ली स्पॉंटेनिअस मूव्हमेंट) होती असें म्हणावें लागतें. (तिच्यामागें राजकीय क्रांतीचें तत्त्व-ज्ञान नव्हतें.)

"राजकीय स्वातंत्र्याची जाणीव कामगारांना नव्हती असें मीं वर म्हटलें. याचें कारण असें कीं, राजकीय स्वातंत्र्याची जाणीव निव्वळ स्वयंस्फूर्तीनें होणें शक्य नसून त्यांना ती शिक्षणानें करून दिली पाहिजे. सर्व देशांच्या इतिहासावरून दिसून येतें कीं, केवळ स्वतःच्या प्रयत्नांनीं कामगारांत काम-गार संघांचे लढे लढविण्यापुरती जागृति (ट्रेड यूनियन कॉन्शसनेस) उत्पन्न

होऊं शकते. कामगार-संघांतर्फे भांडवलदारांशीं लढून कामगारांसंबंधींचे कायदे करण्यास सरकारास भाग पाडणें वगैरे गोष्टी करण्यांची जरूरी त्यांस पटते. पण (समाजवादी तत्त्वज्ञान केवळ अशा कामगारसंघ-लढ्यांतून निर्माण होऊं शकलें नाहीं.) समाजवादी तत्त्वज्ञान जें निर्माण झालें तें सुखवस्तु वर्गाच्या सुशिक्षित प्रतिनिधींनीं तत्त्वज्ञान, इतिहास व अर्थशास्त्र यांच्या-विषयीं जो विचार केला, त्यांतून निर्माण झालें. आधुनिक शास्त्रशुद्ध समाज-वादाचे प्रणेते मार्क्स व एंजल्स हे स्वतः सुखवस्तुवर्गातले सुशिक्षित प्रतिनिधि होते. तसेंच लोकसत्तेचें (सोशल डिमॉक्रसी) जें तत्त्वज्ञान निर्माण झालें त्याचा उगम स्वयंस्फूर्त कामगार चळवळीच्या वाढीहून अगदीं स्वतंत्र आहे. समाजक्रांतिवादी सुशिक्षितांचे ठिकाणीं जी राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली तींत या लोकसत्तेच्या तत्त्वज्ञानाचा उगम आहे.

"समाजवादी तत्त्वज्ञानास क्षुद्र लेखणें, त्यापासून थोडेंहि दूर जाणें म्हणजे भांडवलशाहीचें ध्येय स्वीकारणें होय. कामगारांच्या 'स्वयंस्फूर्तीचा' (स्पॉंटेनिइटी) खूप बडेजाव केला जात आहे. पण हें कोणी ध्यानांत घेत नाहीं, कीं या स्वयंस्फूर्त वाढीस कोणतेंहि वळण न लावल्यास ती भांडवल-शाही ध्येयाच्या जाळ्यांत सांपडते. कारण स्वयंस्फूर्त कामगार-चळवळ ही फक्त कामगारसंघ-चळवळच असून ती भांडवलशाही ध्येयाच्या टापेखालीं जाते. म्हणून आम्हा समाजवाद्यांचें कार्य हें कीं, या स्वयंस्फूर्त चळवळीला आपली लगाम घालून कामगारांच्या हितासाठीं चालू असणारी कामगारचळवळ भांडवलशाहीच्या टापेखालून काढून क्रांतिकारक लोकसत्तावादाच्या कह्यांत आणली पाहिजे.

"पण, वाचक येथें विचारतील, कामगारांची स्वयंस्फूर्त चळवळ—केवळ कायद्याच्या व कर्मीत कमी अडचणीच्या मार्गानें जाणारी चळवळ—भांडवल-शाही ध्येयाच्या टापेखालीं जाईलच हें कशावरून? याचें कारण अगदीं उघड आहे. भांडवलशाहीचें तत्त्वज्ञान प्राचीन असून त्याची वाढ पूर्ण झालेली आहे व त्याच्या प्रसारास अनुकूलताहि पुष्कळ आहे. तसेंच सोशॅल डेमोक्रॅटिक (समाजवादी,-लोकसत्तात्मक) तत्त्वज्ञानाचें नाहीं. समाजवादी चळवळ जितकी अधिक नवीन असेल तितक्या अधिक निकरानें समाजवाद्यांनीं समाज-वादविरोधी तत्त्वज्ञानास हाणून पाडण्यासाठीं झटलें पाहिजे. कामगारवर्ग स्वयं-

स्फूर्तीनेंच समाजवाद्यांकडे खेचला जातो असें नेहमीं म्हटलें जातें. समाजवादी सिद्धांतांनींच कामगारवर्गाच्या दारिद्र्याचें अधिक पूर्णपणें व अधिक अचूकपणें निदान केलें जातें; म्हणून कामगारवर्गास समाजवादाचें महत्त्व पटूं लागतें. या अर्थानें वरील विधान खरें आहे. पण असें होतांना समाजवाद्यानें, केवळ स्वयंस्फूर्तीस वाव मिळावा म्हणून, आपण दूर जाऊं नये व स्वयंस्फूर्तीस डोईजड होऊं न देतां आपल्या लगामीं ठेवावें. कामगारवर्ग समाजवादाकडे 'आपोआप' ओढला जातो हें अगदीं खरें; पण भांडवलशाहीचें तत्त्वज्ञान चोहोंकडे पसरलेलें असून विविधरूपानें पुनःपुन्हा लोकांपुढें येऊन तें कामगार-वर्गाच्या मनाची पकड इतर तत्त्वज्ञानापेक्षां अधिक 'आपोआप'-पणानें घेऊं शकतें हेंहि तितकेंच खरें आहे. समजून घ्यावयाला पाहिजे तें हें, कीं जनतेच्या स्वयंस्फूर्तीमुळेंच सोशल डेमोक्रॅट कार्यकर्त्यांनीं जागृतीचें काम करण्याची गरज उत्पन्न होते. लोक स्वयंस्फूर्तीनें जितके जितके अधिक उठावणी करतात तितकी चळवळ अधिकाधिक फैलावते आणि तितक्या अधिकाधिक प्रमाणांत सोशल डेमोक्रॅटांच्या तत्त्वप्रसारक व संघटनात्मक कार्याची गरज वाढत जाते.

"सोशल डेमोक्रॉटिक पक्ष कामगारलढ्याचें जें पुढारीपण घेतो तें कामगारांना आपल्या श्रमशक्तीचा मोबदला पुष्कळ मिळावा एवढ्याचसाठीं घेत नाहीं; तर ज्या समाजव्यवस्थेंत कफल्लक वर्गास आपली श्रमशक्ति धनिक वर्गास विकणें भागच पडतें त्या समाजव्यवस्थेचा शेवट करण्यासाठीं होय. अमुक एका अथवा अनेक कारखानदारांशीं कामगारांचा झगडा चालविणें एवढेंच सोशल डेमोक्रॅट करीत नसून समाजांतील दंडशक्तिरूप सरकारशींहि तो लढा चालवितो ...क्रांतिकारक सोशल डेमॉक्रसी आपल्या चळवळींत कामगारांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याचा कार्यक्रम स्वीकारतेच, पण या आर्थिक चळवळीचा उपयोग सरकारला निरनिराळ्या सुधारणेच्या योजना सादर करण्यासाठींच केवळ करीत नसून अनियंत्रित सरकार रद्द होऊन लोकतंत्र सरकार स्थापन झालें पाहिजे हीहि मागणी ती सरकारपुढें ठेवते... राजकीय जागृतीचा प्रसार होण्यास पहिली आवश्यक गोष्ट ही आहे, कीं सर्व बाजूंनीं राजकीय संघटनेचे दोष चव्हाट्यावर येतील अशी चळवळ व्यापक झाली पाहिजे. अशा दोषप्रदर्शनावांचून जनतेला राजकीय जागृति व

राजकीय चळवळ यांचें शिक्षण कधींहि मिळणार नाहीं. कामगारवर्गाच्या जागृतीस राजकीय जागृतीचें स्वरूप येण्यास आवश्यक गोष्ट ही आहे कीं, समाजांत कोठेंहि जुलूम, अन्याय, अत्याचार—मग तो कोणत्याहि वर्गानें कोणत्याहि वर्गावर केलेला असो—दिसला कीं त्याबद्दल त्याला चेव आला पाहिजे. आणि हा चेव राजकीय क्रांतिस्वरूपाचाच असला पाहिजे... कम्युनिस्टांच्या शास्त्रशुद्ध विचारसरणीनें समाजांतील प्रत्येक वर्गाच्या जीविताच्या प्रत्येक अंगासंबंधींचा कार्यकारणभाव त्यास लावतां आला पाहिजे; तरच कामगारांना खरी क्रांतिकारक जागृति आली असें म्हणतां येईल. कामगारांचें लक्ष मुख्यतः अथवा सर्वथा फक्त कामगारवर्गाकडेच वेधणारा मनुष्य हा सोशल डेमोक्रॅट होऊंच शकत नाहीं. यासाठीं कामगारांना नुसतें तत्त्वज्ञानाचें शिक्षणच नव्हे तर व्यावहारिक चळवळीचें ज्ञानहि दिलें पाहिजे. आधुनिक समाजांतील निरनिराळ्या वर्गांचे राजकीय संबंध त्यास राजकीय चळवळीच्या अनुभवानें कळले पाहिजेत. कामगार हा नमुनेदार सोशल डेमोक्रॅट होण्यास जमिनदार, धर्माधिकारी वर्ग, वरिष्ठ अधिकारी, शेतकरी, विद्यार्थी, भिकारी या सर्वांचें आर्थिक स्थान व राजकीय वैशिष्ट्य त्यास माहीत हवें; या वर्गांचें बलस्थान कोणतें व मर्मस्थान कोणतें हें त्यास माहीत हवें; प्रत्येक वर्ग आपल्या वर्गस्वार्थाच्या मागण्यांस कोणतें गोंडस नांव, विशेषण अथवा उदात्त घोषणा जोडून सजवितो, पण वास्तविक त्या मागणीचें स्वरूप कसें वर्गस्वार्थाचें व संकुचित असतें, कोणत्या संस्था व कोणते कायदे कोणत्या प्रकारचे हितसंबंध राखतात व ते कसे राखतात याचा खुलासा सोशल डेमोक्रॅट कामगारांना पूर्ण माहीत झालेला असला पाहिजे. हें ज्ञान कामगारांस निवळ पुस्तकांवरून शिकवितां येणार नाहीं. चालू राजकीय व सामाजिक व्यवहारांत रोज घडणारीं जिवंत उदाहरणें त्यांस फोड करून सांगितलीं पाहिजेत. अमुक एका घडलेल्या गोष्टीचा अर्थ काय, अमुक एका वादांत कोणत्या पक्षाचें काय म्हणणें आहे, अमुक एका आंकडेवार माहितीपासून कोणत्या गोष्टीचा उलगडा होतो, अमुक खटल्यांत अमक्यास शिक्षा झाली यावरून न्यायपद्धतीचें स्वरूप कसें आहे, वगैरे सर्व गोष्टी कामगारांनीं व कार्यकर्त्यांनीं, जाहीरपणें शक्य नसेल तर, खाजगी रितीनें, एकमेकांच्या कानांत बोलून पढविल्या पाहिजेत. श्रमजीवी जनतेला राज्यक्रांति-

कारक चळवळीचें शिक्षण मिळण्यासाठीं समाजस्थितीचें असें स्पष्ट गुणदोष-दर्शन कामगारांस झालें असलें पाहिजे. पोलिस जनतेवर जुलूम करतात, निरानिराळ्या धर्मपंथीयांचा छळ होत असतो, शेतकऱ्यांना फटके मारण्यांत येतात, विचारस्वातंत्र्यावर भयंकर स्वरूपाची दडपशाही होते, सैनिकांचा छळ होतो अगदीं निरुपद्रवी अशा सुसंस्कृतिप्रसारक चळवळी करणाऱ्यांना त्रास होतो, या सर्वांबद्दल कामगारवर्ग बेफिकीर कां? त्यांना क्रांतीची जरूरी कां वाटत नाहीं? ... याचा दोष आम्हांकडे आहे. आम्ही जनतेच्या चळवळीपासून दूर असतों. या निंद्य जुलुमाचें स्वरूप त्यांना ताबडतोब स्पष्ट करून सांगून त्यांची व्यापक व परिणामकारक संघटना आम्ही करीत नाहीं... ज्या वेळीं अशी संघटना आम्ही करूं त्या वेळीं कामगारांना समजूं लागेल, त्यांच्या अंतःकरणास झोंबेल, कीं विद्यार्थी, निरानिराळ्या धर्मांचे अनुयायी, शेतकरी, ग्रंथकार यांचा अपमान करणारी, त्यांवर जुलूम करणारी शक्ति दुसरी कोणतीहि नसून क्षणोक्षणीं आपणांवर जुलूम करणारी आपणांस चिर-डणारी जी पाशवी शक्ति–अनियंत्रित झारशाही–आहे तीच हीं सर्व दुष्कृत्यें करीत आहे. त्यांच्या अंतःकरणास या गोष्टी झोंबल्या म्हणजे या सर्वांचा प्रतिकार आपणच केला पाहिजे अशी दुर्दम इच्छा कामगाराला उत्पन्न होईल. मग एक दिवस सेन्सॉरला चुकविण्यासाठीं गुप्त मतप्रसाराचीं साधनें तो निर्माण करील; दुसऱ्या एकादे दिवशीं तो एकाद्या प्रांतिक गव्हर्नराच्या घरापुढें गर्दीनें असंतोषनिदर्शन करून कामगारांचा असंतोष निर्दयपणें दडपून टाकल्याबद्दल त्यास जाब विचारील; पुन्हा केव्हां तरी लोकांचा छळ करणाऱ्या सरकारी सैनिकांना तो एकादा चांगला धडा शिकवील.

"'आर्थिक झगडा हेंच राजकीय मतप्रसाराचें व्यापक साधन आहे. त्यालाच राजकीय स्वरूप देणें हें आपलें काम आहे' असें कोणी म्हणतात. पण आमचें राजकीय मतप्रसाराचें कार्य व संघटनेचें कार्य यासंबंधीं ही संकुचित दृष्टि आहे. मालकशाही व सरकार यांविरुद्ध निवळ आर्थिक लढा चालविण्यास अखिल रशियन स्वरूपाची केन्द्रीभूत संघटना मुळींच जरूर नाहीं व निवळ आर्थिक लढ्यांतून ती निर्माण होणार नाहीं. राजकीय क्रांति करणारा अखिल रशियन स्वरूपाचा जो पक्ष असेल त्याला प्रचलित राज्यघटनेच्या विरोधी अशा ज्या अनेक घटना असतील त्यांचें संघटन करावें लागेल.

म्हणून या पक्षाचे पुढारी हे सर्व समाजाचे पुढारी असून ते धंदेवाईक क्रांतिकारक असावे लागतील.

"मी निश्चयपूर्वक सांगतों कीं, (१) चळवळीचें सूत्र तुटूं न देतां ती अखंड चालूं ठेवण्यासाठीं पुढाऱ्यांची कायम स्वरूपाची संघटना नसेल तर कोणतीहि चळवळ टिकाऊ होणार नाहीं; (२) जितकी अधिकाअधिक जनता चळवळींत येऊं लागते व चळवळीची भूमिका जितकी अधिक विस्तृत होते तितकी अशा पुढाऱ्यांच्या संघटनेची गरज अधिक तीव्र होते व तितकीच ती मजबूतहि असावी लागते; कारण अशा वेळींच बोलघेवडे पुढारी समाजांतील कांहींशा मागसलेल्या वर्गास डावलून देत असतात; (३) पुढाऱ्यांच्या संघटनेंत फक्त धंदेवाईक क्रांतिकारक पुढारीच हवेत; (४) रशियासारख्या अनियंत्रित राज्यव्यवस्थेच्या देशांत ज्यांनीं क्रांतिकार्यास आयुष्य वाहिलें आहे, व ज्यांना राजकीय पोलिसांशीं झगडण्याची कला पूर्णपणें अवगत आहे, अशांनाच फक्त संघटनेंत घ्यावयाचें, असें नियंत्रण असल्यास पोलिसाला ती संघटना बुडविणें अवघड जाईल.....जो माणूस तात्त्विक प्रश्नांचें बाबतींत दुबळा व डळमळीत असतो, जो जनतेचा पुढारी नसून केवळ कामगारसंघाच्या चिटणिसासारखाच असतो, व्यापक व धीट अशी योजना अंगावर घेण्यास जो धजावत नाहीं, शत्रूचे ठिकाणींहि जो स्वतांबद्दल आदरभाव निर्माण करूं शकत नाहीं, जो आपल्या क्रांतिव्यवसायांत अनुभवी नसून केवळ मंत्रचळ्या आहे असा माणूस क्रांतिकारक नव्हे.

"जनता दंगे, मारामाऱ्या करीत राहील तर दैनंदिन झगडा खात्रीनें आपोआप जोरावेल, अशा अपेक्षेनें पक्षसंघटना करणें ही घोडचूक आहे. आपण आपलें नित्य कार्य सतत चालूं ठेविलें पाहिजे आणि तें करीत असतां कोणत्याहि परिस्थितीस तोंड देण्याची तयारी पाहिजे. कारण लोकक्षोभाचा अकस्मात् लोप होऊन चळवळी केव्हां थंडावतील, राजकीय ढिलेपणाचा काल केव्हां येईल, हें कधींहि सांगतां येत नाहीं. जरी एकादे वेळीं असें आगाऊ सांगतां आलें, तरी आपली संघटना पुन्हा मजबूत करण्यास या दूरदृष्टीचा उपयोग करतां येत नाहीं. कारण रशियासारख्या अनियंत्रित राज्यघटनेच्या देशांत राजकीय अस्वस्थतेंतून ढिलेपणा अगदीं अकस्मात् येतो आणि झारच्या पोलिसांनीं एका रात्रीं एकाद्या संस्थेवर छापा घातला तर एवढ्या क्षुल्लक

कारणावरूनहि हा ढिलेपणा येऊं शकतो. तसेंच क्रांतिहि एकदांच व एकाच उठावणीनें होत असते असें समजतां कामा नये. तर लोकक्षोभाच्या अनेक उद्रेकांची ती मालिका असून या उद्रेकांमधून पुनः पुनः अतिशय ढिलेपणाचा काळ येत असतो. यासाठीं आपल्या पक्षसंघटनेच्या चळवळीचें रहस्य, चळवळींतली युक्ति, ही असली पाहिजे कीं शक्य व आवश्यक असें सर्व काम आपण प्रचंड लोकक्षोभाचे वेळीं व पूर्ण ढिलेपणाच्या काळींहि सारख्याच उत्साहानें चालविलें पाहिजे. सर्व रशियावर राजकीय चळवळीचें जाळें पसरलें पाहिजे. त्यामुळें जीविताच्या सर्व अंगांत राजकीय विचारसरणीचा संचार होऊन समाजांतील जास्तींत जास्त घरांत राजकारणाचा शिरकाव झाला पाहिजे."

या उताऱ्यांत पक्षसंघटनेचे दोष म्हणून जे जे लेनिननें दाखविलें आहेत, तेवढे सर्व सोशलडेमोक्रॅटिक पक्षांत होते व ते दूर करण्यासाठींच लेनिननें हें विस्तृत पत्रक लिहिलें. १९०२ नंतर शेतकरी व कामकरी यांत क्रांतीचे वारे शिरून आर्थिक झगड्यास जें क्रांतीचें स्वरूप आलें त्यास सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या पुढाऱ्यांची चळवळ पुष्कळ अंशांनीं कारण होती. या वेळीं त्यांनीं केलेल्या उघड व गुप्त चळवळींचा इतिहास आज उपलब्ध असणेंहि मुष्कील आहे. पण त्यांनीं कशा प्रकारें चळवळी केल्या असाव्या व शेतकरी-कामकरी यांच्या क्षोभास, चळवळींस व मागण्यांस सार्वदेशीय व राजकीय क्रांतीचें स्वरूप कां आलें याचा कांहींसा अदमास या पत्रकावरून करतां येतो. १९०५ च्या क्रांतीचा बोध होण्यास अशा प्रकारें या पत्रकाचें महत्त्व विशेष आहे.

बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक

या पत्रकांतील कांहीं मुद्द्यांवर सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत व इस्क्राच्या संपादकांत तीव्र मतभेद झाले. इस्क्राच्या संपादकांत लेनिन, मार्टाव्ह वगैरे प्रमुख असून ट्रॉट्स्की हा बुद्धिमान तरुणाहि त्यांस येऊन मिळाला होता. पक्षाची जोरदार पायावर संघटना करण्यासाठींच हें पत्रक लेनिननें लिहिलें होतें. १९०३ सालीं लंडनमध्यें पक्षाची दुसरी काँग्रेस भरली. तिला लंडनहून पुष्कळ प्रतिनिधि आले होते. या काँग्रेसमध्यें पक्षाचे नियम करीत असता पहिल्या नियमावरच मतभेद झाला व तोच विकोपास गेला. 'पक्षाच्या संघटनेंत जो

प्रत्यक्ष रीतीनें भाग घेतो तोच पक्षाचा सभासद होऊं शकेल' असें लेनिन सुचवीत होता. उलट, 'पक्षाच्या देखरेखीखालीं काम करणारा मनुष्यहि पक्षाचा सभासद होऊं शकेल' असें मार्टाव्ह यानें सुचविलें. यांपैकीं लेनिनची सूचना एकंदर ३६ सभासदांत दोन मतें अधिक (१९ मतें) पडून मंजूर झाली. पण बहुमताचा असा निर्णय लागल्यावरहि तंटा मिटला नाहीं. लेनिनच्या पक्षास यापुढें बहुमतवाला पक्ष, म्हणजे 'बोल्शेव्हिकी' व मार्टाव्हच्या पक्षास अल्पमतवाला पक्ष म्हणजे 'मेन्शेव्हिकी' असें नांव मिळालें. हे मतभेद पुढें निरंतर कायम राहिले. १९१७च्या ऑक्टोबरमध्यें लेनिनच्या नेतृत्वाखालीं बोल्शेव्हिक पक्षानें कामगारक्रांति केली म्हणून त्या क्रांतीस बोल्शेव्हिक क्रांति असें नांव मिळून त्यानंतर स्थापन झालेल्या रशियांतील राज्यासहि बोल्शेव्हिक राज्य असें संबोधण्यांत येतें.

पक्षाच्या ज्या पहिल्या नियमावर मतभेद झाला म्हणून वर सांगितलें त्याचा संदर्भ लेनिनच्या 'आपल्या कार्याची दिशा' या पत्रकांत 'पुढाऱ्यांच्या संघटनेंत फक्त धंदेवाईक क्रांतिकारकच असावे' असें जें तत्त्व सांगितलें आहे त्याच्याशीं आहे. भांडवलवाल्यांच्या पक्षांत लोकनियंत्रित राज्यपद्धतीबद्दल ज्यांचा आग्रह असेल त्यांना, 'ते जितपत क्रांतिकारक ठरतील व झारिस्ट सरकाराला जितपत तीव्र विरोध करतील' तितक्यापुरता, पाठिंबा देण्यास लेनिनची तयारी होती. पण कामगार चळवळ व त्यासाठीं निर्माण झालेली सोशल डेमोक्रॅटिक पक्षसंघटना ही भांडवलवाल्यांच्या चळवळीपासून अलग ठेवावी असें लेनिनचें म्हणणें असून त्याला प्लेखॅनॉव्हनें पाठिंबा दिला होता. मार्टाव्ह यास पक्षसंघटना अधिक व्यापक व सैल हवी असून पक्षाबद्दल निवळ सहानुभूति बाळगणाऱ्यांनाहि पक्षांत घ्यावें असें त्याचें मत होतें. त्याच्या सूचनेप्रमाणें सोशल डेमोक्रॅटिक पक्ष हा भांडवलवाल्यांना उत्तेजन देऊन त्यांना पुढें ढकलणारा पक्षच झाला असता. पॉट्रेसॉव्ह, एक्सलरॉड व ट्रॉट्स्की यांनीं मार्टाव्हला पाठिंबा दिला होता. काँग्रेसमधील चर्चेंत प्लेखॅनॉव्हनें लेनिनला उत्कृष्ट भाषणें करून पाठिंबा दिला. 'लोकशाहीचें तत्त्व' या विषयावरील त्याचें भाषण संस्मरणीय झालें. त्यांत तो म्हणाला, " क्रांति यशस्वी करणें हें आपलें प्रमुख ध्येय आहे. त्यासाठीं लोकशाहीच्या एखाददुसऱ्या तत्त्वाचा बळी द्यावा लागला तरी त्या वेळीं कच खाणें हा गुन्हा होईल." लेनिनच्या

धोरणावर मेन्शेव्हिकांनीं अकारण 'कठोर' धोरण अशी टीका केली व उलट प्लेखॅनॉव्हनें 'भांडवलवाल्यांच्या व्यक्तिवादाच्या खुळानें वेडावलेले बुद्धिवान' असें मेन्शेव्हिकांना संबोधिलें. ट्रॉट्स्कीचा आक्षेप असा होता, कीं शेकडों कामगारांची धरपकड चालू झाली असतां जर कोणाहि कामगारानें आपण सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा सभासद नाहीं असें सांगितलें, तर क्रांतीचा पुढारी या नात्यानें पक्षाचें जगांत निवळ हसें होईल. त्यावर लेनिन म्हणाला,

"कॉम्रेड ट्रॉट्स्की यांना 'आपल्या कार्याची दिशा' या माझ्या पत्रकाची मूळ भूमिकाच नीटशी समजली नाहीं. आपला पक्ष सर्व कामगारांच्या चळवळीची आघाडीची तुकडी आहे, तो त्यांचा पुढारी आहे. सर्व कामगार हे पक्षाच्या नेतृत्वाखालीं व देखरेखीखालीं आपला लढा चालवतील; पण पक्षाचे सभासद असणार नाहींत. .....शेंकडों, हजारों कामगार संपाचे वेळीं व असंतोष-निदर्शनांत पकडले गेले व त्यांनीं आपण सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे सभासद नाहीं हें सिद्ध केलें तर प्रत्येक अनुभवी क्रांतिकारकाला ही गोष्ट अभिनंदनीयच वाटली पाहिजे. कारण यामुळें आपली पक्षसंघटना चांगली असून मुख्य कटवाल्यांचें लहानसेंच मंडळ तयार करून त्याच्या द्वारा जास्तींत जास्त कामगारांना क्रांतिशास्त्र पढविणें व क्रांतिध्येय त्यांचे मनांत बिंबविणें हें आपलें कार्य आपणांस चांगलें समजलें आहे असा याचा अर्थ आहे." (रोझेनबर्गनें घेतलेला उतारा)

मार्टॉव्ह व ट्रॉट्स्की यांना चळवळ करणारे सगळे कामगार पक्षांत घ्यावयाचे होते. पण लेनिनला पक्ष ही एक केवळ गुप्त, आटोपशीर व चळवळयांना दिशा दाखवून नियंत्रण करणारी छोटी संघटना बनवावयाची होती. अशा संघटनेंत ढिले, दुर्बल व तत्त्वनिष्ठेचा गोंधळ असलेले लोक त्यास नको होते. बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांतील हे मतभेद न मिटतां तीव्र झाले, त्यांत व्यक्तिनिष्ठा व व्यक्तिद्वेष यांचीहि भर पडली व पुढील सर्व चळवळीवर या पक्षभेदाची कृष्णछाया पडत गेली. अर्थात् चळवळीचा जोर फारच वाढल्यामुळें तीस या पक्षभेदामुळें फारसा अपाय असा कांहीं घडला नाहीं व सामान्य कामगारवर्गाचे दृष्टीने पक्षांतील अंतःकलहास फारसें महत्त्वहि आलें नाहीं. कॉंग्रेसनंतर कांहीं दिवसांनीं एक्सलरॉड यांच्या वजनामुळें प्लेखॅनॉव्हचें मत बदलून तो लेनिनविरुद्ध मेन्शेव्हिकांना जाऊन मिळाला.

इस्क्राच्या संपादकवर्गांत लेनिनचें कांहींच चालेनासें झालें. तेव्हां लंडन काँग्रेसच्या ठरावांची कसोशीनें बजावणी करण्यासाठीं एक नवी मध्यवर्ती कमिटी स्थापून त्यानें आपलीं मतें प्रतिपादन करण्यासाठीं जिनिव्हा येथें १९०४च्या शेवटीं 'व्हीप्राइड' (आघाडी) नांवाचें बोल्शेव्हिक पत्र सुरू केलें.

१९०५ची क्रांति कशी फसली

१९०५च्या क्रांतीची हकीगत मागील प्रकरणीं विस्तारानें दिली आहे. ९ जानेवारीच्या गोळीबारानें क्रांतीस सुरवात झाली. सर्व देशभर शेतकऱ्यांत व कामगारांत क्रांतीची लाट पसरली. ऑक्टोबरमध्यें (१९०५) क्रांतीस इतका जोर चढला, कीं झारचें सरकार व क्रांतिकारक यांच्या सामर्थ्याचा ताजवा कांहीं वेळ समतोल झाला होता. १७ ऑक्टोबरला झारनें जाहीरनामा काढून ड्यूमा नांवाचें पार्लमेंटहि देऊं केलें. येथून पुढील सहा आठवडे क्रांति इतकी वरचढ झाली होती, कीं या कालास 'स्वातंत्र्यकाल' असें नांव मिळालें आहे. लेनिन येथपर्यंत जिनिवासच होता व तेथून आपल्या रशियांतील कार्यकर्त्यांस सल्लामसलत देत होता. नोव्हेंबरमध्यें तो गुप्तपणें रशियांत आला. पोलिसांस ओळख न देतां नांव व वेष बदलून त्यानें कामगारांपुढें अनेक व्याख्यानें दिलीं, क्रांतिकारकांत तो मिसळला व त्यांच्या पुढाऱ्यांशीं त्यानें दळणवळणहि ठेविलें. मॅक्झिम गोर्की या प्रसिद्ध लेखकाचें 'नोव्हायाझिन' (नवजीवन) हें दैनिक त्याला मतप्रसारासाठीं हातीं मिळालें. हें पत्र बोल्शेव्हिक मतास वाहिलेलें असल्यानें रशियांत लेनिनला आपलीं मतें या वेळीं पसरवितां आलीं. प्रत्यक्ष बंडाचा प्रसंग केव्हां तरी येईल हें जाणून बंडवाल्यांनीं रस्तोरस्तीं पोलिस व सैनिकांशीं चकमकी करून शहरें कशीं काबीज करावीं याचा पद्धतशीर अभ्यास त्यानें केला होता. त्याप्रमाणें सशस्त्र बंड उभारण्याचा सल्लाहि त्यानें दिला. लिऑन क्रेसिन यानें बंडासाठीं दारूगोळा जमविण्याचेंहि काम केलें. त्याप्रमाणें कामगारांनीं शस्त्रें हातीं घरून बंड केलेंहि. पण प्रत्यक्ष बंडाचा अनुभव असा कामगारांना पूर्वी मुळींच नसून पुढाऱ्यांना व अनुयायांनाहि बंड करून पाहण्याची ही पहिलीच वेळ होती. क्रांतीच्या पुढाऱ्यांत बोल्शेव्हिक, मेन्शेव्हिक, तसेंच सोशॉलिस्ट रेव्होल्यूशनरीहि होते. सोशॉलिस्ट रेव्होल्यूशनरी व सोशल डेमोक्रॅट यांच्या कार्यपद्धति प्रथम वेगळ्या असल्या-

मुळें क्रांतिकारक जनतेची संघटना फुटीर झाली होती. कांहीं भांडवल-वालेहि क्रांतिपक्षांत असल्यानें सनदशीरपणाचे मंत्रहि कामगारांच्या कानांवर पडून त्यांच्या बुद्धीचा भ्रम होई. गुलामगिरीच्या अंधारांतून क्रांतिकारक जनता पहिल्यानेंच स्वातंत्र्याच्या प्रकाशांत येऊं लागल्यामुळें तिचे डोळे दिपल्यासारखे झाले व आपल्यापुढील वाट तिला स्पष्ट दिसली नाहीं. बंड सुरू झालें तें सरकारला तयारी करावयास भरपूर वेळ मिळाल्यावर झालें. ज्या भांडवल-वाल्यांनीं संपांना प्रथम मदत केली त्यांनीं १७ ऑक्टोबरच्या सरकारी जाहिरनाम्यामुळें कच खाऊन झारची बाजू पकडली व संपवाल्यांचा पैशाचा आश्रय तुटला. मॉस्कोचे कामगार संपास सिद्ध होण्यापूर्वीच पीटर्सबर्ग सोव्हि-यट पकडलें गेलें व काळ्या समुद्रांतील आरमाराचें बंड मोडलें गेलें होतें. मॉस्कोच्या कामगारांनीं बंडाचें निशाण उभारलें त्या वेळीं आगगाडयांतील कामगारांना या बंडास मदत करावी असें वाटलें नाहीं. त्यांनीं पीटर्सबर्गहून मॉस्कोला आगगाडी चालबून सैन्य येऊं दिलें. इत्यादि अनेक कारणांमुळें शेवटीं बंडाचा मोड झाला.

पण या पराभवासहि इतिहासांत फार मोठें स्थान असून त्याचा अनुभव १९१७ सालीं उपयोगी पडला, असें लेनिन, ट्रॉट्स्की वगैरे प्रमुख पुढाऱ्यांचें म्हणणें आहे. व्यवहारांत वर्गयुद्ध लढतां लढतांच पराभवांनीं व विजयांनीं अभ्यास व अक्कल वाढवावयाचीं असतात असें मार्क्सिस्टांचें मत आहे. हे वर्गयुद्धाचे प्रसंग पुढाऱ्यांना अथवा कामगारांना हवे तेव्हां जमवून आणतां येत नाहींत. खुद्द १९०५च्या क्रांतीची गोष्ट अशी आहे, कीं ती १९०५ सालीं झाली नसती तर लेनिनला तें हवें होतें. 'माझ्या हातीं असतें तर मीं ही क्रांति निदान पुढील वसंत ऋतूपर्यंत थोपवून धरली असती; पण अशा बाबतींत आमच्या सल्ल्यानें गोष्टी घडणार नाहींत', असे उद्गार १९०५ च्या ऑक्टोबरमध्यें लेनिननें काढल्याचें त्याच्या बायकोनें 'लेनिनच्या आठवणीं'त नमूद केलें आहे.

१९०५नें क्रांतीचें हत्यार दिलें

१९०५च्या क्रांतींतील संस्मरणीय घटना म्हणजे 'सोव्हियट' संस्थेचा जन्म होय. संप जसजसे झपाट्यानें वाढूं लागले तसतशी त्यांचें नेतृत्व

स्वीकारून कामगारांना उत्तेजन देणारी खास कामगारांची संस्था नाहीं ही उणीव कामगारांना तीव्रतेनें भासूं लागली. म्हणून त्यांनीं ५०० कामगारांस एक प्रतिनिधि या प्रमाणांत एक 'कौन्सिल (सोव्हियट) ऑफ् वर्कर्स डेलिगेट्स्' स्थापन केलें. मोठ्या कारखान्यांनीं आपणांतील प्रतिनिधि निवडले व अगदीं लहान कारखान्यांनीं अनेक कारखान्यांचे मतदारसंघ बनवून प्रतिनिधींची निवड केली. सोव्हियट स्थापण्याची ही पद्धति इतरत्रहि पसरली. पहिल्या पीटर्सबर्ग सोव्हियटच्या जन्मासंबंधीं ट्रॉट्स्की लिहितो—

"सोशल डेमोक्रॅट पक्षाच्या गुप्त संघटनेंत शें-दोनशेंच कामगार होते व ज्यांवर त्यांचें प्रत्यक्ष वजन होतें अशा कामगारांची संख्या कांहीं थोडे हजारपर्यंत भरली असती. पण संपांत कामगारांना आपल्या शक्तीचा जो प्रत्यय येई त्याची जाणीव देऊन त्यांनीं कामगारांचे मनांत राजकीय जागृतीचा प्रकाश पाडला होता. तथापि एकंदरीनें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे सर्व कट रचण्याचें कार्य गुप्तपणें चालत असल्यानें त्यांचें प्रत्यक्ष असें कार्य जनतेसमोर येत नसे. यामुळें हजारों स्त्री-पुरुष कामगारांचा सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या जिवंत संघटनेशीं प्रत्यक्ष संबंध येऊं शकत नसे. सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाच्या इतर संघटनाहि अशाच गुप्त असल्यानें कामगारांशीं त्यांचा एकजीव नव्हता. शिवाय त्यांच्या कार्यक्रमांत ठाम निर्णय नसून एकंदरीनें दुर्बलताहि पुष्कळ होती. यामुळें ते दुर्बल झाले होते. सोशल डेमोक्रॅट पक्षांतील बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक गटांत तीव्र स्पर्धा असून सोशल डेमोक्रॅट पक्ष व सोशल रेव्हेल्यूशनरी पक्ष यांतहि स्पर्धा असल्यामुळें कामगार-संघटनेचे कामीं अनेक अडथळे येत. अशा परिस्थितींत कोणत्याहि पक्षसंघटनेशीं जिचा संबंध नाहीं अशी खास कामगारांची संघटना निर्माण होणें अपरिहार्यच झालें." (रोझेन्बर्गनें घेतलेला उतारा)

क्रांतिकार्याच्या बाबतींत कामगार किती अनभिज्ञ होते हें या १९०५च्या क्रांतींत स्पष्टपणें कळून आलें. ९ जानेवारीस पीटर्सबर्ग येथील कामगारांचें पुढारीपण घेतलेला तरुण भिक्षु जॉर्ज गेपॉन हा पोलिसचा हस्तक होता. पुढें पीटर्सबर्ग सोव्हियट स्थापन झालें त्या वेळीं नोसार क्रूस्टॅलेव्ह या एका राजकारणाशीं मुळींच संबंध नसणाऱ्या वकिलालाच कामगारांनीं या सोव्हियटचा पहिला अध्यक्ष केलें. क्रूस्टॅलेव्हच्या निवडणुकीसंबंधीं ट्रॉट्स्की सांगतो—

"व्यवहारांत तो मोठा धूर्त व तरतरीत होता; सभापति या नात्यानें तो हुशार व जोरदार असे; वक्ता मोठासा बुद्धिमान नव्हे, पण भावना खळबळून सोडी; राजकीय भूतकाळ असा त्याला कांहींच नव्हता; राजकारणाचा ढंगहि त्याजजवळ मुळींच नव्हता. जन्माला आला तो जणूं कांहीं १९०५ च्या अखेरीस सोव्हियटचा अध्यक्ष होण्यासाठींच आला होता. कामगार-वर्ग क्रांतिकारक होता व त्याला तीव्र वर्गभावना झाली होती हें खरें; पण त्यांतील बहुसंख्य कोणत्याहि एका राजकीय पक्षावर निष्ठा ठेवून राहणारे नव्हते. आणि क्रूस्टॅलेव्ह राजकीय पक्षनिष्ठेच्या दृष्टीनें असाच कोराकरकरीत होता. राजकीय भूतकाळ ज्यांना होता असे सगळे सोशॅलिस्ट पुढारी विशिष्ट व दृढ पक्षनिष्ठेनेंच वागणारे होते. अशा पुढाऱ्यांपैकीं कोणीहि सोव्हियटचा पहिला अध्यक्ष होण्यासाठीं उमेदवार राहिला असता तर सोव्हियटच्या स्थापनेपासूनच त्यांत भांडणें सुरू झालीं असतीं."

डिसेंबरमध्यें सोव्हियटचा अध्यक्ष या नात्यानें क्रूस्टॅलेव्ह पकडला गेल्यावर त्याचे जागीं तीन जणांची कमिटी नेमण्यांत आली. यांतील दोघेजण बिनराजकारणीच होते. तिसरा सभासद मात्र स्वतां ट्रॉट्स्कीच निवडला गेला. अशा प्रकारें क्रांति घडवून आणण्याचें उत्तम हत्यार म्हणजे सोव्हियट संघटना १९०५ च्या अनुभवांत जन्म पावली. १९१७ची क्रांति घडवून आणण्याचें मोठें श्रेय या सोव्हियट संघटनेस आहे.

या कामगार-सोव्हियटचें स्वरूप व कार्य नेमकें कोणतें? क्रांति यशस्वी होऊन झारशाही उलथून पडल्यास जें सरकार निर्माण व्हावयाचें तें हें, म्हणजे जी कामगारसत्ता निर्माण करावयाची तिचें हें पार्लमेंट अथवा कार्यकारी मंडळ, असें लेनिन मानीत नव्हता. लेनिनच्या मतें तें एक युद्धमंडळ होतें. पीटर्सबर्ग सोव्हियटमध्यें अराजक पंथी पुढाऱ्यांना घेण्याचें सोव्हियट कमिटीनें नाकारलें. त्याचें समर्थन करतांना लेनिननें असें म्हटलें आहे, कीं "हें सोव्हियट जर पार्लमेंट असतें अथवा सरकारचें कार्यकारी मंडळहि असतें तरी कांहीं लोकांचे प्रतिनिधि म्हणून यांना सोव्हियटमध्यें येऊं देणें योग्य होतें; पण जी संस्था राजकीय प्रगतीचा लढा चालविण्यासाठीं नेमली व राजकीय प्रगति ही बाबच ज्या अराजकांना नामंजूर आहे त्या अराजकांना त्या संस्थेंत

घेण्यानें संस्थेच्या कार्यांत विघ्नें येऊन तिची संघटनाच मोडेल." जी संस्था कोणत्याहि राजकीय पक्षाशीं संलग्न नसणाऱ्या कामगारांची असूं शकते अशी सोव्हियट संस्था टिकाऊ स्वरूपाची क्रांति घडवून आणण्यास निरंतर उपयोगी पडेल हें लेनिन यास, त्याच्या बोल्शेव्हिक मतानुसार, मंजूर असणें शक्यच नव्हतें. क्रांति यशस्वी झाल्यास घटनापरिषद् बोलावून तिच्या द्वाराच नवीन सरकार नेमावें हीच त्याची कल्पना होती. आणि रशियांतील सर्वच क्रांतिकारक पक्षांची हीच कल्पना होती. १९१७च्या क्रांतींत ही सोव्हियटद्वारा क्रांति घडवून आणण्याची कल्पना अतिशय उपयुक्त ठरली. इतकेंच नव्हे तर लोकनियुक्त घटनापरिषदेनें निर्मिलेल्या सरकारपेक्षां हें सोव्हियट सरकारच अधिक व्यवहार्य आहे असा अनुभव बोल्शेव्हिकांना इतिहासानें आणून दिला. तो कथाभाग यथावकाश पुढें येईलच.

बंड फसण्यासंबंधीं लेनिनची मीमांसा

१९०५चें बंड फसल्यावर तें कां फसलें याची चर्चा सुरू झाली. संप झाला तो अवेळीं झाला व कामगारांनीं शस्त्र धारण करावयास नको होतें असें मत प्लेखॅनोव्हनें एक पत्रक लिहून प्रसिद्ध केलें. प्लेखॅनोव्हचे सर्व मुद्दे खोडून काढून 'बंडापासून शिकावयाचा धडा' कोणता, याविषयीं लेनिन सांगतो, (१) कामगारांनीं शस्त्र धारण केलें, तें अधिक निश्चयानें, अधिक हिंमतीनें व अधिक चढाईनें धारण करावयास हवें होतें. पहिल्यापासूनच कामगारांना सांगावयास पाहिजे होतें, कीं शांततायुक्त संप हे एकटेच निरुपयोगी असतात. निर्भयपणें व निर्दयपणें सशस्त्र युद्धच करावें लागतें..... लोकांना हें स्पष्टपणें न सांगणें म्हणजे स्वतांची व लोकांची वंचना करणें आहे. (२) सैन्यच क्रांतिकारक बनविल्याशिवाय क्रांति होणें शक्य नाहीं, हें म्हणणेंहि खोटें आहे. सैन्यांत योग्य तो मतप्रचार करावाच; पण सैन्याशीं झगडा हा टळणार नाहीं. अर्थात् लढतां लढतां क्रांतीस अनकूल होऊं लागलेल्या सैनिकांना आपणाकडे ओढून घेण्याची शिकस्त केलीच पाहिजे. तसेंच मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांवर दया न दाखवतां त्यांचा निःपात केला पाहिजे. १९०५च्या क्रांतींत या दृष्टीनें चुका फार झाल्या. (३) सैनिक तोफा डागत असतां पिस्तुलें घेऊन त्यांच्या तोंडावर जाणें हा मूर्खपणा आहे. अशा वेळीं गमिनी

काढ्यानें लढलें पाहिजे. लढण्याचीं हत्यारें कोणतीं यावरून लढण्याची पद्धति कोणती हें ठरत असतें. (४) जिवाची तमा न धरतां लढण्यास लोकांनीं शिकलें पाहिजे. केवळ बचाव करून न राहतां अथवा प्रतिपक्षानें हल्ला करण्याची वाट न पाहतां चढाईचें धोरण आरंभापासून अखेरपर्यंत ठेविलें पाहिजे. (लेनिनच्या लेखाचा सारांश)

'तात्पुरत्या सरकार'च्या घटनेचा वाद

१९०५च्या सुमारास क्रांतीची लाट जोरानें जमत आहे असें स्पष्ट दिसूं लागलें होतें. झारिस्ट सरकारला क्रांतीच्या झंझावातांत उलथून पाडून घटनापरिषद बोलावून नवीन राज्यघटना निर्माण करावी हें मत सर्व क्रांतिकारकांस मान्य होतें. पण घटनापरिषद् बोलावून त्यांत लांचलुचपत, जुलूम व फसवणूक न होतां सार्वत्रिक व प्रौढ मताधिकार पद्धतीनें व गुप्त मतदानानें निवडणूक होऊन नवीन सरकार निर्माण करण्यासाठीं संक्रमण काळांतील तात्पुरतें सरकार बनविणें अवश्य होतें. तात्पुरत्या सरकारांत सोशल डेमोक्रॅट पक्षानें भाग घ्यावा कीं नाहीं याची चर्चा पक्षांतील सभासदांत चालून बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांत तीव्र मतभेद झाले. झारिस्ट सरकारचा पराभव या वेळीं होऊंच न शकल्यानें हा वादविवाद वायफळ वाटतो; पण सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचीं या वेळचीं धोरणें व मतभेद व पुढें १९१७ सालीं प्रत्यक्ष क्रांतीनंतर त्यांना आलेले अनुभव हें सर्व नीट समजण्यासाठीं या मतभेदाचें रहस्य समजणें अवश्य आहे.

बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक या दोघांना एक गोष्ट मान्य होती, कीं झारशाहीचा पाडाव जरी रशियांत त्या वेळीं झाला तरी तेथें एकदम जमीन व कारखाने राष्ट्रीय मालकीचे करून मजुरांची मुखत्यारी स्थापणें शक्य नाहीं. कारण कारखानी मजुरांची संख्या फार थोडी असून शेती मागसलेली होती. ज्या व्यवस्थेंत शेतकऱ्याच्या मालकीची जमीन राहणार नाहीं अशी समाजव्यवस्था मानण्यास शेतकरी मुळींच तयार होणें शक्य नव्हतें. झारशाहीचा पाडाव करण्यास सैन्याचें पाठबळ हवें. पण सैन्य सगळें शेतकऱ्यांतून आलेलें. तेव्हां शेतकऱ्यांस जमिनीचें आश्वासन दिल्यासच सैन्याचा क्रांतीस पाठिंबा मिळणार होता. सारांश झारिस्ट सरकारचा मोड झाल्यास त्या जागीं जें

सरकार येणार तें राष्ट्रीय लोकशाहीचें (नॅशनल डेमोक्रॅटिक) अथवा भांडवलदारी लोकशाहीचें (बुर्ज्वा डेमोक्रॅटिक) सरकार येणार ही गोष्ट सर्वमान्य होती. यांत धनोत्पादक साधनांचें राष्ट्रीकरण होणार नव्हतें. तेव्हां या प्रकारच्या सरकारांत जर सोशल डेमोक्रॅटिक पक्ष सामील झाला तर त्याची फजिती होईल असें मार्टिनोव्ह या मेन्शेव्हिक पुढाऱ्याचें म्हणणें होतें.

समजा, तो म्हणे, थोडेसे सोशल डेमोक्रॅटिक सभासद सरकारांत शिरले तर देशांतील धनोत्पादक साधनें खालसा होत नसल्यामुळें मजुरांची परिस्थिति फारशी सुधारणें शक्य नाहीं असें त्यांस आटळून येईल. पण कामगारांच्या दुःस्थितीची जबाबदारी मात्र त्यास, राज्यसंस्थेचें घटक या नात्यानें, पत्करणें भाग होतें. आणि कामगारांच्या दृष्टीनें लोकशाही राज्य व सोशल डेमोक्रॅटिक पक्ष हीं दोन्ही कामगारद्रोही ठरणार होतीं. असली ही अपेशी जबाबदारी घेण्यापेक्षां सरकारपासून बाजूस राहून व सरकारला विरोध करीत करीत कामगारांच्या हितसंबंधांचें रक्षण करावें अशी मार्टिनोव्हची व एकंदर मेन्शेव्हिकांची (ट्रॉट्स्कीखेरीज) विचारसरणी होती. लेनिनचें मत याविरुद्ध होतें. राष्ट्रीय लोकशाही सरकार स्थापलें, कीं भांडवलशाहीची पोलादी चौकट अढळपणें पत्करलीच पाहिजे असें त्यास वाटत नव्हतें. श्रमजीवी मजूरवर्ग व जमिनी आणि कारखाने यांवर मालकी हवी असणारे शेतकरी आणि भांडवलदार यांचे दरम्यान दरिद्री असे अनेक वर्ग असून ते भांडवलशाहीस विरोध करून कामगारांच्या कमींत कमी मागण्या ज्या असतील त्या मंजूर करून घेण्याइतकी सक्ति भांडवलदारवर्गावर सरकारच्या साह्यानें करतील असें लेनिनचें मत होतें. तो विचारतो—

"मार्टिनोव्हच्या डोक्यांतला सारा गोंधळ कशामुळें झाला? त्याचें कारण असें, कीं लोकसत्ताक क्रांति व समाजवादी क्रांति यांच्या स्वरूपांबद्दल त्याचा गैरसमज आहे. मजूर व मध्यमवर्ग यांचे दरम्यान असणारा कनिष्ठ मध्यमवर्ग आणि दरिद्री प्रांतांत व खेड्यांत पोट भरणारे मजूर हे एकवटून लोकमताचा केवढा जोर निर्माण करतात हे मार्टिनोव्ह विसरला आहे. जनतेचा कमींत कमी कार्यक्रम काय आहे, हेंहि यांना नीट समजलेलें नाहीं. .....जनतेच्या कमींत कमी कार्यक्रमांत प्रजासत्ताक राज्य, शस्त्रधारणाचा हक्क, सरकारी चर्च रद्द करणें, पूर्ण नागरिकस्वातंत्र्य देणें आणि मूलग्राही

मराठी ग्रं. क. ४८८

आर्थिक सुधारणा करणें वगैरे मागण्या आहेत. खालच्या वर्गाच्या मुखत्यारीची राज्यसंस्था स्थापल्याशिवाय भांडवलशाहीच्या आर्थिक घटनेतून या मागण्या हिसकून घेतां येणें शक्य आहे काय? सत्ता मजूरवर्गाची असणें अथवा भांडवलदार वर्गाची असणें यांत महदंतर आहे एवढें म्हटल्यानें भागत नाहीं. एकंदर कनिष्ठ वर्गाहि लोकसत्ताक क्रांतीस केवढी तरी मोठी उठावणी देत असतात."

पुन्हा दुसऱ्या ठिकाणीं लेनिन लिहितो,—

"क्रांतिकारक अशा भांडवलशाही लोकसत्तेंत, प्रजासत्ताक क्रांतींत, मोठ्या हिंमतीनें व निष्ठुरपणें कार्य करतांना आपण कोलमडून पडूं अशी भीति बाळगूं नका; संकटांचा उगीच बाऊ करूं नका; आपले संघटित कामगार त्या संकटांचा यथास्थित समाचार घेतील. कित्येक दशकांच्या स्मशानशांतेंत व मोहमय वातावरणांत न झालेली प्रगति कामगार व शेतकरी यांच्या मुखत्यारीच्या केवळ कांहीं महिन्यांतच होऊन जाईल." यामुळें भांडवलशाहीची आर्थिक घटना शेतकरी, कामकरी व गरीब मध्यम वर्ग यांच्या राजकीय सत्ताबलानें हळूहळू ढिली करून समाजवादी क्रांतीच्या दृष्टीनें पुष्कळच मजल मारतां येईल असें लेनिनचें मत होतें.

लेनिनच्या या मताची मार्टिनोव्ह 'जेरिझम्' म्हणून थट्टा करी. जेरिस् हा फ्रेंच सोशॅलिस्ट असें प्रतिपादीत होता, कीं सोशॅलिस्ट पक्षानें सरकारांत सामील होऊन फ्रेंच प्रजासत्ताकाचें रक्षण करावें; पण अमस्टरडॅम येथें भरलेल्या दुसऱ्या इंटरनॅशनलच्या एका काँग्रेसनें जेरिसची ही सूचना हाणून पाडली. या जेरिसचें अनुकरण लेनिन करीत आहे, असा मार्टिनोव्हचा लेनिनवर आरोप आहे. या आरोपास उत्तर देतांना लेनिन म्हणतो कीं, फ्रेंच प्रजासत्ताकाला जगण्यासाठीं सोशॅलिस्टांची मदतहि नको आणि फ्रेंच सोशॅलिस्टांना सरकारपासून दूर राहून आपली संघटना करणें शक्यहि आहे. पण रशियांत क्रांति झाल्यावर जें सरकार येईल तें, लेनिनच्या मतें, अगदीं सुरक्षित नाहीं. तो पुढें म्हणतो—

"ड्यूमा ऊर्फ पार्लमेंटचें खेळणें दाखवून जर झारशाहीला आपलीं संकटें निवारतां आलीं नाहींत आणि अखेरीस झारशाही जर उलथूनच पडली, तर मग एक गोष्ट उघड आहे, कीं जिंकून घेतलेल्या स्वातंत्र्याचें रक्षण सर्व प्रगतिपर पक्षांनीं सर्व क्रांतिकारक शक्ति एकवटून केलें पाहिजे. हें रक्षण करणें

म्हणजेच शेतकरी व कामकरी यांची मुखत्यारी स्थापणें होय. क्रांतीनंतर परत पीछेहाटीचा काळ येईल हें खरें. पण दरम्यान आपण जेवढें अधिक जिंकूं व जेवढें अधिक रक्षण करूं तितकें पीछेहाटीच्या काळांत आपलें नुकसान कमी होईल. पीछेहाटीचा काळ लहान होईल आणि मागून येणाऱ्या कामगार लढवय्यांचें काम हलकें होईल. ...आम्हां क्रांतिकारकांची म्हणजे शेतकरी-कामकऱ्यांची अनियंत्रित झारशाही उलथून पाडण्याची जर खरी-खुरी इच्छा असेल, तर आपण ती मुळासकट व कायमची उलथून पाडली पाहिजे, तिला कायमची ठार केली पाहिजे व तिचा पुनरुद्धार करण्याचे प्रयत्न होतील ते होऊं देतां कामा नये. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं आम्ही 'प्रजासत्ताक राज्य' असा शब्द उच्चारतों तेव्हां राज्यघटनेचा अमुक एक आराखडा आमच्या डोळ्यांपुढें नसतो, तर जनतेच्या ज्या कमींत कमी आर्थिक व राजकीय मागण्या त्यांची प्रत्यक्ष प्राप्ति हा 'प्रजासत्ताक' शब्दाचा अर्थ आम्हांस अभिप्रेत असतो."

जमिनी या धर्माधिकारी वर्ग व जमिनदार यांचे हातून काढून शेतकऱ्यांना वाटाव्या असें लेनिनचें म्हणणें होतें; पण ही जमिनींची वाटणी होण्यासाठीं तो क्रांति झाल्यानंतर नवीन राज्यघटना येईपर्यंत शेतकऱ्यांनीं वाट पाहावी असें म्हणत नव्हता. तर शेतकऱ्यांनीं क्रांति चालूं असतांच ज्या जमिनींचे कबजे घेतले असतील त्यांची वाटणी त्यांनीं ताबडतोब शेतकरी कमिट्या नेमून करावी असें त्याचें म्हणणें होतें. संक्रमणकाळांतील सरकार कसें असेल तें सांगतांना लेनिन लिहितो—

"झारिस्ट सरकार जर उलथून पडलें तर त्या जागीं दुसरें सरकार स्थापावेंच लागेल. हें सरकार संक्रमणकाळांतील तात्पुरतें सरकार असेल. त्याला समाजांतील फक्त क्रांतिकारक वर्गांतूनच म्हणजे शेतकरी-कामकऱ्यांतूनच पाठिंबा मिळूं शकेल. हें सरकार मुखत्यारीच्या स्वरूपाचेंच असेल. म्हणजे सुव्यवस्था हें त्याचें प्रयोजन नसून लढा हें प्रयोजन असेल. एकादा किल्ला हस्तगत करण्यासाठीं तुम्हीं जर युद्ध केलें तर तो किल्ला घेतल्यावर त्याचें रक्षण करण्याचें तुम्हांला टाळतां येणार नाहीं. एक तर किल्ला जिंकल्यावर तो राखण्याच्या इच्छेनेंच तो घेतला पाहिजे. अगर तो जिंकण्याचा प्रयत्नच न करतां त्याच्याशेजारीं मला फक्त ओसरीभर जागा द्या म्हणजे पुरें अशी भीक मागितली पाहिजे."

ज्या राज्यव्यवस्थेंत भांडवलशाही शिल्लक आहे अशा राज्यव्यवस्थेंत भाग घेऊन सोशल डेमोक्रॅटिक पक्ष भांडवलशाहीस आशीर्वाद देत नाहीं काय? असा आक्षेप मार्टिनोव्हनें घेतला होता. या आक्षेपासंबंधीं लेनिन लिहितो—

"तात्पुरत्या सरकारांत भांडवलवाल्या लोकसत्तेसमवेत भाग घेणें म्हणजे भांडवलशाही समाजव्यवस्था, तुरुंग व पोलिस, बेकारी व दारिद्र्य, खाजगी मालमत्ता व वेश्यागृहें या सर्वांस आशीर्वाद देणें नव्हे काय? असे हे लोक रडून रडून विचारतात. .....मिळणारें स्वातंत्र्य 'भांडवलशाही लोकसत्ताक' जातीचें स्वातंत्र्य असलें तरी स्वातंत्र्याकरितां झगडणारा सोशल डेमोक्रॅट त्या स्वातंत्र्याचा अव्हेर करणार नाहीं. .....सोशल डेमोक्रॅटिक पक्ष प्रजासत्तात्मक भांडवलशाहीस आशीर्वाद देतो तो राजसत्तात्मक व अनियंत्रित अशा राज्यापेक्षां ती अधिक बरी या भावनेनें देतो; तसेंच वर्गलढ्याचें हें शेवटचें स्वरूप आहे, कामकऱ्यांना भांडवलशाहीविरुद्ध झगडण्यास हें उत्कृष्ट क्षेत्र आहे म्हणूनहि देतो. हा आशीर्वाद भांडवलवाल्यांच्या तुरुंगांना, खाजगी मिळकतीला अथवा वेश्याबाजीला नसून या संस्थांविरुद्ध अखेरचा व अप्रतिहत झगडा चालविण्यासाठीं मिळणाऱ्या संधीस असतो.

संक्रमणकाळच्या सरकारांत भाग घेण्यांत मुळींच धोका नाहीं असें लेनिन मानीत नाहीं. तो लिहितो,—

"अर्थात् 'तात्पुरत्या सरकारां'त भाग घेण्यापासून सोशल डेमोक्रॅटिक पक्षास मुळींच धोका नाहीं असें आम्ही समजत नाहीं. असा कोणताहि झगडा अथवा अशी राजकीय परिस्थिति नसेल, कीं जींत धोका असणार नाहीं. उदाहरणार्थ क्रांतिकारक वर्गभावना नसेल, ज्याच्या त्याच्या विद्वत्तेच्या मानानें प्रत्येकास सर्वांगीण तात्त्विक दृष्टि नसेल, आणि स्पष्टच बोलतों कीं असल्या या सरकारच्या डोक्यावरहि एकादा क्रांतिकारक 'झार' नसेल, तर क्रांतीचा अधःपात होऊन ती निवळ आर्थिक लढ्यावर जाईल व पार्लमेंटरी आचरटपणा तेथें सुरू होईल."

ट्रॉट्स्कीची विचारसरणी

बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांमधील हा राज्यघटनाविषयक मतभेद समजून घेतांना ट्रॉट्स्की हा मेन्शेव्हिकांतला असून सुद्धां त्याला मेन्शेव्हिकांचें

व.बोल्शेव्हिकांचें अशीं दोन्ही मतें अमान्य होतीं व त्याचा एक तृतीयच पंथ होता हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत ट्रॉट्स्की हा तरुण, विद्वान, तरतरीत, धडाडीचा व कर्तबगार पुढारी होता. १९०५च्या क्रांतींत व त्याहूनहि अधिक म्हणजे १९१७च्या क्रांतींत त्यानें फार महत्त्वाची कामगिरी केली आणि त्याचीं इतरांना १९०५ सालीं न पटलेलीं मतें १९१७ सालीं त्याच्या सहकाऱ्यांना पुष्कळ अंशांनीं मान्य करावीं लागलीं. या दृष्टीनें पाहतां ट्रॉट्स्कीची विचारसरणी १९०५ सालीं काय होती हें समजून घेणें अवश्य आहे. लंडन काँग्रेसमध्यें १९०३ सालीं जेव्हां सोशल डेमोक्रॅट पक्षांत फूट झाली तेव्हां ट्रॉट्स्की मेन्शेव्हिक पक्षांत सामील झाला हें खरें. व एवढ्याच एका प्रसंगाचा गैरफायदा घेऊन त्याच्या प्रतिपक्षांनीं ट्रॉट्स्कीची 'मेन्शेव्हिक' 'मेन्शेव्हिक' म्हणून निंदा केली आहे. पण मेन्शेव्हिकांशीं त्याचें मतैक्य कां झालें व त्याची स्वतांची भूमिका नेमकी कोणती होती हें समजल्याविना राशियन क्रांतीचें रहस्य उकलणार नाहीं इतकें मोठें कार्य या क्रांतींत त्यानें स्वतां केलें असून त्याच्या विशिष्ट मतांनींहि केलें आहे.

लंडन काँग्रेसमध्यें लेनिनला धंदेवाईक क्रांतिकारकांपुरताच सोशल डेमोक्रॅटिक पक्ष ठेवायचा होता; तर मार्टाव्ह, ट्रॉट्स्की यांना पक्षाचें स्वरूप व्यापक ठेवून पक्षसंघटनेंत नसलेल्या पण त्या पक्षाचे देखरेखीखालीं काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांचा त्यांत समावेश करून घ्यावयाचा होता. पण मार्टाव्ह व ट्रॉट्स्की यांचें एकमत निरनिराळ्या कारणांनीं झालें होतें. मार्टाव्हचा कल कामगार चळवळींतून तेजस्वी क्रांति निर्माण करण्यापेक्षां इंग्लंड-फ्रान्सप्रमाणें व्यापक प्रमाणावर कामगारसंघचळवळीचें कार्य चालवावें इकडे असे. उलट ट्रॉट्स्कीला कामगारांना पक्षसंघटनेंत मोठ्या प्रमाणावर सामील करून घेऊन खुद्द त्यांनाच क्रांतीचें शिक्षण द्यावयाचें होतें व त्यांच्या हातूनच क्रांति घडवून आणावयाची होती. १९०५च्या क्रांतींत पीटर्सबर्ग सोव्हियट निर्माण करण्यांत त्यानें प्रामुख्यानें भाग घेतला असून त्याच्या अध्यक्ष-मंडळांताहि तो निवडून आला होता हें मागें सांगितलेंच आहे. रशियन समाजांत कारखानदारी कामगारवर्ग हाच काय तो एक क्रांतिकारक वर्ग आहे असें त्याचें मत असून या बाबतींत त्याचा मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक या उभयपक्षांशींही मतभेद होता. क्रांतीनंतरच्या तात्पुरत्या राज्यसंस्थेसंबंधीं बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक

यांच्याशीं आपला मतभेद व्यक्त करतांना ट्रॉट्स्की १९०९ सालीं लिहितो,—

"एकंदर रशियन क्रांतीसंबंधीं आपलें धोरण कोणतें हें मेन्शेव्हिकांनीं कधींच स्पष्टपणें आंखलेलें नाहीं. बोल्शेव्हिकांप्रमाणें राज्यक्रांतीची तड पोंचवावी असें हेहि म्हणतात. असें म्हणण्यांत दोघांचाहि अभिप्राय असा असतो, कीं जनतेच्या कर्मीत कमी मागण्यांचा कार्यक्रम पूर्ण करून घ्यावा, नंतर लोकशाही-प्रधान समाजघटना स्थापून भांडवलवाल्यांकडून पिळणूक चालू ठेवणारा एक कालखंड जावा लागेल. वास्तविक राज्यक्रांति तडीस लावणें म्हणजे झारिस्ट सरकारचा शेवट करून क्रांतिकारक वर्गानें दंडशक्ति धारण करणें. हा क्रांतिकारक वर्ग कोणता ? मेन्शेव्हिक म्हणतात 'मध्यम वर्ग'. बोल्शेव्हिक म्हणतात 'कामकरी व शेतकरी'. पण मेन्शेविक म्हणतात तो 'मध्यम वर्ग' कोणता ? असा शक्तिमान, व्यक्त व स्पष्ट वर्ग अस्तित्वांतच नाहीं. खरोखर इतिहासाला हा प्रकार माहीतच नाहीं. वर्तमानपत्रकारांनीं केवळ अनुमानानें तो तर्किलेला आहे." (रोझेन्बर्गनें घेतलेला उतारा)

मेन्शेव्हिकांच्या मताप्रमाणें क्रांति झाल्यावर लोंबकळत राहावें लागून कांहींहि पदरांत पाडून घेतां येणार नव्हतें. उलट कामगारांनीं क्रांतीनंतर सत्ता काबीज केल्यावरहि केवळ भांडवलशाहीला शोभतील एवढ्याच सुधारणा लेनिनच्या मताप्रमाणें घ्याव्या हा अकारण संन्यास ट्रॉट्स्कीच्या मतें विचित्रच होता. शिवाय क्रांतीनंतर राज्यसत्ता धारण करतांच थोड्याच काळांत लेनिनला आपलें ध्येय अशक्य कोटींतलें म्हणून सोडावें लागेल असेंहि ट्रॉट्स्की म्हणतो. कामगारांचा विजय झाला कीं संप होतील, कारखान-दार कारखान्यांना कुलुपें ठोकतील. राज्यक्रांति झाली तरी भांडवलवाल्यांच्या दौलतीस धोका नसल्यानें ते कामगारांस बेकार करून टाकतील. आणि मग अशा वेळीं राज्यक्रांतींत यशस्वी झालेले कामगार हात जोडून स्वस्थ बसतील कीं जबरदस्तीनें कुलुपें तोडून कारखाने कबजांत घेतील ? असें ट्रॉट्स्की लेनिन-ला विचारतो. तसेंच सोशल डेमोक्रॅटिक सरकारांतून हळूहळू सोशॅलिझम निर्माण करूं असें लेनिन म्हणत असेल, तर तेंहि ट्रॉट्स्कीच्या मतें व्यर्थ होतें. कारण ज्या सरकारांत शेतकरी व कामकरी हे दोघेहि घटक असणार तेथें जमिनी राष्ट्रीय मालकीच्या करण्याची वेळ आली, कीं कामकरी व शेत-करी हे एकमेकांच्या प्राणांवर उठल्यावांचून राहणार नाहींत. मग एक

'शेतकरी व प्रतिक्रांति' अथवा 'कामकरी व सोशॅलिझम' यांपैकीं एकाचा विजय व दुसऱ्याचा पाडाव होऊनच हा तंटा मिटेल. मग खाजगी मिळकतीसाठीं हपापलेल्या अशा शेतकरी वर्गास राज्यसंस्थेंत सामील करून घ्यावें तरी कशाला? असा ट्रॉट्स्कीचा सवाल होता, व नुसत्या कामगारांचीच मुखत्यारी स्थापावी असें त्याचें मत होतें. रशियासारख्या देशांत नुसत्या कामगारांचें राज्य फार काळ टिकणें शक्य नाहीं हें तो जाणून होता. पण यावर रशियांत क्रांति होतांच पाश्चिम युरोपांतहि तशाच स्वरूपाची क्रांति घडवून आणावी म्हणजे अनेक देशांत कामगारशाह्या स्थापन झाल्यास त्या सर्व परस्परसहकार्यानें टिकूं शकतील व त्यापासून पुढें आंतरराष्ट्रीय समाजवादाचें सुखस्वप्न जगांत प्रत्यक्ष रूपांत अवतरेल असें त्याचें मत त्यानें १९०९ सालीं लिहून ठेविलें आहे. एकामागून एक देशांत क्रांति करीत राहून सर्व जगांत कामगारशाही व त्यांतून सोशॅलिझम निर्माण झाल्यावांचून क्रांतिकार्यास विसांवा नाहीं असें त्याचें मत असून त्यालाच 'सतत क्रांतीचा सिद्धांत' (थिअरी ऑफ् पर्मनंट रेव्होल्यूशन) असें नांव प्राप्त झालें आहे.

रशियांत कामगारक्रांति व कामगारमुखत्यारी असलेली राज्यघटना यासंबंधीं ट्रॉट्स्कीनें आपलीं मतें १९०५ सालीं 'मतितात्पर्य व दृष्टिकोन' (समरीज़ अॅन्ड पर्स्पेक्टिव्हस्) या लेखांत ठाशीवपणें मांडलीं आहेत. त्याच्या मतें हे विचार त्यानें पुढें कधींच बदलले नाहींत. या मतांना ऐतिहासिक महत्त्व फार मोठें असल्यानें त्या लेखांतील कांहीं उतारे (कांहीं भाग सारांशरूपानें) येथें देतों.

"भांडवलशाही जशी वाढेल त्याच प्रमाणांत कामगारांची संख्या व सामर्थ्य वाढत असतें. या अर्थानें भांडवलशाहीची वाढ म्हणजे कामगारांची राजकीय मुखत्यारीकडे प्रगतिच होय. पण ज्या दिवशीं आणि ज्या घटकेला कामगारांचे हातीं राज्यसत्ता जाईल तो दिवस व ती घटका भांडवलशाहीची उत्पादनशक्ति किती वाढली आहे यावर अवलंबून नसतात. तर वर्गलढ्यांतील उभयवर्गांचें परस्पर बलप्रमाण, आंतरराष्ट्रीय परिस्थिति, आणि शेवटीं माणसांच्या परंपरागत संवयी व रूढि, कर्तृत्व (इनिशिएटिव्ह) आणि लढ्याची तयारी वगैरेंवरून कामगारांचा सत्तासंपादनाचा दिवस, व घटका निर्णीत होते. भांडवलशाहीची वाढ झालेली आहे अशा राष्ट्रांचे आधीं आर्थिक उत्पादना-

च्या दृष्टीनें मागसलेल्या राष्ट्रांत कामगारांचे हातीं राज्यसत्ता येईल. ...यांत्रिक उत्पादनाची व त्याच्या साधनांची अमुक इतकी वाढ होण्यावर आपोआपच्या कामगारांची मुखत्यारी अवलंबून असते ही कल्पना 'आर्थिक वास्तववादाच्या' अति स्थूल कल्पनेवरून बनविलेला एक गैरसमज आहे. मार्क्सवादाशीं याचा कोठेंच संबंध नाहीं; आमच्या मतें रशियन क्रांति अशी परिस्थिति निर्माण करूं शकेल, कीं त्या वेळीं कामगारांकडे राज्यसत्ता जाणें अशक्य नाहीं; (आणि क्रांति यशस्वी होतांच ती खात्रीनें जाईल:) भांडवलवाल्या मुत्सद्द्यांना राज्यसत्ता धारण करण्यास पुरेल इतकी अक्कल वाढविण्यास फुरसतच मिळणार नाहीं."

"क्रांतीचा निर्णायक स्वरूपाचा विजय झाल्यास, क्रांतीच्या लढ्यांत ज्या पक्षानें पुढारीपण केलें असेल त्याकडे म्हणजे कामगारांचे हातीं राज्यसत्ता जाईल. येथें आम्ही स्पष्ट सांगून ठेवतों कीं, कामगारेतर क्रांतिकारक वर्गांचे प्रतिनिधि कामगार-सरकारांत घेण्यास कोणताहि प्रत्यवाय नाहीं. पण प्रश्न सगळा असतो तो हा, कीं सरकारी धोरणाची मुख्य दिशा ठरवितो कोण? एकजीव असें बहुमत कोणत्या वर्गाचें असतें? ...क्रांतीचा पाया अधिकाधिक रुंद केल्यावांचून कामगारांना आपलें राज्य फार काळ टिकवितां येणार नाहीं. श्रमजीवी वर्गांचे कित्येक थर, मुख्यतः खेड्यांतील थर, यांना आधीं क्रांतिकार्यांत खेचावें लागतें व त्यांच्या हातीं राजकीय संघटनेचीं कांहीं सूत्रें द्यावीं लागतात. पण ही गोष्ट क्रांतीचे मुख्य पुढारी जे शहरांतील कामगार, त्यांचें हातीं राजसत्ता आली म्हणजेच होत असते. ...कामगारसत्तेंत पुष्कळ काळपर्यंत लोकशाही निर्माण करतां येणार नाहीं ...कामगारसत्ता हीच आपली गुलामागिरी नष्ट करणारी आहे असें शेतकऱ्यांस दिसून येईल. ...शेतकरीच गर्दी करून कामगारास पदच्युत करतील व राज्यसत्ता धारण करतील हें अशक्य आहे. इतिहासांत शेतकऱ्यांनीं क्रांतीचें पुढारीपण केलेलें कधींच आढळत नाहीं. ...रशियन भांडवलवाल्यांना सर्व सत्ता कामगारांस अर्पण करावीच लागेल आणि कामगारसत्तेस चिकटून राहणें एवढेंच शेतकऱ्यांना करतां येईल. पण भांडवलवाल्यांनीं जशी त्यांची निवळ फसवणूक व लूट केली तशी कामगारसत्तेंत न होतां शेतकऱ्यांचा सांस्कृतिक दर्जा, व राजकीय अहंकार यांची वाढ होईल.....

"अनियंत्रित झारशाही व सरंजामशाही यांच्याशीं झगडण्यांत सगळ्या जनतेचा पुढारी या नात्यानें कामगारवर्ग राज्यसत्ता धारण करील. पण एकदां कामगारसत्ता स्थापन झाल्यावर हें पुढारीपण कामगारवर्ग संभाळीलच असें सांगतां येणार नाहीं. ...सरंजामदारांना दडपून शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट करतांना शेतकऱ्यांचा पाठिंबा कामगारसत्तेस मिळेल. पण शेती मजुरांना मालक शेतकऱ्यांच्या पिळणुकींतून सोडविण्याची वेळ आली, कीं श्रीमान शेतकऱ्यांशीं निकरानें झगडण्याचा कामगारसत्तेस प्रसंग उत्पन्न होईल... कामगारांनीं राज्यसत्ता धारण केली कीं कमींत कमी कार्यक्रम, जास्तींत जास्त कार्यक्रम असा कांहींहि फरक त्यांना ठेवतां येणार नाहीं. कामगार व कामगार-विरोधीवर्ग यांच्या परस्परबलप्रमाणानें कामगारांच्या कार्यक्रमास आवश्यकतया पडेल ती त्याची मर्यादा... आपली सत्ता कायम व मजबूत करण्यासाठीं कामगारवर्ग झगडेल. या झगड्यांत मतप्रसार व संघटना या अस्त्राप्रमाणें वाढतें सामुदायिक उत्पादन या अस्त्राचाहि उपयोग कामगारवर्ग करील... चालू कालखंडांत युरोपांत सोशॅलिस्ट क्रांति होणार नाहीं, व रशियांत इतक्यांत कामगारसत्ता होईल हें बोलणें भरमसाट आहे असें कांहीं लोक म्हणतात. पण खरा प्रश्न (आंतरराष्ट्रीय) सोशॅलिस्ट क्रांतीचा तिथिनिश्चय करणें हा नसून ऐतिहासिक क्रमांत त्या क्रांतीस निश्चित स्थान देणें हा आहे ...एक-एकट्या राज्यसंस्थेच्या तटबंदींत समाजवादी उत्पादन सुरू करणें राजकीय व आर्थिक अशा उभयकारणांमुळें शक्य होत नाहीं.

"१८व्या शतकाचे अखेरीस भांडवलदारांची राज्यसत्ता स्थापणें हें, भांडवलदारी उत्पादन निर्माण करण्याचें ध्येय असलेल्या क्रांतीच्या चौकटींत शक्य झालें. विसाव्या शतकाचे आरंभीच्या म्हणजे सध्यांच्या क्रांतीचें नजीकचें कार्य भांडवलदारी स्वरूपाचें असलें तरी कामगारसत्ता स्थापणें अपरिहार्य होईल असें वाटतें."

ट्रॉट्स्कीचा हा लेख ऑक्टोबर (१९१७) क्रांतीची अधिकृत तात्त्विक भूमिका म्हणून कम्युनिस्ट इंटरनॅशनलनें विदेशी भाषांतून प्रसिद्ध केला होता एवढें येथें नमूद करून ठेवतों.

प्रकरण ४ थें

क्रांतीची पीछेहाट (१९०६-१९१०)

१९०५अखेर बंडाचा मोड झाल्यानंतर पुढील चार वर्षें भयंकर दडपशाही करून झारशाहीनें क्रांतीचें बीज भाजून काढण्यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न केले. सरकारी धोरणास पाठिंबा देण्यासाठीं मोठमोठे सरदार, जमिनदार, धर्माधिकारी, पोलीस, व्यापारी, धनिक शेतकरी, आणि मजूरवर्गांतीलहि आशाळभूत लोक अशांची एक 'अखिल रशियन लोकसंघ' (यूनिअन् ऑफ् दि रशियन पीपल्) नांवाची संस्था पुरिश्केविच व मार्कोव्ह या डयूमांतील दोन प्रतिनिधींच्या नेतृत्वाखालीं स्थापण्यांत आली. सर्व रशियन लोक एक आहेत व ते झारशीं पूर्णपणें राजनिष्ठ आहेत, या मताचा रशियांत प्रसार करणें व असंतोष दडपण्यास सरकारला साह्य करणें हें या संस्थेचें उद्दिष्ट होतें. संघांत गरीब मजूर व शेतकरी वर्गांतील जे लोक असत त्यांचा उपयोग ज्यूंचा छळ करण्यास, त्यांच्या कत्तली करण्यास अथवा कामगारांच्या सभांतून व क्रांतिकारक निदर्शनांतून बखेडा व मारामारी उत्पन्न करून पोलिसांना दंडुकेशाहीनें सभा व निदर्शनें मोडण्यासाठीं संधि मिळवून देण्यास केला जाई. पोलिस व कोझॅक घोडेस्वार, दंडुके, चाबूक, तरवारी व बंदुका यांचा मनमुराद उपयोग करून क्रांतिकारकांचीं निदर्शनें उधळून लावीत. हजारों कामगार, शेतकरी व सुशिक्षित पुढारी यांनीं सर्व तुरुंग भरून गेले. खटले होऊन कित्येकांना आजन्म कैदखाना अथवा दूर सैबेरियांत हद्दपारीच्या शिक्षा झाल्या. १९०७-१९०९ या काळांत ५००० वर माणसांना न्यायासनासमोर मृत्यूची शिक्षा देऊन ठार मारण्यांत आलें. जमाव मोडण्यासाठीं गोळीबार करून, गुप्त छापे घालून, खटले होण्यांत फार वेळ जातो म्हणून व खाजगी सूडबुद्धीनें पोलिसानें व लष्करानें आणखी किती माणसें मारलीं, त्याचा अर्थात् हिशेब नमूद नाहीं. ठार मारलेल्यांपैकीं सुमारें ४००० लोक शेतकरी, कामकरी व कारागीर वर्गांपैकीं होते.

स्टोलिपिननें केलेली सुधारणा

१९०६ सालीं मुख्य प्रधानाचे जागीं स्टोलिपिन याची नेमणूक झाली व त्यानेंच हें दडपशाहीचें काम मोठ्या क्रूरपणें पार पाडलें. पण नुसत्या दडपशाहीनें क्रांतीचा बीमोड होणार नाहीं हें समजण्याइतका स्टोलिपिनहि शहाणा होता. पूर्वी प्रांतिक गव्हर्नरींचीं कामें करीत असतां, लक्षावधि शेतकऱ्यांना मालकीची जमीन नसून त्यांची कशी अन्नान्नदशा आहे हें त्यानें पाहिलें होतें. शेतकऱ्यांच्या दंग्यांचें खरें कारण हें होतें. शेतकऱ्यांत असंतोष माजला नसता तर कामगार वर्गाच्या संपांस व बंडांस इतकें उग्र स्वरूप येणें शक्य नव्हतें हें स्टोलिपिनच्या लक्षांत आलें. १८६१ सालीं शेतकऱ्याची गुलामगिरी नष्ट करून कुत्र्यामांजरांसारखी त्यांची देवघेव होणें बंद झालें. कायदेशीर दृष्ट्या तो जमिनदाराच्या मालकींतून सुटला. पण मालकीची जमीन न मिळाल्यामुळें पुनः कूळ या नात्यानें जमिनदाराची गुलामगिरी त्याचे नशिबीं आलीच. जमिनदाराचा खंड व सरकारी कर या जात्याच्या दोन तळींत शेतकऱ्याचा बुकणा उडाला. तसेंच ग्रामसंस्थेचा जुलूम कायमच राहिला. कूळ या नात्यानें कां होईना अमुक जमीन माझी असें म्हणून शेतकऱ्यास जमिनीला हात लावता येत नसे. यामुळें जमिनीची मशागत ममत्वाच्या भावनेनें होत नसे आणि यामुळें पीक कमी येई. म्हणून जास्तींत जास्त शेतकऱ्यांना शेतीवर खपण्यासाठीं खेड्यांत ग्रामसंस्था डांबून ठेवी. यामुळें व्यक्तिश शेतकऱ्याला चालू समाजव्यवस्थेबद्दल व राज्यव्यवस्थेबद्दल ममत्व न राहून तो क्रांतिकारक उठावणीस प्रवृत्त होई. या शेतकऱ्यांना मालकीच्या जमिनी जर झारशाहीनें दिल्या तर ते झारशाहीच्या रक्षणार्थ उभे राहूं लागतील व क्रांतीचा जोर कायमचा कमी होईल हें ताडून स्टोलिपिननें शेतकऱ्यांना जमिनी देण्याची योजना बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अमलांत आणली. प्रथम राजघराण्याच्या मालकीच्या जमिनी २० टक्के कमी किंमतीनें शेतकऱ्यांना देण्यासाठीं १९०६ च्या ऑगस्टमध्यें सरकारी हुकूम काढून बँकांच्या हवालीं करण्यांत आल्या. यांत कांहीं जमिनदारांनीं आपल्या जमिनींची भर घातली व सुमारें ३३ लक्ष हेक्टेअर (१ हेक्टेअर म्हणजे सुमारें अडीच एकर) जमीन

शेतकऱ्यांना विकण्यांत आली. जमिनदार व धर्माधिकारी वर्गांनाहि या वेळीं जमीन विकण्याची स्फूर्ति आली. गेलीं आठदहा वर्षें शेतकऱ्यांचे दंगे न्लहान-मोठ्या प्रमाणांत सर्व देशभर चालून उपरी शेतकरी जमिनीची मशागत करीत नाहीं आणि जमीन पडून राहिल्यामुळें सर्वस्वीं नुकसान होतें ही गोष्ट जमिनदार व धर्माधिकारी वर्गांचे ध्यानांत आल्यामुळें त्यांनीं जमिनी शेतकऱ्यांना विकून नगदी संपत्ति जवळ ठेवावी हेंच शहाणपण आहे असें ठरविलें. यामुळें एका १९०६ सालींच सुमारें ८३ लक्ष हेक्टेअर जमीन बाजारांत विक्रीस आली. कफल्लक शेतकऱ्यांना एवढी जमीन खरेदी करणें अशक्यच होतें. १९०६ ते १९१० एवढ्या दीर्घ कालांत शेतकऱ्यांना फक्त ७२ लक्ष हेक्टेअरच खरेदी करतां आली. जमिनी लवकर विकल्या जात नसत; तरीहि जमिनदार व धर्माधिकारी त्यांच्या किंमती उतरवीत नसत. म्हणून बँकेचा वार्षिक हप्ता शेतकऱ्यास खंडापेक्षां पुष्कळच जास्त बसूं लागला. यामुळें साधारण सधन अशाच शेतकऱ्यांना आणखी आणखी जमिनी घेतां आल्या व दरिद्री शेतकऱ्यांना कांहींच मिळूं शकलें नाहीं. याचबरोबर ग्रामसंस्थेच्या अखत्यारींतील जमिनीहि हिस्सेरशीनें कायद्याच्या आधारावर मालकीच्या करण्याचा अधिकार शेतकरी कुटुंबांना मिळाला. यामुळें ग्रामसंस्था बहुतेक नष्ट होऊन मालक व उपरी शेतकरी पूर्णपणें स्वतंत्र झाले व ज्यांना खेड्यांत जमिनीवर पोषण होणें शक्य होईना त्यांनीं शहरांतील कारखान्यांकडे धाव घेतली. यामुळें वाढत्या कारखानदारीस अधिकाधिक मजूर मिळूं लागले. स्टोलिपिनच्या या खटाटोपानें शेतकऱ्यांना मिळालेली जमीन एकंदरीनें फार थोडी होती. बहुसंख्य समाजाचें दुःख दूर करण्याच्या दृष्टीनें स्टोलिपिनचा उपाय अखेर निरुपयोगीच ठरला. पण ग्रामसंस्थेंतून बाहेर पडून खासगी मालकीची जमीन करण्याचा जो हक्क शेतकऱ्यास मिळाला त्यामुळें पुढें कांहीं वर्षें तरी शेतकऱ्यांतील असंतोषाची लाट ओसरली व भांडवलशाहीच्या वाढीस, जमिनींच्या किंमतीच्या रूपानें जमलेलें भांडवल, वाढता मजूरवर्ग तसेंच मालक-शेतकऱ्यांचें नवें गिऱ्हाईक मिळून मदत झाली.

भांडवलशाहीची वाढ अशी लगेच पुढील चार वर्षांत फारशी झाली नाहीं. पण (१) मालक-शेतकऱ्यांचें शहाजोग गिऱ्हाईक सरकारनें वाढविल्यामुळें भांडवलदार व झारिस्ट सरकार यांचें नातें दृढ झालें. (२) मालक असलेल्या

धनिक शेतकऱ्यांना गरीब शेतकऱ्यांपासून आपल्या इस्टेटी संभाळण्यास झारची शक्ति हाच आधार वाटूं लागला आणि अशा प्रकारें सरदार, धनिक शेतकरी व भांडवलदार असे तीन वर्ग झारचें आसन मजबूत करावयास कारण होऊन क्रांतिकारक कामकरी व शेतकरी यांची सर्व बाजूंनीं पीछेहाट झाली. त्यांतहि शेतकरी हा क्रांतीच्या पराभवामुळें खचून गेला व क्रांतीनें साधलें नाहीं तें डयूमा साधेल म्हणून तिजकडे आशेनें डोळे लावून बसला. यामुळें दडपशाहीचा सगळा मार कामकरीवर्गावरच पडला. याचा परिणाम १९०५ ते १९०९ पर्यंत संपास जी उतरती कळा लागली त्यांत स्पष्ट दिसून आला. १९०५ सालीं रशियांत एकंदर १४००० संप झाले. त्यांत एकूण सुमारें ३० लक्ष कामगार सामील झाले होते. १९०८ सालीं संपाचा आंकडा ९०० च्याहि खालीं आला. १९०९ सालीं तो आणखी खालीं उतरला. आणि संपवाल्यांची संख्या दीड लाखाखालीं गेली. १९०५ सालीं शेंकडा ७०हून अधिक संपांचा निकाल कामगारांचे बाजूनें लागला. तर १९०९ सालीं शेंकडा २० संपांतहि कामगारांना यश आलें नाहीं.

सोशल डेमोक्रॅट पक्षाची वाताहत

शेतकरी-कामकरी वर्गाचा जसा सर्व बाजूंनीं धुव्वा उडाला तीच गत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचीहि झाली. पक्षाचे कित्येक पुढारी पकडले जाऊन हद्दपार झाले. गुप्त छापखाने जप्त झाले व जनतेशीं असलेला पक्षाचा सर्वच संबंध तुटला. पक्षाच्या सभासदांची संख्या १९०५ चे अखेरीस दीडलक्षावर गेली होती. पण क्रांतीची लाट ओसरल्यावर ही संख्याहि पार वितळून गेली. पीछेहाटीकाळच्या दडपशाहीपुढें सुशिक्षित वर्ग खचून मागें हटला व धर्म, तत्त्वज्ञान आणि लैंगिक स्वेच्छाचार या प्रकारच्या विचारांच्या व वाङ्मयाच्या मागें लागला. पक्षाचें धोरण व्यापक व उदार असावें म्हणजे पक्षाची सभासदसंख्या मोठी होईल असें मेन्शेव्हिकांचें मत होतें. पण या उतरत्या काळांत मेन्शेव्हिक सभासदांची संख्या बोल्शेव्हिकांचे प्रमाणांत फारच दुर्बल व कमी झाली. यासंबंधीं मेन्शेव्हिकांचा पुढारी मार्टाव्ह लिहितो, "या उतरत्या काळांत पक्षाच्या बोल्शेव्हिक विभागानें कडक शिस्त व एकमेकांस घट्ट धरून राहण्याचा दृढनिश्चय यांचे जोरावर आपल्या

विभागाची लढाऊ फळी तयार केली. पण अंतःकलह व तत्त्वनिष्ठेची उपेक्षा यांनीं मेन्शेव्हिक विभागाची फारच दाणादाण झाली." अर्थात् 'पक्षांत मेन्शेव्हिकांचें संघटनाबल कमी असलें तरी संख्याबल अधिक होतें. यामुळें त्यांच्या मताप्रमाणें पक्षाच्या धोरणासंबंधींचे निर्णय होऊं लागले. दडपशाही जोरांत असल्यानें सोशल डेमोक्रॅटिक पक्षास पोलीसचा जाच भयंकर होऊं लागला. राजनिष्ठ पक्षाखेरीज कोणाचें काम होणेंच अशक्य होऊं लागले. यामुळें मार्टॉव्ह, मास्लाव्ह, एक्सलरॉड, पोट्रेसॉव्ह वगैरे मेन्शेव्हिक पुढाऱ्यांनीं गुप्त व क्रांतिकारक कटाच्या चळवळी व्यर्थ आहेत, त्यापेक्षां कायद्याच्या कक्षेंत राहून करण्यासारखें काम पुष्कळ असतें त्यावरच भर द्यावा असा मत-प्रसार चालविला. या वेळीं मवाळ होऊन, नमतें घेऊन, राजकारण जिवंत ठेवणें हेंच महत्त्वाचें कार्य आहे असें त्यांचें मत झालें. झारविषयीं राजनिष्ठ राहून सनदशीर राज्यसत्तेचा पुरस्कार करणारा एक पक्ष ड्यूमाच्या जन्माबरोबरच जन्मास आला होता. या पक्षाशीं मेन्शेव्हिकांच्या ड्यूमामध्यें ड्यूमांतील पक्षानें सहकार्य करण्याचें ठरविलें व त्यास खूष करण्यासाठीं जमिनदारांच्या जमिनी खालसा करण्याची घोषणा जाहीरसभांतून बोलावयाची नाहीं असा मेन्शेव्हिकांनीं संकेत ठरविला. एकंदर मेन्शेव्हिकांचें धोरण इतकें घरंगळीला लागलें होतें, कीं जॉर्ज प्लेखॅनोव्ह यास हा मेन्शेव्हिकांचा अधःपात सहन न होऊन 'पक्षनिष्ठ मेन्शेव्हिक' नांवाचा आपला वेगळा गट त्यानें तयार केला. मवाळ अथवा 'कायदेशीर'वाल्यांचें 'सोशल डेमोक्रॅटिक व्हॉइस' नांवाचें पत्र होतें. त्यास तोंड देण्यासाठीं प्लेखॅनोव्हनें 'सोशल डेमोक्रॅटिक डायरी' नांवाचें पत्र सुरू केलें. 'कायदेशीर'च चळवळ करावी म्हणणाऱ्या मेन्शेव्हिकांसंबंधीं प्लेखॅनोव्ह लिहितो,—

"गेल्या शतकाच्या नव्वदींत (नाइन्टीज्) 'कायदेशीर' संधिसाधूंचा, 'लीगल मार्क्सिस्टांचा' एक गट सोशल डेमोक्रॅटांत होताच. हे कायदेबाज मार्क्सिटस्ट हळूहळू भांडवलवाल्यांचीं प्रागतिक धोरणें प्रतिपादूं लागले, आणि बेकायदा चळवळ करावी म्हणणारे क्रांतिकारक कटवाले झाले. आज क्रांतिकारक चळवळीवर हल्ला जो केला जातो तो क्रांतिकारक कटास जे नालायक आहेत त्यांकडूनच केला जातो. ते दमले आहेत, सतत वीरवृत्तीनें त्यागाच्या

भूमिकेंत राहणें हें त्यांच्या ताकदीच्या पलीकडे आहे, म्हणून आपल्या पक्षनिष्ठ सहकऱ्यांपासून ते पळून जातात आणि असें करणें हा पक्षद्रोह नसून पक्षाचें धोरण व्यापक करणें आहे असा इतरांचा व स्वतांचा समज करून देत असतात."

तथापि प्लेखॅनोव्हला बोल्शेव्हिकांचेंहि धोरण पसंत नव्हतेंच. बोल्शेव्हिक आपल्या मताचा 'प्रॉलेटेरियट' या पत्रांतून प्रसार करीत. या पीछेहाटीच्या काळांत पक्षाचें धोरण कसें असावें यासंबंधीं बोल्शेव्हिकांचें मत असें होतें कीं,

"झारचा अंमल अस्तित्वांत असेपर्यंत कायद्याच्या मर्यादेंत व्यापक प्रमाणावर कामकऱ्यांची चळवळ होण्याचा संभव मुळींच नाहीं. सरंजामदारांच्या हातीं राज्ययंत्र असून तें बव्हंशीं प्रतिगामीच आहे. झारची सत्ता सनदशीर सुद्धां लवकर होत नाहीं. अशा परिस्थितींत केवळ बेकायदा क्रांतिकारक चळवळीनेंच कामगारचळवळींत समाजवादी ध्येयवादाचें पोषण होणें शक्य आहे. अशी बेकायदा संघटना हीच कामगारसंघटनांचा क्रांतिकारक आत्मा होऊं शकते. बेकायदा चळवळ करून लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य स्थापणें, जमिनदारांच्या जमिनी खालसा करणें व ८ तासांचा कारखान्यांतील कामाचा दिवस ठरविणें या तीन 'मूलभूत मागण्यांवर' कामगारांची संघटना करावी."

मेन्शेव्हिकांत जसा एक एकांतिक मवाळ गट होता तसाच बोल्शेव्हिकांत बोगदॅनोव्ह, लुनाचार्स्की, अलेक्झिन्स्की वगैरेंचा एक अतिजहाल गट होता. लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक हे बेकायदेशीर चळवळीवर भर देतच, पण कायदेशीर चळवळही चालू ठेवून कायदेशीर मार्गांनींहि क्रांतीचें वातावरण उत्पन्न करण्यास मदत झाल्यास ते मार्गहि अनुसरावे असें त्यांचें म्हणणें होतें. उलट बोगदॅनोव्हप्रभृति अतिजहालांना कोणतीहि कायदेशीर चळवळ ही शरणागतिच वाटत असून ते केवळ बेकायदा व गुप्त चळवळीवरच भर देत. १९०४ सालीं लेनिननें 'व्हेप्रॉइड' (आघाडी) हें पत्र काढलें होतें. त्याच नांवाचें पत्र या अतिजहालांनीं १९०९ सालीं काढलें व आपण लेनिनची जहाल भूमिका सोडली नसून लेनिन मात्र मवाळ झाला आहे असें त्यांनीं सूचित केलें. १९०७ सालीं क्रांतीच्या सर्व आशा विफल झाल्यानंतर लेनिन रशियांतून बाहेर गेला तो १९१७ पर्यंत आला नाहीं. तो जिनिवाहून आपल्या पक्षाचें नेतृत्व करी.

स्थळ प्रत
सं. ११५
ता.

ड्यूमा व सोशल डेमोक्रॅटिक पक्ष

स्टोलिपिननें पहिली ड्यूमा एप्रिल १९०६ मध्यें भरविली; पण तिच्याशीं न पटल्यामुळें त्यानें ती जुलैमध्यें बरखास्त केली. या ड्यूमामध्यें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे १८ प्रतिनिधि होते. दुसरी ड्यूमा नव्या निवडणुकी करून फेब्रुवारी १९०७ मध्यें भरविण्यांत आली; ती पुढें जूनमध्यें विसर्जन झाली. हींत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे ६० प्रतिनिधि निवडून आले. या वेळच्या पुष्कळशा सोशल डेमोक्रॅट प्रतिनिधींना कांहींना कांहीं निमित्त काढून तुरुंगांत अथवा हद्दपारीवर पाठविण्यांत आलें. यांचे प्रतिनिधि कमी निवडून यावे यासाठीं निवडणुकीचे नियम अगदीं संकुचित करून तिसरी ड्यूमा १९०७ च्या नोव्हेंबरमध्यें भरविण्यांत आली. यांत सोशल डेमोक्रॅटिक पक्षास फक्त १५च जागा मिळाल्या. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत जे तीन गट पडले होते त्या तिघांचीं तीन धोरणें ड्यूमाचे बाबतींतहि दिसून आलीं. मेन्शेव्हिकांनीं नुसतें ड्यूमांतील काम हेंच काय तें व्यवहार्य कार्य आहे असें मानलें. ज्वलज्जहाल बोल्शेव्हिकांनीं ड्यूमावर सर्वस्वीं बहिष्कार घालून गुप्त चळवळींचें सर्व बाजूंनीं संघटन केलें. या संघटनांत लेनिन पक्षानें भाग घेतलाच होता. पण जनतेवर ड्यूमाची जी मोहनी आहे, सनदशीर चळवळीबद्दल लोकांना जी एक आंधळी आशा वाटत असते ती नष्ट केली पाहिजे; सरकारी संस्थांचें जुलुमी स्वरूप जनतेसमोर आणण्यासाठा ड्यूमाच्या राजकारणांत प्रतिपक्षी या नात्यानें व ती मोडून टाकण्याच्या हेतूनें भाग घेऊन तिचे वाभाडे काढले पाहिजेत; तसेंच 'सामाजिक विम्या'सारख्या संस्थांत घुसून त्यांचें धोरण करतां येईल तेवढें लोकोपयोगी केलें पाहिजे असें लेनिन-पक्षाचें मत होतें. १९०७ मध्यें लंडन येथें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची परिषद भरली; १९०८ मध्यें पॅरिस येथें भरली व १९१० मध्यें मध्यवर्ती कमिटीचें खुलें आधिवेशन झालें. या सर्व वेळीं या तीन गटांच्या तीन धोरणांवर खडाजंगी वाद विवाद झाला व लेनिन पक्षानें आपलें कायदेशीर व बेकायदेशीर चळवळ ही दुहेरी धोरण जोरदारपणें मांडलें. १९११ पासून क्रांतिकारक संपांची जी पुनः उठावणी झाली त्या वेळीं या दुहेरी धोरणासच पुष्कळसें यश आलें.

धनिक शेतकऱ्यांना गरीब शेतकऱ्यांपासून आपल्या इस्टेटी संभाळण्यास झारची शक्ति हाच आधार वाटूं लागला आणि अशा प्रकारें सरदार, धनिक शेतकरी व भांडवलदार असे तीन वर्ग झारचें आसन मजबूत करावयास कारण होऊन क्रांतिकारक कामकरी व शेतकरी यांची सर्व बाजूंनीं पीछेहाट झाली. त्यांतहि शेतकरी हा क्रांतीच्या पराभवामुळें खचून गेला व क्रांतीनें साधलें नाहीं तें डयूमा साधेल म्हणून तिजकडे आशेनें डोळे लावून बसला. यामुळें दडपशाहीचा सगळा मार कामकरीवर्गावरच पडला. याचा परिणाम १९०५ ते १९०९ पर्यंत संपास जी उतरती कळा लागली त्यांत स्पष्ट दिसून आला. १९०५ सालीं रशियांत एकंदर १४००० संप झाले. त्यांत एकूण सुमारें ३० लक्ष कामगार सामील झाले होते. १९०८ सालीं संपाचा आंकडा ९०० च्याहि खालीं आला. १९०९ सालीं तो आणखी खालीं उतरला. आणि संपवाल्यांची संख्या दीड लाखाखालीं गेली. १९०५ सालीं शेंकडा ७०हून अधिक संपांचा निकाल कामगारांचे बाजूनें लागला. तर १९०९ सालीं शेंकडा २० संपांतहि कामगारांना यश आलें नाहीं.

सोशल डेमोक्रॅट पक्षाची वाताहत

शेतकरी-कामकरी वर्गाचा जसा सर्व बाजूंनीं धुव्वा उडाला तीच गत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचीहि झाली. पक्षाचे कित्येक पुढारी पकडले जाऊन हद्दपार झाले. गुप्त छापखाने जप्त झाले व जनतेशीं असलेला पक्षाचा सर्वच संबंध तुटला. पक्षाच्या सभासदांची संख्या १९०५ चे अखेरीस दीडलक्षावर गेली होती. पण क्रांतीची लाट ओसरल्यावर ही संख्याहि पार वितळून गेली. पीछेहाटीकाळच्या दडपशाहीपुढें सुशिक्षित वर्ग खचून मागें हटला व धर्म, तत्त्वज्ञान आणि लैंगिक स्वेच्छाचार या प्रकारच्या विचारांच्या व वाङ्मयाच्या मागें लागला. पक्षाचें धोरण व्यापक व उदार असावें म्हणजे पक्षाची सभासदसंख्या मोठी होईल असें मेन्शेव्हिकांचें मत होतें. पण या उतरत्या काळांत मेन्शेव्हिक सभासदांची संख्या बोल्शेव्हिकांचे प्रमाणांत फारच दुर्बल व कमी झाली. यासंबंधीं मेन्शेव्हिकांचा पुढारी मार्टाव्ह लिहितो, "या उतरत्या काळांत पक्षाच्या बोल्शेव्हिक विभागानें कडक शिस्त व एकमेकांस घट्ट धरून राहण्याचा दृढनिश्चय यांचे जोरावर आपल्या

विभागाची लढाऊ फळी तयार केली. पण अंतःकलह व तत्त्वनिष्ठेची उपेक्षा यांनीं मेन्शेव्हिक विभागाची फारच दाणादाण झाली." अर्थात् 'पक्षांत मेन्शेव्हिकांचें संघटनाबल कमी असलें तरी संख्याबल अधिक होतें. यामुळें त्यांच्या मताप्रमाणें पक्षाच्या धोरणासंबंधींचे निर्णय होऊं लागले. दडपशाही जोरांत असल्यानें सोशल डेमोक्रॅटिक पक्षास पोलीसचा जाच भयंकर होऊं लागला. राजनिष्ठ पक्षाखेरीज कोणाचें काम होणेंच अशक्य होऊं लागले. यामुळें मार्टॉव्ह, मास्लाव्ह, एक्सलरॉड, पोट्रेसॉव्ह वगैरे मेन्शेव्हिक पुढाऱ्यांनीं गुप्त व क्रांतिकारक कटाच्या चळवळी व्यर्थ आहेत, त्यापेक्षां कायद्याच्या कक्षेंत राहून करण्यासारखें काम पुष्कळ असतें त्यावरच भर द्यावा असा मत-प्रसार चालविला. या वेळीं मवाळ होऊन, नमतें घेऊन, राजकारण जिवंत ठेवणें हेंच महत्त्वाचें कार्य आहे असें त्यांचें मत झालें. झारविषयीं राजनिष्ठ राहून सनदशीर राज्यसत्तेचा पुरस्कार करणारा एक पक्ष ड्यूमाच्या जन्माबरोबरच जन्मास आला होता. या पक्षाशीं मेन्शेव्हिकांच्या ड्यूमामध्यें ड्यूमांतील पक्षानें सहकार्य करण्याचें ठरविलें व त्यास खूष करण्यासाठीं जमिनदारांच्या जमिनी खालसा करण्याची घोषणा जाहीरसभांतून बोलावयाची नाहीं असा मेन्शेव्हिकांनीं संकेत ठरविला. एकंदर मेन्शेव्हिकांचें धोरण इतकें घरंगळीला लागलें होतें, कीं जॉर्ज प्लेखॅनोव्ह यास हा मेन्शेव्हिकांचा अधःपात सहन न होऊन 'पक्षनिष्ठ मेन्शेव्हिक' नांवाचा आपला वेगळा गट त्यानें तयार केला. मवाळ अथवा 'कायदेशीर'वाल्यांचें 'सोशल डेमोक्रॅटिक व्हॉइस' नांवाचें पत्र होतें. त्यास तोंड देण्यासाठीं प्लेखॅनोव्हनें 'सोशल डेमोक्रॅटिक डायरी' नांवाचें पत्र सुरू केलें. 'कायदेशीर'च चळवळ करावी म्हणणाऱ्या मेन्शेव्हिकांसंबंधीं प्लेखॅनोव्ह लिहितो,—

"गेल्या शतकाच्या नव्वदींत (नाइन्टीज्) 'कायदेशीर' संधिसाधूंचा, 'लीगल मार्क्सिस्टांचा' एक गट सोशल डेमोक्रॅटांत होताच. हे कायदेबाज मार्क्सिस्ट हळूहळू भांडवलवाल्यांचीं प्रागतिक धोरणें प्रतिपादूं लागले, आणि बेकायदा चळवळ करावी म्हणणारे क्रांतिकारक कटवाले झाले. आज क्रांतिकारक चळवळीवर हल्ला जो केला जातो तो क्रांतिकारक कटास जे नालायक आहेत त्यांकडूनच केला जातो. ते दमले आहेत, सतत वीरवृत्तीनें त्यागाच्या

भूमिकेंत राहणें हें त्यांच्या ताकदीच्या पलीकडे आहे, म्हणून आपल्या पक्षनिष्ठ सहकाऱ्यांपासून ते पळून जातात आणि असें करणें हा पक्षद्रोह नसून पक्षाचें धोरण व्यापक करणें आहे असा इतरांचा व स्वतांचा समज करून देत असतात."

तथापि प्लेखॅनोव्हला बोल्शेव्हिकांचेंहि धोरण पसंत नव्हतेंच. बोल्शेव्हिक आपल्या मताचा 'प्रॉलेटेरियट' या पत्रांतून प्रसार करीत. या पीछेहाटीच्या काळांत पक्षाचें धोरण कसें असावें यासंबंधीं बोल्शेव्हिकांचें मत असें होतें कीं,

" झारचा अंमल अस्तित्वांत असेपर्यंत कायद्याच्या मर्यादेंत व्यापक प्रमाणावर कामकऱ्यांची चळवळ होण्याचा संभव मुळींच नाहीं. सरंजामदारांच्या हातीं राज्ययंत्र असून तें बव्हंशीं प्रतिगामीच आहे. झारची सत्ता सनदशीर मुद्धां लवकर होत नाहीं. अशा परिस्थितींत केवळ बेकायदा क्रांतिकारक चळवळीनेंच कामगारचळवळींत समाजवादी ध्येयवादाचें पोषण होणें शक्य आहे. अशी बेकायदा संघटना हीच कामगारसंघटनांचा क्रांतिकारक आत्मा होऊं शकते. बेकायदा चळवळ करून लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य स्थापणें, जमिनदारांच्या जमिनी खालसा करणें व ८ तासांचा कारखान्यांतील कामाचा दिवस ठरविणें या तीन 'मूलभूत मागण्यांवर' कामगारांची संघटना करावी."

मेन्शेव्हिकांत जसा एक एकांतिक मवाळ गट होता तसाच बोल्शेव्हिकांत बोगदॅनोव्ह, लुनाचार्स्की, अलेक्झिन्स्की वगैरेंचा एक अतिजहाल गट होता. लेनिनप्रभृति बोल्शेव्हिक हे बेकायदेशीर चळवळीवर भर देतच, पण कायदेशीर चळवळही चालू ठेवून कायदेशीर मार्गांनींहि क्रांतीचें वातावरण उत्पन्न करण्यास मदत झाल्यास ते मार्गहि अनुसरावे असें त्यांचें म्हणणें होतें. उलट बोगदॅनोव्हप्रभृति अतिजहालांना कोणतीहि कायदेशीर चळवळ ही शरणागतिच वाटत असून ते केवळ बेकायदा व गुप्त चळवळीवरच भर देत. १९०४ सालीं लेनिननें 'व्हेप्रॉइड' (आघाडी) हें पत्र काढलें होतें. त्याच नांवाचें पत्र या अतिजहालांनीं १९०९ सालीं काढलें व आपण लेनिनची जहाल भूमिका सोडली नसून लेनिन मात्र मवाळ झाला आहे असें त्यांनीं सूचित केलें. १९०७ सालीं क्रांतीच्या सर्व आशा विफल झाल्यानंतर लेनिन रशियांतून बाहेर गेला तो १९१७ पर्यंत आला नाहीं. तो जिनिवाहून आपल्या पक्षाचें नेतृत्व करी.

स्थळ प्रत
सं. ११५
ता.

डयूमा व सोशल डेमोक्रॅटिक पक्ष

स्टोलिपिननें पहिली डयूमा एप्रिल १९०६ मध्यें भरविली; पण तिच्याशीं न पटल्यामुळें त्यानें ती जुलैमध्यें बरखास्त केली. या डयूमामध्यें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे १८ प्रतिनिधि होते. दुसरी डयूमा नव्या निवडणुकी करून फेब्रुवारी १९०७ मध्यें भरविण्यांत आली; ती पुढें जूनमध्यें विसर्जन झाली. हींत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे ६० प्रतिनिधि निवडून आले. या वेळच्या पुष्कळशा सोशल डेमोक्रॅट प्रतिनिधींना कांहींना कांहीं निमित्त काढून तुरुंगांत अथवा हद्दपारीवर पाठविण्यांत आलें. यांचे प्रतिनिधि कमी निवडून यावे यासाठीं निवडणुकीचे नियम अगदीं संकुचित करून तिसरी डयूमा १९०७ च्या नोव्हेंबरमध्यें भरविण्यांत आली. यांत सोशल डेमोक्रॅटिक पक्षास फक्त १५च जागा मिळाल्या. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत जे तीन गट पडले होते त्या तिघांचीं तीन धोरणें डयूमाचे बाबतींतहि दिसून आलीं. मेन्शेव्हिकांनीं नुसतें डयूमांतील काम हेंच काय तें व्यवहार्य कार्य आहे असें मानलें. ज्वलज्जहाल बोल्शेव्हिकांनीं डयूमावर सर्वस्वीं बहिष्कार घालून गुप्त चळवळींचें सर्व बाजूंनीं संघटन केलें. या संघटनांत लेनिन पक्षानें भाग घेतलाच होता. पण जनतेवर डयूमाची जी मोहनी आहे, सनदशीर चळवळीबद्दल लोकांना जी एक आंधळी आशा वाटत असते ती नष्ट केली पाहिजे; सरकारी संस्थांचें जुलमी स्वरूप जनतेसमोर आणण्यासाठा डयूमाच्या राजकारणांत प्रतिपक्षी या नात्यानें व ती मोडून टाकण्याच्या हेतूनें भाग घेऊन तिचे वाभाडे काढले पाहिजेत; तसेंच 'सामाजिक विम्या'सारख्या संस्थांत घुसून त्यांचें धोरण करतां येईल तेवढें लोकोपयोगी केलें पाहिजे असें लेनिन-पक्षाचें मत होतें. १९०७ मध्यें लंडन येथें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची परिषद भरली; १९०८ मध्यें पॅरिस येथें भरली व १९१० मध्यें मध्यवर्ती कमिटीचें खुलें अधिवेशन झालें. या सर्व वेळीं या तीन गटांच्या तीन धोरणांवर खडाजंगी वाद विवाद झाला व लेनिन पक्षानें आपलें कायदेशीर व बेकायदेशीर चळवळ ही दुहेरी धोरण जोरदारपणें मांडलें. १९११ पासून क्रांतिकारक संपांची जी पुनः उठावणी झाली त्या वेळीं या दुहेरी धोरणासच पुष्कळसें यश आलें.

प्रकरण ५ वें

कांतिकारक चळवळींचा पुनरुद्भव (१९११-१९१४)

विकलेल्या जमिनींच्या किंमतीच्या रूपानें कारखानदारीच्या वाढीस नवें भांडवल मिळालें, कफल्लक झालेल्या शेतकऱ्याला ग्रामसंस्थेचें बंधन तुटल्यामुळें कारखान्यांत मजुरीसाठीं धावण्यास वाव मिळून कारखानदारांना मजूर भरपूर मिळाले, जमिनीचा मालक असा नवा शेतकरीवर्ग निर्माण होऊन झारशाहीस उचलून धरणारा नवा वर्ग निर्माण झाला व मालक शेतकऱ्यांचें शहाजोग गिऱ्हाईक भांडवलशाहीस मिळालें, हे स्टोलिपिनच्या सुधारणेचे मुख्य फायदे झाले असें मागील प्रकरणांत सांगितलें आहे. त्याचा हळूहळू परिणाम दृग्गोचर होऊन कारखानदारी १९११ पासून तेजीस येऊं लागली. १९०९ ते १९१३ पर्यंत कांहीं ठळक धंद्यांची पुढीलप्रमाणें वाढ झाली. कच्चें लोखंड (पिग आयर्न) ६५·५टक्के, इतर धातूंचे कारखाने ५१·३ टक्के, रेल्वे २३·९ टक्के; पक्कें लोखंड (रॉट आयर्न) ६१·३ टक्के, लोखंडी पत्रे २०·४टक्के; तुळवटें ८७·९ टक्के.

कामगारसंपांची वाढ

१९०६ ते १९१४ या काळांत सुमारें ३० लक्ष बेकार शेतकरी कारखानाकामगारवर्गांत सामील झाले. कारखानदारीची अशी झपाट्यानें वाढ होत असतां कामगारांचीहि भूक अधिक वाढून त्यांच्या असंतोषास भर येऊं लागला. कारखानदारांचा नफा वाढूं लागला. पण कामगारांची संख्या बेकार शेतकऱ्यांनीं एक [illegible]फुगून त्यांच्यांत चढाओढ लागत होती; यामुळें कामकऱ्यांच्या माग[illegible]लांकारखानदारांना पर्वा करण्याचें कारण नव्हतें. तसेंच सरकारहि अधि[illegible]न बलिष्ठ होत असून भांडवलवाल्यांच्या लहरीनें वागत असल्यानें कामकऱ्यांच्या असंतोषास भीक घालण्याची जरूरी कारखानदारास वाटेनाशी झाली. यामुळें १९१० पासून संपांचे रूपानें कामगारांच्या असंतोषास तोंड फुटूं लागलें. १९१०–१९१४ या काळांत कामगारांचे संप

२०पट वाढले. एका १९१२ सालांत १० लक्षांहून अधिक कामगार संपांत सामील झाले होते. ही संख्या १९१३ सालीं १५ लक्षांवर गेली व १९१४ सालीं २० लक्षांच्याहि वर गेली. दिवसानुदिवस कामगारांत राजकीय हक्कांबद्दल जागृति वाढत जाऊन त्यांचा संपवाल्यांच्या मागण्यांत समावेश होऊं लागला होता. १९१२ सालीं सैबेरियांत आगगाडीपासून दूर अशा लेना येथील सोन्याच्या खाणींतील मजुरांनीं त्यांजवर होत असलेल्या पाशवी जुलुमाविरुद्ध तक्रार केली व आर्थिक परिस्थितीसंबंधीं अगदीं सौम्य स्वरूपाच्या मागण्या केल्या. यासाठीं कामगारांनीं व्यापक प्रमाणावर पण शांतपणानें असंतोष-निदर्शन केलें. तेव्हां त्यांजवर सरकारी सैन्यानें गोळीबार केला. त्यांत शेंकडों कामगार प्राणांस मुकले व रक्ताची नदी सोन्याच्या खाणीवर वाहिली. या भयंकर रक्तपाताची बातमी सर्व रशियाभर कामगारांत पसरून सहानुभूतीचे संप होऊं लागले. संपांची संख्या दरसाल वाढून ९ जानेवारी, १ मे वगैरे दिवशीं कामगार कामें बंद ठेवून राजकीय घोषणा करीत सभा व मिरवणुका वाढत्या जमावानें काढूं लागले. १९१४च्या १ मे रोजीं १० लक्षांहून अधिक कामगारांनीं काम बंद ठेवून राजकीय मागण्या जाहीर करीत तो मजूरदिन साजरा केला.

पुढाऱ्यांत पुढारीपणाची झटापट

या वाढत्या असंतोषास सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे पुढारी आपापल्या परीं राजकीय वळण देत होते. पण त्यांतील पोटभेद म्हणजे बोल्शेव्हिक व मवाळ-लेले (लिक्विडेटर्स) मेन्शेव्हिक यांमध्यें पुढारीपणाबद्दल झटापट चालू होती. कामगारांनीं केवळ अर्ज-विनंत्या कराव्या, सरकार व कारखानदार यांना चीड येईल अशा मागण्या आपली संघटना मजबूत होईपर्यंत करूं नयेत, तूर्त कामगार-संघटना करण्याचें स्वातंत्र्य मागण्यावरच आपल्या चळवळीचा भर द्यावा असें मवाळ मेन्शेव्हिकांचें सांगणें असे. पण क्रांतिकारक मागण्यांची तार ढिली करण्यास बोल्शेव्हिक तयार नव्हते. लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य (डेमोक्रॅटिक रिपब्लिक), जमिनदारांच्या जमिनी खालसा करणें व कारखान्यांच्या कामाचा आठ तासांचा दिवस करणें अशा जुन्या क्रांतिकारक मागण्याच बोल्शेव्हिकांनीं कामगारांपुढें ठेविल्या व कामगारांना मेन्शेव्हिकां-

पेक्षां बोल्शेव्हिकांचेंच धोरण अधिक पसंत पडूं लागलें. क्रांतीच्या पडत्या काळांत बोल्शेव्हिकांनीं आपला एकांतिक क्रांतिवाद सोडला नाहीं व मेन्शेव्हिकांनीं कायद्याच्या चौकटींत बसून चळवळ करण्याचें ठरविलें. यामुळें बोल्शेव्हिकांचा पक्ष दडपशाहीच्या धर्गीत साफ जळून जाईल व आपण मात्र शाबूत राहून कामगारचळवळ सुरू होतांच आघाडीवरचें स्थान पकडूं असें या मवाळलेल्या मेन्शेव्हिकांना वाटलें होतें; पण वस्तुस्थिति वेगळी झाली असा त्यांना मागाहून अनुभव आला. मेन्शेव्हिक पुढारी टी. डॅन या प्रकारासंबंधीं लिहितो—

"मवाळलेल्या मेन्शेव्हिकांना वाटे, कीं आपल्या तयारीच्या काळांतील विशिष्ट कार्यपद्धतीनें आपणांला कामगारचळवळींत महत्त्वाचें स्थान प्राप्त होईल. पण जो बोल्शेव्हिक गट जळून भस्मसात् झाला असें ते धरून चालले होते तो कामगारचळवळ सुरू होतांच तिच्या अग्रभागीं झाला आणि मेन्शेव्हिकांची पडत्या काळांतील पुढारीपणाची मिरास त्यांच्या हातून साफ निघून गेली."

बोल्शेव्हिकांना हें यश इतिहासानेंच मिळवून दिलें होतें. १९०५सालीं क्रांति अयशस्वी होऊन अत्यंत क्रूर दडपशाही झाली, तो भयानक अनुभव कामगारांच्या स्मृतींत ताजा होता खरा. पण त्यानंतर चार वर्षांत सदनशीर चळवळी करूनहि कामगारांची आर्थिक प्रगति झाली नाहीं, स्टोलिपिनच्या सुधारणेनें कारखानदारी वाढली तरी ग्रामसंस्था नष्ट झाल्यामुळें कफल्लक शेतकऱ्यांनीं कामगारांचीहि संख्या वाढविली. राज्यसत्ता जसजशी अधिकाधिक निर्भय झाली तसतसें तिनें कामगारांबद्दलचें आपलें धोरण अधिकच उग्र केलें. पुढें १९०९पासून कारखानदारीस बरकत येऊं लागल्यामुळें भांडवलशाही भरभराटली, तरी कामगारवर्गाच्या विरोधाच्या भीतीनें भांडवलशाही लोकशाहीच्या वाढीचा आग्रह सोडून झारचें आसन अधिकच सावरून धरूं लागली. यामुळें १९०५च्या क्रांतीनंतर झालेली दडपशाही भयंकर असली तरी नंतरच्या कायदेशीर चळवळीच्या काळांत आपलें दारिद्र्य व जुलूम वाढतच आहे व एक क्रांति फसली तरी पुन्हा दुसरी करण्याची खटपट करून राजकीय लोकसत्ता स्थापन केल्यावांचून आपल्या मागची परंपरागत गुलामगिरी सुटणारी नाहीं हा बोल्शेव्हिकांचा उपदेश कामगारांना पटूं लागला होता. यामुळें

१९११–१९१४ या काळांत कामगारांचें लहानमोठ्या प्रमाणांवर जे जे निव्वळ आर्थिक अथवा आर्थिक-राजकीय झगडे झाले त्या सर्व वेळीं वाढत्या प्रमाणावर बोल्शेव्हिकांकडेच त्यांचें पुढारीपण आलें.

१९१४ सालीं महायुद्ध सुरू होऊन रशिया त्यांत सामील झाला. त्या वेळीं कामगारांच्या असंतोषास १९०५ची आठवण करून देण्याइतकें भीषण स्वरूप आलें होतें. ऑगस्टच्या आरंभीं महायुद्ध सुरू झालें त्याच्या थोडें आधीं पीटर्सबर्ग शहरांत कामगार व सैनिक रस्ते अडवून एकमेकांवर शस्त्रप्रहार करीत होते. १९१४च्या नोव्हेंबरमध्यें बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीनें युद्धाविषयीं जो जाहिरनामा काढला होता त्यांत सदर कमिटी म्हणते,

"गेल्या कांहीं वर्षांत झारशाहीविरुद्ध क्रांतिकारक चळवळ फारच जोरावली आहे. आणि या सर्व चळवळींत कामगारवर्गासच अग्रस्थान आहे. अलीकडे राजकीय संप होतात, त्यांत लक्षावधि कामगार सामील होतात आणि झारशाहीचा पाडाव करून प्रजासत्ताक स्थापलें पाहिजे अशाच स्वरूपाच्या घोषणा कामगार करीत असतात. युद्ध सुरू होण्याचे थोडे आधीं फ्रान्सचा अध्यक्ष पॉइंकेर पीटर्सबर्गला आला होता. त्या वेळीं कामगारांनीं सैनिकांचे रस्ते अडविले आहेत असें दृश्य त्याचे दृष्टीस पडलें."

बोल्शेव्हिकांचें वाढतें वजन

महायुद्ध सुरू झाल्यामुळें पुढें चळवळ दडपली गेली. पण शेवटीं या दडपशाहीचाच मोड होऊन १९१७ सालीं कामगारांनीं सर्व बाजूंनीं यशस्वी क्रांति करून दाखविली इतका सुप्त जोम त्या दडपलेल्या चळवळींत होता. १९०५ पेक्षां १९११–१९१४ या काळांत कामगारचळवळ एकंदर शिस्त व जागृति या दृष्टीनें अधिक उच्च दर्जाची होती. १९०५ सालीं कामगारांवर सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्ष, झुबाटोव्हचे हस्तक, मेन्शेव्हिक, बोल्शेव्हिक या सर्वांचेंहि थोडेंफार वर्चस्व असून एकंदरीनें ध्येयदृष्टि व रणनीति या दृष्टीनें कामगार अननुभवी व बावचळल्यासारखे झाले होते. पण १९१०–१९१४ या काळांत १९०५ची क्रांति व अपयश, त्यानंतरची दडपशाही, सनदशीर चळवळींतील अपयश, वगैरे सर्व अनुभव कामगारांचे गांठीस असून १९०५सालीं फसगत कां झाली याची लेलिननें केलेली मीमांसा बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनीं कामगारांना

पढविली होती. यामुळें बोल्शेव्हिकांकडे या वेळीं चळवळीचें कांहीं अंशीं अद्वितीय पुढारीपण आलें होतें. यापुढें बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक या सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील दोन गटांना एकत्र काम करणें अशक्य होऊन प्रत्येक गटाच्या वेगवेगळ्या कमिट्या स्थापन करणें अवश्य झालें. १९१२ सालीं सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील क्रांतिकारक मताच्या सभासदांनीं म्हणजे बोल्शेव्हिकांनीं आपली परिषद भरविली व त्यांत त्यांनीं पक्षाचें काम चालविण्यासाठीं एक 'मध्यवर्ती कमिटी' स्थापन केली. यामुळें बोल्शेव्हिक गटास स्पष्ट व संघटित स्वरूप प्राप्त झालें. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील दुफळी यापुढें अगदीं आंखीव झाली व डयूमांतील पक्षाच्या १३ प्रतिनिधींतहि याप्रमाणें दोन पक्ष झाले. पैकीं मेन्शेव्हिक मताचे ७ सभासद असून ते सुमारें २१४००० कामगार-मतदार व बाकीचे इतर वर्गीय मतदार असलेल्या मतदारसंघांकडून निवडलेले होते. बाकीचे सहा बोल्शेव्हिक मताचे असून त्यांच्या मतदारसंघांत १० लक्ष ८ हजार कामगार होते. मेन्शेव्हिकांचा पुढारी श्चीड्झ हा होता. डयूमाचे बाहेर जनतेंत जें काम करावयाचें तें उघड व कायदेशीर तेवढेंच करावें कीं गुप्त व बेकायदेशीरहि त्याबरोबर करावें या चालू वादावरच हे दोन पक्ष डयूमामध्यें पडले. मतभेद तीव्र झाले असतां केवळ जनतेपुढें पक्षैक्याचें ढोंग दाखविणें हें परिणामीं घातक ठरतें हा अनुभव या वेळेपर्यंत बोल्शेव्हिकांना अनेकदां आला असल्यानें १९१३पासून सोशल डेमोक्रॅटिक पक्षातफें फारसें न बोलतां बोल्शेव्हिकांच्या विशिष्ट मताचा बोल्शेव्हिक पक्षाच्या नांवाखालींच बोल्शेव्हिकांनीं प्रचार सुरू केला. त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. सगळा सोशल डेमोक्रॅटिक पक्ष हा आपला पुढारी नसून फक्त बोल्शेव्हिक हेच पुढारी आहेत असें कामगारांना कळून आलें. यामुळें साधनें, मार्ग व ध्येय यांसंबंधीं कामगारांत बराच अधिक बौद्धिक निश्चय उत्पन्न होऊं लागला. १९१२ सालीं मजुरांच्या विम्यासंबंधीं जो कायदा झाला त्यानें मजुरांना सरकार व मालक यांचा गुलाम बनवून टाकलें होतें. पण जें मिळत आहे तेवढें तरी पदरांत घ्या, असा मेन्शेव्हिकांनीं उपदेश केला. तसेंच बोल्शेव्हिक हे सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत दुफळी करून कामगारांतहि दुफळी करितात, त्यामुळें कामगारांना लहानसान फायदेहि पदरांत पाडून घेतां येत नाहींत अशी मेन्शेव्हि-

कांनीं बोल्शेव्हिकांविरुद्ध ओरड चालविली होती. पण कामगारांत दुफळी फारशी न होतां सर्वच कामगार बोल्शेव्हिक मताकडे स्पष्टपणें झुकले आणि १९१३ सालीं आरोग्यविमाखात्याच्या तत्त्वावर झालेल्या निवडणुकींत बोल्शेव्हिक गटास प्रचंड बहुमत मिळालें.

१९१४ सालीं महायुद्ध सुरू झाल्यावर रशियांत व युरोपियन राष्ट्रांत, या युद्धासंबंधीं मार्क्सवाद्यांचें धोरण काय असावें याविषयीं वादाचीं पुष्कळ रणें माजलीं. त्याच वेळीं रशियन कामगारांनीं युद्धांत झारशाहीस मदत करावी कीं नाहीं, रशियांत क्रांति झाल्यास तिचें स्वरूप काय असावें, इतर राष्ट्रांतील सोशॉलिस्ट पक्षांनीं आपल्या सरकारास युद्धांत मदत करावी कीं नाहीं, आंतरराष्ट्रीय क्रांति केव्हां करावी हे प्रश्न खूप घुसळून निघाले आणि या सर्व वादविवादाची छाया १९१७ सालीं रशियांत झालेल्या क्रांतीवरहि पडली. म्हणून १९१७ च्या क्रांतीकडे वळण्यापूर्वी महायुद्धानें मार्क्सवाद्यांच्या मतांत जीं आंदोलनें झालीं त्यांचा संक्षेपानें विचार पुढील प्रकरणांत करूं.

पडविली होती. यामुळें बोल्शेव्हिकांकडे या वेळीं चळवळीचें कांहीं अंशीं अद्वितीय पुढारीपण आलें होतें. यापुढें बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक या सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील दोन गटांना एकत्र काम करणें अशक्य होऊन प्रत्येक गटाच्या वेगवेगळ्या कमिट्या स्थापन करणें अवश्य झालें. १९१२ सालीं सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील क्रांतिकारक मताच्या सभासदांनीं म्हणजे बोल्शेव्हिकांनीं आपली परिषद भरविली व त्यांत त्यांनीं पक्षाचें काम चालविण्यासाठीं एक 'मध्यवर्ती कमिटी' स्थापन केली. यामुळें बोल्शेव्हिक गटास स्पष्ट व संघटित स्वरूप प्राप्त झालें. सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील दुफळी यापुढें अगदीं आंखीव झाली व ड्यूमांतील पक्षाच्या १३ प्रतिनिधींतहि याप्रमाणें दोन पक्ष झाले. पैकीं मेन्शेव्हिक मताचे ७ सभासद असून ते सुमारें २१४००० कामगार-मतदार व बाकीचे इतर वर्गीय मतदार असलेल्या मतदारसंघांकडून निवडलेले होते. बाकीचे सहा बोल्शेव्हिक मताचे असून त्यांच्या मतदारसंघांत १० लक्ष ८ हजार कामगार होते. मेन्शेव्हिकांचा पुढारी स्चीड्झ हा होता. ड्यूमाचे बाहेर जनतेंत जें काम करावयाचें तें उघड व कायदेशीर तेवढेंच करावें कीं गुप्त व बेकायदेशीरहि त्याबरोबर करावें या चालू वादावरच हे दोन पक्ष ड्यूमामध्यें पडले. मतभेद तीव्र झाले असतां केवळ जनतेपुढें पक्षैक्याचें ढोंग दाखविणें हें परिणामीं घातक ठरतें हा अनुभव या वेळेपर्यंत बोल्शेव्हिकांना अनेकदां आला असल्यानें १९१३पासून सोशल डेमोक्रॅटिक पक्षातफें फारसें न बोलतां बोल्शेव्हिकांच्या विशिष्ट मताचा बोल्शेव्हिक पक्षाच्या नांवाखालींच बोल्शेव्हिकांनीं प्रचार सुरू केला. त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. सगळा सोशल डेमोक्रॅटिक पक्ष हा आपला पुढारी नसून फक्त बोल्शेव्हिक हेच पुढारी आहेत असें कामगारांना कळून आलें. यामुळें साधनें, मार्ग व ध्येय यांसंबंधीं कामगारांत बराच अधिक बौद्धिक निश्चय उत्पन्न होऊं लागला. १९१२ सालीं मजुरांच्या विम्यासंबंधीं जो कायदा झाला त्यानें मजुरांना सरकार व मालक यांचा गुलाम बनवून टाकलें होतें. पण जें मिळत आहे तेवढें तरी पदरांत घ्या, असा मेन्शेव्हिकांनीं उपदेश केला. तसेंच बोल्शेव्हिक हे सोशल डेमोक्रॅटिक पक्षांत दुफळी करून कामगारांतहि दुफळी करितात, त्यामुळें कामगारांना लहानसान फायदेहि पदरांत पाडून घेतां येत नाहींत अशी मेन्शेव्हि-

कांनीं बोल्शेव्हिकांविरुद्ध ओरड चालविली होती. पण कामगारांत दुफळी फारशी न होतां सर्वच कामगार बोल्शेव्हिक मताकडे स्पष्टपणें झुकले आणि १९१३ सालीं आरोग्यविमाखात्याच्या तत्त्वावर झालेल्या निवडणुकींत बोल्शेव्हिक गटास प्रचंड बहुमत मिळालें.

१९१४ सालीं महायुद्ध सुरू झाल्यावर रशियांत व युरोपियन राष्ट्रांत, या युद्धासंबंधीं मार्क्सवाद्यांचें धोरण काय असावें याविषयीं वादाचीं पुष्कळ रणें माजलीं. त्याच वेळीं रशियन कामगारांनीं युद्धांत झारशाहीस मदत करावी कीं नाहीं, रशियांत क्रांति झाल्यास तिचें स्वरूप काय असावें, इतर राष्ट्रांतील सोशॅलिस्ट पक्षांनीं आपल्या सरकारास युद्धांत मदत करावी कीं नाहीं, आंतरराष्ट्रीय क्रांति केव्हां करावी हे प्रश्न खूप घुसळून निघाले आणि या सर्व वादविवादाची छाया १९१७ सालीं रशियांत झालेल्या क्रांतीवरहि पडली. म्हणून १९१७ च्या क्रांतीकडे वळण्यापूर्वी महायुद्धानें मार्क्सवाद्यांच्या मतांत जीं आंदोलनें झालीं त्यांचा संक्षेपानें विचार पुढील प्रकरणांत करूं.

प्रकरण ६ वें

महायुद्ध व मार्क्सवाद्यांतील आंदोलनें

१९१४ सालीं महायुद्ध सुरू झालें तेव्हां लेनिन गॅलीशियांत होता. ऑस्ट्रियाचा शत्रु जो रशिया त्या देशाचा नागरिक या नात्यानें ऑस्ट्रियन सरकारनें ताबडतोब लेनिनला पकडून तुरुंगांत टाकलें. पण लेनिन हा त्याच्या विशिष्ट मतामुळें युद्धांत त्याच्या रशियन सरकारला मदत करणार नाहीं, विरोधच करील म्हणून त्यास सोडून द्या, असा व्हिक्टर ॲड्लर या ऑस्ट्रियन सोशॅलिस्टानें ऑस्ट्रियन सरकारास सल्ला दिल्यामुळें ऑस्ट्रियन सरकारनें लेनिनला मुक्त करून ऑस्ट्रियांतून हद्दपार केलें. तेथून तो स्विट्सर्लंडमध्यें झूरिच येथें येऊन राहिला. तेथें येतांच त्यानें आपला 'युद्धाविषयींचा सिद्धांत' (थेसीज् ऑन दि वॉर) लिहून काढून बर्न येथें हद्दपार बोल्शेव्हिकांची एक सभा भरली होती तीपुढें मंजुरीसाठीं मांडला. या पत्रकाचा सारांश मिर्स्कीनें लेनिनच्या चरित्रांत पुढीलप्रमाणें दिला आहे.

युद्धाविषयीं लेनिनचें धोरण

" लेनिनच्या मतें हें युद्ध साम्राज्यशाही युद्ध असून बँकवाल्यांच्या फायद्यासाठीं तें चालविण्यांत आलें होतें. युद्धयमान राष्ट्रांतील अमुक पक्ष नीतिदृष्ट्या श्रेष्ठ व दुसरा हीन अशी निवड करण्याचें कांहींच कारण नव्हतें. त्यांपैकीं कोणाचाहि विजय झाला तरी एकंदरीनें कामगारवर्गाचें त्या विजयापासून नुकसानच होतें. म्हणून प्रत्येक देशांतील खऱ्या सोशॅलिस्टाचें पहिलें कर्तव्य म्हणजे त्यानें स्वतांच्या साम्राज्यशाही राष्ट्राच्या पराभवासाठीं झटणें हें होय. विशेषतः रशियन सोशल डेमोक्रॅट पक्षानें हें लक्षांत ठेवावें, कीं झारिस्ट सरकारचा पराभव होणें हें रशियावर कमींत कमी संकट आहे.... चालू युद्धाचें रूपांतर रशियांतील यादवी युद्धांत करणें (शेतकरी-कामकऱ्यांनीं झारशाहीविरुद्ध, सरंजामशाहीविरुद्ध बंड उभारणें) हा स्पष्ट व निःसंदिग्ध मंत्र कामगारांनीं आपणापुढें ठेविला पाहिजे."

स्वदेशी राज्यसंस्था कितीहि वाईट असली तरी स्वदेशाचें परकी राष्ट्रांशीं युद्ध सुरू झालें असतां त्या युद्धांत स्वदेशाचा पराभव व्हावा व त्यासाठीं सर्वांनीं झटावें असें प्रतिपादणें हें सामान्यतः देशद्रोहासारखेंच दिसतें. क्रिमियन युद्धांत, रुसो-जपानी युद्धांत व १९१४ सालीं सुरू झालेल्या महायुद्धांत झारशाहीवर एका ना दुसऱ्या कारणानें चिडून जाऊन झारच्या पराभवासाठीं शत्रूस फितुर होऊन खटपट करणारे देशद्रोही लोक मोठमोठ्या सरदार-घराण्यांतहि होते. प्लेखॅनोव्ह वगैरे मेन्शेव्हिक पुढाऱ्यांना झारशाहीचा जरी समूळ निःपात करावयाचा होता तरी वरील देशद्रोही सरदारांप्रमाणें ते शत्रूस मिळून स्वदेशाचाहि पराभव करावा असें म्हणण्यास तयार नव्हते. उलट जर्मन युद्धांत रशियानें यशस्वितेनें लढून युद्धाची तड लावलीच पाहिजे असें प्लेखॅनोव्ह आग्रहानें प्रतिपादूं लागला. पण झारशाहीचा दुर्बल व नीतिभ्रष्ट अंमल असेपर्यंत रशियास युद्धांत यश मिळणें अशक्य आहे म्हणून त्यासाठीं राज्यक्रांति करून झारशाहीचा पाडाव होणेंहि त्यांस इष्ट वाटत होतें. म्हणून त्यानें 'विजयासाठीं क्रांति' (रेव्होल्यूशन फॉर व्हिक्टरी) या घोषणेचा प्रसार सुरू केला. प्लेखॅनोव्हची ही भूमिका पूर्वीच्या देशद्रोही व फितुर सरदारांहून भिन्न व देशभक्ति-प्रेरित होती. झारशाहीचा पाडाव करून घटनापरिषद बोलवावी हेंहि प्लेखॅनोव्हचें प्रतिपाद्य होतेंच. यामुळें त्यानें आपली लोकशाहीची भूमिका सोडली नव्हती हेंहि स्पष्ट होतें. अशा या सर्वथैव निष्कलंक व उदात्त भूमिकेशीं लेनिनची, रशियाचा युद्धांत पराभव व्हावा व त्यासाठीं समाजभक्तांनीं खटपट करावी ही, भूमिका सकृद्दर्शनीं हिडीस—निदान विचित्र दिसते व तशी ती आरंभीं पुष्कळांना दिसलीहि. तेव्हां १९१५च्या ऑक्टोबरच्या १३ तारखेस लेनिननें महायुद्ध व रशियन क्रांति याविषयीं आपली योजना विशद करण्यासाठीं 'कांहीं विचार' या अगदीं साध्या शीर्षकाखालीं ११ प्रमेयांत आपला समग्र सिद्धांत मांडून दाखविला. हीं प्रमेयें ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचीं असल्यानें त्यांचा सारांश व खुलासा क्रमशः खालीं देतों.

लेनिनचीं अकरा प्रमेयें

पहिल्या प्रमेयांत लेनिननें आपली घटनापरिषदेसंबंधींची भूमिका स्पष्ट केली आहे. रशियन क्रांतीचा प्रश्न, लेनिन सांगतो, नुसतें घटनापरिषद

बोलवावयाची म्हटल्यानें सुटत नाहीं. ही घटनापरिषद कोणी बोलवावयाची हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समजा, झारनेंच घटनापरिषद बोलावली तर? मग क्रांति होणेंच कठिण आहे. यासाठीं घटनापरिषदेची भाषा आपण बोलूं नये. लोकशाहीयुक्त प्रजासत्ताक स्थापणें, मोठ्या दौलती खालसा करणें व कारखान्यांतील कामाचा आठ तासांचा दिवस करणें या मागण्या स्पष्टपणें आपण लोकांपुढें मांडाव्या. दुसऱ्या प्रमेयांत, शस्त्रास्त्रें व इतर युद्धोपयोगी साहित्य भराभर निर्माण व्हावें यासाठीं ज्या कामगार-कमिट्या स्थापन झाल्या होत्या त्यांत कामगारांनीं भाग घेऊं नये असें लेनिननें प्रतिपादिलें होतें. सोशल डेमोक्रॅट पक्षानें आपला मतप्रसार गरीब शेतकरी, शेती मजूर व सैन्य आणि आरमार यांपर्यंत पोंचवावा असें तिसऱ्या प्रमेयांत म्हटलें होतें. तसेंच संपांस उत्तेजन देऊन ताबडतोब तह घडवून आणणें, डयूमामधील हद्दपार झालेल्या बोल्शेव्हिक सभासदांस स्वदेशांत परत येऊं देणें वगैरे मागण्यांवर लेनिननें जोर दिला होता. कामगार-मुखत्यारांचीं कौन्सिलें म्हणजे सोव्हियट्स हीं बंड करणारीं मंडळें व क्रांतिकारक सत्ता धारण करणाऱ्या संस्था मानल्या जाव्या असें चौथ्या प्रमेयांत म्हटलें होतें. हीं सोव्हियट्सच पुढें राज्यसत्ताधारक संस्था होतील ही लेनिनला या वेळीं कल्पनाहि नव्हती. येत्या राज्यक्रांतीचें सामाजिक स्वरूप काय असावें याची चर्चा पांचव्या व सहाव्या प्रमेयांत केली होती. १९०५ सालचीं त्याचीं मतें या बाबतींत अजून कायम होतीं. राज्यसंस्था मध्यम वर्गाचे हातीं जावी व फार मोठ्या इस्टेटीखेरीज इतर धनोत्पादक साधनें सरकारी मालकीचीं करूं नयेत असेंच लेनिननें या वेळींहि प्रतिपादिलें.

पण ज्या मध्यम वर्गाच्या सरकारशीं सहकार्य करण्याची त्याची १९०५ प्रमाणें या वेळींहि तयारी होती त्याचें स्वरूप कसें असलें तर सहकार्य करावें हें त्यानें सहाव्या व सातव्या प्रमेयांत स्पष्ट केलें. जे मध्यम वर्गीय क्रांतिकारक खोटया देशाभिमानानें (शॉव्हिनिझम्) प्रेरित झालेले असतील म्हणजे स्वदेशी साम्राज्यशाहीचे पक्षपाती असतील, रशियानें विजयी होऊन पोलंड, तुर्कस्तान वगैरे राष्ट्रांवर आपला अंमल गाजवावा असें ज्यांच्या देशाभिमानास पटत असेल त्यांच्याशीं सहकार्य करण्याची लेनिनची तयारी नव्हती. नवव्या प्रमेयांत याहिपुढें जाऊन लेनिन सांगतो,

"जर क्रांतिकारक शॉव्हिनिस्ट म्हणजे देशाभिमानी पण साम्राज्यलोभी अशा वर्गाचे हातीं राज्यसत्ता जाईल तर राष्ट्रसंरक्षणाचे कामीं त्यांच्याशीं सहकार्य न करतां त्यांस आपण विरोध केला पाहिजे. साम्राज्यलोभी देशभक्त जरी क्रांतिकारक असले म्हणजे झारशाही नष्ट करून त्यांना प्रजासत्ताक स्थापावयाचें असलें तरी ते दुसऱ्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य हरण करूं इच्छिणारे म्हणून त्यांचा धिक्कार केला पाहिजे. आणि आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट क्रांतीसाठीं सर्व राष्ट्रांतील कामगारांच्या ऐक्यवर्धनास आपण पाठिंबा दिला पाहिजे." (रोझेन्बर्गनें घेतलेला उतारा.)

लेनिनच्या विचित्र भूमिकेची सयुक्तिकता

क्रांति झाल्याबरोबर जें सरकार अस्तिवांत येईल त्यानें युद्ध थांबविलें पाहिजे ही लेनिनची मुख्य अट होती. याचें कारण असें, कीं युद्ध चालवायचें म्हटलें म्हणजे कारखानदार व झारच्या वेळचें सैन्य व आरमार यांतील अधिकारी यांच्याशीं सहकार्य करणें अपरिहार्य होतें. परराष्ट्रांशीं युद्ध म्हटलें, कीं स्वदेशांत पूर्ण शांतता हवी म्हणून लोकशाही स्वरूपाच्या सुधारणा करणें सुरक्षित नसणार. अथवा असंतुष्ट वर्गांना दडपण्यासाठीं पोलिस व सैनिक यांच्या साह्यानें दडपशाही करणें भाग होणार. एतावता झारशाही उलथून पडली तरी तिचा सर्व सांगाडा संभाळावाच लागणार. अर्थातच झारशाहीचा व त्याच्या सांगाड्याचा चुराडा करावयाचा, तर कांहींहि करून युद्ध थांबवावें व शांतता करावी हेंच योग्य असें लेनिनचें म्हणणें होतें. हा तपशील समजून घेतला म्हणजे प्लेखॅनोव्ह व लेनिन यांमधील मतभेदाचें स्वरूप स्पष्ट होऊन लेनिनच्या भूमिकेंतील सयुक्तिता दिसून येते. जुनें राज्ययंत्र जर आमूलाग्र उलथून पाडावयाचें तर युद्ध चालविणेंच अशक्य व तें राज्ययंत्र कायम ठेवून फक्त झारलाच पदच्युत केलें तर क्रांति यशस्वी होणें अशक्य ही व्यावहारिक अडचण प्लेखॅनोव्हला दिसली नाहीं ती लेनिनला स्पष्टपणें १९१५ सालींच दिसली; आणि १९१७ सालानें लेनिनचा हा सिद्धांत तंतोतंत खरा करून दाखविला.

जागतिक क्रांतीची घोषणा

युद्ध चालू ठेवूं इच्छिणाऱ्या मध्यम वर्गाचे हातीं राज्यसत्ता गेल्यास कामगार-वर्गास क्रांतीचें पुढारीपण आपणाकडे घेऊन क्रांतीची तार पुढें खेचत नेतां

येईल काय? या प्रश्नाचें उत्तर लेनिननें दहाव्या प्रमेयांत दिलें आहे. ऐनवेळीं गरीब मध्यम वर्ग बोल्शेव्हिक मतास अनुकूल होईल तर त्याच्या पाठिंब्याच्या जोरावर कामगारवर्गास यशस्वी क्रांति घडवून आणतां येईल असें लेनिनचें मत होतें. अकराव्या प्रमेयांत युद्ध कसें थांबवावें व जागतिक क्रांति कशी घडवून आणतां येईल याविषयीं लेनिननें आपलें मत स्पष्ट केलें आहे. तो लिहितो,

"चालू महायुद्धांत क्रांति घडवून आणून कामगारांचे हातीं राज्यसत्ता आल्यास कामगारपक्षाचें धोरण कसें राहील? या प्रश्नास आमचें उत्तर असें कीं, सर्व जुलूमग्रस्त व परतंत्र राष्ट्रें स्वतंत्र होतील या अटीवर सर्व राष्ट्रांनीं युद्ध थांबवावें. जर्मनी, इंग्लंड व फ्रान्स हीं राष्ट्रें हल्लींच्या त्यांच्या परिस्थितींत अशा अटी कधींच कबूल करणार नाहींत. मग आपणांस क्रांतिकारक युद्धांसाठीं तयारी करून युद्ध करावेंच लागेल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे आम्ही अत्यंत कठोरपणें आपलें धोरण अमलांत आणून केवळ आमच्याच सर्व मागण्या पदरांत पाडून घेऊं असें नव्हे; तर रशियाचे अंकित प्रदेश, हिंदुस्थान, चीन, इराण वगैरे जुलूमग्रस्त व अंकित प्रदेश, तसेंच युरोपांतील समाजवादी कामगारवर्ग यांना आम्ही त्यांच्या त्यांच्या राज्यसंस्थांविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त करूं."

लेनिननें या परिच्छेदांत सांगितल्याप्रमाणें तो सत्ता हातीं येतांच जर्मनीस तहास बोलावणार होता व प्लेखॅनोव्हला हें तत्त्व मंजूर नव्हतें. जर्मनी लेनिनच्या अटींवर तहास तयार होणारच नाहीं ही लेनिनची खात्री होती व म्हणून क्रांतिकारक युद्धाचीहि तयारी तो करूं इच्छीत होता. पण अशा प्रकारें युद्ध चालविण्याचें ठरविल्यावर तरी झारचें सैन्य, आरमार व अधिकारी वापरण्याचा प्रसंग (प्लेखॅनोव्हप्रमाणेंच) लेनिनवर येणार होता कीं नाहीं? व जर येणार तर प्लेखॅनोव्हपासून निव्वळ तात्त्विक मतभेद दाखविण्यांत लेनिननें काय मिळविलें? लेनिनचें या प्रश्नास उत्तर असें होतें, कीं क्रांतिकारक युद्ध चालविणें कांहीं वेळ अशक्य होण्याचा धोका पत्करूनहि प्रथम झारचें राज्ययंत्र मोडून तोडून टाकलें पाहिजे व नंतर क्रांतिकारक युद्ध चालविण्यासाठीं स्वतंत्र तयारी केली पाहिजे. अशा प्रकारचें जें युद्ध चालवावयाचें तें जर्मनी व इंग्लंड-फ्रान्स वगैरे संयुक्त राष्ट्रें यांशींहि चालविणें जरूर होतें.

यासाठीं या राष्ट्रांच्या पूर्वेकडील अंकित राष्ट्रांत व त्या राष्ट्रांतील कामगारांत आपापल्या राज्यकर्त्यांविरुद्ध बंडें उत्पन्न करणें व त्या योगें साम्राज्यशाही राष्ट्रांचा पराभव करणें ही लेनिनची योजना होती. झारिस्ट अमलाखालील युक्रेन, फिन्लंड, पोलंड, कॉकेशियन-तुर्कस्तान वगैरे राष्ट्रांस रशियांत क्रांति होतांच स्वातंत्र्य देऊन त्यांतील कामकरी-शेतकरी व मध्यमवर्ग यांना व युरोपिअन राष्ट्रांतील कामगारवर्गांना रशियन क्रांतिकारक सरकारास पाठिंबा देण्यास तो उद्युक्त करणार होता. १९०५ सालीं रूसो-जपानी युद्ध झालें व रशियांत क्रांति झाली. यामुळें चीन, इराण, हिंदुस्थान या सर्व देशांत स्वातंत्र्याची लाट उसळून भयंकर लोकक्षोभ झाले व चीनमध्यें तर १९११ सालीं राज्य-क्रांति झाली. तोच प्रकार या वेळीं अधिक मोठ्या प्रमाणावर होऊन जगभर दडपल्या गेलेल्या जनतेचीं बंडें होतील त्यांचा उपयोग साम्राज्य-शाहीचा जगभर विध्वंस करण्याकडे करतां येईल असें लेनिनचें मत होतें. १९१५ सालीं रशियांतील क्रांतीसंबंधीं नेमका अदमास असा कांहींच करणें शक्य नव्हतें. बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांमधील वरील मतभेद निवळ तात्त्विक होता. तसेंच प्रत्यक्ष राज्यक्रांति १९१७ सालीं घडून आल्यावर जीं निरनिराळीं धोरणें अमलांत आणावीं लागलीं तीं वरील सर्व विचारसरणी-हून पुष्कळ भिन्न होतीं. तरी पण लेनिनची विचारसरणी एकंदरीनें कशी होती हें कळून येण्यास या चर्चेचा ऐतिहासिक दृष्ट्या उपयोग असून पुढें अपेक्षेहून परिस्थिति वेगळी उत्पन्न झाल्यामुळें लेनिननें आपलें धोरण कसें व कां बदललें याचा त्यामुळें चांगला उलगडा होतो.

ट्रॉट्स्कीची भूमिका

मेन्शेव्हिक पुढारी प्लेखॅनोव्ह व बोल्शेव्हिक पुढारी लेनिन यांहून ट्रॉट्स्की-ची विचारसरणी वेगळी होती हें मागें सांगितलेंच आहे. महायुद्ध चालूं असतां रशियांत क्रांति कशी होईल अथवा तिचें स्वरूप कसें असावें या-विषयीं ट्रॉट्स्कीहि आपली योजना १९१५ सालीं मांडीत होता. पॅरिसमध्यें चालविलेल्या 'नॅश स्लोव्हो' या रशियन वृत्तपत्रांत ऑक्टोबर १७, १९१५, या दिवशीच्या लेखांत ट्रॉट्स्की लिहितो—

"रशियन क्रांतीचें स्वरूप व त्यासाठीं कामगारांनीं अमलांत आणावयाचीं

धोरणें यासंबंधींची चर्चा करतांना ज्या ऐतिहासिक प्रश्नाची चर्चा करणें आवश्यक आहे तो हा;—१९०५ पेक्षां आज मध्यम वर्गाची लोकशाही रशियांत अधिक बलवान् आहे कीं दुर्बल आहे ? या प्रश्नास आमचें उत्तर असें आहे कीं, रशियांत खऱ्या अर्थानें क्रांतिकारक स्वरूपाची लोकशाही मुळींच नसल्यानें तेथें मध्यम वर्गीय राष्ट्रीय क्रांति अशक्य आहे. युरोपांत राष्ट्रीय युद्धांचा काळ जसा नाहींसा झाला आहे (व जागतिक युद्धांचा काळ आला आहे) त्याप्रमाणें राष्ट्रीय क्रांतीचाहि काळ मागें पडला आहे. गरीब मध्यम वर्गांत कपट, दौर्बल्य, असंतोष व द्वेषबुद्धि जितकी अधिक काळ नांदूं देण्यांत येईल तितका त्यांचा परिणाम झारशाहीच्या दृष्टीनें वाईट होत जाईल (त्यांच्यांत झारशाहीविरुद्ध क्रांतिकारक वृत्ति बळावेल) हें खरें; पण याचा अर्थ असा नव्हे, कीं कामगारांच्या बरोबरीनें क्रांतिकारक लोकशाही ही क्रांति-कार्यांत स्वतंत्र शक्ति म्हणून उपयोगी पडेल. त्यासाठीं आवश्यक असे पुढारी अथवा सामाजिक वर्ग दोघेहि अस्तित्वांत नाहींत. मात्र गरीब मध्यम वर्गा-तील वाढता असंतोष कामगारांना क्रांतिकार्यांत उत्तेजन देईल हें खरें आहे. शहरी लोकांत व शेतकऱ्यांत असंतोष एकसारखा वाढतो आहेच; पण या असंतोषाचा उपयोग करील असें क्रांतिकारक सामर्थ्य फक्त कामगारांतच आहे आणि १९०५पेक्षां आज हें सामर्थ्य वाढलेलें आहे. म्हणून तात्पुरतें म्हणजे संक्रमणकालचें सरकार—प्रथम निराकार व पुढें ज्यास कांहीं तरी रूप द्यावयाचें असें सरकार—निर्माण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. तर कामगारांच्या हातीं राज्यसत्ता येईल असें कामगारांचें सरकार कसें निर्माण करावयाचें एवढाच प्रश्न उरतो."*

महायुद्धांत दुसऱ्या इंटरनॅशनलचा बळी

'जगांतील कामगारांनो, एक व्हा' हें मार्क्स-एंजल्स यांच्या कम्युनिस्ट मॅनिफेस्टोंतील प्रसिद्ध वचन असून मार्क्सिस्ट अथवा कम्युनिस्ट पंथांतील तें एक महावाक्य आहे. भांडवलशाही ही एकराष्ट्रीय संस्था नसून जागतिक संस्था

*१९१५ सालीं निवळ तात्त्विक महत्त्व असलेल्या प्लेखॅनोव्ह, लेनिन व ट्रॉट्स्की यांच्या या तीन मतांपैकीं ट्रॉट्स्कीचें हें मतच पुष्कळ अंशीं खरें झालें असें वाचकांस पुढें आढळून येईल.

आहे. यामुळें श्रमजीवी वर्गाची पिळणूक होते ती सर्व जगांतील राष्ट्रांत होत असते व म्हणून सोशॅलिस्ट क्रांति करावयाची ती एका राष्ट्रांत करावयाची नसून सगळ्या जगांतील राष्ट्रांत हळूहळू घडवून आणावयाची असते असें मार्क्सिस्ट पंथाचें प्रमुख मत आहे. याच हेतूसाठीं १८६४ मध्यें मार्क्स व त्याचे सहकारी यांनीं पहिला आंतरराष्ट्रीय कामगारसंघ (फर्स्ट इंटरनॅशनल) स्थापन केला; तो १८७२ त मोडला; पुढें १८८९ मध्यें दुसरा आंतरराष्ट्रीय कामगार संघ (सेकंड इंटरनॅशनल) स्थापन करण्यांत आला; याच्या पहिल्या बैठकीस प्लेखॅनोव्ह हजर होता व रशियन मार्क्सिस्ट म्हणजे सोशल डेमोक्रॅट पक्षीय कार्यकर्ते हे या दुसऱ्या इंटरनॅशनलचे सभासद होते, वगैरे हकीकत मागें दिलीच आहे. तसेंच मागें असेंहि सांगितलें आहे, कीं प्लेखॅनोव्ह, लेनिन व ट्रॉट्स्की या तीन मतवाद्यांपैकीं ट्रॉट्स्की व लेनिन यांना रशियांत क्रांति होतांच आंतरराष्ट्रीय क्रांतीचें निशाण हातीं धरावें लागणार व तें धरलेंच पाहिजे असें वाटत होतें. या मतामुळें रशियन क्रांतीसाठीं ज्याप्रमाणें लेनिन युद्धकाळीं आपल्या अनुयायांत मतप्रसार करीत होता त्याप्रमाणें युरोपियन राष्ट्रांतहि क्रांति घडवून आणण्यास काय तजवीज करावी याची चिंतनाहि तो अखंड करीत होता.

१९०७ सालीं स्टटगार्ट येथें, १९१० सालीं कोपेनहेगन येथें व १९१२ सालीं बेसल येथें दुसऱ्या इंटरनॅशनलतर्फे आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट परिषदा भरल्या. त्यांना लेनिन हजर होता व या संस्थेच्या आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट ब्यूरोवर रशियातर्फे प्रतिनिधि होता. स्टटगार्ट (१९०७) येथें जर्मन मार्क्सिस्ट पुढारी रोझा लक्सेंबर्ग हिच्या सहकार्यानें लेनिननें महायुद्धकाळीं लढणाऱ्या राष्ट्रांतील कामगारांनीं कोणतें धोरण ठेवावें याविषयीं एक ठराव तयार केला. या वेळेपासून जर्मनी व इंग्लंड यांची आरमारी व साम्राज्यविषयक स्पर्धा वाढूं लागली. या दोन राष्ट्रांत लवकरच केव्हां तरी युद्धप्रसंग येणार व इतर साम्राज्यवादी राष्ट्रें त्यांत पडून जगांतील राष्ट्रांना एकमेकांची कत्तल करावी लागणार हें भयानक भवितव्य सर्वांना स्टटगार्ट येथें दिसत होतें. रोझा लक्झेंबर्ग व लेनिन यांनीं असा ठराव स्टटगार्ट येथें आणला, कीं अशा प्रकारचें लहान-मोठें युद्ध सुरू झाल्यास युद्धयमान राष्ट्रांतील कामगारांनीं

आपल्या देशांतील भांडवलवाल्या राज्यकर्त्यांविरुद्ध युद्ध पुकारून युद्धयमान राष्ट्रांत यादवी माजवावी व सोशॅलिस्ट स्वरूपाची क्रांति घडवून आणावी. पण अशा प्रकारचा ठराव मंजूर झाल्यास जर्मन सरकार सर्व जर्मन सभासदांना राजद्रोहाखालीं अडकवून टाकील म्हणून जर्मन प्रतिनिधींनीं या ठरावास विरोध केला व त्या स्वरूपांत तो ठराव पास होऊं शकला नाहीं. पुढें १९१२ सालीं बेसल येथील परिषदेंत हा ठराव असाच्या असा पास झाला खरा; पण नंतर दोन वर्षांनीं महायुद्ध सुरू होतांच सर्व सोशॅलिस्टांनीं हातपाय गाळले व यादवीचा कार्यक्रम सोडून आपापल्या राज्यकर्त्यांशीं युद्धाचे कामीं सहकार्य केलें. यामुळें, लेनिनच्या मतें, महायुद्ध सुरू होतांच दुसऱ्या इंटरनॅशनलचा पहिला बळी पडला. दुसरी इंटरनॅशनल या वेळींच ठार झाली.

खरें पाहिलें तर १८८९ सालीं जी दुसरी इंटरनॅशनल स्थापन झाली तिचे पुढारी स्वतःला मार्क्सिस्ट म्हणवीत असले तरी लेनिनइतके कडवे मार्क्सिस्ट सभासद रशियाबाहेरच्या राष्ट्रांतील त्यांत कोणीहि नव्हते. सर्वच युद्धयमान राष्ट्रांत १९१४ सालीं व त्यानंतर जे सोशॅलिस्ट होते त्यांना स्वदेशांत पाठिंबाहि फारसा नव्हता. इंग्लंड, जपान व अमेरिका या राष्ट्रांत नांव घेण्यासारखा सोशॅलिस्ट पक्षच नव्हता. फ्रान्स, ऑस्ट्रिया, हंगेरी व इटली या देशांत सोशॅलिस्ट होते ते अल्पसंख्य होते. खुद्द रशियांतहि झारशाहीपुढें सोशॅलिस्टांचें कांहींहि चालत नव्हतें व महायुद्ध सुरू होतांच कांहीं दिवस तरी पूर्वी वाढत असलेला कामगारांचा असंतोष नाहींसा होऊन बोल्शेव्हिकांचें वर्चस्वहि दबून जाऊं लागलें होतें. यामुळें क्रांतीची असेल नसेल ती आशा भाजून निघाली होती. जर्मनींत जर्मन कायदेमंडळाचे एक-तृतीयांश मतदार सोशॅलिस्ट होते. पण बाकीच्या दोनतृतीयांशांत लष्करी वर्ग, पोलिस, भांडवलदार व मध्यमवर्ग सामील असल्यामुळें त्यांची फळी फोडणें सोशॅलिस्टांना कधींच शक्य नव्हतें. एकाहि युद्धयमान राष्ट्रांत सोशॅलिस्ट सरकार अस्तित्वांत नव्हतें इतकेंच नव्हे, तर सोशॅलिस्टांच्या थोड्याहि पाठिंब्याची एकाहि सरकारला गरज नव्हती. स्वतःला मार्क्सिस्ट, व दुसऱ्या इंटरनॅशनलचे सभासद म्हणविणारे पुढारी कडवे नव्हते हें वर सांगितलेंच. पण त्यांच्या मवाळ धोरणांतहि त्यांची एकजूट नव्हती. ज्या जर्मनींत यांना थोडेंसें संख्याबल होतें, तेथें जगाची परिस्थिति मार्क्सनंतर पुष्कळ

बदलली असल्यानें मार्क्सच्या मतांत पुष्कळसें पाणी मिसळून तें व्यापक व पचनास हलकें करावें असें मार्क्सिस्ट पुढारी प्रतिपादूं लागले. त्यांच्यांत मतभेद होता, तो हें पाणी जाहीरपणें ओतावें कीं मुकाट्यानें ओतावें, एवढ्याच पुरता होता. या मतवाद्यांचे पडसाद व बुडबुडे इतर सर्व देशांतून कमी-अधिक प्रमाणांत उमटत होते. यांपैकीं 'रिव्हिजनिस्ट' अथवा दुरुस्तीवादी यांचें म्हणणें असें होतें कीं, परिस्थिति बदलली असल्यानें आतां मार्क्सचें कम्युनिस्ट क्रांतीचें ध्येय सोडावें अथवा बिनमुदत तहकूब करावें. मध्यम वर्गाशीं व भांडवलवाल्यांशींहि जरूर तर सहकार्य करावें व कामगारवर्गाची परिस्थिति ज्या ज्या मार्गांनीं थोडथोडी सुधारेल त्या त्या मार्गांनीं थोडथोडी सुधारणा ही गोड मानून पदरांत पाडून घ्यावी. मिळेल त्या भिकेस हात पुढें करावा व अधिक भिकेसाठीं (ओ)रडत रहावें असें हें व्यवहारचातुर्याचें धोरण होतें. दुसरा म्हणजे 'रॅडिकल' अथवा जहाल पंथ इतकें प्रांजळपणें तत्त्वत्याग करण्यास तयार नव्हता. क्रांतीची आशा आतां सोडा, त्यासाठीं खटपट करणेंहि सोडा व सुधारणेच्या तुकड्यांचा लाभहि करून घ्या असेंच या पक्षाचें म्हणणें होतें. पण तुकडे चघळतां-चघळतां आम्हांला त्यांची पर्वा नाहीं असा आविर्भाव ठेवून जंगी जाहीर सभांत सुधारणावादाचा निषेध व मध्यमवर्ग व भांडवलदारवर्ग यांच्यांशीं सहकार्याचा निषेध करीत राहून अंतिम क्रांतीची घोषणा उच्चस्वरानें घोषीत राहावें असें या 'जहालां'चें म्हणणें होतें. हाहि पंथ आपणांस अर्थातच व्यवहारचतुर म्हणवीत असे.

रोझा लक्झेंबर्गचें मत

रोझा लक्झेंबर्ग ही मार्क्सिझम् उघड अगर चोरून पातळ करूं पाहणाऱ्या दोनहि पंथांतील नव्हती. पण मूळ मार्क्सिझम्ला धरूनच प्रत्यक्ष क्रांतीचें स्वरूप कसें असावें याविषयीं तिचा लेनिनशीं मतभेद होता. 'आमच्या कार्याची दिशा' (व्हॉट इज टु बी डन्) या पत्रकांत धंदेवाईक क्रांतिकारक सुशिक्षितांचा स्वतंत्र पक्ष असावा व त्यानें कामगारांना, शेतकऱ्यांना व मध्यम वर्गाला क्रांतीकडे रेटीत नेऊन त्यांजकडून क्रांति घडवून आणावी असें लेनिननें प्रतिपादिलें होतें असें मागें सांगितलेंच आहे. रोझा लक्झेंबर्गला अशा स्वतंत्र

क्रांतिकारक पक्षाची उपयुक्तता पटत नसून कामगारवर्ग स्वयंस्फूर्तीनेंच क्रांति घडवून आणील असें तिला वाटत होतें. तसेंच कामगारवर्गास क्रांतीचें कार्मी मध्यमवर्गाचें साहाय्य मिळेल हेंहि तिला पटत नव्हतें. भांडवलशाहीच्या नाशासंबंधीं तिची एक विशिष्ट कल्पना होती व त्या बाबतींतहि लेनिनशीं तिचा मतभेद होता. १९१२ सालीं 'भांडवलाचें केंद्रीकरण' (अॅक्युम्युलेशन ऑफ कॅपिटल) हा ग्रंथ रोझा लक्झेंबर्ग हिनें प्रसिद्ध केला. त्यांत तिनें असें प्रतिपादन केलें होतें, कीं भांडवलवाल्यांनीं मागसलेले प्रदेश जिंकण्याचें कार्य तडीस नेलें व नवीन प्रदेश जिंकण्यास उरला नाहीं म्हणजे भांडवलशाहीचा ऱ्हास होऊं लागेल व जगभर मजूरवर्ग भांडवलशाहीविरुद्ध स्वयंस्फूर्तीनें बंड करील. नंतर जी क्रांति होईल तींत मध्यमवर्गास स्थान राहणार नसून ती एकदम सोशॅलिस्ट क्रांतिच होईल. लेनिनचें यावर असें उत्तर होतें, कीं भांडवलशाहीचा आपोआप ऱ्हास होईल ही कल्पनाच खोटी व आत्मघातकी आहे. क्रांतिकारक पक्षानें क्रांतीची संघटना करून भांडवलशाहीस हाणून पाडलें नाहीं तर केवळ अंगभूत दोषांनीं येणारें केवढेंहि संकट भांडवलशाही अंगभूत गुणांनीं तरूनहि जाईल. तसेंच कामगारवर्ग स्वपराक्रमानें यशस्वी क्रांति करण्याइतका प्रबळ होईपर्यंत वाट पाहणें चुकीचें आहे. देशांत असंतुष्ट असे जे मध्यम व गरीब वर्ग असतात यांचें कामगारवर्गास साहाय्य घेऊन क्रांतिकारक पुढाऱ्यांनीं भांडवलशाहीवर संकट येईल त्या वेळीं लगट करून तिचा पाडाव केला पाहिजे व पूर्ण सोशॅलिस्ट पद्धतीचें नव्हे तरी सोशॅलिझमकडे समाजास खेचत नेईल अशा घटनेचें राज्य स्थापन केलेंच पाहिजे असें लेनिनचें म्हणणें होतें. ट्रॉट्स्कीचें व रोझा लक्झेंबर्गचें मत या बाबतींत बरेंच जुळतें होतें असा एक समज आहे, पण तो सदोष आहे. लेनिनशीं ट्रॉटस्कीचा मतभेद होता तो मध्यम वर्गाचे अंगी क्रांतिकर्तृत्व नाहीं व म्हणून कामगारांनीं स्वबलानेंच क्रांति घडवून कामगारराज्यच स्थापन केलें पाहिजे या ट्रॉट्स्कीच्या मतापुरताच होता. पण भांडवलशाही आपल्या मरणानें मरेल, क्रांति घडवून आणण्यास धंदेवाईक क्रांतिकारकांच्या संघटनेची जरूरी नाहीं असें रोझा लक्झेंबर्गप्रमाणें तो सांगत नाहीं व त्यानें आपल्या आयुष्यांत धंदेवाईक क्रांतिकारकाचीच भूमिका यशस्वितेनें पार पाडली आहे. भांडवलशाहीचा ऱ्हास होण्यास जगांत भांडवलशाहीस जिंकायचें कांहीं उरलें नाहीं अशी स्थिति व्हायला पाहिजे असें तो

मानीत नव्हता. उलट रशियासारख्या मागासलेल्या राष्ट्रांत भांडवलशाहीचा पाडाव करणें कामगारांस पुढारलेल्या राष्ट्रांपेक्षा अधिक सुकर आहे असें त्यानें 'मततात्पर्य व दृष्टिकोन' या लेखांत म्हटलें आहे. (पृ. १०६–१०८पहा) असो.

तिसऱ्या इंटरनॅशनलची जरूरी

महायुद्ध सुरू होतांच बेसल परिषदेचा ठराव धाब्यावर बसवून ज्या वेळीं युद्धयमान राष्ट्रांतील सोशॅलिस्ट पुढारी व कामगारवर्ग आपल्या सरकारला सामील झाले व खांद्यांवर बंदुका टाकून आपल्या विदेशी बांधवांचीं डोकीं फोडण्यासाठीं खंदकांत उतरले त्या वेळीं सेकंड इंटरनॅशनल मेली असें ठरवून आपल्या मताप्रमाणें आंतरराष्ट्रीय जागतिक क्रांति घडवून आणणारी तिसरी इंटरनॅशल स्थापली पाहिजे असें लेनिन प्रतिपादूं लागला. नोव्हेंबर १, १९१४ रोजीं लिहिलेल्या लेखांत तो लिहितो—

"सेकंड इंटरनॅशनलवर संधिसाधुत्वाचा विजय होऊन सेकंड इंटरनॅशनल मेली आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या दीर्घ काळांत भांडवलशाहीची क्रूर गुलामगिरी वाढत जाऊन जी स्मशानशांतता नांदली त्या काळांत कामगारवर्गाची संघटना करण्याचें आवश्यक असें प्राथमिक काम या संस्थेनें केलें आहे. आतां भांडवलशाही सरकारावर क्रांतिकारक हल्ला करणें, सोशॅलिझम्च्या विजयासाठीं मध्यम वर्गास हातीं धरून व सर्व देशांत यादवी माजवून राज्यसत्ता त्याचे हातीं देणें हें कार्य तिसऱ्या इंटरनॅशनलनें करावयाचें आहे."

झिमरवॉल्ड परिषद

महायुद्धाचे आरंभीं सेकंड इंटरनॅशनलचे सभासद बारंगळले आणि त्यांनीं कामगारवर्गासह महायुद्धांत उडी घेतली. तरी थोड्याच दिवसांत पुढाऱ्यांना आपली चूक कळून आली आणि युद्धाचे बाबतींत सोशॅलिस्ट पक्षांनीं राज्यकर्त्यांशीं असहकार करून शत्रुराष्ट्राशीं तह करण्यास व आंतरराष्ट्रीय शांतता करण्यास त्यांना भाग पाडावें असें सोशॅलिस्टांकडून प्रतिपादण्यांत येऊं लागलें. जर्मनींत कॉट्स्की हा या मताचा पुढारी बनला. हा सोलीव शांततावाद लेनिनला पसंत नव्हता. सोशॅलिस्टांनीं केवळ आंतरराष्ट्रीय शांततेसाठीं प्रयत्न न करतां आपापल्या देशांत युद्धाची संधि साधून सोशॅलिस्ट क्रांति घडवून

आणावी असें लेनिनचें मत होतें. वेळ युद्धाची आहे या सबबीवर सोशॅलिस्ट व भांडवलवाले यांमध्यें तात्पुरता राजकीय तह असावा हें मत अमान्य करण्यापुरतेंच लेनिन व कॉट्स्की यांच्यामध्यें मतैक्य होतें. अशा तात्पुरत्या तहास विरोध करणाऱ्यांची एक परिषद १९१५ सालीं सप्टेंबर ५ ते ८ पर्यंत झिमरवॉल्ड (स्वित्सर्लंड) येथें भरली. इंग्लंडच्या पुढाऱ्यांना पासपोर्ट मिळाला नाहीं. बाकीच्या युरोपियन राष्ट्रांतून एकंदर ३० प्रतिनिधि परिषदेस आले. तेथें पास झालेल्या ठरावांत सोशॅलिस्ट व भांडवलवाले यांत युद्धाचे वेळीं तात्पुरता तह करण्याच्या धोरणाचा निषेध करण्यांत येऊन युद्धाविरुद्ध मोहीम करण्याचा ठराव पास करण्यांत आला. पण सोशॅलिस्ट क्रांति प्रत्येक कामगारपक्षानें आपापल्या देशांत घडवून आणावी या लेनिनच्या ठरावास अवघीं सातच मतें अनुकूल पडलीं व तो नापास झाला. यांत विशेष हें, कीं कॉट्स्कीसारखे मवाळ व रोझा लक्झेंबर्गसारखे ज्वलज्जहाल या वेळीं लेनिनविरुद्ध सहमत झाले. लेनिनच्या या विरोधकांची भूमिका कांहींशी आजच्या मॉस्कोच्या थर्ड इंटरनॅशनलसारखी–कॉमिन्टर्नसारखी–होती. सोशॅलिस्ट क्रांतीचें ध्येय जवळ जवळ सोडून देऊन केवळ सुधारणावादी बनावें असें कॉट्स्की म्हणत होता; तर भांडवलशाहीची पूर्ण वाढ होऊन तिचा ऱ्हास सुरू झाल्यावांचून कामगार-क्रांति, सोशॅलिस्ट क्रांति होणार नाहीं असें रोझा लक्झेंबर्गचें म्हणणें होतें. पण युद्धाचे वेळीं कामगारक्रांति शक्य नाहीं एवढ्या मुद्द्यावर त्यांचें एकमत झाल्यामुळें कामगारांची आंतरराष्ट्रीय जूट मोडणारें युद्ध थांबणेंच इष्ट आहे याहि मुद्द्यावर त्यांचें एकमत झालें. आजच्या कॉमिंटर्नची भूमिका कॉट्स्कीची असो कीं लक्झेंबर्गची असो, क्रांतीसाठीं आंतरराष्ट्रीय कामगारांच्या होणाऱ्या ऐक्यापेक्षां आज अधिक महत्त्वाची बाब म्हणजे सोव्हियट रशियाचें रक्षण करण्यासाठीं महायुद्ध टाळणें इष्ट आहे असें कॉमिंटर्न जगांतील कामगार वर्गास शिकवीत आहे. लेनिननें आज कोणती भूमिका घेतली असती हा प्रश्न चर्चिणें आज व्यर्थ असलें तरी १९१५ सालीं सोशॅलिस्ट क्रांतीची तयारी न करतां निवळ आंतरराष्ट्रीय शांततेची जपमाळ घेणें हें लेनिनला नुसतें निरुपयोगीच नव्हे, तर अपायकारक आहे असें वाटत होतें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. १९१६चे ईस्टरमध्यें झिमरवॉल्डसारखींच एक परिषद केंथॉल येथें भरली. त्या वेळीं लेनिनला थोडा अधिक पाठिंबा मिळाला, पण त्याचा

ठराव नापास झाला. सोशॅलिस्ट क्रांति कांहींशी पश्चिम युरोपांत अशक्य झाली आहे हें लेनिनलाहि दिसत नव्हतें असें नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रांच्या भांडवलशाहीस बरकत आल्यानें कांहीं मजुरांचे पगार वाढले व त्यांच्यांतच एक मध्यम वर्ग निर्माण होऊन त्यानें क्रांतिकारक असंतोषाची धार बोथट करून टाकली होती हें लक्षांत येण्याइतकी सूक्ष्म बुद्धि त्याला नेहमींच होती. १९१६च्या ऑक्टोबरमध्यें लेनिन लिहितो,

"प्रगतिपर भांडवलशाही राष्ट्रांत मध्यम वर्गीय मजूरपक्ष हा एक राजकीय महत्त्वाचा गट होऊन बसला आहे ही गोष्ट खरी आहे." पण यासाठीं नुसती शांतिवादाची जपमाळ घेऊन न बसतां "अशा मध्यमवर्गीय मजूर पक्षाशीं निकरानें लढा देण्याची तयारी करणें अवश्य आहे. एरवीं नुसत्या 'साम्राज्यशाहीचा धिक्कार', 'मार्क्सिस्ट चळवळ', 'मजूर चळवळ' वगैरे पोकळ बडबडींत कांहीं अर्थ नाहीं. अशा प्रकारचा निकराचा सामना दिल्यावांचून हे पक्ष आपोआप विरून जातील असें समजण्यास कांहींहि आधार नाहीं." यावरून सोशॅलिस्ट क्रांतीची युरोपांतं तयारी नाहीं ही माहिती नसल्यामुळें लेनिन त्या क्रांतीची घोषणा उराशीं घेऊन बसला होता असें मॅक्डोनाल्डपासून लिटव्हिनॉफपर्यंत आज कोणासहि म्हणतां येणार नाहीं. लेनिनची भूमिका धाडसाची, धोक्याची होती हें खरें; पण बोलूनचालून ती क्रांतीची भूमिका होती. सोशॅलिस्ट क्रांति न करतां नुसतें लष्करांत न शिरणें व युद्ध थांबविणें यामुळें साम्राज्यवाद्यांतील भांडणें मिटणें एवढेंच घडून आलें असतें. त्यानें साम्राज्यशाही दुर्बळ न होतां अधिकच सुदृढ झाली असती. त्यापेक्षां साम्राज्यशाहीच्या अडचणींच्या वेळीं कामगारांना क्रांतीकडे रेटीत नेण्यानें आज ना उद्यां, या देशांत नाहीं तर त्या देशांत क्रांतीस अनुकूलता उत्पन्न झाली असती व तेथें यशस्वी क्रांति झाल्यास क्रांतीची आग तेथून दुसरीकडे पसरवितां आली असती अशी लेनिनची विचारसरणी होती. १९१७च्या जानेवारी २२* रोजीं १९०५च्या क्रांतीच्या वाढदिवससमारंभांत झूरिच येथें भाषण करितांना तो महायुद्धांतील धोरणा-विषयीं सांगतो—

---

* रशियन कॅलेंडरप्रमाणें ता. ९ जानेवारी.

"१८७१च्या पॅरिस कम्यूनचा इतिहास तसेंच १९०५च्या रशियन क्रांतीचा अनुभव निःसंदेहपणें असें शिकवितो कीं, राष्ट्रीय सैन्याच्या एका विभागाच्या साह्यानें दुसऱ्या सैन्यविभागाशीं झगडा केल्यावांचून, नुसता लष्करशाहीचा केव्हांहि धिक्कार करण्याचा, तिला शिव्या देण्याचा कांहीं उपयोग नाहीं. लष्करशाहीशीं शांततापूर्वक असहकार करणें मूर्खपणाचें आहे. कामगारवर्गाची क्रांतिकारक भावना भडकवीत राहणें, त्यांतील हुषार कामगारांना क्रांतीचें शिक्षण देणें, निवळ ढोबळ स्वरूपाचें नव्हे तर प्रत्यक्ष स्वरूपाचें शिक्षण देणें अवश्य आहे. अशा योगानें लोकक्षोभ कळसास पोंचला तर तोच क्रांतिकारक सैन्याचें पुढारीपण घेऊन क्रांति घडवून आणतो."

महायुद्धाच्या त्या वेळेपुरतेंच लेनिनचें हें धोरण होतें असें नव्हे. अशीं महायुद्धें वरचेवर येणार व सर्व वेळीं क्रांतिकारक लढा वाढवीत राहून संधि येतांच क्रांति घडवून आणावी अशी त्याची विचारसरणी होती. याच व्याख्यानांत लेनिन शेवटीं सांगतो,—

"आम्ही जुन्या पिढींतील माणसें येत्या क्रांतीचा निर्णायक लढा पाहण्यास कदाचित् जगणार नाहीं. पण स्वित्सर्लंडांतील सोशॅलिस्ट चळवळींत उत्कृष्टपणें काम करीत असलेले तरुण येत्या कामगारक्रांतींत लढतील एवढेंच नव्हे तर अखेर यशस्वीहि होतील."

लेनिन या वेळीं सत्तेचाळीस वर्षांचा होता व आपल्या जीवमानांत ही कामगारक्रांति कदाचित् घडणार नाहीं अशी त्यास भीति वाटत होती. पण तरीहि क्रांतीची तार ढिली सोडण्यास व आंतरराष्ट्रीय शांततेच्या अटीवर साम्राज्यशाहीशीं तडजोड करण्यास तो या वेळीं तयार नव्हता. संधि लवकर येवो अथवा कितीहि उशीरां येवो तडजोडीची भाषा न बोलतां कामगारक्रांतीची तयारी करीत राहावें व आंतरराष्ट्रीय युद्धाचें यादवी युद्ध बनवावें असें तो सांगत होता. त्याचें हें मत त्याच्या अंदाजाहून पुष्कळ अधिक लवकर खरें ठरलें. निवळ शांततावाद्यांच्या शांतिपाठानें युद्ध थांबलें नाहीं. युद्धामुळेंच युद्धाचे शेवटीं ऑस्ट्रिया, जर्मनी या साम्राज्यांचीं हाडें खिळखिळीं झालीं. १९१५ सालीं युद्ध थांबलें असतें तर कामगारांचें बळ भांडवलवाल्यांशीं तुलनेनें

जितकें राहिलें असतें त्यापेक्षां १९१८ सालीं युद्ध थांबल्यावर पुष्कळच वाढलें; आणि खुद्द रशियांत युद्ध चालू असून कामगारक्रांतीची तयारीहि चालू असल्यामुळें लेनिनच्या वरील भाषणानंतर दोन महिन्यांचे आंत झारशाही धुळीस मिळाली व एक वर्षांत कामगारक्रांति होऊन लेनिन विजयी झाला. कॉट्स्कीच्या आंतरराष्ट्रीय शांतिवादानुसार १९१५ सालीं युद्ध थांबतें तर रशियन कामगारक्रांतीचा दिवस बिनमुदत लांबणीवर पडला असता.



प्रकरण ७ वें

झारिस्ट रशिया व महायुद्ध (१९१४-१९१६)

क्रांतीची लाट दबली

१९१०-१९१४ या कालांत कारखानदारीची वाढ होऊं लागली तसतशी रशियांत कामगार-चळवळ, दडपशाही व क्रांतिकारक असंतोष यांचीहि वाढ होत गेली असें पांचव्या प्रकरणांत सांगितलें आहे. १९१४च्या ऑगस्टच्या आरंभीं रशियानें ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारलें व जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, वगैरे युरोपांतील सर्व बलाढ्य राष्ट्रें युद्धांत खेचलीं गेलीं. महायुद्धास सुरुवात होतांच रशियांतील कामगारचळवळींचें रूप एकदम पालटूं लागलें. "युद्धाच्या नौबदीवर पहिलें टिपरूं पडतांच त्याच्या दचक्यानें क्रांतिकारक चळवळ थंडावली. विशेष चळवळ्ये वर्ग सैन्यांत ओढण्यांत आले. क्रांतिकारक कामगारांची कारखान्यांतून उचलबांगडी होऊन युद्धाच्या आघाडीवर त्यांची रवानगी करण्यांत आली. संपांबद्दल कडक शासन होऊं लागलें. कामगारांचे छापखाने सर्रहा बंदच करण्यांत आले. कामगार-संघटना बुडविण्यांत आल्या. शेतकऱ्यांचीं बायका-मुलें यांची कारखान्यांतून नवी भरती करण्यांत आली. महायुद्धाचा गाजावाजा, व निरनिराळ्या राष्ट्रांतील कामगार पक्षांनीं युद्धांत सामील होऊन दुसऱ्या इंटरनॅशनलनें केलेली आत्महत्या, यामुळें रशियन कामगारांना सरकारहून वेगळें राजकीय धोरण राहिलेंच नाहीं. कारखानदारांना कारखान्याचें कल्याण तें राष्ट्राचें कल्याण अशी भाषा जाहीरपणें बोलतां येऊं लागून कामगारांनाहि त्याची भुरळ पडूं लागली. कामगारांतील क्रांतिकारक व्यक्तींना तोंडास खीळ घालून कांहीं काळ वाट पाहत बसणें भाग झालें. अगदीं लहान लहान गटांत क्रांतिकारक ध्येयवाद छपून राहिला. त्या वेळीं 'मी बोल्शेव्हिक आहें' असें बोलण्याचें कोणासहि धैर्य होत नसे. केवळ सरकारच्या भीतीनें नव्हे तर राजकीय दृष्ट्या कच्चे असलेले

कामगार बोल्शेव्हिक म्हणविणाऱ्यांना देशद्रोही समजून पिटून काढीत, म्हणूनहि जाहीरपणें बोल्शेव्हिझम् बोलण्याची सोय नव्हती; डयूमामधील बोल्शेव्हिक सभासदहि दुर्बल होते. 'सरकारी धोरणास विरोध करण्यासाठीं आम्हांला लोकांच्या संस्कृतीचें रक्षण करावयाचें आहे' असा मेन्शेव्हिकांप्रमाणें एक जाहीरनामा त्यांनीं काढला. या धंदेवाईक क्रांतिकारकांचें (बोल्शेव्हिकांचें) निशाण इतकें संस्कृतिसपाट झालेलें पाहून डयूमामधील भांडवलवाल्या पक्षानें आपली पाठ थोपटून घेतली. रशियाचा पराभव झाला पाहिजे ही लेनिनची भूमिका रशियांत कोणीहि त्या वेळीं घेतली नव्हती. अर्थात् बोल्शेव्हिकांनीं नेरॉड्निक अथवा मेन्शेव्हिक यांचेप्रमाणें 'देशभक्ती'चें व्रत पत्करलें नव्हतें. युद्ध सुरू होतांच डयूमाबाहेरील बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनीं युद्धाविरुद्ध लेखी व तोंडी गुप्त मतप्रचार हळूहळू सुरू केला. डयूमांतील बोल्शेव्हिक सभासदहि हळूहळू आपलें क्रांतिकार्य हातीं घेऊं लागले. पण झारिस्ट सरकारच्या हेरांनीं बोल्शेव्हिकांच्या अगदीं काळजांत प्रवेश केला होता. पीटर्सबर्ग बोल्शेव्हिक कमिटीच्या सात सभासदांपैकीं तिघेजण गुप्तपोलीस होते. १९१४च्या नोव्हेंबरमध्यें डयूमामधील बोल्शेव्हिक सभासदांस अटक करण्यांत आली. सप्टेंबर १९१४मध्यें लेनिननें युद्धाविषयींचा आपला जो 'सिद्धांत' प्रसिद्ध केला होता तदनुसार झारिस्ट रशियाचा पराभव व्हावा व रशियांत क्रांति व्हावी या धोरणाचा पुरस्कार केल्यामुळें त्यांनाहि अटक करण्यांत आली होती. १९१५च्या फेब्रुवारींत त्यांचा खटला कोर्टांत गेला. या वेळीं लेनिनचा सिद्धांत मूळ उचलून धरणारा कॅमेनेव्ह यानें व पेट्रॉव्हस्की यानेंहि लेनिनच्या भूमिकेंतून माघार घेतली. तरी पण सर्वांना सैबेरियांत हद्दपार करून सक्तमजुरीच्या शिक्षा देण्यांत आल्या.

यामुळें तर क्रांतीचा बुडबुडाहि दिसेनासा झाला. शांतिप्रिय कामगारांची नवी जातच पेट्रोग्रॅडमध्यें* निर्माण झाल्यासारखी दिसली. आणि कांहींसें तें खरेंच होतें. कारण अनुभवी क्रांतिकारक कामगारांची रणांगणावर भरती झाल्यानंतर नवीन भरती करण्यांत आलेल्या मजुरांत क्रांतिकारक जागृतीचा पूर्ण अभावच झाला. व सरकारी मतप्रचारामुळें सरकारनिष्ठा व देशभक्ति

* युद्ध सुरू झाल्यानंतर पीटर्सबर्गला पेट्रोग्रॅड असें नांव देण्यांत आलें.

यांची लाट स्वाभाविकपणेंच उसळली. "कामगार राजद्रोह शोधून काढीत आहेत, फितुरांचा पिच्छा पुरवीत आहेत व रणांगणांत रशियाचा पराजय होतो त्यास जबाबदार कोण याचा तलास काढीत आहेत," असें कामगारांच्या देशभक्तीचें व राजनिष्ठेचें वर्णन सरकारी मंत्री १९१५च्या ऑगस्टमध्यें एकमेकांस सांगत होते. जर्मनीकडून रशियाचा पराभव होणें म्हणजे स्वदेश परतंत्र होणें हें मत सहज पटण्यासारखें होतें. स्वदेशसंरक्षणाच्या मुद्द्यावर त्या वेळीं स्वदेशाभिमानास व झारिस्ट सरकारला पाठिंबा देण्याच्या धोरणास विलक्षण भरती येऊन कामगारहि तींत कांहीं काळ वाहवले गेले.

वादळ जमूं लागलें

पण ही वादळापूर्वीची शांतता होती. कामगारांच्या खालच्या थरांत वादळ जोमानें जमूं लागलें होतें. युद्ध चालू राहिलें, तसा देशांत अन्नाचा तुटवडा पडूं लागला. युद्धास लागणाऱ्या मालाच्या कारखान्यांतील कामगार शिस्तीच्या कैचींत असल्यानें ते भुकेल्या पोटीं निमूटपणें राबत. पण गांवोगांव बायका, मुलें, म्हातारीं माणसें यांच्यांत उपासमारीनें असंतोष पसरला व गांवोगांव दंगेहि होऊं लागले. युद्धामुळें महागाई वाढली, धंदेवाल्यांना नफ्याची हाव सुटली व त्यांनीं नवीन कामगारांना कमी पगारावर कामें दिलीं. यामुळें बाजारभाव व मजुरीचे दर या दोनहि दृष्टींनीं कामगारांची मिळकत घटली. तेव्हां देशभक्त कामगारांतहि हळूहळू आर्थिक संपांची लाट पसरली. क्रांतिकारक पुढाऱ्यांनीं या संधींत आपला मतप्रचार सुरू केला व संपांच्या सभांतून राजकीय विरोधाचे ठराव होऊं लागले. सरकार व कारखानदार यांनीं रेसभरहि माघार घ्यावयाची नाहीं असें ठरविलेलें असल्यानें संप व सभा यांचें पर्यवसान गोळीबारांत होऊं लागलें. रणांगणावर शत्रूच्या हातून मरूं लागलेल्या कामगारांचे भाई स्वदेशांत पोलिसांकडून मारले जाऊं लागले. १९१५ च्या जूनमध्यें कापड-गिरण्यांत असंतोष माजला. जून २ला कॉस्ट्रोमा येथील कोष्ट्यांच्या जमावावर गोळीबार करून पोलीसनें ४ कोष्टी ठार मारले व ९ जखमी केले. ऑगस्ट १०ला इव्हॅनोव्हो व्होझ्नेसेन्स्क येथील कामगारांवर गोळीबार होऊन १६ मेले व ३० जखमी झाले. सैनिकांच्या स्थानिक तुकड्या संपवाल्यांत सामील होऊं लागल्या इव्हॅनोव्हो येथील गोळीबाराचा निषेध

करण्यासाठीं जागोजाग सहानुभूतीचे संप होऊं लागले. आर्थिक मागण्यांसाठीं संप वाढतच होते व त्यांना हळूहळू राजकीय संपांचें स्वरूप येतच होतें. कापड-कारखान्यांतील कामगार या असंतोषनिदर्शनांत या वेळीं आघाडीवर होते. १९१५च्या ऑगस्टमध्यें सरकारी मंत्री कसे खुषींत बोलत होते हें वर दिलें आहे. पण कांहीं थोड्यांना वस्तुस्थिति कळत होती. ख्वोस्टॉव्ह हा न्यायमंत्रि ऑगस्टमध्येंच म्हणाला, "कामगारांना संघटना नाहीं म्हणूनच ते शस्त्र धारण करीत नाहींत." या सर्व असंतोषास मुख्यतः बोल्शेव्हिक जबाबदार आहेत ही गोष्ट भांडवलवाल्यांनीं ताडली व मेन्शेव्हिकांशीं संगनमत सुरू केलें. पोलीसलाहि या मवाळ सोशॅलिस्टांबद्दल विश्वास असून यांच्यामुळें युद्धाचे वेळीं राज्यक्रांति होण्याचें टळेल असें वाटत होतें. म्हणून भांडवलवाले व मेन्शेव्हिक यांच्या संगनमतास पोलीसनें उत्तेजन दिलें. पेट्रोग्रॅडमध्यें स्थापन झालेल्या युद्धसाहित्यकमिटीवर कामगारांचे प्रतिनिधि निवडून घेण्यांत आले. या वेळीं बोल्शेव्हिकांनीं कमिटीवर बहिष्कार घालावा असें प्रतिपादिलें होतें व मेन्शेव्हिकांनीं सहकार पुरस्कारिला होता. ग्वोझ्डेव्ह नांवाचा धातु-कारखान्यांतील कामगार कांहीं अनुयायांसह कमिटीवर निवडून आला. कमिटीच्या एकंदर सभासदांत हे कामगार अत्यल्पसंख्य होते. पण भांडवलवाल्यांच्या व सरकारच्या प्रतिनिधींनींहि त्यांची तोंडपाटिलकी खपवून घेऊन त्यांचें सहकार्य मिळवावयाचें ठरविलें होतें. "हल्लींची नोकरशाही अधिकार-भ्रष्ट करून तुम्ही सर्व सत्ता आपल्या हातीं घ्या" असा कमिटीवरील एका मेन्शेव्हिक सभासदानें कमिटीस सल्ला दिला व कारखानदारांनाहि मेन्शेव्हिकांना वाटणाऱ्या राष्ट्राच्या या आस्थेबद्दल समाधान वाटलें.

गुप्त मतप्रचाराचें बोल्शेव्हिकांचें कार्य हळूहळू वाढत होतेंच. पोलीस खात्यांतील नोंद सांगते,

"बोल्शेव्हिकांची पेट्रोग्रॅड, मॉस्को, खार्कॉव्ह, कीव, टयुला, कॉस्ट्रोमा, व्हाल्डिमीर प्रांत, समारा वगैरे जीं मोठमोठीं गुप्त केंद्रें होतीं तेथून लेनिनचे अनुयायी युद्ध थांबविण्याच्या व झारशाही उलथून पाडण्याच्या घोषणा कामगारांत गुप्तपणें पसरवीत होते. कामगारांचे संप व दंगे यांत या मत-प्रसाराचे पडसाद उमटत असत."

जानेवारी ९ हा १९०५ च्या क्रांतीचा संस्मरणीय आरंभदिन. १९१५ सालीं

तो शांतपणें पार पडला. पण १९१५ सालभर संप वाढत गेले. त्यांना सरकार-विरुद्ध मधून मधून सैनिकांची मदत मिळते हेंहि पोलिसच्या लक्षांत आलें. आणि १९१६च्या जानेवारीच्या ९ तारखेस १९०५च्या क्रांतीच्या वाढ-दिवसानिमित्त देशभर संप होऊन पोलीस व कामगार यांच्या चकमकी झाल्या. लवकरच युद्धसाहित्यकमिटीवर नोकरशाहीचा ताबा असावा, कीं भांडवल-वाल्यांचा असावा याबद्दल दुही माजली. कापडासारखे लोकोपयोगी मालाचे कारखाने कमी करून कामगारांची भरती युद्धसाहित्याकडे होऊं लागली. यामुळें बाजार आणखी आणखी महागून संपांची वाढ होऊं लागली.

"१९१६ च्या अखेरीस बाजारभाव भराभर वाढूं लागले. मालाची वाहतूक नीटशी होईना, यामुळें अन्नद्रव्यें अजिबात मिळेनाशींच झालीं. दोन वेळच्या जेवणाऐवजीं एक वेळच्या अन्नासहि फाके पडूं लागले. चळवळ जोरावली. ऑक्टोबरमध्यें सर्व तुटक चळवळी एकजीव झाल्या. कारखान्यांतून सभांवर सभा होऊं लागल्या. अन्नाचा तुटवडा, महागाई, युद्ध व राज्यक्रांति हेच सर्वत्र चर्चेचे विषय होते. बोल्शेव्हिकांचीं पत्रकें वाटलीं जात होतीं. राजकीय संप भडकत होते. कारखान्यांतून असंतोषनिदर्शनें संघटितपणें केलीं जात. कांहीं कारखान्यांतून संपवाले व सैनिक हे बंधुभाव व्यक्त करीत. बाल्टिक आरमारांतील खलाशांनीं बंड केलें त्यांवर खटला झाला. त्या खटल्याविरुद्ध सर्वत्र निषेधप्रदर्शक संप झाले. कामगारांची कड घेऊन कांहीं सैनिकांनीं पोलिसांवर गोळ्या घातल्या. नोव्हेंबरमध्यें चळवळ्या कामगारांची मोठी संख्या रणांगणावर पाठवावी लागली. सालअखेर जिकडे तिकडे वादळ व गडगडाट सुरू होता." (हिस्टरी ऑफ् रशियन रेव्होल्यूशन; ट्रॉट्स्कीकृत)

बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीचा सभासद व पूर्वीचा धातु-कामगार शिलआ-प्निकोव्ह लिहितो, "एकादी शीळ अथवा दुसरा एकादा आकस्मिक आवाज झाला तर कामगारांना ही संप पुकारण्याची खूण आहे असें वाटून ते एकदम कारखाना बंद पाडीत." पेट्रोग्रॅडहून देशाच्या आंतरभागांत असंतोष भराभर पसरत होता. कापडकारखान्यांतला असंतोष धातु कामगारांतहि पसरला. सर्वच आर्थिक संपांनीं राजकीय स्वरूप धारण केलें." संपांत सहा लक्ष कामगार सामील झाले होते. पेट्रोग्रॅड व मॉस्को येथील

कामगारांचा यांत फार मोठा हिस्सा होता. जानेवारीच्या ८ तारखेस पोलिसांनीं निरनिराळ्या चळवळींच्या केन्द्रांवर छापे घालून पुढाऱ्यांची धरपकड केली व धाकदपटशा दाखविला. जानेवारी ९ रोजीं १९०५च्या क्रांतीच्या वाढदिवसानिमित्त पेट्रोग्रॅडमध्यें दीडलक्ष कामगार संपावर गेले. असंतोष निकरावर गेला होता. धातुकामगारांकडे या वेळीं पुढारीपण गेलें होतें. फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यांत क्रांतिकारक सभांचा महापूर आला. फेब्रुवारीच्या ८ तारखेस प्युटिलॉव्ह कारखान्यांत पोलिसांस शिवीगाळ करून कामगारांनीं त्यांवर लोखंडाचे तुकडे फेकले. १४ फेब्रुवारी रोजीं ड्यूमाचें अधिवेशन सुरू झालें. त्या दिवशीं पेट्रोग्रॅडमध्यें ९० हजार कामगार संपावर होते. मॉस्कोंतहि अनेक कारखाने बंद पडले. १६ तारखेस अधिकाऱ्यांनीं अन्न-विक्रीचीं तिकिटें काढलीं. यामुळें कामगारांस पोटाची अनिश्चिति वाटून १९ तारखेस बायकामुलांनीं अन्नाच्या दुकानांना गराडे घातले; लुटालूटहि पुष्कळ झाली. चारच दिवसांनीं उठणाऱ्या क्रांतीच्या वादळापूर्वीची ही केवळ विजेची चकमक होती."

शेतकरी आणि महायुद्ध

कामगारांच्या मानानें खेडोपाड्यांतला शेतकरीवर्ग मागसलेला होता. १९०५ च्या क्रांतीनंतर सर्वत्र जी दडपशाही झाली तींत शेतकऱ्यांची दामटी वळली. स्टोलिपिनच्या शेतीविषयक धोरणानें असंतुष्ट पण सधन शेतकऱ्यांस जमिनी विकत मिळूं लागल्या व ग्रामसंस्थेंतून मालकीचा जमिनीचा हिस्सा घेऊन फुटून निघण्याची शेतकऱ्यांना मुभा मिळाली. या सर्व कारणांमुळें १९०८पर्यंत शेतकऱ्याचा असंतोष कमी झाला होता. पण १९०८ पासून पुन्हा त्याची वाढ सुरू झाली. ग्रामसंस्थेच्या जमिनीच्या वाटणीबद्दल शेतकऱ्यांच्या आपसांत मारामाऱ्या होऊं लागल्या. जमिनदारांच्या इस्टेटींचीहि जाळपोळ होऊं लागली. महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत हा प्रकार असाच वाढत होता. युद्धानें या आगींत तेल ओतलें. सुमारें एक कोटि तरुण शेतकऱ्यांना सैनिक व कामगार करण्यासाठीं सरकारनें रणांगणावर अथवा शहरांत पाठविलें. २० लक्ष घोडा खेड्यांतून आघाडीवर गेला. यामुळें शेतीचें नुकसान होऊं लागलें. पेरण्यास घोडीं व माणसें यांचा तुटवडा पडूं लागला. यामुळें खेड्यांतून

युद्धास विरोध एकसारखा वाढूं लागला. खेड्यापाड्यांतून विमा-एजंट, शिक्षक, दुकानदार, व्यापारी व शेतकरी रशियाचा युद्धांत पराजय होणार असें ऑक्टोबर १९१६ मध्यें उघड बोलूं लागले. राजकीय प्रश्नांची चर्चा उघडपणें होऊं लागली. बडे व्यापारी व जमिनदार यांविरुद्ध शेतकऱ्यांच्या सभांतून ठराव होऊं लागले. स्टोलिपिनच्या शेतीविषयक धोरणानें कांहीं शेतकरी मालक बनले तरी शेतीचा मागसलेपणा फारसा कमी होऊं शकला नाहीं. त्यावांचून शेतकऱ्यांतील असंतोष शमणें अशक्य होतें. पण शेतीची प्रगति ही बाबहि कांहीं सहज शक्य कोटींतील नव्हती. रशियन सरकारचे मंत्री व रशियांतील फ्रेंच वकील पॅलेलोग यांचेमध्यें शेती-सुधारणेसंबंधीं चर्चा झाली असतां पुढील माहिती बाहेर आली;—

"शेतीच्या धंद्यांत मूलग्राही सुधारणा करण्यासाठीं शेतीची पाहणी करणारे ३ लक्ष तज्ज्ञ १५ वर्षेपर्यंत कामावर नेमले पाहिजेत. पण त्या वेळेपर्यंत लोकसंख्या वाढून आज केलेलें सर्व अंदाज चूक ठरतील."

सामान्य शेतकऱ्यांस एवढें प्रचंड गणित मुळींच कळत नव्हतें. आधीं जमिनदारांचा पाडाव करून मग सगळी जमीन वाटून घेऊं असा त्यांचा सीधा कार्यक्रम होता. नांगऱ्या शेतकरी एवढ्याच नात्यानें शेतकरी स्वतः दुबळा होता. त्या नात्यानें त्याचा कार्यक्रम पार पाडणें त्याला शक्य नव्हतें. पण शेतकऱ्यांतीलच हजारों माणसें सैनिक झालीं होतीं. त्यांची मदत शेतकऱ्यांस शेवटीं मिळाली.

सैनिकच युद्धास वैतागले

रशियन क्रांतीचें पुढारीपण कामगारांनींच आरंभापासून अखेरपर्यंत केलें हें खरें; पण झारशाहीचा अखेर पाडाव झाला, तो सैन्य कामकऱ्यांच्या बंडांत सामील झाल्यामुळेंच झाला. रशियाचें सैन्यबल महायुद्धांत कोणत्याहि दुसऱ्या एका राष्ट्रापेक्षां अधिक म्हणजे दीडकोट होतें. पण या सैन्याचा विध्वंस झाला तोहि इतर कोणत्याहि राष्ट्राचा झाला नाहीं इतका पुष्कळ झाला. एकट्या रशियाचे पंचवीस लक्ष म्हणजे सर्व संयुक्त राष्ट्रांच्या चाळीस टक्के सैनिक युद्धांत ठार झाले. जर्मनी व इंग्लंड-फ्रान्स या राष्ट्रांच्या सैन्याचे मानानें रशियन सैन्य अत्यंत मागासलेलें व कुचकामाचें होतें.

युद्धांतील पहिले कांहीं महिने रशियाला यश आलें त्याचें कारण ऑस्ट्रियन-सैन्य रशियन सैन्यापेक्षांहि कमकुवत होतें म्हणून. पण जर्मन आघाडीवर तोंड पडल्यावर रशियाचा एकसारखा धुव्वा उडत चालला. सैनिकांसारखेच सेनापतिहि कुचकामाचे होते. तुर्क, पोल्स, इराणी यांसारख्या मागासलेल्या राष्ट्रांवर यापूर्वी रशियन सैन्यानें विजय मिळविले होते. पण आधुनिक शस्त्रास्त्रें व शिक्षण यांनीं सज्ज असलेल्या बुटक्या जपान्यांनीं हडेलहप्प रशियनांस १९०४-५ च्या युद्धांत यथास्थित चोपलें होतें. जपान्यांपेक्षांहि अधिक युद्धपटु अशा जर्मनांशीं १९१४ सालीं प्रसंग आल्यावर रशियन सैन्याची सपशेल धूळधाण झाली. पहिल्या पहिल्यानें जर्मन तोफेचा गोळा आला, कीं त्यापुढें रशियन सैनिक फारसा विचार न करतां आपला देह अंथरीत व मुडदा करून घेत. पुढें अन्नाचा तुटवडा पडूं लागला. पायांत बूट नाहींत म्हणून अनवाणीच रण तुडवावें लागूं लागलें. सेनापतींनीं केलेल्या सैन्यांच्या अनेक हालचाली व्यर्थ व चुकीच्या ठरून सैनिकांची मात्र सेनापतींच्या मूर्खपणानें कत्तल होत आहे असें सैनिकांच्या लक्षांत येऊं लागलें. सेनापति आपल्या चुक्यांचा राग सैनिकांवर काढूं लागले. गॅलीशियांतून पीछेहाट करीत असतां रण सोडून जाणाऱ्या सैनिकांस फटके मारावे असा गुप्त हुकूम सर सेनापतींनीं काढला. तेव्हांपासून "अगदीं क्षुल्लक गुन्ह्यासाठीं फटके बसूं लागले. थोडा वेळ परवानगीवांचून गैर राहणाऱ्यालाहि फटके बसूं लागले. इतकेंच नव्हे तर सैनिकांना लढाईस चेव यावा म्हणूनहि फटके मारण्यांत येऊं लागले." लढाईच्या सुरुवातीस सैनिकांत जो आत्मविश्वास होता तो एक वर्षांत एकसारखे पराभवांमागून पराभव येऊं लागल्यामुळें मावळून जाऊन रशियाचा पराभव होणार अशी सैनिकांची खात्री झाली. "यामुळें प्रत्येकाला कोणी तरी युद्ध थांबवावें, विजय रशियाचा न झाला तर जर्मनीचा होवो, तह होईल तो कसाहि होवो, कांहींहि होवो, पण आतां युद्ध नको" अशी सर्वसामान्य सैनिकांत ओरड चालू झाली. "रिगा प्रांतांतून सैनिक आले ते बेदिल होऊनच आले. हल्ल्याचा हुकूम त्यांनीं अमान्य केला. संगिनी दाखवून त्यांनीं एका कंपनी कमांडरची हकालपट्टी केली. शेवटीं कित्येक सैनिकांना गोळ्या घातल्या तेव्हां ती तुकडी

अधिकाऱ्यांच्या कह्यांत आली." "क्रांतीचे वेळीं अखेरीस सैनिक बंडांत सामील झाले; पण त्यांची तयारी क्रांतीचे फार पूर्वीपासूनच चालली होती. क्रांतिप्रचारकांनीं या तयारीच्या कार्यांत पुष्कळ भाग घेतला होता. सैन्याची एकंदर प्रवृत्ति भयानक झाली होती. सैन्याजवळ येणाऱ्या सर्वांची खात्री झाली, कीं सर्व सैन्य पूर्णपणें बेदिल झालें आहे."

भांडवलवाल्यांची पोळी पिकली

पण शेतकरी, कामकरी व सैनिक या सर्वांना अशा प्रकारें युद्धाचा वैताग आला असतां भांडवलवाल्यांना युद्धाचा मनस्वी हुरूप आला होता; आणि त्याचें कारण अगदीं उघड होतें. देशांतील कारखान्यांना युद्धोपयोगी मालाची मागणी वाढूं लागली. आणि युद्धाच्या नांवावर सरकारी तिजोरींतून निघणारा पैसा भांडवलवाल्यांच्या तिजोऱ्यांत महापूर आलेल्या गंगेप्रमाणें दुथडयांनीं भरून वाहूं लागला. रायबुशिन्स्कीच्या कापड कारखान्यास १९१४-१५ सालीं भांडवलाच्या ७५ टक्के निवळ नफा झाला. ट्वर कंपनीला १११ टक्के नफा झाला. कोल्चुगिनच्या तांब्याच्या कारखान्यांत १ कोटि भांडवल होतें तें निघून त्याला सव्वा कोटी निवळ नफा युद्धानें दिला. भांडवलवाल्यांना देशाभिमान असा फायदेशीर पडल्यामुळें युद्धास त्यांचा एकमतानें पाठिंबा मिळाला असल्यास नवल नाहीं. ट्रॉट्स्की सांगतो—

"बाजारांत सट्टा, जुगार यांस ऊत आला होता. रणांगणावर सांडणाऱ्या रक्ताच्या फेसांतून अफाट संपत्ति वर येत होती. खुद्द राजधानींत भाकरी मिळेना कीं जळण मिळेना, पण सरकारी सराफ फॅबरगेट फुशारकीनें सांगत होता, कीं धंद्याला अशी बरकत कधीं आलीच नाहीं. झारीनाची परिचारिका विरूबोवा सांगते, कधींहि हल्लींइतके झगे शिवले नव्हते आणि हिऱ्यांची खरेदी हल्लींइतकी कधीं झालीच नाहीं. आघाडीचे नव्हे तर पिछाडीचे वीर, लढायला थेरडे पण भोगायला तरणे, अशा माणसांनीं रात्रीं नाचणारणींचे अड्डे तुडुंब भरलेले असत. ...कितीहि खर्च झाला तरी कोणाला त्याची फिकीर वाटत नसे. जणूं काय आभाळांतून सोन्याचा पाऊस पडत होता. वरिष्ठ वर्गांतले पुरुष आपले खिसे भरीत. स्त्रिया झगे पसरून भरून घेत. बँकवाले, अधिकारी, कारखानदार, ग्रँड ड्यूक, शास्त्रीपंडित, महालांतील दासी, ड्यूमाचे

लिबरल सभासद, आघाडीचे आणि पिछाडीचे सेनापति, जहाल वकील, राजघराण्याचे नातेवाईक आणि विशेषतः नातेवाइकिणी सगळींजणें त्या रक्ताच्या चिखलांत हात घालघालून त्यांतल्या सोन्यानें आपली तुंबडी भरून घेत. ही वैभवाची गंगा अकस्मात् ओसरेल या भीतीनें प्रत्येकजणाला लूट करण्याची घाई झाली होती. साहजिकच युद्ध थांबविण्याची कल्पना निघाली, कीं यांचा देशाभिमान थरारून येई व ते या कल्पनेचा धिक्कार करीत." (हिस्टरी ऑफ दि रशियन रेव्होल्यूशन–ट्रॉट्स्की)

झार व भांडवलवाले यांचें घरगुती भांडण

पण रणांगणावर सैन्याचा पराभव होत असून शेतकरी, कामकरी व सैनिक या सर्वांत असंतोष बळावत होता. यामुळें युद्धाचा किफायतशीर धंदा चालू कसा ठेवावयाचा याची भांडवाल्यांना काळजी लागली. राज्यक्रांतीची तरवार डोकीवर लटकूं लागली हें ड्यूमांतील पुढाऱ्यांना दिसत होतें. मिल्युकोव्ह सांगत होता, " आम्ही ज्वालामुखीच्या तोंडावरून चालतों आहों, परिस्थिति इतकी तापली आहे, कीं चुकून आगकाडी पडली तरी भयंकर भडका झाल्याशिवाय राहणार नाहीं." म्हणून त्याच्या मतें " चांगलें अथवा वाईट पण जबरदस्त सरकार त्या वेळीं हवें होतें." म्हणून 'राष्ट्राच्या विश्वासास पात्र असें' म्हणजे भांडवलवाल्यांचें सरकार त्यास हवें होतें. यासाठीं ड्यूमांत 'प्रगतिपर गट' (प्रोग्रेसिव्ह ब्लॉक) म्हणून एक पक्षहि स्थापन झाला, व त्यानें १९१५च्या ऑगस्टमध्यें झारनें ड्यूमास बरेच अधिकार द्यावे अशी गोरेम्किन या प्रधानाकरवीं मागणी केली; तेव्हां आपलें अधिकार कमी होणार या भीतीनें झारनें सप्टेंबरच्या ३ तारखेस ड्यूमाच बरखास्त करून टाकली. तेव्हां कॅडेट अथवा लिबरल पक्ष चुरमुरे खात बसला, पण त्यानें हूं कां चूं केलें नाहीं. याचें कारण उघड होतें. झारशीं भांडवलवाल्यांच्या कॅडेट पक्षानें भांडण सुरू केलें तर कामगार व सैनिकहि उठावणी करतील व मग झारशाही आणि भांडवलशाही दोन्ही जाऊन धुपाटणें हातीं येईल ही त्यांस भीति वाटत होती. ड्यूमा बंद पडल्यामुळें मॉस्को व पेट्रोग्रॅड येथें विरोधदर्शक संप झाले. त्यामुळें कॅडेट पक्षास आनंद न होतां तो भीतीनें अधिकच गांगरला आणि झारशाहीला जाऊन बिलगला. आपण कायद्याची मर्यादा ओलांडायची नाहीं

म्हणजे नोकरशाहीचा जाच होणार नाहीं अशी युक्ति योजण्याचें त्यानें ठरविलें. मे १९१६मध्यें ड्यूमा पुनः बोलावण्यांत आली; पण चुळबुळ्यापलीकडे कांहींहि काम झालें नाहीं. रणांगणावर जय येत नाहीं, क्रांतीची लाट आवरत नाहीं आणि झार तर मुळींच ऐकत नाहीं अशा नकारत्रिशूळावर कॅडेट पक्ष लटकून तळमळत होता. पावसाळ्यांत पराभव वाढूं लागले. राज्यक्रांतीची भीति वाढली. तेव्हां 'प्रगतिपर गटा'चा पुढारी प्रोटोपोपॉव्ह यानें स्वीडनमध्यें जर्मन वकिलाशीं गुप्त खलबत करून रशियानें युद्धांतून अंग काढून घ्यावें अशी योजना केली व ती झारच्या कानांवर घातली. झारला ती पसंत पडली. पण प्रोटोपोपॉव्हनें कॅडेट पक्षास तहाच्या वाटाघाटींत गोवून झारच्या सत्तेवर नियंत्रण येईल असा उपद्व्याप करूं नये असा झारनें हट्ट धरला. प्रोटोपोपॉव्ह झारला वशहि झाला; पण पुढें हें सर्व कारस्थान फुटून ड्यूमांत चव्हाट्यावर आलें. या सरकारी देशद्रोहाचा जनतेवर भयंकर परिणाम होणार हें उघड होतें. कॅडेट पक्षाच्या पुढाऱ्यांनीं ड्यूमांत या कारस्थानावर नोव्हेंबर १ रोजीं खूप तोंडसुख घेतलें. त्यांचीं भाषणें इतकीं कडक झालीं कीं त्यांची प्रसिद्धि करण्यास बंदी झाली. पण त्यामुळेंच त्याच्या लक्षावधि प्रति गुप्तपणें छापून गुप्तपणेंच अगदीं आघाडीपर्यंत पोंचविण्यांत आल्या. कॅडेट पक्षाचे हातीं सत्ता देण्यास पोलिसचा व नोकरशाहीचा तीव्र विरोध होता. १९०५ची क्रांति दडपून टाकणारा सेनापति डरनोव्हो याला या कॅडेट अथवा लिबरल पक्षाचा तिटकारा वाटे. राष्ट्र यांच्यामागें नाहीं "हे मूठभर खाबू भांडवलवाले, वकील, प्रोफेसर वगैरे आहेत; क्रांतिकारकांचें शौर्य पराक्रम, संघटनाकौशल्य व लक्षावधि लोकांवर छाप टाकण्याची कला यांच्यांत मुळींच नाहीं" म्हणून त्यांना मुळींच अधिकार देऊं नये असें डरनोव्हो व सर्व पोलीस आणि नोकरशाही यांचें मत होतें. ड्यूमा रद्द करावी, मॉस्को व पेट्रोग्रॅड येथें लष्करी कायदा पुकारावा, उमरावांचें सल्लागार मंडळ झारनें नेमावें व बंड दडपून टाकण्याची जय्यत तयारी ठेवावी असा त्यांचा सुटसुटीत कार्यक्रम होता. पण १९०५ मध्यें डरनोव्होला यश आलें तसें आजहि येईल असें झारला वाटलें नसावें. त्यानें ड्यूमा रद्द न करतां तहकूब केली व लष्करी कायदा पुकारला नाहीं. ड्यूमा तहकूब होतांच कॅडेट पक्ष चुळबुळूं लागला. युद्धास विरोध करणारास तो गुन्हेगार, देशद्रोही म्हणून

संबोधून झिडकारी व झारची सत्ता कमी करून लोकमतास जबाबदार सरकार स्थापण्याची प्रतिज्ञा करीत. पण शेवटीं १९१७च्या १४ फेब्रुवारीस झारनें ड्यूमा पुन्हा बोलावली. तेव्हां नेहमींप्रमाणें कॅडेट पक्षाचें धैर्य पुन्हा गळालें. झारशीं आपण भांडलों तर कामगार व सैनिक आपल्या मदतीस येऊन क्रांतीची संधि साधतील ही त्यास भीति वाटली. मिल्युकोव्ह म्हणाला, "आम्ही शब्दांनीं भाडूं, पण त्यापलीकडे झारला त्याच्या इच्छेविरुद्ध दुखविणार नाहीं."

मूर्ख झार व हटवादी झारीना

पंधरा कोटि लोकसंख्येच्या राज्यव्यवस्थेच्या व समाजव्यवस्थेच्या उदरांत अशा प्रकारें एकसारखा ज्वालामुखी भडकत असतां त्याच्या तोंडावर झार दुसरा निकोलस व त्याची राणी झारीना अलेक्झांड्रा फीडोरोव्हना हीं ख्याली-खुशालींत आणि उन्मादांत अत्यंत गाफीलपणें वावरत होतीं. जनावराला भोंवतालच्या जगाचा जसा सूक्ष्म व पृथक्त्वानें बोध होऊं शकत नाहीं, आपणाला न समजणारी लिपी असलेला कागद पाहून आपण जसे शून्य-मनस्क होतों तशी अबोध, स्थूल व शून्यमनस्क वृत्ति निकोलसची होती. याच्या कारकीर्दीस १८९६ सालीं सुरवात झाली आणि १९१७ सालीं त्याची स्वतःची व त्याच्या सर्व वंशाचीच नव्हे तर झारशाहीचीच कारकीर्द खलास झाली. अव्वलपासून अखेरपर्यंत संप, दंगे व कत्तली यांनीं त्याची कारकीर्द बुजबुजली होती. अखेर त्यांतच त्याची आहुतिहि पडली. पण खाटकाच्या अंगणांतला पशु आपली पाळी येईपर्यंत जसा खुशाल रवंथ करीत बसलेला असतो तसा निकोलस आपल्या राजवटीचीं वीस वर्षें संथपणें रवंथ करीत होता. रुसो-जपानी युद्धांत पराजयांचीं लांबड लागली होती तरी निकोलस घणमणला नाहीं. डोक्यावर ढग गडगडताहेत, विजा चमकताहेत, पण राजाच्या स्वस्थचित्ताचा भंग होत नसे. 'चहा प्यालों, दारू प्यालों, फेऱ्या मारल्या, कावळे मारले' असल्या मजकुरानें त्याच्या रोजनिश्या भरलेल्या असत. तो नुसताच मूढ नव्हता. क्रूर व चंचलहि होता. पिंचलेली कांच उकिरड्यावर फेकावी त्याप्रमाणें त्यानें विट्टे, स्टोलिपिन यांसारख्या मुत्सद्द्यांस प्रधानपदां-वरून, गरज संपल्यासारखें वाटतांच, फेकून दिलें. गोळीबार करून दंगे मोडणें

म्हणजे केरसुणीनें केर लोटणें असेंचत्याला वाटे. पोलिसांनीं माणसें मुंग्यांसारखीं मारलीं अथवा रणांगणावर पलटणीच्या पलटणी गारद झाल्या तरी त्याची समाधि भंगत नसे. त्याचा हा नैतिक व मानसिक परमहंसपणा पाहून याला कोणीं माजूम चारली आहे असें लोक म्हणत. पण एकदां चारलेली माजूम जन्मभर कशी पुरली असती ? त्याच्या रक्तांत त्याच्या जन्माबरोबरच ती निर्माण झालेली होती असें ट्रॉट्स्की वैतागानें म्हणतो. त्याला हुशार, निःस्पृह सल्लागारांचें वारेंहि सहन होत नसे. खुशामत्ये व दगलबाज हे त्याचे संवगडी होते. राज्यक्रांतीपूर्वी दोन महिने रॉड्झिअँको झारला सांगत होता, " महाराज, एकहि प्रामाणिक व विश्वसनीय माणूस तुम्हांजवळ नाहीं. चांगलीं माणसें होतीं तीं तुम्हीं हाकललीं अथवा आपणच मागें सरलीं. फक्त हलकट तुम्हांजवळ आहेत."

निकोलसची राणी निकोलसइतकीच मूर्ख पण अधिक उन्मत्त, अधिक लोभी, अधिक क्रूर व अधिक हट्टी होती. रासपुटीन नांवाचा एक जादूटोणा करणारा व्यसनांध, कारस्थानी व कमालीचा हलकट बैरागी तिचा 'मित्र' व सल्लागार होता. तो रात्रंदिवस दारूनें झिंगलेला व बायका बिघडविण्यांत रमलेला असे. राजाजवळ एवढा एक 'विश्वसनीय' मुत्सद्दी आहे असें राणीचें मत असून ती तें राजाला पढवीत असे. राजा तिच्या अर्ध्या वचनांत होता. रासपुटीन हा ईश्वराचा प्रेषित आहे अशी तिची खात्री झाली होती. १९०५च्या क्रांतीच्या वेळीं टोबोलस्क प्रांतांतून एक दाढीवाला बैरागी राणीकडे आला व त्यानें राजपुत्राचें दुखणें जादूनें बरें केलें. तो हा रासपुटीन. तो वेळींच आला नसता तर या दगलबाज मुत्सद्द्यांनीं केव्हांच आपलें वाटोळें केलें असतें असें राणी म्हणत असे. आणि तिचें हें मत चमत्कारिकपणें खरें ठरलें. १९१६ च्या डिसेंबरमध्यें रासपुटीनचा खून झाला. पुढें दोनच महिन्यांत राज्यक्रांति होऊन झारचें सिंहासन मोडून पडलें.

रणांगणावर होणारा पराभव, व देशांत माजूं लागलेलें बंड हें सर्व पाहून उमराव घराण्यांतील लोक घाबरले. त्यांना लोकमताहातीं सत्ता द्यावी असें वाटत नव्हतें. पण राजा रासपुटीनखेरीज कोणाचाच सल्ला ऐकत नव्हता. रासपुटीनला सरदारांचें वर्चस्व उडवून लावून राजाराणीस आपल्या कह्यांत

ठेवावयाचें होतें. आणि राजाच्या लहरीस नियंत्रण घालून राज्यकारभारांत शिस्त आणल्यावांचून झारशाहीची व सरंजामशाहीची धड गत नाहीं असें सरदारांना वाटूं लागलें होतें. तेव्हां कांहीं सरदारांनीं कट करून रासपुटीनचा खून केला. तथापि याहून कांहींहि अधिक करण्याची कोणाचीच छाती होईना. कारण राज्यक्रांतीस तेवढेंच निमित्त पुरेल अशी त्यांस भीति वाटत होती. "राजा तूं कोणासहि दाद देऊं नको, कोणासहि अधिकार देऊं नको, राज्य तुझें आहे, युद्ध तुझें आहे, विजय मिळेल तो तुझा एकट्याचा असला पाहिजे" असा सल्ला राणी राजाला १९१७ च्या आरंभीं, क्रांतीच्या आधीं दीडच महिना, देत होती आणि राजा बुद्धिमूढतेच्या निशेंत तिचें ऐकत होता. जर्मनीशीं कारस्थान करून युद्ध थांबवावें व मग फुरसतीनें क्रांति दडपून टाकावी असाहि प्रयत्न राणीनें केला म्हणतात. पण कांहींच उरकलें नाहीं. राजाच्या डोळ्यांसमोर त्याच्या पायाखालची जमीन दुभंगूं लागली. तरी पण 'चहा पिणें, दारू पिणें, कावळे मारणें, फेऱ्या मारणें' एवढें नियमितपणें चालूं होतें. फेब्रुवारीच्या २३ तारखेस आंतरराष्ट्रीय महिला-दिन होता. त्या दिवशीं स्त्री-कामगार संपावर गेल्या. राजाला वाटलें पोरी-पोरींचा खेळ आहे; अगदीं क्रांतिकारक पुढाऱ्यांनाहि हा दरसालचा दिन साजरा करण्याहून या संपास अधिक महत्त्व आहे असें वाटलें नाहीं. पण याच दिवशीं झारशाहीच्या खड्ड्याची पहिली कुदळ स्त्री-कामगारांनीं मारली होती. एका आठवड्यानेंच त्यांत झारचें सिंहासन लोटलें जाऊन कामगारांनीं व सैनिकांनीं त्यावर माती पसरली.

प्रकरण ८ वें

झारशाहीचा पाडाव व भांडवलशाहीची डळमळीत सत्ता (१९१७, फेब्रुवारी ते जून)

ते पांच दिवस

१९१७ चा २३ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय स्त्रीदिन सभा भरवून, भाषणें करून व क्रांतिकारक पत्रकें वाटून पाळावा एवढींच क्रांतिकारक पुढाऱ्यांची योजना होती. एकंदर कामगारजग इतकें क्षुब्ध झालेलें होतें, कीं संप झाले तर रस्तोरस्तीं दंगे होतील व सैनिकांच्या गोळ्यांस कामगार नाहक बळी पडतील अशी पुढाऱ्यांना भीति वाटत असल्यानें सैनिकांच्या मनःस्थितीची कल्पना आल्याशिवाय कामगारांना इरेला घालण्यास पुढाऱ्यांची तयारी नव्हती. "पण कामगारच्च अधीर झालेले होते व केव्हां तरी सडकेवर येऊन मारामारी आपण करणार असा त्यांचा निश्चय झाला होता. कधीं, तेवढें ठरावयाचें होतें" असें कायुरोव्ह हा पुढारी सांगतो. **२३ फेब्रुवारी** रोजीं पुढाऱ्यांच्या सल्ल्यास न जुमानतां कित्येक कापड-गिरण्यांतील स्त्री-कामगारांनीं संप केले व कामगारांनीं सडकेवर कधीं यायचें ती तारीख आपल्या वर्तनानें निश्चित केली. कापड-गिरण्यांतील स्त्री-कामगारांनीं संप पुकारून धातु-कारखान्यांतील कामगारांना मदतीस बोलावण्यासाठीं प्रतिनिधि पाठविले.तेव्हां "मनांत नव्हतें तरी बोल्शेव्हिकांनीं संपास संमति दिली व मेन्शेव्हिक आणि सोशल रेव्होल्यूशनरी पुढाऱ्यांनाहि तोच मार्ग पत्करावा लागला." संप होऊन कामगार सडकांवरून जमावानें फिरूं लागले तर सैनिक कसे वागतील, याची चर्चा पुढाऱ्यांनीं आपसांत केली होती. पण नक्की अमुकच घडेल असें ठरविण्याइतका पुरावा नव्हता. ९० हजार स्त्री-पुरुष कामगार त्या दिवशीं पेट्रोग्रॅडमध्यें संपांत सामील झाले, त्यांत सैनिकांच्या बायकाहि पुष्कळ होत्या. स्त्रियांनीं मोठी

मिरवणूक काढून म्युनिसिपल कौन्सिलच्या इमारतीपुढें नेली. 'भाकरी द्या', 'भाकरी द्या' अशा मजकुराचीं निशाणें त्यांनीं मिरवत आणलीं होतीं. दंगा-गडबड होईल या भीतीनें पोलिसांच्या मदतीस कांहीं सैनिक देण्यांत आले होते; पण कांहींहि गडबड न होतां २३ फेब्रुवारीचा दिवस पार पडला.

पण यामुळें **२४ फेब्रुवारीला** कामगारांना उत्साहाचें व आत्मविश्वासाचें भरतें येऊन संपवाल्यांची संख्या वाढली. त्यांनीं कारखान्यांत पाऊल टाकतांच कामाऐवजीं सभाच सुरू केल्या व मिरवणुकी काढल्या. 'भाकरी, भाकरी, भाकरी' हाच सर्वत्र प्रचंड जयघोष होता. कामगारांच्या पोटांत आगीचा भडका उडाला असतां राजवाड्यांतून, उमरावांच्या विलासमंदिरांतून, भांडवलवाल्यांच्या हवेल्यांतून चाललेल्या चैनी रस्तोरस्तीं कामगारांच्या डोळ्यांत सलत होत्या. तें पाहून 'झारशाहीचा धिक्कार असो', 'आधीं युद्ध थांबवा' अशा घोषणा कामगार ओरडूं लागले. दवाखान्यांच्या रस्त्यांकडील खिडक्यांतून जखमी सैनिक मिरवणुकींतील कामगारांना खुणावून त्यांचें अभिनंदन करीत आहेत हेंहि कामगारांस दिसून त्यांना उत्तेजन आलें. विद्यार्थी व इतर सामान्य लोकहि कामगारांच्या मिरवणुकींतून सभांतून सामील झाले. कोझॅक घोडेस्वार गर्दीत घोडे घालून गर्दी मोडण्याचा प्रयत्न करीत; पण त्यांच्यांत क्रूरपणा दिसत नव्हता. लोकहि घोडेस्वारांस वाट करून देत व पुन्हा गर्दी करीत. कांहीं कामगारांचीं घोडेस्वारांशीं संभाषणेंहि होऊं लागलीं. "ते गोळ्या घालणार नाहींत" असा आत्मविश्वासाचा ध्वनि सर्वत्र उमटला. घोड्यांच्या पोटांखालून माणसें गर्दीत घुसूं लागलीं तरीहि गोळीबार होईना. तेव्हां कामगारांची घोडेस्वारांबद्दलची भीति मोडली. ते धीट झाले व ठाण धरून निर्भयपणें उभे राहूं लागले. सगळा दिवस शहराच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत वाढत्या गर्दीनें माणसें भटकत होतीं. पोलिसांच्या तुकड्या मधून मधून त्यांना अडवीत. तेव्हां पोलिसांवर लोक हल्ले करूं लागले. पोलीस व कामगार वगैरे गर्दीतले लोक यांच्या मधून मधून चकमकी उडूं लागल्या. पोलिसांवर धोंडे, बर्फाचे तुकडे यांचा मधून मधून वर्षाव होऊं लागला. पण सैनिकाशीं लोक अधिक आर्जवानें वागत असें दिसलें. कोझॅक घोडेस्वार हे मूळचे शेतकरी असून स्वतांच्या घोड्यानिशीं झारच्या सैन्यांत वंशपरंपरा नोकरी करीत. त्यांचा वीरवंश झार राजांनीं जिंकून आपल्या लगामीं लावलेला

होता. झारशाहीच्या सर्व लढायांचा भार या जमातीवर मनस्वी पडलेला होता. झारची नोकरी व रणावर मृत्यु यांखेरीज वंशपरंपरेनें त्यांना कांहींच माहीत नव्हतें. पण यामुळेंच ते झारशाहीस कंटाळलेले होते. चालू महायुद्धाचा त्यांना तिटकारा आला होता. कोझॅक शेतकऱ्यांस रणावर मरावें लागत असून घरीं उपासमार होऊं लागली होती. असें हें युद्ध हे कामगार संपवूं पाहतात म्हणून त्यांना कामगारांबद्दल स्वाभाविक सहानुभूति वाटे. कामगारांनीं दंगे केले, कीं त्यांना तुडविण्याचें, गोळ्या घालण्याचें कोझॅक्सकडे येई. या जिण्यास ते कंटाळले होते हें गर्दीतल्या कामगारांना उघड दिसत होतें. पोलिसांनीं एका बाईस मारलें तेव्हां कोझॅक घोडेस्वारांनीं पुढें होऊन त्या पोलिसांस चोप दिला अशी खरी कीं खोटी आवई उठली. कामगारांना स्फुरण चढण्यास तेवढेंच कारण झालें. आणि खरोखरच 'बहोत खाशी चालू द्या' अशा अर्थानें कोझॅक्स कामगारांकडे नेत्रसंकेत करूं लागले. पण एवढ्यानें हुरळून जाण्यासारखी परिस्थिति नव्हती. पिढ्यानुपिढ्या हुकुमाची तामिली करण्याची सवय हाडीं खिळलेले सैनिक तशीच वेळ आली तर काय करतील हें सांगणें कठिण होतें. दोन दिवसांत २८ पोलिसांना मार बसला तरी गोळीबार झाला नाहीं. पण तिसऱ्या दिवशीं न होईल कशावरून ? त्या वेळीं कामगार टिकतील काय ?

१९१७च्या आरंभीं बंडाचीं स्पष्ट चिन्हें दिसत असल्यानें खाबालोव्ह या सेनापतीच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन बसविण्यांत आलें व त्यानें बंड दडपून टाकण्याची एक योजना तयार केली होती. त्याप्रमाणें पेट्रोग्रॅडमध्यें ६ पोलिस स्टेशनांच्या अखत्यारींत गांवें वाटून देण्यांत येऊन कडेकोट बंदोबस्त जानेवारीपासूनच करून ठेवण्यांत आला होता. खाबालोव्ह यास शहरचा मुख्य रक्षक अमलदार नेमण्यांत आलें होतें. दंगे होऊं लागल्यास प्रथम पोलिस पाठवावे, मग जरूर तर चाबूक घेऊन कोझॅक्स पाठवावे व त्यानंतरहि दंगा शमेना तर मग सैनिक आणून बंदुका व मशिनगन्स यांनीं दंगे मोडावे अशी ही योजना होती. याच धोरणानें दोन दिवस सरकारचा कार्यक्रम चालू होता. यामुळें कामगारांच्या निर्भयतेची व सैनिकांच्या स्वामिभक्तीची अथवा क्रांतिभक्तीची कसोटी अजून पुढेंच होती.

ता. २५ फेब्रुवारी उजाडली आणि संपवाल्यांची संख्या आणखी वाढली.

त्या दिवशीं सरकारी आंकड्यांप्रमाणें अडीच लक्ष लोक संपावर गेले. लहान-मोठे धंदे, दुकानें पेट्रोग्रॅडमध्यें बंद पडलीं. शाळा-कॉलेजांच्या विद्यार्थ्यांनीं शाळा-कॉलेजें ओस पाडलीं व तेहि संपांत सामील झाले. तिसऱ्या अलेक्झांडरच्या थडग्याशेजारीं वक्त्यांचीं व्याख्यानें होऊं लागलीं. पोलिसांनीं एकदां गोळीबार केला, एका वक्त्याला गोळी लागून जखम झाली. तेव्हां पोलिसांवर उलट दगड-विटांचा व गोळ्यांचाहि वर्षाव झाला. सैनिकांनीं लोकांचीं उघडउघड उपेक्षा केली व पोलिसांवरच वक्रदृष्टि टाकली. दुसऱ्या एका ठिकाणीं कोझॅक घोडेस्वार लोकांना चाबूक मारीत होते.

"त्यांना आम्हीं" कायुरोव्ह हा कामगार पुढारी सांगतो, "'भाई कोझॅक्स, कामगारांना त्यांच्या शांततेच्या मागण्या पूर्ण करून घेण्यांत तुम्ही मदत करणार नाहीं काय?' अशी विनंति केली; हातांत टोप्या घेऊन त्यांना नम्रतेनें आमच्या मदतीस या असें आवाहन केलें; त्याचा विलक्षण परिणाम झाला. कोझॅक्सनीं कांहीं विशेष प्रकारें एकमेकांशीं नेत्रसंकेत केला व कांहींजण आम्ही पोलिसांशीं झगडत असतां गर्दीत घुसले. थोडक्याच वेळांत स्टेशनच्या दरवाजांत एका कोझॅकला कामगार चोहोंकडून कवटाळीत आहेत असें आढळून आलें. कारण त्यानें आपल्या कट्यारीनें एका पोलिस-इन्स्पेक्टरची कत्तल केली होती." सैनिकांना पोलिसांपासून फोडून क्रांतींत सामील करून घेण्याचा प्रयत्न दिवसभर चालला होता. मॉगिलेव्हच्या राजवाड्यांत झार जाऊन राहिला होता. त्यानें खाबालोव्हला 'एकदम गडबड थांबवा' असा हुकूम केला. खाबालोव्हनेंहि तेंच ठरविलें होतें. 'तीन दिवसांत कामगारांनीं संप बंद केले नाहींत तर त्यांना जबरदस्तीनें रणांगणावर पाठविण्यांत येईल' असा त्यानें जाहीरनामा काढला. पण एवढी मुदत फाजील ठरली. दोनच दिवसांत खाबालोव्हचें सगळें सैन्य क्रांतिकारकांस सामील होऊन खाबालोव्हची सुलतानी खलास झाली.

ता.२५रोजीं रात्रीं बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीनें अखिल रशियन सार्वत्रिक संप जाहीर केला. **ता. २६ फेब्रुवारी** रोजीं पहांटे पेट्रोग्रॅडमधील निरानिराळ्या भागांतले सुमारें १०० पुढारी पकडण्यांत आले. आज कसें होणार? सरकारची तर चढाईची तयारी आहे. सैनिकांनीं हल्ले सुरू केल्यास लोक टिकतील काय? सैनिक क्रांतीच्या बाजूस येतील कीं क्रांति दडपून टाकतील? अशी अनेक

प्रकारची चिंता पुढाऱ्यांना लागली. पण नदी ज्याप्रमाणें कडेपठार फोडून आपलें पात्र खणीत धावत असते, त्याप्रमाणें लोकगंगा स्वपराक्रमानें आपला मार्ग काढीत चालली होती. ता. २६ हा रविवार असल्यानें कारखान्यांना सुटीच होती. यामुळें संपाचें बळ अजमावण्यास सकाळीं कांहींच मार्ग नव्हता. पण चळवळीचा जोर वाढला आहे हें समजण्याला फार वेळ लागला नाहीं. कामगार, लहान दुकानदार, विद्यार्थी, यांच्या गर्दीनें रस्ते लवकरच फुलून गेले. आज पोलिस मागें व सैनिक पुढें होते. जरा कमी-जास्त दिसलें कीं, गोळ्या घाला असा त्यांना सक्त हुकूम होता. या दिवशीं सुमारें चाळीस माणसें ठार व चाळीस जखमी झालेली पोलिसांच्या हातीं लागलीं. याशिवाय स्वतः लोकांनींहि कांहीं प्रेतें नेलीं. पण आज कोणीहि भीत नव्हतें असें दिसलें. ड्यूमाचा अध्यक्ष रॉड्झिअँको यानें, गोळ्या न घालतां आगीच्या बंबानें थंड पाणी उडवून लोकांना पिटाळून लावा असा सल्ला दिला. 'त्यानें लोकक्षोभ वाढेल मात्र' असें खाबालोव्हनें मत दिलें. पण आज बंदुकीच्या आगीनेंहि लोक मागें हटत नव्हतें. पोलीस रिपोर्ट सांगतो, "सैनिकांशीं त्या दिवशीं लोक अगदीं बेमुर्वतखोरपणें वागत होते. गर्दी मोडण्याचा लोकांना हुकूम करतांच त्यांनीं रस्ते उखणून सैन्यावर सरळ दगडफेक केली. नुसता भिवविण्यासाठीं गोळीबार करतांच गर्दींतून फक्त प्रचंड हशा पिकला. शेवटीं जेव्हां प्राणघातक गोळ्यांचा वर्षाव झाला तेव्हां लोक पांगले. पण त्या वेळीं सुद्धां लपून-छपून राहिले व गोळीबार संपतांच पुन्हा गर्दी करूं लागले!" सैनिक गोळ्या घालीत असले तरी अखेर आपणाला येऊन मिळणार असा कामगारांना विश्वास वाटतो आहे असा याचा अर्थ होता. शुर्कानोव्ह हा बोल्शेव्हिक पुढारी पोलिसचा गुप्तहेर होता. त्यानें पोलिसला दिलेल्या रिपोर्टांत 'लोकांना क्रांति होणार ही खात्री झाली आहे, आतां कांहीं केल्या ते ऐकत नाहींत' असा सल्ला दिला होता. कामगारांना फाजील इरेस पाडून त्यांचा पाडाव करावा अशी एक युक्ति शुर्कानोव्हला सुचली व त्यानें बोल्शेव्हिकांच्या गटांच्या सभांतून कामगारांनीं हातीं शस्त्रें घेऊन सैनिकांवर हल्ला करावा असेंहि सुचविलें. कामगारांच्या आत्मविश्वासाची तो जाणून बुजून अत्युक्ति करीत होता. पण त्याचें दुर्दैव असें, कीं त्याच्या सुचनेबरहुकूम नव्हे पण एकंदरींत चढाईच्या धोरणानेंच कामगारांनीं यश मिळविलें. सैनिकांसंबंधीं कामगारांनीं

एक विशेष धोरण ठेविलें होतें. तें म्हणजे त्यांच्यापुढून भिऊन पळून जायचें नाहीं, त्यांना शरण जायचें नाहीं, पण दृढनिश्चयी वृत्ति ठेवून त्यांना स्नेहभाव दाखवावयाचा. याचा योग्य तो परिणाम होत होता. क्रांतीनें सैनिकांना पछाडलें आहे ही गोष्ट सैन्याधिकाऱ्यांच्या लक्षांत आली होती. २५तारखेसच संध्याकाळीं पाव्लोस्की रेजिमेंटची चौथी तुकडी संपवाल्यांना सामील झाली होती. यामुळें ही क्रांतीची आग सैनिकांत केव्हां भडकेल याचा अधिकाऱ्यांना नेम वाटत नव्हता.

आणि त्यांची भीति खरी ठरविणारा दिवस– **फेब्रुवारी २७**– उजाडला. आज संपाच्या आगीचा पेट्रोग्रॅडभर डोंब उठला होता. कामगार पुढाऱ्यांजवळ शस्त्रास्त्रें मागूं लागले. पण स्लिआप्निकोव्ह या बोल्शेव्हिक पुढाऱ्यास कामगारांनीं शस्त्रें वापरल्यास सैनिक बिथरतील अशी भीति वाटली. यापेक्षां सैनिकांचें शांततेच्या पण बाणेदार वर्तनानें परिवर्तन करावें असें त्यानें सुचविले. तेव्हां कामगारांनीं पोलिसांवर हल्ले करून त्यांचे रिव्हॉल्व्हर पळविलें. हे रिव्हॉल्व्हर सैनिकांच्या बुंदुकीपुढें, मशिनगन्सपुढें, तोफखान्यापुढें निर्बल होते. पण हीं भव्य शस्त्रें खरोखर झारशाहीचीं राहिलीं आहेत का, हाच प्रश्न २७ तारखेस सर्वांपुढें उभा राहिला. सैनिकांना आज कामगारांचा हेतु पूर्णपणें कळला होता व त्यांशीं आपण सहकार्य केलें तर यशाची खात्री आहे असें वाटूं लागलें होतें. झारशाहीचें कांहींच त्यांना पसंत नव्हतें व कामगारांच्या या अभूतपूर्व चळवळीसारखी संधि पुन्हा येणार नाहीं हेंहि त्यांना कळलें होतें;—

"त्यांच्यामागें बायकापोरांचा प्रपंच होता. ते राखीव सैनिक होते. देश बेचिराख झाला, रणांत रशियाचा पराभव झाला म्हणजे शेवटीं खंदकांत पडून मरण्याचा प्रसंग आपणावर आहे, हें त्यांना स्पष्ट दिसलें. झारच्या दरबारांतलीं कारस्थानें त्यांना दिसत होतीं. त्यांना युद्ध नको होतें. राजाबद्दल त्यांना काडीइतकीहि निष्ठा नव्हती. त्यांना जर्मनांशीं लढण्याची उमेद नव्हती व पेट्रोग्रॅडच्या कामगारांशीं लढण्याची तर नव्हतीच नव्हती. राज्यकर्ते वरिष्ठवर्ग युद्धाचे वेळीं मजा मारीत होते हें सैनिकांना दिसत होतें. त्यांचा त्यांना तीव्र द्वेष वाटत होता. १९०५च्या क्रांतींत बंडांत भाग घेतलेले कामगारहि सैनिकांत होते. आणि आपला असंतोष क्रांतीस उपयोगी

अशा प्रकारें कसा व्यक्त करावा हें त्यांना अवगत होतें. या ज्ञानाचा त्यांनीं या वेळीं भरपूर उपयोग केला. अगदीं सकाळीं व्हॉलिन्स्की पलटणीनें पहिल्यानें बंड उभारलें. सात वाजतां खाबालोव्हला टेलिफोन आला. बंड शमविण्याची सर्व मदार ज्या तुकडीवर तिनेंच कूच करण्याचें अमान्य करून अधिकाऱ्यांस ठार केलें अशी ती बातमी होती. स्वतां बंड उभारून व्हॉलिन्स्की पलटणीनें इतर छावण्यांतील सैनिकांना बंडांत ओढलें. बोल्शेव्हिकांना बातमी कळली व त्यांना उत्साहाचें भरतें आलें. जी पलटण बंडवाल्यांवर पाठवावी ती बंडवाल्यांस सामील होऊं लागली. "त्या दिवशीं कांहीं तरी अघटित घडत होतें." खाबालोव्ह लिहितो, " एकाद्या शूर अधिकाऱ्याच्या हाताखालीं एकादी पलटण निघावी व मागून तिचा मागमूसहि कळूं नये. आणि दुसरीचीहि तीच वाट व्हावी." त्या दिवशीं दीडलक्ष सैन्य खाबालोव्हच्ये हाताखालीं होतें. पण धरण फुटून पाणी वाहून जावें त्याप्रमाणें भराभर सैन्याच्या तुकड्या बंडवाल्यांकडे चालूं लागल्या होत्या. अधिकाऱ्यांच्या गाफीलपणाची कमाल होती. सकाळीं ड्यूमाचा अध्यक्ष रॉड्झिअँकोनें झारला तार केली, " महाराज, रशियानें आणि आपल्या घराण्यानें मरावयाचें कीं जगायचें हें ठरविण्याची शेवटची घटका आली आहे." त्यावर आपल्या दरबारी मंत्र्यास झार म्हणतो " हा ढेरपोट्या रॉड्झिअँको मूर्खासारखें बरळतो आहे, मी त्याला उत्तरहि देणार नाहीं." पण रॉड्झिअँको मूर्ख नव्हता. राजाच मूर्ख होता. दुपारीं खाबालोव्हला पावलोव्हस्की, व्हॉलिस्की, लिटोवस्की प्रीओ ब्राझेन्स्की वगैरे सर्व पलटणी बंड करून उठल्या असा निरोप आला. युद्धमंत्र्याला वाटलें आपण हें बंड अजून-हि दडपूं. पण त्याची आशा व्यर्थ ठरली. खाबालोव्हनें लष्करी कायदा पुकारणारा जाहीरनामा काढला. पण तो भिंतीवर चिकटविण्याइतकी खळ-हि बेलिफाला मिळेना. ७० वर्षांचा म्हातारा झालेला प्रधान गोलिटसिन यानें राजीनामा देऊन जबाबदारींतून अंग झटकलें; तेव्हां " अराजक, रक्तपात, हायहाय," करून रॉड्झिअँको रडूं लागला. इकडे कामगारांनीं तुरुंग उघडून सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता केली. संध्याकाळीं ड्यूमाचे अधिवेशन व कचेरी असलेला टॉराइड राजवाडा कामगारांनीं व सैनिकानीं काबीज केला आणि तेव्हांपासून सर्व पारडें उलटलें. आतां बंडवाल्यांनीं बंड मोडणाऱ्यांची व अधिकाऱ्यांची धरपकड सुरू केली. ता. २७ रोजीं सेनापति

इव्हॅनोव्ह आघाडीवरून परत आला. खाबालोव्हकडे त्यानें तारेनें आलबेल विचारली; ते सगळे सैनिक बंड करून उठले असून दारूगोळा, कचेऱ्या, व सारें शहर त्यांचे हातीं आहे, अशी त्यानें आलबेल दिली. तेव्हां ता. २८ रोजीं झारीनानें झारला तारेनें सल्ला दिला कीं "राजा, आतां लोकांना सवलती दिल्या पाहिजेत." पण लोकांना देण्यासारखें त्या मूर्ख व अभागी राजाजवळ आतां काय होतें? तो बायकोच्या भेटीस आगगाडींतून निघाला. वाटेंत त्यानें राणीस तार पाठविली. "हवा फार सुंदर; तुझीहि मजा असेल नाहीं? आघाडीवरून दंगा शमविण्यासाठीं सैन्य आणलें आहे; तुझा लाडका, निकी." पण या सुंदर हवेपलीकडून वादळ आलेलें या वेड्याला दिसलें नाहीं. विशार स्टेशनावर आगगाडी-कामगारांनीं त्याची गाडी बंदच पाडली. राणीनें राजाला केलेली तार 'झार बेपत्ता' म्हणून पोस्टांतून परत आली. झार तेथून सेनापति रुझ्कीच्या तळावर पिस्कोव्ह येथें परत आला. अजूनहि त्याला गादीचा लोभ सुटत नव्हता. एकदां मुलाला, एकदां भावाला, पुन्हा मुलाला राज्यपद द्यावें असा त्याचा विचार चंचलपणें हेलकावत होता. ता. १ मार्च रोजीं रात्रीं जनरल अलेक्झीव्हनें आघाडीवरील सर्व सेनापतींचा सल्ला विचारला. सर्वांनीं विविध पर्याय करून पण झारनें राजीनामा द्यावा असेंच एकमुखानें सांगितलें. ता.१ रोजीं संध्याकाळीं रॉड्झिअँकोनें क्रांतीस संमति देऊन तात्पुरतें सरकारहि स्थापन केलें होतें. आणखी एक दिवस झार आपल्या भ्रामक पदवीला लोंबकळत होता. शेवटीं मार्च २–३ च्या मध्यरात्रीं मुलाच्या वियोगाची कल्पना असह्य वाटल्यामुळें त्याला राज्यपद न देतां भावाला राज्यपद देऊन त्यानें आपल्या सिंहासनाच्या राजीनाम्यावर सही केली; पण त्याचा भाऊ मिखेल यानेंच पुढें राज्यपद स्वीकारण्याचें नाकारलें व लवकरच निकोलसला पकडण्यांत आलें. ता. ८ मार्च रोजीं मोंगिलेव्ह येथून पोलिसांच्या पहाऱ्यांत त्याला सहकुटुंब सहपरिवार हलविण्यांत आलें.

क्रांतीची पुढाऱ्यांकडून फसगत

कामकरी व सैनिक म्हणजेच कामकरी व शेतकरी यांनींच १९१७च्या फेब्रुवारीअखेर यशस्वी बंड करून अखिल रशियाच्या झारला पदच्युत केलें खरें; पण त्यांनीं मिळविलेलें यश त्यांनीं मोठ्या

विश्वासानें आपल्या पुढाऱ्यांच्या हातीं दिलें, पुढाऱ्यांनीं तें परत भांडवलवाल्यांच्या व इतर प्रतिगामी वर्गांच्या हातीं देऊन स्वतांस व जनतेस फशीं पाडलें. या फसगतीचें नीट आकलन होण्यास पुढें आठ महिने शेतकरी, कामकरी व सैनिकांना जुल्म, हालअपेष्टा व झगडा यांत काढावे लागून हरपलेलें यश पदरांत पाडून घेण्यासाठीं त्याच सालच्या ऑक्टोबरमध्यें पुनः बंड उभारून दुसरी क्रांति घडवून आणावी लागली. हें कथानक आपणास यापुढें समजून घ्यावयाचें आहे.

पेट्रोग्रॅडमधील टॉराइड राजवाडयांत डयूमाचें अधिवेशन भरत असे. ता. २७ रोजीं दुपारीं विजयी कामकरी व सैनिक टॉराइडकडे चाल करून येत असतां केरेन्स्की हा डयूमाचा सभासद घाबऱ्या घाबऱ्या डयूमाच्या बैठकींत येऊन " जनता व सैनिक यांचा प्रचंड घोळका टॉराइडवर चाल करून येत असून झारची सत्ता डयूमानें आपल्या हातीं घ्यावी असें म्हणत आहे " असें मोठमोठ्यानें ओरडूं लागला. ही निवळ थाप होती. डयूमाचे हातीं राज्यसत्ता जावी अशी बंडाचे आरंभापासून कामकऱ्यांची व सैनिकांची कधींच घोषणा नव्हती. पण गढूळ पाण्यांत मासे मारण्याची कला केरेन्स्कीला माहीत होती. डयूमानें या धांदलींत पुढें होऊन झारच्या हातून कामकरी व सैनिक यांच्या बंडामुळें गळून पडणारी सत्ता मधल्यामध्यें अलगद झेलावी असें तो डयूमाच्या पुढाऱ्यांना सुचवीत होता. पुढारी कचरत होते. पण होय नाहीं म्हणण्यास वेळच नव्हता. अखेर काय करावें काय नाहीं हें ठरविण्यास मागून फुरसत मिळविण्यासाठीं सध्यां सत्ता हातीं येणारच असल्यास झोळी पसरून बसावें असा डयूमाचा अध्यक्ष रॉड्झिअँको यानें विचार करून डयूमाच्या सभासदांची एक 'तात्पुरती समिति' (प्रोव्हिजनल कमिटी) त्यानें स्थापन करण्याचा ठराव केला.

इकडे बंडवाल्यांचा घोळका राजवाडयांत शिरून डयूमाचे विरुद्ध बाजूस असलेल्या दालनांत जमला. पुढें काय करावें हें ठरविण्यास त्यांना फारसा वेळ लागला नाहीं. १९०५ सालीं बंड चालविण्यासाठीं त्यांनीं कामकऱ्यांच्या प्रतिनिधींचें सोव्हियट स्थापन केलें होतें. त्या वेळीं बंड अखेर फसलें तरी सोव्हियटची उपयुक्तता कामगारांस पटली असून केव्हांहि बंड झालें अथवा करायचें असलें, कीं सोव्हियट स्थापावें व त्याची हुकमत ऐकावी ही

कामकऱ्यांनीं खूणगांठ बांधली होती व त्याप्रमाणें टॉराइड राजवाड्यांत प्रवेश करतांच श्रीड्झ, स्कॉबालेव्ह वगैरे पुढाऱ्यांनीं एक 'कामकऱ्यांच्या प्रतिनिधींचें तात्पुरतें कार्यकारी मंडळ' स्थापन केलें व कामकऱ्यांनीं आपले प्रतिनिधि निवडून सोव्हियट तयार करावें अशी द्वाही फिरविली. त्याच दिवशीं रात्रीं ९ वाजतां तेथेंच या सोव्हियटची परिषद भरली. त्यापुढें बंडवाल्या सैनिकांनींहि क्रांतीचा पुरस्कार करणारीं दणदणीत भाषणें केलीं. त्याच बैठकींत सोव्हियट हें नुसतें कामकऱ्यांचें न म्हणतां 'कामकरी व सैनिक यांच्या प्रतिनिधींचें सोव्हियट' असें म्हणावें असाहि ठराव झाला. लगेच या सोव्हियटच्या कारभाराला सुरुवात झाली. पहिल्यानें जी 'तात्पुरती कार्यकारी-कमिटी' नेमली होती. तीच कायम 'कार्यकारी कमिटी' म्हणून थोडयाफार फरकानें मंजूर झाली. " या कार्यकारी कमिटीनें एक 'अन्नसमिति' नेमून ती सैनिकांच्या अखत्यारींत दिली. एक क्रांतिकारक अधिकारीमंडळ नेमण्यांत आलें. जुन्या सरकारी अधिकाऱ्यांकडून पैशाच्या अडचणी येऊं नयेत यासाठीं सरकारी बँक, तिजोरी, टांकसाळ व नोटांचा छापखाना ताब्यांत घ्यावा आणि क्रांतिकारक सैनिकांचा त्यांवर पहारा ठेवावा असा सोव्हियटनें ठराव केला. यापुढें शेतकरी व कामकरी आणि सैनिक यांच्या दृष्टीनें सोव्हियट हेंच सरकार बनलें. तेंच त्यांच्या दृष्टीनें सर्व सत्तेचें केंद्र व भावी सुखाचें आशास्थान झालें." पण जनतेच्या दुर्दैवानें या सोव्हियटच्या अधिकाऱ्यांना आपल्याच सत्तेची भीति वाटली व जनतेचें दावें त्यांनीं भांडवलवाल्यांचे हातीं विश्वासानें दिलें.

फसगत कां झाली

ही जनतेची फसगत होण्याचें कारण इतिहासांतूनच निर्माण झालें होतें. क्रांतीचे ज्वलज्जहाल पुढारी हे बोल्शेव्हिक खरे, पण जनतेला बोल्शेव्हिक, सोशल रेव्होल्यूशनरी यांच्या मतांतील बारीक फरक नीटसा कळत नव्हता. बोल्शेव्हिकांच्या शिकवणीनें व प्रेरणेनें बोल्शेव्हिकांच्या अपेक्षेपेक्षांहि मोठी उठावणी करून जनतेनें बंड यशस्वी केलें खरें; पण सोव्हियटचे प्रतिनिधि निवडतांना पुढाऱ्यांतील बारीक मतभेद त्यांना दिसले नाहींत. झारशाहीचा

पाडाव करूं इच्छिणारे सर्वच वर्ग—कामकरी, सैनिक, कारागीर, दुकानदार लहान व्यापारी, विद्यार्थी, वकील, कारकून, डॉक्टर, तरुण सैन्याधिकारी व इतर लहान वर्ग बंडांत सामील होते. बंड यशस्वी होतांच बंडवाल्यांची संख्या आपणहि बंडवाले म्हणून पुढें होऊन पुष्कळशा घरबशांनींहि फुगविली. कैदखाने खुले होतांच बोल्शेव्हिक पुढारी क्रांति टिकविण्यासाठीं जरूर ती संघटना करण्यास पुन्हा लोकांत मिसळले. मेन्शेव्हिक, सोशल रेव्होल्यूशनरी वगैरे मतवाद्यांनीं सोव्हियट स्थापण्यासाठीं टॉराइडकडे धांव घेतली. बोल्शेव्हिकांपेक्षां यांचीं मतें फारच मवाळ होतीं. साहजिकच सोव्हियट बनलें तें क्रांतींत भाग घेतलेल्या अथवा आपण घेतला अशी टिमकी पिटविणाऱ्या मवाळांचें व वाग्वीरांचें बनलें. महायुद्धासारख्या बिकट परिस्थितींत सैनिक व कामकरी यांच्यांत भयंकर बेदिली माजली असतांना भांडवलवाल्यांस राज्यपद न देतां तें सोव्हियटनें धारण करावें हें त्यांस सुरक्षित वाटत नव्हतें. तसेंच धनोत्पादनाचीं खाजगी साधनें सोव्हियटनें खालसा करावीं असें या मध्यम वर्गीय पुढाऱ्यांना पसंत नव्हतें. कार्यकारी समितीचा प्रमुख श्रीड्झ हा व त्याचे सहकारी मेन्शेव्हिक होते. झारशाही उलथून पडतांच रशियांत प्रथम भांडवलशाही क्रांति झाली पाहिजे व अशा भांडवलशाही सरकारांत शेतकरी—कामकऱ्यांच्या सोशॅलिस्ट स्वरूपाच्या मागण्या मंजूर करून घेणें अशक्य असल्यानें सोशॅलिस्ट क्रांतिकारकांनीं भांडवलशाही क्रांति होऊन गेल्याशिवाय राज्यसत्ता धारण करूं नये, असें मेन्शेव्हिकांचें तत्त्वज्ञान असल्याचें मागें सांगितलेंच आहे. यामुळें श्रीड्झ व कोणत्याहि पक्षांत नसलेला महाफंदाईत सोशॅलिस्ट सुखॅनोव्ह यांनीं ड्यूमास राज्यकारभार हातीं घेण्याची विनंति करण्याचें ठरविलें. इकडे झारच्या 'उमराव मंडळा'नें (कौन्सिल ऑफ् एल्डर्स) 'ड्यूमाच्या सभासदांची तात्पुरती कमिटी' मान्य केली तींत काम करण्यास श्रीड्झलाहि पाचारण केलें. पण श्रीड्झनें आपल्या मेन्शेव्हिक मतानुसार तें निमंत्रण नाकारून तो सोव्हियटचा अध्यक्षच राहिला. ड्यूमांतील फक्त कांहीं वैयक्तिक सभासदांची ही कमिटी होती; पण तिलाच पुढें ड्यूमाची प्रातिनिधिक कमिटी असें नांव मिळालें. या कमिटीकडे सोव्हियटचें शिष्टमंडळ राज्यदान करण्यासाठीं गेलें. कामकरी, सैनिक व सामान्य जनता यांत कोठेंहि ड्यूमाचा बोज नसतां

'राज्यसत्ता धारण करा' अशी सोव्हियट प्रतिनिधींनीं डयूमाला विनंति करावी ही आपली थट्टा आहे असें रॉड्झिअँकोस वाटलें. पण सोव्हियट शिष्टमंडळाची विनंति न ऐकावी तर "डयूमांतील सभासदांना पकडून सैनिक त्यांची कत्तल करतील व मग राज्यसत्ता सरळ बोल्शेव्हिकांच्याच हातीं जाईल" अशी रॉड्झिअँकोस भीति वाटली. म्हणून "आम्ही राजसत्ता धारण करतों" असें मिल्युकोव्ह या रॉड्झिअँकोच्या सहकाऱ्यानें शिष्टमंडळास कळविलें. शिष्टमंडळाच्या मेकड मनास या निर्णयानें केवढा धीर आला हें सांगतांना सुखॅनोव्ह लिहितो,—

"मिल्युकोव्ह 'आम्ही राज्यसत्ता धारण करतों' असें म्हणतों. पण हे 'आम्ही' म्हणजे कोण हें समजून घेण्याचीहि आम्हीं पर्वा केली नाहीं. तुफान दर्यांत पंचमहाभूतांच्या लहरींवर हेलकावे खाणाऱ्या क्रांतीच्या जहाजावर शीड उभारलें, ऐन वादळांत त्याला स्थैर्य व नियमन प्राप्त झालें, परिस्थिति निवळली असें वाटून माझ्या जिवांत जीव आला."

वास्तविक "याच क्षणापासून क्रांतीचा शिरच्छेद झाला, राज्यकारभारांत व जनतेंत भयंकर गोंधळ उडाला, जनता चिडीस पेटली, युद्धांत सैन्याची धूळधाण झाली व भावी यादवीची तेढ वाढत गेली" असें मत ट्रॉट्स्कीनें दिलें आहे (हिस्टरी ऑफ् रशियन रेव्होल्यूशन). पुढील इतिहासावरून ट्रॉट्स्कीच्या या मताचा प्रत्यय आपणास यावयाचा आहे.

सोव्हियटच्या कार्यकारी समितीस जशी राज्यसत्ता हातीं घेण्याची भीति वाटली तशीच ती डयूमाच्या 'तात्पुरत्या समिती'सहि वाटली व तिनें झार निकोलसनें राजीनामा देतांना आपला वारस म्हणून नेमलेला निकोलसचा भाऊ मिखेल याच्या राज्यपद घेण्यासाठीं आर्जवा केल्या. मिखेलनें विचारलें, "मला राज्य द्याल, पण माझ्या जिवाची हमी कोण घेईल?' रॉड्झिअँको अशी हमी घेऊं शकत नव्हता. तेव्हां "तशीच जरूर पडल्यास आपणाबरोबर मीहि माझे प्राण अर्पण करीन" असें रॉड्झिअँको म्हणाला. पण रॉड्झिअँकोबरोबर मरण्याच्या सवलतीवर राज्यसत्ता घेण्याची इच्छा मिखेल यांस होईना. तो डयूमाचे सभासदांसमोर आला, रॉड्झिअँकोनें आपणाबरोबर मरण्याची कबूली दिली याबद्दल त्याचे आभार मानून त्यानें त्यास आलिंगन दिलें; पण त्याबरोबरच आपणास ही

सुळावरची झारची गादी नको असें नम्रतापूर्वक सांगितलें. यामुळें ड्यूमाची तात्पुरतो समिति हें 'तात्पुरतें सरकारच' (प्रोव्हिजनल गव्हर्मेंट) बनवावें लागलें. या तात्पुरत्या सरकारांत अध्यक्ष रॉड्झिअँको, कॅरॉलोव्ह हा गृहमंत्री, कर्नल एजेल्हार्ड्ट् हा पेट्रोग्रॅडचा सेनापति, केरेन्स्की हा न्याय-मंत्री, मिल्युकोव्ह हा परराष्ट्रमंत्री, गुचकोव्ह हा युद्धमंत्री, शिंगॅरेव्ह हा कृषि-मंत्री, टेरिश्चेंको हा फडणवीस व प्रिन्स ल्वोव्ह हा मुख्य प्रधान अशा नेमणुका झाल्या. झारची सत्ता जाऊन हें नवें सरकार निर्माण झालें. यानें आपणांस 'तात्पुरतें सरकार' असें नांव घेऊन 'घटनापरिषद' (कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली) 'योग्य वेळीं' बोलाविली जाईल व तिनें ठरविलेली घटना कायम होईल असें जाहीर केलें. पण ही 'योग्य वेळ' कोणती याचा खुलासा न करतां प्रथम युद्धावर सर्व शक्ति एकवटण्याचें ठरवून सैन्यावर जुने अधिकारी व राज्य-कारभारांत जुने अधिकारी यांच्या नेमणुका कायम केल्या व राज्यकारभारा-चा जुना गाडा चालविण्यास हातीं घेतला.

सरकार भांडवलवाल्यांचें; अधिकार सोव्हियटचा

पण अशा प्रकारें जुनें सरकार फक्त नवा बुरखा घेऊन अवतरलें तरी आपल्या हुकुमाची तामिली करून घेण्याचा दरारा त्याचे ठिकाणीं उरला नव्हता. सैनिक, कामकरी व सामान्य नागरिकांची जुनी मनोवृत्ति क्रांतीनें पालटून गेल्यामुळें खरी राज्यसत्ता सोव्हियटची आहे व म्हणून ती आपल्याच हातीं आहे असें त्यांना वाटूं लागून शिपायानें कैद्यावर पहारा करावा असा त्यांनीं नव्या सरकारावर पहारा चालू ठेविला.

"ड्यूमांतील प्रतिनिधि, पलटणींतील अधिकारी व अधिकाऱ्यांचे सेनापति, कारखान्यांचे डायरेक्टर व मॅनेजर, रेल्वे व टेलिग्राफ खात्यांचे अधिकारी जमिनदार व त्यांचे मॅनेजर, या सर्वांना आपण जनतेच्या नजरकैदेंत असून आपली कोणत्या क्षणीं कोण, काय चौकशी करील याचा नेम नाहीं असें वाटे. उलट ज्यांनीं आजवर आपला छळ केला त्यांच्याबद्दल आपणास वाटणाऱ्या अविश्वासाचें मूर्त स्वरूप म्हणजे सोव्हियट होय असें लोक मानीत. वर्तमान-पत्राच्या छापखान्यांत कंपॉझिटरांना छापावयास लेख दिल्यास ते आधीं तो क्रांतीस अनुकूल आहे कीं नाहीं तें पाहत व असेल तरच छापण्यास घेत.

लष्करी गाड्यांवर आगगाडी-कामगार पाळत ठेवून राहत, तारायंत्रांवरील कारकून तारा करण्यापूर्वी पुनः पुनः मजकुरांत क्रांतीस विरोध केलेला नाहीं, अशी आधीं खात्री करून घेत. अधिकाऱ्यांच्या हालचालींवर सैनिक नजर ठेवीत; कामगारवर्ग झारच्या पक्षास अनुकूल असलेल्या ओव्हरसिअरांस कारखान्यांतून हाकून लावीत व लिबरल मताच्या व्यवस्थापकांवर पाळत ठेवीत. सामान्य जनतेच्या अधिकारातिक्रमाबद्दल वरिष्ठ वर्गांच्या लेखी तक्रारींचें ढीगचे ढीग रोज डयूमापुढें व तात्पुरत्या सरकारापुढें येऊन पडूं लागले." (हिस्टरी ऑफ रशियन रेव्होल्यूशन—ट्रॉट्स्की.)

भांडवलवाल्यांच्या या सरकारावर जनतेचा मुळींच विश्वास नव्हता. पण ज्या सोव्हियटवर जनतेचा विश्वास होता त्यालाच आत्मविश्वास नव्हता व त्याला भांडवलवाल्यांची कास सोडावयाची नव्हती म्हणून भांडवलवाल्यांचें सरकार नांदूं लागलें होतें. तथापि हुकुमांच्या बजावण्या होण्यासाठीं सोव्हियटचीं आर्जवें त्यास करावीं लागत व कोणताहि हुकूम सोव्हियटकडून आला म्हणजे जनता त्याची बजावणी करी. गुचकोव्ह सांगतो, " हाय हाय, सरकारला खरी सत्ताच नाहीं. सैन्य, आगगाड्या, पोस्ट, तारायंत्र सर्व कांहीं सोव्हियटच्या हातीं आहे. सोव्हियट नांदा म्हणतें तोंवरच हें 'तात्पुरतें सरकार नांदतें' आहे." " जुनें सरकार तुरुंगांत गेलें व नवें पकडण्यांत आलें आहे " असें एकानें या परिस्थितीचें विनोदानें वर्णन केलें आहे.

सोव्हियट व डयूमा यांमध्यें 'दुभंगलेली ही सत्ता' (डयूएल पॉवर) धनिक वर्गास असह्य झाली. फेब्रुवारीअखेर पेट्रोग्रॅडमध्यें बंड यशस्वी झालें. त्याच सुमारास मॉस्कोंतहि बंड झालें व बंडाची लाट साऱ्या देशभर पसरली. पण पेट्रोग्रॅड येथें मूळ राज्यसत्ताच उलथून पडल्यामुळें इतरत्र कोठें बंडास फारसा विरोध झाला नाहीं. पेट्रोग्रॅडमध्यें सोव्हियट निर्माण झालें तशीं सोव्हियट्सहि सर्व लहानमोठ्या शहरांतून व खेड्यांतून निर्माण होऊन राज्य सरकारचें पण सत्ता सोव्हियटची हा दुभंगलेल्या राज्यसत्तेचा प्रकार सर्व देशभर सुरू झाला. तेव्हां मार्च १० रोजीं सर्व झेमस्टोव्हनीं म्हणजे स्थानिकस्वराज्य कौन्सिलांनीं—हीं कौन्सिलें मुख्यतः धनिक वर्गाचीं प्रतिनिधि असत—तात्पुरत्या सरकारलाच राजनिष्ठा दाखविण्याचा ठराव केला. तसेंच या दुभंगलेल्या सत्तेमुळें देशांत बजबजपुरी माजते म्हणून सोव्हियटच्या नांवानें खडे

फोडण्यासहि सुरवात केली. लोकांचा असंतोष दूर करण्याचें मुख्य साधन म्हणजे शेतकऱ्यांना जमिनदारांच्या जमिनी वाटून देणें हें होतें. पण तात्पुरत्या सरकारचें सगळें प्रधानमंडळ जमिनदार व भांडवलदार यांच्या पुढाऱ्यांचेंच बनलें असल्यानें शेतीच्या बाबतींत जनतेचें समाधान करणें त्या सरकारच्या हातून अशक्यच होतें. आठ तासांचा कामाचा दिवस करण्यास सरकार तयार नव्हतें व सरकारला दुखविण्याची सोव्हियट पुढाऱ्यांची छाती होईना. तेव्हां कामगारांनीं आठ तास काम झाल्यानंतर कारखाने सोडून जाण्यास सुरुवात केली. अशा प्रकारें कामगारांनीं कायदाच हातीं घेतला, तेव्हां कारखानदारांच्या समितीनेंच आठ तासांच्या दिवसांस संमति दिली. बंडाचे कालांत चालू असलेला सार्वत्रिक संप राज्यक्रांति झाली तरी पूर्णपणें मोडला नव्हता. शेवटीं कारखानदारांना कामगारांनीं वठणीवर आणून आठ तासांस संमति घेतली. तेव्हां मागून सोव्हियटनेंहि त्यास संमति दिली. लहान लहान शहरांतून हा तंटा एप्रिलमध्येंहि चालला व अखेर कामगार सर्वत्र विजयी झाले.

कामकऱ्यांना विजय मिळाला तो सैनिकांनीं त्यांना साहाय्य केलें म्हणून मिळाला ही गोष्ट धनिक वर्गाच्या पोटांत डांचत होती. तेव्हां त्या दोघांत कलागत लावून कामगारांचा पाडाव करण्याचाहि प्रयत्न धनिकांनीं करून पाहिला. आठ तासांच्या दिवसाची कामगारांची मागणी हें त्यास फार चांगलें निमित्त होतें. "रणभूमीवर खंदकांत जे सैनिक खांद्यावर बंदूक टाकून लढाईस उभे असतात त्यांना असा आठ तासांचा दिवस मिळणें शक्य आहे काय? कारखाना-कामगारांनीं कामाचे तास कमी करून घेणें म्हणजे युद्धसामुग्री कमी निपजणें व त्यामुळें लढाईत सैनिकांचा मृत्यु ओढवणें आहे." या प्रकारचा युक्तिवाद सैनिकांपुढें केला गेल्यानें सैनिक व कामकरी यांत मधून मधून चकमकी होऊं लागल्या. पण धनिकांच्या या कारवायांस फारसें यश आलें नाहीं. सैनिकांशीं फारसें वर्दळीवर न येतां त्यांच्याशीं युक्तीनें वागण्याचें धोरण याहि वेळीं कामगारांनीं कौशल्यानें चालविलें. "सैनिकांचें मन कामगारांस अनुकूल करून घेण्यास केवळ त्यांस परिस्थिति कथन करणें—युद्धापासून भांडवलवाले कसा नफा मारतात त्याचे आंकडे सैनिकांपुढें मांडणें, त्यांना तोफा, बंदुका, यांचे कारखाने दाखविणें एवढें पुरेसें होतें. त्याप्रमाणें कारखानदारांनीं सैनिकांच्या

टोळ्या टोळ्या घेऊन त्यांना कारखाने दाखविण्यास सुरुवात केली. ते सर्व सैनिक पाहत व कामगारांचीं बोलणीं लक्षपूर्वक ऐकत. कामगार सर्व परिस्थितीचा खुलासा करीत. या गांठीभेटींनीं कामकरी व सैनिक यांमध्यें बंधुभाव वाढूं लागला." एप्रिलच्या सुमारास हे द्वंद्व माजविण्याचे प्रयत्न व्यर्थ होऊन कदाचित् अंगलट येतील अशी भांडवलवाल्यांनाच भीति वाटूं लागली व भांडवलवाल्यांच्या वृत्तपत्रांनीं या विषयावर मौन धारण केलें.

सैनिकांस काय हवें होतें

क्रांतीच्या आधीं पुष्कळ दिवसांपासून सैन्यांतली शिस्त बिघडण्यास सुरुवात झाली होती. सैनिक अधिकाऱ्यांच्या आज्ञा मोडतात, घोड्यांचे हाल करतात, सामानाची नासधूस करितात या तक्रारी क्रांतीचे पूर्वी रोजच्या झाल्या होत्या. क्रांतीनें शिस्तीचा बंध आणखी शिथिल झाला. २७ फेब्रुवारीपर्यंत क्रांतीबद्दल बेफिकीर असणाऱ्या पलटणी ता. २८ रोजीं आपल्या अधिकाऱ्यांसह बंडांत सामील होऊन टॉराइड राजवाड्यांत दाखल झाल्या. अधिकाऱ्यांना हें मंजूर होतें असें नव्हे. सैनिकांनीं अधिकाऱ्यांना हाकून आपल्याबरोबर बाहेर काढलें होतें. शिपायांबरोबर कैदी जातो त्याप्रमाणें अधिकारी बंडवाल्यांबरोबर निमूटपणें राजवाड्यांत गेले. अशा या बेदिल सैन्यास शिस्तीचा लगाम घालून पुन्हा जुन्या अधिकाऱ्यांपुढें मान लवविण्यास लावण्याची जोखीम सोव्हियटच्या कार्यकारीमंडळावर आली होती. या कार्यकारीमंडळास सामान्य सैनिक बेबंदशाही माजवितील ही भीति वाटत होती व म्हणून झारशाहीच्या वेळच्या अधिकाऱ्यांपुढें सैनिकांस नमविणें त्यांस आवश्यक वाटलें. पण हें कार्य सोपें नव्हतें. झारशाही हें सरंजामी राज्य असून सैन्यांतील अधिकारी हे उमराव असत. सामान्य सैनिकांस ते अतिशय तुच्छतेनें वागवीत. "अधिकाऱ्यांचा मोठेपणा त्यांच्या गुणांवर नसून त्यांची उच्च जात, सरकारची दडपशाहीची सत्ता व सामान्य सैनिकांनीं अधिकाऱ्यांपुढें 'जी' 'जी' म्हणून वापरावयाची नम्रभाषा यांवर अवलंबून असे!" झारशाही उलथून पडली तरी अधिकाऱ्यांच्या स्वतःच्या मोठेपणाच्या उद्दाम कल्पना नष्ट झाल्या नाहींत. पूर्वी गुलामांप्रमाणें मुकाट्यानें अपमान सोसणारे सैनिक आतां स्वातंत्र्यप्रिय होऊन स्वतःस अधिकाऱ्यांपेक्षां हीन लेखत नाहींत

हें अधिकाऱ्यांना दिसूं लागलें; तरी त्याचा त्यांना उमज पडेना. सेनापति डेनिकिन म्हणाला, "क्रांति झाली ती मला मंजूर आहे. पण सैन्यांत क्रांति होऊं देऊन सैनिकांत पुढारी आणि वक्ते निर्माण होऊं देणें म्हणजे देशाचें वाटोळें करणेंच आहे!" लढाऊ जहाजांवरील खलाशांची अन्न-पाण्याची व खाण्याची स्थिति गुलामांपेक्षां वाईट होती. त्यांच्याच शेजारीं त्यांचे अधिकारी अगदीं झारच्या दिमाखानें वागत. जहाजांच्या मोठमोठ्या कारखान्यांतील संघटित मजूरवर्गांत स्वाभिमान जसजसा अधिकाधिक जागृत होत होता तसतशी ही अपमानाची परिस्थिति त्यास असह्य होत होती. यामुळें बंडाची आग जेथें आरमारापर्यंत पोंचली तेथें ती भयंकर पसरली. क्रॉन्स्डॅट् येथील आरमाराधिकाऱ्यांनीं क्रांतीची बातमी छपविण्याचा प्रयत्न केला. पण खलाशांना ती लागतांच त्यांनीं मुख्य ॲडमिरल यास ठारच केलें व इतर अधिकाऱ्यांस अटक करून निःशस्त्र केलें. लष्करावरहि नाना प्रकारचे जुलूम ऐन युद्धाच्या धामधुमींत चालत. क्रांतीची बातमी जसजशी आघाडीवर जाऊं लागली तसतसे सैनिक आतां या जुलुमाचा शेवट होणार अशा आशेनें अधिकाऱ्यांस न जुमानतां क्रांतींत सामील झाले. क्रांति होतांच अधिकाऱ्यांच्या दालनांतून असलेलीं झारचीं चित्रें सैनिकांनीं फाडून टाकलीं.

क्रांतीच्या आधींच सर्व युद्धसाधनें अपुरीं पडूं लागून सैनिकांचे हाल व पराभव लागोपाठ होऊं लागले होते. त्यांना युद्धाचा कंटाळा आला होता. क्रांति होतांच आतां युद्ध थांबणार ही एकच आशा त्यांस उत्पन्न झाली. मार्चमध्यें ड्यूमांतील कांहीं प्रतिनिधि रणांगणावर दौरा काढून आले. त्यांना सर्व सैनिकांनीं 'युद्ध कधीं थांबविणार व आम्हांला जमीन देणार कीं नाहीं?' हाच एक प्रश्न सर्वत्र ऐकविला. घटनापरिषद जमिनीचा प्रश्न सोडवील असें उत्तर हे प्रतिनिधि सैनिकांना देत. पण सैनिक आपसांत बोलत 'अरे, हें युद्ध थांबून घरीं गेलों म्हणजे पुरे. जमिनदारांपासून जमिनी घेण्याला घटनापरिषदेचा प्रपंच हवा कशाला?' मार्चच्या शेवटीं अखिल रशियन सोव्हियट परिषद भरली; तींत भाषण करतांना अगदीं खंदकांतून थेट परिषदेस आलेला एक सैनिक म्हणाला, "क्रांतीची बातमी येतांच आम्हीं ईश्वराची करुणा भाकली; वाटलें कीं हें युद्ध एकदांचें थांबेल आतां; स्वातंत्र्यासाठीं आम्ही तळहातावर शिर घेऊं; पण भाई, कांहीं करा आणि या

सं. नं. ता. ठा. गं.

युद्धाचा एकदां शेवट करा !" आणखी कांहीं दिवस लढाच म्हणाल तर लढूं. हि, पण आतां हें युद्ध लवकर संपवा असें सगळ्या सैनिकांचें मनोगत तो तेथें बोलत होता. खुद्द रणावरून पळून जाऊन स्वदेश जर्मनीच्या हवाली करण्यास सैनिक उत्सुक झाले नव्हते; क्रांतिकारक सरकार आज ना उद्यां युद्ध थांबवील या आशेनें खांद्यावर बंदूक टाकून रण धरून ते उभे होते. स्वाभिमानाचा तह त्यावांचून होणार नाहीं हें सैनिक जाणून होते. पण यापुढें फक्त स्वदेशाच्या बचावाचें धोरण ठेवावें व तह करण्याचा प्रयत्न करावा, इंग्लंड-फ्रान्सला विजय पाहिजे म्हणून जर्मनीवर चढाई करण्याच्या भरीस रशियन सैन्यानें पडूं नये असें सैनिकांचें म्हणणें होतें. डार्डानेलीस घ्यावी, तुर्कांना जिंकावें, पूर्व प्रशिया रशियास जोडावा, या सर्व आकांक्षा सोडून द्या असें नवीन राज्यकर्त्यांस सैनिकांचें आग्रहाचें सांगणें होतें.

क्रांति दडपण्यासाठीं युद्धाचा उपयोग

जमिनदार व भांडवलवाले यांनीं घडविलेलें जें 'तात्पुरतें सरकार' त्यालाहि रशियास युद्धांत विजय येणार नाहीं हें दिसत होतें. पण तह करून व सैनिकांना परत बोलावून जमिनी व कारखाने खालसा करून घेण्याचें, भांडवलशाही व जमिनदारी यांचा विध्वंस करून घेण्याचें संकट आपल्याच हातानें ओढून घ्यावयास तें सरकार तयार नव्हतें. क्रांतीचा उपयोग युद्ध पुढें चालविण्यास होत नाहीं हें त्यांना कळून चुकलेंच होतें. तेव्हां युद्धाचा उपयोग क्रांति दडपण्यास करावा असें त्यांनीं ठरविलें--

" कारण युद्ध चालू ठेवावयाचें म्हटलें, कीं झारशाहीच्या वेळची लष्करी नोकरशाही कायम ठेवतां येत होती, घटनापरिषद लांबणीवर टाकण्यास सबब होती, देशाचें लक्ष क्रांतीकडून युद्धाकडे खेचता येत होतें. शेतीसंबंधी व इतर समाजसुधारणांसंबंधींचे कायदे करण्याचें कार्य युद्ध संपेपर्यंत तहकूब असावें, युद्धांत विजय मिळाल्यावरच युद्ध संपवावें असें लोकांना सरकारचें सांगणें होतें व विजय खास मिळत नाहीं हें सरकारला मनांतून माहीत होतें. अर्थात् शत्रूस जेरीस आणण्यासाठीं युद्ध चालविण्याची सबब सांगून स्वदेशांतील क्रांतीसच जेरीस आणावें असा त्यांचा डाव होता असें अगदीं सरकारी मंत्र्यांनीं आपसांत पक्केपणीं बोलून ठरविलें नसेल, पण

तशी जरूर नव्हती. भांडवलवाल्यांचें आपली धनसत्ता संभाळण्याचें सनातन धोरण व क्रांतीनें निर्माण केलेली परिस्थिति यांपासून हें सर्व ओघानेंच येत होतें." (हिस्टरी ऑफ् रशियन रेव्होल्यूशन—ट्राट्स्की)

वास्तविक रशिया, इंग्लंड, व फ्रान्स यांनीं जर्मनीचा पराभव केला तरी रशियाच्या मागसलेपणामुळें रशियावर इंग्लंड-फ्रान्सच्या भांडवलशाहीची धाड येणार हें उघडपणें या भांडवलवाल्यांना दिसत होतें. पण बोल्शेव्हिकांच्या चरकांत सापडून आपली धनसत्ता बुडविण्यापेक्षां परकीय साम्राज्यशाहीच्या हल्ल्याचा धोका त्यांनीं पत्करला होता.

क्रांति होतांच युद्धाचें काय करावें याबद्दल सोव्हियट पुढारी बुचकळ्यांत पडले. "आम्ही तर युद्ध नको अशी ओरड एकसारखी करीत आलों, मग आतां तें चालू ठेवा असें म्हणावें तरी कसें!" असा श्रीड्झनें सोव्हियटचा अध्यक्ष झाल्यावर चिंतेनें उसासा टाकला. सोव्हियट पुढाऱ्यांनीं सरकार नाखूष होईल या भीतीनें युद्धाविषयीं मूग गिळून बसण्याचें धोरणच प्रथम स्वीकारलें. सोव्हियट पुढाऱ्यांत कांहींजण झिमरवॉल्ड परिषदेचा युद्धविरोधक ठराव मानणारे होते तर दुसरे कांहीं भांडवलवाल्यांच्या धोरणाचे पक्षपाती होते. यामुळें सोव्हियट पुढाऱ्यांतच मतभेद होईल म्हणून सोव्हियटची कार्यकारी समिति घाबरली. यांतून त्यांनीं समाधानाचा मार्ग काढला. रासपुटीन मेला, झारहि सत्ताहीन झाला; आतां देशच आपला झाला. मग त्याच्या स्वातंत्र्याचें शत्रूपासून रक्षण नको कां करायला? अशी आपली समजूत करून घेऊन सोव्हियटमधील झिमरवॉल्ड पक्षहि युद्धास अनुकूल झाला. क्रांति होऊन नवीन सरकार स्थापन होतांच सैनिकांनीं आपापल्या बराकींत परत जावें असा जाहीरनामा रॉड्झिअँकोनें काढला. यामुळें सैनिक अतिशय चवताळले, सोव्हियटच्या एका बैठकींत वादविवादाची खडाजंगी होऊन अगदीं ठिणग्या पडल्या. पण युद्ध थांबविण्याची बातहि बोलण्यास सोव्हियट पुढारी नाखूष होते. तेव्हां सामान्य सैनिकांना खूष करून त्यांचे अंगीं युद्धाचा उत्साह आणण्यासाठीं सोव्हियटनें 'हुकूम नं. १' म्हणून एक फार महत्त्वाचा खलिता जाहीर केला.

"फेब्रुवारी क्रांतीनें काढलेला असा हा एकच एक बहुमोल खलिता असून त्यानें सैनिकांना स्वातंत्र्याची सनद दिली होती. सगळ्या पलटणींत

सैनिकनियुक्त समित्या स्थापण्यांत याव्या; सैनिकांचे प्रतिनिधि सोव्हियटवर निवडून जावे; प्रत्येक राजकीय बाबतींत सैनिकांनीं आपल्या नियुक्त कमिटीची व सोव्हियटचीच हुकमत मानावी; शस्त्रास्त्रेंहि रेजिमेंट व बटालियन यांच्या समित्यांच्या स्वाधीन असावीं, अधिकाऱ्यांच्या हातीं तीं कांहींहि झालें तरी देण्यांत येऊं नयेत. नोकरीवर रुजू असतां कडक लष्करी शिस्तीचें बंधन असावें. पण रुजू नसतां नागरिकत्वाचे सर्व हक्क सैनिकांस असावे. अधिकाऱ्यांना पदव्या नसाव्या. नोकरीवर रुजू नसतां सैनिकांनीं अधिकाऱ्यांना सलाम करूं नये. सैनिकांना अधिकाऱ्यांनीं असभ्य रीतीनें वागवूं नये, अरे तुरे बोलूं नये" वगैरे आशयाचा मजकूर त्या खलित्यांत होता. हा खलिता सर्व आघाडीवर पाठविण्यांत व प्रसिद्ध करण्यांत आला. भांडवलवालें सरकार अर्थातच नाखूष झालें; म्हणून याच खलित्याबरोबर सैनिकांनीं अधिकाऱ्यांच्या हुकुमांत वागावें अशी ताकीदहि सोव्हियट कार्यकारी मंडळानें पाठविण्याचें ठरविलें होतें. पण छापखाना-कामगारांनीं ही ताकीद कंपोज करून छापण्याचें नाकारलें, यामुळें ती जाऊं शकली नाहीं. पुढें 'हुकूम नं. २' प्रसिद्ध करून पहिला हुकूम पर्यायानें रद्द व्हावा अशी खटपट कार्यकारी समितीनें करून पाहिली, पण ती व्यर्थ गेली. हुकूम नं.१-मध्यें मिळालेलें स्वातंत्र्य सैनिकांनीं तो हुकूम मिळण्याआधींच भोगण्यास सुरुवात केली असून हुकूम नं. १ नें फक्त त्यास मंजुरी मिळाली होती. हें स्वातंत्र्य गमावण्याचा विचार सैनिकांनीं मनास शिवूंहि दिला नाहीं. सरकारच्या आग्रहानें जुने सेनापति सैन्यावर कायम करण्यांत आले होते. पण सोव्हियटचा बोजहि सैनिकांवर राहावा हें कार्यकारी समितीस आवश्यक वाटून ता. ६ मार्च रोजीं त्यांनीं सर्व पलटणींत व लष्करी संस्थांत सोव्हियटचे मुखत्यार (कॉमिसर्स) पाठविण्याचें ठरविलें. यामुळें सैनिकांचे प्रतिनिधि सोव्हियटमध्यें, सोव्हियटचे मुखत्यार सैन्यांत व सैनिकांनीं स्वतः निवडलेल्या कमिट्या एवढा संच जमून सैनिकांच्या स्वातंत्र्याची भक्कम चौकट तयार झाली. "सैनिकनियुक्त कमिटीशीं ज्या अधिकाऱ्याचा मतभेद होई त्याची परिस्थिति असह्य होई. यामुळें अधिकाऱ्यांना जरूर तेव्हां काढून टाकण्याचा अलिखित हक्कच सैनिकांच्या हातीं आला." भांडवलशाही सरकारचें वर्चस्व सैन्यावर मुळींच स्थापित न होतां, ता. ७ ते १०

एप्रिलपर्यंत पश्चिम आघाडीवरील सैनिकांची मिन्स्क येथें जी परिषद भरली तींत सैनिकांनीं 'तात्पुरत्या सरकार'विरुद्ध सोव्हियटच्या कार्यकारी कमिटीस ६१० मतांनीं पाठिंबा दिला. फक्त ८ मतें विरुद्ध पडलीं. ५४ लोक तटस्थ राहिले. पण सोव्हियट पुढाऱ्यांचें धोरण युद्ध चालू ठेवण्याचेंच होतें. म्हणून सोव्हियटला मताधिक्य मिळालें तरी 'तात्पुरत्या सरकारला' एकंदरींत आपलीच सरशी आहे असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

बोल्शेव्हिक पक्षाची त्रेधा

फेब्रुवारीच्या क्रांतीनंतर बोल्शेव्हिक पक्षाची मात्र अगदीं त्रेधा उडाली. "रशियांत झारशाहीचा पाडाव होऊन क्रांति झाली तरी भांडवलशाहीयुग रशियांत अवतरलें नसल्यानें झारशाहीनंतर राज्यसत्ता भांडवलवाल्यांच्या हवालीं करावी व आपण प्रतिपक्षी राहून भांडवलवाल्यांकडून कामकरी व शेतकरी यांच्या हिताचे कायदे करून घ्यावे, पण भांडवलशाही परिपक्व झाल्यावांचून सोशॅलिझम् येणें शक्य नसल्यानें सोशॅलिस्टांनीं राज्यसत्ता धारण करूं नये' असें मेन्शेव्हिकांचें १९०४ सालापासून मत असल्यानें त्यांनीं सोव्हियट स्थापन करून राज्यसत्ता भांडवलवाल्यांच्या 'तात्पुरत्या सरकार'च्या हवालीं केली हें सरळ झालें. पण बोल्शेव्हिक हे १९०४ सालापासूनच, झारशाहीचा पाडाव होतांच सोशॅलिस्टांनीं राज्यसत्ता धारण करून 'कामकरी, शेतकरी व कनिष्ठ मध्यमवर्ग यांची मुखत्यारी' (डेमोक्रॅटिक डिक्टेटरशिप ऑफ् दि प्रॉलेटॅरियट, दि पेझंट्री, ॲन्ड दि लोअर मिडल् क्लासेस्) स्थापावी असें म्हणणारे होते. अर्थात् फेब्रुवारीअखेर क्रांति होऊन कामकरी व सैनिक यांच्या सोव्हियटची स्थापना होतांच, त्या सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करावी ही भूमिका बोल्शेव्हिकांनीं घेणें भाग होतें. पण बोल्शेव्हिकांचे लेनिन, स्टॅलिन वगैरे अनुभविक पुढारी त्या वेळीं परदेशीं अथवा हद्दपार झालेले असून कामकरी व सैनिक यांना पुढाऱ्यांचे बारीक पक्षभेद कळत नव्हते; त्यामुळें क्रांति यशस्वी झाली असें पाहतांच एकदां लवकर कशी तरी स्थिरस्थावर करण्यास आतुर झालेले मेन्शेव्हिक, सोशल रेव्होल्यूशनरी, मध्यमवर्गीय पुढारी हे टॉराइड राजवाड्याकडे धांवले, त्यांनीं सोव्हियट स्थापन होण्यापूर्वीच कार्यकारी मंडळ स्थापलें व नंतर सोव्हियटकडून त्यास मंजुरी मिळविली. कामगार-

क्रांति सैनिकांच्या मदतीनेंच मुख्यतः यशस्वी झाल्यामुळें निवडणुकींत सैनिकांना विशेष महत्त्व आलें. त्यांत क्रांतींत सामील असल्याचा बहाणा करणारे पुष्कळसे अधिकारी, सुशिक्षित मध्यमवर्गीय लोक यांचींच सोव्हियटमध्यें भरती झाली आणि या सर्वांनीं बनलेल्या सोव्हियटनें व कार्यकारी मंडळानें, भांडवलवाल्यांच्या 'तात्पुरत्या सरकारा'स निर्माण करून त्यास संमति दिली. या गल्लतींत बोल्शेव्हिकांना आपला मार्ग दिसेना व ते वेगानें फिरणाऱ्या परिस्थितीच्या भोंवऱ्यांत भोंवळ येऊन गिरक्या खाऊं लागले. राज्यसत्ता काबीज करण्याची कल्पनाहि सोडून देऊन त्यांनीं मेन्शेव्हिकांप्रमाणें 'तात्पुरत्या सरकार'ला पाठिंबा दिला. क्रांति यशस्वी होतांच बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीनें काढलेल्या जाहिरनाम्यांत "कारखान्यांतील व दुकानांतील कामगारांनीं, तसेंच बंडवाल्या सैनिकांनींहि तात्पुरत्या क्रांतिकारक सरकारासाठीं आपले प्रतिनिधि निवडावे" असे शब्द आहेत. पण हा जाहीरनामा कागदावरच राहिला असें दिसतें. सुखॅनोव्ह सांगतो, "मार्चच्या १ तारखेस सोव्हियटच्या कार्यकारी समितीची बैठक झाली. त्या वेळीं भांडवलवाल्या सरकारच्या हातीं राज्यसत्ता द्यावी ती कोणत्या अटींवर द्यावी हा मुख्य प्रश्न होता. समितीच्या ३९ सभासदांत ११ सभासद बोल्शेव्हिक अथवा त्यांचे अनुयायी होते. तसेंच झालुट्स्की, श्ल्याप्निकोव्ह, मोलॅटोव्ह, यांसारखे प्रमुख पुढारी बैठकीस हजर होते. पण भांडवलवाल्या सरकारच्या हातीं राज्यसत्ता देऊंच नये अशा अर्थाचा कोणीं चकारशब्दहि काढला नाहीं!" ता. २ रोजीं सोव्हियटची बैठक झाली. त्या वेळीं ४०० प्रतिनिधि हजर होते. त्यांतील ४० बोल्शेव्हिक होते. पण भांडवलवाल्यांच्या हातीं राज्यसत्ता द्यावी या ठरावाविरुद्ध फक्त १९ मतेंच पडलीं. या १९नींहि आपला म्हणून स्वतंत्र असा कोणताहि ठराव न मांडतां फक्त विरुद्ध मत देऊन आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. कामगारांत बोल्शेव्हिकांची संख्या थोडी होती तरी त्यांनीं मात्र पुढाऱ्यांच्या या धोरणास विरोध ताबडतोब सुरू केला. पेट्रोग्रॅडमधील कारखान्यांचा प्रचंड विभाग जो वायबॉर्ग तेथें बोल्शेव्हिक कामगारांचा मोठा भरणा होता. तेथें हजारों कामगारांच्या व सैनिकांच्या सभा होऊन सोव्हियटनें राज्यसत्ता धारण केली पाहिजे अशा अर्थाचे ठराव जवळ जवळ एकमतानें पास होऊं लागले. अशा अर्थाचा एक ठराव छापून ठळक

ठिकाणीं चिकटविण्यांतहि आला होता. पण बोल्शेव्हिकांच्या पेट्रोग्रॅड कमिटीनें तो नियमबाह्य ठरविला व मग झिस्तीसाठीं वायबॉर्ग कामगारांनीं तें पत्रक परत घेतलें. "सरंजामशाही मोडून जात असून भांडवलशाहींत मिळणारें सर्व प्रकारचें स्वातंत्र्य आपणांस मिळणार अशा कालखंडांतून आपण जात आहोंत हें मेन्शेव्हिकांचें मत आम्हीं मान्य केलें!" अशी श्ल्याप्निकोव्ह कबुली देतो. सोशॅलिझम् स्थापणें हें आपलें 'अंतिम ध्येय' असून त्यासाठीं झगडण्याइतकें स्वातंत्र्य कामगारांना हवें आहे असें बोल्शेव्हिक पत्र 'प्रवडा' यानें बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचें मनोगत सांगितलें.

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यांत स्टॅलिन व कॅमेनेव्ह हे दोन बोल्शेव्हिक पुढारी सैबेरियांतून हद्दपारीवरून परत आले. पण त्यांनाहि बोल्शेव्हिकांच्या बारंगळलेल्या धोरणास पुन्हा रस्त्यावर आणण्याचें काम झेपलें नाहीं अथवा सुचलें नाहीं असें दिसतें. ता. १४ मार्च रोजीं सोव्हियटनें 'जगांतील सर्व लोकांस' उद्देशून एक जाहीरनामा काढला. त्यांत फेब्रुवारींतील रशियन क्रांति ही संयुक्तांच्या म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, इटली या जर्मनीविरुद्ध संयुक्तपणें लढणाऱ्या राष्ट्रांच्या दृष्टीनें फायद्याची असून फ्रान्ससारख्या प्रजासत्ताक राज्याची येथें स्थापना होत आहे असा गौरवपूर्वक उल्लेख होता. हा जाहीरनामा एकमतानें पास झाला होता. यासंबंधीं "सोव्हियटमधील निरनिराळ्या पक्षांत बुद्धिपुरस्सर घडविलेली तडजोड" असें 'प्रवदा'नें म्हटलें होतें. लवकरच 'प्रवदा'चें संपादकत्व स्टॅलिन, कॅमेनेव्ह या बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटींतील सभासदांनीं स्वतःकडे घेतलें. पण अर्थातच 'प्रवदा'चें धोरण मुळींच बदललें नाहीं. जोंपर्यंत जर्मन सेनापतींची आज्ञा जर्मन सैनिक मान्य करीत आहेत "तोंपर्यंत युद्धाविरुद्ध बोलणें व्यर्थ असून रशियन सैनिकांनीं जर्मनींच्या गोळीस गोळी भिडविली पाहिजे" असें नव्या संपादकांनीं लिहिलें. नवीन संपादकांच्या नेतृत्वाखालीं 'प्रवदा'चा जो पहिला अंक निघाला त्यांतील धोरण पाहून युद्ध चालूं ठेवावें म्हणणारे सर्व पक्ष खूष झाले. पण त्या बरोबरच बोल्शेव्हिक कामगारांना याचा संताप आला व या नव्या संपादकांना हाकून लावा अशी मागणी होऊं लागली. शेवटीं वायबॉर्ग कामगारांकडून 'प्रवदा'च्या या धोरणाचा निषेध करणारें एक पत्र आलें व तें 'प्रवदा'तच छापणें संपादकांना भाग पाडण्यांत आलें. त्यांत "पत्राला जर कामगारांचा

विश्वास गमविण्याची इच्छा नसेल तर त्यांनीं कामगारांत क्रांतिकारक जागृति केली पाहिजे. मग भांडवलवाल्या घुबडांना त्यापासून कितीहि दुःख होवो असें म्हटलें होतें. पण अशा विरोधाचा त्या वेळीं फारसा उपयोग झाला नाहीं. मार्चचे अखेरीस सर्व रशियांतील ८२सोव्हियट्सच्या प्रतिनिधींची एक अखिल रशियन परिषद पेट्रोग्रॅड येथें भरली. तेथें 'तात्पुरत्या सरकार'ला पाठिंबा देण्याच्या धोरणास स्टॅलिन व कॅमेनेव्ह यांनीं पाठिंबा दिला. त्याच वेळीं सर्व रशियांतील बोल्शेव्हिकांची एक बोल्शेव्हिक पक्षाची परिषद पेट्रोग्रॅड येथें भरली होती. तींत स्टॅलिननें बोल्शेव्हिक पक्षाची त्या वेळची भूमिका पुढीलप्रमाणें स्पष्ट करून मांडली.

आपल्या भाषणांत स्टॅलिन म्हणाला, "राज्यसत्ता दोन संघटनांत (सोव्हियट व 'तात्पुरतें सरकार') विभागली असून कोणतीहि एक संघटना पूर्ण सत्ताधारी नाहीं. या दोहोंत वादविवाद होतो, झगडा होतो; व तो तसा होणें इष्टच आहे. दोघांसहि भूमिका विभागून दिल्या आहेत. खरोखर क्रांतिकारक बदल घडवून आणण्यांत सोव्हियटनेंच पुढाकार घेतला आहे. बंडवाल्या लोकांचा क्रांतिकारक पुढारी सोव्हियटच आहे. 'तात्पुरत्या सरकार'चें नियंत्रण हें सोव्हियटच करीत आहे. उलट क्रांतिकारक जनतेनें मिळविलेल्या विजयाचें रक्षण करण्याचें कार्य 'तात्पुरत्या सरकार'नें पत्करलें आहे. सोव्हियट जनतेची संघटना करतें व जनतेच्या शक्तीवर ताबा चालवितें. 'तात्पुरतें सरकार' गोंधळलें आहे व लोकांनीं जिंकून आधींच मुठींत ठेविलेला विजय आपण रक्षण करतों असें सांगत आहे; परिस्थिति अपायकारक आहेच, पण तशीच फायदेशीरहि आहे. भांडवलवाले आज ना उद्यां आपणांस सोडून जाणारच. पण आजच घाई करून त्यांचे थर पाडून टाकणें आपल्या फायद्याचें नाहीं. जितक्या प्रमाणांत 'तात्पुरतें सरकार' क्रांतीच्या पायऱ्या मजबूत करील तितक्या प्रमाणांत आमचा त्यास पाठिंबा आहे. जितक्या प्रमाणांत हें सरकार प्रतिक्रांतिकारक असेल तितक्या प्रमाणांत त्यास पाठिंबा देणें अयोग्य होईल." तात्पुरत्या सरकारला या भाषणांत स्टॅलिननें पाठिंबा दिला असून अर्थातच युद्ध चालू ठेवण्याच्या धोरणासहि त्यानें उचलून धरलेंच आहे.

झिमरवॉल्ड परिषदेंत लेनिननें घेतलेली भूमिका याहून वेगळी होती.

पण क्रांति होऊन झारशाहीचा पाडाव झाला असल्यानें लेनिन झिमरवॉल्डची भूमिका बदलील अशी अपेक्षा होती. स्वित्सर्लंडांतून मार्चच्या आरंभींच बोल्शेव्हिकांचें धोरण चुकीचें आहे अशी तार लेनिननें केली होती. तथापि रशियाच्या प्रत्यक्ष परिस्थितीचें ज्ञान लेनिनला नाहीं, तो येथें येतांच परिस्थिति समजून घेतल्यावर 'तात्पुरत्या सरकार'ला पाठिंबा देण्याचें धोरण उचलून धरील असें सर्वांस वाटत होतें. बोल्शेव्हिक कामगारांचा असंतोष 'तात्पुरत्या सरकार'विरुद्ध वाढूं लागला या गोष्टीची 'तात्पुरत्या सरकार'च्या प्रधानमंडळाच्या मार्चमधील एका बैठकींत चर्चा चालली असतां " थोडें थांबा, लेनिन स्वतांच येतो आहे. तो आला म्हणजे कामगारांना 'खेरें धोरण' तो शिकवील " असें करेन्स्कीनें प्रधानमंडळाचें सांत्वन केलें. आणि खरोखरच लेनिन आल्यावर बोल्शेव्हिक पक्षाच्या खच्या धोरणास सुरुवात झाली. पण केरेन्स्कीला हवेंसें व येईलसें वाटलें तें हें धोरण नव्हतें. स्टॅलिनचें वर उद्धृत केलेलें भाषण २९ मार्च रोजीं झालें. त्यानंतर पांचच दिवसांनीं लेनिन फिन्लंडमध्यें उतरला. फिन्लंडमध्यें पाय ठेवल्यापासून लेनिननें स्टॅलिनप्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचें धोरण साफ चुकीचें आहे असें सांगून आपली भूमिका कोणती हें जाहीर केलें. स्टॅलिननें बहुधा तात्काळ आपली भूमिका बदलली व तो लेनिनच्या निशाणाखालीं येऊन उभा राहिला. बाकीचे पुढारी इतके लवकर बदलले नाहींत. पण कामगार व सैनिक यांचा पाठिंबा लेनिनच्या मतास वाढत गेला व त्या जोरावर ऑक्टोबरमध्यें भांडवलवाले, मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी या सर्वांविरुद्ध त्यानें एकट्या बोल्शेव्हिक पक्षाचें बंड उभारून कामगारक्रांति यशस्वी केली व राज्यसत्ता धारण केली. फेब्रुवारी-क्रांतीस ही नवी कलाटणी कशी मिळाली हें आतां पहावयाचें.

लेनिन रशियांत आला

फेब्रुवारी-क्रांति होईपर्यंत लेनिन स्वित्सर्लंडांत झूरिच येथें होता. झिनोव्हिफ हा त्याचा मतप्रसाराचा मदतनीस असून लेनिनची बायको क्रूप्सकाया ही चिटणिशीचें सर्व काम करी. रशियन बोल्शेव्हिकांचें नेतृत्व लेनिन स्वित्सर्लंडांतून करीत असे, तरी महायुद्ध सुरू झाल्यापासून बातमीबंदीचे तट संयुक्त राष्ट्रांनीं त्याचेभोंवतीं उभारल्यामुळें रशियन कार्यकर्त्यांना स्वित्सर्लंडांतून

वेळोवेळीं सूचना देणें अथवा रशियांतील परिस्थिति नीटपणें वेळोवेळीं समजून घेणें हें लेनिनला शक्य नव्हतें; बोल्शेव्हिकांचे स्टॅलिन, कॅमेनेव्ह वगैरे पुढारी सैबेरियांत, तर लेनिन झिनोव्हिफ वगैरे स्वित्सर्लंडांत. दुसरे कोणी आणखी कोठें तरी रशियापासून दूर अशी बोल्शेव्हिक पुढाऱ्यांची वाताहत झाल्यामुळें फेब्रुवारी क्रांतीनंतर आकस्मिकपणें व अनपेक्षित रीतीनें उद्भवलेल्या परिस्थितींत बोल्शेव्हिकांच्या धोरणास कांहींच ताळ राहिला नाहीं व ते मेन्शेव्हिकांबरोबर वाहवले. लेनिनला झूरिच येथें राहूनहि आपल्या अनुयायांची ही चूक कळून आली व 'पिंजऱ्यांतला पक्षी बाहेर जाण्यासाठीं अधीर होतो तसा तो झूरिचहून रशियाला येण्यास अधीर झाला.' सुटून जाण्यासाठीं अनेक योजनांची चर्चा झाली. इंग्लंडनें लेनिन व त्याचे सहकारी यांना रशियास जाऊं देण्यास परवाना देऊं देण्याचें साफ नाकारलें. संयुक्त राष्ट्रांत इंग्लंडला विशेष महत्त्व असल्यामुळें तिकडून परवाना मिळणें सहजच अशक्य झालें. लेनिननें बहिरा व मुका स्विडिश नागरिक बनून तशा परवान्यावर पळ काढावा असाहि एक बेत झाला होता; पण तो अमलांत येऊं शकलेला दिसत नाहीं. दरम्यान आपलीं मतें रशियांतल्या आपल्या अनुयायांना कळविण्याचें त्यांचें कार्य अखंड चालू होतें. मार्चच्या ६ तारखेस त्यानें पुढील तार रशियांतील आपल्या अनुयायांस पाठविली;—

"आमचें धोरणः—सरकारवर विश्वास ठेवूं नये; नवीन सरकारला पाठिंबा देऊं नये; केरेन्स्कीबद्दल विशेष सावध रहा; कामगारवर्गाचे हातीं शस्त्रास्त्रें देणें हाच एक पीछेहाट न होऊं देण्यास उपाय आहे. पेट्रोग्रॅडडयूमाची ताबडतोब निवडणूक करावी. इतर कोणत्याहि पक्षाशीं सख्य करूं नये."

पण नवीन 'तात्पुरत्या सरकार'ला श्चीड्झसारख्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे मेन्शेव्हिक सभासद व कांहीं बोल्शेव्हिकहि पाठिंबा देत आहेत ही हकीकत त्याला लवकरच विदेशी वृत्तपत्रांतून कळली. तेव्हां त्यानें १७ मार्च रोजीं स्वीडनमधील कांहीं मित्रांचे द्वारा पुढील आशयाचें खरमरीत पत्र पाठविलें.

"या कपटनाटकांत आमचा पक्ष भाग घेणार असेल तर तो आपल्या तोंडास काजळ फासून घेणार असून ही राजकीय आत्महत्याच होणार आहे.

राष्ट्रैक्य व स्वदेशाभिमान यांचें हें जें ढोंग उभारण्यांत आलें आहे यांत सामील होण्यापेक्षां आमच्या पक्षांतील कोणाशींहि वैर पत्करण्यास मी तयार होईन ...कॅमेनेव्ह यानें लक्षांत ठेवावें कीं, सगळ्या जगाचा इतिहास घडविण्याची जबाबदारी या वेळीं त्याचेवर आहे.''

मार्च ३१ रोजीं स्वित्सर्लंडमध्यें असतांच 'झूरिचर व्होल्केच्ट' या पत्रांत लेनिननें रशियन क्रांतीसंबंधींचें आपलें धोरण खालीलप्रमाणें जाहीर केलें. तो लिहितो—

"तर मग (रशियन) कामगारांनीं यापुढें कोणतें धोरण ठेवावें ? या वेळीं आम्ही क्रांतीच्या पहिल्या अवस्थेपासून दुसऱ्या अवस्थेच्या मार्गावर आहों; झारिस्ट सरकारविरुद्ध केलेलें बंड यशस्वी झालें. आतां भांडवलशाही-विरुद्ध—साम्राज्यशाहीविरुद्ध आम्हांस बंड करावयाचें आहे .....या वेळचें विशेष कार्य म्हणजे कामगारांची संघटना करणें हें. पण ही संघटना सोशॅलिझम्चा द्रोह करणाऱ्या पुढाऱ्यांनीं मान्य केलेल्या परंपरागत पद्धतीनें करावयाची नाहीं; सर्व देशांतील संधिसाधु* पुढाऱ्यांना योग्य वाटणाऱ्या देशाभिमानाच्या ढोंगाच्या भूमिकेवर ही संघटना करावयाची नाहीं, तर क्रांतिकारक स्वरूपाची संघटना करावयाची आहे. .....या संघटनेनें राज्य-कारभार व लष्कर या दोनहि प्रकारची सत्ता धारण केली पाहिजे. १८७१ च्या पॅरिसकम्यूनच्या अनुभवावरून मार्क्सनें असें शिकविलें आहे, कीं आयतें तयार असलेलें राज्ययंत्र ताब्यांत घेऊन कामगारवर्ग त्याचा आपल्या हिताच्या दृष्टीनें उपयोग करूं शकणारच नाहीं. कामगारवर्गानें या राज्य-यंत्राचा (लष्कर, पोलीस व नोकरशाही यांचा) विध्वंस केलाच पाहिजे. ही गोष्ट करण्याची गरज नाहीं अथवा तिचें तितकेंसें महत्त्व नाहीं असें संधिसाधु पुढारी सांगत आहेत. पण १८७१चें पॅरिस कम्यून व १९०५ची रशियन क्रांति यांनीं हाच अत्यंत महत्त्वाचा व्यावहारिक धडा आम्हांला शिकविलेला आहे. (राज्यसंस्था नसावीच, त्यावांचूनच सामाजिक व्यवहार न्यायानें व सुरळीत चालू शकतात असें मानणारे) अराजकपंथी आम्ही

* संधिसाधु (ऑपर्च्युनिस्ट) = तत्त्वनिष्ठा न बाळगतां प्रसंग येईल तशी पगडी फिरविणारे.

नव्हे. क्रांतिकारक पालट घडवून आणण्यासाठीं सरकार हवें असें आमचें मत आहे. पण संधिसाधु पुढारी व कॉट्स्की व त्याचे अनुयायी यांच्याशींहि आमचा मतभेद आहे, तो असा कीं, भांडवलवाल्यांचें प्रजासत्ताक राज्य असतें तसलें तयार राज्ययंत्र आम्हांला उपयोगाचें नाहीं. सशस्त्र व संघटित अशा कामगारांच्याच हातांत आम्हांस राज्यसत्ता द्यावयाची आहे. आम्हांला हवें असणारें सरकार हें तत्त्वतः १८७१चें कम्यून व १९०५ व १९१७ सालचें रशियांतलें कामगारप्रतिनिधींचें सोव्हियट हें अशा प्रकारचें सरकार होय. याच पायावर आपण पुढें उभारणी केली पाहिजे."

स्वित्सर्लंडांतून रशियांत जाण्याचे सर्व उपाय हरल्यावर शेवटीं जर्मन सरकारच्या मदतीनें रशियांत जाण्याचें लेनिननें ठरविलें. लेनिन हा युद्ध चालूं ठेवण्यास विरोध करणार हें ठाऊक असल्यानें रशियानें युद्धांतून अंग काढून घेतल्यास तेवढाच एक शत्रु कमी होईल, कदाचित् लेनिननें रशियांत दुफळी घडवून आणल्यास रशियाचा पराभव करून पुष्कळशीं लूट मारतां येईल या आशेनें जर्मन सरकारनें आपल्या मुलखांतून लेनिनला रशियांत जाऊं देण्याचें ठरविलें होतें. यामुळें लेनिननें जर्मनीस फितुर होऊन स्वदेशाचा गळा कापला असा आरोप त्यावर येऊन त्याचें सर्व चारित्र्य कलंकित होण्याचा संभव होता. पण रशियांत या वेळीं जाऊन पीछेहाट होत असलेल्या क्रांतीस आपण परत पुढें खेचली पाहिजे याची आतुरता लेनिनला इतकी तीव्रपणें लागली होती, कीं सर्व आयुष्यास काळिमा लागण्यासारखा धोकाहि पत्करण्यास तो तयार झाला. लेनिन, त्याची बायको क्रूप्सकाया, झिनोव्हिफ व इतर क्रांतिकारक मिळून एकंदर ३० जणांसाठीं एक स्वतंत्र आगगाडी जर्मन सरकारनें द्यावी, ती 'सील' केलेली असावी व तिची तपासणी कोणींहि करूं नये असा लेनिननें जर्मन सरकारकडून करार करून घेतला होता. इतक्या सवलती जर्मन सरकारनें देण्याचें मान्य केलें व त्या तंतोतंत पाळल्या. यामुळें पुढील सहा महिने लेनिनच्या डोकीवर फितुरीचा आळ सतत तरवारीसारखा लटकत होता. ही 'सीलबंद' गाडी या काळांत त्यास फारच भोंवली व जर कोणत्याहि कारणानें ऑक्टोबर-क्रांतींत त्यास अपयश आलें असतें अथवा त्यापूर्वीच सरकारचें हातीं सांपडून अथवा अन्य कारणांनीं त्याचा अंत झाला असता तर आज जगद्वंद्य रशियन देशभक्त म्हणून माहीत

झालेला हा थोर पुरुष एक देशद्रोही गुन्हेगार म्हणून जगास माहीत झाला असता. असो.

लेनिननें सुकाणूं फिरविलें

लेनिन फिन्लंडमध्यें उतरतांच त्यास भेटण्यासाठीं कॅमेनेव्ह वगैरे स्नेही व शिष्य त्याचे भेटीस गेले होते. "कॅमेनेव्ह, 'प्रवदा'मध्यें काय भलभलतें लिहितो आहेस हें? आम्हीं कित्येक अंक पाहिले व नीट समजहि दिली होती!" असें बोलून लेनिननें पहिल्या सलामीलाच कॅमेनेव्हला झाडून टाकलें. स्टेशनवर पेट्रोग्रॅडच्या बोल्शेव्हिक कमिटीनें लेनिनचें प्रचंड स्वागत करण्याचें ठरविलें असून हजारों कामगार व सैनिक एक मोठी चिलखती गाडी घेऊन फिन्लंड स्टेशनवर त्यास सामोरे आले होते. स्टेशनवरील 'झार्स रूम' नांवाच्या झारच्या दिवाणखान्यांत लेनिनचा जाहीर सत्कार करण्यांत आला. तेथें पेट्रोग्रॅड सोव्हियटचा अध्यक्ष या नात्यानें स्चीड्झ् यानें स्वागतपर भाषण केलें. 'तात्पुरत्या सरकार'ला पाठिंबा देण्याचें आपलें धोरण लेनिनला पसंत नाहीं ही गोष्ट स्चीड्झच्या मनांत डाचत होती; म्हणून स्वागताच्या भाषणांतच भीड चेपून टाकून आपली भूमिका स्पष्ट करावी असें त्यानें ठरविलें. आपल्या भाषणात स्चीड्झ् म्हणाला,

"भाई लेनिन, पेट्रोग्रॅडसोव्हियट व रशियन क्रांति यांच्यातर्फे मी तुझें स्वागत करतों. ...पण आम्ही तुला स्पष्ट सांगतों, कीं या वेळचें आपलें मुख्य कार्य म्हणजे क्रांतीचें आंतील व बाहेरील हल्ल्यांपासून रक्षण करणें हेंच आहे असें आम्हांस वाटतें. हें ध्येय सिद्ध करण्याच्या कार्यांत तुझी आम्हांस मदत होईल अशी मी आशा करतों."

उत्तरादाखल भाषण करतांना लेनिन म्हणाला,

"कामगार, सैनिक व खलाशी भाई हो, तुमच्या रशियन क्रांतींतील यशाबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. आंतरराष्ट्रीय क्रांतीचे आघाडीचे सैनिक या नात्यानें तुमचें अभिनंदन करण्यांत मला आनंद होत आहे. ज्या वेळीं भाई कार्ल लेबकेनेट(जर्मन कम्युनिस्ट पुढारी)च्या हांकेसरशीं जर्मन लोक त्यांना पिळून काढणाऱ्या भांडवलशाहीविरुद्ध हत्यार उचलतील तो दिवस

फार दूर नाहीं. तुम्हीं यशस्वी केलेल्या रशियन क्रांतीनें एक नवीन कालखंड सुरू झालें आहे. जागतिक सोशॅलिस्ट क्रांति चिरायु होवो."

श्रीड्झ्च्या भाषणाविरुद्ध प्रत्यक्षपणें या भाषणांत कांहींच नव्हतें. पण स्वदेशांतील भांडवलशाही सत्ता संभाळण्याची भूमिका श्रीड्झनें घेतली असतां जागतिक क्रांतीच्या गोष्टी लेनिननें त्याला ऐकविल्या यांत दोघांची विरोधी भूमिका स्पष्टच झाली. स्टेशनवरून लेनिनची मिरवणूक काढण्यांत आली. त्याचें दर्शन हजारों लोकांना व्हावें म्हणून सैनिकांनीं चिलखती गाडीच्या वरील छतावर त्याला बसविलें, रात्रीची वेळ असल्यानें इतर गाड्यांवरील दिवे मंद करून लेनिनवरच पुष्कळ प्रकाश पाडला व तो सर्वांस स्पष्ट दिसावा अशी सोय केली. बोल्शेव्हिकांची मुख्य कचेरी असलेल्या 'क्षेशिन्स्काया' वाड्यांत मिरवणूक आल्यावर तेथेंहि लेनिनचा पुन्हा सन्मान झाला. तेथें लेनिननें सुमारें दोन तास तपशीलवार भाषण करून आपली भूमिका मांडली.

"प्रवासांत असतां मला वाटे" तो म्हणाला, "कीं स्टेशनांत शिरतांच पीटर-पॉल किल्ल्याकडे (तुरुंगाकडे) आमची रवानगी होईल. ती परिस्थिति पार बदलली आहे असें दिसतें. पण अजूनहि तो प्रसंग येईल. आमच्या नशिबाची कैद कायमची सुटेल असें समजूं नका. .....आम्हांला पार्लमेंटरी प्रजासत्ताक राज्य नको आहे. आम्हांला भांडवलवाल्यांची लोकशाही नको. आम्हांला कामकरी, सैनिक व शेतकरी यांच्या प्रतिनिधींच्या सोव्हियटचें सरकार हवें आहे. ...झिमरवॉल्ड परिषदेंतील जहाल पक्ष (म्हणजे लेनिनचा पक्ष; मागें पृ. १३३-१३४ पहा) हाच एकटा जागतिक क्रांतीचा पुरस्कर्ता आहे. बाकीचे सर्व संधिसाधु आहेत. ते गोड शब्द बोलतात. पण त्यांनीं सोशॅलिझम् व कामगार पक्ष यांचा द्रोह केला आहे."

लेनिन ३ एप्रिल रोजीं फिन्लंड येथें उतरला. दुसरे दिवशीं म्हणजे ता. ४ रोजीं त्यानें क्रांतीसंबंधीं आपली भूमिका बोल्शेव्हिक पक्षास सादर करण्यासाठीं एक पत्रक पक्षाच्या चिटणिसाच्या हवालीं केलें. हें पत्रक '४ एप्रिलचे सिद्धांत' (थेसीज् ऑफ् एप्रिल फोर) म्हणून इतिहासांत अमर झालें आहे.

चार एप्रिलचें सिद्धांतदशक

या पत्रकांत लेनिन म्हणतो, "(१) युद्धासंबंधीं आमचें धोरण असें असलें पाहिजे, कीं क्रांतिकारक बचावाच्या धोरणास (रेव्होल्यूशनरी डिफे-

न्सिझम्) म्हणजे जर्मनीपासून भांडवलवाल्या रशियन सरकारचें रक्षण करण्याच्या धोरणास) आम्हीं मुळींच सवलत देऊं नये. कारण प्रिन्स ल्व्होव्ह-कंपूचें हें सरकार, भांडवलशाही सरकार असल्यानें रशियाचें युद्ध हें लुटारू साम्राज्यशाहीचें युद्धच राहणार. वर्गजागृत असा कामगारवर्ग क्रांतिकारक बचावाच्या धोरणाचें समर्थन करून क्रांतिकारक युद्धास संमति देऊं शकेल; पण तो या अटीवर कीं (अ) सर्व राज्यसत्ता कामगार व त्यांचे साहाय्यक गरीब शेतकरी यांच्या हातीं आली पाहिजे, (आ) इतर प्रदेश न जिंकण्याचें धोरण शब्दांत नव्हे तर कृतींतहि स्पष्ट झालें पाहिजे व (इ) सर्व भांडवलशाही वर्गाशीं व्यवहारतः आपला संबंध पूर्णपणें तुटला पाहिजे. आज परिस्थिति अशी आहे कीं, सामान्य लोकप्रतिनिधींना क्रांतिकारक बचावाचें धोरण हें प्रामाणिकपणें अवश्य वाटत असून त्यासाठीं युद्ध हें अपरिहार्यच आहे अशी त्यांची खात्री झाली आहे. भांडवलवाल्यांनीं त्यांना फसविलेलें असल्यामुळें हें युद्ध साम्राज्यवर्धनासाठीं आहे हें त्यांना माहीत नाहीं. म्हणून जनतेला आपण पूर्णपणें, चिकाटीनें व धीर धरून तिची चूक स्पष्ट करून सांगितली पाहिजे. भांडवलशाही व साम्राज्यलोभजन्य युद्ध यांचे संबंध अविभाज्य आहेत. भांडवलशाहीच उलथून पाडल्याशिवाय खरी लोकशाहीप्रधान व जुलूमविरहित अशी शांतता लाभेल अशा प्रकारें युद्धाचा शेवट होणारच नाहीं. रणांगणावरील सैनिकांत ही भावना पसरविली पाहिजे. विरुद्ध बाजूच्या दोन्ही सैनिकांत बंधुभावना पसरविली पाहिजे.

(२) रशियांतील सद्यःस्थितीचें वैशिष्ट्यच असें आहे कीं, क्रांतीच्या पहिल्या अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेकडे आपण चाललों आहों; कामगारांची कमकुवत संघटना व अस्पष्ट वर्गजागृति यांमुळें या अवस्थेंत भांडवलवाल्यांच्या हातीं राज्यसत्ता गेली. पण यापुढें ज्या दुसऱ्या अवस्थेंत आपण जात आहों तींत कामगार व अगदीं गरीब शेतकरी यांचे हातीं राज्यसत्ता जाईल. आज रशियांत, कोणत्याहि युद्धयमान राष्ट्रांत नाहीं इतकें नागरिकस्वातंत्र्य आहे. यामुळें आपलें काम आपणास जास्तींत जास्त कायदेशीरपणें करतां येईल. लोकांवर जुलूम नाहीं व सोशॅलिझम्चा कट्टा शत्रु असें जें हल्लींचें भांडवलवाल्यांचें सरकार त्यावर अज्ञानामुळें जनतेचा विश्वास बसलेला आहे, म्हणूनहि आपणांस जास्तींत जास्त कायदेशीरपणें वागलें

पाहिजे. प्रचंड कामगारवर्गास नुकतीच राजकीय जागृति आली आहे. यामुळें हल्लींच्या विशेष स्थितींत आपल्या पक्षाचें कार्य परिस्थितीशीं आपण जुळतें केलें पाहिजे.

(३) 'तात्पुरत्या सरकार'ला पाठिंबा देऊं नये. त्या सरकारचीं वचनें, विशेषतः आपण नवीन प्रदेश जिंकणार नाहीं अशा अर्थाचीं त्यांनीं दिलेलीं वचनें कशीं खोटीं आहेत या गोष्टी चवाठ्यावर आणाव्या. हें भांडवलशाही सरकार आपल्या साम्राज्यलोभाचा त्याग करो अशी भ्रामक मागणी न मांडतां ही गोष्टच कशी अशक्य आहे हें जाहीर करावें.

(४) कामगारांच्या अनेक सोव्हियट संस्थांत आम्ही अल्पसंख्य आहों ही गोष्ट आम्हांस उघड दिसते आहे. आमचा पक्ष संख्याबलानें अगदींच क्षुद्र असून 'पीपल्स सोशॅलिस्ट', 'सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी', 'ऑर्गनायझेशन कमिटी' (श्रीड्झ, त्सेरिटेली, स्टेक्लॉव्ह इ. इ.) अशा अनेक पक्षांचें एकजूट झालेलें बल फार मोठें आहे. हे सर्व पक्ष भांडवलवाल्यांच्या वर्चस्वास शरण गेले असून ते कामगारांवरहि त्या वर्चस्वाचें दडपण आणीत आहेत.

लोकांना यापुढें आम्हीं स्पष्टपणें समजून सांगितलें पाहिजे, कीं कामगार-प्रतिनिधींची सोव्हियट हीच यापुढें क्रांतिकारक राज्यसंस्था होऊं शकेल. यासाठीं आपलें काम हें आहे, कीं प्रस्तुत सरकार भांडवलवाल्यांच्या कच्छपीं जात असतां लोकांना आपण शांतपणें, सतत व पद्धतशीरपणें लोकांच्या रोजच्या अडीअडचणींच्या दृष्टीनें सरकारच्या कारवाया व घोडचुक्या पृथक्करणपूर्वक लोकांपुढें मांडल्या पाहिजेत. आपण अल्पसंख्य आहों तोंवर आपण टीका करीत राहूं. सरकारच्या चुका लोकांपुढें मांडूं आणि सर्व सत्ता कामगार-प्रतिनिधींच्या सोव्हियटच्या हातीं आणावी असा मतप्रसार करूं. म्हणजे मग सरकारच्या या घोडचुक्यांतून आपण कायमचें कसें निसटावें हें कामगारां-नाच अनुभवानें कळूं लागेल.

(५) पार्लमेंटरी प्रजासत्ताक नको आहे. कामगारप्रतिनिधींचें सोव्हियट स्थापल्यानंतर पार्लमेंटरी प्रजासत्ताक स्थापणें म्हणजे आपली पीछेहाट करून घेणें आहे. आम्हांला जें प्रजासत्ताक हवें आहे तें कारखाना-कामगार, शेती कामगार व शेतकरी यांच्या सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींचें प्रजासत्ताक खालपासून वरपर्यंत हवें आहे. हल्लींचें पोलिस, सैन्य व नोकरशाही ही रद्द करावी. (व

कामगारांच्या हातीं शस्त्रें द्यावीं.) सर्व अधिकाऱ्यांची निवडणूक व्हावी व त्यांना केव्हांहि कामावरून दूर करण्याचा अधिकार निवडणाऱ्यांनाच असावा. चांगल्या लायक कामगारांस मिळेल याहून अधिक पगार कोणाहि अधिकाऱ्यास मिळूं नये.

(६) शेतीच्या कार्यक्रमाची बजावणी शेती-कामगारांच्या प्रतिनिधींच्या सोव्हियटकडे मुख्यतः देण्यांत यावी. सर्व खाजगी जमिनी जप्त कराव्या. देशांतील सर्व जमीन सरकारी मालकीची करून अशा जमिनींची वहिवाट शेतीकामगारांच्या प्रतिनिधींच्या सोव्हियटकडे देण्यांत यावी. अतिशय गरीब शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींची सोव्हियट स्वतंत्र ठेवावी. मोठमोठ्या जमिनींची नमुनेदार शेती करावी. स्थानिक परिस्थितीप्रमाणें तीनशें ते सातशें एकरांचा एकेक तुकडा करावा. यावर शेतीकामगारांच्या प्रतिनिधींच्या सोव्हियटचें नियंत्रण असावें. त्याचा खर्च सरकारनें चालवावा.

(७) राष्ट्रांतील सर्व बँकांचें एकीकरण करून एक राष्ट्रीय बँक निर्माण करावी. कामगारप्रतिनिधींच्या सोव्हियटचें त्यावर नियंत्रण असावें.

(८) सोशॉलिझमची स्थापना ताबडतोब करावयाची नाहीं. पण धनोत्पादन व धनाची विभागणी हें सामाजिक कार्य कामगारप्रतिनिधींच्या सोव्हियटकडे देण्यांत यावें.

(९) पक्षाचें कार्य:—(अ) पक्षाची परिषद ताबडतोब बोलवावी. (आ) पक्षाचा (१) साम्राज्यशाही व साम्राज्यशाही महायुद्ध व (२) आमचें सरकारसंबंधींचें धोरण व पॅरिस कम्यूनसारख्या राज्यप्रकाराची मागणी (३) जुनाट झालेला कर्मीत कमी मागणीचा कार्यक्रम; इतक्या मुद्द्यांसंबंधीं कार्यक्रम बदलावा. (३) पक्षाचें नांव बदलावें. (सोशल डेमॉक्रसी-ऐवजीं कम्युनिस्ट पक्ष असें करावें.)

(१०) आंतरराष्ट्रीय कामगारसंघाची पुनर्घटना करावी. ढोंगी देशभक्तीला विरोध करणारी क्रांतिकारक आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करावी."

या ठिकाणीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे, कीं १९०५ सालीं शेतकरी-कामकऱ्यांची 'डेमोक्रॅटिक डिक्टेटरशिप', प्रजासत्ताकराज्य, घटनापरिषद वगैरे योजना लेनिनला मंजूर होत्या, पण वरील सिद्धांतदशकांत त्यानें

त्यांबद्दल आतां नापसंती दाखविली असून सोव्हियटची स्थापना झाल्यानंतर पुन्हा प्रजासत्ताकाकडे वळणें ही पीछेहाट आहे असें लेनिन म्हणतो.. यांत १९०५ मधील स्वतांची भूमिका येथें लेनिननें सोडली असून मागें 'मतितात्पर्य व दृष्टिकोन' या ट्रॉट्स्कीच्या १९०५ सालच्या लेखांत जी भूमिका ट्रॉट्स्कीनें घेतली आहे तत्सदृश भूमिका लेनिननें वरील सिद्धांतदशकांत घेतली आहे असें दिसतें. पैकीं १९०५ची प्रजासत्ताकाची भूमिका आपण सोडली, जुना बोल्शेव्हिझम्' आपण सोडला हें लेनिनला मान्य होतें. पण ट्रॉट्स्कीची भूमिका आपण घेतली आहे हें त्याला मान्य नव्हतें. दुसऱ्या एका प्रसंगीं याचा खुलासा करतांना लेनिन सांगतो, "ट्राट्स्कीझम् याचा अर्थ झारशाही उलथून पाडा व कामगारांचें सरकार स्थापन करा असा आहे. पण हें चूक आहे. गरीब व मध्यम वर्गाची उपेक्षा करणें शक्य नाहीं. त्याचे दोन भाग असतात. यांतील गरीब लोकांचा भाग कामगारांसंगतीं कूच करीत असतो." (लेनिनिझम्, खंड २ रा;—स्टॅलिनकृत) ट्रॉट्स्कीनें आपल्या ग्रंथांत, लेनिननें वरील सिद्धांतदशकामुळें १९०५ची भूमिका सोडली व आपली म्हणजे ट्रॉट्स्कोची भूमिका पत्करली असें म्हटलें आहे; पण लेनिन या वेळींहि ट्रॉट्स्कीहून भिन्न भूमिकेवर उभा होता अशा अर्थाचें जें हें वचन स्टॅलिननें दिलें आहे त्यासंबंधीं ट्रॉट्स्कीनें मौनच धारण केलेलें दिसतें. ट्रॉट्स्की व लेनिन यांमधील मतभेदाचें हें बीज निरंतर कायमच होतें व त्यामुळेंच, १९१७च्या फेब्रुवारी क्रांतीनंतर ऑक्टोबर क्रांति होऊन जाईपर्यंत लेनिन व ट्रॉट्स्की यांचें पटलें तरी एरवीं, सर्व आयुष्यभर त्यांचें कधींच पटलें नाहीं असें स्टॅलिन पक्षाचें मत आहे. एकंदर इतिहासावरून तें सामान्यतः खरें मानावें लागतें.

फेब्रुवारी क्रांतीसंबंधीं ट्रॉट्स्कीचें मत

फेब्रुवारी क्रांतीचे वेळीं ट्रॉट्स्की अमेरिकेंत होता. फेब्रुवारी क्रांतीची बातमी ऐकून तो परत फिरला व ता. ३ एप्रिलला इंग्लंडला पोंहोचला. तेथून पुढें ४ मे-ला तो रशियांत येऊं शकला. या वेळेपर्यंत म्हणजे लेनिन आल्यापासून एक महिन्यांत लेनिननें आपल्या सिद्धांतदशकास बोल्शेव्हिकांचें मत पुष्कळच अनुकूल करून घेतलें. पण अमेरिकेंत असतां फेब्रुवारी क्रांतीची बातमी कळतांच

ट्रॉट्स्कीनें तेथील रशियन कामगारांसाठीं निघत असणाऱ्या 'नोव्ही मीर' या दैनिकांत जे लेख लिहिले त्यांत स्वतंत्रपणें त्यानें लेनिनसारखेंच धोरण प्रतिपादिलें आहे. मेपासून ऑक्टोबरपर्यंत लेनिनला ट्रॉट्स्कीची पुष्कळच मदत झाली असल्यामुळें त्या काळांतील ट्रॉट्स्कीच्या कार्याची कल्पना येण्याकरितां उपयुक्त म्हणून ट्रॉट्स्कीनें अमेरिकेंत लिहिलेल्या लेखांतील कांहीं उतारे येथें देतों.

'नोव्ही मीर' मार्च ३—" रॉड्झिअँको व मिल्युकोव्ह यांनीं कायदा व सुव्यवस्था यांची भाषा फार लवकर सुरू केली आहे. पण खवळलेल्या रशियांत उद्यां सकाळीं शांतता कांहीं आभाळांतून उतरणार नाहीं. जुलुमानें गांजलेल्या, कफल्लक झालेल्या, झार व इतर राज्यकर्ते वर्ग यांकडून लुटल्या गेलेल्या जनतेचे थरामागून थर आतां रशियारूपी अगाध तुरुंगांतून बाहेर येतील. पेट्रोग्रॅडची गडबड हा नुकताच कोठें आरंभ आहे. रशियन सामान्य जनतेच्या आघाडीवर राहून रशियांतील क्रांतिकारक कामगार आपलें ऐतिहासिक कार्य पूर्ण करतीलच करतील. झार व त्याचे सरंजामदार यांची प्रतिगामी सत्ता तिच्या सर्व लपण्याच्या ठिकाणांपासून शोधून काढून तिला कामगार नेस्तनाबूत करतील आणि जर्मनी व बाकीचा युरोप येथील कामगारांशीं बंधुभावानें हस्तांदोलन करतील. कारण नुसतें झारिस्ट सरकार उलथून पाडून भागणार नाहीं, युद्धहि थांबविलें पाहिजे. मिल्युकोव्ह व रॉडझिअँको हे झारशीं तडजोड करून कायदा व सुव्यवस्था निर्माण करण्याच्या उद्योगांत आहेत. पण क्रांतीची दुसरी लाट यांच्या डोक्यावरून जाईल. क्रांतीच्या पोटांतूनच क्रांतीचें सरकार निर्माण होईल. त्याच्याच साह्यानें क्रांतिकारक जनता अखेर विजयी होईल. खरा अटीतटीचा सामना व खरा स्वार्थत्याग अजून पुढेंच आहे. त्यानंतर पूर्ण व खरेंखुरें यश पदरांत पडेल."

'नोव्ही मीर' मार्च ६—" घटनापरिषदेची तयारी चालू असलेल्या काळांत सुद्धां क्रांतिकारक कामगारांचें सरकारच देशभर लोकशाहीचें वातावरण निर्माण करणें, खालपासून वरपर्यंत सैन्याची पुनर्घटना करून त्यास क्रांतिकारक सैन्याचें स्वरूप देणें, आणि क्रांतिकारक कामगारांच्या सरकारास पाठिंबा दिल्यानें आपला आपत्तींतून मोक्ष होईल हें खालच्या थरांतील शेतकऱ्यांना कृतीनें पटविणें या गोष्टी करूं शकेल."

'नोव्ही मीर' मार्च ७—" महायुद्धाच्या कत्तलींतून झारशाहीच्या साम्राज्यवादाकडून युद्ध भांडवलवाल्यांच्या साम्राज्यवादाकडे जाण्यास कामगारवर्ग राजी होणार नाहीत. या महायुद्धासारखी जागतिक कत्तल व साम्राज्यशाही यांविरुद्ध आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा झगडा चालविण्याची जबाबदारी पूर्वीपेक्षां आतां रशियन कामगारांवर विशेष प्रकारें येऊन पडली आहे."

'नोव्ही मीर' मार्च ८— " सरंजामी—भांडवलशाही व देशाभिमानी सोशॅलिस्ट यांचेमध्यें शेतीचा प्रश्न पाचर ठोकील. सगळी क्रांति मुकाट्यानें भांडवलशाहीचें ध्येय सिद्ध करून घेण्यास वापरावी असें म्हणणारे 'लिबरल' आणि कामगारक्रांति करूं इच्छिणारे क्रांतिकारक कामगारवर्ग यांपैकीं कोणाची एकाची बाजू घ्यावी याचा विचार केरेन्स्कीला करावा लागेल. झारच्या, सरदारांच्या, धर्ममंदिरांच्या, जमिनी खालसा करणें, हा शेतीचा पूर्ण प्रगतिकारक कार्यक्रम कामगार लवकरच पूर्णपणें जाहीर करतील.....खेड्यांतील शेतकऱ्यांच्या खालच्या थरांशीं आपलें धोरण वेगळें राहील. त्यांचीं मनें कामगारांच्या बाजूस ओढून घेणें ही बाब अत्यंत निकडीची आहे. ती लांबणीवर टाकतां येणें शक्य नाहीं.

".....जर्मन कामगार जर आपल्या जर्मन सरकारविरुद्ध उठले नाहींत तर ? तर मग आम्हीं काय करावें ? ' असा प्रश्न कोणी करतील.

"या प्रश्नांत असें गृहीत धरलें आहे, कीं रशियांत क्रांति झाली, रशियांत कामगार सरकार स्थापन झालें, तरीहि जर्मन कामगारांवर त्याचा कांहींच परिणाम होणार नाहीं हें असंभवनीय दिसतें. पण समजा, तसें झालेंच तर ? ही असंभाव्य गोष्ट घडून आलीच, जर्मनींतील सनातनी सोशॅलिस्टांनीं येत्या कालखंडांत कामगारांना आपल्या राज्यकर्त्यांविरुद्ध बंड करण्यापासून परावृत्त केलें, तर मग अर्थातच रशियन कामगार शस्त्र धारण करून आपल्या क्रांतीचें रक्षण करितील. रशियांतील कामगारांचें सरकार होहेन्झोलर्न राज्यकर्त्यांशीं (जर्मन कैसरशीं) युद्ध करून, जर्मन कामगारांचा व रशियन कामगारांचा सामान्य शत्रु असें जें जर्मन सरकार त्याशीं युद्ध करण्यास जर्मन कामगारांस पाचारण करितील. येत्या थोड्या दिवसांत जर जर्मन कामगार जर्मनींत सत्ताधीश झाले (व रशियन कामगारांना मात्र राज्यसत्ता धारण करतां न आली) तर जर्मन कामगारांनाहि याचप्रमाणें गुचकोव्ह, मिल्युकोव्ह यांच्या रशियन

सरकारशीं झगडण्याचा हक्क आहे. इतकेंच नव्हे तर रशियन कामगारांना त्यांच्या साम्राज्यकर्त्यांशीं लढून त्याचा पराभव करतां यावा यासाठीं जर्मन कामगारांना रशियन साम्राज्यशाहीशीं लढणें भागच पडेल. या दोनहि परिस्थितींत कामगार-सरकारनें पुकारलेलें युद्ध हें सशस्त्र क्रांतीच्याच स्वरूपाचें असेल हा त्या वेळीं 'सरकारच्या संरक्षणा'चा प्रश्न राहणार नाहीं. क्रांतीच्या संरक्षणाचा प्रश्न होईल. तसेंच ही क्रांतीची आग इतर देशांत पसरविणें हेंहि या युद्धाचें ध्येय असेल."

हे उतारे ट्रॉट्स्कीनें 'रशियन राज्यक्रांतीचा इतिहास' या आपल्या ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या दुसऱ्या परिशिष्टांत दिले असून लेनिनच्या ४ एप्रिलच्या सिद्धान्तदशकांतल्यासारखेच हे विचार आहेत असें आपलें मत त्यानें तेथें व्यक्त केलें आहे. मेन्शेव्हिक व लेनिन या दोहोंसंबंधानें आपली भूमिका कोणती हें साकल्यानें पुन्हा सांगण्यासाठीं ट्रॉट्स्कीनें आणखी दोनतीन उतारे याच ठिकाणीं दिले आहेत. रोझा लक्झेंबर्गच्या पोलिश वृत्तपत्रांत ट्रॉट्स्कीनें १९०९ सालीं लिहिलेल्या लेखांत तो म्हणतो—

"'आमची क्रांति ही भांडवलशाही क्रांतिच असणार' अशी निवळ तात्त्विक भूमिका घेऊन मेन्शेव्हिक हे भांडवलवाल्यांच्या हितार्थी, त्यांच्या हातीं राज्यसत्ताहि जावी अशा प्रकारें, कामगार चळवळीचें धोरण मिळतें घेतात. उलट बोल्शेव्हिक हे (म्हणजे लेनिन व त्याचे अनुयायी) 'सोशॅलिस्ट स्वरूपाची नव्हे तर लोकशाहीप्रधान मुखत्यारी' स्थापण्याची तात्त्विक भूमिका घेत असल्यानें कामगारांचे हातीं राज्यसत्ता आली तरी भांडवलवाल्यांची लोकशाही स्थापित करण्यासाठीं कामगारांच्या सत्तेस स्वतःच त्यांना नियंत्रण घालावें लागेल. अर्थात्, या दोहोंतील फरक पुष्कळच आहे. मेन्शेव्हिकांचें प्रतिक्रांतिकारक धोरण आजच व्यक्त होत आहे; तसें बोल्शेव्हिकांचें आज होत नाहीं. पण क्रांति होऊन कामगारांचे हातीं सत्ता आली म्हणजे त्यांचें प्रतिक्रांतिकारक धोरण सुरू होईल."

पुढें या उताऱ्याचा उल्लेख करून १९२२ सालीं ट्रॉट्स्की लिहितो—

"मीं बोल्शेव्हिकांसंबंधीं दाखविलेला धोका बोल्शेव्हिक क्रांतिनंतर प्रत्यक्ष इतिहासांत घडून आला नाहीं हें खरें. पण त्याचें कारण लेनिनच्या नेतृत्वाखालीं बोल्शेव्हिकांनीं १९१७चे एप्रिल-मेमध्यें—म्हणजेच ऑक्टोबरमध्यें

राज्यसत्ता जिंकण्यापूर्वी—आपली बौद्धिक भूमिका बदलून घेतली. त्यासाठी लेनिनला अंतरविरोधाशींहि झगडावें लागलें."

बोल्शेव्हिझम्ची जुनी भूमिका लेनिननें बदलली हें आपलें मत सिद्ध करण्यासाठीं यापुढें लेनिनच्या मताचा १९१७च्या एप्रिलमधलाच एक उतारा ट्रॉट्स्कीनें दिला आहे. त्यांत लेनिन सांगतो—

" बोल्शेव्हिक पक्षाच्या घोषणा व कल्पना 'सामान्यतः' मला अजूनहि मान्यच आहेत. 'प्रत्यक्ष' वस्तुस्थिति अशी झाली आहे, कीं कोणासहि कल्पना करतां आली नसती अशा गोष्टी घडल्या आहेत. आमच्या अपेक्षेहून त्या गोष्टी मूलतःच भिन्न आहेत, अपवादात्मक आहेत व त्या अनेक प्रकारांनीं घडल्या आहेत. या घटनेकडे दुर्लक्ष करणें, ती विसरणें, म्हणजे 'जुन्या बोल्शेव्हिकां'सारखें तें वर्तन होईल. यांनीं आमच्या पक्षाच्या इतिहासांत कित्येकदां अगदीं कींव करण्यासारखें वर्तन केलें आहे. पाठ केलेला पाढा निरर्थकपणें म्हणून दाखवावा आणि विशेष प्रकारें उत्पन्न झालेला जिवंत व्यवहार मात्र शिकूं नये अशी यांची रीत असते. 'आतां' या वेळीं जो कोणी बोल्शेव्हिक 'कामकरी व शेतकरी यांची क्रांतिकारक—लोकशाही-प्रधान मुखत्यारी' (रेव्होल्यूशनरी डेमोक्रॅटिक डिक्टेटरशिप ऑफ् दि प्रॉलेटॅरियट अॅन्ड दि पेझंट्री) हा जुना पाढा म्हणत राहील तो कालाच्या मागें राहील. इतकेंच नव्हे, तर असें बोलणारा बोल्शेव्हिक हा कामगारांचें वर्गयुद्ध सोडून भांडवलवाल्यांच्या पक्षास जाऊन प्रत्यक्षपणें मिळाला आहे. अशा बोल्शेव्हिकाला (आज व्यवहारांत गडबड करूं न देतां) बोल्शेव्हिकांच्या क्रांतीपूर्वीच्या दप्तरांत बांधून ठेवला पाहिजे. वाटल्यास 'जुन्या बोल्शेव्हिकांच्या दप्तरां'त असें म्हणा. तें दप्तर आतां फक्त इतिहास-संशोधनाच्याच काय तें उपयोगी आहे."

लेनिनचें ४ एप्रिलचें सिद्धान्तदर्शक दिल्यानंतर त्याच्या आधारें लेनिननें जी ऑक्टोबर क्रांति घडवून आणली तीमधील त्याचा मुख्य साहाय्यक व सहकारी ट्रॉट्स्की याची भूमिका फेब्रुवारी क्रांतीसंबंधीं काय होती हें समजून घेण्यासाठीं मध्येंच ट्रॉट्स्कीचे उतारे देण्याचा हा प्रपंच केला. असो. ट्रॉट्स्की रशियांत येण्यास अजून एक महिना अवकाश होता. दरम्यान

लेनिननें एप्रिलमध्यें बोल्शेव्हिक पक्षाचें धोरण बदलण्याचे काय प्रयत्न केले, एप्रिलमध्यें कामगारांना कोणते कटु अनुभव आले या इतिहासाकडे आतां वळूं.

बोल्शेव्हिकांच्या धोरणांत बदल

लेनिननें आपलें सिद्धांतदशक बोल्शेव्हिक पक्षाच्या हवालीं ४ एप्रिल १९१७ या दिवशीं दिलें; तें त्याच्याच सहीवर प्रसिद्ध झालें. त्यावर इतर कोणींहि, लेनिनबरोबर स्वित्झर्लंडांत राहिलेल्या झिनोव्हिफनेंहि, सही केली नाहीं. मागें (पृष्ठ १७५) स्टॅलिननें ता. २९ मार्च रोजीं बोल्शेव्हिक परिषदेंत केलेल्या भाषणांतला उतारा दिला आहे. त्याची भूमिका लेनिनच्या ४ एप्रिलच्या सिद्धांतांहून वेगळी होती हें उघड आहे. दुसरे दिवशीं म्हणजे ३० मार्च रोजीं त्सेरीटेली या प्रमुख मेन्शेव्हिक पुढाऱ्यानें बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक पक्ष एक करावे अशी सूचना केली होती, स्टॅलिननें ती मान्य केली. मॉलॉटोव्ह यानें या सूचनेस विरोध करून दोन विसंगत पक्षांचें ऐक्य साधण्याचा हा प्रयत्न व्यर्थ आहे असें मत दिलें. झिमरवॉल्ड व केन्थॉल परिषदेच्या ठरावांच्या भूमिकेवर ऐक्य होऊं शकतें असें स्टॅलिन (बोल्शेव्हिक) व त्सेरीटेली (मेन्शेव्हिक) यांचें मत होतें. झिमरवॉल्डचे ठराव हे कॉट्स्की (जर्मन) पक्षाचे असून लेनिनचा त्यास विरोध होता हें मागें आलेंच आहे. पण विशेष गोष्ट अशी आहे, कीं झिमरवॉल्ड व केन्थॉल येथील ठराव युद्ध थांबविण्याच्या मताचे असतांहि त्सेरीटेली व स्टॅलिन युद्ध चालू ठेवूं इच्छिणाऱ्या भांडवलशाही सरकारास पाठिंबा देत होते. अर्थात् झारशाही नष्ट झाली असून 'प्रस्तुत सरकार जितक्या प्रमाणांत क्रांतीस मदत करील तितक्या प्रमाणांत त्याचें रक्षण करणें' व म्हणूनच क्रांतीचें रक्षण करण्यासाठीं सरकारला युद्धाचे कामीं पाठिंबा देणें यास आपण बांधलेलों आहों असें स्टॅलिनच्या मनानें घेतलेलें होतें. त्याच दिवशीं स्टेक्लॉव्ह यानें केलेल्या भाषणांत "हें 'तात्पुरतें सरकार' समाजसुधारणेस विरोध करतें, याचा ओढा राजघराणें राज्यावर आणण्याकडे आहे, हें सरकार प्रतिक्रांतिकारक पक्षांचें रक्षण करतें, परकीय राष्ट्रांचें प्रदेश जिंकण्याची यांना हाव आहे" असें तात्पुरत्या सरकारचें वर्णन आलें होतें. तरीहि स्टॅलिनला हें सरकार क्रांतीच्या प्रगतीस मदत करील अशी आशा वाटत असावी असें दिसतें. मेन्शेव्हिकांशीं ऐक्य करण्याचे बाबतींत तो

म्हणाला, "बारीक-सारीक मतभेदांची पर्वा न करतां आपण ऐक्य करूं शकतों." पण 'तात्पुरत्या सरकार'वरचा स्टॅलिनचा हा विश्वास फार काळ टिकला नाहीं. ४ एप्रिलचे लेनिनचे सिद्धांत जाहीर झाल्यापासून स्टॅलिनच्या विचारास उलट गति मिळाली व तेव्हांपासून तो हळूहळू लेनिनच्या बाजूंत पूर्णपणें सामील झाला.

वर उल्लेखिलेल्या परिषदेंत ४ एप्रिलाच लेनिनचेंहि भाषण झालें. त्याच दिवशीं प्रसिद्ध झालेल्या त्याच्या सिद्धांतांवर तो बोलला. 'लहान मुलांनीं रेघोट्या मारलेल्या फळ्यावर गुरूजींनीं बोळा फिरवावा' असें त्याच्या भाषणानें परिषदेचें तेथवर झालेलें कामकाज पुसून टाकलें.

"तुम्ही राज्यसत्ता कां धारण केली नाहींत?"—लेनिननें बोल्शेव्हिक धोरणाचें संशोधन सुरू केलें. आपणच या पश्नाचें उत्तर देतांना तो म्हणाला, "ही भांडवलशाही क्रांति आहे, क्रांतीची ही पहिली अवस्था आहे, युद्ध चालू आहे, या सर्व सबबी व्यर्थ आहेत. खरें कारण असें आहे, कीं कामगारवर्ग पुरेसा जागृत नसून त्याची संघटनाहि पुरेशी बलवान झालेली नाहीं हें आपण कबूल केलें पाहिजे. भौतिक सामर्थ्य कामगारांच्याच हातांत होतें. पण (त्यांना त्याची जाणीव नव्हती व तें वापरण्याची त्यांची तयारी नव्हती.) भांडवलवाले जागृत होते व आयती ओंजळींत पडणारी सत्ता धारण करण्यास टपून बसले होते. ही फारच घातक गोष्ट घडली. पण ती तशी घडली हें प्रांजळपणें कबूल करणें अवश्य आहे. आणि आम्ही पुरेसे जागृत व संघटित नव्हतों म्हणून राज्यसत्ता धारण केली नाहीं हें सर्व लोकांस जाहीरपणें सांगणें अवश्य आहे."

लेनिनची भूमिका फेब्रुवारी क्रांतीसंबंधीं काय होती हें येथें स्पष्टपणें ध्यानांत घेणें जरूर आहे. क्रांति यशस्वी झाल्यावर मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं राज्यसत्ता स्वतां धारण न करतां भांडवलवाल्यांच्या हवालीं केली व त्यांस पाठिंबा देण्याचें ठरविलें. पण लेनिन या वेळीं हजर असता तर त्यानें राज्यसत्ता धारण केली असती काय? वरील भाषणावरून व ४ एप्रिलच्या सिद्धांतावरून, त्यानें राज्यसत्ता धारण केली नसती असें म्हणावें लागतें. कामगारवर्ग पुरेसा जागृत व संघटित नाहीं हें सोव्हियटच्या निवडणुकी करून त्याच्या लक्षांत आलेंच असतें व १९०५ चे प्रजासत्ताक स्थापण्याचें तत्त्वहि त्यानें सोडलेंच होतें. म्हणून त्यानें राज्यसत्ता धारण केली नसती. पण उलट मेन्शेव्हिक अथवा

'जुने' बोल्शेव्हिक यांचेप्रमाणें भांडवलशाही सत्तेस त्यानें पाठिंबाहि दिला नसता; तर हें सरकार कामगारांचें शत्रु कसें आहे, साम्राज्यवादीच कसें आहे ह्या गोष्टी त्यानें एप्रिलच्या सिद्धांतांत सांगितल्याप्रमाणें लोकांस 'शांतपणें समजावून सांगण्यास' सुरुवात केली असती. असें न करतां स्टॅलिन-प्रभृतींनीं जितक्या प्रमाणांत ('तात्पुरतें सरकार' क्रांतीच्या पायऱ्या मजबूत करील) तितक्या प्रमाणांत (आमचा त्यास पाठिंबा आहे)' असे आढेवेढे घेऊन भांडवलशाही सरकारला व त्याच्या युद्धविषयक धोरणास पाठिंबा देण्याचें ठरविलें हें, लेनिनच्या मतें, चुकीचें धोरण होतें. फेब्रुवारी क्रांतींतून घटनापरिषद बोलावून लोकशाही निर्माण करावी अशा धोरणाचा विचार करण्यासाठीं ही परिषद बोलावण्यांत आली होती. लेनिननें आपल्या भाषणानें या मूळ हेतूवरच घाव घातला. तो म्हणाला,

"लोकांतील जोम व क्रांति यांनीं घटनापरिषद मार्गेंच पडेल. (आतां घटनापरिषद कसली बोलवितां?) कामगारांची मुखत्यारी अस्तित्वांत आलीच आहे. पण तिचें करावें काय, हेंच सगळ्यांना कोडें पडलें आहे."

'प्रवदा'च्या धोरणास उद्देशून लेनिन म्हणतो—

"म्हणे या सरकारनें आपण परकी प्रदेश जिंकणार नाहीं असें जाहीर करावें! खरोखर भांडवलशाही सरकारनें प्रदेश जिंकूं नये अशी अपेक्षा करणें हें व्यर्थ आहे, ती शुद्ध कुचेष्टा आहे."

१४ मार्चच्या 'सगळ्या जगास उद्देशून' सोव्हियटनें काढलेल्या जाहीरनाम्यासंबंधानें लेनिन म्हणाला—

"रशियाचा विशेष सध्यां असा आहे, कीं आधीं भयंकर अत्याचार करून या सरकारनें आतां मोठ्या त्वरेनें अतिशय नाजूक अशा कपटनाटकांत प्रवेश केला आहे. सोव्हियटनें केलेल्या या घोषणेंत वर्गजागृतिपूर्वक उच्चारलेला एकहि शब्द नाहीं. त्यांत फक्त शब्दावडंबर आहे."

पक्षोपपक्षांतील ऐक्यासंबंधानें लेनिन म्हणाला—

"ऐक्याची भाषा मला ऐकूं येते आहे. पण 'युद्धांत आत्मरक्षण' करण्याचें ढोंग हल्लीं ज्यानीं पांघरलें आहे त्यांच्याशीं ऐक्य करणें म्हणजे सोशॅलिझमची फसवणूक करण्यासारखें आहे. त्यापेक्षां लेबकेनेटप्रमाणें हजारां-

विरुद्ध एकट्यानें दंड थोपटून उभें राहणें पुरवलें.....व्यक्तिशः माझ्यापुरतेंच बोलायचें तर पक्षाचें नांव बदलून सरळ कम्युनिस्ट पक्ष असें ठेवावें..... जुन्या आठवणी तुम्हांला सोडवत नसतील.....पण आतां कपडे बदलण्याची वेळ आली आहे. जुना घाणेरडा शर्ट काढून टाकून आतां नवा घातलाच पाहिजे. ...शतशः जीर्ण झालेल्या शब्दांस लोंबकळत राहूं नका. नवीन पक्ष निर्माण करण्याची धमक बाळगा.....म्हणजे पहा सगळे जुलूमग्रस्त लोक तुम्हांकडे धावत येतील.....मानसन्मान आणि ठराव आतां पुरे झाले. आतां उद्योगाला लागण्याची वेळ आली आहे. व्यावहारिक व धिमेपणाच्या कामाला आपण लागूं या."

या भाषणानंतर एक तासानें मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक यांच्या संयुक्त सभेंत लेनिननें पुन्हा भाषण केलें. तेथें तो म्हणाला, " आम्ही कांहीं ढोंगी पुढारी नव्हे. जनतेची जागृति ज्या मानानें असेल त्याच मानानें आपण कार्यक्रम हातीं घेतला पाहिजे. कांहीं काल (लोकांस आपलीं मतें पटेपर्यंत) अल्पसंख्य म्हणून राहावें लागलें तरी चालेल. कांहीं वेळ पुढारीपण सोडून देणें चांगलें असतें. अल्पसंख्य म्हणून राहण्यांत भिण्याचें कांहींहि कारण नाहीं.....खरें सरकार कामगारप्रतिनिधींचें सोव्हियट हेंच आहे.....त्यांत आपला पक्ष अल्पसंख्य आहे. अशा वेळीं काय करतां येईल ? आपण इतकेंच करूं शकतों कीं, धीरानें, आग्रहानें व शिस्तशीरपणें बहुमतास त्याचें कोठें चुकतें तें सांगूं. अल्पसंख्य आहों तोंवर कपटजालांतून लोकांना सोडविण्यासाठीं त्यांना वस्तुस्थितीची फोड करून सांगूं. आम्ही म्हणतों म्हणून लोकांनीं आमचें म्हणणें मानावें असें नाहीं. आम्हांला ढोंग करावयाचें नाहीं. अनुभवांनीं शहाणे होऊन लोकांनीं आपल्या चुक्या सुधारल्या पाहिजेत. अखेर आमची विचारसरणीच लोकांना खरी वाटेल. कारण हें युद्ध त्यांना खेचून आम्हांकडे ढकलील. त्यांना दुसरी गतिच नाहीं."

लेनिनचे ४ एप्रिलचे सिद्धांत व त्या दिवशीचीं त्याचीं भाषणें यांचा तात्कालिक परिणाम फारच वाईट झाला. दुसऱ्या एकाद्या ग्रहावरून आलेल्या माणसाप्रमाणें लेनिनची भाषा व विचारसरणी सर्वांनाच दुर्बोध वाटली. ज्यांनीं त्यावर स्वागताचा वर्षाव केला होता त्यांचा तो उत्साह साफ

मावळला. जर्मनीच्या 'सीलबंद' गाडींत बसून आलेला लेनिन जर्मनीस फितुर आहे व तो युद्धांत रशियाचें कंबरडें मोडून जर्मनीचा फायदा करूं इच्छितो अशी भाषा सरकार पक्षानें सुरू केली. सरकारपक्षीय स्टॅन्केविच म्हणाला, "इतकें मूर्खपणें हा माणूस बोलतो! हा कसला भयंकर! तो येथें आला हेंच बरें झालें! लोकांना तो आहे तसा आतां स्वच्छ प्रकाशांत दिसला. त्यालाच आतां त्याचें मूर्खपण कळून येईल."

रशियांतील ब्रिटिश वकील बुचानन यानें लेनिन जर्मनीच्या 'सीलबंद' गाडींतून आला व सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या समेत तो आला असतां त्याचें कोणीं स्वागत केलें नाहीं' असें नमूद करून ठेविलें आहे. बोल्शेव्हिक पक्षाचें पत्र 'प्रवदा' याच्या ८ एप्रिलच्या अंकांत लेनिनच्या धोरणासंबंधीं पुढील मजकूर आला होता—

"कॉम्रेड लेनिन याची योजना सामान्यतः आम्हांस नापसंत आहे. कारण लोकशाहीप्रधान भांडवलशाही क्रांति होऊन गेली असें तो गृहीत धरतो आहे. हल्लींच्या क्रांतींतून एकदम सोशॅलिस्ट क्रांति घडवून आणतां येईल असें त्यास वाटतें आहे."

'हजारांविरुद्ध एकट्यानें दंड थोपटून उभे राहावें' असें लेनिननें सांगितलें होतें. आतां खुद्द त्याच्यावरच तो प्रसंग येऊन ठेपला आहे असें दृश्य एप्रिलच्या आरंभीं दृष्टीस पडलें. पण 'युद्ध हें जुलूमग्रस्त जनतेला आम्हांकडे खेचीत आणील, त्यांना दुसरी गतिच नाहीं' हें जें भाकित त्यानें करून ठेविलें तें ततोतंत खरें ठरलें व एप्रिलपासून दर महिन्यास रशियन सरकारच्या चुक्या व संकटें वाढत जाऊन ऑक्टोबरमध्यें लेनिनची सरशी झाली.

जिवंतपणीं अवमानिलेल्यांचा मेल्यावर सन्मान

कामकरी व सैनिक यांनीं झारशाही उलथून पाडली व त्यांची फसगत करून भांडवलवाल्यांनीं राज्यसत्ता बळकावली; पण सोव्हियटद्वारा कामकरी व सैनिक यांची संघटना कायम टिकवून ठेवण्यांत आल्यामुळें सोव्हियटवांचून नव्या सरकारास राज्य करणें अशक्य झालें. यामुळें कामकरी, शेतकरी व सैनिक यांची इभ्रत मात्र रशियांत पूर्वी कधींहि नव्हती इतकी वाढली. ता. २३ मार्च रोजीं फेब्रुवारी क्रांतींत बळी पडलेल्यांची स्मशानयात्रा पेट्रोग्रॅडमध्यें

काढण्यांत आली. ज्या भांडवलवाल्यांनीं व लष्करी अधिकाऱ्यांनीं क्रांतीस विरोध केला होता, ज्यांच्या शस्त्रास्त्रांस ते क्रांतिवीर बळी पडले होते ते भांडवलवाले व लष्करी अधिकारी आज नाक मुठींत धरून मिरवणुकींत चालले होते. परराष्ट्रीय वकील, व्यापारी, कारखानदार, विद्यार्थी लहानमोठे सरकारी अधिकारी या सर्वांनीं मिरवणुकींत भाग घेतला होता. शवपेटिका थडग्यांत ठेवण्यांत येतांच त्या मृतवीरांना तोफांची लष्करी सलामी देण्यांत आली. ज्यांना जन्मभर अपमान, उपहास, बंदिवास, उपासमार, फटके यांचून कांहीं माहिती नव्हतें त्या कामकरी-सैनिकांनीं स्वातंत्र्य-युद्धांत प्राणार्पण करून आपल्या प्रेतांस शत्रूकडून तोफांची सलामी मिळविली होती व आपल्या भाईबंदांना स्वातंत्र्याच्या मार्गास लावलें होतें. एकटया वायबॉर्ग विभागाच्या एकावन्न प्रेतपेटया होत्या. सर्व शहराच्या विभागांनीं आपल्या विभागांतील वीरांचीं शवें शृंगारून आणलीं होतीं. त्या दिवशीं सुमारें ८ लक्ष जनसमुदाय त्या वीरांच्या थडग्यांस वंदन करून गेला. इतके लोक अगदीं शांतपणें एकत्र येऊन परत निघून जाऊं शकतात असें लष्करी शास्त्रज्ञांच्या ग्रंथांत लिहिलेलें नव्हतें. झारचा अंमल असता तर दहा-पांच वेळां गोळीबार करून शांतता राखण्याचा प्रयत्न झाला असता. पण त्या दिवशीं एकहि गोळी उडाली नाहीं. आपणांसाठीं प्राणार्पण करणाऱ्या भाईबद्दल सर्वांचीं अंतःकरणें कृतज्ञतेनें भरून आलीं होतीं. आपण यशस्वी झालों याबद्दल प्रत्येकजण धन्यता मानून घेत होता. आज परिस्थिति वाईट असली तरी आतां चांगले दिवस खचित येणार या आशेनें सर्वांना स्फुरण आलें होतें. आजचा दिवस मंगल व पवित्र आहे अशीच सर्वांची भावना होती; म्हणून कोणींहि दंगाधोपा केला नाहीं.

१८ एप्रिल (नव्या कॅलेंडरप्रमाणें १ मे) हा आंतरराष्ट्रीय कामगारदिन असाच शांतपणें पार पडला. मजुरांच्या मिरवणुकींत सैन्याधिकारी सामील झाले होते. गांवांतील सर्व प्रकारचे नागरिक मजुरांच्या बरोबरीनें चालले होते. रणांगणावरहि सर्वत्र सभा, क्रांतिकारक निशाणांच्या मिरवणुकी, क्रांतिकारक गीतें यांनीं सैनिकांनीं मजूरदिन साजरा केला. वेडावांकडा प्रकार कांहींच न होतां शांतपणें सर्व समारंभ साजरे झाले. पण या शांततेखालीं युद्ध व सरकारचा मूर्खपणा यांनीं लोकक्षोभाचा ज्वालामुखी हळूहळू पेट घेत होता.

सरकारचा साम्राज्यलोभ व दडपशाही

युद्ध भडकत होतें. २३ मार्च रोजीं (५ एप्रिल–नवें कॅलेंडर) अमेरिका युद्धांत संयुक्तांचे बाजूनें सामील झाली होती. यामुळें परराष्ट्रमंत्री मिल्युकोव्ह याला उगीचच स्फुरण चढलें. संयुक्तांना कोणाची केवढीहि मदत झाली तरी रशियाची परिस्थिति एवढी भयंकर होती, कीं त्यास कोणीहि पुरा पडूं शकला नसता. कामकरी व सैनिक यांना युद्ध असह्य झालें होतें. बाजार-भाव एकसारखे कडाकत होते. कामगार 'किमान मजुरीची इयत्ता ठरवा' असा हट्ट धरून बसले असून कारखानदार 'ठरवणार नाहीं' म्हणून उलट हट्टास पेटले होते. कारखान्यांतून वाढत्या प्रमाणांत मारामाऱ्या होऊं लागल्या. अन्नाचा तुटवडा वाढला. दरमाणशीं ठरविलेला शिधा कमी कमी करण्यांत येऊं लागला. दुकानांतून धान्यें मिळण्यासाठीं परवाने काढण्यांत आले. सैन्यांत असंतोष वाढला. विशेष क्रांतिकारक अशा पलटणींना पेट्रोग्रॅड मधून रणावर पाठविण्यांत येऊं लागलें. ही कारवाई सैनिकांना कळतांच पलटणी हालविण्यास विरोध होऊं लागला. या सर्व आपत्तींस युद्ध हें मुख्य कारण होतें. पण परराष्ट्रमंत्री मिल्युकोव्ह याला आपल्याखालीं धुमसणारा हा ज्वालामुखी ऐकूं आला नाहीं. अमेरिका युद्धांत संयुक्तांचे बाजूनें सामील झाली हें ऐकतांच लहान मुलाचें तोंडांत चाकोलेट पडावें त्याप्रमाणें मिल्यु-कोव्हची कळी खुलली. त्यानें त्याच दिवशीं ताबडतोब वृत्तपत्रांच्या प्रति-निधींना हांकारून आणलें व त्यांच्यापुढें पोटांत सांचवून ठेवलेला साम्राज्य-लोभ ओकून टाकला. "कॉन्स्टॅन्टिनोपल जिंकणें, अर्मीनिया जिंकणें, ऑस्ट्रिया व तुर्कस्तान यांचे तुकडे पाडणें, उत्तर इराण जिंकणें" हें रशियाचें युद्ध कर-ण्यांत ध्येय आहे असें सांगून "मात्र सर्व राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा हक्क असावा हें विल्सनचें तत्त्व आम्हांसहि मान्य आहे" असें त्यानें या ओके-वर तुळशीपत्र ठेविलें. जे भेन्शेव्हिक आपल्या सरकारला पाठिंबा देण्याच्या धोरणाचें समर्थन करण्याकरितां सरकार साम्राज्यवादी नाहीं असें सांगण्याचा अट्टाहास करीत होते त्यांना खास परराष्ट्रमंत्र्याचें वृत्तपत्रांना दिलेलें हें प्रवचन जखमेंत मीठ भरल्याप्रमाणें झोंबलें. तेव्हां केरेन्स्कीनें मिल्युकोव्हचें हें वैय-क्तिक मत असून सबंध सरकारचें हें धोरण नव्हे असा खुलासा जाहीर केला. पण मिल्युकोव्ह सरकारच्या धोरणाविरुद्ध हवें तें बोलून परत अधिकारावर

राहतो हें लोकांना समजण्यासारखें नव्हतें. त्सेरीटेलीनें सरकारनें आपण साम्राज्यलोभी नाहीं असें स्पष्टपणें जाहीर करावें असा तगादा लाविला. तेव्हां परराष्ट्रमंत्री मिल्युकोव्ह व युद्धमंत्री गुचकोव्ह या उभयतांच्या विरोधास न जुमानतां "स्वतंत्र रशियाचें ध्येय इतर राष्ट्रांवर अंमल बसविणें, त्यांचें परंपरागत हक्कहरण करणें अथवा परकी राष्ट्रांचे प्रदेश सक्तीनें जिंकून घेणें हें नाहीं' असें रशियन सरकारनें मार्च २७ रोजीं रशियांत जाहीर केलें. त्याचबरोबर "संयुक्त राष्ट्रांना आम्हीं दिलेलीं वचनेंहि अवश्य पाळूं" अशी पुस्तीहि जोडून ठेवण्यांत आली. एवढ्यानें मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक पुढाऱ्यांचें समाधान झालें; पण इंग्लंड, फ्रान्स इत्यादि संयुक्त राष्ट्रांचा घुस्सा झाला. "रशियाला नवीन राज्यें न जिंकतां तह हवा असेल तर असो. पण आमचे नाजुक हितसंबंध रशिया दुखवणार नाहीं अशी हमी घेतली पाहिजे." अशी रशियांतील ब्रिटिश वकिलानें आपल्या सरकारला सूचना केली. रशियन सरकारावर सोव्हियटचें वर्चस्व वाढत आहे याचाहि संयुक्त राष्ट्रांना राग आला. याच वेळीं रशियाला युद्धासाठीं मोठें कर्ज हवें होतें व युद्धाचें ध्येय साम्राज्यवर्धन हें नाहीं असें सर्व संयुक्त राष्ट्रांना सरकारनें स्पष्ट कळविल्यावांचून कर्ज मंजूर करण्यास सोव्हियट तयार नव्हतें. तेव्हां २७ मार्च रोजीं रशियन सरकारनें जो जाहीरनामा काढला त्याच आशयाचा जाहीरनामा संयुक्तांनाहि सरकारनें कळवावा व त्याबद्दल सोव्हियटनें कर्जउभारणीस संमति द्यावी असा देवघेवीचा करार सोव्हियट कार्यकारी समितीचा सभासद त्सेरीटेली व सरकारचा परराष्ट्रमंत्री मिल्युकोव्ह या उभयतांत ठरला. पण मिल्युकोव्हला वचन पाळण्याची घाई नव्हती व सवयहि नव्हती. मार्च २७च्या जाहीरनाम्यानें जीं संयुक्त सरकारें असंतुष्ट झालीं आहेत त्यांना, त्सेरीटेलीनें दिलेली ही संधि साधून, आपले खरे हेतु कळवावे असें मिल्युकोव्हनें ठरविलें. मार्च २७ च्या जाहीरनाम्याचा खरा अर्थ काय ते संयुक्तांना जाहीर करण्यासाठीं त्यानें एक खलिता लिहिला. त्यांत तो लिहितो—

"सर्व संयुक्त राष्ट्रांचें मिळून असें जें हें युद्ध आहे तें लढण्यांत क्रांति झाली म्हणून रशिया दुर्बल झाला असें समजूं नका. उलट जागतिक युद्धांत संयुक्तांना संपूर्ण यश यावें याबद्दल आमचा निश्चय अधिकच दृढ झाला आहे. यापुढें पुन्हा अशीं युद्धें होऊं नयेत यासाठीं 'जी हमी व जीं दंड-

साधनें' (गॅरंटीज ॲन्ड सँक्शन्स) जरूर वाटतील तीं संयुक्त राष्ट्रांना मिळतीलच मिळतील."

'गॅरंटीज ॲन्ड सँक्शन्स' हे शब्द फ्रेंच वकील थॉमस याच्या सूचनेवरून मिल्युकोव्हनें घातले होते. या मुत्सद्देगिरीच्या शब्दांचा नागडा अर्थ नवीं राज्यें जिंकणें व पराभूत राष्ट्रांवर नुकसानभरपाई लादणें हा होता हें सर्वांस सहज कळण्यासारखें होतें. सरकारनें कोणतीहि गोष्ट ठरविण्यापूर्वी सोव्हियटच्या कार्यकारी समितीची संमति घेण्याचा शिरस्ता असून झटपट कामें उरकावीं यासाठीं कार्यकारी समितीनें एक कायमचें सल्लागारमंडळ (कॉन्टॅक्ट कमिशन) सरकारशीं बोलणें चालणें करण्यासाठीं निर्माण करून ठेविलें होतें. पण मिल्युकोव्हनें आपला खलिता आधीं जवळ जवळ परराष्ट्रीय वकिलाकडूनच लिहून घेतला, तो संयुक्तांना तारेनें कळविला व मग त्याची नक्कल सोव्हियटकडे पाठविली. त्याच वेळीं वृत्तपत्रांनाहि एकेक नक्कल देण्यांत आली. १८ एप्रिल या आंतरराष्ट्रीय मजूरदिनादिवशींच हा प्रकार घडला. मेन्शेव्हिक पत्रें या प्रकारानें खवळून गेलीं. सोव्हियटच्या कार्यकारी मंडळाची बैठक भरली. पण सरकारचा निषेध करून त्यांना जाब विचारण्याचें धाडस कोणासच होईना. या वेळीं मिल्युकोव्हनें जबाबदारीची बेडी केरेन्स्की सुद्धां सर्व प्रधान-मंडळाच्या पायांत अडकविली होती. यामुळें नुसतें मिल्युकोव्हला काढून टाका म्हणणें शक्य नव्हतें. सगळेंच सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न करण्याची कार्यकारी मंडळाची छाती होईना. तेव्हां 'अशुभस्य कालहरणं' या न्यायानें त्यांनीं सोव्हियट प्रतिनिधींची बैठक बोलाविण्याचें ठरविलें. ही टोलवाटोलवी कामकरी व सैनिक यांना मंजुर होणें शक्यच नव्हतें. शस्त्रास्त्रें घेऊन लोक रस्त्यावर आले. सुमारें ३०००० सशस्त्र आरमारी सैनिक "मिल्युकोव्हचा धिक्कार, गुचकोव्हचा धिक्कार" अशी घोषणा मोठमोठ्या अक्षरांत संगिनीवर अडकवून रस्तोरस्तीं फिरूं लागले. सरकारची व सोव्हियटच्या कार्यकारी मंडळाचीहि घाबरगुंडी उडाली. सैनिकांच्या या मिरवणुकी बंदुका, तोफा चालवून झोडपून काढाव्या अशी एक सूचना आली होती; पण केरेन्स्की स्वतः त्यास विरुद्ध होता. कॉर्निलोव्ह या सैन्याधिकाऱ्यास मिरवणुकी झोडपून काढण्यास परवानगी मिळाली नाहीं. शेवटीं ता. २१ रोजींच्या मिरवणुकींत भांडवलवाल्या पक्षानें आपल्या पक्षपाती लोकांनाहि मिरवणुकींत

घुसण्यास सांगितलें. तेव्हां उलटसुलट पक्षांचीं व्याख्यानें होऊं लागलीं. बोल्शेव्हिकांवर व लेनिनवर जर्मनीस फितुर असण्याचा जाहीर आळ घेण्यांत आला. उलटसुलट पक्षीयांकडून मारामाऱ्या सुरू झाल्या. राज्यसत्ता उलथून पाडावी अशी सैनिकांची व कामकऱ्यांची मुळींच इच्छा नव्हती. त्यांना फक्त परराष्ट्रीय राजकारणाचें धोरण बदलून घ्यावयाचें होतें. पण पेट्रोग्रॅड बोल्शेव्हिक कमिटीनें तात्पुरत्या सरकारचा पाडाव करा अशी घोषणा दिली. तेव्हां वेळेवर मिरवणुकी बंद पाडल्या नाहींत तर सर्व प्रकरण अनावर होईल असें वाटून सोव्हियटच्या कार्यकारी मंडळानें कामगारांनीं व सैनिकांनीं मिरवणुकी बंद कराव्या अशा तारेनें सूचना पाठवल्या व कार्यकारी समितीनें हुकूम केल्याशिवाय कोणताहि कार्यक्रम कामकऱ्यांनीं व सैनिकांनीं अंगावर घेऊं नये अशी ताकीद जाहीर केली. यामुळें सर्वत्र शांतता झाली.

सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करावी असा ठराव २१ तारखेस कॅमेनेव्हनें बोल्शेव्हिकांतर्फे सोव्हियटमध्यें मांडला; पण तो डावलून देण्यांत आला. या वेळीं सशस्त्र मिरवणुकी काढून जें असंतोषनिदर्शन करण्यांत आलें तें कामकरी व सैनिक यांच्या असंतोषांतून आपोआप निर्माण झालें होतें. पण तें एक प्रकारें साहस होतें व त्याचे परिणाम अनिष्ट झाले असते असें मत लेनिननें दिलें. शस्त्रबलाचा क्रांतीसाठीं उपयोग करण्यास वाव नसतां तसा तो करण्याचा प्रयत्न झाला हें साहस झालें असें लेनिनचें म्हणणें होतें. लेनिन सांगतो—

"जो जुलुमी राज्यकर्ता आहे असें लोकांना माहीत असतें त्याला तुम्ही सशस्त्र प्रतिकार करून पदच्युत कराल. पण येथें जुलुमी राज्यकर्ता नाहींच, बंदुका व तोफा कामगारांच्या व सैनिकांच्या हातीं आहेत, भांडवलवाले शस्त्रबलानें राज्य करीत नसून कपटानें राज्य करीत आहेत, तेथें फक्त शांततायुक्त असंतोषनिदर्शन करावें असा आमचा हेतु होता. पण पेट्रोग्रॅड कमिटीनें 'तात्पुरत्या सरकार'ला हाणून पाडा अशी घोषणा दिली ही चूक झाली. असें करण्यानें संघटना बिघडते. असें करणें हा गुन्हा आहे."

लोकमत पूर्णपणें सरकारविरुद्ध झालें नाहीं, तें होईपर्यंत सशस्त्र प्रतिकार करणें गैर आहे असा लेनिनच्या मताचा इत्यर्थ होता.

मेन्शेव्हिक पुढारी प्रधानमंडळांत शिरले

एप्रिलमधील या बखेड्यामुळें सोव्हियटचे सभासद आपणांत असल्याशिवाय राज्य करतां येणें अशक्य आहे अशी 'तात्पुत्या सरकार'ची खात्री झाली. सोव्हियटनें 'तात्पुरत्या सरकारां'त आपले प्रतिनिधि पाठविण्यापूर्वी डार्डानेलीस जिंकणार नाहीं अशी कबुली मागितली. तेव्हां मिल्युकोव्हनें २ मे रोजीं आपल्या जागेचा राजीनामा देऊन तो प्रधानमंडळांतून बाहेर पडला. 'तात्पुरत्या सरकारां'त सोव्हियट व भांडवलवाले यांचें संयुक्त सरकार बनवावें यास लोकमताचा विरोध होता. पण 'तात्पुरत्या सरकार'नें सोव्हियटवांचून राज्य करण्याचें साफ नाकारलें. सोव्हियटला तर राज्यसत्ता हातीं घेण्याची छाती नव्हती. तेव्हां संयुक्त सरकार नेमण्याची योजनाच मुक्रर करण्यांत आली. एकंदर पंधरा मंत्र्यांपैकीं ६ जागा सोव्हियट प्रतिनिधींना देण्यांत आल्या. केरेन्स्की युद्ध व आरमार खात्यांचा मंत्री झाला. त्सेरीटेली सोव्हियट कार्यकारी समितीवरील आपली जागा न सोडतां सरकारांत पोस्ट व तार खात्यांचा मंत्री झाला. सोव्हियट प्रतिनिधींनीं एकहि महत्त्वाची जागा पत्करली नाहीं. पेट्रोग्रॅड सोव्हियटमध्यें ता. ५ मे रोजीं नवीन मंत्रिमंडळास संमति देण्याचा ठराव आला. शंभर बोल्शेव्हिक सभासदांनीं विरुद्ध मत दिलें. ट्रॉट्स्की आधल्या दिवशींच इंग्लंडांतून पेट्रोग्रॅड येथें आला होता. त्यानें संयुक्त मंत्रिमंडळ नेमण्याच्या धोरणावर कडाडून हल्ला केला. पण अर्थात् सोव्हियटमध्यें बहुमत त्याचे मतास मिळालें नाहीं; व संयुक्त मंत्रिमंडळास संमति देण्याचा ठराव पास झाला.

या सुमारास रणांगणावर सामसूम होतें. रशियन सैनिकांस शस्त्रास्त्रें दारूगोळा, अन्नसामुग्री या सर्वांचा तुटवडा होता. त्यांचे ठिकाणीं लढण्याचें त्राण अथवा उत्साह मुळींच नव्हता. हें पाहून जर्मनीनेंहि आपलीं सैन्यें व युद्धसामुग्री पश्चिम रणावर नेली होती. इकडे 'तुम्ही चढाई करा' असा केरेन्स्कीचे मागें संयुक्तांचा लकडा लागला. तेव्हां केरेन्स्की सैनिकांना उत्तेजन देण्यासाठीं स्वतां रणांगणावर फेरी मारून आला. जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यांत व जुलैच्या पहिल्या आठवड्यांत केरेन्स्कीनें तीन आघाडीवर चढाई करण्याचे हुकूम सोडून पाहिले. पण सर्व ठिकाणीं जर्मनीकडून मार मिळून पीछेहाट खावी

लागली. खरें म्हणजे सैनिक मुळीं लढलेच नाहींत. पुष्कळजण रणांगण सोडून चालते झाले. लेनिन हा जर्मन एजंट आहे असें कामकऱ्यांचें व विशेषतः सैनिकांचें मत बनविण्याचे प्रयत्न निकारानें चालू होते व त्यांना यशहि पुष्कळ आलें. पण लेनिनचा हेतु कांहीं असला तरी कामकरी-सैनिकांना स्वतंत्रपणेंच युद्ध नको झालें होतें.

कामकरीवर्ग युद्धाचे बाबतींत व इतरहि कारणांनीं सरकारचे विरुद्ध जाऊं लागले म्हणून त्यांचें मीठ तोडण्यासाठीं कारखानदारांनीं हळूहळू कारखान्यांना कुलुपें लावून बेकारीची वाढ करण्यास सुरुवात केली. कच्च्या मालाचा तुटवडा, भांडवलाचा तुटवडा हेंहि कारखाने बंद करण्याचें कारण होतेंच. पण त्यामुळें कामकऱ्यांचा असंतोष वाढूं लागला व बोल्शेव्हिक पक्षांत कामगारांची भरती होऊं लागली. मेन्शेव्हिक पक्षांतून नांव काढून बोल्शेव्हिक पक्षांत घालावयाचें आहे असें सांगणाऱ्या कामकरी-सैनिकांच्या झुंडीच्या झुंडी बोल्शेव्हिक कचेरींत येऊं लागल्या. ३जूनला अखिल रशियन सोव्हियट काँग्रेसनें भरली. तिनें केरेन्स्कीच्या लढाईच्या धोरणास संमति दिली होती. तेव्हां बोल्शेव्हिक पक्षानें सरकारचा निषेध करण्यासाठीं असंतोषनिदर्शनार्थ मिरवणूक काढावी असा सैनिकांनीं आग्रह धरला. पुढारी आमचें नेतृत्व पत्करणार नसले तर आम्हीच शस्त्रें घेऊन बाहेर पडतों असा सैनिकांनीं धाक घातला. तेव्हां असंतोषनिदर्शनार्थ ता. १० जूनला मिरवणूक काढावी असें बोल्शेव्हिकांनीं ठरविलें. पण सोव्हियट काँग्रेसनें ता. ९ रोजीं मिरवणुकीस ३ दिवस मनाई करणारा ठराव केला व शिस्तीसाठीं बोल्शेव्हिकांनीं तो मानण्याचें ठरविलें. सोव्हियट प्रतिनिधि सर्व देशांतून आले होते. त्यांचे ठिकाणीं पेट्रोग्रॅड येथेंच असणाऱ्या कामकरी सैनिकांइतका कडवेपणा नव्हता. मिरवणूक रद्द झाली असें पाहून सगळें पेट्रोग्रॅड खवळून गेलें. ज्या दिवशीं बोल्शेव्हिकांच्या असंतोषनिदर्शनाच्या मिरवणुकीस मनाई करण्यांत आली त्याच दिवशीं सोव्हियट काँग्रेसनें रशियांत सर्व पक्षांचें ऐक्य कसें दृढ झालें आहे, हें शत्रुराष्ट्रांस दाखविण्यासाठीं रविवार ता. १८ जून रोजीं ऐक्यनिदर्शनाची मिरवणूक काढण्याचें ठरविलें. सोव्हियट प्रतिनिधींनीं सर्व कारखान्यांत व बराकींत जाऊन कामकऱ्यांना व सैनिकांना ऐक्याचे डोज पाजले. पण ऐक्याचे सर्व प्रयत्न अखेर वांया गेल्याचा सरकारला व सोव्हियट कार्यकारी कमिटीला प्रत्यय आला. सुमारें ४ लक्ष

लोकांची परेड १८ जूनला मार्स फील्डवर गेली. सरकारनिष्ठेच्या घोषणा पुष्कळशा मिरवाव्यात व ऐकवाव्यात असा पेट्रोग्रॅड सोव्हियटनें शिकस्तीचा यत्न केला होता. पण प्रत्यक्ष परेडीमध्यें 'भांडवलवाल्या १० मंत्र्यांचा धिक्कार असो', 'खाजगी मिळकतीच्या हक्कापेक्षां जगण्याचा हक्क अधिक श्रेष्ठ आहे' याच घोषणांची गर्दी उसळली. जिकडे तिकडे भांडवलवाल्या मंत्र्यांना हाकून लावा हाच घोष ऐकीव्हझला ऐकावा लागला असें प्लेखॅनोव्हनें लिहिलें आहे. सर्व रशियांतून आलेल्या प्रतिनिधींनीं पेट्रोग्रॅड तुमचें आहे अशी बोल्शेव्हिकांना कबुली दिली. "पण रणांगणावर व खेड्यांतून तुम्हां बोल्शेव्हिकांस कोणी विचारीत नाहीं" असा त्यांनीं टोमणाहि मारला. हा टोमणाहि फार काळ खरा राहणारा नव्हता. बोल्शेव्हिकांच्या भाकिताप्रमाणें केरेन्स्कीच्या चढाईचें सर्व आघाडीवर भंभाळें वाजलें, व सैनिकांची वाढ बोल्शेव्हिकांकडे होऊं लागली. सैनिक हे मूळचे खेड्यांतील शेतकरीच असल्यामुळें खेडींहि बोल्शेव्हिझम्‌ची वाट प्रथम हळूहळू व मागाहून जलद जलद चालत होतीं.

फेब्रुवारी क्रांतीचा शेतकऱ्यांवर परिणाम

फेब्रुवारी क्रांतीनें शहरांचें व रणांगणांचें रूप जितक्या जलद पालटून टाकलें तितक्या जलद क्रांतीचा परिणाम खेड्यांवर झाला नाहीं. पण फार काळपर्यंत खेड्यांना ही धग न पोंचणें अशक्य होतें. राजधानींत कामगारांचीं गडबड सुरू झाली, कीं खेडोपाडीं जमिनदारांच्या इस्टेटींवर शेतकऱ्यांचे हल्ले होऊं लागतात, ही १९०५ ची आठवण जमिनदारांना ताजी होती. १९०५ सालीं मॉस्कोंतील बंड फसलें होतें; पण १९१७ सालीं पेट्रोग्रॅड व मॉस्को येथें बंडवाले यशस्वी झाले आणि देशभर नवी राज्यसत्ता त्यांनीं स्थापित केली होती. भांडवलवाल्यांची राज्यसत्ता असल्याचा फक्त देखावा असून खरी सत्ता कामकरी व सैनिक यांच्या सोव्हियट्‌सच्या हातींच सर्व देशभर आली होती. स्टोलिपिननें १९०६ सालीं ग्रामसंस्थेंतून बाहेर पडण्याची व नवीन जमिनी खरेदी करण्याची सोय शेतकऱ्यांस करून दिली. पण त्यामुळें कांहीं धनिक शेतकरी अधिकच गबर झाले. जमिनदारांच्या जमिनी विकत घेण्यास लागणारी रोकड शेंकडों वर्षें पिळून जाऊन चिपाड झालेल्या बहुसंख्य शेतकऱ्यांत मुळींच नव्हती. त्यामुळें बहुसंख्य शेतकऱ्यांच्या नशिबीचें उपरीपण

नष्ट झालें नाहीं. रात्रंदिवस आपण ज्या जमिनीवर खपतों तिचें धन जमिनदारास देऊन पोरा-बाळांची उपासमार करावी लागते म्हणून शेतकरी चिडला होता. ती विकत घेण्यासाठीं जमिनदारांस पैसे द्यावे हें त्यास कसेंसेंच वाटत होतें. त्यास ती मोफतच हिसकून घ्यावयाची होती. शेतकरी हाच सैनिकहि होता. तेव्हां त्याला जमीन हिसकून घेण्याचें धैर्य कांहीं कमी नव्हतें. पण झारशाही बलिष्ठ, तिचा जमिनदारांस पाठिंबा व शेतकरी मात्र असंघटित असा विषम सामना असल्यानें शेतकरी नाइलाज झाला होता. फेब्रुवारी क्रांति यशस्वी होऊन झारशाहीचा पाडाव झाला व बंडांत सैनिकांनीं महत्त्वाचा भाग घेतल्यानें त्यांना म्हणजेच शेतकऱ्यांला विशेष महत्त्व आलें होतें. जमिनदारांच्या जमिनी हिसकून घेण्याइतकी शक्ति आतां सैनिक-शेतकऱ्यांच्या अंगीं आली होती. पण सैनिक-शेतकऱ्यांना या शक्तीची जाणीव होण्यापूर्वीच जमिनदार आपल्या जमिनी हिसकल्या जाणार म्हणून पूर्वानुभवावरून घाबरले.

जमिनीच्या मुद्द्यावर सरकारचा अंगचोरपणा

'तात्पुरत्या सरकार'च्या मंत्रिमंडळांतच बडे जमिनदार होते. यामुळें सरकारचा जमिनदारांना पाठिंबा होता. आणि सोव्हियटमधील पुढारी 'तात्पुरत्या सरकार'ची मर्जी सांभाळून राहण्यास तयार होते. यामुळें क्रांति होऊन झारशाही उलथून पडली तरी जमिनीचा प्रश्न धसास लावणें धोक्याचें आहे असें सोव्हियट पुढाऱ्यांचें मत पडलें. "पुढील कांहीं महिन्यांत" सुखॅनोव्ह लिहितो—"शेतीचा प्रश्न धसास लावणें यांत धोका आहे. आणि सध्यां तशी कांहीं गरजहि नाहीं." खरोखर फेब्रुवारी क्रांतीची तरी पुढाऱ्यांना गरज कोठें वाटत होती? गुरें दाव्याला बांधून ओढीत न्यावीं त्याप्रमाणें क्रांतीनें पुढाऱ्यांना खेचून त्यांच्या मानेवर क्रांतीची धुरा लादली होती. आणि शेतकऱ्यांनींहि जमिनीचा प्रश्न असाच आपल्या हातानें पुढाऱ्यांवर लादण्यास सुरुवात केली. "युद्ध चालू आहे, शहरांना व रणांगणावर अन्नाचा तुटवडा पडेल. शेती हातांत घेण्याची आजच घाई करूं नका" असाच संदेश सोव्हियटच्या कार्यकारीसमितीनें खेडोपाड्यांतल्या कार्यकर्त्यांना पाठविला होता. पण जमिनी हातच्या जाणार अशी धाय जमिनदारांनीं

घेतली; व जमिनी पेरण्याचेंच पुष्कळ ठिकाणीं लांबणीवर टाकण्यांत आलें. यामुळें अन्नाच्या तुटवड्याचें संकट दत्त म्हणून सोव्हियटपुढें उभें राहिलें. जमिनदार हे भीतीनें आपल्या जमिनी भराभर विकूं लागले. त्या कुलक म्हणजे धनिक शेतकरीवर्गानें विकत घेण्याचा सपाटा चालविला. क्रांतीमुळें आपल्या जमिनी जाणार ही भीति जमिनदारांना पडली होती; पण बोल्शेव्हिक, मेन्शेव्हिक व विशेषतः सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांचे पुढारी हे शेतकऱ्यांना जमिनी वांटण्याच्या धोरणाचा पुरस्कार करीत असल्यामुळें आपल्या जमिनी सुरक्षित राहतील असा कुलक वर्गास विश्वास वाटत होता. व म्हणून ते जमिनदारांच्या जमिनी भराभर खरेदी करीत होते. या जमिनी विकण्याच्या सपाट्यामुळें जमिनीवरून उपरी शेतकऱ्यांची हकालपट्टी होऊं लागली व पुढें मागाहून मालकीच्या जमिनी मिळतील हा संभव कमी कमी होत आहे असें पाहून गरीब शेतकऱ्यांच्या पोटांत धडकी भरली. शेतकरी-प्रतिनिधींच्या झुंडीच्या झुंडी पेट्रोग्रॅडला येवून 'जमिनींची विक्री थांबवा' अशी विनंति 'तात्पुरत्या सरकारला' करूं लागल्या. एक दिवस मंत्रिमंडळ आपल्या दिवाणखान्यांत बसलें असतां एक शेतकरी आंत घुसला व 'जमिनींची विक्री थांबविण्याचा कायदा करा' असें प्रधानमंडळावर खेकसून ओरडूं लागला. केरेन्स्कीनें 'होय' म्हटलें तरी त्यास विश्वास वाटेना व तो आपलें खेकसणें बंद करीना. त्याची ती अधीर, हताश, क्रूर व संशयी मुद्रा पाहून केरेन्स्की थोडासा भेदरला, व सगळें अवसान एकत्र करून त्या शेतकऱ्यावर तोहि खेकसला, " कायदा करीन म्हटलें ना ? झालें तर. करीन म्हटलें तर करीनच. असा संशयानें माझ्याकडे डोळे फाडून पाहूं नको." शेंकडों वर्षें ज्या शेतकऱ्यांची निवळ फसगतच राज्यकर्त्यांनीं व जमिनदारांनीं केली होती त्यांस आजच हें सत्य बोलणारें सरकार अवतरलें हें खरें कसें वाटणार ?

सरकार खोटेंच बोललें

आणि त्या बिचाऱ्यांचा संशयच खरा ठरला. जमीनविक्री बंद ठेवण्याचा कायदा 'तात्पुरत्या सरकारा'नें कधींच केला नाहीं. कालहरण करण्यासाठीं खेडोपाड्यांतून जमीनसामिति नेमण्याचा कायदा करण्यांत आला व त्या

कमिट्यांकडे जमिनींचा प्रश्न निकालांत काढण्याचें सोपविण्यांत आलें. यामुळें पेट्रोग्रॅड येथें ज्याप्रमाणें सोव्हियट व 'तात्पुरतें सरकार' अशी दुभंगलेली सत्ता होती तशी खेडोपाडयांतूनहि दुभंगलेली सत्ता निर्माण झाली. कारण क्रांति यशस्वी झाल्यानंतर हळूहळू सर्व देशभर स्थानिक सोव्हियट्स निर्माण होऊन वर पेट्रोग्रॅडपासून खालीं अगदीं लहानशा खेड्यापर्यंत सोव्हियट्सचें जाळें पसरलें. तसेंच जाळें पेटोग्रॅडमधील 'तात्पुरत्या सरकार'पासून खेड्यांतील जमीनसमित्यांपर्यंतहि पसरलें. जमीन-समित्यांत जमिनदार व धानिक वर्गाचे प्रतिनिधि घुसत. सोव्हियटमध्यें शेतकऱ्यांवर पुष्कळसें वजन असलेल्या सोशल रेव्होल्यूशनरी पुढाऱ्यांचा व शेतकऱ्यांचा भरणा होई. अर्थात् पेट्रोग्रॅड सोव्हियटच्या कार्यकारीमंडळानें शेतीच्या प्रश्नास सबूरी करा असें धोरण खेडयांतील सोव्हियट्सना कळविल्यामुळें जमीनसमिति व सोव्हियट यांच्यांत विरोध न येतां सोव्हियटतर्फेंहि सबूरीचा उपदेश होऊं लागला. " घटनापरिषद होईपर्यंत जमिनी काढून घेण्याचें तहकूब करा " असा उपदेश सोशल रेव्होल्यूशनरी विद्यार्थी करूं लागले; पण शेतकऱ्यांस इतका धीर निघत नव्हता. लढाईवरून रजेवर आलेल्या शेतकरी-सैनिकांस आपल्या कर्तृत्वाचा विश्वास वाटूं लागला असून त्याला वाट पाहण्याची गरज भासली नाहीं. शेतकऱ्यांनीं खेडोपाडीं कायदा हातीं घेतला. जमिनदारांच्या धरपकडी सर्रास सुरू झाल्या. सैनिकांच्या नेतृत्वाखालीं शेतकरी जमिनदारांच्या इस्टेटीवर छापे घालून त्यांचा ताबा घेऊं लागले. ज्यांनीं ग्रामसंस्थांतून पैसे देऊन आपल्या जमिनी तोडून घेतल्या होत्या अशांच्यावरहि हल्ले होऊं लागले. यांत शेतकऱ्यांना पुन्हा ग्रामसंस्था सुरू करावयास हवी आहे असा अर्थ नव्हता. पण मालक झालेला शेतकरी हा जमिनदाराच्या बाजूस जाऊं पाहत होता अथवा वर्गलढ्यांतून अलग राहूं इच्छीत होता. अशा अंगचोर व स्वपक्षद्रोही शेतकऱ्यांस उपरी शेतकऱ्यांनीं झोडपून काढलें. " येथें कोर्टें चालत नाहींत कांहीं नाहीं. ज्याला जसें वाटेल तसें तो वागतो. समजूतदार लोकांना धमक्या देण्यांत येतात." अशा तक्रारी खेडयांतील अधिकाऱ्यांकडून वर येऊं लागल्या. 'जमिनविक्रीच्या स्वातंत्र्यास आळा घालण्यांत येणार नाहीं' असें सरकारनें ३ एप्रिल रोजींच जाहीर केलें होतें. शेतकऱ्यांपुढें हें एक प्रकारें नाक खाजविणेंच होतें.

त्यामुळें बेबंदशाही कमी होण्याऐवजीं उलट वाढली मात्र. जागोजाग शेतकरीपरिषदा भरून जमिनींचे कबजे घेण्याचे ठराव होऊं लागले. "हे ठराव हेच आपले कायदे समजून शेतकरी त्यांची बजावणी करतात" अशा तक्रारी अधिकाऱ्यांनीं वर पाठविल्या. सगळ्या खेड्यांतून पांच-दहा बोल्शेव्हिक पुढारीहि नसतील. सगळा भरणा सोशल रेव्होल्यूशनरींचा होता. सक्तीनें जमिनी हिसकून घेण्याच्या धोरणास त्यांचा विरोध होता. पण शेतकऱ्यांनीं आपल्या पुढाऱ्यांचा उपदेश धाब्यावर बसविला व ज्या बोल्शेव्हिकांची शेतकऱ्यांना फारशी कधींच माहिती नव्हती त्यांचा, सक्तीनें जमिनदारांच्या जमिनी शेतकऱ्यांनीं हिसकून घेण्याचा, कार्यक्रम शेतकऱ्यांनीं अमलांत आणला. हळूहळू जमीनसमित्यांतून क्रांतिकारक शेतकऱ्यांचा भरणा होऊं लागला. त्यांनीं कांहीं ठिकाणीं जमिनदारांचे खंड चतुर्थांश पंचमांशपर्यंत कमी केले व हे खंड जमिनदारांस न देतां घटनापरिषद भरून तिचा निर्णय होईपर्यंत जमीनसमितीच्या स्वाधीन करावे अशा शेतकऱ्यांस सूचना केल्या. "घटनापरिषद होऊन तिचा निर्णय होईपर्यंत जमिनदारांच्या जमिनी हिसकून घेऊं नका" असा उपदेश सोशल रेव्होल्यूशनरी पुढारी करीत असत; त्यांची आज्ञा या शेतकऱ्यांनीं अशा उलट्या क्रमानें मान्य केली.

अखिल रशियन शेतकरीपरिषद

मे महिन्याचे आरंभीं अखिल रशियन शेतकरीपरिषद बोलावण्यांत आली. तींत धनिक शेतकऱ्यांचें प्रतिनिधिच पुष्कळ घुसले. यामुळें सामान्य शेतकऱ्यांचा कैवार या परिषदेंत ऐकूं आला नाहीं. जमिनी विकण्याचें स्वातंत्र्य नष्ट करण्याची सरकारची इच्छा नाहीं हें परिषदेंत स्पष्टपणें कळून आलें; त्यामुळें गरीब शेतकऱ्यांचे प्रतिनिधि मात्र चिडून गेले. २० मे रोजीं लेनिननें परिषदेंत भाषण केलें. त्यांत त्यानें शेतकऱ्यांनीं जमिनदारांकडून जमिनी हिसकून घ्याव्या असा स्पष्ट सल्ला दिला. सरकारच्या कायद्याची वाट न पाहतां लेनिन लोकांना कायदा हातांत घेण्यास सांगतो हें अराजकतेचें लक्षण आहे असा आरोप त्यावर अनेकांनीं केला होता. पण लेनिन अराजक पंथी नव्हता. क्रांति होऊन शेतकऱ्यांची जीं सोव्हियट्स निर्माण होत आहेत हींच नवें सरकार होत व यांच्याच ठरावाअनुसार जमिनदारांच्या जमिनी हिसकून

घेणें यांत अराजक कसलें, अशी त्यांची विचारसरणी होती. जास्तींत जास्त संघटितपणें शेतकऱ्यांना जमिनी ताबडतोब वांटून द्याव्या असें त्यानें एप्रिल २८ रोजीं आपलें स्पष्ट मत जाहीर केलें होतें. पण घटनापरिषद होईपर्यंत धीर कां धरीत नाहीं ? या आक्षेपास लेनिननें क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचे परिभाषेंत उत्तर दिलें. परिषदेंत तो म्हणाला—

" लोकांत जें क्रांतिकारक कर्तृत्व निर्माण झालें आहे तें टिकविणें ही बाब आज महत्त्वाची आहे. हें कर्तृत्व कायद्याप्रमाणें घडावयाचें नसून या क्रांतीचे वेळच्या कर्तृत्वांतून कायदे निर्माण झाले पाहिजेत. तुम्ही जर कायदा कागदावर लिहिला जाईपर्यंत वाट पहाल व स्वतः क्रांतिकारक जोम वाढविणार नाहीं, तर तुम्हांला कायदाहि मिळणार नाहीं व जमीनहि मिळणार नाहीं."

शेतकरीपरिषद सुमारें एक महिनाभर चालून, एक२००शेतकरी प्रतिनिधींची कार्यकारी समिति नेमण्यांत आली व परिषद विसर्जन पावली. समितींत केरेन्स्की व त्याचे हस्तक सोशल रेव्होल्यूशनरी यांचा भरणा होता. समितीच्या हातून फारसें कार्य झालें नाहीं. शेतकऱ्यांनीं कायदा हातांत घेतला होता. असंतोष ठेचून टाका, लोकांना कायद्याची शिस्त लावा असे हुकूम प्रधानमंडळांतून सुटत होते. पण त्यांची बजावणी करण्याची ताकद स्थानिक अधिकाऱ्यांत राहिली नव्हती.

प्रकरण ९ वें

क्रांति आणि प्रतिक्रांति यांची रस्सीखेच

(१९१७, जुलै ते सप्टेंबर)

वाढतें दारिद्र्य, अन्न व इतर आवश्यक वस्तूंचा तुटवडा, रणावर अपजय व स्वदेशांत दडपशाही यांनीं सर्वच देश हैराण होऊं लागला असला तरी खेड्यांतील शेतकऱ्यांपेक्षां शहरांतील मजुरांची व सैनिकांची परिस्थिति अधिक बिकट होती. खेडोपाडीं सरकारचा हात पोंचणें कठीण असल्यामुळें शेतकरी कायदा धाब्यावर बसवून जमिनी हिसकावून घेऊन क्रांतीचीं फळें पदरांत पाडून घेऊं लागले. पण कामकरी व सैनिक यांना कारखाने काबीज करणें, युद्ध थांबविणें वगैरे गोष्टी साध्य करण्यासाठीं त्यांना वेढा देऊन बसलेल्या कारखानदार, सरकार व सैन्याधिकारी यांशीं निकराची झुंज देणें भाग होतें. फेब्रुवारींत आपण रक्त सांडून क्रांति केली, पण आपल्या हातीं नरोटी आली आणि खोबरें भांडवलवाल्यांनीं पळविलें असा अनुभव हळूहळू कामगारांना व सैनिकांना येऊं लागला. यामुळें हळूहळू लेनिनच्या बोल्शेव्हिक पक्षास कामकरी-सैनिकांची सहानुभूति वाढूं लागली. एप्रिलमध्यें मिल्युकोव्हच्या परराष्ट्रीय धोरणाविरुद्ध जीं असंतोषनिदर्शनें झालीं त्यांपेक्षां जूनच्या १८ तारखेस सोव्हियटच्या कार्यकारी मंडळानें काढलेल्या मिरवणुकींत बोल्शेव्हिकांचें बळ खूपच अधिक वाढलें होतें. जुलैच्या पहिल्या आठवड्यांत पेट्रोग्रॅडमध्यें जें असंतोषनिदर्शन झालें त्यानें 'तात्पुरत्या सरकार'ची इभ्रत जवळ जवळ खलास झाली व बोल्शेव्हिकांची पुष्कळच वाढली. तो प्रकार असा—

लोकक्षोभ आणखी उसळला

२ जुलै रोजीं तात्पुरत्या सरकारच्या मंत्रिमंडळांतील चार कॅडेट सभासदांनीं सरकारचें धोरण साम्राज्यवर्धनास विरोधी आहे अशा सबबीवर राजीनामे दिले. लोकांच्या चळवळी सरकार पुरेशा निर्दयतेनें दडपून टाकीत

नाहीं हाहि त्यांच्या राजीनाम्याचा एक हेतु होता. भांडवलवाल्यांचे दहा मंत्री हाकून लावून सोव्हियटच्या कार्यकारी मंडळानें राज्यसत्ता धारण करावी अशी कामकरी सैनिकांनीं जूनमधील निदर्शनांत मागणी केली होती. ती लोकांची मागणी या वेळीं आणखी जोरानें वाढली. हें युद्ध आणि वाढतें दारिद्र्य याला हे भांडवलवालेच कारण आहेत अशी कामकरी व सैनिकांची खात्री झाली असून युद्धाचा व दारिद्र्याचा प्रश्न निकालांत काढण्याच्या आधीं हें संयुक्त प्रधान मंडळ निकालांत काढून सोव्हियटच्या हातीं सत्ता देऊं असा विचार कामकरी-सैनिकांत प्रभावी होऊं लागला. त्यांतच ता. ४ रोजीं सैनिकांच्या ताज्या दमाच्या तुकड्यांना आघाडीवर नेण्यांत येणार अशी बातमी आली. यामुळें भांडवलवाल्यांच्या हातून राज्यसत्ता काढून घेण्यासाठीं सैनिकांनीं टॉराइड राजवाड्याकडे कामकरी-सैनिकांची मिरवणूक नेऊन तुम्ही राज्यसत्ता हातीं घ्या व उरलेल्या भांडवलवाल्या मंत्र्यासहि हाकून लावा अशी सोव्हियटला विनंति करावयाची असें मशिनगनवाल्या सैनिकांनीं ठरविलें. त्यांनीं प्युटिलॉव्हच्या धातु-कारखान्यांतील कामगारांस तसेंच कॉन्स्डॅट बेटावरील लढाऊ खलाशांना व इतर कामकरी-सैनिकांना मिरवणुकीस आमंत्रण दिलें. अशा तऱ्हेनें प्रचंड मिरवणूक काढल्यास सरकार तेवढेंच निमित्त करून गोळीबार करील व सर्व चळवळ दडपून टाकील, सरकारचा पराभव करण्याइतकें आपलें सामर्थ्य वाढलें नाहीं व सरकारचें कमी झालें नाहीं म्हणून जरा दमानें घ्यावें अशी बोल्शेव्हिक पक्षाची विचारसरणी होती. तसा सल्लाहि व्यक्तिशः कांहीं बोल्शेव्हिकांनीं दिला. त्यावर मशिनगनवाले सैनिक म्हणाले "बस करा तुमचा दम धरण्याचा उपदेश! अजून तुम्हांला निर्वाणीचा झगडा लांबणीवरच ढकलावासा वाटतो. पण आम्हांला आतां धीर निघत नाहीं." ब्लीचमन नांवाचा एक साहसी अराजक सैनिकांना पुढारी मिळाला. त्यानें क्षोभकारक व्याख्यानांची झोड उठविली. क्रांतीचें, चढाईचें, संघटनेचें कांहीं तरी एक विशिष्ट तंत्र म्हणून असतें, त्यावांचून यश येत नाहीं असें ब्लीचमन मानीतच नव्हता. हातांत तरवार घेतली कीं लढाईची कला सुचते, शस्त्र घेऊन सडकेवर जमलें, कीं संघटना आपोआप होते व यशहि मिळतें असें त्याचें दणकेबाज मत होतें. तो म्हणे, पुढारी आणि पक्ष हवेत

कशाला ? " कोणत्याहि पक्षाला नको असतां आपण झारला उलथून पाडलेंच कीं नाहीं ? तसेंच आतां या तात्पुरत्या सरकारलाहि उलथून पाडूं." असल्या या उतावळ्या वीराचा उपदेश कामकरी-सैनिकांच्या चेवलेल्या मनास योग्य वाटून ते शस्त्रास्त्रें घेऊन पेट्रोग्रॅडच्या सडकोसडकीं जमा झाले. मिरवणूक काढावयाची तर निदान ती शांततामय आहे अशी सरकारला खातरजमा होण्यासाठीं निःशस्त्रपणें तरी काढा असा आग्रहाचा सल्ला ट्रॉट्स्की वगैरे पुढाऱ्यांनीं देऊन पाहिला; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं कामकरी-सैनिक आपलें ऐकत नाहींत तर निदान त्यांचें नियंत्रण करण्यासाठीं मिरवणुकीचें पुढारीपण आपणांकडे घ्यावें असें बोल्शेव्हिकांनीं ठरविलें. ता. ३ जुलै रोजीं लाखांवर सैनिक व कामकऱ्यांची सशस्त्र मिरवणूक दुपारभर जागोजाग सभा व भाषणें करीत करीत रात्रौ टॉराइड राजवाड्यापाशीं गेली. रात्रौ प्युटिलॉव्ह कारखाने व क्रॉन्स्डॅट बेटावरील खलाशी यांच्याहि सशस्त्र मिरवणुकी आल्या. सर्वांनीं टॉराइड राजवाड्यास वेढा दिला.

बंडाची खोटीच आवई

या प्रसंगास कसें तोंड द्यावें याचा विचार करण्यासाठीं सोव्हियट कार्यकारी मंडळ व 'तात्पुरत्या सरकार'चे सोव्हियट प्रतिनिधिमंत्री, तसेंच शेतकरीसंघटनेचें कार्यकारी मंडळ यांची बैठक चालू होती. आजची मिरवणूक सशस्त्र होती, फार प्रचंड होती व तिनें टॉराइड राजवाड्यास वेढा दिला होता हें सर्व खरें. तथापि तिचा हेतु सोव्हियटविरुद्ध बंड करण्याचा नसून सोव्हियट कार्यकारी मंडळानें राज्यसत्ता धारण करावी व भांडवलवाल्यांना हाकून लावावें असें कामकरी-सैनिकांचें मागणें होतें. पण भांडवलवाले, मध्यमवर्ग व विद्यार्थि यांना भांडवलवाल्यांची सत्ता नष्ट व्हावयाला नको होती, म्हणून त्यांनीं कामकरी-सैनिकांनीं आज बंड उभारलें आहे अशी आवई उठविली. सोव्हियटच्या कार्यकारी मंडळानेंहि असाच समज करून घेतला. त्सेरीटेली हा मंत्रिमंडळांत पोस्टमास्टर जनरल होता व सोव्हियट-कार्यकारी मंडळाचाहि सभासद होता. त्याला पोस्ट व तारखात्यांतले कामगारहि संप करून मिरवणुकींत आले आहेत व सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करावी असा आग्रह करीत आहेत अशी बातमी कळली. कार्यकारी

मंडळानें सकाळपासून सैन्याची जमवाजमव करण्याचा प्रयत्न केला. पण विश्वसनीय असें सैन्य पेट्रोग्रॅडमध्यें मिळेना. तेव्हां आघाडीवरून त्यांनीं सैन्याची मागणी केली. हें सैन्य येण्यास अवकाश असल्यानें कार्यकारी मंडळाच्या सभेंत त्यांनीं भाषणबाजी चालू ठेविली. मिरवणूकवाल्यांच्या कांहीं प्रतिनिधींनीं सभेंत बसण्याची व चर्चेंत भाग घेण्याची परवानगी मागितली व ती त्यांना नाइलाजानें देण्यांत आली. त्सेरीटेली आपल्या भाषणांत म्हणाला,—

"सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करण्याचें मनांत आणल्यास त्याला ती गोष्ट करणें सहज शक्य आहे. पण आज तें इष्ट नाहीं. असें असतां शस्त्रें हातांत घेऊन व सडकेवर जमून सैनिकांनीं व कामकऱ्यांनीं 'सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करावी' अशी घोषणा करावी याचा अर्थ क्रांतीविरुद्ध बंड करणें, प्रतिक्रांति घडवून आणणें हाच आहे."

दुसरे दिवशीं त्या सभेंत कामकऱ्यांच्या पांच प्रतिनिधींस कामकऱ्यांचें व सैनिकांचें म्हणणें मांडण्यास परवानगी देण्यांत आली. त्यांनीं आपल्या भाषणांतून कामकरी-सैनिकांवर बंडाचा व प्रतिक्रांतीचा केला जाणारा आरोप दुष्टपणाचा व खोटा आहे असें सांगितलें.

"आमच्या निशाणावर 'सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करावी' एवढेंच लिहिलें आहे ना? मग ही प्रतिक्रांति कशी?" एकानें विचारलें.

"सगळ्या कामकरी-सैनिकांचें हें मत आहे. आमचा सोव्हियटवर विश्वास आहे. पण सोव्हियटचा ज्या भांडवलवाल्या सरकारवर विश्वास आहे त्यावर आमचा नाहीं. जमिनदारांच्या जमिनी ताबडतोब हिसकून घ्या, कारखान्यांवर ताबडतोब नियंत्रण ठेवा, दुष्काळ येत आहे त्यास मागें हटवा हें आमचें मागणें आहे;" दुसऱ्यानें भाषण केलें.

"ही कांहीं वादविवाद सभा नव्हे. लोकमताचें हें संघटित निदर्शन आहे. क्रांतिकारक सैन्याविरुद्ध काढलेले हुकूम रद्द करा, असें आमचें मागणें आहे. या वेळीं कॅडेट मंत्र्यांनीं तुमच्याशीं सहकार्य करण्याचें नाकारलेंच आहे. मग आतां कोणाशीं तुम्ही सहकार्य करणार सांगा पाहूं? तें कांहीं नाहीं. सोव्हियटनें राज्यसत्ता धारण केलीच पाहिजे;" तिसऱ्यानें खडसावलें.

पण कार्यकारीमंडळास यांतील कांहींच पटलें नाहीं.

"सोव्हियटनें सत्ता धारण करावयाची ? म्हणजे तें केवढें मोठें संकट ! युद्ध यांबविलें पाहिजे, त्यासाठीं संयुक्त राष्ट्रांशीं वैर पत्करलें पाहिजे, भांडवलवाल्यांशीं कलह करण्यास सिद्ध झालें पाहिजे, छे छे ! जबाबदार सोशॅलिस्टांनीं असें साहस करणें योग्य नव्हे,"

असें कार्यकारीमंडळानें मनाशीं ठरविलें. पण कांहींच निर्णय जाहीर करण्याची कोणाची छाती होईना. तेव्हां कामगार-सैनिकांनीं घातलेल्या वेढ्यास उद्देशून त्सेरीटेली म्हणाला, "सध्यांच्या स्थितींत कोणताच निर्णय करणें शक्य नाहीं. तेव्हां उरलेलें प्रधानमंडळ तेवढेंच सरकार असें मान्य करून पुढील विचारासाठीं सोव्हियट्सची जादा बैठक पेट्रोग्रॅडच्या क्षुब्ध वातावरणांत भरविण्यापेक्षां दोन आठवड्यांत मॉस्को येथेंच भरवूं." बैठकीस मधून मधून एकसारखा अडथळा येत होता. बंद केलेल्या दाराला बाहेरून धक्के बसत असून "त्सेरीटेलीला बाहेर बोलवा, तो येत नसेल तर आम्ही त्यांस बाहेर काढतों" अशा आरोळ्या येत होत्या. झिनोव्हिफ् हा बोल्शेव्हिक पुढारी व्हरांड्यांतून लोकांना समजावीत होता. पण लोकांनीं त्याचें भाषण निवळ हशावारी नेलें. बोल्शेव्हिक हेहि मवाळ होऊं लागले अशी लोकांची समजूत होऊं लागली होती. झिनोव्हिफ बाहेर कामगारांशीं वाद घालीत त्यांना थोपवून उभा असतां आंत चालू असलेल्या सभेंत एक प्रक्षुब्ध कामगार व्यासपीठावर उडी मारून उभा राहिला. मनःक्षोभानें त्याचें सर्व शरीर कंप पावत होतें.

"भाई हो," क्षोभानें व संतापानें तो म्हणाला, "तुमच्या या विश्वासघातकी धोरणास आम्हीं किती वेळ पाठिंबा द्यावा ? तुम्हीं आमचें मत धाब्यावर बसवून जमिनदार व भांडवलवाले यांशीं बिनदिक्कत तडजोड करीत आहां. एका प्युटिलोव्ह कारखान्यांतील ३० हजार कामगार आम्ही येथें जमलों आहों. आज आम्ही आमचा हेका खरा करून घेणार." वक्त्याच्या हातांत बंदूक होती. कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष श्रीड्झ त्याचेसमोर जवळच उच्चासनावर बसला होता. त्याचे नाकासमोर वक्त्याची बंदूक आविर्भाव करतांना नाचत होती. मोठा धीर करून श्रीड्झ आपल्या अध्यक्षपदावरून खालीं उतरला. त्यानें त्या वक्त्याच्या हातांत एक जाहीरनामा खुपसला. "भाई हा वाच, प्युटिलॉव्ह कामगारांनीं काय करावें हें त्यांत

सांगितलें आहे," असें त्यास त्यानें शांतपणें सांगितलें. 'मिरवणूक आवरा व घरीं जा, नाहीं तर तुम्हीच क्रांतीचे द्रोही ठराल' असें त्या जाहीरनाम्यांत लिहिलें असून तो कामगारांना बाहेर वांटण्यांत आला होता. शेवटीं निदर्शन थांबवून घरोघर जा, असा ठराव बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीनें करून सैनिक-कामकऱ्यांना आवरण्याचा पुन्हा एकदां प्रयत्न केला. या वेळीं कामकऱ्यांनाहि 'सोव्हियटच्या हातीं राज्यसत्ता आणणें हें निवळ मिरवणुकींनीं उरकण्या-इतकें सोपें नाहीं' असा प्रत्यय आला होता. गांवांत मिरवणूकवाले सर्वत्र पसरले असून घरादारांतून व वळचणींतून, माडयांवरून आणि गच्च्यांवरून, इतर आडोशांतून त्यावर एकसारखा गोळीबार होत होता. कोझॅक घोडेस्वारांचे छापे एकसारखे येत होते. आघाडीवरून बोलाविलेलें सैन्य आल्याचीहि बातमी पसरली. तेव्हां कामकरी व सैनिक अपयश पदरांत घेऊन व बोल्शेव्हिकांचा सल्ला न ऐकल्याबद्दल मनांतल्या मनांत चुळबुळत घरोघर गेले. चोरट्या गोळीबारांत दोन्हीकडचीं मिळून २९ माणसें मेलीं व ११४ जखमी झालीं. मागून धरपकड पुष्कळ झाली. या चकमकींत उभयपक्षांना आपलें बलाबल कळून आलें. बोल्शेव्हिकांचीं मतें हींच खरीं, त्यांच्या सल्ल्यानें धीरानेंच पुढें पाऊल टाकलें पाहिजे हें कामकरी-सैनिकांना पटूं लागलें. उलट कामकरी-सैनिकांचा सोव्हियटच्या कार्यकारी मंडळास मुळींच पाठिंबा नाहीं हें पाहून सोव्हियट पुढारी भांडवलवाल्यांच्या अधिकाधिक पाशांत सांपडत गेले. या वेळीं खरोखरच कामकरी व सैनिक यांनीं सशस्त्र बंड उभारलें असतें तर त्यांना भांडवलवाल्या सरकारचा पाडाव करून दुसरी क्रांति घडवून आणतां आली असती; पण बोल्शेव्हिकांना तें इष्ट वाटलें नाहीं. ट्रॉट्स्की लिहितो—

" कांहीं झालें तरी, सशस्त्र बंडाचा मार्ग पत्करूं नये, असा बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं सल्ला दिला तेंच योग्य झालें. कारण सत्ता काबीज केली म्हणजे यत्न सफल झाले असें नव्हे. ती सत्ताहि टिकवून धरतां आली पाहिजे. पुढें ऑक्टोबरमध्यें योग्य वेळ आली असें पाहून बोल्शेव्हिकांनीं राज्यसत्ता जिंकून घेतली. पण खरे अवघड प्रसंग नंतरच ओढवले. कामगारांनीं राज्यसत्ता धारण केल्यावर शत्रूचे असंख्य हल्ले होतात त्यांना यशस्वितेनें तोंड देण्या-साठीं कामगारांचा दृढ निश्चय; चिकाटी व कमालीची जूट असावी लागते.

अशा दीर्घकालीन झगडयांत टिकाव धरण्याइतकें बल पेट्रोग्रॅड कामगारांत नव्हतें. राज्यसत्ता जिंकण्याची त्यांची तयारी होती खरी. पण मांडवलवाल्यांच्या आहारीं गेलेली जी सोव्हियट कार्यकारी कमिटी तिच्याच पदरीं पुन्हा ती राज्यसत्ता टाकण्याचा त्यांचा निश्चय होता. बोल्शेव्हिकांबद्दल बहुसंख्य कामगारांना विश्वास वाटूं लागला होता. पण फेब्रुवारीमधलें मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाबद्दलचें त्यांचें प्रेम नष्ट झालें नव्हतें. शब्दांनीं सांगून, जाहीर व मोठ्या प्रमाणावर असंतोषनिदर्शनें करून, फार तर थोडासा धाक दाखवून मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरींना बोल्शेव्हिकांचें धोरण पत्करण्यास भाग पाडूं अशी आशा कामगारांस वाटत होती.....अजून सैनिकांतहि पुष्कळ पलटणी तटस्थ राहून आपला पक्ष कोणता याची विवंचना करीत होत्या. .....खेडयापाड्यांतून बोल्शेव्हिकांना हवा इतका पाठिंबा मिळाला नव्हता.....वगैरे कारणांसाठीं सत्ता आजच जिंकून घेण्याचा प्रश्न बोल्शेव्हिकांनीं अशक्य कोटींत काढला."

लेनिनवर फितुरीचा आरोप

जुलैमधील या बखेडयानें बोल्शेव्हिकांचें वचन फारच वाढलें असें पाहून मांडवलवाल्यांनीं लेनिन, झिनोव्हिफ वगैरे पुढाऱ्यांची नाचक्की करण्यासाठीं ते जर्मनीचे गुप्त हेर व फितुर आहेत आणि रशियन कामकरी-सैनिकांना सरकारविरुद्ध फितवून जर्मनीपुढें रशियाचा मोड करावा अशी खटपट करीत आहेत असे आरोप वृत्तपत्रांतून उघडपणें करण्यास सुरुवात केली. त्यांना खोटया चहाडया सांगणारे अनेक चहाडखोर मिळाले. केरेन्स्कीनेंहि बोल्शेव्हिकांना हाणून पाडण्यासाठीं या आयत्या शस्त्राचा भरपूर उपयोग करून घेतला. सोव्हियट कार्यकारी मंडळाच्या मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी सभासदांना लेनिनवर असे आरोप घेणें इष्ट वाटलें नाहीं. तरी मांडवलवाल्यांची सत्ता टिकविणें त्यांना अवश्य असल्यानें केरेन्स्कीच्या धोरणास त्यांनीं प्रबळ विरोध असा कधींच केला नाहीं. शेतकरीसंघटना व सोव्हियट यांच्या कार्यकारी मंडळांच्या संयुक्त बैठकीपुढें ता. १७ जुलै रोजीं भाषण करतांना लेनिन व झिनोव्हिफ् यांजवरील फितुरीच्या आरोपासंबंधीं ट्रॉट्स्की सांगतो—

"वातावरण इतकें असह्य झालें आहे, कीं त्यांत तुम्हां आम्हां दोघांचाहि कोंडमारा होत आहे. लेनिन व झिनोव्हिफ यांजवर घाणेरडे आरोप केले जात आहेत. हे आरोप खरे वाटणारीं कांहीं माणसें या दिवाणखान्यांतहि आहेत. क्रांतिकारकांच्या जमावात चोरून शिरलेलीं कांहीं माणसें येथें आहेत. ही क्रांति घडवून आणण्यासाठीं लेनिन आज तीस वर्षें झगडतो आहे. माझींहि वीस वर्षें या कामीं खर्च झालीं आहेत. जर्मन लष्करशाहीबद्दल आम्हांला द्वेष वाटतो.....ज्यांना क्रांति म्हणजे काय हें माहीत नसेल अशींच माणसें आम्हांविरुद्ध संशय घेऊं शकतील.....निदान या दिवाणखान्यांत तरी असा संशय घेणारा कोणीं असूं नये. कारण तो क्रांतिकारक नसून हलकट मनुष्यच असला पाहिजे."

लेनिन व झिनोव्हिफ हातीं लागतांच त्यांना कांहीं तरी निमित्त करून ठार मारावें असाहि केरेन्स्कीचा बेत असल्याचा लेनिनला संशय आला. लेनिनवर पकडवारंटहि निघालें; यामुळें जुलैपासून पुढील चार महिने लेनिननें गुप्तपणानें काढले. ता. १३ जुलैच्या गोर्कीच्या वृत्तपत्रांत ट्रॉट्स्कीनें सरकारला उद्देशून एक अनावृत पत्र लिहिलें; त्यांत तो लिहितो—

"लेनिनवर सरकारी हुकुमाअन्वयें पकडवारंट काढण्यांत आलें आहे, त्यांतून मला वगळण्यास सरकारला तार्किक आधार कांहींच नाहीं. या प्रश्नाच्या राजकीय बाजूचा विचार करतां 'तात्पुरत्या सरकार'च्या राजकीय धोरणाचा मीहि लेनिनइतकाच कट्टा शत्रु आहें." त्याच दिवशीं रात्रीं ट्रॉट्स्की व लुनाचार्स्की यांची तुरुंगांत रवानगी झाली.

जुलैच्या आरंभीचा बखेडा झाल्यानंतर शेतीच्या धोरणांत सरकारनें प्रगति दाखवावी असा सोव्हियट प्रतिनिधींनीं सरकारमागें लकडा लावला. त्यावरून बडा जमिनदार मुख्यप्रधान प्रिन्स ल्वोव्ह यानें राजीनामा दिला. तेव्हां केरेन्स्की हा मुख्य प्रधान झाला व त्सेरीटेली हा गृहमंत्री झाला. बोल्शेव्हिकांना पकडण्याची जबाबदारी गृहमंत्र्यावर पडणार; ती आपण घेऊं नये असा सल्ला मार्टाव्ह यानें त्यास दिला होता. "या धर-पकडीची जबाबदारी घेण्यास माझी तयारी आहे" असें त्सेरीटेलीनें मार्टाव्हला उत्तर दिलें व बदललेलें प्रधानमंडळ अधिकारावर आलें त्याच दिवशीं त्सेरीटेलीनें ट्रॉट्स्कीला अटक करून मार्टाव्हपुढें मारलेली फुशारकी खरी करून दाखविली.

सेनापतींची परिषद

जून व जुलैमध्यें झालेली चढाई सर्व रणावर फसल्यानंतर केरेन्स्कीनें ता. १६ जुलै रोजीं एक सेनापतींची परिषद भरविली. या परिषदेंत केरेन्स्कीला सेनापतींच्या तोंडून सरकारची फक्त नाचक्की ऐकावी लागली. क्रांतीनंतर लगेच मृत्यूची शिक्षा रद्द केली होती ती ता.१२ जुलै रोजीं सेनापतींच्या आग्रहावरून पुन्हा सुरू करण्यांत आली. तरी सेनापतींचें समाधान झालेंच नाहीं. या परिषदेंत सेनापति क्लेम्बॉवस्की केरेन्स्कीला म्हणाला—

"मृत्यूची शिक्षा मंजूर झाली खरी, पण सगळी पलटणची पलटण का गोळ्या घालून मारणें शक्य आहे? लष्करी कोर्टाकडून हद्दपारीची शिक्षा द्यावयाची म्हटलें तर निमें सैन्य हद्दपार करून सैबेरियांत पाठवावें लागेल."

परिषदेस जमलेल्या सगळ्या सेनापतींनीं "क्रांतीमुळें सैन्याची शिस्त बिघडली, आधीं सैनिककमिट्या मोडा व कडक शिस्त अमलांत आणा" असा केरेन्स्कीला सल्ला दिला. "आम्ही कांहीं भांडवलवाले नव्हे, सेनापति हेहि एक प्रकारें मजूरच नव्हेत का?" अशी सेनापति रुझ्की व ब्रुसिलॉव्ह यांनीं केरेन्स्कीची थोडी खुषमस्करीहि केली. या परिषदेंत सेनापतींनीं दिलेल्या सल्ल्यानुसार कॉर्निलोव्ह या अधिकाऱ्याची सरसेनापति म्हणून नेमणूक झाली. त्यानें जवळ जवळ सैन्यासंबंधींच्या सर्वाधिकाराच्या शर्तीवर सरसेनापतिपद स्वीकारलें. सैन्यांत शिस्त निर्माण होऊन युद्धांत विजय व्हावा या हेतूनें केरेन्स्कीनें कॉर्निलोव्हला सरसेनापति नेमलें होतें व स्वतः हळूहळू प्रधानमंडळ गुंडाळून ठेवून कुलमुखत्यार व्हावें असा केरेन्स्कीचा विचार होता. पण स्वतः कॉर्निलोव्हची महत्त्वाकांक्षाहि हीच असून तो तशी कारस्थानेंहि करीत आहे अशी बातमी केरेन्स्कीला समजली व तेथपासून या दोघांत चुरस सुरू झाली.

मॉस्कोची सर्वपक्षीय परिषद

सैन्यांत बेदिली, रणावर पराभव, लोकमताचा असंतोष, सेनापतींची नाराजी, भांडवलवाल्यांचीं कारस्थानें या सर्व गोष्टींनीं जेजावल्यामुळें सर्वांशीं सर्वांनीं एकदां खुल्या दिलानें बोलणें करावें या उद्देशानें केरेन्स्कीनें जुलैच्या

शेवटच्या आठवड्यांत सर्व राजकीयपक्ष, भांडवलवाले, व्यापारी, सेनापति या सर्वांची एक राजकीय परिषद भरविली. पेट्रोग्रॅडमध्यें सरकारला विरोध फार मोठा असल्यामुळें परिषदेचें ठिकाण त्यानें मॉस्को हें ठरविलें. परिषदेंत बोल्शेव्हिकांचा फारसा शिरकाव होऊं नये अशी त्यानें व्यवस्था करून ठेविली. पण त्याच दिवशीं कॉर्निलोव्ह तेथेंच बंड करणार अशी आवई असल्यानें कांहीं सोशल रेव्होल्यूशनरी व कांहीं बोल्शेव्हिक पुढाऱ्यांची एक गुप्त कमिटीहि त्यानें कॉर्निलोव्हला सैनिक व मजूर यांकरवीं तोंड देण्यास तयार करून ठेविली होती. मॉस्को येथें सरकारला विरोध कमी म्हणून परिषद मॉस्कोला भरविण्यांत आली. पण येथेंहि बोल्शेव्हिकांनीं केरेन्स्कीचा पिच्छा पुरविला. कॉर्निलोव्हनें बंड उभारल्यास केरेन्कीचें व त्याच्या सरकारचें रक्षण करण्याचें त्यांनीं ठरविलेंच; पण राजकीय परिषदेचा व केरेन्स्कीच्या धोरणाचा निषेध करण्यासाठीं परिषदेच्या पहिल्या दिवशीं त्यांनीं मॉस्को-कामगारांचा सार्वत्रिक संपहि यशस्वीपणें घडवून आणला. परिषदेंत झालेलीं एकंदर भाषणें मासले-वाईकच झाली. बोल्शेव्हिक फार थोडे आले होते. पण सर्व सभासदांनीं एकमेकांवर हल्ले-प्रतिहल्ले इतके केले, कीं रशियन सरकार किडीनें पोखरलें आहे असा देखावा परिषदेंत स्पष्ट दिसला.

दुपारीं चार वाजतां परिषदेची वेळ होतांच केरेन्स्की दोन शरीररक्षकां-समवेत सभागृहांत दाखल झाला. नुकताच तो मुख्य प्रधान झाला असून सर्वाधिकारित्वाचे डोहाळेहि त्यास होत होते. आपल्या प्रास्ताविक भाषणांत केरेन्स्की म्हणाला, " मी सगळ्या रशियन राज्याचा प्रमुख आहें. मला कोणी निर्वाणीच्या धमक्या देईल तर त्याला कसें नमवावें हें मी जाणतों,....." यानंतर त्यानें सर्व राष्ट्रानें एकजूट होऊन युद्धांत सरकारला मदत करावी अशी विनंति केली. नंतर ताज्या दमाचा सरसेनापति कॉर्निलोव्ह यानें भाषण केलें. तो म्हणाला—

" शत्रु रिगाला येऊन धडकला आहे. आमच्या सैन्यांतील बेदिलीमुळें रिगाचें आखात आम्हीं गमावल्यास शत्रु पेट्रोग्रॅडच्या रस्त्यास लागला म्हणून समजा. क्रांतीनंतर जे जे कायदे झाले त्यांनीं सैन्य म्हणजे एक मेकड माणसांचा गळाठा होऊन बसलें आहे. ज्यांनीं कायदे केले त्यांना सैन्य आणि त्याची मनोभूमिका यांची कांहींच माहिती नाहीं."

जनरल कॅलेडिन बोलला, " आधीं सैनिकांच्या कमिट्या मोडा, सेनापतींची सत्ता त्यांची त्यांना परत द्या, आघाडीवर व पिछाडीवर एकच शिस्त कायम करा, सैनिकांच्या हक्कांचा पुनर्विचार करा (म्हणजे ते हक्क सर्व रद्द करा) " वगैरे. माजी युद्धमंत्री गुचकोव्ह यानें " सरकार सत्ताधारी नसून दुसऱ्या एका सत्ताधारी संस्थेची सावली आहे " असें म्हणून केरेन्स्कीनें सोव्हियट प्रतिनिधींना प्रधानमंडळांत येऊं दिल्याबद्दल त्याची निर्भर्त्सना केली. डयूमाचा माजी अध्यक्ष व 'तात्पुरत्या सरकार'चा माजी अध्यक्ष रॉड्झिअँको हा सरकारी बंदुकांना किडकीं लाकडें विकून गबर झाला होता. त्यानें 'तात्पुरत्या सरकार'नें डयूमाचें ऐकलें नाहीं म्हणून हल्लींची आपत्ति ओढवली असा सरकारला दोष दिला, व युद्धसाहित्य तयार करणाऱ्या कारखानदारांचें अभिनंदन केलें. " क्रांतीनंतर जनतेचा कोणावरहि विश्वास नसतां आम्हीं, सोव्हियटच्या कार्यकारी मंडळानें सोव्हियटकडून सर्व सत्ता 'तात्पुरत्या सरकार'च्या हवालीं केली. देशांत अराजकता माजूं नये म्हणून आम्हींच सरकारला उचलून धरलें नाहीं काय ? " असें त्सेरीटेलीनें काकुळतीनें विचारलें. मिल्युकोव्हनें सरकारची व सोव्हियट पुढाऱ्यांची तोंडभर निंदा करून घेतली. यानंतर त्सेरीटेलीनें पुनः भाषण करून आम्ही अनुभवी होतों यामुळें चुक्या केल्या अशी कबुली दिली. " सगळी क्रांति कांहीं काळ माझे हवालीं करा " अशी सेनापति अलेक्झीव्ह यानें मागणी घातली. लेफ्टनंट कुचीन या मेन्शेव्हिक अधिकाऱ्यानें अलेक्झीव्हविरुद्ध भाषण करून सैन्याधिकारी कुचकामाचे आहेत असें स्पष्ट मत दिलें.

क्रोपॉट्किन या वयोवृद्ध अराजकाचें भाषण सर्वांत विचित्र झालें. जगांत राज्यसंस्थाच नसावी असें त्याचें मत असून त्यानें तें अनेक ग्रंथांतून प्रतिपादिलें आहे व त्याचे ग्रंथ जगद्वंद्य झाले आहेत. भांडवलशाहीस याच्याइतकी लाखोली कोणीहि वाहिली नसेल. पण तो या वेळीं रशियांतील भांडवलवाल्या सरकारच्या पाठिंब्यास धावून आला. " लॉइड जॉर्जहि सोशॅलिस्ट विचाराचीं भाषणें करीत आहे " याबद्दल क्रोपॉट्किननें आपल्या भाषणांत त्याचें अभिनंदन केलें. " आतां जहाल, मवाळ एक होऊं व आपणां सर्वांची माता असें जें रशियन राष्ट्र त्याचें रक्षण करूं, त्यासाठीं प्राणहि वेंचूं, राष्ट्राचा युद्धांत पराभव होण्यानें त्याच्या मनःस्थितवर फार वाईट परिणाम होतो म्हणून

एकजूट होऊन पराभव टाळा" असें क्रोपॉट्किननें सभासदांस विचार सरप्लेखॅनोव्ह यानें भांडवलवाल्यांशीं आपणांस जुळतें घेतलें पाहिजे अर जर्मनीस 'लेनिनच्या दुष्कृत्यांची आठवण होऊन मनास वाईट वाटतें' असें या हातीं परिषदेंत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं व सरकारला पोंचावा विचारीत नाहीं हा केरेन्स्कीस प्रत्यय आलाच होता. तेव्हां 'एक्य' अशीहि एकमेकांस समजली व एकमेकांबद्दल आदर वाढला' असेंनः केरेन्स्कीकडे करून केरेन्स्कीनें परिषदेची बोळवण केली. ल मंत्र्यांचे प्राण

कॉर्निलोव्हचें बंड

कें भडकलें. त्यानें

ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत कॉर्निलोव्हनें व्हला अटक करून तयारी केली. पेट्रोग्रॅडमधील बोल्शेव्हिकांच्या वर्चस्वाख पलटणी त्यानें आधींच ठेवून दिल्या. प्रेटोग्रॅडमधील 'सैन दोन हजार सशस्त्र सैनिक देण्याचें कबूल केलें. पेटोग्रॅडमधील का परिषदेनंतर व पुढारी यांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठीं त्यानें एक गुप्त पोलिसखा काढलें. हें सरसेनापतीचेंच बंड व्हावयाचें असल्यामुळें रणांगणावरील हेड क्वार्टर्सचें सर्व युद्ध-यंत्र कॉर्निलोव्हनें अनिर्बंधपणें वापरलें. क्रिमोव्ह या सेनापतीची बंडवाल्या सैन्याचा अधिपति म्हणून कॉर्निलोव्हनें नेमणूक केली. क्रिमोव्हचें गुणवर्णन करतांना कॉर्निलोव्ह सांगतो, "माझी खात्री आहे कीं, जरूर पडल्यास सर्व सोव्हियटमधील कामकऱ्यांना व सैनिकांना फांशीं देण्यास तो मागें-पुढें पाहणार नाहीं." पेटोग्रॅडजवळ बंडवाल्यांचें सैन्य आलें, कीं पेटोग्रॅडमधल्या एका पलटणीनें स्मॉल्नी संस्थेवर* हल्ला करून बोल्शेव्हिक पुढाऱ्यांना पकडावें अशी योजना होती. वास्तविक या संस्थेंत बोल्शेव्हिक मधून मधून सभांपुरते येत असून सोव्हियटच्या कार्यकारी मंडळांतील पुढाऱ्यांचा तो अड्डा होता. अर्थात् या सर्व पुढाऱ्यांना पकडावें असाहि कॉर्निलोव्हचा हेतु होता हें उघडच होतें. बंडास अनुकूल अशा प्रकारें मतप्रसार कसा करावा याचीहि एक योजना ठरली होती. सैन्याधिकाऱ्यांनीं कारखान्यांतून व

*'स्मॉल्नी संस्था'ही एक झारच्या काळीं सरदारांच्या मुलींची शाळा होती. अलीकडे येथें सोव्हियट व बोल्शेव्हिक पक्ष यांच्या कचेऱ्या आल्या होत्या व बैठकी होत.

जनरल सेनापतींची शिस्त काय रद्द करा)

...ं काम करावयाचें होतें. पण कामकरी व सैनिक अधिकाऱ्यांचें न ...शेव्हिकांचेंच ऐकतात हें माहीत असल्यामुळें कर्नल डुटोव्ह यानें ...झाल्याचा बहाणा करून २८ ऑगस्टपासून २ सप्टेंबरपर्यंत बोल्शे- उभें करावें असा घाट घालण्यांत आला होता. कॉर्निलोव्हच्या ...ेव्रु २७ ऑगस्ट ही योजण्यांत आली. २७ फेब्रुवारी रोजीं क्रांति दुसऱ्या एका स ...सल्यानें २७ ऑगस्ट हा दिवस क्रांतीचा अर्ध सांवत्सरिक सोव्हियट प्रतिनि ...त्या दिवशीं कामकरी व सैनिक जुलैप्रमाणें कांहीं तरी बखेडा केली. डयूमाचा ...की व त्सेरीटेली वगैरे मेन्शेव्हिक घाबरून कॉर्निलोव्हच्या रॉड्झिअँको हा सरक ...होता. त्यामुळें बोल्शेव्हिक कामगार व सैनिक चिडून जाऊन आपत्ति ओढवली अ ...णीनें २८ तारखेस बोल्शेव्हिक बंड उभारणार व णाऱ्या कारखानदा ...ळ बोल्शेव्हिक, मेन्शेव्हिक पुढारी व स्वतः केरेन्स्की यांचा विश्वास नसतां कॉर्निलोव्ह लष्करशाही सुरू करणार अशी ही सर्व योजना ...ा. २६ रोजीं अगदीं पहिल्या 'तात्पुरत्या सरकार'चा एक मंत्री ल्वोव्ह (मुख्य प्रधान प्रिन्स ल्वोव्ह नव्हे) यानें मध्यस्थीची स्वयंसेवा पत्करली. केरेन्स्कीकडे घाबऱ्या घाबऱ्या येऊन त्यानें रणांगणांकडील हेड क्वार्टर्स व सर सेनापति बिथरले आहेत कांहीं तजवीज करा, अशी केरेन्स्कीस सूचना दिली. तेव्हां सैन्याधिकाऱ्यांस आपण प्रधान-मंडळांत घेण्यास तयार आहों असा ल्वोव्हबरोबर केरेन्स्कीनें निरोप पाठविला. सॅव्हिकोव्ह या कॉर्निलोव्हच्या दुय्यमाची नेमणूक केरेन्स्कीच्या शिफारशीनें व अधिकारानें झाली होती. तो आपला हस्तक आहे असें केरेन्स्कीस वाटत होतें. आपणाला याचा उपयोग होईल असें केरेन्स्की मनांत मांडे खात होता. पण सॅव्हिकोव्ह, हा केरेन्स्की व कॉर्निलोव्ह या दोघांनाहि बनवीत होता व दोघांनाहि कोलवून दोघांचीहि गादी पटकावण्याचा विचार करीत होता. आधलेच दिवशीं 'कॉर्निलोव्ह जर आपल्या रक्षणास कोझॅक पलटणी देईल तर क्रांति दडपून टाकण्याचा कॉर्नि-लोव्हचा कार्यक्रम आपण पार पाडूं' असा सॅव्हिकोव्हबरोबर केरेन्स्कीनें निरोप पाठविला होता. आज तर सैन्याधिकाऱ्यांना मंत्रि-मंडळांत घेण्याचीहि हा तयारी दाखवितो हें पाहून शिकार जाळ्यांत अडकली अशी कॉर्निलोव्हची खात्री झाली. 'बोल्शेव्हिक' कर्नल डुटोव्ह यांचें 'बोल्शेव्हिक' बंड २८ तारखेस व्हावयाचें असल्याची 'गुप्त' बातमी आपणांस समजली असल्याचा

बहाणा करून कॉर्निलोव्ह क्वोव्हला म्हणाला, "बोल्शेव्हिकांचा विचार सरकारला उलथून टाकून जर्मनीशीं तह करण्याचा व बाल्टिक आरमार जर्मनीस देऊन टाकण्याचा असल्यामुळें या वेळीं सर्व सत्ता सर सेनापतीच्या हातीं देऊन केरेन्स्कीनें बाजूला व्हावें हेंच बरें." आपल्या जिवाला धोका न पोंचावा म्हणून केरेन्स्कीनें कॉर्निलोव्हच्या संरक्षणाखालीं येऊन राहावें अशीहि सूचना कॉर्निलोव्हनें करून ठेविली. हा निरोप घेऊन क्वोव्ह पुनः केरेन्स्कीकडे धांवला व त्यानें कॉर्निलोव्हचा सल्ला ऐकून प्रधान-मंडळांतील मंत्र्यांचे प्राण वांचवा अशी मसलत केरेन्स्कीला दिली. केरेन्स्कीचें डोकें भडकलें. त्यानें कॉर्निलोव्हला टेलिफोनवर बोलावून खडसावलें व क्वोव्हला अटक करून तुरुंग दाखविला.

बंडाचा फुगा पिचला

पेट्रोग्रॅडमधील वातावरण या वेळीं अतिशय क्षुब्ध होतें. मॉस्को परिषदेनंतर कॉर्निलोव्हच्या माकिताप्रमाणें रिगा शत्रूच्या हातीं पडलें होतें. रशियन रणाची आघाडी मागें हटली असून पेट्रोग्रॅडवर जर्मनीचा हल्ला केव्हां होईल याचा नेम नव्हता. बोल्शेव्हिक बंडाची आवई असल्यामुळें धनिक वर्ग जंगम मिळकत खांकेंत मारतां येईल तेवढी मारून पळ काढीत होते. कामकरी व सैनिक हे जुलैच्या कटु अनुभवानें इतके शहाणे झाले होते, कीं बोल्शेव्हिक पुढाऱ्यांच्या सल्ल्यावांचून ता. २७ रोजीं क्रांतीच्या अर्धसांवत्सरिक उत्सवानिमित्त बोटहि उचलावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. आणि पुढाऱ्यांचाहि या वेळीं स्तब्धच राहावयाचें असा निश्चय होता. तरी पण बोल्शेव्हिझम्च्या नांवाखालीं कोणी अज्ञात व्यक्ति बंडाचा उठाव करण्याची खटपट करीत आहे असें बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीस ता. २६ रोजीं आढळून आलें. अशा वातावरणांत ता. २७ उजाडली. पुढाऱ्यांनीं ठरविल्याप्रमाणें कामकरी-सैनिक आपापल्या उद्योगांत गढून राजकारणाबद्दल बेफिकीर राहिले. यामुळें पेट्रोग्रॅडमध्यें सर्वत्र स्मशानशांतता होती. इकडे अगदीं सकाळीं रणांगणावरील हेड क्वार्टर्समध्यें असलेला सर सेनापति कॉर्निलोव्ह याला एक तांतडीची तार आली तींत 'आपले अधिकार हाताखालच्या प्रमुख अधिकाऱ्यास देऊन ताबडतोब माझ्या भेटीस या' असा केरेन्स्कीचा हुकूम होता. आधल्या रात्रीं (ता. २६)

सॅव्हिंकोव्हनें केरेन्स्कीची एकांतांत भेट घेऊन कॉर्निलोव्हची सर्व योजना त्यास सांगितली व त्याचा सहकारी म्हणून आपणास पकडावें अथवा बंडवाल्यांशीं आपला कांहीं संबंध नाहीं हें सिद्ध करण्याची आपणास संधि द्यावी अशी विनंति केली होती. केरेन्स्कीनें तावडतोब सॅव्हिंकोव्हला पेट्रोग्रॅडचा गव्हर्नर जनरल करून त्याला कॉर्निलोव्हविरुद्ध वापरण्याचें ठरविलें व उजाडतांच वर सांगितल्याप्रमाणें सर सेनापतीस तारेनें भेटीस बोलावलें. सॅव्हिंकोव्हनेंहि पाठोपाठ दुसरी तार करून केरेन्स्कीचा सल्ला ऐका, असें कॉर्निलोव्हला आपलें मत कळविलें. कॉर्निलोव्हला आपलें सर्व कारस्थान अवेळीं फुटलें अशी खात्री झाली. पण तो शिपाईगडी ! तो केरेन्स्कीचा दम ओळखून होता. त्यानें तावडतोब केरेन्स्कीचा हुकूम धाब्यावर बसाविण्याचें ठरवून एक जाहीरनामा काढला. कॉर्निलोव्ह जाहिरनाम्यांत लिहितो,

" जें करावयाचें तें उघड करण्याची वेळ आतां आली आहे. मी, जनरल कॉर्निलोव्ह, असें जाहीर करतों कीं, सोव्हियटमधील बोल्शेव्हिक बहुमताचे दडपणामुळें 'तात्पुरतें सरकार' जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या योजनेप्रमाणें वागत आहे आणि रिगाच्या किनाऱ्यावर जर्मन सैन्य उतरलें असतां आपल्या सैन्याची कत्तल करीत असून देशांत अंदाधुंदी माजवीत आहे. अशा वेळीं माझे अधिकार शत्रूच्या हवालीं करण्याऐवजीं मी रणांगणावर सन्मानानें देह ठेवीन."

हे उदात्त शब्द ज्या रशियन जनतेस फसविण्यासाठीं वापरण्यांत आले होते तिला या कपटनाटकाचा सुगावा आधींच लागला होता. पण लोकांची फसगत झालेली नाहीं हें कॉर्निलोव्हला इतक्या लवकर कळून आलें नाहीं. सगळ्या भांडवलवाल्यांचा त्यास पाठिंबा असल्यानें तो गुर्मीत होता. आपण कोणाची कत्तल करतों याची दरकार न बाळगणाऱ्या डोंगरी मुलखांतल्या रानटी मुसलमान सैन्याच्या तुकड्या त्यानें बंडासाठीं उभारल्या होत्या; त्यास त्यानें 'सॅव्हेज डिव्हिजन' हें नांव दिलें. आगाऊ ठरल्याप्रमाणें ता. २६ रोजीं प्रधानमंडळांतील कॅडेट मंत्र्यांनीं राजीनामे दिले. कॉर्निलोव्हला तोंड द्यावयाचें तर सर्वाधिकार आपल्या हातीं हवेत अशी केरेन्स्कीनें मागणी केली; तेव्हां कॅडेट मंत्र्यांना राजीनामे देण्यास ही चांगलीच सबब सांपडली. ता. २७ रोजीं केरेन्स्कीनें कॉर्निलोव्ह आपल्या बोलावण्याप्रमाणें येत नाहीं असें पाहून

"पेट्रोग्रॅडकडे निघालेलीं सैन्यें जेथून निघालीं तेथें परत न्यावींत" असा हुकूम हेडकार्टर्सला सोडला. "हा हुकूम मानूं नका, पेट्रोग्रॅडकडे कूच करा" असा हुकूम उलट कॉर्निलोव्हनें सोडला. याचा अर्थ कॉर्निलोव्हनें बंड पुकारलें असाच झाला व केरेन्स्कीनें तसें रीतसर जाहीरहि केलें.

रशियांतील हकीकतींचा आंतरराष्ट्रीय जगावर कोणता परिणाम होत होता हें येथें पाहण्यासारखें आहे. जुलैमध्यें कामगारांचा असंतोष भडकून सशस्त्र मिरवणुकीहि निघाल्या. केरेन्स्कीचें सरकार डळमळणार अशी भीति उत्पन्न झाली. त्यावरोबर फ्रान्सच्या सराफकट्ट्यावर रशियन सरकारच्या कर्जरोख्यांचे भाव भराभर उतरले. पण ऑगस्ट २७ला कॉर्निलोव्हचें बंड झालें असें जाहीर होतांच केरेन्स्कीचा पराभव होऊन लष्करशाही व म्हणून जबरदस्त राज्यसत्ता रशियांत निर्माण होणार या आशेनें कर्जरोख्यांना पुन्हा तेजी आली. असो.

मिल्युकोव्ह प्रथमपासून कॉर्निलोव्हच्या कटांत सामील होता. त्यानें कार्निलोव्हच्या आज्ञाभंगाचा फारसा बाऊ करूं नका व त्याची जागा जनरल अलेक्झीव्हला द्या असा केरेन्स्कीस सल्ला दिला. केरेन्स्कीनेंहि लगेच अलेक्झीव्हला सेनापतीचे अधिकार देण्याचें मान्य केलें. केरेन्स्कीला कोणाचाहि पाठिंबा नाहीं कॉर्निलोव्ह पेट्रोग्रॅडला आला, कीं राज्यपद पिकल्या फळाप्रमाणें त्याचे हातीं गळून पडेल अशी मांडवलवाल्यांची खात्री होती. पण पेट्रोग्रॅडचे वारे वेगळ्या दिशेनें वाहत होते.

केरेन्स्कीच्या हातीं राज्यसत्ता ठेवण्यास बोल्शेव्हिक कामगार व सैनिक प्रतिकूल होतेच; पण केरेन्स्कीच्या हातून कार्निलोव्हनें सत्ता हिसकून घ्यावी ही कल्पना एकजात सर्व कामकरी-सैनिकांस असह्य होती. कार्निलोव्हच्या बंडाची बातमी जाहीर होतांच 'प्रतिक्रांति-प्रतिकार-समिति' नांवाची एक समिति सोव्हियटनें ता. २७ ऑगस्टच्या सायंकाळीं स्थापन केली. बंडाचा प्रतिकार करण्याचें पुढारीपण साहजिकच बोल्शेव्हिकांकडे आलें. टॉट्स्की तुरुंगांत होता. लेनिन गुप्तसंचारी होता, पण इतर पुढारी जे बाहेर होते त्यांनीं कामकऱ्यांत व सैनिकांत कॉर्निलोव्हच्या बंडाविरुद्ध जागृति केली. आपापल्या विभागाचें रक्षण करण्यासाठीं कामगारांचे हातीं शस्त्रें देण्यांत आलीं.

खंदक खणणें, तटबंदी करणें, कांटेरी कुंपणें घालणें यासाठीं कामगारांनीं आपल्या तुकड्या कामास लावल्या. लाल स्वयंसेवकांनीं ४०००० सैन्य बंडवाल्यांस तोंड देण्यास उभें केलें. प्युटिलॉव्ह कारखान्यांत कामगारांनीं आपल्या तुकड्या लढण्यासाठीं तयार केल्या. बंडाची आवई उठल्यापासून त्यास तोंड देतां येईल अशा लढाईच्या सिद्धतेसाठीं कामगार सोळासोळा तास रोज खपत होते. हेल्सिंगफोर्स विभागांत सोव्हियटची एक काँग्रेस भरली. तिनें क्रांतिकारक समिति स्थापन केली व तिच्या सहीशिक्क्यांनीं सर्व कारभार यापुढें चालावा असें ठरलें. क्रॉन्स्डॅट बेटावरील खलाशी-वीरांना आमंत्रण देण्यांत आलें. जुलैमध्यें ज्या केरेन्स्कीच्या सरकारनें त्यांचेवर भयंकर दडपशाही केली ते आतां केरेन्स्कीच्या रक्षणार्थ धावून आले व केरेन्स्कीच्या खास रक्षणासाठीं क्रॉन्स्डॅट खलाशांची एक तुकडी ठेवण्यांत आली. क्रॉन्स्डॅट खलाशी या वेळीं फिरत फिरत तुरुंगाच्या बाजूला गेले असतां त्यांनीं ट्रॉट्स्कीची भेट घेतली आणि 'सरकारला या वेळीं अटक करावी काय?' असा सल्ला विचारला. "नको, इतक्यांत नको," ट्रॉट्स्की म्हणाला, "सध्यां कॉर्निलोव्हला मारण्यास केरेन्स्कीचा बंदुकीच्या आधारासारखा उपयोग करा. मागून केरेन्स्कीचा समाचार घेऊं" ट्रॉट्स्कीनें या एका वाक्यांत कॉर्निलोव्हच्या बंडाच्या वेळची बोल्शेव्हिकांची भूमिका स्पष्ट केली. क्रॉन्स्डॅट खलाशांनीं आपली बाजू मजबूत करण्यासाठीं, जुलैमध्यें जे अधिकारी नेमले होते ते हाकून लावले. वायबॉर्ग विभागांतील सैनिकांना मदतीस येण्यास ता. २९ रोजीं तारा गेल्या होत्या. पण सेनापति ओर्नोव्स्की यानें तारा दाबून ठेवल्या. ती बातमी बाहेर फुटतांच सेनापतीस ठार मारण्यांत आलें व दुसऱ्या कांहीं अधिकाऱ्यांकडून त्यांनीं आपण कॉर्निलोव्ह पक्षाचे नसल्याबद्दल जामीन लिहून घेतले. कॉर्निलोव्हच्याविरुद्ध कठोर उपाय योजण्यास केरेन्स्की अजूनहि कांकूं करीत होता. पण कामगार त्याची वाट पाहात नव्हते.

इकडे कॉर्निलोव्हचा सेनापति क्रिमोव्ह याचें सैन्य हळूहळू पेट्रोग्रॅडकडे येऊं लागलें तसतसा आगगाडीकामगारांचा विरोध वाढूं लागला. ल्यूगा स्टेशनवर आगगाडीकामगारांनीं एंजिनें नाहींत म्हणून सैनिकांच्या गाड्या चालविणार नाहीं असें सांगितलें. ल्यूगा छावणींतील २० हजार सैनिकांनीं बंडवाल्या कोझॅक पलटणीस घेरलें,—लढण्यासाठीं नव्हे तर त्यांस बंडापासून परावृत्त

करण्यासाठीं घेरलें. कॉर्निलोव्हला अधिकारावरून हाकून लावल्याची हस्त-पत्रकेंहि वाटण्यांत आलीं. गाड्या सोडा नाहीं तर गोळ्या घालीन असा क्रिमोव्हनें धाक घातला; पण कामगारांनीं रूळ उखडून व रस्ते पाडून टाकले होते. यामुळें क्रिमोव्हचा नाइलाज झाला. फितवणाऱ्यांच्या भीतीनें क्रिमोव्हनें सैन्य खेड्या-पाड्यांत नेलें. तेथेंहि फितविणाऱ्यांनीं पाठलाग केला. अशा फितवाफितवीनेंच बंड मोडावें असा मेन्शेव्हिकांचा विचार होता. पण या फितवणाऱ्यांच्या मागें सशस्त्र सैनिक उभे असतील तरच फितविण्यांत यश येईल असा आग्रह बोल्शेव्हिकांनीं धरला. त्यांचा कसलाहि हट्ट यशस्वी होण्याचीच ही वेळ होती. त्याप्रमाणें बोल्शेव्हिक कामगारांनीं आपल्या सशस्त्र तुकड्या तयार ठेवल्या. क्रिमोव्हच्या 'सॅव्हेज डिव्हिजन'ला फितविण्यास एक मुसलमान शिष्टमंडळहि पाठविण्यांत आलें. या शिष्टमंडळास पकडण्याचा क्रिमोव्हचा हुकूम 'सॅव्हेज डिव्हिजन'नें शिष्टाचारास्तव अमान्य केला. शिष्ट-मंडळाशीं झालेल्या बोलाचालींत 'जर्मनीस फितुर झालेल्यांचें बंड मोडण्यास आपण जात आहों' असा बंडवाल्या सैनिकांचा समज करून देण्यांत आला असल्याचें शिष्ट-मंडळास आढळून आलें. तावडतोब 'ही बातमी साफ खोटी आहे, आम्ही पेट्रोग्रॅड-हूनच आलों, कॉर्निलोव्हच बंडखोर आहे' असें शिष्ट-मंडळानें सांगितलें व त्यास आधार म्हणून वृत्तपत्रेंहि दाखविलीं. तेव्हां 'सॅव्हेज डिव्हिजन'च्या मोटारीवर त्यांतील सैनिकांनीं लाल निशाण उभारलें व लेफ्टनंट-कर्नेलनें विरोध करतांच त्यास अटक केली. पेट्रोग्रॅडमध्यें बंड उठलें आहे अशी हूल क्रिमोव्ह व कॉर्निलोव्ह यांनीं ता. २९ रोजीं पुन्हा उठविली; पण तिचा उपयोग झाला नाहीं. केरेन्स्कीनें क्रिमोव्हला 'इकडे सामसूम आहे एकवार मला येऊन भेटा' असा निरोप पाठविला. क्रिमोव्ह चिडला व थोडेसें कोझॅक सैन्य घेऊन त्वेषानें पेटोग्रॅडकडे चालला; पण ल्यूगापासून थोड्याच अंतरावर कामकऱ्यांचें सैन्य पाहून लढाई न करतांच माघारा आला. रेल्वे-कामगारांनीं आपलें कर्तव्य फारच चातुर्यानें तडीस नेलें. त्यांनीं क्रिमोव्ह आगगाडीचा हट्ट घेऊन बसला असें पाहून त्याच्या कांहीं तुकड्या भलतीकडेच नेऊन उतरविल्या व एकीकडे तोफखाना तर भलतीकडे सैन्य असे त्यांचे तीन-तेरा करून टाकले. तारमास्तरांनीं कॉर्निलोव्हच्या लिहून आलेल्या तारा खिशांत घातल्या.

कॉर्निलोव्हविरुद्ध हजारों पत्रकें छापून वाटण्यांत आलीं. भोंवतालचें जगच आपणाला खायला उठलें आहे असा अनुभव कॉर्निलोव्ह व क्रिमोव्ह या उभयतांस आला. अशा प्रकारें बंडाच्या नांवानें एकहि गोळी झाडली गेली नाहीं आणि मानभंग मात्र पदरांत पडला हें पाहून क्रिमोव्ह एकटाच केरेन्स्कीच्या भेटीस पेट्रोग्रॅडला आला. त्यांची मुलाखत झाली. तींत काय बोलणें झालें हें कोणासच कळलें नाहीं. क्रिमोव्हनें मागाहून पिस्तुलानें आत्महत्या केली. अशा प्रकारें कॉर्निलोव्हच्या या बंडाचा एक प्रकारें निःशस्त्र प्रतिकारानें शेवट झाला. कॉर्निलोव्हमागून अलेक्झीव्हची नेमणूक केरेन्स्कीनें सैन्याचा मुख्याधिकारी म्हणून केली व सरसेनापतिपद स्वतःकडे राखून ठेवलें. कॉर्निलोव्ह यास त्यानें पकडलें, पण शिक्षा केली नाहीं. हा कॉर्निलोव्ह पुढें बोल्शेव्हिक पक्षाचें राज्य झाल्यानंतर त्याविरुद्ध बंड करून लढाईत ठार झाला.

बोल्शेव्हिकांची सर्वत्र सरशी

कॉर्निलोव्हचें बंड फसल्यामुळें बोल्शेव्हिकांचें वर्चस्व एकदम वाढूं लागलें. ते जर्मनीस फितुर आहेत हा त्यांच्यावरील आरोप लोकांस खरा वाटेनासा होऊं लागला. ता. ४ सप्टेंबरला लोकमताच्या दडपणामुळें केरेन्स्कीनें ट्रॉट्स्कीची जामिनावर सुटका केली. ता. ९ सेप्टेंबर रोजीं पेट्रोग्रॅड सोव्हियटमध्यें ४१४ विरुद्ध ५१९ मतांनीं बोल्शेव्हिकांची सरशी झाली. तेव्हां त्सेरीटेली वगैरे सभासदांनीं पेट्रोग्रॅड सोव्हियटचे अधिकार बोल्शेव्हिकांचे हवालीं केले. 'आम्हीं ६ महिने क्रांति संभाळली. इतके दिवस तरी तुम्ही संभाळा' असें त्सेरीटेली ट्रॉट्स्कीप्रभृतींना टोंचून बोलला. पुढें दोन महिन्यांचे आंतच बोल्शेव्हिक सर्व सत्ता जिंकून घेणार आहेत हें त्या वेळीं कोणासच माहीत नव्हतें. ट्रॉट्स्कीस सोडलें त्याच दिवशीं 'कामगारांच्या लष्करी कमिटीनें बंड मोडण्यास फार चांगली मदत केली, पण आतां मात्र त्यांनीं सर्व संघटना विसर्जन करावी' असा जाहीरनामा अखिल रशियन सोव्हियटनें काढला. पण कामगारांनीं तो मुळींच मानला नाहीं. १४ सेप्टेंबरला केरेन्स्कीनें पुढील विचार करण्यासाठीं एक डेमोक्रॅटिक कॉन्फरन्स भरविली. तींत आपणास आतां कोणाचाहि पाठिंबा नाहीं असा केरेन्कीस प्रत्यय आला. तथापि या

परिषदेंत संयुक्त प्रधानमंडळ स्थापावें अशीच सूचना पास झाली. त्याचबरोबर कॉन्स्टिटयुअंट असेंब्ली बोलाविण्यापूर्वी तूर्तपुरतें एक सर्व पक्षांच्या ३५० प्रतिनिधींचें 'प्रीपार्लमेंट' स्थापण्याचेंहि ठरलें. २० सप्टेंबरला बोल्शेव्हिकांच्या मध्यवर्ती कमिटींत या प्रीपार्लमेंटावर बहिष्कार घालावा असा ठराव ट्रॉट्स्कीनें मांडला, तो नापास झाला. पण ट्रॉट्कीचें धोरणच बरोबर असल्याचें लेनिननें पुढें दोन दिवसांनीं आपल्या गुप्तनिवासस्थानांतून लेख पाठवून जाहीर केलें.

सेप्टेंबरअखेर केरेन्कीनें भांडवलवाले व सोव्हियट प्रतिनिधि या उभयतांचें नवें संयुक्त प्रधानमंडळ बनविलें व स्वतां तो मुख्य प्रधान व सरसेनापतिहि झाला. मार्चमध्यें 'तात्पुरतें प्रधानमंडळ' झालें तेव्हां तो न्यायमंत्री झाला. पुढें एप्रिलमधील कामगारांच्या असंतोषनिदर्शनानें मिल्युकोव्हची उचलबांगडी झाली व मंत्रिमंडळांत फेरफार झाले तेव्हां केरेन्की युद्धमंत्री झाला. जुलैच्या बखेड्यानंतर प्रिन्स ल्वोव्हनें राजीनामा दिल्यावर केरेन्की मुख्य प्रधान झाला. कॉर्निलोव्हच्या बंडाचा मोड झाल्यानंतर आतां तो मुख्यप्रधान व सरसेनापतिहि झाला. त्यास आतां स्वर्ग दोनच बोटें उरला होता; पण तो हातीं येण्याचें बाजूस राहून एक महिन्याचे आंतच त्याचा सत्तापदावरून कडेलोट व्हावयाचा होता.

प्रकरण १० वें

यशस्वी बोल्शेव्हिक क्रांति (१९१७, ऑक्टोबर)

शेतीच्या प्रदेशांतील अंदाधुंदी

पेट्रोग्रॅडमधील फेब्रुवारी क्रांतीची धग क्रमाक्रमानें दूरवर खेडोपाडीं पोंचून शेतकऱ्यांनीं जमिनदारांचा पाडाव करण्यास व जमिनीचे कबजे घेण्यास कशी सुरुवात केली हें मागें आठव्या प्रकरणांत सांगितलें आहे. अंतराळांतून गुरुत्वाकर्षणामुळें पृथ्वीकडे धावणाऱ्या धोंड्याचा वेग जसा वाढत जातो त्याप्रमाणें शेतकऱ्यांच्या बंडाचा वेग एकसारखा वाढत होता. सरहद्द प्रदेश सोडल्यास एकंदर ११०० कौंटीं(जिल्हां)पैकीं ९००कौंटींमध्यें बंडाची आग भडकली होती. पेट्रोग्रॅड वगैरे शहरांतून सैनिक व कामकरीवर्ग जुलैपर्यंत भांडवलशाही सत्तेशीं सौम्यपणें वागून तीस पाठिंबा देत होते. पण जुलैमधील रणांगणावरील पराभव व दडपशाहीची वाढ यामुळें सैनिक व कामकरी यांचा सरकारला प्रखर विरोध सुरू झाला व ऑक्टोबरअखेरीस त्यांनीं बोल्शेव्हिकांच्या नेतृत्वाखालीं भांडवलशाही उलथून पाडली. कामकरी व सैनिक यांप्रमाणें शेतकरीहि फेब्रुवारीपासून ऑक्टोबरपर्यंत कांहीं अंशीं अशा दोन अवस्थांतून गेले. फेब्रुवारीनंतर पहिल्यानें जेव्हां शेतकरी जमिनदाराच्या जमिनीस हात घालूं लागला तेव्हां तो शक्य तों सौम्यपणें बोलून व मोठ्या अदबीनें सरकारला व जमिनदारांना धमक्या देत होता. एप्रिलमध्यें टॉम्बोव्ह खेड्यांतून 'तात्पुरत्या सरकार'ला एक तार आली होती तींत पुढील मजकूर होता—

"जनतेस जें स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे त्याचें रक्षण व्हावें यासाठीं आम्ही शांतता ठेवूं इच्छितों. पण त्यासाठीं तुम्हीहि जमिनींच्या विक्रीस घटना-परिषदेपर्यंत प्रतिबंध केला पाहिजे. असें न होईल तर मात्र आम्ही रक्तपात करूं. दुसऱ्या कोणासहि आमच्या जमिनींत नांगर टाकूं देणार नाहीं."

पण सरकार जमीनविक्रीस प्रतिबंध करीत नाहीं अशी शेतकऱ्याची खात्री झाली तेव्हां मात्र त्यानें कायदा व हत्यार हातीं घेऊन यादवी सुरू केली. खेडोपाडीं असलेलें व्यवस्थापक सैन्य हेंहि शेतकऱ्यांचें असल्यामुळें तें गांवोगांव सरकारवर उलटलें. इचूजलवर्ग परगण्यांत जंगलें तोडून लांकडें विकून जमीनदार पैसा साठवूं लागले. तेव्हां शेतकऱ्यांनीं जागोजाग जमिनदारांना हत्यार दाखवून अथवा ठोकून काढून जंगलतोड थांबविली. शेतकरी म्हणत "घटनापरिषद होईपर्यंत जमिनदाराचें जंगल हिसकून घ्यायचें नाहीं तर नको. पण त्यानें जर झाडें तोडलीं तर घटनापरिषद कांहीं जादूनें झाडें जिवंत करणार नाहीं." परराष्ट्रमंत्री टेरेश्चेको याची सुपीक जमीन कुर्स्क परगण्यांत होती ती शेतकऱ्यांनीं मालकाच्या गुमास्त्यास धाब्यावर बांधून आपसांत वाटून घेतली. डयूमाचा अध्यक्ष रॉड्झिअँको याच्या गुमास्त्यास ग्रामकमिटीनें सगळें गवत शेतकऱ्यांना देऊन टाकण्याचा हुकूम केला. "ग्रामकमिटीचें न ऐकशील तर तुला पकडण्यांत येईल" अशी कमिटीच्या सहीशिक्क्यानिशीं त्यास नोटीसहि देण्यांत आली. सरकारच्या वरिष्ठांत वरिष्ठ अधिकाऱ्याचा हा बोज खेड्यापाड्यांतून होता ! सामान्य जमिनदाराची स्थिति किती भयंकर झाली असेल याची कल्पना यावरून सहज करतां येईल.

सरकारला व युद्धाला शेतकरी इतके वैतागले होते, कीं खेडयापाड्यांतून ठेवलेल्या ऑस्ट्रियन युद्धकैद्यांची ते भराभर सक्तीनें सुटका करूं लागले. कांहीं ग्रामसमित्यांवर मुक्त झालेले ऑस्ट्रियन युद्धकैदी हेच अध्यक्ष झाले होते. शेतकऱ्यांच्या गुन्ह्यांच्या तक्रारी वरिष्ठांकडे गेल्या म्हणजे त्यांना अटक करण्याचे हुकूम येत. "पण ज्या हुकुमावर सोव्हियट मिनिस्टरची सही नसे त्याची बजावणीच होत नसे." जुलैमध्यें कामगार व सैनिक यांना दडपून टाकल्यावर सरकारनें शेतकऱ्यांविरुद्धहि उग्र रूप धारण केलें. सशस्त्र "सैनिक शेतकऱ्यांवर घालण्यांत आले. फटके मारण्याचीहि प्रथा पुनः सुरू करण्यांत आली." तिचा कोठें कोठें सरकारला अनुकूल असा परिणाम झालाहि; तथापि भुकेची आग केवळ दडपशाहीनें शमणारी नव्हती. सेप्टेंबरपासून ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत बंडाचा कहर उसळला. या वेळीं शेतकऱ्यांचा निर्धार फार तीव्रपणें प्रतीत झाला. यादवीचें स्वरूप फार तीव्र झालें. शेतकरी जीं जंगलें जमिनदारांस तोडूं देत नसत तीं ते स्वतः लाकूड-

फाट्यासाठीं अथवा हट्टास पेटलेल्या जमिनदाराचें वाटोळें करण्यासाठीं तोडून, जाळून, राख करूं लागले. शहरांपेक्षांहि खेडयांतून धान्याचा तुटवडा पडूं लागला. पेरणीचें बींहि खाऊन फस्त झालें. या निराशेच्या स्थितींत जमिनदारांच्या इस्टेटींवर सशस्त्र हल्ले करावे, त्यांचीं गुरेंढोरें पळवावीं, नाहीं तर ठार मारावीं हा प्रघातच झाला. जमिनदाराचा सूड घेऊन त्याला देशोधडीस लावण्याच्या बुद्धीनें शेतकरी त्याचे वाडे, बगीचे आगीनें जाळून टाकीत. त्यांत कांहीं विवेकी व दूरदर्शीहि असत. ते म्हणत " अरे, हे वाडे जाळतां कां ? क्रांति झाली म्हणजे शाळा, दवाखाने यांना यांचा उपयोग होईलच." पण विवेकापेक्षां सूडबुद्धीवर ज्यांचा भर असे ते म्हणत " क्रांति नाहीं झाली तरी सुद्धां याला घरदार राहणार नाहीं असें आपण करूं." सावश्चेकोचा एक शेतकरी आपली आठवण सांगतो, " शेतकऱ्यांनीं जमिनदाराची सर्व इस्टेट ताब्यांत घेतली. त्याला हाकून लावलें. त्याच्या वाड्याचीं खिडक्या, दारें, पटई, माडया सर्व त्यांनीं फोडून, तोडून, जाळून टाकलें. सैनिक म्हणत तुम्ही जर लांडग्यांचीं घरटीं जाळणार तर लांडग्यांचे गळेहि तुम्ही दाबून टाकावे हें बरें ? या धमक्यांमुळें खुनाच्या भीतीनें जमिनदार पळून जात अथवा गुप्त राहात. यामुळेंच मोठ्या जमिनदारांचे फारसे खून झाले नाहींत." 'मुलेंबाळें सुद्धां लुटींत सामील असत.' कुलक नांवाचे जे सधन शेतकरी असत ते जमिनदार व शेतकरी यांच्या मधल्या दर्जाचे असत. त्यांना मालकीची पुष्कळ जमीन असल्यानें जमिनदारांशीं आपण समानधर्मी आहों असें त्यांना वाटे. पण सामान्य शेतकरी हे जमिनदारास कुलक मिळाल्यास त्याचा छळ करीत व पुन्हा त्यास शेतकऱ्यांकडे खेचून आणीत. सैन्याच्या बळावर शेतकऱ्यांना दडपणें दिवसानुदिवस अशक्य होऊं लागलें. कारण सैनिक सरसहा शेतकऱ्यांसच सामील होऊं लागले. पोडॉल्स्क प्रांताचा अधिकारी लिहितो, " सैन्याच्या लहानमोठ्या तुकडया सामाजिक व आर्थिक प्रश्न आपणास हवे तसे सोडवीत आहेत. जमिनींचे कबजे घ्या, जंगलें तोडा असें ते स्वतःच शेतकऱ्यांना सांगत आहेत व स्वतः लुटीच्या कार्यांत भाग घेत आहेत. शेतकऱ्यांचे हल्ले थांबविण्यासंबंधींचे हुकूम सैनिक पायांखालीं तुडवितात." ऑक्टोबरअखेर बोल्शेव्हिकांनीं सरंजामशाही व भांडवलशाही यांचें पेट्रोग्रॅडमधील मुख्य राज्ययंत्र मोडून पाडलें. पण तोंपर्यंत त्या यंत्राचे

मुख्य खिळे जे जमिनदार वर्ग ते शेतकऱ्यांनीं आधींच उपसून काढले होते. त्यामुळें स्पर्श करतांच पत्त्यांचा बंगला कोलमडावा त्याप्रमाणें बोल्शेव्हिकांनीं थोडा धक्का लावतांच पेट्रोग्रॅडमध्यें मांडवलशाही व सरंजामशाही यांचें राज्य-यंत्र कोसळून पडलें.

प्री-पार्लमेंटवर बोल्शेव्हिकांचा बहिष्कार

ता. ७ ऑक्टोबर रोजीं केरेन्स्कीनें पेट्रोग्रॅड येथें मरीन्स्की राजवाड्यांत प्री-पार्लमेंटचें अधिवेशन सुरू केलें. या प्रीपार्लमेंटमध्यें आपण शिरून त्याच्या कार्यक्रमांत भाग घ्यावा असा जरी बोल्शेव्हिक कमिटीनें पूर्वी ट्रॉट्स्कीच्या मतास न जुमानतां ठराव केला होता तरी पुढें लेनिनच्या संदेशावरून तो बदलण्यांत आला व प्री-पार्लमेंटवर बोल्शेव्हिकांनीं बहिष्कार घालावा असें ठरलें. ता. ७ रोजीं ट्रॉट्स्की व इतर कांहीं बोल्शेव्हिक पुढारी प्री-पार्लमेंटमध्यें हजर राहिले. ट्रॉट्स्की हा १९०३ सालीं बोल्शेव्हिक पक्ष निघाल्यापासून त्या पक्षांत कधींच नव्हता. पण १९१७ च्या एप्रिलपासूनचें लेनिनचें धोरण त्यास मान्य झाल्यामुळें मे महिन्यांत तो रशियांत आला. तेव्हांपासून त्यानें लेनिनशीं मनोभावानें सहकार्य केलें व जुलैमध्यें तो बोल्शेव्हिक पक्षाचा रीतसर सभासदहि झाला. जुलै ६ पासून ऑक्टोबर २५ पर्यंत लेनिन हा गुप्त-संचारी असल्यामुळें पुढारीपणाचा पुष्कळसा खटाटोप ट्रॉट्स्कीनेंच केला. पेट्रोग्रॅड सोव्हियटमध्यें बोल्शेव्हिकांचें बहुमत झाल्यावर ट्रॉट्स्कीच त्याचा अध्यक्ष झाला व पुढें स्थापन झालेल्या मिलिटरी रेव्होल्यूशनरी कमिटीचा अध्यक्षहि तोच होता. ऑक्टोबरअखेरचें बंड यशस्वी करण्यांत त्याचा प्रमुख भाग होता. यासाठीं ऑक्टोबरच्या क्रांतीच्या पुढाऱ्यांत लेनिनबरोबर ट्रॉट्स्कीचें नांव निरपवादपणें उच्चारलें जातें. अलीकडे ट्रॉट्स्कीच्या प्रति-पक्षीयांनीं त्याचें हें कर्तृत्व विस्मृतिगर्तेंत पुरून टाकण्याचा दुर्दम खटाटोप चालविला आहे. पण पृथ्वी आरपार खोदली तरी तींत हें कर्तृत्व बुझणार नाहीं इतकें तें उंचच उंच आहे. असो. प्रीपार्लमेंटमध्यें बोल्शेव्हिक पक्षातर्फे भाषण करून सरकारचें व बोल्शेव्हिक पक्षाचें कां बनत नाहीं हें ट्रॉट्स्कीनें सांगावयाचें व मग सर्व बोल्शेव्हिक सभासदांनीं सभागृहाचा त्याग करावयाचा

अशी योजना ठरली होती. ट्रॉट्स्की प्री-पार्लमेंटमधील आपल्या भाषणांत म्हणाला—

"सरकार पूर्वीइतकेंच आजहि बेजबाबदार आहे. धनिक वर्गाचे इतके पुष्कळ प्रतिनिधि येथें जमले आहेत, कीं त्यांना एवढ्या मताधिक्याचा मुळींच हक्क नाहीं. भांडवलवाल्यांना जर घटनापरिषद महिना दीड महिन्यांत बोलवाक्याची असेल तर सरकारच्या बेजबाबदारीचें इतकें त्वेषानें समर्थन करण्याचें सरकारच्या पुढाऱ्यांना मुळींच कारण नव्हतें. घटनापरिषद बुडवून टाकावी हाच खरोखर भांडवलवाल्यांचा हेतु दिसतो."

या वेळीं सभासदांत विरोधनिदर्शक गडबड झाली. पण मध्यें न थांबतां ट्रॉट्स्की आपलें भाषण पुढें वाचूं लागला,

"सरकारचें औद्योगिक, शेतकीविषयक, अन्नविषयक सर्व धोरण देशहित-विघातक आहे. लोकांना बंड करण्यास मुद्दाम प्रवृत्त करावयाचें तुम्हीं मनांत आणलें तरी याहून वाईट धोरण तुम्हीं ठेवण्याची जरूरी नाहीं इतकें हल्लींचें धोरण भयंकर आहे. पेट्रोग्रॅड जर्मनीच्या हवालीं करावयाचा तुमचा डाव आहे. प्रतिक्रांति घडवून आणण्याचा तुमचा जो कट आहे त्याच्या सांखळींतलाच हा एक दुवा आहे."

या वेळीं ट्रॉट्स्कीविरुद्ध आरडाओरड व शिव्यागाळ्यांचा अगदीं बीभत्स वर्षाव झाला. भाषणाच्या शेवटीं ट्रॉट्स्की म्हणाला,

"आम्ही बोल्शेव्हिक असें जाहीर करतों कीं, हल्लींचें देशद्रोही सरकार व प्रतिक्रांतीची उपेक्षा करणारें हें प्रीपार्लमेंट यांच्याशीं आम्हांला कांहींच समानधर्मत्व नाहीं. या प्रीपार्लमेंटचा त्याग करितांना आम्ही रशियाच्या शेतकरी कामकरी व सैनिक यांना असें जाहीर करतों, कीं त्यांनीं सावध राहावें व धैर्यानें पुढें पाऊल टाकावें. पेट्रोग्रॅडला धोका आहे, क्रांति संकटांत आली आहे, लोकांना धोका आहे.....सर्व सत्ता सोव्हियटच्या हातीं आली पाहिजे."

आपलें भाषण संपवून ट्रॉट्स्की व्यासपीठावरून खालीं उतरला व सर्व बोल्शेव्हिक एकदम सभागृह सोडून गेले.

अखिल रशियन सोव्हियट काँग्रेसची मागणी

सेप्टेंबर २१ रोजीं डेमोक्रॅटिक कॉन्फरन्स संपण्याचेपूर्वी सर्व ठिकाणच्या पेट्रोग्रॅड येथें जमलेल्या सोव्हियट प्रतिनिधींनीं अखिल रशियन सोव्हियट काँग्रेस लवकरच बोलावण्यांत यावी अशी सोव्हियट कार्यकारीमंडळाकडे मागणी केली. ही काँग्रेस भरली कीं त्यांत आपला पाडाव होईल व सोव्हियट-कडे राज्यसत्ता जाईल ही कार्यकारी मंडळास भीति होती. पण सोव्हियट काँग्रेस न बोलविली तर अखिल रशियन सोव्हियट्सचे अधिकृत पुढारी हा त्यांचा दर्जा राहणार नव्हता; म्हणून त्यांनीं हो ना करीत ऑक्टोबर २० तारखेस अखिल रशियन सोव्हियट काँग्रेस पेट्रोग्रॅडमध्यें भरविण्याची योजना मान्य केली. या योजनेचा प्रतिध्वनि सर्व देशभर उमटून सोव्हियट् काँग्रेस भरेल त्याच वेळीं त्याच काँग्रेसकडे राज्यसत्ता जावी असे ठराव सर्व देशभर होऊं लागले. काँग्रेस टळतहि नाहीं व ती भरल्यावर राज्यसत्ता तिच्या हातीं गेल्यावांचून राहत नाहीं असें उघड उघड दिसूं लागलें. तेव्हां 'तात्पुरत्या सरकार'चेच हातीं राज्यसत्ता टिकविण्यासाठीं खटपट करण्यास आणखी वेळ मिळावा म्हणून सोव्हियट कार्यकारीकमिटीनें सोव्हियट काँग्रेसच तारीख २० ऑक्टोबरवरून २५ ऑक्टोबरवर ढकलली; पण यामुळें उलट बोल्शेव्हिकांनाच तयारीला अधिक वेळ मिळाला व २० तारखेस कदाचित् ओढवलें नसतें तें 'तात्पुरत्या सरकार'चें मरण २५ तारखेस निश्चितपणें घडून आलें.

क्रांतिकारकसंरक्षणमंडळ

बोल्शेव्हिकांच्या सरकारविरोधी मतप्रसारास आळा घालून युद्धाकडे त्यांचें लक्ष वेधण्यासाठीं सरकारनें लोकांत देशभक्ति निर्माण करण्याची एक टूम काढली. पेट्रोग्रॅड शत्रूच्या हातीं जाणार अशी भीति वाटत असल्यानें ऑक्टोबर ९ रोजीं पेट्रोग्रॅड सोव्हियटमध्यें कांहीं मेन्शेव्हिक पुढाऱ्यांनीं 'कमिटी ऑफ् रेव्होल्यूशनरी डिफेन्स' म्हणजे 'क्रांतिसंरक्षकमंडळ' अशासारखें नांव धारण करून तें काम करणारी एक समिति स्थापावी असा ठराव मांडला. बोल्शेव्हिकांचें पेटोग्रॅड सोव्हियटमध्यें या वेळीं बहुमत होतें व त्यांना नको असती तर ही सूचना त्यांनीं सहज फेटाळली असती. पण पेटोग्रॅडच्या

संरक्षणासारखें महत्त्वाचें काम या समितीवर सोपविण्यांत येणार, यामुळें कामगारांना शस्त्रास्त्रसंनद्ध करण्याची संधि मिळणार व पेट्रोग्रॅड सोव्हियटमध्यें आपलें बहुमत असल्यानें समितीचीं सूत्रें आपल्याच हातीं राहणार या गोष्टी लक्षांत घेऊन बोल्शेव्हिकांनीं या समितीच्या योजनेस ताबडतोब संमति दिली. सोव्हियट काँग्रेस सत्तास्वीकाराचा ठराव करणार हें ठरल्यासारखें होतें. पण नुसत्या सोव्हियट काँग्रेसच्या ठरावानें भांडवलदार व सरंजामदार यांच्या लगामीं असलेलें 'तात्पुरतें सरकार' अधिकारन्यास करणार नाहीं ही गोष्ट बोल्शेव्हिकांना उघड दिसत होती. शिवाय राजधानीबाहेर पुष्कळ ठिकाणीं बोल्शेव्हिकांपेक्षां मेन्शेव्हिकांचें वर्चस्व अधिक होतें. यामुळें सोव्हियट काँग्रेस अथवा तींतील बरेच प्रतिनिधि सत्तास्वीकाराला विरोध करतील ही भीति बोल्शेव्हिकांना वाटत होती. यासुळें सोव्हियट काँग्रेस भरण्याचे आधींच बंड उभारून सक्तीनें राज्य काबीज करावें अशी बोल्शेव्हिकांची कल्पना होती; पण असें बंड घडवून आणण्यास आधींपासून सशस्त्र मजूर व सैनिक यांची एक जय्यत तयार असलेली संघटना उघडपणें काम करीत राहणें जरूर होतें. उघड काम म्हटलें कीं, तें कायदेशीर असणें जरूर; आणि बोल्शेव्हिकांना बंडासाठीं हत्यार म्हणून वापरतां येईल अशी संघटना सरकारनें स्थापूं देणें कल्पना करतां येण्यासारखें नव्हतें. पण पेट्रोग्रॅडचें, चढाई करून येणाऱ्या जर्मन सैन्यापासून, रक्षण करण्यासाठीं व अंतर्गत असंतोषाचें तोंड युद्धाकडे वळविण्यासाठीं सरकारनें क्रांतिकारकसंरक्षण समितीची टूम काढली व पेट्रोग्रॅड सोव्हियटमध्यें बोल्शेव्हिकांचें बहुमत असून कामकरी व सैनिक यांवर फक्त बोल्शेव्हिकांचाच बोज असल्यानें सदर कमिटीचें पुढारीपण बोल्शेव्हिकांकडेच आलें व ट्रॉट्स्की तिचा अध्यक्ष झाला. कमिटीची स्थापना झाल्यावर 'क्रांतिकारकसंरक्षणसमिति' हें तिचें नांव बदलून 'लष्करी क्रांतिकारकसमिति'. (मिलिटरी रेव्होल्यूशनरी कमिटी) असें तिला नवें नांव ठेवण्यांत आलें. पेट्रोग्रॅडमध्यें कामकरी व सैनिक हे सरकारला राज्य करणें अशक्य करून टाकीत आहेत म्हणून राजधानी बदलण्याचाच विचार मध्यंतरीं केरेन्स्कीनें केला होता. पण तेवढ्यानें ताबडतोबच बंडाचा उठाव होईल इतका असंतोष भडकल्यामुळें केरेन्स्कीनें तो विचार सोडून दिला. बोल्शेव्हिझमकडे विशेष कल असलेल्या बऱ्याचशा पलटणी रणांगणावर

पाठवून बोल्शेव्हिकांचें कंबरडें मोडावें अशी एक योजना केरेन्स्कीनें करून ठेविली होती. रणांगणावरील सेनापतींचाच त्यास विरोध होता. आधींच बेदिल असलेल्या सैन्यांत बोल्शेव्हिक सैन्याच्या आगीची भर सेनापतींना नको होती. पण केरेन्स्की बोल्शेव्हिक सैन्यास कांहींहि निमित्त करून केव्हां पेट्रोग्रॅडमधून काढून लावील याचा नेम नाहीं हें बोल्शेव्हिकांना कळून चुकलें होतें व अशी फसगत होण्यापूर्वीच बंडाचें निशाण उभारावें हें ओघानेंच येत होतें. त्यासाठीं ज्या उघड व कायदेशीर संघटनेची जरूर होती ती आतां बोल्शेव्हिकांना ता. ९ ऑक्टोबर रोजीं मिळाली. लगेच दुसरेच दिवशीं म्हणजे ता. १० रोजीं बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीनें एक गुप्त सभा भरवून बोल्शेव्हिकांनीं लेनिननें पाठविलेला 'शक्य तों लवकर बंड उभारावें' हा ठराव मंजूर करून घेतला, आणि संरक्षक कमिटीचा त्या कामीं उपयोग करावा असें ठरविलें. बोल्शेव्हिक पक्षाचें कामकऱ्यांवर किती वजन होतें याची साक्ष ट्रॉट्स्की सांगतो,—

" कामगारांचें एक शिष्ट-मंडळ एक दिवस मजकडे आलें व शस्त्रास्त्रें मागूं लागलें. मीं म्हटलें, 'हें पहा बुवा, शस्त्रास्त्रांचे कारखाने कांहीं आपले हातीं नाहींत; मग शस्त्रास्त्रें आम्ही कोठचीं देणार?' शिष्ट-मंडळानें सुचविलें 'सेस्ट्रोरेस्ट्क या शस्त्रास्त्रकारखान्यांत खूप शस्त्रें आहेत तीं आम्ही पाहून आलों आहों.' 'मग तुमचें म्हणणें काय?' मीं विचारलें. तेव्हां शिष्ट-मंडळानें उत्तर केलें 'सोव्हियटचा हुकूम होईल तर त्या कारखान्यांतले कामगार व सैनिक शस्त्रें आमच्या हवालीं करण्यास तयार आहेत.' मीं म्हटलें, 'एवढेंच ना? हा घ्या हुकूम' असें म्हणून मीं (पेट्रोग्रॅड सोव्हियटचा अध्यक्ष या नात्यानें) पांच हजार बंदुकी आमच्या हवालीं करा असा हुकूम खरडून शिष्ट-मंडळास दिला. त्याच दिवशीं त्यांनीं खरोखरच पांच हजार बंदुका त्या कारखान्यांतून आणल्या; क्रांतिकारक समिति स्थापल्यानंतरचा हा अगदीं पहिलाच प्रयोग होता."

ट्रॉट्स्कीसारख्या राजद्रोही गुन्हेगाराच्या शब्दास इतकें महत्त्व आलें याबद्दल वृत्तपत्रांतून खूप ओरड झाली. अखिल रशियन सोव्हियटच्या कार्यकारी मंडळानें पेट्रोग्रॅड सोव्हियटच्या हुकुमानें शस्त्रें वाटूं नयेत अशी समजहि कारखानदारांस देऊन पाहिली. पण पेट्रोग्रॅड सोव्हियटचाच हुकूम

ऐकायचा असें कामकऱ्यांनीं व सैनिकांनीं ठरविलें होतें. त्यास कोणाचाहि इलाज चालण्यासारखी परिस्थिति उरली नव्हती. क्रांतिकारक लष्करी कमिटी हातीं येतांच बोल्शेव्हिकांनीं तिच्यातर्फे एक पत्रक काढून सर्व पलटणींवर बोल्शेव्हिक अधिकारी—कॉमिसर नेमले. अर्थात् बंडाचे वेळीं सैनिकांनीं आपले अधिकारी विरुद्ध गेल्यास त्यांचे हुकूम न ऐकतां या कॉमिसरांचेच ऐकावे अशीहि स्पष्ट इशारत देण्यांत आली होती. लष्करी संरक्षक समितीबरोबरच 'गॅरिसन कॉन्फरन्स म्हणजे पलटणींची एक कायम संघटनाहि स्थापण्यांत आली व तिनें ता.२३ऑक्टोबर रोजीं 'अधिकाऱ्यांच्या ज्या हुकुमांवर सोव्हियट कॉमिसरच्या सह्या असतील तेच हुकूम मान्य करावे' असा उघड ठरावच पास केला.

ट्राट्स्कीचें पुढारीपण

ट्रॉट्स्की हा नामांकित वक्ता, हुषार, विद्वान मार्क्सिस्ट, समयसूचक, धडाडीचा, अविश्रांत परिश्रम करणारा व क्रांतिकारक पुढाऱ्याचे गुण अंगीं उपजतच असलेला पुढारी होता. मे महिन्यांत त्यानें रशियांत पाऊल टाकल्यापासून आपल्या गुणांनीं लेनिनच्या खालोखाल तो श्रेष्ठ पुढारी झाला. जुलैमध्यें लेनिन गुप्त झाला व ट्राट्स्की तुरुंगांत गेला. तो सप्टेंबरांत सुटून आल्यावर बोल्शेव्हिक पक्षाची मुख्य धुरा त्याच्याच मानेवर बसली. त्यानेंहि त्या श्रेष्ठ व अवघड पदास साजेशा धडाडीनें व चातुर्यानें काम केलें. या वेळच्या ट्रॉट्स्कीच्या हालचालींचें वर्णन करतांना सुखॅनोव्ह लिहितो,—

"क्रांतिकारकांच्या मध्यवर्ती कचेरींतलें काम झपाझप संपवून तो ऑबुकोव्स्की कारखान्यांत भरारी मारी व तेथें कामगारांना भेटून ट्रुबोचेनी कारखान्याकडे दौडत असे. घडींत प्युटिलॉव्ह कारखान्यांत तर दुसऱ्या घडीस बाल्टिक आरमाराच्या गोचांत, क्षणांत स्वारांच्या शाळेंत तर दुसऱ्या क्षणीं सैनिकांच्या चाळींत असा तो वाऱ्यासारखा जणूं कांहीं एकदम सगळ्या जागीं सापडत असे. पेट्रोग्रॅडमधील प्रत्येक सैनिक व कामकरी त्याला ओळखीत असून त्याच्याशीं व्यक्तिशः संभाषण करीतं. जनतेंत व सैनिकांत त्याचें वजन केवळ प्रचंड होतें. त्या दिवसांत तोच सगळ्यांच्या डोळ्यांत भरणारी व्यक्ति होता. जगाच्या इतिहासांतील या भव्य पृष्ठावरचा तोच मुख्य वीर पुरुष होता." ॲन्टॉनोव्ह ट्रॉट्स्कीचें वर्णन करतांना लिहितो—

" त्या वेळीं सर्व हुकमत ट्रॉट्स्कीच चालवीत होता. तो आम्हांला जो सल्ला देई तो त्याच्या उपजत क्रांतिकारक बुद्धींतून निपजे."

पीटर ॲन्ड पॉल किल्ल्यांत लष्करी ठाणें होतें व तेथले बहुतेक सैनिक बोल्शेव्हिकांचे बाजूस होते. पण कांहीं तुकड्या व अधिकारी बोल्शेव्हिकांस तितकेसे अनुकूल नव्हते. आपणांस अनुकूल अशी एकादी सैन्याची तुकडी बाहेरून किल्ल्यांत न्यावी व प्रतिकूल तुकडी निःशस्त्र करावी अशी ॲन्टोनोव्हनें सूचना केली. ट्रॉट्स्की म्हणाला,

" तसें नको. किल्ला बाहेरच्या साह्यानें जिंकण्यापेक्षां आंतल्या साह्यानेंच जिंकूं. तेथले सैनिक कांहीं आपणांस सहानुभूति दाखविणार नाहींत असें नाहीं."

हा प्रयोग पहायचा कसा ही पंचाईत होती. आंत प्रतिकूल सैन्य असलेल्या किल्ल्यांत जाऊन प्रयोग करून पाहण्यांत धोका होता. पण सैनिकांवर सक्ति करण्यापेक्षां त्यांचें अंतःकरण जिंकतां आल्यास प्रयत्न करून पाहणें हेंच ट्रॉट्स्कीस इष्टतर वाटलें व आपलें व्यक्तित्व इरेस घालून धोका पत्करण्याचें त्यानें ठरविलें. किल्ल्यांतील सैनिकांच्या एका सभेस ट्रॉट्स्की व लॅसेव्हिच दोघेचे दोघेच गेले. या वेळीं किल्ल्यांत घडलेल्या हकीकतींची ट्रॉट्स्कीनेंच खालीलप्रमाणें नोंद करून ठेविली आहे—

" २३ ऑक्टोबर रोजीं दुपारीं दोनच्या सुमारास मी किल्ल्यांत गेलों. तेथें एक सभा चालली होती. सरकारपक्षीय वक्ते फार सावधगिरीनें वागत होते.....आमचींहि भाषणें झालीं. सैनिकांनीं तीं भाषणें ऐकलीं व आमच्या हुकमतीस संमति देण्याचें कबूल केलें. स्मोल्नी वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावर मीं टेलिफोननें कळविलें. 'पीटर ॲन्ड पॉल किल्ल्यांतील पलटणींनीं प्रतिज्ञापूर्वक वचन दिलें आहे, कीं यापुढें लष्करी क्रांतिकारक समितीच्याच आज्ञा आपण पाळूं.' या संदेशानें तेथील सर्व मंडळींच्या जिवांत जीव आला."

लेनिन : पुढाऱ्यांचा पुढारी

बोल्शेव्हिक पक्षाच्या जाहीर पुढारीपणाचें काम याप्रमाणें ट्रॉट्स्की करीत होता तथापि पक्षाचा मेंदू मुख्यतः लेनिन हाच होता व तो आपल्या गुप्त निवासस्थानांतून पक्षाचा चळवळीचें संचालन करीत असे. बोल्शेव्हिक

पक्षाच्या जन्मापासून ट्रॉट्स्कीचा पक्षाशीं मतभेद असल्यानें १९१७च्या ऐन क्रांतीच्या वेळीं पक्षांतील सभासदांस ट्रॉट्स्कीच्या पुढारीपणाबद्दल विश्वास वाटणें अवघड होतें. ट्रॉट्स्कीच्या तापट, तडफदार व कांहींशा तुटस आणि चढेल वृत्तीमुळें तो सहकाऱ्यांस पुष्कळदां असह्यच होई. उलट लेनिन स्वभावतः शांत, सहकाऱ्यांना आपली भूमिका शिक्षकांप्रमाणें धीरानें व सयुक्तिकतेनें पटवून देण्याची शिकस्त करणारा, प्रत्येक व्यक्तीची किंमत ओळखून गरजूपणानें तिचा उपयोग करणारा, दूरदृष्टीचा असा असल्यानें त्यानें आपल्या गुप्त निवासस्थानापासून हीं सर्व सूत्रें हालवून पक्षाची संघटना चांगली संभाळली व ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं कार्यक्षमता टिकवून धरली. ऐन बोल्शेव्हिक बंडाचे वेळीं झिनोव्हिफ व कॅमेनेव्ह यांचे लेनिनशीं तीव्र मतभेद झाले व त्या दोघांनीं पक्षाची शिस्त मोडेल असें वर्तन करूनहि आपलीं मतें जाहीर केलीं. पण केवळ लेनिनच्या श्रेष्ठ व्यक्तित्वामुळें पक्षाची घडी न विस्कटतां बंड यशस्वी झालें व कॅमेनेव्ह व झिनोव्हिफ यांनीं पुन्हा पक्षनिष्ठ होऊन पुढील काळांत चांगली कामगिरी बजावली. सामान्य जनावर ट्रॉट्स्कीची छाप तेव्हांच पडे. पण पुढाऱ्यांचे ठिकाणीं विश्वास उत्पन्न करून त्यांची संघटना कार्यक्षम व अचूक मार्गावर ठेवण्यासाठीं–पुढाऱ्यांचा पुढारी होण्यासाठीं लागणारे विशेष गुण ट्रॉट्स्कीमध्यें मुळींच नव्हते व लेनिनमध्यें सर्व परिपूर्णतेनें होते. आणि केवळ त्याच्यामुळेंच १९०३ पासून १९२३ एवढ्या दीर्घ कालांत पक्षाची संघटना टिकून राहिली व यशस्वी झाली. असो.

लेनिननें बंडास आवाहन दिलें

एप्रिलमध्यें लेनिन स्वित्सर्लंडांतून पेट्रोग्रॅडमध्यें आला त्या वेळीं सोव्हियटनें क्रांति घडवून आणली तरी सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करावी यास लोकमत अनुकूल नसल्यानें लोकमत सतत प्रयत्नानें बदलत राहणें हेंच सोव्हियटनें पुढें राज्यसत्ता धारण करण्याचें प्रमुख साधन आहे असें ठरविलें. मिल्युकोव्हच्या साम्राज्यशाही धोरणाविरुद्ध लोकमत व्यक्त करण्यासाठीं कामगारांनीं व सैनिकांनीं ज्या मिरवणुकी काढल्या व सरकार पक्षीयांशीं ज्या सशस्त्र मारामाऱ्या केल्या, त्या वेळीं कामगारांनीं केलेल्या अत्याचाराचा त्यानें निषेध केला. "तोफा आणि बंदुका कामगारांचेच हातीं आहेत. भांडवलवाले

राज्य करितात तें कपटानें लोकांना फसवून करतात." येथें अत्याचाराची जरूर काय? असें उद्गार लेनिननें त्या वेळीं काढले होते. यावरून सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करण्यास सशस्त्र बंडाची गरज पडणार नाहीं असें त्याचें अस्पष्ट मत असावें असें दिसतें. पण जुलैमध्यें कामगार-सैनिकांच्या भिरवणुकीवर सरकार पक्षानें जो भयंकर हल्ला केला त्यामुळें केवळ लोकमत बदलल्यानें कामगार-सैनिकांना राज्यसत्ता हातीं घेतां येणार नाहीं, त्यासाठीं सशस्त्र बंड योग्य वेळीं उभारावेंच लागेल अशी लेनिनची बालंबाल खात्री झाली. इतकेंच नव्हे तर सोव्हियटमध्येंहि लोकमताचे खरे प्रतिनिधि नसून भांडवलवाल्यांच्या पाठीराख्यांचाच भरणा असल्यानें 'सोव्हियटनें राज्यसत्ता धारण करावी' ही घोषणाहि चूक ठरेल असा संशय जुलै ते सप्टेंबरच्या अवधींत येत होता. पुढें पेट्रोग्रॅड सोव्हियटमध्यें बोल्शेव्हिकांना बहुमत मिळालें तेव्हां बंडाचीं सूत्रें अखिल रशियन सोव्हियटचे हातीं न देतां पेट्रोग्रॅड सोव्हियटचे हातीं त्यानें दिलीं व अखिल रशियन सोव्हियट काँग्रेस भरण्याचे आधींच बंड करून राज्यसत्ता जिंकून घ्यावी असा त्यानें पेट्रोग्रॅड सोव्हियटचे मागें लकडा लावला. त्याचें कारण अखिल रशियन सोव्हियटबद्दल त्यास वाटणारा अविश्वास व केवळ लोकमत अनुकूल होण्यानें क्रांति होईल याबद्दलहि वाटणारा अविश्वास हेंच होय. जुलैच्या खडतर अनुभवानंतर लेनिन लिहितो—

"यापुढें सशस्त्र बंड केल्यावांचून राज्यसत्ता जिंकणें शक्य नाहीं. तडजोडवाल्या ('कॉम्प्रोमाइजर्स'= मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी) पुढाऱ्यांनीं सोव्हियट्संघटनेचा नैतिक अधःपात करून टाकला आहे. यामुळें आपणास यापुढें सोव्हियटवर न विसंबतां कारखाना-कमिट्यांवर विसंबणें भाग आहे. बंड यशस्वी होऊन राज्यसत्ता आपल्या स्वाधीन झाली म्हणजे आपणांस सोव्हियटसंघटनेचा सत्ता धारण करण्याचें साधन म्हणून उपयोग होईल अशा प्रकारें त्या संघटनेची पुनर्घटना करावी लागेल."

पुढें पेट्रोग्रॅड व मॉस्को येथील सोव्हियटमध्यें बोल्शेव्हिकांना बहुमत मिळाल्यापासून बंड करण्याची वेळ येऊन ठेपली अशी लेनिनची खात्री झाली. "आपली संधि आली. आतां घाई होण्याचें भय उरलें नाहीं," असें तो सेप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीला लिहूं

लागला. मध्यवर्ती कमिटीस पाठविलेल्या खाजगी पत्रांत व वृत्तपत्रांत प्रसिद्धी-साठीं पाठविलेल्या लेखांत तो बंड करण्याची निकड पटविण्यासाठीं आंतर-राष्ट्रीय परिस्थितीवर विशेष भर देत होता. युरोपांत महायुद्ध चालू असून तिकडील कामगारांत जागृति व असंतोष वाढूं लागला होता, त्याकडे बोट दाखवून "विदेशी साम्राज्यवाद्यांपासून या वेळीं रशियन क्रांतीस भय नाहीं" असें तो मध्यवर्ती कमिटीस आश्वासन देत होता. इटालींत सोशॅलिस्टांची त्या वेळीं झालेली धरपकड, जर्मन आरमारांत झालेलें बंड, या गोष्टींनीं आंतर-राष्ट्रीय परिस्थिति फार झपाट्यानें बदलत असल्याचें त्यास दिसत असून "जाग-तिक कामगारक्रांतीच्या वाटेवर आपण उभे आहोंत" असें लेनिन या वेळीं लिहितो. निरनिराळ्या ठिकाणीं सोव्हियटच्या, स्थानिक डयूमाच्या, शेतकरी-कमिट्यांच्या ज्या निवडणुकी होत त्यांत बोल्शेव्हिकांचें बहुमत होत आहे हे निवडणुकीच्या निकालांचे आंकडे पाहून त्यास आढळून आलें. यामुळें कामगार-क्रांतीच्या यशाची अनुकूलता एकसारखी वाढत आहे हें त्यास उघडच दिसलें. पण अशा प्रातिनिधिक मतप्रदर्शनापेक्षां प्रत्यक्ष प्रतिकार हाच आपणास अखेर यश देईल अशी त्याची खात्री झालेली होती.

"क्रांतिकारक कामगारांचें वजन" लेनिन म्हणतो, "जनतेवर पडून तीं प्रत्यक्ष झगड्यांत सामील होण्याचे दृष्टीनें पार्लमेंटांतील झगड्यांपेक्षां प्रत्यक्ष प्रतिकाराचा मार्ग अधिक उपयुक्त आहे. भांडवलवाल्यांविरुद्ध व सरंजाम-दाराविरुद्ध बंड करून देशांत यादवी माजवावयाची म्हटलें तर त्याची तयारी पार्लमेंटरी झगड्यापेक्षां प्रत्यक्ष प्रतिकारानें अधिक चांगली होऊं शकेल ही महत्त्वाची गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे."

क्रांतीचें पुढारीपण मुख्यतः कामकरी व सैनिक यांनाच घ्यावें लागेल असें त्याचें सनातन मत होतें; तथापि क्रांति यशस्वी होण्यासाठीं शेतकऱ्याचा, जमिनदार व सरंजामदार यांविरुद्ध असणारा असंतोष विकोपास गेला असला पाहिजे हें त्यास पूर्णपणें पटलें होतें. सप्टेंबरच्या अखेरीस शेतकऱ्यांचा असंतोष विकोपास जाऊन त्यास भयंकर यादवीचें स्वरूप आलें. तेव्हां मात्र आतां बंडाची वेळ आली असें त्याला वाटूं लागलें. या वेळीं लेनिन लिहितो—

"शेतकऱ्यांनीं बंड उभारलें आहे ही वस्तुस्थिति ढळढळीत दिसत असतां सर्व रशियाभर परिस्थिति विकोपास गेली नाहीं असें दर्शविणारीं इतर कितीहि

लक्षणें असलीं तरी त्यांना कांहींहि किंमत नाहीं. शेतीच्या क्षेत्रांतील असंतोष हा क्रांतीचा पाया होय. या वेळीं सरकारला शेतकऱ्यांचा असंतोष जर यशस्वितेनें दडपून टाकतां आला तर क्रांति ठार झाली असेंच समजावें. बंड करण्यास याहून अधिक अनुकूल कालाची वाट पाहत बसण्याची आतां सोय उरली नाहीं. शस्त्रधारणाची वेळ अगदीं हातार्शी आहे. देशांतील संकटाची परिस्थिति परिपक्व झाली आहे. सोशॅलिझमच्या निर्मितीसाठीं कराव्या लागणाऱ्या कामगारक्रांतीचें सर्व भवितव्य येथें इरेस पडलें आहे."

बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ती कमिटींत बंडास प्रतिकूल वातावरण असून झिनोव्हिफ व कॅमेनेव्ह हे तर बंडाचे कट्टे विरोधक होते, म्हणून या वेळीं लेनिननें कमिटीवर पत्रांचा व वृत्तपत्रांत लेखांचा नुसता वर्षाव चालविला होता. अखिल रशियन सोव्हियट कॉंग्रेसचा निर्णय होईपर्यंत थांबणें हा मूर्खपणा आहे,

" आधीं केरेन्स्कीला जिंका मगच कॉंग्रेस बोलवा. .....सोव्हियट कॉंग्रेस-पर्यंत वाट पाहण्याचा बोल्शेव्हिकांना मुळींच हक्क नाहीं. त्यांनीं ताबडतोब आतांच राज्यसत्ता जिंकली पाहिजे, विलंब हा गुन्हा आहे. सोव्हियट कॉंग्रेस-साठीं तिष्ठत बसणें म्हणजे शिस्तशरिपणाचा निर्लज्ज पोरखेळ आहे, क्रांतीचा विश्वासघात आहे."

अशी स्पष्ट इशारत त्यानें ऑक्टोबरचे आरंभीं बोल्शेव्हिकांना दिली. आम्ही तिष्ठत बसूं तर अखिल रशियन सोव्हियटचे सरकार पक्षीय पुढारी कॉंग्रेस हळूच नोव्हेंबरमध्यें ढकलतील व दरम्यान " केरेन्स्की कॉर्निलोव्हचें सैन्य आणवून कामगारांना ठोकून काढील " असें लेनिननें नुकत्याच भरणाऱ्या बोल्शेव्हिकांच्या 'उत्तर विभाग परिषदे'च्या प्रतिनिधींस ता. ८ ऑक्टोबर रोजीं लिहिलें.

ता. १० ऑक्टोबरची गुप्त बैठक

ऑक्टोबरच्या १० तारखेस पेट्रोग्रॅडमधील सुखॅनोव्हच्या घरीं बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांची गुप्त बैठक झाली. सुखॅनोव्ह हा स्वतां सोशॅलिस्ट असून तो केरेन्स्कीचा कट्टा विरोधक होता. स्वतः मेन्शेव्हिक असला तरी इतर मेन्शेव्हिकां-

चें तडजोडीचें धोरण त्यास पसंत नव्हतें. पण त्याचें बोल्शेव्हिकांशींहि पटत नव्हतें. यामुळें सुखॅनोव्हच्याच घरीं बोल्शेव्हिकांची गुप्त बैठक भरावी हें चमत्कारिक होतें. पण त्या बैठकीस हजर राहण्यास लेनिन स्वतः आपल्या गुप्तस्थानांतून येणार असून त्यासाठीं पोलिसाला संशयातीत असें ठिकाण म्हणून सुखॅनोव्हच्या घराचीच निवड बैठकीसाठीं करण्यांत आली होती. सुखॅनोव्ह मेन्शेव्हिक असला तरी त्याची बायको बोल्शेव्हिक होती व तिनें बोल्शेव्हिक पुढाऱ्यांच्या गुप्त बैठकीसाठीं आपलें घर देण्याचें व गुप्तपणाची सर्व खबरदारी घेण्याचें कबूल केलें. त्याच दिवशीं सुखॅनोव्ह दूरच्या प्रवासाहून आला होता. पण "प्रवासाच्या यातायातीनंतर उगीच डोकें पिकवून घेऊं नको" असें नवऱ्यास सांगून तिनें त्याला रात्रीं झोंपण्यास बाहेर पिटाळलें व कोणत्याहि प्रकारें सुखॅनोव्हनें बैठकीस अडचण आणूं नये अशी खबरदारी घेतली.

बोल्शेव्हिक मध्यवर्ती कमिटीच्या २२ सभासदांपैकीं १२ सभासद या वेळीं हजर होते. एक मोठा लांब कोट, डोकीवर मोठा टोप व डोळ्यांवर काळा चष्मा घालून व नेहमींची दाढी साफ काढून टाकून लेनिन या बैठकीस आला. त्या बारा सभासदांत झिनोव्हिफ व कॅमेनेव्ह होतेच. इतरहि कांहीं सभासद लेनिनच्या धोरणाविरुद्ध होते. यामुळें लेनिनला त्या दिवशीं फारच हुजत घालावी लागली. शेवटीं झिनोव्हिफ व कॅमेनेव्ह यांखेरीज सर्वांनीं लेनिनच्या शक्यतों लवकरच बंड करण्याच्या ठरावास पाठिंबा दिला. तेथें पडलेल्या लहान मुलांच्या खर्ड्याच्या वहींतील एक पान फाडून व पेन्सिल नखानें कुरतुडून लेनिननें त्या कागदावर तो ऐतिहासिक क्रांति घडवून आणणारा ठराव घाईघाईनें खरडला. त्यांत "कॉर्निलोव्हचें बंड पुनः होण्याचा संभव आहे व केरेन्स्की जर्मनीशीं तह करण्याच्या विचारांत असून कदाचित् पेट्रोग्रॅड जर्मनीच्या हवालीं करील व बंडाची संधि कायमची जाईल" असें म्हटलें असून "रशियांत कामगारक्रांति घडवून आणण्यास आंतरराष्ट्रीय दृष्ट्या हीच अनुकूल संधि आहे, म्हणून यापुढील सर्व कार्यक्रम बोल्शेव्हिक संस्थांनीं ताबडतोब बंड उभारण्याच्याच धोरणानें चालवावे" असें स्पष्ट सांगितलें होतें. बंड ताबडतोब उभारावें अशी लेनिनची कल्पना असून तिला स्वर्ड्लोव्ह व स्टॅलिन यांनीं दुजोरा दिला होता; पण ट्रॉट्स्की हा सोव्हियट काँग्रेसच्या वेळींच बंड

उभारावें असें म्हणत होता. हा मतभेद खरा कीं खोटा व कोणता पक्ष सयुक्तिक होता, याबद्दल बराच वाद मागून माजला. पण त्याचा निर्णय काय हें सांगणें शक्य नाहीं व जरूरहि नाहीं. कॅमेनेव्ह् वगैरेंच्या विरोधामुळें बंडास अपरिहार्यतेनेंच विलंब झाला.

बोल्शेव्हिकांचें यशस्वी बंड

शेवटीं ता. २४ रोजीं पेट्रोग्रॅडमध्यें कामकरी व सैनिकांनीं बंड उभारून टेलिफोन एक्सेंज व सरकारी सर्व कचेऱ्या बोल्शेव्हिकांनीं काबीज केल्या. ता. २५ रोजीं विंटर राजवाड्यावर बंडवाल्यांनीं हल्ला करून सर्व प्रधानमंडळास अटक केली. त्या वेळीं केरेन्स्की अमेरिकन वकिलातीच्या मोटारींतून पळून गेल्याचें त्यांना आढळून आलें. कामकरी व सैनिक एकजात सर्व बोल्शेव्हिकांचे बाजूस असल्यामुळें रक्तपात न होतां केवळ वायबारावर भांडवलवाल्या सरकारचा पाडाव होऊन बोल्शेव्हिक क्रांति यशस्वी झाली.

या दोन दिवसांतल्या हकीकतींचें संक्षिप्त वर्णन हॅम्ण्डन जॅक्सन यानें थोडक्यांत व संगतवार दिलें आहे तें येथें उद्धृत करतों; "ता.२३ ऑक्टोबर (जुन्या कॅलेंडरप्रमाणें १० ऑक्टोबर) रोजीं एका खाजगी बैठकींत बोल्शेव्हिकांनीं एका पंधरवड्यांत राज्यसत्ता काबीज केलीच पाहिजे असें मत दिलें. वीज क्षणांत चमकून अदृश्य व्हावी तसे पुढील दोन आठवडे भरकन निघून गेले. 'रेड गार्ड' या नांवाखालीं जेमतेम १०० सैनिकांची गुप्त तुकडी स्थापणें शक्य झालें; तिनें दारूगोळाकामगारांशीं संगनमत करणें, बाँब व मशिनगन्स चोरून सांठवून ठेवणें, टेलिफोन चालविणाऱ्या कामगारांना इशारा देऊन ठेवणें, पोलिसांतील मित्रांना इशारत देऊन ठेवणें, अरोरा जहाजावरील खलाशांना सूचना देणें वगैरे कामें केलीं. या जहाजावरील खलाशी-सैनिक बोल्शेव्हिक असून त्यांनीं आपलें जहाज तेव्हां नदींतून पेट्रोग्रॅडला आणून लाविलें होतें; स्मॉल्नी या संस्थेंत बोल्शेव्हिकांची मध्यवर्ती कचेरी होती. तेथें सोव्हियट काँग्रेससाठीं प्रतिनिधि गोळा झाले होते. त्यांत कित्येकजण आजन्म क्रांतिकारकाचा पेशा धारण केलेले असून क्रांतिकालांतच वनवासांतून परत आलेले होते. सशस्त्र 'रेड गार्ड'हि त्यांत होते. निरनिराळे संदेशवाहक व बातमीदार तेथें हजर होते. या सर्व गबाळगोंधळांतून कसे तरी बंड करण्याविषयींचे पुढाऱ्यांचे हुकूम सुटले, कसे तरी कामगारांना व सैनिकांना ऐकूं

आले, त्यांनीं ते मानले व कसेहि करून तडीस नेले. बोल्शेव्हिकांनीं नोव्हेंबर ७ ला (जुन्या कॅलेंडरप्रमाणें ऑक्टोबर २५) राज्यसत्ता जिंकली यांत आश्चर्यकारक असें कांहींच नव्हतें. जणूं कांहीं सर्व वेळीं पेट्रोग्रॅड हें बोल्शेव्हिकच होते इतक्या सहजपणें ती राजधानी त्यांचे हातांत पडली. पहांटे २ वाजतां बंड सुरू झालें व बोल्शेव्हिक तुकड्यांनीं नाक्याच्या जागा काबीज केल्या. ५ वाजतां 'तात्पुरत्या सरकार'नें बोल्शेव्हिक छापखाना ताब्यांत घेण्याचा पोलिसांस हुकूम दिला. यंत्रांच्या खोल्यांवर छापे घालून पोलिसांनीं यंत्रांची कांहीं थोडी मोडतोड केली. पण अरोरा जहाजावरील खलाशांनीं सरकारला न जुमानतां बोल्शेव्हिकांना कुमक पाठविली व छापखाना मोडल्यामुळें थबकलेलें हुकूमप्रसाराचें काम करण्यास ब्रॉडकास्टिंग स्टेशन बोल्शेव्हिकांचे हवालीं केलें. स्मॉल्नीहून ब्रॉडकास्टिंग मशीनमधून बंड सुरू झाल्याची आरोळी १०वाजतां देण्यांत आली. दुपारीं सोव्हियट कॉंग्रेस भरली. तींत लेनिननें भाषण करून बंडाचें समर्थन केलें व क्रांतीचें ध्येय समजावून सांगितलें. तिसऱ्या प्रहरीं 'पीटर व पॉल' किल्ल्यांतील सैनिक बोल्शेव्हिकांना सामील झाले. संध्याकाळीं 'तात्पुरत्या सरकार'नें स्मॉल्नीचा टेलिफोन तोडण्याचा यत्न केला, पण फोल ठरला. लेनिनला पकडण्यासाठीं पाठविलेल्या माणसांना बंडवाल्यांनीं गिरफदार केलें. आतां फक्त विंटर राजवाडा उरला होता. तेथें सरकारचें मुख्य ठाणें होतें. त्याला बोल्शेव्हिक सैन्यानें व सरसकट जमावानें वेढा दिला. अंधारांत कोणीं तरी राजवाड्याचें मागील दार उघडलें व लोकांचा जमाव आंत घुसून सगळा गोंधळ उडाला. 'तात्पुरतें सरकार' खलास झालें. मध्यरात्रीनंतर थोड्याच वेळांत सगळी राजधानी बोल्शेव्हिकांच्या हातीं आली. रक्तपात इतका थोडा झाला होता, कीं विदेशी वृत्तपत्रांच्या बातमीदारांना येथें कांहीं महत्त्वाची गोष्ट घडली आहे, हें पटलेंच नाहीं. बंड नंतर मॉस्कोंत सुरू झालें. येथें मात्र हातघाईच्या लढाया झाल्या. पण लवकरच बोल्शेव्हिक व सोव्हियट यांचा विजय होऊन त्यांनीं शहराचा ताबा घेतला. खेड्यापाड्यांतून बंडाचा वणवा तसाच भडकत गेला. लेनिननें एक हुकूम काढून जमिनी शेतकऱ्यांना दिल्या. तेव्हां शेतकऱ्यांनीं जमिनदारांच्या इस्टेटींवर हल्ले करून व त्या खालसा करून आपली सोव्हियट्स उभारलीं."

(पोस्ट–वॉर वर्ल्ड)

विंटर राजवाडा काबीज झाला त्या वेळीं सोव्हियट काँग्रेस चालूं होती. वादविवाद खूप झाला. मेन्शेव्हिक व मवाळ सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पुढारी विंटर राजवाडा बोल्शेव्हिकांनीं घेतला हें ऐकून सभागृहांतून उठून गेले.

लेनिननें सोव्हियट सरकार जाहीर केलें

या काँग्रेसला मध्यमवर्गीय पुढारी निवडून आले नसून शेतकरी, कामकरी व सैनिक यांतील बोल्शेव्हिकांशीं एकमत झालेले पुढारी काँग्रेसला आले होते. त्यांना मेन्शेव्हिक व मवाळ सोशल रेव्होल्यूशनरी उठून गेल्याचें वाईट वाटलें नाहीं. या काँग्रेसमध्यें लेनिन चार महिन्यांच्या गुप्त वासानंतर प्रथम प्रकट झाला. त्याला पाहतांच कित्येक मिनिटेंपर्यंत टाळ्यांचा कडकडाट झाला. तो थांबल्यावर "आपण आतां सोशॅलिस्ट समाजघटना निर्माण करण्याच्या उद्योगास लागूं या" याच वाक्यानें त्यानें भाषणास सुरुवात केली. युद्ध, जमीन व नवें सरकार या तीन मुद्द्यांवर त्यानें बोल्शेव्हिक पक्षाचें धोरण जाहीर केलें. ताबडतोब युद्ध तहकूब करून तीन महिन्यांत शत्रूशीं तह करावा, जमिनदारांच्या जमिनी खालसा करून त्या ग्रामसमित्यांच्या हवालीं कराव्या व सरकारच्या निरनिराळ्या खात्यांसाठीं कमिशन्स नेमून त्यांनीं कामकरी, सैनिक, खलाशी, शेतकरी, स्त्रिया, कारकूनवर्ग वगैरेंच्या संघटनांच्या साह्यानें सोव्हियट काँग्रेसचे कार्यक्रम अमलांत आणावे. या कमिशनांच्या अध्यक्षांचें एक अध्यक्ष-मंडळ 'सोव्हियट ऑफ् पीपल्स कॉमिसर्स' नेमावें व तेंच सरकार ठरवून त्याचे हातीं राज्यसत्ता द्यावी असा तो कार्यक्रम होता. ही योजना पुष्कळ वादविवादानंतर प्रचंड बहुमतानें मंजूर झाली. प्रत्यक्ष सरकार निर्माण करण्याचें काम लेनिनकडे सोपविण्यांत आलें. त्यानें पुढीलप्रमाणें नेमणुका केल्या.—लेनिन सरकारचा प्रमुख; त्याकडे विशिष्ट खातें नसावें. रायकॉव्ह—गृहमंत्री. मिल्युटिन शेतीखात्याचा प्रमुख; नोगिन—व्यापार व उद्योगधंद्यांचा प्रमुख; ट्रॉट्स्की—परराष्ट्रमंत्री; लोमोव्ह—न्यायमंत्री; स्टॉलिन—पोटराष्ट्र (नॅशनॅलिटीज्)मंत्री; अॅन्टॉनोव्ह ओझेंको, क्रिलेंको व डायबेंको—लष्कर व आरमार मंत्रिमंडळ; श्लिआप्निकोव्ह—मजूरमंत्री; लुनाचार्स्की शिक्षणमंत्री; थिओडोरोविच्—मालपुरवठा-मंत्री; ग्लेबोव्ह—पोस्ट व तारमंत्री; वाहतूक मंत्र्याची जागा, रेल्वे-मजुरांच्या सल्ल्यानें भरावी असें ठरलें. याप्रमाणें लेनिन

व त्याचे अनुयायी यांनीं तीस वर्षें झगडून जी कामगारसत्ता स्थापन करण्याचा ध्यास घेतला ती कामगारसत्ता स्थापन झाली व लेनिनच्या श्रमांस व हालअपेष्टांस यश आलें. पण लेनिनला कामगारसत्ता स्थापन करण्याहून फार मोठें कार्य करावयाचें होतें. सोशॅलिस्ट समाजघटना स्थापणें हें त्याचें ध्येय होतें. कामगारसत्ता हें ध्येयसिद्धीचें एक साधन होतें; म्हणून आलेल्या यशानें धन्य मानून घेण्यांत कालक्षेप न करतां बोल्शेव्हिक क्रांतीचा विजय झाल्याची बातमी आल्यावर प्रगट होऊन त्यानें जें पहिलें वाक्य उच्चारलें तें "आतां आपण सोशॅलिस्ट समाजघटना निर्माण करण्याच्या कार्यास लागूं या" हेंच होतें.

स्थळ प्रत
सं..... नं.....
ता.....
ठा. पं.

प्रकरण ११ वें

रशियन राज्यक्रांतीचें वैशिष्ट्य

लेनिनच्या शिकवणीप्रमाणें कामकरी–शेतकऱ्यांनीं राज्यसत्ता काबीज करणें हा जो महत्त्वाचा भाग त्याचा इतिहास येथवर सांगितला. लेनिनच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'सोशॅलिस्ट समाजघटना निर्माण करण्याचें जें कार्य' त्या कार्यास लेनिननें नंतर हात घातला; त्यांत अनेक भयंकर विघ्नें आलीं; लेनिनचा लवकरच अंत होऊन त्याच्या अनुयायांत भांडणें झालीं; तथापि 'सोशॅलिस्ट समाज निर्माण करण्याचें कार्य' पुढें अखंड चालूं राहिलें आहे. याचा त्रोटक वृत्तांत पुढें येईल. रशियांतील आजच्या राज्यकर्त्यांच्या चालू प्रयत्नास साऱ्या जगभर महत्त्व आलें असून अंधाऱ्या रात्रीं शुक्राच्या चांदणीच्या प्रकाशांत चोर व सज्जन आपला मार्ग काढीत असतात तशी भांडवलशाहीच्या गोंधळांतून वाट काढण्यासाठीं रशियन राज्यकारभाराचा व राजकीय तत्त्वज्ञानाचा उपयोग जगांतील भांडवलवालीं राष्ट्रें व त्यांतील जनता करीत आहेत. पण आजच्या रशियन राजकारणास व समाजकारणास जें हें जागतिक महत्त्व आलें आहे, तितकेंच किंवा त्याहूनहि कांहीं एका प्रकारें अधिक महत्त्व लेनिन व ट्रॉट्स्की यांनीं १९१७च्या ऑक्टोबरांत राज्यसत्ता काबीज करून कामगारक्रांति केली या गोष्टीस आहे. कारण आज रशियास येत असलेलें यश व इतर राष्ट्रांस येत असलेलें अपयश हीं, अनुक्रमें रशियांत कामगारक्रांति झाली व इतरत्र ती होऊं शकली नाहीं, याचीं फलें आहेत. म्हणून १९१७च्या ऑक्टोबरमधील क्रांतीचा इतिहास संपला असतां येथेंच थांबून या राज्यक्रांतीचें इतिहासांत वैशिष्ट्य काय हें समजून घेऊं व मग पुढील इतिहासाकडे वळूं.

मार्क्सचा क्रांतिक्रम व रशियन राज्यक्रांति

कार्ल मार्क्सनें 'कॅपिटल' ग्रंथाच्या पहिल्या खंडांत पहिल्यापासून भांडवलशाहीच्या मीमांसेस सुरुवात करून ग्रंथाच्या शेवटीं शेवटीं मीमांसा पूर्ण करीत असतां, सरंजामी राज्यसत्तेचा व समाजव्यवस्थेचा मोड होऊन भांडवलशाही राज्यसत्ता व समाजव्यवस्था निर्माण होते व नंतर कालांतरानें कामगारवर्ग भांडवलवाल्यांविरुद्ध बंड करून कामगारसत्ता स्थापतील असें अनुमान लिहून ठेविलें आहे. 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'मध्येंहि सरंजामी सत्तेतून, तिचा नाश करून, भांडवलशाही जन्म पावते व तिचा नाश करून मग कामगार कामगारशाही निर्माण करतात असें मार्क्सनें दाखविलें. या प्रतिपादनांत एक प्रकारचा इयत्ताक्रम अथवा अनुक्रम अभिप्रेत आहे असें उघड दिसतें. विद्यापीठांतील मुलांना अमुक एका परीक्षेनंतर मग अमुक दुसरी परीक्षा असें ठरविलेलें असतें किंवा सृष्टिक्रमांत झाडांना आधीं पानें, मग 'फुलें व त्या मागून फळें' येतात, 'आधीं ढग येतात व मागून पाऊस पडतो' असा, आधीं 'निमित्त' व मागाहून 'नैमित्तिक', आधीं कारण व मागाहून कार्य असा कांहीं तरी कारण-कार्यक्रम मार्क्सला अभिप्रेत असावा अशा प्रकारेंच मार्क्सनें वर उल्लेखिलेल्या दोन्ही ग्रंथांत विवेचन केलें आहे. पण रशियांत ज्या मार्क्सच्या अनुयायांनीं फेब्रुवारी व ऑक्टोबर १९१७ मध्यें राज्यक्रांति घडवून आणली ती त्यांनीं आधीं सरंजामी सत्ता भांडवलशाहीनें उलथून पाडावी व मागाहून भांडवलशाहीचा विकास व ऱ्हास झाल्यानंतर कामगारांनीं भांडवलशाही उलथून पाडावी या इयत्ताक्रमानें अथवा निमित्तनैमित्तिक क्रमानें घडवून आणली नाहीं. फेब्रुवारीमध्यें सरंजामशाहीचा पाडाव केला, तो भांडवलवाल्यांनीं न करतां कामकरी व (सैनिक असलेले) शेतकरी यांनीं केला. भांडवलवाल्यांची शेतकरी-कामकऱ्यांस मदतहि मिळाली नाहीं. इतकेंच नव्हे तर शेतकरी-कामकऱ्यांविरुद्ध सरंजामशाही व तिचा प्रमुख झार यांचा सामना सुरू असतां भांडवलदार हे झारच्या बाजूनें कामगारांशीं लढत होते. पुढें झारशाहीचा पाडाव झाल्यावर कामकऱ्यांनीं भांडवलवाल्यांच्या हातीं राज्यसूत्रें दिलीं तरी त्यांनीं सरंजामशाहीची घटना न मोडतां ती मोडणाऱ्या कामगारांच्या प्रयत्नांसच कसून विरोध केला. पुढें ऑक्टोबरमध्यें भांडवल-

वाल्यांच्या या अल्पकालीन व दुर्बल सत्तेचा पाडाव करून कामगारांनीं राज्य-सत्ता धारण केली व सरंजामी सत्तेंतून एकदम कामगार क्रांतीचा उदय करून भांडवलशाहीच्या उदय-उत्कर्ष-उच्छेद या सर्व आयुःक्रमास अजिबात फाटाच दिला. गेल्या १८ वर्षांत रशियांतल्या कामकऱ्यांच्या सत्तेखालीं भांडवलशाही समाजाचीं कांहीं लक्षणें दिसतील असे सामाजिक प्रकार सरकारनें नांदूं दिले तरी इंग्लंडमध्यें, फ्रान्समध्यें, अमेरिकेमध्यें जशी भांडवलशाही राज्यघटना व समाजघटना आहे असें म्हणतां येते, तशा अर्थानें गेल्या १८ वर्षांत भांडवलशाहीचा उदय कधींच झाला नाहीं. रशियन राज्यकर्त्यांना आपल्या चुक्या दिसून आल्या असून आतां ते हळू हळू रशियांत भांडवलशाहीसारखी समाजघटना निर्माण करीत आहेत असे उद्गार कांहीं समंजस म्हणविणारीं माणसें काढीत असतात. पण हा त्यांचा धूर्तपणा अथवा मूर्खपणा होय. राज्यक्रांतीपूर्वी अथवा राज्यक्रांतीनंतर रशियांत 'भांडवलशाही—अर्थात् इंग्लंड अमेरिकेंत आहे तशा अर्थानें, कधींच नव्हती व ती उत्पन्न होण्याचीं लक्षणें आजहि मुळींच दिसत नाहींत.*

---

* 'भांडवलशाही इंग्लंड अमेरिकेंत आहे तशा अर्थानें' हे शब्द वरील वाक्यांत हेतुपूर्वक वापरले आहेत. प्रस्तुत पुस्तकांत मागें अनेकवार रशियन भांडवलवाल्यांस अथवा त्यांच्या मंत्रिमंडळास अथवा त्यांच्या नाममात्र सत्तेस उद्देशून 'भांडवलशाही' हा शब्द वापरला आहे तो प्रत्येक बारीकबारीक अवस्थांतरास निरनिराळे सुटसुटीत शब्द नसण्यानें येणारी अडचण तात्पुरती दूर करण्यासाठीं वापरला आहे. त्याचा अर्थ जेथल्या तेथल्या संदर्भानें विशिष्ट भांडवलवाल्यांचा गट, कंपू, मंत्रिमंडळ वगैरे यथासंभव घ्यावयाचा आहे. पण शास्त्रीय परिभाषेंत भांडवलशाहीचें मानवविकासक्रमांतील स्थान शोधतांना 'भांडवलशाही' याचा अर्थ धनोत्पादनाचीं प्रचंड साधनें, विशिष्ट वर्गाच्या मालकीचीं असून त्याचे जोरावर तो वर्ग राज्यसत्ता व समाजव्यवस्था यांवर प्रभुत्व गाजवितो असा कालखंड, अशी राज्यव्यवस्था अथवा तशी समाजव्यवस्था, असाच यथासंदर्भ असतो. खांद्यावरील मालकीची कुदळ मालकीच्या टीचभर जमिनींत खुपसून शेती करणारा शेतकरी अथवा मालकीच्या तिरकमठ्यानें हरणें मारून खाणारा

लेनिन व ट्रॉट्स्की यांनीं मार्क्सचा इयत्ताक्रम अथवा निमित्त-नैमित्तिक क्रम सोडला ही गोष्ट आज प्रथमच लक्षांत येत नसून त्यांच्या हयातीभर त्यांनीं मार्क्सचा द्रोह करणारे मार्क्सवादी अशा शिव्या मूळच्या त्यांच्या पक्षांतील पुढाऱ्यांकडून खाल्या आहेत. १९०३ सालीं मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक अशीं मूळच्या एका सोशॅल डेमोक्रॅटिक पक्षाचीं दोन शकलें झालीं, त्या वेळेपासून १९०७ अखेर या दोन गटांत जो वाद माजला त्यांत बोल्शेव्हिक गटाचा पुढारी लेनिन हा कामकरी-शेतकऱ्यांनीं झारशाहीचा पाडाव करून राज्यसत्ता धारण करावी असें सांगत होता तर प्लेखॅनोव्ह, मार्टाव्ह हे मेन्शेव्हिक पुढारी, रशियांत सरंजामशाहीचा पाडाव झाल्यावर मार्क्सच्या शिकवणीअनुसार भांडवलशाही निर्माण झाली पाहिजे व भांडवलशाहीचा

शिकारी हेहि भांडवलवाले—म्हणजे कुदळ व तिरकमठा हीं धनोत्पादक साधनें ज्यांच्या मालकीचीं आहेत असें—समजून मग मार्क्सच्या वाङ्मयाचा अर्थ लावूं पाहणारीं माणसें कांहीं थोडीं नसतात. अर्थातच अशीं माणसें स्वतःऐवजीं मार्क्सलाच वेडा ठरवून त्याचा नाद लवकरच सोडून देतात आणि हें मार्क्सच्या व त्यांच्याहि कल्याणाचें असतें. मार्क्सच्या लिखाणांत भांडवलशाही शब्द येत असतो तो, इंग्लंडांत भांडवलवाल्यांच्या हातीं धनोत्पादनाचीं प्रचंड साधनें होतीं व त्यांच्या हातीं राज्ययंत्र व समाजव्यवस्था गेली होती व जात होती, या अवस्थेस उद्देशून येत असतो. 'शाही' याचा अर्थ सत्ता असा आहे. कुदळवाल्या शेतकऱ्याजवळ अथवा तिरकमठावाल्या शिकाऱ्याजवळ 'भांडवल' असलें तरी तो त्यामुळें 'शाही' निर्माण करूं शकत नाहीं व स्वतः 'शहा' बनत नाहीं. कुदळीऐवजीं ट्रॅक्टर, विजेची शक्ति, प्रचंड कारखाना ज्याच्या मालकीचा झाला व तिरकमठ्याऐवजीं प्रचंड शस्त्रास्त्रांचे कारखाने ज्याच्या मालकीचे झाले तो त्यांच्या जोरावर भांडवल'शाही' निर्माण करतो व स्वतः भांडवल'शहा' बनतो. आधीं सरंजामशाही, मग भांडवलशाही व नंतर कामगारशाही हा जो मार्क्सचा क्रम यांतील भांडवलशाही शब्दांतला हा विशिष्ट अर्थ लक्षांत ठेवला पाहिजे. १९१७च्या फेब्रुवारीपासून ऑक्टोबरपर्यंत जें 'तात्पुरतें सरकार' होतें त्यास भांडवलवाल्यांचा पाठिंबा होता व सरकारांतहि भांडवलवाले व जमिनदार होते तरी त्यांना भांडवल'शाही' अशी कधींच निर्माण करतां आली नाहीं. सत्ता सगळी सोव्हियटचे हातींच होती.

उदय, उत्कर्ष, ऱ्हास हा क्रम यथासांग पार पडल्यानंतर मगच तिचा पाडाव कामगारांनीं करून कामगारशाही निर्माण करावी असें सांगत होता. लेनिन या आपल्या तात्कालिक ध्येयास 'डेमोक्रॅटिक डिक्टेटरशिप ऑफ् दि प्रॉलेटॅरियट ॲन्ड दि पेझंट्री' (शेतकरी व कामकरी यांची लोकशाहीप्रधान मुखत्यारी) असें नांव देई. यांत 'डेमोक्रॅटिक' (लोकशाहीप्रधान) या शब्दानें भांडवलशाही अंशतः शिल्लक राहणार असें गृहीत धरलें होतें; व कामकरी-शेतकरी यांचें राज्य झालें तरी भांडवलवाल्यांचीं धनोत्पादक साधनें जप्त न करतां त्यांचेकडून प्रचंड उत्पादन करवावें व मार्क्सला अभिप्रेत असलेला भांडवलशाहीचा कालखंड उत्पादनपद्धतीपुरतां तडीस न्यावा अशी लेनिनची योजना होती. तरी पण भांडवलवाल्यांच्याच हातीं राज्यसत्ताहि राहूं देण्यास लेनिन तयार नाहीं, एवढ्यामुळेंच मार्टाव्ह लेनिनला मार्क्सच्या शिकवणीपासून चळलेला असें मानी. ट्रॉट्स्की लेनिनच्या पुढें जाऊन झारशाहीचा पाडाव करतांच कामगारसत्ताच स्थापावी व भांडवलवाल्यांच्या ईस्टेटी जप्त कराव्या असें म्हणे. यामुळें मेन्शेव्हिकांचें व त्यांचें कोठेंच बनण्यासारखें नव्हतें. लेनिन-ट्रॉट्स्की व एकंदर बोल्शेव्हिक पक्ष यांवरचा मार्क्सचें मत न अनुसरण्याचा आरोप १९०५च्या क्रांतीपासून १९१७च्या क्रांतीपर्यंत टिकला व १९१७च्या फेब्रुवारीपासून ऑक्टोबरपर्यंत हे दोन पक्ष याच मुद्द्यावर जवळ जवळ रणांत उतरले होते. श्चीड्झ, त्सेरिटेली वगैरे ज्या पुढाऱ्यांनीं फेब्रुवारी क्रांतीनंतर सोव्हियट्सचीं व त्यांच्या द्वारें कामकरी, शेतकरी व सैनिक यांनीं बनलेल्या बहुसंख्य समाजाच्या जीवनाचीं सूत्रें आपल्या हातीं घेऊन तीं भांडवलवाल्यांच्या आज्ञेप्रमाणें चाळविलीं, अगदीं ओंजळींत आलेल्या राज्यसत्तेचें उदक भांडवलवाल्यांच्या हातांवर सोडलें, लोकांस झुलवून, फसवून, दटावून, दडपून भांडवलवाल्या सरकारच्या लगामीं खेचलें, भांडवलवाल्यांची सत्ता डळमळूं लागली तेव्हां त्सेरिटेलीनें तिला स्वतः खांदा दिला व ऑक्टोबरमध्यें जेव्हां ट्रॉट्स्की व लेनिन यांच्या बोल्शेव्हिक पक्षानें कामगारक्रांति केली त्या वेळीं मेन्शेव्हिक पुढारी, लढले, पडले, अटक झाले अथवा पळून गेले. पण त्यांना आपलें वर्तन मार्क्सच्या इयत्ताक्रमास धरून आहे व लेनिन-ट्रॉट्स्की मात्र मार्क्सच्या सिद्धांतास सोडून वागत आहेत असें अखेरपर्यंत वाटत होतें.

लेनिनचा उपाय अद्वितीयच होता

उलट लेनिननें केलें तेंच बरोबर केलें असें मत लेनिनच्या सर्व विचारवंत शत्रु-मित्रांनीं दिलें आहे. लेनिनचा चरित्रकार डी. एस्. मिर्स्की याचा बाप १९०५च्या क्रांतीचे सुमारास झारच्या मंत्रिमंडळांत होता. स्वतः डी. एस्. मिर्स्की हा क्रांतीनंतरच्या यादवींत डेनिकिनच्या सैन्यांत राहून ट्रॉट्स्कीच्या सैन्याविरुद्ध लढला. पुढें डेनिकिनचा मोड झाल्यावर तो इंग्लंडांत गेला. तेथें रशियन इतिहासाकडे मागें वळून पुनः एकवार त्यानें पाहिलें व त्याचा नंतर त्यानें खोल अभ्यास केला. लेनिनच्या लेखांचीं अनेक पारायणें त्यानें केलीं; तेव्हां त्याची खात्री झाली, कीं लेनिननें जर आपल्या मताप्रमाणें कामगार-क्रांति केली नसती तर रशियाचा युद्धांत पराभव तर झालाच असता, पण शिवाय इंग्लंड-फ्रान्सनीं जर्मनीचा पराभव केल्यानंतर त्या दोन साम्राज्यशाही राष्ट्रांचा, युद्धांत बेजार झालेला रशिया, हा, मोकाट चरण्याचें कुरण झाला असता. रशियाचें राजकीय स्वातंत्र्य बहुतेक नष्ट झालें असतें, आणि चीन अथवा हिंदुस्थान यांपैकीं कोणाच्या तरी पदवीस पोंचून अनेक राष्ट्रांनीं त्याचे अनेक लचके तोडले असते. मॉरिस हिंडसनें 'ह्युमॅनिटी अपरूटेड' या प्रसिद्ध ग्रंथांत इंग्लंड-फ्रान्स यांना दोघांनाहि रशियावर साम्राज्यशाही माजवावयाची होती पण इंग्लंडला रशियाचा लचका काढतां आल्यास त्याला तेलाच्या खाणी मिळतील व त्यामुळें इंग्लंड बलिष्ठ होईल अशी फ्रान्सला इंग्लंडबद्दल चुरस वाटूं लागली व मग फ्रान्सनेंच इंग्लंडचे पाय रशियाच्या यादवींतून मागें खेंचले असें आपलें मत दिलें आहे. बोल्शेव्हिकांखेरीज दुसऱ्या पक्षांनीं अथवा पुढाऱ्यांनीं अमुक एक चुकी केली नसती, अमुक एका प्रकारें आपलें धोरण बदललें असतें तर, लेनिनला यश आलें नसतें असें म्हणण्याचा पुष्कळांनीं प्रयत्न केला आहे. पण त्या म्हणण्याचा कांहीं उपयोग नाहीं. लेनिनची योजना हाणून पाडणें फारसें कठीण नव्हतेंच. स्वित्झर्लंडांतून मार्चच्या शेवटीं लेनिनची व इंग्लंडांतून ट्रॉट्स्कीची सुटका झाली नसती—व तसा संभव कांहीं थोडा-थोडका नव्हता—तरी तेवढ्यानेंहि फेब्रुवारीनंतरच्या राजकारणास अगदीं वेगळें वळण लागून ऑक्टोबरक्रांति टळली असती. इतकेंच नव्हे तर अगदीं ऑक्टोबरच्या आरंभीं केरेन्स्कीनें मारेकरी घालून

लेनिन व ट्रॉट्स्की यांची वाट लावली असती तरीहि ऑक्टोबरमध्यें व कदाचित् पुढें केव्हांच कामगारक्रांति झाली नसती. लेनिनला फशी पाडणें सोपें होतें हें म्हणण्यानें लेनिनचें व त्यानें केलेल्या क्रांतीचें महत्त्व कमी होत नाहीं. खरा प्रश्न असा आहे, कीं लेनिननें केलेल्या कामगार क्रांतीशिवाय दुसऱ्या कोणत्या तरी उपायानें व लेनिन-ट्रॉट्स्कीखेरीज म्हणजे बोल्शेव्हिक-पक्षाखेरीज दुसऱ्या कोणत्या तरी व्यक्तीनें अथवा पक्षानें, चोंहों बाजूंनीं आगीच्या डोंबाळ्यांत सांपडून भस्म होत जाणारा अथवा परकी राष्ट्रांनीं वांचविल्यास त्यांच्याच भक्ष्यस्थानीं पडणारा रशिया, या दोन्ही महत्संकटां-पासून वांचविला असता काय ? आणि या प्रश्नाची विशेष तात्त्विक चर्चा न करतां केवळ घडलेल्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप केला तरी या प्रश्नाचें, कामगार-क्रांतीखेरीज दुसरा मार्ग नव्हता व लेनिन्-ट्रॉट्स्कीखेरीज ती कोणींहि केली नसती हेंच उत्तर द्यावें लागतें. झारशाहीचा पाडाव करणें भांडवलवाल्यांना साधलें नाहीं हें तर सिद्धच आहे. फेब्रुवारींत कामगारांनीं क्रांति करून झार-शाहीचा पाडाव केला व सोव्हियटतर्फे राज्यसत्ता त्वोव्ह मिल्युकोव्ह-केरेन्स्की-कंपूचे हवालीं केली त्या वेळीं त्यांनीं लोकमताचा जोर ओळखला नाहीं, कामगारांना दडपलें नाहीं, सैन्यांत शिस्त निर्माण केली नाहीं, म्हणून हळूहळू लोक बोल्शेव्हिकांना अनुकूल झाले, असे केरेन्स्कीकंपूचे दोष टीकाकारांनीं काढले आहेत. पण यांतील प्रत्येक गोष्ट करण्याची केरेन्स्कीकंपूची तयारी असून व त्यांनीं त्यासाठीं प्रयत्न केला असूनहि त्याचे स्वतांस प्रतिकूल असणारे परिणाम त्यास टाळावयाचे होते, यासाठीं त्यांनीं या गोष्टीस घालावा तसा हात घातला नाहीं. चढाईचें युद्ध बंद करा व तह करा, तह होत नसेल तर फक्त आत्मरक्षणापुरतेंच आम्ही लढूं असें अधिकाऱ्यांना बंदूक रोखून एकजात सांगणाऱ्या सैनिकांत शिस्त निर्माण करणें युद्ध थांबविण्याशिवाय शक्य होतें काय ? सरकारला युद्ध बंद करणें अशक्य वाटण्याचीं कारणेंहि तशींच बलवान् होतीं. युद्धसाहित्य पुरविणाऱ्या कारखानदारांना कोट्यवधि रूबल्स फायदा मिळत असून, रणांगणावर रक्ताच्या नद्या वाहत असतां पेट्रोग्रॅडमध्यें नायकिणींच्या अड्ड्यांत 'युद्धावर जायला म्हाताऱ्या पण भोग भोगायपुरत्या तरण्या' वीरांच्या घशांत दारूचीं पिपें कशीं खलास होत होतीं हें मागें सांगितलेंच आहे. युद्ध बंद झालें असतें तर यांना दारू न मिळतां

नायकिर्णींच्या लाथा मिळाल्या असत्या. रशियन युद्धकर्जात संयुक्त राष्ट्रांतील धनिकांनीं भाग घेतला असून संयुक्तांचे युद्धरोखे रशियन धनिकांनीं खरेदी केले होते. संयुक्तांच्या संमतीखेरीज युद्ध बंद केल्यास या कर्जरोख्यांची होळी होऊन दोन्ही देशांतील भांडवलवाले भाजून निघाले असते. म्हणून केरेन्स्कीकंपूस युद्ध बंद करावयाचें नव्हतें. सैनिक हे नुसतें युद्ध बंद करा म्हणून स्वस्थ बसणार नव्हते. युद्ध थांबवून ताबडतोब जमिनदारांच्या जमिनी आम्हांला देऊन टाका असें हे मूळचे शेतकरी असलेले सैनिक सरकारला सांगत होते. युद्ध बंद केल्यावर खांद्यावर बंदूक टाकून केरेन्स्कीकडे येणाऱ्या सैनिकास जमीन देत नाहीं म्हणणें केवळ अशक्य होतें. म्हणजे जमिनदारांच्याच हितासाठीं राज्यसत्ता धारण करणाऱ्या मंत्रिमंडळास अशी आत्महत्या सहजच करावयाची नव्हती. लोकांच्या म्हणजे शेतकऱ्यांच्या 'युद्ध थांबवा व जमीन द्या' या दोन इच्छा त्यांना दिसत होत्या; पण त्या त्यांना मानावयाच्या नव्हत्या. कामगारांना दडपून टाकावयाचें तर तें सैन्याच्याच बळावर. फेब्रुवारी क्रांतीचे वेळीं आधीं कामगारांनीं संप सुरू केले व असंतोष-निदर्शनें (डेमॉन्स्ट्रेशन्स) काढलीं, त्यांना सैनिकांनीं झोडपलें, तरी कामगार हटले नाहींत, व शेवटीं एकंदरीनें कामगार हेच युद्ध बंद करून आम्हांस जमिनी देतील असा विश्वास वाटून सैनिकांनीं आपल्या अधिकाऱ्यांना गोळ्या घातल्या, बंडाचें निशाण घेतलें व झारशाहीस धूळ चारली. हा इतिहास ज्या केरेन्स्कीकंपूस दिसत होता ते कामगारांना काय दडपणार? सारांश युद्ध थांबविणें व शेतकऱ्यांना जमिनदारांच्या जमिनी देऊन टाकणें या दोन्ही गोष्टी ज्या लेनिननें केल्या त्याच केरेन्स्कीकंपूनें राज्यसत्ता हातीं येतांच केल्या असत्या तर लेनिनला कामगारक्रांति करतां आली नसती असें क्षणभर म्हणूं. पण त्यासाठीं केरेन्स्कीकंपू हा जमिनदार, भांडवलदार या वर्गांचा प्रतिनिधि असूनहि एक सत्पुरुष-मंडळ असावयास पाहिजे होता. पण फेब्रुवारीअखेर सोव्हियटच्या मेन्शेव्हिक पुढाऱ्यांनीं राज्यसत्ता जी केरेन्स्कीकंपूच्या हातीं दिली ती तो कंपू जमिनदार, भांडवलदारवर्गाचा प्रतिनिधि म्हणून दिली. हा कंपू सत्पुरुष-मंडळ आहे असें कळतें तर दिली नसती व दिली असती तरी जमिनदार, भांडवलदार व तदुपजीवी मध्यम वर्ग यांनीं अशा सत्पुरुषांच्या हातीं ती नांदूं दिलीच नसती. सारांश युद्ध थांबविणें व शेतकऱ्यांना जमिनी

देणें हें कार्य करणारा कामगारवर्ग हा एकच वर्ग रशियांत उरला होता. भांडवलदारवर्ग सरंजामदारांस पाठिंबा देणारा असल्यानें व सरंजामशाही मोडल्यावांचून शेतकरी-कामकऱ्यांचें कल्याण होणार नाहीं हें कामकरी-शेतकऱ्यांस पटलेलें असल्यामुळें भांडवलशाही व सरंजामशाही मोडून कामगार-सत्ता स्थापन केल्यावांचून रशियन जनतेचा मोक्ष नाहीं ही गोष्ट कामकऱ्यांना पटलेली होती. या कामीं पुढाकार घेईल असा लेनिन व ट्रॉट्स्की यांचा एकच पक्ष देशांत होता. तेव्हां सर्व विध्वंस अथवा पारतंत्र्य टाळावयाचें असल्यास बोल्शेव्हिकांच्या नेतृत्वाखालीं कामगारसत्ता स्थापण्याखेरीज अन्य गति रशियास त्या वेळीं राहिलीच नव्हती.

रशियांत स्वदेशी भांडवलशाही कां वाढली नाहीं

पण सरंजामशाहींतून एकदम कामगारक्रांति करून भांडवलशाहीस काट दिल्यामुळें कार्लमार्क्सच्या इयत्ताक्रमाचा अथवा निमित्तनैमित्तिक क्रमाचा भंग झाला त्याची वाट काय? इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या भांडवलशाही राष्ट्रांच्या मानानें रशिया अतिशय मागासलेला होता व म्हणूनच त्यांत एकदम जगांत अद्याप कोठें न झालेली अशी सर्वांत वरच्या पायरीची कामगारक्रांति करावी लागली असें कांहींसें विरोधाभासात्मक उत्तर या प्रश्नास ट्रॉट्स्कीनें दिलें आहे.

भांडवलशाहीपूर्वी इंग्लंड-फ्रान्स वगैरे पाश्चिमात्य राष्ट्रांतील शहरांतून निरनिराळ्या धंदेवाल्यांचे संघ (गिल्ड्स्) असत. आणि खेड्यांच्या शेतीचा माल शहरांत व शहरांतील धंद्यांचा माल खेड्यांना जाऊन शहर व खेडीं यांचें दळणवळण व व्यापार वाढे. शहरांतील धंदेवाल्यांच्या या संघांचे धंदे व्यापारी भांडवलवाल्यांनीं केन्द्रीकृत भांडवलाचे बळावर आपल्या हातीं घेऊन धंद्यांचे संघ बुडविले. या भांडवलवाल्यांनीं आपली मजुरांची वाढती गरज भागविण्यासाठीं खेड्यापाड्यांतून सरंजामदारांच्या गुलामगिरींत खितपत पडलेल्या भूदास शेतकऱ्यांना, सरंजामदारांविरुद्ध असणाऱ्या राजांची मदत घेऊन, सरंजामदारांच्या गुलागिरींतून सोडविलें व भांडवलशाहीच्या चरकांत अडकविलें. पुढें यांत्रिक भांडवलशाहीचा उदय होऊन, भांडवलवाल्यांची धनसत्ता वाढूं लागली तशी त्यांनीं राज्ययंत्रास गवसणी घालून तेथें भांडवल-

शाही निर्माण केली. या भांडवलशाहीचा तेथें विकास होऊन जाऊन ऱ्हास होऊं लागला म्हणजे याच अनुक्रमानें तेथें कामगारशाही निर्माण झाली पाहिजे असें मार्क्सचें म्हणणें होतें. पण रशियाची प्रगति अशा क्रमानें झाली नाहीं. रशियाचें क्षेत्र अफाट होतें यामुळें शेतीच्या उत्पादनाची गरज जेव्हां जेव्हां वाढली तेव्हां तेव्हां रशियन शेतकऱ्यांनीं थोड्या क्षेत्रांत अधिक धन निर्माण करण्याची कला हस्तगत न करतां, ते सपाट प्रदेशावर फक्त पसरत सुटले. या शेतकऱ्यांच्या इतर गरजा त्यांच्या खोपटांतून चालणाऱ्या धंद्यांतून भागत, यामुळें शहरांशीं त्यांचा संबंध क्वचित येई, शहरें थोडींच असत. त्यांत धंद्यांचे संघ नव्हते. रशियन शेतकऱ्यांचा माल युरोपांत विकून त्यावर गबर होणारे व्यापारी, शेतकऱ्यांनीं निर्मिलेल्या धनावर चैन करणारे सरंजामदार व त्यांचीं शहरांत शिकायला राहणारीं चैनी मुलें, लष्करी पोषाख अंगावर घालून सर्व प्रकारच्या बेताल वर्तनास आपणास खास परवाना आहे असें मानणारे लहानमोठे सैन्याधिकारी, राजघराण्यांचे सगेसोयरे, या सर्वांवर मुकुटासारखी शोभणारी झार-झारीना आणि या सर्वांचे एकामागून एक आंखलेले अनीतीचे कार्यक्रम पार पाडणारे राजप्रासाद, नायकिणींचे व त्यांच्या लठ्ठयांचे व एजंटांचे अड्डे, दारूचे गुत्ते, रशियाच्या राजकारणांत कारस्थानें घडविण्यासाठीं राहणारे परराष्ट्रीय वकील आणि फुरसतीच्या वेळीं सर्वांची आध्यात्मिक करमणूक करणारे राजविलासी बुवा-गोसावी या सर्व अनुत्पादक फुकटखाऊंनीं सेंट पीटर्सबर्ग व मॉस्को हीं शहरें थाटलीं होतीं. इंग्लंड-फ्रान्समध्यें शहरांतून हळूहळू जो धनोत्पादक भांडवलदारवर्ग निर्माण झाला असें वर म्हटलें तो रशियांत निर्माण होऊंच शकला नाहीं. कारण युरोपियन शहरांतून उत्पादक धंदेवाल्यांचे संघ असत, तसे रशियांत नसून रशियन शहरें हीं फक्त भोगालयें होतीं. त्यांतून साहसी उत्पादक भांडवलदार निघणें शक्य नव्हतें.

मागासलेल्या रशियाशेजारीं असलेलीं सुधारलेलीं पाश्चिमात्य राष्ट्रें हीं रशियाचें मागासलेपण दृढ करण्यासच कारणीभूत झालीं. पाश्चिमात्य शस्त्रास्त्रें व पाश्चिमात्य नोकरशाही राज्यकारभार यांचा स्वीकार रशियन राज्यकर्त्यांनीं करून, समाजांत प्रगतिपर चळवळी होण्यास यशस्वितेनें प्रतिबंध घातला. यामुळें १८६१चे सुमारास इंग्लंड फ्रान्सचीं साम्राज्यें जगावर पसरून, त्यांचीं स्थिरस्थावर होत होती, त्या वेळीं रशियांत अजून भूदासपद्धति कायम होती.

१८६१त भूदासपद्धति रद्द झाली तरी शेतकऱ्यांना मालकीच्या जमिनी मिळूं शकल्याच नाहींत व त्यांचा असंतोष आगीसारखा भडकत गेला. संगिनी, बंदुका, तोफा या पाश्चिमात्य सुधारलेल्या शस्त्रांवर विसंबून असलेल्या झारनें असंतोष दडपण्याखेरीज कांहींच केलें नाहीं. अशा या सर्व बाजूंनीं मागासलेल्या रशियांत जी भांडवलशाही आली ती पश्चिमयुरोपांतून तेथील अगदीं सुधारलेलीं यंत्रें घेऊन आली. हें भांडवलशाही उत्पादन मात्र पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीनें किंवा अधिक प्रमाणांतच चालू झालें. शंभरांखालीं मजूर असणाऱ्या कारखान्यांत अमेरिकेंत शें. ३५ मजूर असत व रशियांत शें. १८ होते. शंभरांवर व एक हजाराखालीं मजूर असणाऱ्या कारखान्यांतून या दोन्ही देशांत जवळजवळ सारखेच मजूर होते. आणि एक हजारावर मजूर असणाऱ्या प्रचंड कारखान्यांत अमेरिकेंत शें. १८ मजूर असत, तेथें रशियांत अशा कारखान्यांतून शें. ४१चेवर मजूरसंख्या होती. कांहीं विभागांतून हें प्रमाण शेंकडा ५७चेवर गेलें होतें. (पोस्टवॉर वर्ल्ड). पण बैलाच्या पाठीवर जशा साखरेच्या गोण्या असाव्या तशी रशियाची या भांडवली धंद्यांबाबत अवस्था होती. हे धंदे रशियानें उभारलेले नव्हते. त्यांची आयात इंग्लंड-फ्रान्समधील बँकवाल्यांनीं केली होती. लोखंड, कोळसा, पेट्रोल असे रशियाचे प्राणभूत धंदे परकी बँकवाल्यांचे हातीं असत. रशियांतील राजे, सरदार, धनिकवर्ग या सर्वांचें भांडवल शेंकडा ६० टक्क्यांइतकें या धंद्यांतून असून, विदेशी बँकवाल्यांचें सुमारें ४० टक्क्यांइतकेंच होतें. पण विदेशी बँकवाल्यांनीं एकट पुष्कळसे भाग घेऊन पाश्चिमात्य तज्ज्ञांकरवीं धंद्यांचें चालकत्व आपल्या हातीं घेतलें असल्यानें रशियन भागीदारांची अवस्था, समोर आलेली गवताची पेंढी खाऊन पडून राहावें अशी, दाव्यास बांधलेल्या गुरासारखी होती.

हे विदेशी भांडवलवाले रशियांत एका निश्चित उद्देशानें आले होते. त्यांच्या देशांतून मजुरांची संघटना वाढून त्यांची राहणी महागाईची झाली होती व म्हणून ते मजुरी जास्त मागत. मागसलेल्या राष्ट्रांतून कच्चा माल आणावा, त्याचा महागाईच्या मजुरीनें पक्का बनवावा व परत मागसलेल्या राष्ट्रांत विकावा यामुळें उत्पादनखर्च वाढून नफा कमी

सुटे. म्हणून बँकांकरवीं मोठें भांडवल जमवून इंग्लंड-फ्रान्सचे भांडवलवाले मागसलेल्या राष्ट्रांत धंदे उभारण्यास जात. याच क्रमांत ते रशियांत आले होते व तेथील दरिद्री राहणीच्या मजुरांस पिळून काढून ते गबर होत होते. या विदेशी भांडवलशाहीनें आपल्या देशांत स्वतांच्या हातीं राज्यसत्ता घेऊन तेथें लोकशाहीचें काहीं तरी सोंग उभें केलें होतें; पण रशियांतील भांडवलवाल्यांनीं रशियांत राज्यसत्ता काबीज करून लोकशाही निर्माण केल्यास विदेशी चोरटे या नात्यानें आपली रशियांतून हकालपट्टी होईल अशी यांना भीति वाटत होती. म्हणून या विदेशी भांडवलवाल्यांनीं रशियांत पाय टाकल्यापासून झारशाहीच्या मुस्क्या विदेशी कर्जे व शस्त्रास्त्रें पुरविण्यानें आवळून भांडवलवाल्यांवरील व जनतेवरील झारच्या अनियंत्रित सत्तेस पाठिंबाच दिला व सरंजामशाही व झारशाही यांचें पोषण केलें. रशियन भांडवलवाल्यांनीं व भांडवलोपजीवी मध्यम वर्गांनीं या विदेशी गुलामगिरीस विरोध न करतां मानच तुकविली. शेतकरी व कामकरी यांची चोहों बाजूंनीं पिळणूक चालूं असल्यानें त्यांचा असंतोष भडकत होता. या असंतुष्टांची संघटना करून झारशाहीचा पाडाव करावा व राज्यसत्ता आपल्या हातीं घ्यावी हें भांडवलवाल्यांना अव्यवहार्य वाटत होतें. कारण भांडवल व जमिनी ज्या भांडवलदार व जामिनदार वर्गांचे हातीं होत्या त्या वर्गांकडून, झारशाहीचा पाडाव होतांच, शेतकरी-कामकरी हे जमिनी व भांडवल लुबाडून घेतील ही भीति भांडवलदार व जमिनदारवर्गास होती. विदेशी बँकवाल्यांच्या कृपेनें घरबसल्या भांडवलावर नफा मिळून चैन चालत होती व झारच्या सैन्यामुळें शेतकरी-कामकऱ्यांपासून या धनाचें रक्षण होत होतें. अशी सुखाची गादी सोडून झारशाहीचा शेतकऱ्या-कामकऱ्यांच्या बळावर पाडाव करण्याचा जुगार खेळण्यास भांडवलवाले तयार नव्हते. झारशाहीचा पाडाव होऊन इंग्लंड-फ्रान्ससारखें भांडवलशाही अमलांतले प्रचंड कारखाने व प्रचंड शास्त्रीय शेती त्यांना नको होती असें नाहीं. पण हें सर्व, भांडवलाचें व्याज जसें त्यांना घरबसल्या घरपोंच बिनबोभाट मिळत असे तसाच झारशाहीचा पाडाव होऊन भांडवलवाल्यांच्या हातीं सत्ता आल्याची बातमी त्यांना घरबसल्या बिनबोभाट मिळायला हवी होती. पण झार, झारीना, रासपुटीन, त्यांचे सगेसोयरे सेनापति व या कोणासहि

भांडवलवाल्यांबद्दल काडीमात्र आदर नव्हता व हातची सत्ता सोडण्याची इच्छा नव्हती. आणि अशा मुर्दाड झारशाहींशीं झगडून अखेरीस शेतकरी-कामकऱ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडण्यापेक्षां झारच्या छायेखालीं अथवा धोंड्याखालीं किड्याप्रमाणें निरुपद्रवानें पडून राहणें त्यांना सुखाचें व निर्धास्त वाटलें. १९०५ सालीं शेतकरी-कामकऱ्यांनीं जीं बंडें केलीं, तीं भांडवलवाल्यांना मान्य नव्हतीं. पण एवींतेवीं वणवा लागलाच आहे, थोडा हुर्डा भाजला तर पहावा म्हणून ते टपून होते. ऑक्टोबरच्या १७ तारखेस (१९०५) झारनें ड्यूमा नांवाची पार्लमेंट दिल्याचें जाहीर करतांच भांडवलवाल्यांनीं टाळ्या पिटल्या. 'जिंकली, बस पुरे' असें त्यांना होऊन गेलें. असें घबाड मिळालें होतें तरी काय ? कांहीं वरिष्ठ व धनिक वर्गास मताधिकार मिळून त्यांनीं ड्यूमा निवडावी असें ठरलें. या ड्यूमाला एकहि मंत्री नेमण्याचा अथवा एकाहि मंत्र्यावर ताबा चालविण्याचा अधिकार नव्हता. तथापि अमेरिकेच्या एखाद्या लटक्या विद्यापीठाचा पीएच्.डी. होण्यांतहि जसें कित्येकांना भूषण वाटतें, त्याप्रमाणें इंग्लंड-फ्रान्ससारखें 'पार्लमेंट' आपणांसहि मिळालें यांतच या भांडवलवाल्यांना भूषण वाटलें. शिवाय अधिकारासाठीं हट्टून बसण्याची सोय नव्हती. शेतकरी-कामकरी चेव चढून लढत होते. हें प्रकरण आणखी चिडीस पेटल्यास भांडवलशाहीची व जमिनदारशाहीची त्यांत आहुति पडेल ही १९०५ सालीं भांडवलदार व जमिनदार यांना भीति वाटून त्यांनीं बंड दडपण्यास झारला मदत केली. १९१७च्या फेब्रुवारींत कामगारांनीं बंड केलें असतां अगदीं अखेरपर्यंत बंड थंड पाणी शिंपडून किंवा ऊन पाणी उडवून अथवा गोळ्या घालून शमवावें याबद्दल भांडवलवाल्यांचा पुढारी रॉड्झिअँको हा सेनापतीशीं हुजत घालीत होता. पुढें कामकरी व सैनिक यांनीं झारला हुसकून लावलें व बोल्शेव्हिकांनीं भांडवलवाल्यांना अगदीं शब्दशः घरबसल्या घरपोंच व बिनबोभाट राज्यदान केलें; तें त्यांनीं घेतलें. पण बँकेच्या व्याजाप्रमाणें ही राज्यसत्ता चघळत चघळत आराम करावा अशी त्यांची इच्छा होती. क्रांतीनें उत्पन्न केलेला प्रत्येक प्रश्न— युद्ध थांबविणें, शेतकऱ्यांना जमिनी देणें वगैरे— सोडविण्यास हात घालणें म्हणजे स्वतःसह सगळ्या समाजव्यवस्थेस अग्नि लावणें आहे हें त्यांस दिसत होतें. तें त्यांस टाळावयाचें होतें. पण रशियांतील असंख्य जनतेस हा आगीचा भडका करण्यावांचून

सुटका नसल्यानें त्यांनीं हातांत दिवट्या घेऊन झारशाही, सरंजामशाही, जमिनदारशाही, भांडवलशाही या सर्वांस अग्नि लावला व या सर्व उकिरड्याखालीं कुजणारा रशिया, इतर राष्ट्रांप्रमाणें मोकळ्या हवेंत थरारून वाढण्यासाठीं मोकळा केला.

झारशाहीचा पाडाव करूनं भांडवलशाहीची स्थापना करणें शक्य असतांहि लेनिन-ट्रॉट्स्की यांनीं त्या घटनेस विरोध केला असें नव्हे. झारशाहीचा व सरंजामशाहीचा पाडाव करण्याची भांडवलवाल्यांना ताकद नव्हती व इच्छाहि नव्हती. तें काम करण्यास फक्त शेतकरी-कामकरीच समर्थ होऊं शकतील व त्यांना तसें करण्यावांचून गत्यंतर राहणार नाहीं असा लेनिन-ट्रॉट्स्की व सर्व बोल्शेव्हिक पुढारी यांचा, इतिहासावरून बांधलेला तर्क होता. त्यांनीं त्या दिशेनें खटाटोप केला व त्यांचा तर्क खरा ठरून त्यांना यश आलें.

मार्क्सचा अनुक्रम कोणत्या प्रकारें सिद्ध झाला

पण निदान, सरंजामशाहीमागून भांडवलशाही व तीपाठीमागून कामगारशाही हा मार्क्सचा इयत्ताक्रम अथवा निमित्तनैमित्तिक क्रम चुकला असें तरी येथें म्हणवयास नको काय? 'नको' असें लेनिन व ट्रॉट्स्की यांचें या प्रश्नास उत्तर आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका वगैरे राष्ट्रांमध्यें जी भांडवलशाही झाली, ती प्रथम राष्ट्रीय स्वरूपाची असली, तरी थोड्याच कालांत जागतिक बनली. पुढारलेल्या देशांतून मागासलेल्या परदेशांत भांडवल कसें व कां जातें हें वर सांगितलें आहे. हें भांडवल जेथें जेथें जातें तेथें तेथें आपल्या मालक राष्ट्राची 'भांडवलशाही' म्हणजे भांडवली सत्ता निर्माण करतें. धार काढण्यासाठीं आपण जसे गाईचे पाय बांधतों, त्याप्रमाणें ही परकी भांडवलशाही या मागसलेल्या राष्ट्रास जखडून टाकून त्याची पिळणूक करते. नांगरास जुंपावयाच्या बैलाचा वंशनिर्मितीचा गुण शेतकरी छिनून टाकतो, त्याप्रमाणें परकी भांडवलशाही मागसलेल्या राष्ट्राची प्रगतिशीलता खुडून टाकण्यास झटत असते. मार्क्सच्या विचारसरणीचा आशय असा होता कीं, माणसाचें उत्पादनसामर्थ्य वाढत असतां सरंजामशाहीमुळें समाजाची प्रगति खुंटूं लागली, कीं सरंजामशाहीरूपी कवच फोडून

समाज भांडवलशाही धारण करतो. पुढें हें भांडवलशाहीरूपी कवचहि प्रगति पावण्यासाठीं धडपडणाऱ्या समाजास अडथळा करूं लागलें, कीं भांडवलशाहीरूपी कवच फोडून कामगारशाहीचें कवच समाज धारण करतो. या विचारसरणीप्रमाणें पाहतां रशियामध्यें इंग्लंड-फ्रान्सच्या बँकांच्या द्वारा जी ब्रिटिश, फ्रेंच अथवा इतर राष्ट्रांची भांडवलशाही आपला कारखान्यांचा पसारा मांडून बसली होती, ती रशियांतील समाजजीवनाचा कोंडमारा करीत होती, त्याची प्रगति होऊं देत नव्हती हें आपण वर पाहिलेंच आहे. सरंजामशाही-भांडवलशाही-कामगारशाही हा क्रम प्रत्येक राष्ट्रांत वेळवेगळा म्हणजे स्वतंत्रपणें घडला पाहिजे असा मार्क्सचा आशय नाहीं. भांडवलशाही स्वदेश व्यापून परदेशांत, जगभर पसरली, कीं ती राष्ट्रीय न राहतां जागतिक होते. एका राष्ट्रांतील भांडवलशाही राज्याची सत्ता बँकांच्या द्वारा परदेशांवर पसरते. या घटनेस लेनिन साम्राज्यशाही म्हणतो. 'इम्पीरिॲलिझम्' या आपल्या ग्रंथांत तो सांगतो, कीं निरनिराळ्या भांडवली राष्ट्रांची साम्राज्यशाही सर्व जग व्यापून, तिच्या वाढीस नवीन वाव न उरल्यामुळें, जगांतील मानवजातीचा कोंडमारा करते. म्हणजे मार्क्सच्या अनुक्रमानुसार भांडवलशाहीचा उदय, उत्कर्ष संपून जो ऱ्हासकाल यावयाला पाहिजे तो साम्राज्यशाहीनें जग व्यापलें म्हणजे जगभर सुरू होतो. भांडवलशाहीनें जग व्यापून साम्राज्यशाहीचें रूप धारण केलें, म्हणजे तिचा जागतिक घटना या दृष्टीनें विचार करणें भाग पडतें. या अर्थानें पाहतां रशियांत स्वदेशी भांडवलशाही झाली नाहीं तरी परदेशी भांडवलशाही आली, या अर्थानें भांडवलशाहीचा कालखंड होऊन गेला, हें मान्य करावें लागेल. या विदेशी भांडवलशाहीनें रशियांत आगगाड्या, कारखाने वगैरे उभारून प्रगतिहि केली. या अर्थानें तिचा उदय व उत्कर्षहि झाला. पुढें मात्र तिचा प्रगतिगुण, दिव्यांतलें तेल संपावें तसा संपून अथवा अन्नाचें विष व्हावें त्याप्रमाणें विकृत होऊन, रशियन जनतेच्या जीविताची कुचंबणा, अडवणूक व अवनति करूं लागला. तेव्हां बोल्शेव्हिकांनीं कामगारांकरवीं झारशाहीचें, सरंजामशाहीचें व त्यांच्या आधारावर पोसलेल्या व यांनाहि उलट पोसण्याऱ्या विदेशी साम्राज्यशाहीचें कवच फोडून रशियन राष्ट्राच्या प्रगतीची वाट मोकळी करून दिली. अशा जागतिक दृष्टीनें पाहतां रशियांतहि सरंजामशाही, भांडवलशाही व कामगारशाही हा अनुक्रम

घडून आलाच. फरक इतकाच म्हणतां येईल, कीं विदेशी भांडवलशाहीस रशियन सरंजामशाहीचा मोड करतां न येऊन त्या दोहोंनीं सख्य केलें. तेव्हां कामगारांनीं पुढें होऊन त्या दोहोंचाहि संहार केला व कामगार-शाहीचा कालखंड सुरू केला.

कामगारच भांडवलशाहीचा पाडाव करतात म्हणजे काय ?

मार्क्सनें कामगारच भांडवलशाहीचा पाडाव करतील असें म्हटलें असून लेनिन व ट्रॉट्स्की यांनीं कामगारांकरवीं ही घटना प्रत्यक्ष सृष्टींत निर्माण केली यासंबंधीं एक महत्त्वाचा मुद्दा अभ्यासकांनीं नेहमीं ध्यानांत ठेवणें जरूर असतें. त्यावांचून मार्क्स-लेनिन-ट्रॉट्स्की यांच्या क्रांतिशास्त्राचें रहस्य समजूं शकत नाहीं. इंग्लंडांतील प्रसिद्ध मजूर पुढारी रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनीं बरेच वर्षांपूर्वी 'स्टेट अॅन्ड सोशॅलिझम्' या नांवाचा एक द्विखंडात्मक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत लोकशाहीचा विकास कसकसा झाला हें सांगितलें असून आधीं राजा, मग सरदारवर्ग व मग सामान्य जनता असा थोडक्यांतून पुष्कळांकडे राज्यसत्तेचा विकास झाल्याचें सांगितलें आहे. या भाकडकथे-प्रमाणें आधीं मूठभर सरंजामदारांकडून त्याहून अधिकसंख्य भांडवलदारांकडे व नंतर भांडवलदारांहून अधिकसंख्य अशा कामगारांकडे राज्यसत्ता व अर्थसत्ता जाते. सूर्यबिंबापासून निघणारा प्रकाश जसा सभोंवार जगभर पसरतो अथवा वेदांत्याचें परब्रह्म जसें सूक्ष्मांतून व्यक्तांत पसरत जातें, तसा मार्क्सचा प्रगतिक्रम आहे असें म्हटलें तर मोठें मोहक दिसेल. पण तें सत्य नव्हे. अशा युक्तिवादानें कोणाची थोडी-फार सोय झाली तरी त्यांत सत्याचा अंशहि नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रशियांत भांडवलदारांनीं सरंजामशाहीचा पाडाव केला नाहीं तेव्हां कामगारांकडे तो उरकण्याचें काम ओघानेंच व अपरिहार्यतेनें आलें असें मागें म्हटलें आहे, हें निःसंशय खरें आहे. पण मार्क्स, लेनिन, ट्रॉट्स्की वगैरे लेखक भांडवलशाहीचा पाडाव करण्याचें काम जेव्हां कामगारवर्गावर सोपवितात, तेव्हां केवळ सर्व वर्ग पळून गेल्यामुळें उरलेल्या या एका वर्गाकडे हें काम सोपवावें अशा अर्थानें अथवा थोड्यांतून पुष्कळाकडे अथवा सूक्ष्मांतून स्थूलाकडे अशा अर्थानें सोपवत नाहींत; तर भांडवलशाहीच्या रचनेंतील कामगारांच्या विशिष्ट स्थानामुळें कामगारवर्गाचे

अंगीं कांहीं विशेष प्रकारचें बल येतें व तें त्यांना भांडवलशाहीचा पाडाव करण्यास उपयोगी पडतें असें त्यांचें सांगणें आहे.

याचाहि अर्थ असा नव्हे, कीं स्कॉटिश, आयरिश, जर्मन, ऑस्ट्रियन, रोहिले, शीख, गुरखे वगैरे जशा लढाऊ जाती जगांत आहेत असें मानण्यांत येते तशी कामगार ही एक लढाऊ जात आहे. कामकरी अथवा प्रॉलेटॅरियट हा शब्द वापरतांना जाति अथवा वंश यांचा विचार मार्क्स करीत नसून आर्थिक व सामाजिक रचनेंत अमुक एका ठिकाणीं असणारीं माणसें असा अर्थ मार्क्सला अभिप्रेत आहे. निवळ मनुष्य या नात्यानें निग्रो हा केव्हांहि निग्रोच आहे; पण तो विशेष प्रकारच्या आर्थिक समाजरचनेंत आला म्हणजे तो गुलाम होतो अशा अर्थाचें एक वाक्य मार्क्सच्या 'वेज–लेबर अॅन्ड कॅपिटल' या निबंधांत आलें आहे. सोनें हें मूळचेंच कांहीं भांडवल नव्हे, तें भांडवलशाही समाजरचनेंत भांडवल होतें असा दृष्टांत तेथें मार्क्सनें दिला आहे. याच अर्थानें कामगार अथवा प्रॉलेटॅरियट याचा अर्थ भांडवल अधिकाधिक केन्द्रीभूत होणाऱ्या भांडवलशाहींतील कारखान्यांतला मजूर असा होतो. स्वतांच्या श्रमशक्तीवांचून ज्याला चरितार्थसंपादनाचें कांहींच साधन नाहीं तो कामगार व धनोत्पादनाचें साधन मालकीचें असून त्यावर कामगारांकरवीं जो धन उत्पन्न करतो तो भांडवलदार, अशी या दोन शब्दांची व्याख्या मार्क्सिस्ट वाङ्मयांत येत असते. ती शास्त्रशुद्ध आहे यांत शंकाच नाहीं. पण 'कामगार भांडवलशाहीचा पाडाव करतो व त्यांनीं करावा' असें जेव्हां मार्क्स सांगतो तेव्हां कामगारास त्याच्या विशिष्ट स्थानामुळें प्राप्त झालेलें मारक सामर्थ्य तो दर्शवीत असतो. प्राण्याच्या शरीरांतील शक्ति ही मूळची एकच असली तरी एकाच प्राणिशरीरांतील बलें व मर्मस्थलें निरनिराळीं आहेत. माणसाचें मनगट व हाताचा सगळा पंजा यांत असलेली शक्ति इतर अवयवांत नाहीं. सर्व शरीर तोलण्याचें विलक्षण सामर्थ्य पायांतच आहे. हींच बलस्थानें मर्मस्थानेंहि झालीं आहेत. एकादा कुशल पहिलवान प्रतिपक्षाचें नुसतें पाऊल पकडून त्यास हवा तसा उलटा-सुलटा नाचवूं शकतो असें आपण अनेकदां पाहिलें आहे. बैल अथवा बकरा यांचीं शिंगें बळकट धरतां आल्यास त्यांच्या शरिराच्या इतर कोणत्याहि अवयवापेक्षां शिंगांनीं खेचून त्यास धूळ चारतां येते असें सर्कशींत वगैरे दाखवितात. समोरून वाघ चालून आला

असतां हत्ती त्यास ठार मारूं शकतो पण तोच पाठीमागून वाघ अंगावर चढल्यास हत्तीचें कांहीं चालत नाहीं असें सांगतात. तरवारीनें मनगट, दंड अथवा खांदा कापण्यास श्रम पुष्कळ पडतील पण त्यानें माणूस मरणार नाहीं. पण पाठीमागून मुकाट्यानें डाव्या बरगडींत तरवारीचें टोक खुपसल्यास काळीज फोडून माणसास फार थोड्या श्रमानें ठार मारतां येतें हें जगांतील सर्व हलकट लोकांना माहीत असतें. सारांश, प्राणिशरीर म्हटलें कीं त्यांचीं विशिष्ट बलस्थानें व मर्मस्थानें असतात. त्या शरीराकडून विशिष्ट कार्य करून घ्यावयाचें असल्यास त्या विशिष्ट बलस्थानास प्रेरणा करावी लागते किंवा उलट पक्षीं त्या शरीराचा पराभव करणें असल्यास त्या विशिष्ट मर्मस्थानावर आघात करावा लागतो. जिवंतपणा हा सर्व प्राण्यांत येथून तेथून सामान्यतः एकच असतो. वासना अथवा भीति या गुणांनीं सृष्टिव्यवहाराशीं प्रतिक्रिया दर्शविण्याचें कार्य सर्व प्राणी सामान्यतः एकच प्रकारें करतात. गवत पाहून तें खाण्यासाठीं गाय तिकडे धाव घेते व तरवार घेतलेला मनुष्य पाहिला असतां त्यापासून ती दूर दूर धावते, हा सर्व प्राणिमात्रांची सहजप्रवृत्ति दाखविणारा शंकराचार्यांचा शारीरभाष्यांतील दृष्टांत जगप्रसिद्ध आहे. पण या प्रवृत्ति सर्व प्राणिमात्रांस सामान्य असूनहि निरनिराळ्या शरीररचनांवरून निरनिराळ्या प्राण्यांचें कर्तृत्व वेगवेगळें असतें. उदाहरणार्थ गाईस पक्ष्याप्रमाणें उडतां येत नाहीं याचें कारण शरीररचनाभेद. तसेंच त्यामुळें प्रत्येकाचें बलस्थान व मर्मस्थान शरीररचनापरत्वें वेगवेगळें असूं शकतें. व्यक्तिशरीराचें हें सर्व विवेचन समाजशरीरासहि सर्व असेंच्या असेंच लागू आहे हें येथें सांगायचें आहे.

समाज म्हणजे कांहीं उसाची मोळी अथवा भोपळ्याची मोट नव्हे; अथवा हवेंत तरवारी फिरवीत रानोमाळ धावत सुटणारें मराठ्यांचें सैन्य नव्हे. प्राणिशरीर जिवंत व कार्यक्षम राहण्यास जशी त्याच्या अवयवांची विशिष्ट रचना व मजबूत बांधणी केलेली असते तशी समाजरचना जिवंत व कार्यक्षम राहण्यास तींतील घटकांची विशिष्ट तऱ्हेनें आंखणी व बांधणी केलेली असते. संकटापासून बचाव करून व चरितार्थसाधन प्राप्त करून घेऊन प्राणधारणा करणें हें प्राणिमात्रास आपोआप साध्य होत नसून खटाटोपानेंच साध्य होत असतें. मनुष्येतर सृष्टींत कांहीं वन्य पशुपक्ष्यांत संकटनिवारणासाठीं कळप करून परस्परावलंबनानें राहण्याची पद्धति आहे. पण चरितार्थसंपादन, मादी मिलास

खाऊं घालते एवढा अपवाद सोडल्यास, प्रत्येक प्राणी स्वतांचें स्वतां करीत असतो. सामान्यतः प्रत्येक प्राणी आर्थिक बाबतींत स्वयंपूर्ण असतो. पण मनुष्य-सृष्टींत फार पूर्वीपासून चरितार्थसंपादनाचें कार्य श्रमविभागानें व सामुदायिक पणें होत असतें. शेतकरी सगळ्या समाजासाठीं धान्य पिकवतो, लोणारी सर्व समाजासाठीं लांकडें तोडतो, कुंभार सर्व समाजाचीं भांडीं करतो राजा दंडधारण करून संकटनिवारण करतो,..... आणि हे सर्व वर्ग आपापल्या मालाची (अथवा सेवेची) देवघेव करितांत व त्या योगें व्यक्ति आणि समाज टिकवून धरतात. शत्रूशीं झगडण्यासाठीं एकाद्या सैन्याची विशिष्ट तऱ्हेनें रचना करण्यांत येते त्याप्रमाणें सृष्टीशीं झगडून संकटनिवारणासाठीं चरितार्थ-संपादनाच्या निरनिराळ्या भूमिका निरनिराळ्या वर्गांस वाटून देऊन समाज-शरिराची चरितार्थसंपादनासाठीं विशिष्ट प्रकारची रचना केलेली असते. केवळ पोट भरून जगणें हेंच कांहीं माणसाचें इतिकर्तव्य नव्हे; त्यास संस्कृति, कीर्ति, आत्मानंद यांचीहि गरज आहे व त्यासाठींहि तो झटतोच. पण संकटनिवारण व चरितार्थसंपादन (अथवा संकटें हीं बहुतेक चरितार्थसंपादन व रक्षण याच कामीं विशेष येत असल्यानें, मुख्यतः चरितार्थसंपादन) यासाठींच समाजरचना केलेली असते. अर्थात् धनोत्पादनाचा प्रकार जसा असेल तदनुरोधानें त्यास युक्त असें समाजाचें रूप असतें. समाजांत जे कायदे, संकेत वगैरे असतात ते त्या समाजाचें स्वरूप उत्पादनप्रकारास अनुकूल असें कायम राखण्यासाठीं अस्तित्वांत येतात. याप्रमाणें गुलामगिरी हा एकदां उत्पादनप्रकार होता. भूदास-पद्धतीची शेती हा एकदां उत्पादन-प्रकार होता. आतां भांडवलशाही हा उत्पादन-प्रकार आहे. या उत्पादन-प्रकारांत बदल झाले तसतसें मानव समाजाचें रूप बदललें. मार्क्सला जेवणा-खाणाचे दृष्टांत फारसे सुचत नसून नेहमीं लढाऊ दृष्टांतांची आवड असे. उत्पादनप्रकार व समाजरचना यांचा संबंध दाखवितांना तो 'वेज-लेबर ॲन्ड कॅपिटल्' या निबंधांत सांगतो, लढाईचें हत्यार बदललें म्हणजे सैन्याची सर्वची सर्व रचना बदलावी लागते. उदाहरणार्थ धनुष्यबाणानें लढणाऱ्या सैन्याची रचना तें सैन्य तरवारींनीं, घोडेस्वारांनीं, भाल्यांनीं लढूं लागलें म्हणजे बदलावी लागते. बंदुका, मशिनगन्स, विमानांतून पडणारे बाँब या नव्या हत्यारांनीं सैन्यांची रचना कशी बदलली आहे हें आपणांस ठाऊक

आहे. तसेंच समाजाचा घट्टपणा, ठाशीवपणा, आंखीवपणा अथवा विस्कळीतपणाहि धनोत्पादनप्रकारावर अवलंबून असतो. जुन्या पद्धतीनें खेडयांतून शेती करणारा नांगऱ्या शेतकरी हडकुळ्या बैलांनीं, लंगडया पायांनीं, कासराभर दिवस आगें-मागें झाला तरी फिकीर न करतां नांगर हाकीत असतो. पण अमेरिकेंतल्या प्रचंड कारखान्यांत एकाद्या यंत्रास सुरू होण्यास इतरांपेक्षां दहा मिनिटें उशीर झाला तर लाखों डॉलरांचें नुकसान होतें. एकादें यंत्र मध्येंच बंद पडल्यास अनेक अपघात होऊं शकतात. एका यंत्राच्या लहानापासून मोठ्या भागापर्यंत जे हजारों भाग असतात त्यांतील एकादा नसल्यास अथवा वाईट असल्यास तें यंत्र अडून राहतें अथवा मोडून पडतें. भांडवलशाही समाजाची रचनाहि या यंत्रासारखी आंखीव, घाटीव, नियमित झाली आहे. भांडवलशाही समाज हें एक असें यंत्र झालें आहे. त्याचा एकादा भाग थोडासा विकल झाला कीं तें सर्व लगेच डबघाईला येतें. एक दिवस टपालाला दहा मिनिटें उशीर झाला, कीं लाखों रुपयांचें नफानुकसान होतें. आगगाडीच्या रुळाचा यःकश्चित सांधा वेळींच बदलला नसला तर लाखों रुपयांचा व शेंकडों माणसांचा चुराडा होऊं शकतो. या आंखीवपणांत, नियमितपणांत यांत्रिक उत्पादनाचें व तदनुसारी मानवसमाजाचें सामर्थ्य साठविलेलें आहे. अर्थात् व्यक्तीला काय किंवा समाजाला काय जसें बलस्थान असतें, तसेंच मर्मस्थानहि असतें असें मागें म्हटलें आहे. पुष्कळदां बलस्थान व मर्मस्थान एकच असूं शकतें. माणसाचें डोकें हें, त्यांतच मेंदू व पंचज्ञानेंद्रियें असल्यानें, त्याचें बलस्थान आहे. पण या डोक्याचा निकाल झाला तर मनुष्यहि खलास होऊं शकतो. म्हणून तें मर्मस्थानहि आहे. तसेंच भांडवलशाही समाजरचनेचेंहि आहे असें मार्क्सचें म्हणणें आहे. आगगाडया, आगबोटी, गिरण्या, कारखाने, बँका हीं भांडवलशाहीचीं बलस्थानें आहेत तशींच मर्मस्थानेंहि आहेत. यांचा भांडवलवाल्यांना नफा मिळवून देतील असा वापर करण्याची कला कामगारांचे अंगीं असून तेच त्यांना कार्यक्षम राखीत असतात. कामगारांना हें विशेष प्रकारें स्थानबल प्राप्त झालेलें असतें. एक क्षणभर हे सर्व व्यवहार थांबविणें शक्य झाल्यास विजेच्या धक्क्यानें शरिरांतील जीवनव्यापार जसे स्थगित होतात तद्वत् भांडवलशाही स्थगित करण्याचें बल कामगारवर्गाचे हातीं आहे असें मार्क्स, लेनिन, ट्रॉट्स्की वगैरे कम्युनिस्टांचें

म्हणणें असतें. सर्व माणसें ईश्वराचीं सारख्याच दर्जाचीं लेकरें आहेत असें धर्मशास्त्र सांगत असेल; सर्व नागरिक सारख्याच दर्जाचे आहेत असें एकादा लोकशाहीचा लबाड प्रधान म्हणत असेल. पण सेनापति सर्व माणसें सारखीं अथवा लढण्यासाठीं सर्व जागा अथवा सर्व हत्यारें सारखीं लेखीत नाहीं. भांडवलवाला सर्व मजूर व सर्व यंत्रें सारख्याच दर्जाचीं मानीत नाहीं व कम्युनिस्ट पुढारी, शेतकरी, मजूर, कारकून, मास्तर, वकील राजा, उमराव, सैनिक, सेनापति तसेंच कारखाना, शेती, रणांगण हीं सर्व सारखीं लेखत नाहीं. भांडवलशाही समाजाचा ऱ्हास होत जाणार हें मार्क्सला दिसत असून त्याचा अंत कसा व कोणीं करावा हें मार्क्स शोधीत होता. त्यासाठीं त्यानें भांडवलशाही समाजयंत्राचें रूप सर्व बाजूंनीं निरखून पाहिलें व त्याचीं मर्मस्थानें कारखानी कामगारांच्या हातीं आहेत हें त्यानें दाखवून त्यांना प्रतिकारास प्रवृत्त केलें. यांत्रिक कारखान्यांनीं समाजांतील धन वाढतें, केंद्रीभूत होतें; तसेंच कामगारहि वाढतात व केंद्रीभूत होतात. दिवसानुदिवस कारखान्यांचे मालक आपल्या हातीं अधिकाधिक कारखाने घेत असतात व ते सुधारीत असतात, पण त्याबरोबरच कामगारांच्या हातीं अधिकाधिक कारखाने येत असतात व समाज शरीराचें नियंत्रण करण्याइतकें प्रभुत्व त्यांना प्राप्त होत असतें. कारकून वगैरे मध्यमवर्ग अथवा शेतकरी सैनिक या वर्गांचे हातीं भांडवलशाहीचा यांत्रिक पसारा नसतो व तो वापरण्याचें कसबहि नसतें. यामुळें एकंदर समाजांत कामगार हा बली ठरतो. या कामगारवर्गास त्याच्या या बलाची जाणीव करून दिल्यास ऱ्हास पावूं लागलेल्या भांडवलशाहीस तो उलथून पाडूं शकतो हें मार्क्सनें आपल्या अनुयायांस शिकविलें असून कामगारांना लहान लहान दुःखांची जाणीव करून द्या, त्यासाठीं त्यांना लढण्यास शिकवा व ही लढ्याची कला त्यांच्या अंगीं बाणवून त्यांजकडून क्रांति करवून घ्या असें मार्क्सनें सांगितलें आहे. लेनिन, ट्रॉट्स्की वगैरे मार्क्सिस्टांनीं आयुष्यभर हाच उद्योग केला.

कामगारेतर वर्गांचा क्रांतीस उपयोग

सैनिक, शेतकरी, मध्यमवर्ग यांच्या बलाची कम्युनिस्ट अगदींच उपेक्षा करतात असें नव्हे. फ्रान्समध्यें १८४८-५२ व १८७० या सालीं कामगारांनीं उठावणी केली असतां त्यांना जो जबर पराभव खावा लागला त्यासंबंधीं

मार्क्सनें लिहिलेल्या 'एटीन्थ ब्रुमायर' व 'सिव्हिल वॉर इन फ्रान्स' या दोन निबंधांत खेडोपाडच्या शेतकऱ्यांचा पाठिंबा शहरच्या कामगारांना मिळाला नाहीं म्हणून कामगारांचा मोड झाला असें मार्क्सनें दाखविलें आहे. पण त्याबरोबरच शेतकरी (जुन्या पद्धतीनें शेत कसणारा शेतकरी) हा भांडवलशाहीचा पाडाव करण्यास असमर्थ असतो असें मार्क्सनें ठासून सांगितलें आहे. मागासलेल्या पद्धतीनें शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची वसाहत विस्तृत प्रदेशावर दूरदूर होत असल्यानें त्यांची संघटना होऊं शकत नाहीं; व्यवसायजन्य शारीरिक जडता व बौद्धिक मूढता ही त्यांस कोणत्याहि प्रकारच्या प्रतिकारास सर्वथैव अपात्र ठरविते आणि तो शेतकरी बैलासंगतीं बैलासारखा आपलें जिणें हताशपणें घालवितो. रशियांतले शेतकरी शेंकडों वर्षें नरकांतल्याप्रमाणें भयंकर दुःख भोगीत होते पण झारशाहीच्या नखासहि ते धक्का लावूं शकले नाहींत. उलट यांत्रिक कारखान्यांची वाढ रशियांत एकोणिसाव्या शतकाच्या केवळ शेवटच्या चतुर्थांपासून होऊं लागली तरी सुद्धां १९०५ सालीं मूळचे शेतकरी असलेल्या कामगारांनीं झारशाहीला एका धक्क्यानेंच डळमळावयास लाविलें आणि १९१७ सालीं आणखी एका धक्क्यानें झारशाही सरंजामशाही व भांडवलशाही हा सर्व पसारा धुळीस मिळाविला. अर्थात् या सर्व कालांत शेतकऱ्यांनीं खेड्यापाड्यांतून उठावणी करून झारशाहीचा सर्व पाया उखडून काढिला यामुळेंच कामगारांना यश आलें हें खरें. पण हें यश शेतकऱ्यांना स्वतःच्याच बलावर मिळवितां आलें नसतें हेंहि तितकेंच खरें आहे. म्हणून शेतकऱ्यांचा पुढारी कामगारवर्ग झाला किंवा कामगारांस शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळाला म्हणजेच भांडवलशाहीचा पाडाव होऊं शकतो एरवीं नाहीं असें कम्युनिस्टांचें म्हणणें आहे. कामकरी व शेतकरी यांच्या समवायांतच याप्रमाणें बल असतें व तें कामगारवर्ग हा पुढारी व शेतकरी त्याचा पाठीराखा अशा रचनेंत असतें हें ओळखूनच झारशाहीचा पाडाव झाल्यावर कामकरी व शेतकरी यांची मुखत्यारी स्थापन करावी असें १९०५ सालीं लेनिन सांगत होता.

कामकरी व शेतकरी यांची ध्येयभिन्नता

संघटनेच्या दृष्टीनें शेतकरीवर्ग हा दुर्बल असतो हें मागें सांगितलेंच. पण कामगारांनीं चालविलेल्या क्रांतिकारक झगड्यांत शेतकरीवर्गाचा पाठिंबा

मिळतो तेव्हांहि शेतकरी कामगारवर्गाशीं ध्येयाचे बाबतींत एकरूप होऊन मिळत नाहीं. आगगाड्या, कारखाने, बँका हा जो भांडवलशाहीचा पसारा असतो तोच भांडवलशाही राज्यघटनेचा प्राण धारण करणारा सांगाडा असतो. यावर ताबा मिळाल्याखेरीज कामगाराची आर्थिक गुलामगिरींतून सुटका होत नाहीं. पण यावरचा ताबा हा फक्त सामुदायिक मिळूं शकेल. वीतवीत-भर जमीन जशी शेतकरी तोडून घेऊं शकतो तशी कामगार आगगाडी तोडून घेऊं शकणार नाहींत. म्हणून कामगारवर्गास आर्थिक व म्हणून राजकीय सत्ता सबंध वर्गानें धारण करणें भाग पडतें. यामुळें राजकीय व आर्थिक क्रांतीशीं कामगाराचा लढा हा अभेद्यपणें निगडित असतो. शेतकऱ्याची शेती ही मागसलेली असल्यानें प्रत्येक शेतकऱ्यांस मालकीचा शेतीचा तुकडा असणें अवश्य वाटतें. तेवढ्यानें त्याची आर्थिक गुलामगिरी संपूं शकते. अशी त्याची समजूत होते. शिवाय राजकीय सत्ताकेंद्रापासून तो फार दूर असतो. राजकीय सत्ता त्यावर झडप घालूं शकते; उलट संघटनादौर्बल्यामुळें राजकीय सत्तेस तो मात्र विरोध करूं शकत नाहीं. पण कामगारांनीं निकराचा राजकीय झगडा चालविलेला असल्यास खेड्यापाड्यांतून शेतकऱ्याचे अंगावर पसरलेले राजकीय वर्चस्वाचे पाश तो तोडून टाकूं शकतो. बलाचे दृष्टीनें शेतकरी कमकुवत खरा, पण शेतीचें धन हें जें मानवजातीचें मुख्य धन त्याची निपज, क्रयविक्रय, ने-आण हाच देशांतील अथवा जगांतील आर्थिक व्यवहार आहे. शेतकऱ्यांस मालकीची जमीन देऊन त्याच्या आर्थिक जीवनाची जोपासना राज्यसत्तेनें केली तर वरील राज्यसत्ता एकाकडून दुसऱ्याकडे गेली तरी शेत-कऱ्याला त्याची फिकीर नसते, किंबहुना जो खाजगी जमीन देईल त्याची राज्यसत्ता पोसण्यास शेतकरी तयार असतो. झारशाही, सरंजामशाही यांनीं शेतकऱ्याला खाजगी जमिनी दिल्या नाहींत यामुळें रशियांतल्या कामगाराला त्याच्या क्रांतिकारक लढ्यांत शेतकऱ्याचा पाठिंबा मिळाला. पण कामगार आपली राजकीय व आर्थिक सत्ता भांडवलशाहीच्या पसाऱ्यावर स्थापूं पाहत होता, भांडवलशाही मोडून कामगारशाही स्थापूं पाहत होता. तर शेतकऱ्यास खाजगी जमीनच हवी होती, राजकीय सत्तेबद्दल त्याची कांहींशी उपेक्षा-वृत्तिच होती ही गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

सैनिकांचें क्रांतींत स्थान

सैनिक हे इतर बहुतेक शेतीप्रधान देशाप्रमाणें रशियांत शेतकऱ्यांतून आले होते. निवळ शेती कसणारा व शेतीच्या मालकीसाठीं तळमळणारा या नात्यापेक्षां लढाऊ सैनिक या नात्यानें शेतकऱ्यानें कामगारांस क्रांतीचे कामीं जी मदत केली ती अतिशय महत्त्वाची होती; किंबहुना तीच निर्णायक होती असें मत पुष्कळांनीं व्यक्त केलें आहे. १९०५ सालीं कामगारांच्या बंडाच्या अखेरीस कांहीं आरमारी व लष्करी सैनिक बंडवाल्यांना सामील झाले. तथापि अखेर सरकारचे बाजूस बहुतेक लष्कर व आरमार असल्यानें कामकऱ्यांचा मोड झाला हें त्या वेळीं बंड फसण्याचें एक महत्त्वाचें कारण होतें. १९१७च्या फेब्रुवारींत कामगारांनीं सैनिकांना फितवून बंडांत सामील करून घेण्याचे अनेक प्रयत्न केले. त्यासाठीं पोलिसांत व सैनिकांत दुही माजवून सैनिकांना पक्षपात दाखविला. शेवटीं सैनिकांच्या पलटणीच्या पलटणी बंडांत सामील झाल्या तेव्हांच फेब्रुवारी क्रांति यशस्वी झाली. पण ही क्रांति किती यशस्वी व्हावी याला मर्यादाहि सैनिकांनींच घातली. सोव्हियटमध्यें सैनिकांनीं, त्यांचेमध्यें राजकीय क्रांतिकारक जागृति कमी असल्यानें, मध्यमवर्गीय सुशिक्षित व पुष्कळसे सैन्याधिकारी निवडून दिले व त्यांनीं राज्यसत्ता भांडवलवाल्या व जमीनदार मंत्रिमंडळाकडे जाऊं दिली व राहूं दिली. या मंत्रि-मंडळानें युद्ध कां थांबविलें नाहीं व जमिनी कां वाटल्या नाहींत—तसें करणें त्यास कां अशक्य होतें—हें मागें सांगितलेंच आहे. पण जर कां या दोन गोष्टी त्या मंत्रि-मंडळानें घडवून आणल्या असत्या तर पुढें कामगारक्रांतीस सैनिकांचा पाठिंबा मिळालाच नसता. कारण युद्ध थांबलें पाहिजे व शेतकरी या नात्यानें आपणास जमिनी मिळाल्याच पाहिजेत यासाठींच सैनिक बंडांत सामील झाले होते. कोणतेंहि बंड यशस्वी होण्यास अखेर केव्हां तरी सैनिक त्यांत सामील व्हावे लागतात हें उघडच आहे. फेब्रुवारीपासून ऑक्टोबरपर्यंत रशियांत सैनिकांचा कल कामगारक्रांतीकडे एकसारखा अधिकाअधिक झुकत होता. त्यामुळें कामगारक्रांतीचा दिवस जवळ जवळ येत होता. कॉर्निलोव्हशीं सैनिकांनीं अनत्याचारी असहकार पुकारला, यामुळेंच हवा काढून घेतलेल्या फुटबॉलप्रमाणें कॉर्निलोव्हच्या बंडाची

जागच्या जागीं दामटी झाली. ऑक्टोबरमधील पेट्रोग्रॅडच्या बंडांत सरकारला लढाऊ सैनिक उरलेच नाहींत, यामुळें पेट्रोग्रॅड पिकलें पान गळून पडावें तसें बंडवाल्यांच्या अलगद हातांत पडलें. म्हणजे सैनिकांनींच अखेर निर्णय दिला असा याचा अर्थ दिसत होता. इंग्लंडांतील १७व्या शतकांतलें राजाविरुद्ध झालेलें पार्लमेंटचें बंड व १८व्या शतकांतील फ्रेंच राज्यक्रांति या इतिहासावरूनहि राजकीय सत्तेचा ताजवा अखेर कोणीकडे झुकावा याचा निर्णय देणें सैनिकांचे हातीं आहे असेंच सिद्ध होत असल्याचें मानलें जातें. पण या बाबतींत थोडा खोल विचार केल्यास हें 'सगळें सत्य' नव्हे हें लक्षांत येईल.

सैनिकांपेक्षां कामकऱ्यांचें बल अधिक निर्णायक

प्रचंड उत्पादनाच्या भांडवलशाहीपूर्वी शेतकरी व सैनिक यांच्यांत विरोध येई तेव्हां कोण बली असे याची चर्चा आज निवळ ऐतिहासिक महत्त्वाची म्हणून सोडून देऊं. आज प्रचंड उत्पादनाची भांडवलशाही ही वस्तुस्थिति आहे. तींत लहान शेतीचा मालक (अथवा मालक होऊं इच्छिणारा) जो शेतकरी त्याला सामुदायिक संघटनाबलाचे दृष्टीनें कामकरी व सैनिक यांच्या खालचें स्थान आहे. १८९६ पासून १९१७ अखेर रशियांतील क्रांतिकारक झगड्यांचे सर्व वेळीं ज्यांच्या बलाची थोडी फार स्पर्धा झाली ते वर्ग सैनिक व कामकरी हेच होत. त्या त्या वेळीं सैनिकांच्यापेक्षां कामकऱ्यांचें बल हेंच अधिक महत्त्वाचें ठरलें हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास खरें ठरतें. समाजशरीराच्या कोणत्या भागाचें नियंत्रण कोणता वर्ग करतो व त्या त्या भागांचें इतर सापेक्ष महत्त्व काय, त्यावरून हा निर्णय ठरवावा लागतो. शस्त्रास्त्रबल हें राजकीय समाजाचें संरक्षक अंग सैनिकांचे हातीं असतें. आगगाड्या, कारखाने हीं धनोत्पादन व धनाची वाहतूक वगैरेंचीं साधनें म्हणजे राजकीय समाजाचें आर्थिक अंग हें कामकऱ्यांचे हातीं असतें. यांपैकीं संरक्षक अंगानें आर्थिक अंगावर चढाई केल्यास पहिल्या चकमकींत आर्थिक अंगाचा मोड होईल हें खरें. पण केवळ तेवढ्यानें संरक्षक अंगास आर्थिक अंगावर कायमचें प्रभुत्व चालवितां येणार नाहीं. सैनिक हे कांहीं शस्त्रास्त्रें व दारूगोळा खाऊन जगत नसतात. भोग्य धनाचें उत्पादन व त्याची वाहतूक सुरळीत चालून धनाची समाजांत वाटणी सतत चालू राहण्यास कामगारांचें व

शेतकऱ्यांचें खुषीचें अथवा नाखुषीचें सहकार्य राज्यकर्त्यांना मिळवावेंच लागतें. पण कामकऱ्यांची संघटना व क्रांतिनिष्ठा जबर असली तर ते दीर्घकाल अडवणुकीचा लढा चालवून व स्वतःस शस्त्रास्त्रधारीहि करून सैनिकांस आपलें जीवन असह्य करून टाकूं शकतात. आर्थिक अडवणूक ही शस्त्रास्त्र-बलापेक्षां कधीं तरी प्रभावी ठरेल हें सकृद्दर्शनीं खरें वाटत नाहीं. पण इतिहासानेंच ही गोष्ट सिद्ध केली आहे. राजा हा पार्लमेंटविरुद्ध दडपशाही करण्यासाठीं खडें सैन्य ठेवतो असें पाहून ब्रिटिश पार्लमेंटनें १७व्या शतकाचे शेवटीं मिलिशिया बिल पास केलें व सैन्यखात्यानें दरसाल आपल्या खर्चाची मंजुरी पार्लमेंटाकडे मागावी आणि ती न मिळाल्यास सैन्य बरखास्त व्हावें अशी सोय केली. या कायद्यास म्हणजे आर्थिक वेसणीस सैन्यखात्यानें मान तुकविली हा इतिहास आहे. जर्मनींत महायुद्धाच्या शेवटीं सैन्यखात्यानें राज्यपद काबीज करण्याचा कट केला तो उघकीस येतांच रातोरात आगगाडया व कारखाने यांनीं संप करून सैन्याचे बेत जागच्या जागीं थंड पाडले. पुढें हिटलर हा नाझी पक्षाचा पुढारी मध्यम वर्गाची संघटना वाढवूं लागला. भांडवलवाल्यांनींहि त्याच्याशीं संगनमत केलें. तेव्हां कामकरी व शेतकरीवर्गास दडपण्यासाठीं व मध्यम वर्गीयांशीं संगनमत करण्याचें सैन्यखात्यानें ठरवून आतां जर्मनींत हिटलरला त्यांनीं सुलतान पदावर बसविलें आहे. साधारणतः कोणत्याहि देशांत सैन्यसत्ता थोडा काल बली झाली तरी राष्ट्राचें आर्थिक अंग खुषीनें अथवा नाखुषीनें त्या सैन्यसत्तेशीं सहकार्य करून समाजाचा आर्थिक योगक्षेम चालविणार नाहीं तर सैन्यसत्तेस फार काळ सत्तापालन करतांच येणार नाहीं.

रशियांत ऑक्टोबरअखेरीस जी सोव्हियट काँग्रेस भरली तिच्या शेवटीं घडलेला एक प्रसंग ट्रॉट्स्कीनें मोठ्या मार्मिकपणें वर्णिला आहे. त्यावरून कामगारांचें—संघटित कामगारांचें—राजकीय झगडयांतील बल किती परिणामकारक असतें हें स्पष्ट होतें. प्रसंग असा होता, कीं पेट्रोग्रॅडमधील कामकरी व सैनिक यांनीं 'तात्पुरतें सरकार' उलथून पाडलें असून लेनिनच्या प्रमुखत्वाखालीं मुख्यतः बोल्शेव्हिक पक्षाचें सरकार उभारण्यास सोव्हियटकाँग्रेसनें संमति दिली होती. विजयोत्साहानें भरलेलें ट्रॉट्स्कीचें जोरदार भाषण संपलें. काँग्रेसचें सूप वाजविण्याची वेळ आली. इतक्यांत 'विक्झल' नांवाच्या

रेल्वेवर्कर्स यूनियनचा पुढारी बोलण्यासाठीं पुढें आला. "मला व माझ्या यूनियनला एकपक्षीय राज्य मंजूर नाहीं" असा नवीन सत्तेस विरोध दाखवून त्यानें भाषणास सुरुवात केली. पण सर्व रशियांतील सैनिक व कामकरी एकजूट होऊन बंडांत यशस्वी झाले असतां, व काँग्रेसमध्यें त्यांनीं बहुमतानें नवें सरकार निवडलें असतां या गाडीहाक्याच्या विरोधास कोण व कां जुमानील ? हो हो, सर्व जुमानतील; तो स्वतःच सांगतो, पहा या सर्वांचें नाक आपण कसें दाबणार तें—ऐका तो सांगतो—

"सर्वपक्षीय, लोकशाहीप्रधान राज्यसंस्था तुम्ही निर्माण न कराल तर 'विक्झल' स्वतः रेल्वेचा ताबा घेईल. आम्ही प्रतिक्रांतिकारक सैन्यास पेट्रोग्रॅडवर येऊं देणार नाहीं हें निश्चित समजा. पण सामान्यतः केवळ बोल्शेव्हिक पक्षानें सैन्यावर हुकमत गाजवावी हें आम्हांस मंजूर नाहीं. सोव्हियट्च्या मध्यवर्ती कमिटीचीच (त्सेरीटेली, श्रीड्झ्, डॅन वगैरे मेन्शेव्हिक ज्या कमिटींत होते व जिनें फेब्रुवारीपासून ऑक्टोबरपर्यंत सोव्हियट्सची लगाम हातीं ठेवून 'तात्पुरत्या सरकार'ला पाठिंबा दिला होता त्या कमिटीची) हुकमत सैन्यावर चालली पाहिजे. असें न करतां, रेल्वेकामगारांच्या या इच्छेस न जुमानून त्यांवर दडपशाही कराल, तर याद राखा, पेट्रोग्रॅडला आम्ही अन्नावांचून मारूं."

"या धमकीनें" ट्रॉट्स्की लिहितो, "सारी काँग्रेस हादरून गेली." तिच्या तोंडचें पाणी पळालें. "रेल्वेकामगार संघाचा एक प्रमुख शेतकरी, कामकरी व सैनिक यांच्या प्रतिनिधींशीं त्या वेळीं एका सरकारनें दुसऱ्या सरकारशीं बरोबरीच्या नात्यानें बोलावें तशा तोऱ्यानें बोलत होता. कामकरी-शेतकरी व सैनिक राज्यसत्ता हातीं घेण्यास उद्युक्त झाले असतां यःकश्चित् दिसणारी एक रेल्वे यूनियन त्यांच्यावर हुकमत चालवूं पाहत होती. .....असें करण्यांत तो पुढारी संख्याबलावर विसंबत नव्हता. तें त्याच्याविरुद्ध पक्षाकडेच होतें. पण राष्ट्राच्या आर्थिक व सांस्कृतिक रचनेंत रेल्वेला जें अपवादभूत महत्त्वाचें स्थान होतें त्यावर त्याचा भरंवसा होता. तो स्वतः सर्वपक्षीय लोकशाहीचा पुरस्कार करीत होता. पण त्याबरोबरच सामाजिक झगडयांत लोकशाहीच्या देखाव्याची कसोटी किती दुबळी आहे हें

आपल्या कृतीनेंच तो सिद्ध करीत होता. खरोखर परिस्थितीचें सूक्ष्मपणें शिक्षण देण्याचें सामर्थ्य क्रांतिकालाचे अंगीं किती विलक्षण असतें! ...कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांचीं तोंडें त्या वेळीं गोरीमोरीं झालेलीं होतीं." सुदैवानें विक्झलचा पुढारी मानीत होता तसें रेल्वेकामगारांचें पुढारीपण त्याचेकडे नव्हतें हें पुढें आढळून आलें व हें आकस्मिक संकटाचें धुकें वितळून गेलें. पण त्यावरून रेल्वे, कारखाने वगैरे समाजाच्या आर्थिक सांगाड्यांतील कामगारांचें बल, ट्रॉट्स्की म्हणतो त्याप्रमाणें, सामाजिक झगडयांत किती प्रचंड असतें हें फार चांगल्या प्रकारें या प्रसंगानें लक्षांत येत आहे. रशियांत फेब्रुवारी व ऑक्टोबर या दोनहि वेळीं कामकऱ्यांना मागें सांगितलेल्या कारणामुळें सैनिकांची मदत झाली. यामुळें त्यांना यश मिळालें. कामकरी व सैनिक यांच्या निकराच्या विरोधाचा प्रसंगच न आल्यानें यांत निर्णायक दृष्टीनें श्रेष्ठ कोण याचें ठाम उत्तर मिळूं शकलें नाहीं, असें कोणी म्हणतात. पण थोडें सूक्ष्म पाहिलें तर याचें उत्तर सहज मिळतें.

खरोखर रशियन कामगारांस सैनिकांची मदत मिळाली ती सैनिकांनीं आरंभीं दिली नसून ते अन्नान्न दशेस पोंचले, कामगारांवाचून आपणांस शेती कोणीच देणार नाहीं असें त्यांस पटलें व त्या कामीं ते स्वतःच अगतिक झाले तेव्हांच मिळाली. कामकऱ्यांनीं व शेतकऱ्यांनीं राष्ट्राचें आर्थिक जीवन कबजांत घेतल्यावांचून सैनिकांस माणुसकीचें जिणें, नव्हे कसें तरी जगणेंहि शक्य नाहीं अशी खात्री झाली तेव्हांच सैनिक शेतकरी-कामकऱ्यांच्या बंडांत सामील झाले. पण रशियांत 'स्वराज्य' असून तेथले सैनिक स्वदेशी होते व ते कामकऱ्यांना मिळाले म्हणून कामकऱ्यांना यश आलें असा आक्षेप कांहीं लोक घेत असतातच ट्रॉट्स्कीच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे 'आर्थिक व सांस्कृतिक जीवनांत' (व झगड्यांत) आगगाडया, कारखाने वगैरे प्रचंड उत्पादन क्षेत्रांतील कामगारांना जें 'अपवादभूत महत्त्व' (एक्सेप्शनल सिग्निफिकन्स) असतें तें या लोकांना कळत नाहीं इतकाच याचा अर्थ होय.

अर्थात् अखेर निर्णय रशियन कामकरी-शेतकऱ्यांनीं राष्ट्राचा आर्थिक गाडा अडवून पाडून म्हणजे एक प्रकारें त्याशीं 'असहकार' करून तेवढ्यानेंच मिळविला नसता हें उघडच आहे. पेट्रोग्रॅडमध्यें वस्तुजात कामकऱ्यांचे— बोल्शेव्हिकांचे बाजूस आली होती. तरी सुद्धां अखेर राजवाडयावर व सर्व

सरकारी सत्तास्थानावर सशस्त्र स्वारी करावीच लागली. त्या वेळीं रक्तपात झाला नाहीं तरी त्यापूर्वी पेट्रोग्रॅडच्या रस्त्यांना अनेकदां रुधिरस्नान मिळालें, त्याचा २५ ऑक्टोबरची शांतता हा परिणाम होता. मॉस्को येथें तर बंडास यश येण्यास पुष्कळ अवधि लागला व तेथें रक्तपात झालाच. खुद्द राज्यसत्ता हातीं आल्यावरहि लेनिनला ती, ज्याला सनदशीर मार्ग म्हणतां येईल, त्याच्या बळावर टिकवितां आली नाहीं. जानेवारींत जी घटनापरिषद भरली तिनें ऑक्टोबरक्रांतीच्या विरुद्ध मत दिलें व शेवटीं लेनिननें परिषदेच्या हाराशीं ठेवलेल्या कामगारपलटणीवर भरंवसून घटनापरिषद हुसकून लावली. (प्रकरण १२). जगांत कोठेंहि क्रांति व्हावी कीं नाहीं व रशियांत झाली ती योग्य कीं अयोग्य हा वाद आलाहिदा आहे. पण रशियांत रक्तपात न होता क्रांति झाली किंवा क्रांति तडजोडीनें होऊं शकते, केवळ राज्यकारभाराचा गाडा अडवून, आर्थिक व्यवहार थंड पाडून क्रांति होऊं शकते व रशियांत ती तशी झाली असें पुष्कळांना वाटत असतें. पण तो सगळा शुद्ध व निर्भेळ भ्रम आहे. इतिहास सोइस्करपणें शिकायचा नसतो. तो आहे तसा शिकून मग आपल्या उपयोगी कसा पडेल तें पहावें नाहींतर फेकून द्यावा. इतिहासाची त्याबद्दल कार नाहीं.

सिनेमांत शर्यतीचा घोडा भयंकर वेगानें धावत असतां मध्येंच कांहीं वेळ चित्रपट अतिशय सावकाश दाखवितात. यामुळें भयंकर वेगानें धावणाऱ्या त्या घोड्याची प्रत्येक शीरन् शीर, त्याच्या शरीराचा प्रत्येक भाग घोड्याच्या गाबरोबर कसे तणाव दाखवीत असतो, त्याची हालचाल कशी जोरकस त असते हें स्पष्ट दिसतें. रशियांत १९१७च्या फेब्रुवारींत कामकरी-सैनिकांनीं ांति करून राज्यपद हातीं घेतलें, तेव्हांपासून लगेच दोन दिवसांत दुसरी ांति न होतां तब्बल आठ महिने क्रांतिकारक वातावरण वाढत्या तेजस्वितेनें कलें व मग दुसरी क्रांति होऊन कामकऱ्यांचे हातीं राज्यसत्ता आली मुळें ज्याला 'सेमी रेव्होल्यूशनरी सिच्युएशन' म्हणजे क्रांतिसदृश वातावरण णतात तें कसें असतें, समाजाचे निरनिराळे घटक कसे अधिकाअधिक ढूं लागतात, पर्वतासारखी अचल वाटणारी राज्यसत्ता, धर्मसत्ता, सत्ता, सैन्यसत्ता धरणीकंप झाल्याप्रमाणें कशी डळमळूं लागते हें साऱ्या ास फार चांगल्या प्रकारें पहावयास सांपडलें. क्षणांत होणाऱ्या प्रचंड

धरणीकंपांत भूपृष्ठांचें रूप जें भयंकरपणें बदलतें तें तोच धरणीकंप सिनेमांत सावकाश करून दाखवितां आल्यास भूपृष्ठ प्रत्यक्ष बदलत असतांना जसें तपशीलवार दिसूं शकेल तसा रशियांतील १९१७च्या फेब्रुवारी ते ऑक्टोबर हा काळ सगळ्या जगास दिसला. जगांतलीं माणसें कांहीं तेथें गेलीं नव्हतीं. पण तो काळ आजच्या पुष्कळांच्या स्मरणांत असून, त्यांच्या हयातींत घडलेला असून ज्यांनीं ती क्रांति करण्यांत प्रत्यक्ष भाग घेतला त्यांच्या लेखणींतून तो वाचावयास मिळूं शकतो. अत्युत्कृष्ट क्रांतिकारक कादंबऱ्यांचे पर्वताएवढे ढीग वाचले तरी त्यांना प्रत्यक्ष क्रांतिकारकांनीं सांगितलेल्या त्या क्रांतीच्या इतिहासांची सर येणार नाहीं. हा फेब्रुवारी ते ऑक्टोबर या काळांतला इतिहास खुद्द क्रांतिकारक पुढाऱ्यांच्या लेखणींतून मिळाला तो सारांशरूपानें मार्गें दिलाच आहे. त्यांतील आणखी कांहीं गोष्टींकडे विशेष प्रकारें वाचकांचें लक्ष वेधून हें प्रकरण संपविणार आहें.

दुभंगलेल्या राज्यसत्तेचें स्वरूप

राज्यक्रांति घडते म्हणजे राज्यसत्ता व अर्थसत्ता एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे जाते. या सत्तासंक्रमणाचा काल रशियांत आठ महिने टिकला व मध्यें केव्हांहि क्रांतीची स्प्रिंग ढिली पडली नाहीं ही गोष्ट क्रांतिशास्त्राच्या शिक्षणाचे दृष्टीनें फार महत्त्वाची झाली. या काळांत रशियांत 'दुभंगलेली सत्ता' (डयुएल पॉवर) होती असें ट्रॉट्स्कीनें म्हटलें आहे. मेन्शेव्हिकांनीं बनलेल्या सोव्हियट कार्यकारी कमिटीस देशांत झारशाहीनंतर भांडवलशाही झाल्या-वांचून कामगारसत्ता येऊं नये असें वाटून त्यांनीं राज्यसत्ता भांडवलदार वर्गाचे हातीं दिली. सोशल रेव्होल्यूशनरी व मेन्शेव्हिक पुढारी यांचेच सोव्हियटमध्यें व कार्यकारी मंडळांत संख्याबल मोठें असल्यानें व शेतकरी कामकऱ्यांस त्यांचाच पाठिंबा असल्यानें पुढाऱ्यांनीं भांडवलवाल्यांस राज्य-दान केलें, याचें पुष्कळांना वाईट वाटलें तरी प्रत्यक्ष विरोध कोणींच केला नाहीं. पण जनतेला भांडवलशाही राज्यकर्त्यांबद्दल इतका अविश्वास होता, कीं कायदेशीर अशा भांडवलवाल्या राज्यकर्त्यांच्या प्रत्येक हुकुमास खाजगी अशा सोव्हियट पुढाऱ्यांची संमति असल्यावांचून जनता त्याची बजावणी करीत नसे. यासच ट्रॉट्स्की दुभंगलेली राज्यसत्ता म्हणतो. मार्चच्या आरंभापासून ऑक्टोबरपर्यंत भांडवलवाल्यांच्या राज्यसत्तेचा बोज हळूहळू कमी होत होता

ब सोव्हियटचा त्याच क्रमानें वाढत होता. आणि याचें स्वरूप मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी यांचें जनतेवरील वजन हळूहळू कमी होऊन बोल्शेव्हिकांचें वजन त्याच क्रमानें वाढण्यानें व्यक्त होत होतें. सत्तासंक्रमण-कालांतील या दुहेरी सत्तेचें स्वरूप कसें असतें तें सांगतांना ट्रॉट्स्की लिहितो—

"जगांतील कोणत्याहि समाजांत परस्परांचे शत्रु असलेले वर्ग असतातच. ज्या वर्गाची सत्ता हिरावून घेतलेली असते तो सरकारचें धोरण आपणांकडे झुकविण्याचा थोडा फार प्रयत्न करीतच असतो. पण एवढ्यावरूनच दोन अथवा अधिक सत्ता देशांत नांदत आहेत असें म्हणतां येत नाहीं. राज्यकर्ते वर्ग व दडपले जाणारे वर्ग यांमधील नातें जसें असेल त्यावरून राज्यघटनेचें स्वरूप ठरत असतें. कोणत्याहि राजवटींत राज्यसत्ता एकमुखी असणें हें त्या राजवटीच्या स्थैर्यास इष्ट असतें; राज्यकर्ते वर्ग आपली आर्थिक व राजकीय घटना एकंदर समाजावर यशस्वितेनें लादूं शकतात तोंवर ही एकमुखी राजवट टिकून राहते. जर्मनींत सरंजामदार व भांडवलवाले यांची एकत्र सत्ता होहेन्झोलर्न राजांच्या अमलांत होती व आज प्रजासत्ताकांतहि आहे. या दोन राज्यकर्त्या वर्गांचा तीव्र विरोध कित्येकदां निर्माण होतो. पण तेवढ्यावरून ती दुभंगलेली राज्यसत्ता असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्यांची सामाजिक भूमिका एकच असते. यामुळें त्यांचीं भांडणें झालीं तरी त्यानें राज्ययंत्र दुभंगलें जात नाहीं. बिनतोड हितविरोध असणाऱ्या दोन वर्गांच्या कलहांतूनच दुभंगल्या स्वरूपाची सत्ता निर्माण होते. म्हणून अशी सत्ता क्रांति-कालखंडांतच असूं शकते; त्या कालखंडाचें मात्र ती एक आवश्यक अंग असते. एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे राज्यसत्ता संक्रांत करणें हेंच क्रांतीचें राजकीय कार्य असतें. सत्तीच्या बळांवर होणारें हें संक्रमण फार थोड्या काळांत बहुधा उरकलें जातें. पण दडपल्या गेलेल्या अवस्थेंतून इतिहासक्रमानें वर येणारा वर्ग एका रात्रींत कांहीं एकदम राज्यकर्त्यांच्या पदवीस पोंचत नाहीं. अगदीं क्रांतिकाळांतल्या रात्रींहि हें अशक्य आहे. कायदेशीर राज्य-कर्त्या वर्गांहून अगदीं स्वतंत्र अशी भूमिका या दडपल्या वर्गानें क्रांतीच्या आरंभीं धारण करावी लागते. गा दोन वर्गांच्या मधले असे कांहीं वर्ग व थर असतात, कीं ते प्रचलित परिस्थितीबद्दल असंतुष्ट असतात, पण ती बदलण्यास स्वतंत्रपणें ते समर्थ नसतात. अशा वर्गांच्या व थरांच्या आशा उदयिष्णु अशा

आपल्या कृतीनेंच तो सिद्ध करीत होता. खरोखर परिस्थितीचें सूक्ष्मपणें शिक्षण देण्याचें सामर्थ्य क्रांतिकालाचे अंगीं किती विलक्षण असतें! ...कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांचीं तोंडें त्या वेळीं गोरीमोरीं झालेलीं होतीं." सुदैवानें विक्झलचा पुढारी मानीत होता तसें रेल्वेकामगारांचें पुढारीपण त्याचेकडे नव्हतें हें पुढें आढळून आलें व हें आकस्मिक संकटाचें धुकें वितळून गेलें. पण त्यावरून रेल्वे, कारखाने वगैरे समाजाच्या आर्थिक सांगाड्यांतील कामगारांचें बल, ट्रॉट्स्की म्हणतो त्याप्रमाणें, सामाजिक झगड्यांत किती प्रचंड असतें हें फार चांगल्या प्रकारें या प्रसंगानें लक्षांत येत आहे. रशियांत फेब्रुवारी व ऑक्टोबर या दोनहि वेळीं कामकऱ्यांना मागें सांगितलेल्या कारणामुळें सैनिकांची मदत झाली. यामुळें त्यांना यश मिळालें. कामकरी व सैनिक यांच्या निकराच्या विरोधाचा प्रसंगच न आल्यानें यांत निर्णायक दृष्टीनें श्रेष्ठ कोण याचें ठाम उत्तर मिळूं शकलें नाहीं, असें कोणी म्हणतात. पण थोडें सूक्ष्म पाहिलें तर याचें उत्तर सहज मिळतें.

खरोखर रशियन कामगारांस सैनिकांची मदत मिळाली ती सैनिकांनीं आरंभीं दिली नसून ते अन्नान्न दशेस पोंचले, कामगारांवाचून आपणांस शेती कोणीच देणार नाहीं असें त्यांस पटलें व त्या कामीं ते स्वतःच अगतिक झाले तेव्हांच मिळाली. कामकऱ्यांनीं व शेतकऱ्यांनीं राष्ट्राचें आर्थिक जीवन कबजांत घेतल्यावांचून सैनिकांस माणुसकीचें जिणें, नव्हे कसें तरी जगणेंहि शक्य नाहीं अशी खात्री झाली तेव्हांच सैनिक शेतकरी-कामकऱ्यांच्या बंडांत सामील झाले. पण रशियांत 'स्वराज्य' असून तेथले सैनिक स्वदेशी होते व ते कामकऱ्यांना मिळाले म्हणून कामकऱ्यांना यश आलें असा आक्षेप कांहीं लोक घेत असतातच ट्रॉट्स्कीच्या मार्पेत सांगावयाचें म्हणजे 'आर्थिक व सांस्कृतिक जीवनांत' (व झगड्यांत) आगगाड्या, कारखाने वगैरे प्रचंड उत्पादन क्षेत्रांतील कामगारांना जें 'अपवादभूत महत्त्व' (एक्सेप्शनल सिग्निफिकन्स) असतें तें या लोकांना कळत नाहीं इतकाच याचा अर्थ होय.

अर्थात् अखेर निर्णय रशियन कामकरी-शेतकऱ्यांनीं राष्ट्राचा आर्थिक गाडा अडवून पाडून म्हणजे एक प्रकारें त्याशीं 'असहकार' करून तेवढ्यानेंच मिळविला नसता हें उघडच आहे. पेट्रोग्रॅडमध्यें वस्तुजात कामकऱ्यांचे— बोल्शेव्हिकांचे बाजूस आली होती. तरी सुद्धां अखेर राजवाड्यावर व सर्व

सरकारी सत्तास्थानावर सशस्त्र स्वारी करावीच लागली. त्या वेळीं रक्तपात झाला नाहीं तरी त्यापूर्वी पेट्रोग्रॅडच्या रस्त्यांना अनेकदां रुधिरस्नान मिळालें, त्याचा २५ ऑक्टोबरची शांतता हा परिणाम होता. मॉस्को येथें तर बंडास यश येण्यास पुष्कळ अवधि लागला व तेथें रक्तपात झालाच. खुद्द राज्यसत्ता हातीं आल्यावरहि लेनिनला ती, ज्याला सनदशीर मार्ग म्हणतां येईल, त्याच्या बळावर टिकवितां आली नाहीं. जानेवारींत जी घटनापरिषद भरली तिनें ऑक्टोबरक्रांतीच्या विरुद्ध मत दिलें व शेवटीं लेनिननें परिषदेच्या दाराशीं ठेवलेल्या कामगारपलटणीवर भरंवसून घटनापरिषद हुसकून लावली. (प्रकरण १२). जगांत कोठेंहि क्रांति व्हावी कीं नाहीं व रशियांत झाली ती योग्य कीं अयोग्य हा वाद आलाहिदा आहे. पण रशियांत रक्तपात न होता क्रांति झाली किंवा क्रांति तडजोडीनें होऊं शकते, केवळ राज्यकारभाराचा गाडा अडवून, आर्थिक व्यवहार थंड पाडून क्रांति होऊं शकते व रशियांत ती तशी झाली असें पुष्कळांना वाटत असतें. पण तो सगळा शुद्ध व निर्भेळ भ्रम आहे. इतिहास सोइस्करपणें शिकायचा नसतो. तो आहे तसा शिकून मग आपल्या उपयोगी कसा पडेल तें पहावें नाहींतर फेकून द्यावा. इतिहासाची त्याबद्दल तक्रार नाहीं.

सिनेमांत शर्यतीचा घोडा भयंकर वेगानें धावत असतां मध्येंच कांहीं वेळ चित्रपट अतिशय सावकाश दाखवितात. यामुळें भयंकर वेगानें धावणाऱ्या त्या घोड्याची प्रत्येक शीरन् शीर, त्याच्या शरीराचा प्रत्येक भाग घोड्याच्या वेगाबरोबर कसे तणाव दाखवीत असतो, त्याची हालचाल कशी जोरकस होत असते हें स्पष्ट दिसतें. रशियांत १९१७च्या फेब्रुवारींत कामकरी-सैनिकांनीं क्रांति करून राज्यपद हातीं घेतलें, तेव्हांपासून लगेच दोन दिवसांत दुसरी क्रांति न होतां तब्बल आठ महिने क्रांतिकारक वातावरण वाढत्या तेजस्वितेनें टिकलें व मग दुसरी क्रांति होऊन कामकऱ्यांचे हातीं राज्यसत्ता आली यामुळें ज्याला 'सेमी रेव्होल्यूशनरी सिच्युएशन' म्हणजे क्रांतिसदृश वातावरण म्हणतात तें कसें असतें, समाजाचे निरनिराळे घटक कसे अधिकाअधिक हालूं लागतात, पर्वतासारखी अचल वाटणारी राज्यसत्ता, धर्मसत्ता, धनसत्ता, सैन्यसत्ता धरणीकंप झाल्याप्रमाणें कशी डळमळूं लागते हें साऱ्या जगास फार चांगल्या प्रकारें पहावयास सांपडलें. क्षणांत होणाऱ्या प्रचंड

धरणीकंपांत भूपृष्ठांचें रूप जें भयंकरपणें बदलतें तें तोच धरणीकंप सिनेमांत सावकाश करून दाखवितां आल्यास भूपृष्ठ प्रत्यक्ष बदलत असतांना जसें तपशीलवार दिसूं शकेल तसा रशियांतील १९१७च्या फेब्रुवारी ते ऑक्टोबर हा काळ सगळ्या जगास दिसला. जगांतलीं माणसें कांहीं तेथें गेलीं नव्हतीं. पण तो काळ आजच्या पुष्कळांच्या स्मरणांत असून, त्यांच्या हयातींत घडलेला असून ज्यांनीं ती क्रांति करण्यांत प्रत्यक्ष भाग घेतला त्यांच्या लेखणींतून तो वाचावयास मिळूं शकतो. अत्युत्कृष्ट क्रांतिकारक कादंबऱ्यांचे पर्वताएवढे ढीग वाचले तरी त्यांना प्रत्यक्ष क्रांतिकारकांनीं सांगितलेल्या त्या क्रांतीच्या इतिहासांची सर येणार नाहीं. हा फेब्रुवारी ते ऑक्टोबर या काळांतला इतिहास खुद्द क्रांतिकारक पुढाऱ्यांच्या लेखणींतून मिळाला तो सारांशरूपानें मागें दिलाच आहे. त्यांतील आणखी कांहीं गोष्टींकडे विशेष प्रकारें वाचकांचें लक्ष वेधून हें प्रकरण संपविणार आहें.

दुभंगलेल्या राज्यसत्तेचें स्वरूप

राज्यक्रांति घडते म्हणजे राज्यसत्ता व अर्थसत्ता एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे जाते. या सत्तासंक्रमणाचा काल रशियांत आठ महिने टिकला व मध्यें केव्हांहि क्रांतीची स्प्रिंग ढिली पडली नाहीं ही गोष्ट क्रांतिशास्त्राच्या शिक्षणाचे दृष्टीनें फार महत्त्वाची झाली. या काळांत रशियांत 'दुभंगलेली सत्ता' (डयुएल पॉवर) होती असें ट्रॉट्स्कीनें म्हटलें आहे. मेन्शेव्हिकांनीं बनलेल्या सोव्हियट कार्यकारी कमिटीस देशांत झारशाहीनंतर भांडवलशाही झाल्यावांचून कामगारसत्ता येऊं नये असें वाटून त्यांनीं राज्यसत्ता भांडवलदार वर्गाचे हातीं दिली. सोशल रेव्होल्यूशनरी व मेन्शेव्हिक पुढारी यांचेच सोव्हियटमध्यें व कार्यकारी मंडळांत संख्याबल मोठें असल्यानें व शेतकरी कामकऱ्यांस त्यांचाच पाठिंबा असल्यानें पुढाऱ्यांनीं भांडवलवाल्यांस राज्यदान केलें, याचें पुष्कळांना वाईट वाटलें तरी प्रत्यक्ष विरोध कोणींच केला नाहीं. पण जनतेला भांडवलशाही राज्यकर्त्यांबद्दल इतका अविश्वास होता, कीं कायदेशीर अशा भांडवलवाल्या राज्यकर्त्यांच्या प्रत्येक हुकुमास खाजगी अशा सोव्हियट पुढाऱ्यांची संमति असल्यावांचून जनता त्याची बजावणी करीत नसे. यासच ट्रॉट्स्की दुभंगलेली राज्यसत्ता म्हणतो. मार्चच्या आरंभापासून ऑक्टोबरपर्यंत भांडवलवाल्यांच्या राज्यसत्तेचा बोज हळूहळू कमी होत होता

व सोव्हियटचा त्याच क्रमानें वाढत होता. आणि याचें स्वरूप मेन्शेव्हिक व सोशल रेव्होल्यूशनरी यांचें जनतेवरील वजन हळूहळू कमी होऊन बोल्शेव्हिकांचें वजन त्याच क्रमानें वाढण्यानें व्यक्त होत होतें. सत्तासंक्रमण-कालांतील या दुहेरी सत्तेचें स्वरूप कसें असतें तें सांगतांना ट्रॉट्स्की लिहितो—

"जगांतील कोणत्याहि समाजांत परस्परांचे शत्रु असलेले वर्ग असतातच. ज्या वर्गाची सत्ता हिरावून घेतलेली असते तो सरकारचें धोरण आपणांकडे झुकविण्याचा थोडा फार प्रयत्न करीतच असतो. पण एवढ्यावरूनच दोन अथवा अधिक सत्ता देशांत नांदत आहेत असें म्हणतां येत नाहीं. राज्यकर्ते वर्ग व दडपले जाणारे वर्ग यांमधील नातें जसें असेल त्यावरून राज्यघटनेचें स्वरूप ठरत असतें. कोणत्याहि राजवटींत राज्यसत्ता एकमुखी असणें हें त्या राजवटीच्या स्थैर्यास इष्ट असतें; राज्यकर्ते वर्ग आपली आर्थिक व राजकीय घटना एकंदर समाजावर यशस्वितेनें लादूं शकतात तोंवर ही एकमुखी राजवट टिकून राहते. जर्मनींत सरंजामदार व भांडवलवाले यांची एकत्र सत्ता होहेन्झोलर्न राजांच्या अमलांत होती व आज प्रजासत्ताकांतहि आहे. या दोन राज्यकर्त्या वर्गांचा तीव्र विरोध कित्येकदां निर्माण होतो. पण तेवढ्यावरून ती दुभंगलेली राज्यसत्ता असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्यांची सामाजिक भूमिका एकच असते. यामुळें त्यांचीं भांडणें झालीं तरी त्यानें राज्ययंत्र दुभंगलें जात नाहीं. बिनतोड हितविरोध असणाऱ्या दोन वर्गांच्या कलहांतूनच दुभंगल्या स्वरूपाची सत्ता निर्माण होते. म्हणून अशी सत्ता क्रांति-कालखंडांतच असूं शकते; त्या कालखंडाचें मात्र ती एक आवश्यक अंग असते. एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे राज्यसत्ता संक्रांत करणें हेंच क्रांतीचें राजकीय कार्य असतें. सत्तीच्या बळावर होणारें हें संक्रमण फार थोड्या काळांत बहुधा उरकलें जातें. पण दडपल्या गेलेल्या अवस्थेतून इतिहासक्रमानें वर येणारा वर्ग एका रात्रींत कांहीं एकदम राज्यकर्त्यांच्या पदवीस पोंचत नाहीं. अगदीं क्रांतिकाळांतल्या रात्रींहि हें अशक्य आहे. कायदेशीर राज्य-कर्त्या वर्गांहून अगदीं स्वतंत्र अशी भूमिका या दडपल्या वर्गानें क्रांतीच्या आरंभीं धारण करावी लागते. गा दोन वर्गांच्या मधले असे कांहीं वर्ग व थर असतात, कीं ते प्रचलित परिस्थितीबद्दल असंतुष्ट असतात, पण ती बदलण्यास स्वतंत्रपणें ते समर्थ नसतात. अशा वर्गांच्या व थरांच्या आशा उदयिष्णु अशा

दडपलेल्या वर्गानें आपल्याकडे ओढून घेणें जरूर असतें. क्रांतिपूर्वकालीं क्रांतीच्या तयारीचा इतिहास घडून येत असतां, नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी लादलेल्या वर्गाचे हातीं—सर्व राज्यसत्ता नव्हे तरी बरीच राज्यसत्ता केंन्द्रीभूत झालेली असते. कायदेशीर राज्ययंत्र मात्र अजून सरकारच्याच हातीं असतें. क्रांतिकाळांतील दुभंगलेल्या राजवटीचा हा आरंभ असतो. हेंच कांहीं तिचें कायम स्वरूप नव्हे. ज्या या नवीन वर्गाचे हातीं राज्यसत्ता येत असते त्यालाच क्रांति जर नको असली, जर तो वर्ग जुनाट झाला असला, इतिहासांत मागें पडलेला असला, अधिकाराचा मुकुट डोक्यावर बसण्यापूर्वीच जर तो वर्ग जीर्ण झालेला असला, अधिकारावर येतांच त्याला दुसऱ्या उद्-यिष्णु व सत्ताग्रहणास समर्थ झालेल्या व राजमुकुटापर्यंत ज्याचे हात पोंचले आहेत अशा वर्गाचा विरोध उत्पन्न झाला तर एकाच दुभंगलेल्या राज्यसत्तेचा डळमळता तोल असतो तो अगदींच ढळतो व दुसरी आणखी अधिक डळमळणारी दुभंगलेली राजवट निर्माण होते. राज्यसत्ता अशी डळमळूं लागली म्हणजे बेबंदशाही माजते व ती नाहींशी करण्याची जबाबदारी प्रत्येक वेळीं क्रांतिकारक व प्रति-क्रांतिकारक या उभयतांवरहि पडत असते. दुभंगलेली राज्यसत्ता याचा अर्थ सत्तेचे दोन सारखे विभाग करून त्यांची दोन वर्गांत समान वाटणी झालेली असते असा नव्हे, किंवा कोणत्याहि प्रकारें दोन वर्गांत दिलजमाईनें सत्ताविभागणी होणें असा नव्हे. सामान्यतः असें म्हणतां येईल, कीं दुभंगलेल्या राज्यसत्तेंत अशा दिलजमाईचा अभावच असला पाहिजे. ही दुभंगलेल्या सत्तेची परिस्थिति सनदशीर राजकारणांतली नसून ती क्रांतिकालांतली असते. समाजघटनेची घडी विस्कटल्यामुळें राज्यघटनेचेहि तुकडे झाले आहेत असा त्याचा अर्थ असतो. परस्परांशीं लढणारे वर्ग परस्परांशीं विजोड असणाऱ्या संघटना हातीं घेऊन झगडत असतात. एका पक्षाची संघटना जीर्ण झालेली असते दुसऱ्याची तयार होत असते. सरकारच्या कार्यक्षेत्रांत या दोन संघटनांची वरचेवर टक्कर होत असते. या झगडणाऱ्या वर्गाचे हातीं जे सत्तांश पडत असतात ते झगड्यांत त्यांना ज्या मानानें कमी-अधिक यश आलेलें असतें त्या मानानें कमी-अधिक असतात. पण झगडयाची ही वस्तुस्थिति अशी असते कीं, त्या वेळीं स्थैर्य नांदूं शकत नाहीं. समाजजीवनास राज्यसत्ता एकहाती असणें

अवश्य असतें. ज्या वर्गाचे हातीं राज्यसत्ता असते त्यांचे द्वारा (अथवा रशियांतील फेब्रुवारी-ऑक्टोबर या काळाबद्दल बोलावयाचें असल्यास अर्धी अर्धी सत्ता धारण करणारे जे दोन वर्ग होते त्यांच्या द्वारा) ही राज्यसत्ता एकहाती करून घेण्याचा प्रयत्न समाज करीत असतो. राज्यसत्तेचीं दोन शकलें झालीं, कीं यादवी माजणार हें ठरलेलेंच. पण हे दोन वर्ग घनघोर यादवीस सज्ज होण्यापूर्वी—विशेषतः तिसरा कोणी मध्येंच घुसेल अशी भीति दोघांनाहि वाटल्यास—पुष्कळ काळपर्यंतहि दुभंगलेलें राज्य तसेंच सहन करण्यास इतकेंच नव्हे तर बुद्ध्याच चालू देण्यास समाज तयार होणें शक्य असतें. पण या परिस्थितीचा केव्हां तरी धुव्वा उडणें अपरिहार्य असतें. हें दुभंगलेलें राज्य एकाच देशभूमीवर नांदत असल्यानें यादवीच्या ठळक स्वरूपांत तें व्यक्त होतें. या दोनहि पक्षांनीं आपापल्या क्षेत्रांस उत्तम संरक्षण दिलेलें असून दुसऱ्यांचा प्रदेश काबीज करण्यासाठीं त्यांची धडपड चाललेली असते. एकंदर राष्ट्रावर या दोनहि पक्षांच्या स्वाऱ्या होऊन झगड्यानें जनतेचे हाल होत असतात. कोणता तरी एक पक्ष अखेर विजयी होईपर्यंत हे हाल चाललेले असतात."

सत्ताधारी वर्गाची क्रांतीस मदत

फ्रेंच राज्यक्रांतीचे वेळीं उमराववर्ग व राजा यांचेमध्यें स्पर्धा लागून त्यामुळें भांडवलदारवर्ग व सामान्य जनता जागृत झाली व तिनें राज्यक्रांति करून उमराववर्ग व राजा या उभयतांची खांडोळी करून टाकली. फ्रान्समधील हा कटु अनुभव युरोपांतील इतर राष्ट्रांतल्या उमरावांना कळून चुकल्यामुळें ते यापुढें आपल्या राजाशीं भांडणार नाहींत व यामुळें बाकीच्या युरोपांत फ्रान्सइतकी जलद क्रांतीची वाढ होऊं शकणार नाहीं असें रॉबेसपीरे हा फ्रेंच राज्यक्रांतीचा पुढारी एकदां म्हणाला होता. पण ट्रॉट्स्कीला हें म्हणणें पूर्णतेनें पटत नाहीं. रशियांत झार पदच्युत होण्यापूर्वी सरदार व सेनापति आणि खुद्द राजघराण्यांतील कांहीं पुरुष, तसेंच भांडवलवालावर्ग यांचा झारच्या धोरणाशीं तीव्र विरोध आला होता व एकमेकांस खो देण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होते. सरदारवर्गानेंच रासपुटीनचा खून करून राजास वेसण घालण्याचा प्रयत्न केला. सरदार व सेनापति यांना डावलून झारनें आपल्या लगामीं यावें असें भांडवलवाल्यांना वाटत होतें, तर भांडवलदारांना मुळींच न विचारतां

झारनें सेनापति व सरदार यांचा लगाम तोंडांत धरावा अशी सरदार-सेनापतींची इच्छा होती. जर्मनीशीं पृथक् तह करून भांडवलदारास तोंडघशीं पाडण्याचा व झारला सरदारनियंत्रित करण्याचा उद्योग प्रोटोपोपॉव्ह करीत होता. या सर्व एकमेकांशीं भांडणाऱ्या वर्गांस बहुसंख्य समाजाच्या हातीं सत्ता जाऊं नये असें वाटत होतें. आपल्या गृहकलहानें बहुसंख्य समाजाचें बल वाढतें आहें हेंहि त्यांस दिसत होतें. त्यासाठीं ते वरचेवर हा कलह आवरता घेत व झाकून ठेवीत. पण त्यांना तो कायमचा बंद करतां आला नाहीं व त्याचा फायदा जनतेस आपलें बल वाढविण्याचे कामीं फ्रान्सप्रमाणें रशियांतहि करून घेतां आलाच. या घटनेचा खुलासा करतांना ट्रॉट्स्की सांगतो, "एकाद्या समाजांतील सर्व अंतर्विरोध निकरास पोंचले म्हणजेच क्रांतिकारक स्फोट होतो. या वेळीं समाजांतील जुन्या वर्गांसहि—जे वर्ग मरूं घातले आहेत त्या वर्गांसहि ती परिस्थिति दुःसह होते. प्राणिशास्त्रांतील उदाहरणास फाजील महत्त्व मी देतों असें नव्हे. पण इतकें कोणासहि मान्य करावें लागेल, कीं प्रसूतीची नैसर्गिक क्रिया ही जन्मणाऱ्या बालकाच्या शरीरास व तशीच त्याच्या मातेच्या शरीरासहि एका विशिष्ट वेळीं अपरिहार्य होते. रशियांतल्या राज्यकर्त्यांच्या वर्गांनीं झारशाहीस विरोध केला याचा अर्थ असा होता, कीं त्यांचा समाज यापुढें जिवंत राहण्यास ज्या गोष्टी त्यांना हव्या होत्या त्या त्यांच्या परंपरागत भूमिकेंत उपलब्ध होत नव्हत्या. जें हातीं धरण्यास हात पुढें करावा तें निसटून जात आहे असें या वर्गांस आढळून आलें. आपल्याविरुद्ध जग उठलें असें पाहून उमराववर्ग नोकरशाहीस दोष देई, नोकरशाही उमरावांच्या नांवानें खडे फोडी व दोघे मिळून अथवा एकेकटे राजावर असंतुष्ट होऊन अपेशाचें खापर त्याचे माथीं फोडीत."

एका अपयशाची पुढील यशास मदत

फेब्रुवारी अखेर कामकरी व सैनिक यांनीं पांच दिवस झगडून जी क्रांति घडवून आणली त्या कामीं कोणीहि प्रसिद्ध पुढारी जनतेस मिळाला नव्हता. लेनिन ट्रॉट्स्की, स्टॅलिन, कॅमेनेव्ह, झिनोव्हिफ व इतर कित्येक नामांकित पुढारी परदेशांत अथवा सैबेरियांत हद्दपार होते. मेन्शेव्हिक अथवा बोल्शेव्हिक जे जागेवर होते त्यांची त्या वेळीं क्रांति व्हावी अशी इच्छा नव्हती व ती होऊं शकेल ही कल्पनाहि त्यांना नव्हती. मग कामगारांनीं केवळ स्वयंस्फूर्तीनें

सर्व धोरणें संभाळून क्रांतीची तड गांठली कशी ? याचें कारण १९०५च्या क्रांतींतला कामगारांना मिळालेला अनुभव असें ट्रॉट्स्की सांगतो. १९०५ची क्रांति ही १९१७च्या क्रांतीची 'रंगी तालीम' (ड्रेस-रिहर्सल) होती असें लेनिननेंहि म्हटलें आहे. सैनिकांचीं मनें क्रांतीकडे वळवून घेणें वगैरे ज्या कित्येक गोष्टी १९०५ सालीं व्यवस्थितपणें व यशस्वितेनें करतां आल्या नाहींत असें लेनिननें म्हटलें होतें त्या १९१७च्या फेब्रुवारींत कामगारांनीं यशस्वितेनें तडीस नेल्या म्हणून त्यांना यश लाभलें. या दृष्टीनें १९०५चें कामकऱ्यांचें अपयश सुद्धां १९१७च्या रशियन क्रांतीच्या यशास कारणीभूत झालें असें म्हणावें लागतें. भौतिक शास्त्रांच्या प्रयोगशाळेंत जे मोठमोठे शोध लागतात ते प्रयोगशाळेंतील टेबलावर कित्येकदां आलेल्या अपयशांतून यशस्वी झालेले असतात. त्या अनेक अपयशांस अखेर यशाचे वाटेकरी करावें लागतें. कारण प्रत्यक्ष अनुभवाचा संग्रह या अपयशांनींच दिलेला असतो व ते अनुभव हेच यशःशिखरास नेणाऱ्या पायऱ्या ठरतात. भौतिक शोधांप्रमाणें मानवी व्यवहारासंबंधींचे शोधहि अनेक प्रयोग, अपयशें व अनुभव यांनींच लागतात. भौतिक शास्त्रांचे प्रयोग प्रयोगशाळेंत होत असल्यानें जनतेस त्यांच्या अपयशाची तोशीस लागत नाहीं. पण सामाजिक क्रांतीसारख्या प्रयोगांस प्रत्यक्ष समाज हीच प्रयोगशाळा असते. क्रांतिकारकांच्या प्रयोगांनीं पुष्कळदां समाजच्या समाज होरपळून निघतात आणि क्रांतीचा दिवस एकेका अपयशांनीं दूर दूर जातोसा दिसतो. जनतेस भोगाव्या लागणाऱ्या आपत्तींमुळें क्रांतिकारक पुढारी हे खलपुरुष मानले जातात. 'अपमान, उपहास, कारागृहीं वास' हे भोग त्यांस स्वदेशांत स्वजनांकडूनहि मिळतात. यासाठींच क्रांतिकारक पुढाऱ्यांत जाज्वल्य ध्येयानिष्ठा असावी लागते. मूर्ख, उतावळ्या व आततायी गुणांनीं वागून केलेल्या अपेशी प्रयोगांचें समर्थन करण्याचा येथें उद्देश नाहीं. पण स्वतः कांहीं न करतां केवळ बेजबाबदार टीका करून व दुसऱ्यांच्या नाकांत काड्या घालून जगास शहाणपण शिकविण्याचा आव कांहीं पर्यंकपंडित आणीत असतात, त्यांच्यासाठीं हें बोलणें आहे. क्रांतिकारक उठावानें गांजलेली जनता या रिकामटेकड्या विघ्नसंतोषी टीकाकारांमागून पुष्कळ काळ जात असते. पण अखेर इतिहास या टीकाकारांना देशद्रोही ठरविल्यावांचून राहत नाहीं. अशांच्या

टीकेसाठीं नव्हे, पण जनतेच्या पाठिंब्यासाठीं व तिच्या हितासाठीं क्रांतिकारकांनीं चुक्या कमींत कमी कराव्या व केवळ प्रयोगावारी लोकांवर आपत्ति आणूं नयेत हें इष्ट असतें. पण भौतिक संशोधनांत चुक्या अपरिहार्यच असतात व म्हणूनच स्वतंत्र प्रयोगशाळा असावी लागते. आणि मानवी व्यवहाराला तशी प्रयोगशाळा नसून प्रत्यक्ष समाजजीवन हीच प्रयोगशाळा म्हणून पत्करावी लागते, व चुक्यांची अपरिहार्यता मात्र नष्ट होत नाहीं. इतकेंच नव्हे तर प्रयोग व्यर्थ जाणार ही शंका येऊन सुद्धां प्रयोगशाळेंत एकादा प्रयोग करून पाहून खात्री करून घ्यावी लागते, त्याशिवाय पुढील प्रयोगांची वाट मोकळी होत नाहीं; त्याप्रमाणेंच मानवी जीवनांतहि कदाचित् व्यर्थ होतील असे वाटणारे प्रयोग निदान पुढील वाट दिसूं लागेल एवढ्या फायद्यासाठीं नुकसान पत्करूनहि करावे लागतात. शक्य तितक्या अधिक जबाबदारीच्या जाणीवेनें पुढारी वागत असूनहि त्यांचे हातून ज्या चुक्या होतात व जनतेस त्यामुळें जी आपत्ति भोगावी लागते ती जनतेनेंहि धीमेपणानें सहन करून व पुढाऱ्यांबद्दल क्षमावृत्ति धारण करून त्यास वेळोवेळीं झगड्यांत पुनः पुन्हां पाठिंबा द्यावा असें जनतेस शिक्षण मिळालें पाहिजे. खऱ्या विधायक टीकाकारानें हें शिक्षण देण्याची जबाबदारी आपली आहे हें ओळखलें पाहिजे. रशियांत जनतेस हें शिक्षण मिळालें व म्हणूनच अखेर यश आलें. मनुष्य हा चुकीस पात्र आहे असें मानून त्याबद्दल क्षमावृत्ति धारण करणें हा फार थोर असा सामाजिक सद्गुण आहे. मुलें पडत पडत चालूं लागतात तसेंच पुढाऱ्यांचें व समाजांचेंहि असतें. त्यांस वरचेवर आवरलें पाहिजे व त्यांच्या धडपड्या गुणाबद्दल प्रेम ठेवलें पाहिजे.

(१) राज्यक्रांति घडवून आणण्यास धंदेवाईक क्रांतिकारक पुढाऱ्यांचा संघटित पक्ष असावा लागतो आणि (२) प्रत्यक्ष राज्यक्रांति घडवून आणण्याचें हत्यार व सत्ता धारण करण्याचें साधन अशी सोव्हियट संस्था ही एक नवीन युक्ति रशियन क्रांतींत सांपडली व यशस्वितेनें वापरली गेली हे आणखी दोन मुद्दे रशियन राज्यक्रांतीसंबंधीं महत्त्वाचे आहेत. पण त्यांचें विवेचन लेनिन व ट्रॉट्स्की यांच्या मागें दिलेल्या उताऱ्यांतून आलें असून क्रांतीचा हा सर्व इतिहास हेंच त्यांचें उदाहरण आहे म्हणून त्या मुद्द्यांची आणखी चर्चा येथें करीत नाहीं.

प्रकरण १२ वें

जगांतील पहिलें सोव्हियट राज्य



आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत मागसलेल्या व अज्ञानांधकाराच्या खोल दरींत पडलेल्या कोट्यवधि जनतेसह आपण त्या खोल दरींतून सगळ्या जगाहून उंच असा कामगारक्रांतीचा चढ चढून एका मुक्कामास आलों व त्यानंतर, मागील प्रकरणांत, चढलेल्या मार्गावर एकवार मागें वळून पाहिलें. सगळ्या जगाच्या मागें असें असलेलें रशियन राष्ट्र थोड्या वेळांत सर्व जगांत अखेरची व सर्वांत पुढारलेली अशी मानली गेलेली कामगारक्रांति यशस्वितेनें करतें झालें. पण त्यासाठीं बाकीच्या जगाच्या इतिहासाहून, अधिक अवघड, अधिक चढा व अधिक जिकिरीचा असा मार्ग त्यांना आक्रमावा लागला. इतिहासाच्या चढणीवर त्यांचीं पावलें त्यांनीं सहजच जोरानें रोवून टाकलीं. आतां त्यांचे कायम राहिलेले ठसे जगाला दिसतात. दूरच्या राजरस्त्यानें गड चढण्याइतकी ज्यांना सवड नसेल अथवा शक्यता नसेल व म्हणून चढ्या-वाटेनेंच ज्यांना चढावें लागेल त्यांना रशियन शेतकऱ्यांच्या पावलांचे ठसे आधाराला व वाट शोधण्याला उपयोगी पडतील. अक्कलवंत असतील ते त्यांच्या चुका टाळतील व त्यांनीं अज्ञानामुळें भोगलेलीं दुःखें आपणांवर येऊं देणार नाहींत. इतिहासलेखनाचा हाच हेतु व उपयोग असतो. असो; चढ संपून सपाटीचा प्रदेश आला तरी त्यापुढें रशियन जनतेस अत्यंत दुर्गम व संकटमय प्रदेशांतून मार्ग काढावा लागला आहे. त्या इतिहासाकडे आपण आतां वळूं.

घटनापरिषदेची कोंडी

मरतां मरतां शत्रूवर जशी गोळी झाडावी त्याप्रमाणें केरेन्स्कीच्या सरकारनें मरतां मरतां बोल्शेव्हिक सरकारला उलथून पाडण्यासाठीं एक छुपा खड्डा खणून ठेविला होता. फेब्रुवारीपासून घटनापरिषद 'योग्य वेळीं' बोलावून

खरीखुरी प्रातिनिधिक राज्यसंस्था स्थापण्याची योजना ठरलेली होती. भांडवलवाल्यांचें जें नवें सरकार निर्माण करण्यांत आलें होतें, त्याला या कारणानेंच 'तात्पुरतें सरकार' (प्रोव्हिजनल गव्हर्मेंट) हें नांव मिळालें होतें. पण या सरकारच्या दृष्टीनें 'योग्य वेळ' लवकर आलीच नाहीं व घटनापरिषदेच्या तारखांमागून तारखा लांबूं लागल्या. शेवटीं केरेन्स्कीनें राज्यत्याग करण्यापूर्वी थोडेच दिवस आधीं घटनापरिषदेसाठीं प्रतिनिधींच्या निवडणुकी करण्यास हुकूम दिला. पण ऑक्टोबरक्रांतीच्या आधींच्या तीनचार आठवड्यांत परिस्थिति भराभर पालटत होती. निवडणुकींतील उमेदवारांच्या याद्या निरनिराळ्या पक्षातर्फे जेव्हां पुढें आल्या तेव्हां बहुतेक शेतकरीवर्गाचा पुढारी जो सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष तो एकजूट होता व बोल्शेव्हिकांस तीव्रतेनें प्रतिकूल होता. पण ऑक्टोबरक्रांतीचे नुकतेच पूर्वी त्यांच्यांत जहाल व मवाळ असे भेद होऊन फूट पडली. ती इतकी कीं सोव्हियट काँग्रेसमध्यें जेव्हां सोव्हियट प्रतिनिधींचें सरकार स्थापण्याचा ठराव झाला, त्या वेळीं मेन्शेव्हिक व मवाळ सोशल रेव्होल्यूशनरी काँग्रेसमधून उठून गेले व जहाल सोशल रेव्होल्यूशनरी पुढारी मंत्रिमंडळांत सामील झाले. पण अशी फूट होण्यापूर्वी घटनापरिषदेच्या उमेदवारांच्या याद्या प्रसिद्ध झाल्यामुळें त्या वेळची बोल्शेव्हिकांना प्रतिकूल असलेली सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील जूट आतां बोल्शेव्हिक सरकारला चांगलीच भोंवली. एक आठवड्यानंतर ऐन क्रांतीच्या वेळीं पुढाऱ्यांच्या मतांत झालेलीं नवीं आंदोलनें जनतेंत ताबडतोब पोंचूं शकलीं नाहींत. क्रांतीमागून झालेल्या निवडणुकींत एकंदर ३ कोटि ६० लक्ष मतें नोंदलीं गेलीं. त्यांत बोल्शेव्हिकांना ९० लक्ष, मेन्शेव्हिकांना फक्त १४ लक्ष, इतर मध्यमवर्गीय पक्षांना ५० लक्ष व एकट्या सोशल रेव्होल्यूशनरी पक्षास २ कोटि १० लक्ष मतें पडलीं. अर्थात् बोल्शेव्हिक क्रांतीनंतर या मतप्रमाणानें निवडली गेलेली घटनापरिषद बोलावण्यास लेनिनला मुळींच उत्साह नव्हता. ही घटनापरिषद सोशल रेव्होल्यूशनरींच्या बदललेल्या मताची निदर्शक होणार नसून केरेन्स्कीच्या प्रेमानें नव्हे तर बोल्शेव्हिझम्‌बद्दलच्या अज्ञानानें व सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष आपणास जमिनी देणार या भरंवशानें बहुसंख्य शेतकऱ्यांनीं आपलीं मतें सोशल रेव्होल्यूशनरींना दिलीं आहेत हें लेनिन जाणत होता. शेतकऱ्यांची जमिनीची इच्छा लेनिन स्वतःच पूर्ण करणार होता. पण घटनापरिषदेनें

बोल्शेव्हिक सत्तेलाच खो दिला तर सर्वच ऑफस् होऊन बेबंदशाही माजेल ही भीति होती. मग ही विषाची परीक्षा पाहायची कशाला? पण बोल्शेव्हिकांनीं 'तात्पुरतें सरकार' घटनापरिषद बोलावण्यास भितें अशी प्रथमपासूनच ओरड केली असल्यानें आतां हातीं सत्ता आल्यावर घटनापरिषद बोलावण्याचें शौर्य आपल्या अंगीं आहे असें दाखविण्याची पाळी बोल्शेव्हिकांवर आली होती. कदाचित् कांहींशा बेजबाबदारपणें केलेली प्रतिपक्षाची टवाळी आतां बोल्शेव्हिकांचे अंगाशीं आली. शेवटीं नाहीं होय करतां करतां ५ जानेवारी १९१८ रोजीं घटनापरिषद बोलावण्यांत आली. ती बोल्शेव्हिक राज्यास संमति देणार नाहीं व म्हणून ती उधळून द्यावी लागणार असें लेनिन जाणून होता. त्यासाठीं हातार्शी सैन्याची जय्यत तयारी असणें जरूर होतें. परिषद शेतकऱ्यांची प्रतिनिधि असणार यामुळें ती उधळून लावण्यास शेतकऱ्यांच्या सैन्याची पलटण ठेवली तर त्यांत धोका येईल हें लक्षांत घेऊन लेनिननें तेथून शेतकऱ्यांच्या पलटणी दूर नेल्या व कामगारांची एक लेटिश पलटण जय्यत तयार करून ठेवली असें ट्रॉट्स्कीनें लेनिनसंबंधींच्या आपल्या आठवणींच्या ग्रंथांत नमूद करून ठेविलें आहे. लेनिनच्या अपेक्षेप्रमाणें या घटनापरिषदेनें सोव्हियट सरकार कायदेशीर आहे हेंहि मान्य करण्याचें प्रचंड बहुमतानें नाकारलें. तेव्हां बोल्शेव्हिक व जहाल सोशल रेव्होल्यूशनरी प्रतिनिधि सभागृह सोडून गेले. ऑल रशियन सोव्हियट कॉंग्रेसच्या मध्यवर्ती कार्यकारीसमितीनें म्हणजे बोल्शेव्हिक सरकारनें घटनापरिषद बरखास्त करण्याचा हुकूम दिला आणि परिषदेच्या दाराशीं उभें असलेलें बोल्शेव्हिक कामगारांचें सैन्य पाहून परिषद बरखास्त झाली.

घटनापरिषद ही 'सेमीरेव्होल्यूशनरी' परिस्थितींत बोलविणें योग्य असतें असें कांहीं रेव्होल्यूशनरी अथवा 'सेमीरेव्होल्यूशनरी' पुढाऱ्यांचें मत पुष्कळ ठिकाणीं ऐकूं येतें. फेब्रुवारी ते ऑक्टोबर या कालांतील रशियांतील परिस्थिति खात्रीनें 'सेमीरेव्होल्यूशनरी' (दुभंगलेली सत्ता असणारी) होती असें म्हणावें लागेल. पण या काळांत 'तात्पुरत्या सरकार'ला घटनापरिषद बोलावण्याइतका आत्मविश्वास अखेरपर्यंत वाटला नाहीं. शेवटीं त्यांनीं ज्या घटनापरिषदेस हुकूम दिला तिनें त्या सरकारच्या मृत्यूनंतर त्यांना पाठिंबा देणाऱ्या मेन्शेव्हिकांना शेंकडा पांच मतेंहि न देऊन त्यांचा धुव्वा उडविला,

बोल्शेव्हिकांनाहि विटी कोलवावी तसें कोलविलें व ज्यांनीं राज्यसत्ता धारण करावी कशी व ती धारण केल्यावर काय करावें याचा व्यावहारिक दृष्ट्या कधींहि विचार केला नव्हता अशा सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाच्या मस्तकावर प्रचंड मताधिक्याचा मुकुट ठेवला. बोल्शेव्हिक सरकारला रशियांतलें प्रचंड व प्रभावी लोकमत अनुकूल आहे हें अनेक अवांतर पुराव्यांनीं प्रत्यहीं सिद्ध होत होतें. अशा स्थितींत अगदीं कायदेशीर अशी जी बहुमत अजमावण्याची कसोटी तीच सरकारचे विरुद्ध गेली. पण लेनिन 'सेमीरेव्होल्यूशनरी' नसून पूर्ण रेव्होल्यूशनरी होता. म्हणून त्यानें घटनापरिषदेचा फार्स अंगलट येतो असें दिसतांच तो विसकटून टाकला. तथापि केवळ परंपरागत म्हणून, प्राप्त कालीन व्यावहारिक परिस्थितीचा विचार न करतां, एखादी कल्पना गळ्यांत बांधून घेतली म्हणजे ऐन वेळीं ती कशी फास घालून बसते ही गोष्ट या इतिहासानें चांगलीच स्पष्ट केली.

मागून मार्चमध्यें घटनापरिषदेसंबंधीं आपला सिद्धांत 'प्रवदा'मध्यें लेनिननें प्रसिद्ध केला. त्यांत तो म्हणतो, कीं भांडवलशाहीच्या तत्त्वाप्रमाणें लोकमताच्या पूर्णनिदर्शनाचें साधन म्हणून बोल्शेव्हिक पक्षाच्या कार्यक्रमांत घटनापरिषदेस रास्तपणें स्थान दिलें गेलें होतें. पण पार्लमेंटरी लोकशाहीपेक्षां सोव्हियट लोकशाही हीच अधिक लोकमतनिदर्शक असते असें १९१७च्या मार्चपासून पक्षास कळून येऊं लागल्यामुळें अशा संस्थेचें सरकार बनविल्यासच कमींत कमी यातना होऊन क्रांति होईल असें आमचें मत झालें. सोव्हियट पद्धतींत प्रतिनिधि केव्हांहि परत बोलाविण्याचा व त्याचे जागीं दुसरा नेमण्याचा अधिकार असतो म्हणून पार्लमेंटरी घटनेपेक्षां सोव्हियट घटनेंत मतदाराचें प्रतिनिधींवर नियंत्रण अधिक राहतें असें लेनिनचें म्हणणें आहे.

ब्रेस्ट-लिटोव्स्कचा तह

घटनापरिषदेपेक्षांहि अधिक निकडीचा प्रश्न युद्ध थांबविणें हा होता. सोव्हियट राज्याच्या पहिल्याच दिवशीं नवीन सरकारनें 'शांततेचा जाहीरनामा' (पीस-डिक्री) प्रसिद्ध करून सर्व युद्धयमान राष्ट्रांस व जर्मनीस पाठविला. त्यांत कोणीहि नवीन प्रदेशावर आक्रमण करूं नये या अटीवर रशिया तहास तयार आहे असें सुचविलें होतें. पण हें निर्वाणीचें बोलणें नसून बाकीच्या राष्ट्रांनीं व

जर्मनीनें आपल्या अटी सुचविल्यास त्यांचा विचार करण्याची तयारी दर्शविली होती. कमींत कमी तीन महिन्यांची युद्धतहकुबी व्हावी. त्यानंतर स्वतंत्र असलेलीं व नसलेलीं अशा सर्व राष्ट्रांची एक परिषद बोलवावी व त्यांत अखेरचा तह व्हावा असें खलित्यांत म्हटलें होतें. या खलित्यास इंग्लंड व फ्रान्स यांनीं उत्तरहि पाठविलें नाहीं व रशियांतील नवीन सरकारास मान्यताच देण्याचें नाकारलें. जर्मनी व रशिया यांचे दरम्यान मात्र युद्ध तहकूब करण्यासंबंधीं २२ नोव्हेंबर रोजीं करार झाला व २९ नोव्हेंबरला तहाच्या वाटाघाटी चालू झाल्या. रशियाच्या सर्व अंकित राष्ट्रांस लेनिननें पूर्ण स्वयंनिर्णयाचा हक्क जाहीर केला होता. पण जर्मनीनें फिन्लंड, इस्थोनिया, लॅट्व्हिया, लिथुआनिया, व्हाइट रशिया, पोलंड, युक्रेन हीं सर्व राष्ट्रें रशियापासून तोडण्याची अट घातली. अशीं तीं तोडलीं, कीं तीं जर्मनीचीं अंकित होणार हें उघड होतें. हा तह करण्यास ट्रॉट्स्की वगैरे पुढारी नाकबूल झाले. कांहींहि करून युद्ध न थांबविलें तर शेतकरी फार दिवस दम धरणार नाहींत व बोल्शेव्हिक सरकार उधळलें जाऊन सर्वत्र बेबंदशाही माजेल ही लेनिनला भीति वाटली. तीन महिने या वाटाघाटी चालल्या. शेवटीं ट्रॉट्स्कीनें आपला हट्ट सोडला व १९१८च्या मार्चचे ३ तारखेस रशियानें जर्मनीच्या अटी मान्य करून ब्रेस्ट-लिटोव्हस्क येथें तहावर सही केली. जर्मन सरकारनें या तहास २२ मार्च १९१८ रोजीं कायदेशीर मंजुरी दिली.*

ऑक्टोबर क्रांतीचे वेळीं जे जहाल सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पुढारी लेनिनला येऊन मिळाले होते, त्यांना ब्रेस्टलिटोव्हस्कचा तह अमान्य होऊन ते लेनिनपासून फुटले. तहानुसार जर्मनीचा वकील मरबाच हा पेट्रोग्रॅड-मध्यें कचेरी थाटून राहूं लागला. त्याचा कांहीं सोशल रेव्होल्यूशनरी कट-वाल्यांनीं खून पाडला. हें प्रकरण चिघळून पुन्हा युद्ध सुरू होतें कीं काय अशी लेनिनला भीति वाटली; म्हणून जर्मन अधिकाऱ्यांची समजूत घालण्यासाठीं तो स्वतः जर्मन वकिलातींत गेला. तेथें, आमचें रक्षण तुम्ही करूं शकत

---

*रशियांतील जुन्या कॅलेंडरप्रमाणें १९ जानेवारी १९१८ दिवशीं नव्या म्हणजे जगभर रूढ असलेल्या इसवी सनाच्या कॅलेंडरची तारीख १ फेब्रुवारी १९१८ होती. या दिवशीं रशियानें नवें कॅलेंडर अमलांत आणलें.

खरीखुरी प्रातिनिधिक राज्यसंस्था स्थापण्याची योजना ठरलेली होती. भांडवलवाल्यांचें जें नवें सरकार निर्माण करण्यांत आलें होतें, त्याला या कारणानेंच 'तात्पुरतें सरकार' (प्रोव्हिजनल गव्हर्मेंट) हें नांव मिळालें होतें. पण या सरकारच्या दृष्टीनें 'योग्य वेळ' लवकर आलीच नाहीं व घटनापरिषदेच्या तारखांमागून तारखा लांबूं लागल्या. शेवटीं केरेन्स्कीनें राज्यत्याग करण्यापूर्वी थोडेच दिवस आधीं घटनापरिषदेसाठीं प्रतिनिधींच्या निवडणुकी करण्यास हुकूम दिला. पण ऑक्टोबरक्रांतीच्या आधींच्या तीनचार आठवड्यांत परिस्थिति भराभर पालटत होती. निवडणुकींतील उमेदवारांच्या याद्या निरनिराळ्या पक्षातर्फे जेव्हां पुढें आल्या तेव्हां बहुतेक शेतकरीवर्गाचा पुढारी जो सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष तो एकजूट होता व बोल्शेव्हिकांस तीव्रतेनें प्रतिकूल होता. पण ऑक्टोबरक्रांतीचे नुकतेच पूर्वी त्यांच्यांत जहाल व मवाळ असे भेद होऊन फूट पडली. ती इतकी कीं सोव्हियट काँग्रेसमध्यें जेव्हां सोव्हियट प्रतिनिधींचें सरकार स्थापण्याचा ठराव झाला, त्या वेळीं मेन्शेव्हिक व मवाळ सोशल रेव्होल्यूशनरी काँग्रेसमधून उठून गेले व जहाल सोशल रेव्होल्यूशनरी पुढारी मंत्रिमंडळांत सामील झाले. पण अशी फूट होण्यापूर्वी घटनापरिषदेच्या उमेदवारांच्या याद्या प्रसिद्ध झाल्यामुळें त्या वेळची बोल्शेव्हिकांना प्रतिकूल असलेली सोशल रेव्होल्यूशनरी पक्षांतील जूट आतां बोल्शेव्हिक सरकारला चांगलीच भोंवली. एक आठवड्यानंतर ऐन क्रांतीच्या वेळीं पुढाऱ्यांच्या मतांत झालेलीं नवीं आंदोलनें जनतेंत ताबडतोब पोंचूं शकलीं नाहींत. क्रांतीमागून झालेल्या निवडणुकींत एकंदर ३ कोटि ६० लक्ष मतें नोंदलीं गेलीं. त्यांत बोल्शेव्हिकांना ९० लक्ष, मेन्शेव्हिकांना फक्त १४ लक्ष, इतर मध्यमवर्गीय पक्षांना ५० लक्ष व एकट्या सोशल रेव्होल्यूशनरी पक्षास २ कोटि १० लक्ष मतें पडलीं. अर्थात् बोल्शेव्हिक क्रांतीनंतर या मतप्रमाणानें निवडली गेलेली घटनापरिषद बोलावण्यास लेनिनला मुळींच उत्साह नव्हता. ही घटनापरिषद् सोशल रेव्होल्यूशनरींच्या बदललेल्या मताची निदर्शक होणार नसून केरेन्स्कीच्या प्रेमानें नव्हे तर बोल्शेव्हिझम्बद्दलच्या अज्ञानानें व सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष आपणास जमिनी देणार या भरंवशानें बहुसंख्य शेतकऱ्यांनीं आपलीं मतें सोशल रेव्होल्यूशनरींना दिलीं आहेत हें लेनिन जाणत होता. शेतकऱ्यांची जमिनीची इच्छा लेनिन स्वतःच पूर्ण करणार होता. पण घटनापरिषदेनें

बोल्शेव्हिक सत्तेलाच खो दिला तर सर्वच ऑफस् होऊन बेबंदशाही माजेल ही भीति होती. मग ही विषाची परीक्षा पाहायची कशाला? पण बोल्शेव्हिकांनीं 'तात्पुरतें सरकार' घटनापरिषद बोलावण्यास भितें अशी प्रथमपासूनच ओरड केली असल्यानें आतां हातीं सत्ता आल्यावर घटनापरिषद बोलावण्याचें शौर्य आपल्या अंगीं आहे असें दाखविण्याची पाळी बोल्शेव्हिकांवर आली होती. कदाचित् कांहींशा बेजबाबदारपणें केलेली प्रतिपक्षाची टवाळी आतां बोल्शेव्हिकांचे अंगाशीं आली. शेवटीं नाहीं होय करतां करतां ५ जानेवारी १९१८ रोजीं घटनापरिषद बोलावण्यांत आली. ती बोल्शेव्हिक राज्यास संमति देणार नाहीं व म्हणून ती उधळून द्यावी लागणार असें लेनिन जाणून होता. त्यासाठीं हाताशीं सैन्याची जय्यत तयारी असणें जरूर होतें. परिषद शेतकऱ्यांची प्रतिनिधि असणार यामुळें ती उधळून लावण्यास शेतकऱ्यांच्या सैन्याची पलटण ठेवली तर त्यांत धोका येईल हें लक्षांत घेऊन लेनिननें तेथून शेतकऱ्यांच्या पलटणी दूर नेल्या व कामगारांची एक लेटिश पलटण जय्यत तयार करून ठेवली असें ट्रॉट्स्कीनें लेनिनसंबंधींच्या आपल्या आठवणींच्या ग्रंथांत नमूद करून ठेविलें आहे. लेनिनच्या अपेक्षेप्रमाणें या घटनापरिषदेनें सोव्हियट सरकार कायदेशीर आहे हेंहि मान्य करण्याचें प्रचंड बहुमतानें नाकारलें. तेव्हां बोल्शेव्हिक व जहाल सोशल रेव्होल्यूशनरी प्रतिनिधि सभागृह सोडून गेले. ऑल रशियन सोव्हियट काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यकारीसमितीनें म्हणजे बोल्शेव्हिक सरकारनें घटनापरिषद बरखास्त करण्याचा हुकूम दिला आणि परिषदेच्या दाराशीं उभें असलेलें बोल्शेव्हिक कामगारांचें सैन्य पाहून परिषद बरखास्त झाली.

घटनापरिषद ही 'सेमीरेव्होल्यूशनरी' परिस्थितींत बोलविणें योग्य असतें असें कांहीं रेव्होल्यूशनरी अथवा 'सेमीरेव्होल्यूशनरी' पुढाऱ्यांचें मत पुष्कळ ठिकाणीं ऐकूं येतें. फेब्रुवारी ते ऑक्टोबर या कालांतील रशियांतील परिस्थिति खात्रीनें 'सेमीरेव्होल्यूशनरी' (दुभंगलेली सत्ता असणारी) होती असें म्हणावें लागेल. पण या काळांत 'तात्पुरत्या सरकार'ला घटनापरिषद बोलावण्याइतका आत्मविश्वास अखेरपर्यंत वाटला नाहीं. शेवटीं त्यांनीं ज्या घटनापरिषदेस हुकूम दिला तिनें त्या सरकारच्या मृत्यूनंतर त्यांना पाठिंबा देणाऱ्या मेन्शेव्हिकांना शेंकडा पांच मतेंहि न देऊन त्यांचा धुव्वा उडविला,

बोल्शेव्हिकांनाहि विटी कोलवावी तसें कोलविलें व ज्यांनीं राज्यसत्ता धारण करावी कशी व ती धारण केल्यावर काय करावें याचा व्यावहारिक दृष्ट्या कधींहि विचार केला नव्हता अशा सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाच्या मस्तकावर प्रचंड मताधिक्याचा मुकुट ठेवला. बोल्शेव्हिक सरकारला रशियांतलें प्रचंड व प्रभावी लोकमत अनुकूल आहे हें अनेक अवांतर पुराव्यांनीं प्रत्यहीं सिद्ध होत होतें. अशा स्थितींत अगदीं कायदेशीर अशी जी बहुमत अजमावण्याची कसोटी तीच सरकारचे विरुद्ध गेली. पण लेनिन 'सेमीरेव्होल्यूशनरी' नसून पूर्ण रेव्होल्यूशनरी होता. म्हणून त्यानें घटनापरिषदेचा फार्स अंगलट येतो असें दिसतांच तो विसकटून टाकला. तथापि केवळ परंपरागत म्हणून, प्राप्त कालीन व्यावहारिक परिस्थितीचा विचार न करतां, एखादी कल्पना गळ्यांत बांधून घेतली म्हणजे ऐन वेळीं ती कशी फास घालून बसते ही गोष्ट या इतिहासानें चांगलीच स्पष्ट केली.

मागून मार्चमध्यें घटनापरिषदेसंबंधीं आपला सिद्धांत 'प्रवदा'मध्यें लेनिननें प्रसिद्ध केला. त्यांत तो म्हणतो, कीं भांडवलशाहीच्या तत्त्वाप्रमाणें लोकमताच्या पूर्णनिदर्शनाचें साधन म्हणून बोल्शेव्हिक पक्षाच्या कार्यक्रमांत घटनापरिषदेस रास्तपणें स्थान दिलें गेलें होतें. पण पार्लमेंटरी लोकशाहीपेक्षां सोव्हियट लोकशाही हीच अधिक लोकमतनिदर्शक असते असें १९१७ च्या मार्चपासून पक्षास कळून येऊं लागल्यामुळें अशा संस्थेचें सरकार बनविल्यासच कमींत कमी यातना होऊन क्रांति होईल असें आमचें मत झालें. सोव्हियट पद्धतींत प्रतिनिधि केव्हांहि परत बोलाविण्याचा व त्याचे जागीं दुसरा नेमण्याचा अधिकार असतो म्हणून पार्लमेंटरी घटनेपेक्षां सोव्हियट घटनेंत मतदाराचें प्रतिनिधींवर नियंत्रण अधिक राहतें असें लेनिनचें म्हणणें आहे.

ब्रेस्ट-लिटोव्स्कचा तह

घटनापरिषदेपेक्षांहि अधिक निकडीचा प्रश्न युद्ध थांबविणें हा होता. सोव्हियट राज्याच्या पहिल्याच दिवशीं नवीन सरकारनें 'शांततेचा जाहीरनामा' (पीस-डिक्री) प्रसिद्ध करून सर्व युद्धयमान राष्ट्रांस व जर्मनीस पाठविला. त्यांत कोणीहि नवीन प्रदेशावर आक्रमण करूं नये या अटीवर रशिया तहास तयार आहे असें सुचविलें होतें. पण हें निर्वाणीचें बोलणें नसून बाकीच्या राष्ट्रांनीं व

जर्मनीनें आपल्या अटी सुचविल्यास त्यांचा विचार करण्याची तयारी दर्शविली होती. कमींत कमी तीन महिन्यांची युद्धतहकुबी व्हावी. त्यानंतर स्वतंत्र असलेलीं व नसलेलीं अशा सर्व राष्ट्रांची एक परिषद बोलवावी व त्यांत अखेरचा तह व्हावा असें खलित्यांत म्हटलें होतें. या खलित्यास इंग्लंड व फ्रान्स यांनीं उत्तरहि पाठविलें नाहीं व रशियांतील नवीन सरकारास मान्यताच देण्याचें नाकारलें. जर्मनी व रशिया यांचे दरम्यान मात्र युद्ध तहकूब करण्यासंबंधीं २२ नोव्हेंबर रोजीं करार झाला व २९ नोव्हेंबरला तहाच्या वाटाघाटी चालू झाल्या. रशियाच्या सर्व अंकित राष्ट्रांस लेनिननें पूर्ण स्वयंनिर्णयाचा हक्क जाहीर केला होता. पण जर्मनीनें फिन्लंड, इस्थोनिया, लॅट्व्हिया, लिथुआनिया, व्हाइट रशिया, पोलंड, युक्रेन हीं सर्व राष्ट्रें रशियापासून तोडण्याची अट घातली. अशीं तीं तोडलीं, कीं तीं जर्मनीचीं अंकित होणार हें उघड होतें. हा तह करण्यास ट्रॉट्स्की वगैरे पुढारी नाकबूल झाले. कांहींहि करून युद्ध न थांबविलें तर शेतकरी फार दिवस दम धरणार नाहींत व बोल्शेव्हिक सरकार उधळलें जाऊन सर्वत्र बेबंदशाही माजेल ही लेनिनला भीति वाटली. तीन महिने या वाटाघाटी चालल्या. शेवटीं ट्रॉट्स्कीनें आपला हट्ट सोडला व १९१८च्या मार्चचे ३ तारखेस रशियानें जर्मनीच्या अटी मान्य करून ब्रेस्ट-लिटोव्हस्क येथें तहावर सही केली. जर्मन सरकारनें या तहास २२ मार्च १९१८ रोजीं कायदेशीर मंजुरी दिली.*

ऑक्टोबर क्रांतीचे वेळीं जे जहाल सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पुढारी लेनिनला येऊन मिळाले होते, त्यांना ब्रेस्टलिटोव्हस्कचा तह अमान्य होऊन ते लेनिनपासून फुटले. तहानुसार जर्मनीचा वकील मरवाच हा पेट्रोग्रॅड-मध्यें कचेरी थाटून राहूं लागला. त्याचा कांहीं सोशल रेव्होल्यूशनरी कट-वाल्यांनीं खून पाडला. हें प्रकरण चिघळून पुन्हा युद्ध सुरू होतें कीं काय अशी लेनिनला भीति वाटली; म्हणून जर्मन अधिकाऱ्यांची समजूत घालण्यासाठीं तो स्वतः जर्मन वकिलातींत गेला. तेथें, आमचें रक्षण तुम्ही करूं शकत

---

*रशियांतील जुन्या कॅलेंडरप्रमाणें १९ जानेवारी १९१८ दिवशीं नव्या म्हणजे जगभर रूढ असलेल्या इसवी सनाच्या कॅलेंडरची तारीख १ फेब्रुवारी १९१८ होती. या दिवशीं रशियानें नवें कॅलेंडर अमलांत आणलें.

नसल्यास आम्ही एक जर्मन पलटण पेट्रोग्रॅड येथें ठेवणार अशी जर्मन अधिकाऱ्यांनीं अट घातली. ती साफ अमान्य करून हें प्रकरण न मिटवितांच लेनिन परत गेला. इकडे जर्मन अधिकाऱ्यांनीं वकिलात पेट्रोग्रॅडहून पिस्कोव्ह येथें हालविली. जर्मन सेनापति लुडेंडॉर्फ यानें रशियावर चढाई करण्याचीहि तजवीज चालू केली; पण जर्मनीच्या पश्चिम आघाडीवर जर्मनीचा एकसारखा पराभव होऊं लागल्यामुळें लुडेंडॉर्फला आपली योजना कधींच सुरूहि करतां आली नाहीं.

सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्ष जरी लेनिनला सोडून गेला तरी त्या पक्षाचा पैकीं कोणाचेंहि वजन आतां शेतकऱ्यांवर उरलें नव्हतें. तह आणि जमिनी शेतकऱ्यांना मिळाल्यानें ते बोल्शेव्हिक सरकारवर खूष होते. आपला कांहींच इलाज चालत नाहीं असें पाहून सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाच्या कांहीं लोकांनीं लेनिनचा खून करण्याचा कट केला. ता. ३० ऑगस्ट १९१८ रोजीं मॉस्कोजवळील एक मजूरसभा संपवून लेनिन मोटारींत चढत असतां फॅनी कॅप्लॅन नांवाच्या एका सोशल रेव्होल्यूशनरी बाईनें लेनिनवर दोन गोळ्या झाडल्या. एक फुप्फुसांत शिरली, दुसरी मानेस चाटून गेली. झालेल्या जखमेंतून अनेक दिवसांनीं लेनिन बरा झाला. या अत्याचारानें लेनिनच्या व बोल्शेव्हिक पक्षाच्या लोकप्रियतेंत भरच पडली.

रशियानें जगांतील कामगारांच्या गुलामगिरीचा मोक्ष करण्याचा नाद सोडून देऊन जर्मनीशीं केवळ राष्ट्रीय स्वार्थबुद्धीनें तह केला असा जगांतील कामगारांचा आरोप येऊं नये म्हणून ट्रॉट्स्की तहास विरोध करीत होता. जर्मनीच्या मागण्या जर्मनी अगदीं डोकीवर बंदूक रोखून लादील त्या वेळीं तह करूं असें ट्रॉट्स्कीचें म्हणणें होतें. कदाचित् जर्मनींतहि लवकरच क्रांति होईल अशीहि त्याला आशा होती; पण शेवटीं त्यानें लेनिनच्या मतास मान्यता दिली. पुढें एकंदरींत लेनिननें तह केला हेंच अंतर्गत परिस्थितीच्या दृष्टीनें योग्य झालें असें ट्रॉट्स्कीस पटलें. ऑक्टोबर (१९१८)च्या ३ तारखेस सरकारी कार्यकारी मंडळाच्या बैठकींत "आम्ही तहास विरोध करीत होतों ती चूक करीत होतों, लेनिनचें म्हणणें योग्य होतें" अशी ट्रॉट्स्कीनें प्रांजलपणें कबूली दिली. (ट्रॉट्स्की–माय लाइफ पृ. ३७). स्टॅलिन मात्र तहास प्रथमपासून लेनिनच्या बाजूनें पाठिंबा देत होता. अर्थात् ट्रॉट्स्कीनें तीन महिनेपर्यंत तहास संमति न

देतां जर्मनीविरुद्ध भाषणांवर भाषणें ठोकलीं. जगांतील कामगारांना रशियाची कहाणी सांगितली. त्या व्याख्यानांचे रिपोर्ट विदेशी वृत्तपत्रांतूनहि आले, त्यामुळें जगांतील लोकमत ब्रेस्ट तहास व बोल्शेव्हिकांस अनुकूल होण्यास मदत झाली असें लेनिननें मे १७(१९१८) रोजीं केलेल्या भाषणांत बोलून दाखविलें.

यादवी युद्ध

घटनापरिषद व तह हे दोन तात्कालिक महत्त्वाचे प्रश्न याप्रमाणें तडकाफडकीं निकालांत निघाले तरी याहून फारच खडतर अशा अडचणी लेलिन-पुढें उभ्या होत्या. झारशाही व केरेन्स्कीशाही यांपासून त्याला मिळालेला म्हणजे उध्वस्त झालेला देश, अन्नाविणें तडफडणारी प्रजा, शस्त्रधारणास असमर्थ असे सैनिक आणि भांडवलवाल्या राष्ट्रांच्या जोरावर चोहों बाजूंनीं चढाई करणारे झारशाहीच्या काळचे प्रतिक्रांतिकारक सेनापति असा चतुरंग होता. या सर्व संकटांस राज्यसत्ता लेनिननें हातीं घेतलेल्या क्षणापासून सुरुवात झाली. पण शेतकरी-कामकरी-सैनिक या प्रचंड जनतेचा पूर्ण पाठिंबा असल्यानें लेनिननें या सर्वांस यशस्वितेनें तोंड दिलें.

इंग्लंड, फ्रान्स, इटाली, अमेरिका वगैरे संयुक्त राष्ट्रांचें जर्मनीशीं युद्ध सुरू असतांच रशियानें युद्धांतून अंग काढून घेण्यामुळें जर्मनीचें बळ तितकेंच वाढलें. रशियाच्या पश्चिमेकडील व दक्षिणेकडील राष्ट्रें रशियापासून जीं तोडण्यांत आलीं तीं नाममात्र स्वतंत्र असलीं तरी व्यवहारतः जर्मनीच्या भक्ष्यस्थानीं पडलीं. जर्मन सैन्यें त्या प्रदेशांत घुसलीं. तेथें संयुक्तांनीं रशियास दिलेला दारूगोळा साठविलेला होता तो जर्मन सैन्यानें यथेच्छ लुटला. त्या देशांतील भौमिक धनहि जर्मनीच्याच हातीं पडलें. क्रांति होतांच ट्रॉट्स्कीच्या भाकिताप्रमाणें कामगारांनीं सर्व कारखाने आपल्या ताब्यांत घेतले. ते राष्ट्रीय मालकीचें झाले असल्याबद्दलचा जाहीरनामाहि सरकारला जाहीर करावा लागला. शेतजमिनी शेतकऱ्यांना वाटणें व कारखाने सरकारी मालकीचे करणें हीं दोन कृत्यें जनतेचा बोल्शेव्हिक सरकारला पाठिंबा मिळविण्यास अत्यावश्यक म्हणून करावींच लागलीं. रशियन सरकारला व रशियन कारखान्यांना पाश्चिमात्य राष्ट्रांनीं जी कोट्यवधि रूबल्सचीं कर्जे दिलीं होतीं तीं

नसल्यास आम्ही एक जर्मन पलटण पेट्रोग्रॅड येथें ठेवणार अशी जर्मन अधिकाऱ्यांनीं अट घातली. ती साफ अमान्य करून हें प्रकरण न मिटवितांच लेनिन परत गेला. इकडे जर्मन अधिकाऱ्यांनीं वकिलात पेट्रोग्रॅडहून पिस्कोव्ह येथें हालविली. जर्मन सेनापति लुडेंडॉर्फ यानें रशियावर चढाई करण्याचीहि तजवीज चालू केली; पण जर्मनीच्या पश्चिम आघाडीवर जर्मनीचा एकसारखा पराभव होऊं लागल्यामुळें लुडेंडॉर्फला आपली योजना कधींच सुरूहि करतां आली नाहीं.

सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्ष जरी लेनिनला सोडून गेला तरी त्या पक्षापैकीं कोणाचेंहि वजन आतां शेतकऱ्यांवर उरलें नव्हतें. तह आणि जमिनी शेतकऱ्यांना मिळाल्यानें ते बोल्शेव्हिक सरकारवर खूष होते. आपला कांहींच इलाज चालत नाहीं असें पाहून सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाच्या कांहीं लोकांनीं लेनिनचा खून करण्याचा कट केला. ता. ३० ऑगस्ट १९१८ रोजीं मॉस्कोजवळील एक मजूरसभा संपवून लेनिन मोटारींत चढत असतां फॅनी कॅप्लॅन नांवाच्या एका सोशल रेव्होल्यूशनरी बाईनें लेनिनवर दोन गोळ्या झाडल्या. एक फुप्फुसांत शिरली, दुसरी मानेस चाटून गेली. झालेल्या जखमेंतून अनेक दिवसांनीं लेनिन बरा झाला. या अत्याचारानें लेनिनच्या व बोल्शेव्हिक पक्षाच्या लोकप्रियतेंत भरच पडली.

रशियानें जगांतील कामगारांच्या गुलामगिरीचा मोक्ष करण्याचा नाद सोडून देऊन जर्मनीशीं केवळ राष्ट्रीय स्वार्थबुद्धीनें तह केला असा जगांतील कामगारांचा आरोप येऊं नये म्हणून ट्रॉट्स्की तहास विरोध करीत होता. जर्मनीच्या मागण्या जर्मनी अगदीं डोकीवर बंदूक रोखून लादील त्या वेळीं तह करूं असें ट्रॉट्स्कीचें म्हणणें होतें. कदाचित् जर्मनींतहि लवकरच क्रांति होईल अशीहि त्याला आशा होती; पण शेवटीं त्यानें लेनिनच्या मतास मान्यता दिली. पुढें एकंदरींत लेनिननें तह केला हेंच अंतर्गत परिस्थितीच्या दृष्टीनें योग्य झालें असें ट्रॉट्स्कीस पटलें. ऑक्टोबर (१९१८)च्या ३ तारखेस सरकारी कार्यकारी मंडळाच्या बैठकींत "आम्ही तहास विरोध करीत होतों ती चूक करीत होतों, लेनिनचें म्हणणें योग्य होतें" अशी ट्रॉट्स्कीनें प्रांजलपणें कबूली दिली. (ट्रॉट्स्की–माय लाइफ पृ. ३७). स्टॅलिन मात्र तहास प्रथमपासून लेनिनच्या बाजूनें पाठिंबा देत होता. अर्थात् ट्रॉट्स्कीनें तीन महिनेपर्यंत तहास संमति न

देतां जर्मनीविरुद्ध भाषणांवर भाषणें ठोकलीं. जगांतील कामगारांना रशियाची कहाणी सांगितली. त्या व्याख्यानांचे रिपोर्ट विदेशी वृत्तपत्रांतूनहि आले, त्यामुळें जगांतील लोकमत ब्रेस्ट तहास व बोल्शेव्हिकांस अनुकूल होण्यास मदत झाली असें लेनिननें मे १७(१९१८) रोजीं केलेल्या भाषणांत बोलून दाखविलें.

यादवी युद्ध

घटनापरिषद व तह हे दोन तात्कालिक महत्त्वाचे प्रश्न याप्रमाणें तडकाफडकीं निकालांत निघाले तरी याहून फारच खडतर अशा अडचणी लेलिनपुढें उभ्या होत्या. झारशाही व केरेन्स्कीशाही यांपासून त्याला मिळालेला म्हणजे उध्वस्त झालेला देश, अन्नाविणें तडफडणारी प्रजा, शस्त्रधारणास असमर्थ असे सैनिक आणि भांडवलवाल्या राष्ट्रांच्या जोरावर चोहों बाजूंनीं चढाई करणारे झारशाहीच्या काळचे प्रतिक्रांतिकारक सेनापति असा चतुरंग होता. या सर्व संकटांस राज्यसत्ता लेनिननें हातीं घेतलेल्या क्षणापासून सुरुवात झाली. पण शेतकरी-कामकरी-सैनिक या प्रचंड जनतेचा पूर्ण पाठिंबा असल्यानें लेनिननें या सर्वांस यशस्वितेनें तोंड दिलें.

इंग्लंड, फ्रान्स, इटाली, अमेरिका वगैरे संयुक्त राष्ट्रांचें जर्मनीशीं युद्ध सुरू असतांच रशियानें युद्धांतून अंग काढून घेण्यामुळें जर्मनीचें बळ तितकेंच वाढलें. रशियाच्या पश्चिमेकडील व दक्षिणेकडील राष्ट्रें रशियापासून जीं तोडण्यांत आलीं तीं नाममात्र स्वतंत्र असलीं तरी व्यवहारतः जर्मनीच्या भक्ष्यस्थानीं पडलीं. जर्मन सैन्यें त्या प्रदेशांत घुसलीं. तेथें संयुक्तांनीं रशियास दिलेला दारूगोळा साठविलेला होता तो जर्मन सैन्यानें यथेच्छ लुटला. त्या देशांतील भौमिक धनहि जर्मनीच्याच हातीं पडलें. क्रांति होतांच ट्रॉट्स्कीच्या भाकिताप्रमाणें कामगारांनीं सर्व कारखाने आपल्या ताब्यांत घेतले. ते राष्ट्रीय मालकीचे झाले असल्याबद्दलचा जाहीरनामाहि सरकारला जाहीर करावा लागला. शेतजमिनी शेतकऱ्यांना वाटणें व कारखाने सरकारी मालकीचे करणें हीं दोन कृत्यें जनतेचा बोल्शेव्हिक सरकारला पाठिंबा मिळविण्यास अत्यावश्यक म्हणून करावींच लागलीं. रशियन सरकारला व रशियन कारखान्यांना पाश्चिमात्य राष्ट्रांनीं जी कोट्यवधि रूबल्सची कर्जे दिलीं होतीं तीं

सर्व रशियन सरकारनें नाकारलीं. या सर्व गोष्टींमुळें संयुक्त राष्ट्रांचीं डोकीं भणाणून गेलीं व जमिनी जप्त झाल्यामुळें बोल्शेव्हिक सरकारवर चिडलेले जमिनदार व अधिकारभ्रष्ट सेनापति यांना संयुक्त राष्ट्रांनीं बोल्शेव्हिकांविरुद्ध चिथविलें. त्यांना पैसा व सैन्य यांनीं मदतहि केली. पश्चिमेच्या बाजूस ७५ हजार पोलिश व ७० हजार रुमानियन सैन्य रशियाविरुद्ध उठलें. स्वतंत्र म्हणून जाहीर झालेल्या युक्रेनमध्यें जर्मनीनें कोझॅकांचें एक राज्य स्थापन करून त्याचा रशियास भुंगा लावला. उत्तरेस १४ हजार ब्रिटिश व व्हाइट रशियन सैन्य मुरमान्स्क येथें जमलें होतें. अर्चेंजलजवळ सुमारें ३२हजार सैन्य होतें. दक्षिणेस ओडेसा व बाटुमजवळ फ्रेंच सैन्य जमा झालें. डॉननदीवरील कारखाने असलेल्या शहरांना जनरल डेनिकिन हा झारशाहीचा सेनापति वेढा घालीत होता. युद्ध चालू असतां ऑस्ट्रियानें जे झेकोस्लोव्हॅक सैन्य रशियाविरुद्ध पाठविलें तें रशियास फितुर झालें होतें. युद्ध थांबल्यामुळें पासिफिक समुद्राच्या मार्गानें या सैन्यास सुरक्षित परत पाठविण्याचें वचन बोल्शेव्हिकांनीं दिलें होतें. पण तें सर्व सैन्य रशियाभर पसरलेलें असून प्रतिक्रांतिकारक सेनापतींच्या हातीं सांपडलें. त्यांना परत पाठविण्याचें वचन बोल्शेव्हिकांना पार पाडणें अशक्य झालें. या सैन्यानें सगळी ट्रॅन्ससैबेरियन रेल्वे अडवून धरली. सैबेरियांत ॲडमिरल कोल्चॅक हा व्हाइट रशियन सैन्याची मजवाजमव करीत होता. जपानचें सैन्य सैबेरियांतील प्रदेश काबीज करीत होतें. कोल्चॅकला जपान, इंग्लंड व अमेरिका यांचा पाठिंबा मिळत होता. कोल्चॅकच्या एक लक्ष सैनिकांस शस्त्रें व कपडे देण्याचें अमेरिकन सरकारनें मान्य केलें. एकंदरींत सर्व बाजूंनीं बोल्शेव्हिक सरकारवर अगदीं काहूर उसळलें आहे असा देखावा १९१८ सालीं दिसत होता. पण हळूहळू परकी राष्ट्रांचा विरोध ओसरूं लागला. १९१८च्या नोव्हेंबरांत जर्मनीचा पराभव झाल्यामुळें युक्रेनमधील नवें जर्मन कोझॅक राज्य खलास झालें. युक्रेन आपल्या हाताखालीं घालावें असा फ्रेंचांचा मानस होता. पण एप्रिल १९१९मध्यें फ्रेंचांनीं आपलेंहि सैन्य परत बोलाविलें. इंग्लिश सैन्यानेंहि हळूहळू आपला पाय काढून घेतला. युरोपांत कामगारांचा क्षोभ वाढत होता हें याचें कारण होतें. जपानला व्हॅलॅडिव्होस्टॉक बंदर व चायनीय ईस्टर्न रेल्वे जिंकाययाची होती. त्यासाठीं जपानी सैन्य तेवढें सैबेरियांत चढाई करीत राहिलें, पण त्यासहि पुढें माघार घ्यवी लागली.

राहतां राहिलें प्रतिक्रांतिकारक सेनापतींच्या नेतृत्वाखालचें व्हाइट रशियन सैन्य. याच्याशीं रशियाच्या 'रेड आर्मी'नें (बोल्शेव्हिक सरकारचें सैन्य) घनघोर संग्राम दिला. १९१९ च्या जूनमध्यें ट्रॉट्स्कीला रेड आर्मीचा अधिपति नेमण्यांत आलें. झारचे जुने सैनिक, कामकरी व शेतकरी यांचा प्रचंड जमाव करून त्यानें खरोखर कशीबशी 'रेड आर्मी' नांवाची मोट बांधली होती. हें सुमारें ४लक्ष सैन्य जमलें. त्यांत ३०हजार सामान्य अधिकारी झारच्या सैन्यांतले होते. हे कमी करावे अशी स्टॅलिननें लेनिनला सूचना केली. पण लेनिननें ट्रॉट्स्कीच्या कारभारांत ढवळाढवळ केली नाहीं. आत्मविश्वास, धाडस व कार्यनैपुण्य हे ट्रॉट्स्कीचे विशेष गुण होते. सगळें सैन्य बोल्शेव्हिक सरकारला उचलून धरणारें असल्यावर स्वखुषीनें सोव्हियट सरकारला मिळणाऱ्या झारच्या वेळच्या अधिकाऱ्यांना भिण्याचें कारण काय, अशी ट्रॉट्स्कीची विचारसरणी असावी; आणि तीच अखेरीस खरी ठरली. त्याचेजवळ युद्धसाहित्य व दारूगोळा पुष्कळ होता. पण वाहतुकीची अडचण होती. युद्धाच्या बोजाखालीं सगळया रेल्वेचें मातेरें झालें होतें. कशीबशी तरतूद करून ट्रॉट्स्कीनें जितक्या ठिकाणीं प्रतिकारक सैन्य होतें त्या सर्व ठिकाणीं आपलीं सैन्यें पाठविलीं. स्वतःसाठीं एक आगगाडी त्यानें ठेविली. त्याचें स्वतांचें ठाणें यादवीच्या काळांत या आगगाडींत होतें. युद्ध एकंदर १६ आघाड्यांवर चाललें होतें व त्या सर्व ठिकाणीं तो वरचेवर जाऊन युद्धाच्या बातम्या मिळविणें, योजना आंखणें, खचणाऱ्यांस उत्तेजन देणें व देशाभिमानाचें आणि क्रांतीच्या अभिमानाचें वारें भरून अधिक रिक्रूट मिळविणें हीं कामें करीत होता. ट्रॉट्स्कीच्या या काळच्या कर्तृत्वाबद्दल लुनाचार्स्की लिहितो— "सोव्हियटच्या खुर्चीवर बसून अद्वितीय बुद्धिमत्तेनें जागतिक क्रांतीचें नेतृत्व करण्यास लेनिन फार योग्य आहे. पण ट्रॉट्स्कीनें आपल्या अंगावर घेतलें होतें तें कार्य करण्यास लेनिन समर्थ नव्हता. यादवी युद्धाचें काळीं ट्रॉट्स्की एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं विजेसारखा जाई, तेजस्वी भाषणें करी, तडफेनें व निकडीनें हुकमत चालवी; सैन्य जेथें जेथें मधून मधून खचत होतें त्या सर्व ठिकाणीं एकसारखा हिंडून तो जणूं विजेचा संचार करीत होता. ट्रॉट्स्कीची ही जागा भरून काढूं शकला असता असा जगांत एकहि माणूस नाहीं."

१९१९च्या आरंभीं व्हाइट रशियनांची चढाई सुरू झाली. वसंतऋतूच्या पूर्वीच कोल्चॅक पेट्रोग्रॅडवर चाल करून येऊं लागला होता. उन्हाळ्यांत डेनिकिननें दक्षिणेकडून चढाई सुरू केली. पावसाळ्यांत युडेनिच् श्वेत समुद्राकडून पेट्रोग्रॅडवर येऊं लागला. पेट्रोग्रॅडचें रक्षण करण्याच्या भानगडींत न पडतां मागें हटावें असें लेनिनचें म्हणणें होतें. पण स्टॅलिननें सैन्याची जमवाजमव करून युडेनिचचा हल्ला परतविला. १९२०च्या फेब्रुवारीपर्यंत 'रेड आर्मी'नें मुर्मान्स्क व आर्चेंजल काबीज केलीं. युडेनिच बराच पैसा गांठीस बांधून ब्रिटिश जहाजांतून निसटला. कोल्चॅक 'रेड आर्मी'च्या हातीं लागला. त्यास गोळी घालून ठार मारण्यांत आलें. डेनिकिनच्या चढाईचीहि वाताहत झाली. शेवटीं रँगलच्या हाताखालीं थोडेंसें सैन्य क्रिमियांत उरलें होतें तेंहि पुढें पांगून गेलें. अशा प्रकारें यादवींत प्रतिक्रांतिकारकांचा पूर्ण मोड होऊन बोल्शेव्हिक सरकार सर्वत्र विजयी झालें. 'रेड आर्मी'चे सैनिक धंदेवाले लढवय्ये नव्हते; पण क्रांतीचें रक्षण करण्यासाठीं ते जिवावर उदार झाले असून धर्मयुद्धांत लढणाच्या वीरांचें शौर्य त्यांच्या अंगीं संचारलें होतें. ट्रॉट्स्कीच्या एकमुखी नेतृत्वाखालीं युद्धांत सर्वत्र शिस्त व सुसंगत धोरणहि नांदूं शकलें. उलट प्रतिक्रांतिकारक सैन्याचे सेनापति आपसांत भांडत व स्पर्धा करीत. विदेशीयांची मदत व्हावी तशी नेटानें त्यांस झाली नाहीं. त्यांच्या लढणाऱ्या सैन्यास उच्च ध्येय कांहींच नव्हतें. यामुळें त्याचा सर्व बाजूंनीं नाश झाला. १९२०सालीं रशियानें, उरलेला शत्रु जें पोलंड, त्याशीं युद्ध केलें. पहिल्या हल्ल्यांत वॉर्सापर्यंत बोल्शेव्हिक सैन्य पोलिश सैन्यास मागें रेटीत पुढें घुसलें. पण पोलिश सेनापति पिल्सुड्स्की यानें फ्रेंचांचे मदतीनें रशियन सैन्यावर फेरहल्ला करून त्यास मागें रेटलें. पुढें रशिया व पोलंड यांत तह झाला; तेव्हां युक्रेनचा पश्चिम भाग पोलंडला देऊन रशियानें आपली सरहद्द निम्म्या युक्रेनपर्यंत कायम केली. युक्रेन रशियन राज्यांत पुन्हा सामील करतां आलें हा यादवीपासून फायदाच झाला. तरी पण पोलंडशीं युद्ध करून निम्मा युक्रेन गमवावा लागला व दोन महिन्यांत सुमारें दीड लक्ष सैन्य ठार झालें. जर्मन कामगारांना स्वदेशांत बंड करण्यास उत्तेजन द्यावें असा लेनिनचा पोलंडवर चाल करून जाण्यांत हेतु होता; पण ही एकंदरींत मोठी चूक झाली अशी लेनिननें मागाहून कबूली दिली.

युद्धकालीन कम्युनिझम्

यादवी चालू असतां रशियांत धनोत्पादक साधनांची खाजगी मालकी व्यक्तिस्वातंत्र्य वगैरे सर्व नष्ट करण्यांत आलें होतें. सरकारची वट्टमुखत्यारी कमालीची झाली. सर्व मालमत्ता सरकारच्या ताब्यांत आणून आर्थिक उत्पादनाचा सर्व व्यवहार सरकारनें आपल्या नियंत्रणाखालीं आणला व केवळ युद्ध यशस्वी व्हावें या एकाच धोरणानें चालविला. विदेशी व्यापार सरकारनें आपल्या हातीं घेतला. परकीयांचीं सर्व कर्जें रद्द ठरविलीं. शेतकऱ्यांनीं अगदीं थोड्या व सरकारनें ठरविलेल्या दरानें धान्य सरकारला विकलेंच पाहिजे असा कायदा करण्यांत येऊन तो मोडणाऱ्यास मृत्यूची शिक्षा ठेवण्यांत आली. यादवींत यश येण्यास याहून अधिक सौम्य धोरण ठेवणें अशक्यच होतें. पण यामुळें शेतकऱ्यांचा असंतोष फारच भडकला. त्यांनीं जमिनदारांच्या जमिनी काढून घेतल्या, पण त्यांतलें धान्य शेतकऱ्यांच्या पोटांत पडलें नाहीं. १९२० सालीं भयंकर अवर्षण पडून दुष्काळ पडला व शिलकी धान्याचा पुरवठा नसल्यानें १९२१ सालीं लक्षावधि शेतकरी उपाशी मेले. सरकार धान्य घेऊन जातें या भीतीनें शेतकऱ्यांनीं जमिनींची मशागत करण्याचेंच नाकारलें. चोहोंकडे शेतकऱ्यांचे दंगे होऊं लागले. आर्थिक व राजकीय सत्तेचें हें जें केन्द्रीकरण या वेळीं करण्यांत आलें त्यास 'वॉर कम्युनिझम्' (युद्धकालीन कम्युनिझम्) असें नांव देण्यांत आलें होतें.

नवें आर्थिक धोरण (न्यू इकॉनॉमिक पॉलिसी)

यादवी थांबतांच या 'वॉर कम्युनिझम'चा शेवट करण्यावांचून लेनिनला गत्यंतर नव्हतें. म्हणून त्यानें भांडवलशाही मालकीपद्धतीचे प्रकार पुन्हा सुरू केले. हें नवें धोरण न्यू इकॉनॉमिक पॉलिसी (एन्. इ. पी.=नेप) या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध पावलें आहे. मार्क्सिझम्च्या मूलतत्त्वाशीं हें धोरण विसंगत आहे असा गिल्ला त्या वेळीं पुष्कळांनीं केला; पण लेनिननें त्याची पर्वा केली नाहीं. सरकारांत धान्य भरण्याची शेतकऱ्यांवरील सक्ति बंद झाली. त्याऐवजीं मालाच्या स्वरूपांत थोडासा कर शेतकऱ्यांवर लादण्यांत येऊन शेतकऱ्यांना त्यांचा शिलकी माल खुल्या बाजारांत विकण्याची

मुभा मिळाली. कारखानदारीवरील नियंत्रण कमी झालें. लहान लहान धंद्यांत विदेशी कारखानदारांनाहि वाव देण्यांत येऊं लागला. मोठ्या धंद्यांचे 'ट्रस्ट्स्' करून त्यांचें स्वतंत्रपणें नियंत्रण करण्यास मुभा मिळाली अर्थात् सोव्हियटच्या आर्थिक शाखेचें नियंत्रण त्यांवर चालूं राहिलेच; कारखाना-कामगारांच्या राहणीचा दर्जा वाढता ठेवावा, धंद्याचे वाढीस लागणारें भांडवल काढून ठेवावें व त्याव्यतिरिक्त राहणारा नफा सरकारचे हवालीं करावा अशी त्यांवर अट घातली होती. यादवीच्या काळीं नक्त शिधा वांटून देण्यांत येत असे तो बंद करून नफापद्धति व चलनांत देवघेव या पद्धति पुन्हा सुरू करण्यांत आल्या. पण यावरून पूर्ण भांडवलशाहीपद्धति येथें अमलांत आली असें मात्र नव्हे. परराष्ट्रीय व्यापार व बँका पूर्णपणें सरकारीच होत्या. रोखेबाजारांतील दलाली व सट्टेबाजी सुरू झाली नाहीं. भांडवलशाही समूल नष्ट करावयाची, वाढूं द्यावयाची नाहीं हें सरकारचें धोरण कायम असल्यामुळें मालकीपद्धतीस सवलत देण्याबरोबरच गिऱ्हाइकांच्या सहकारी पेढ्या सरकारनें सर्व रशियाभर काढून त्यांना उत्तेजन दिलें. 'गॉस बँक' ही सरकारी मध्यवर्ती बँक १९२१सालीं निघाली; तिनें सर्व रशियाभर सरकारी बँकांचें जाळें पसरलें. पण 'न्यू इकॉनॉमिक पॉलिसी'मुळें संपत्तीचें केन्द्रीकरण कांहींशा पुष्कळ प्रमाणांत झालें हें मात्र खरें आहे. भांडवलवाल्यांनीं नफ्याचा संचय थोडाफार केलाच. धनिक शेतकरी शेतीवर पुष्कळ मजूर लावून त्यांपासून नफा पिळून काढूं लागले. कुलक अथवा धनिक शेतकरी आणि बेडनॅक म्हणजे दरिद्री शेतकरी असे वर्ग खेड्यांत वाढूं लागून त्यांमधील विरोध तीव्र होऊं लागला. धनिक शेतकऱ्यांवर जबर कर लादण्याचा सरकारनें प्रयत्न केला. त्यामुळें तो वर्ग सरकारवर बिथरला व सरकारला त्या मानानें फायदा फारसा झालाच नाहीं. पण यादवी, दारिद्र्य, यांनीं जो भयंकर असंतोष व हाहाःकार उडाला होता तो शमवून आपल्या योजना आंखण्यास बोल्शेव्हिक सरकारला संधि मिळावी हा या नवीन धोरणाचा हेतु होता, तो मात्र साध्य झाला. देशाची आर्थिक परिस्थिति सावरली व भरभराटीस लागली हें निर्गत व्यापाराचे वाढीवरून समजून आलें. १९२० सालीं १४ लक्ष रूबल्सचा निर्गत व्यापार होता. तो १९२१ सालीं २२ लक्षांवर

गेला, १९२२ सालीं एकदम ८ कोटी १६ लक्ष झाला आणि १९२३ सालीं २० कोटि ५८ लक्ष झाला.

सोव्हियट राज्यघटना

१९२३ सालीं बरेंच स्थिरस्थावर झाल्यावर नवीन राज्यघटना जाहीर करण्यांत आली. त्याअनुसार रशिया हें सात 'सॉशेलिस्ट सोव्हियट' प्रजासत्ताक राज्यांचें संयुक्त राज्य (यूनियन ऑफ् सोशॅलिस्ट सोव्हियट रिपब्लिक्स्= यू. एस्. एस्. आर्.) ठरविण्यांत आलें. या सात प्रजासत्ताक राज्यांत (१) रशियन सोशॅलिस्ट फेडरेटेड सोव्हियट रिपब्लिक (आर्. एस्. एफ्. एस्. आर्.) हें सर्वांत प्रचंड असून तें पुन्हा सात स्वायत्त प्रजासत्ताकांनीं बनलेलें आहे. १९२६ सालीं याची लोकसंख्या १० कोटींहून अधिक होती. युरोपच्या सरहद्दीवर (२) व्हाइट रशियन सोशॅलिस्ट सोव्हियट रिपब्लिक व (३) युक्रेनियन सो. सो. रिपब्लिक हीं आहेत. त्यांची लोकसंख्या अनुक्रमें ५० लक्ष व ३ कोटि आहे. युक्रेनियन हे रशियन नव्हत. पण रशियानें यादवीच्या काळांत युक्रेन जिंकून घेतल्यामुळें अनेक परराष्ट्रांच्या टोळधाडींतून तें वांचलें, त्यास पूर्ण स्वायत्तता मिळाली व धान्याचें एक फार मोठें कोठार रशियास सांपडलें. जर्मनींतील नाझी पक्षाचा हल्लीं या युक्रेनवर डोळा आहे. कॉकेशसचे दक्षिणेस (४) ट्रॅन्सकॉकेशस रिपब्लिक असून त्यांत जॉर्जिया, अझरबैजान व अर्मेनिया अशीं तीन स्वायत्त प्रजासत्ताक राज्यें आहेत. यांतील कोणीहि रशियन नसून हीं तीन राज्यें सुद्धां परस्परांपासून भिन्न राष्ट्रीयत्व असलेल्या लोकांचीं आहेत. यांतहि रशियापासून फुटून निघण्याची चळवळ परकीयांनीं उत्पन्न केली होती. पण रशियन बोल्शेव्हिकांनीं हीं राज्यें परत जिंकून घेतलीं व त्यांना पूर्ण स्वायत्तता दिली. हीं सर्व भौमिक धनानें समृद्ध आहेत. जॉर्जियांत मँगानीज पुष्कळ सांपडतें. अझरबैजानमध्यें बाकूच्या तेलाच्या खाणी आहेत. बाकीच्या तीन राज्यांपैकीं (५) उझबेक हें अफगाणिस्तानचे उत्तरेस आहे. (६) तुर्कोमान तुर्कस्तानच्या सरहद्दीवर आहे व (७) ताडझिक हिंदुस्थानच्या उत्तर सरहद्दीस लागून आहे. यांत मागासलेली जनता पुष्कळ असून ती सर्व मुसलमानी आहे. प्रदेश डोंगराळ आहे व मॉस्कोपासून फार दूर आहे. पण " अफगाणिस्तान, इराण व हिंदुस्थान

यांच्या सरहद्दींवरील प्रजांना शेजारच्या रशियन प्रजेबद्दल हेवा वाटावा इतकी या मागासलेल्या प्रजाजनांनाहि उत्तम वागवणूक रशियांत मिळते." या सर्व प्रजासत्ताकांसंबंधीं जे. हॅम्पडन जॅक्सन लिहितो—

" झारच्या रशियन साम्राज्यांतील निरनिराळ्या राष्ट्रांना एकाच भट्टींत भाजून एकजीव करण्याचें झार बादशहांचें धोरण असे. उलट सोव्हियट अमलांत भिन्न राष्ट्रकांना स्वतंत्रपणें उन्नति करण्यास उत्तेजन देण्यांत येतें. प्रत्येक प्रजासत्ताक संयुक्त राज्य व त्यांचीं घटक राज्यें यांना सांस्कृतिक स्वातंत्र्य व भाषास्वातंत्र्य देण्यांत आलें असून शिक्षण संस्था, आरोग्य व मतप्रसाराचीं साधनें ज्यांचे त्यांचे नियंत्रणाखालीं देण्यांत आलीं आहेत. यू. एस्. एस्. आर्.च्या घटनेप्रमाणें मुख्य सात घटकांपैकीं कोणासहि यू. एस्.एस्.आर्. सोडून बाहेर पडतां येतें. उलट तुर्कस्तान, फिन्लंड, मंगोलिया अशा कोणा राष्ट्रांस यू. एस्. एस्. आर्. मध्यें सामील व्हावयाचें असल्यास यू. एस्. एस्. आर्.चें दार उघडें ठेवण्यांत आलें आहे. पण तत्त्वतः स्थिति अशी असली तरी कोणत्याहि प्रजासत्ताकास प्रत्यक्षपणें फुटून जाऊं देण्यांत येईलसें वाटत नाहीं. भिन्नराष्ट्रीयत्वाचा प्रश्न सोव्हियट यूनियननें पुष्कळ अंशांनीं सोडविला आहे. अर्थात् तो पूर्णपणें सुटला आहे असें नव्हे. निरनिराळ्या राष्ट्रकांना सांस्कृतिक स्वातंत्र्य असलें तरी प्रत्येकानें आपली आर्थिक प्रगति एकंदर सोव्हियट राज्यास फायदेशीर होईल अशाच प्रकारें केली पाहिजे असें त्यावर बंधन आहे." (पोस्टवॉर वर्ल्ड). स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचा प्रश्न पूर्णपणें सुटला नाहीं असें जॅक्सन कां म्हणतो तें कळत नाहीं. सांस्कृतिक स्वातंत्र्य मिळणें एवढींच स्वतंत्र राष्ट्रकांची न्याय्य आकांक्षा असूं शकेल. पण त्या त्या क्षेत्रांतील धन हें त्यांच्या सर्वस्वीं मालकीचें असें ठरलें तर तेलाच्या खाणींच्या, सोन्याच्या खाणींच्या वगैरे प्रदेशांतील लोकांना त्या त्या जिनसांची मक्तेदारी देऊन बाकीच्या सगळ्या राष्ट्रांना त्यांचे गुलामच करावे लागेल. आर्थिक विषमता मोडणें हें कम्युनिस्टांचें मुख्य तत्त्व आहे. राष्ट्रीयत्वाची कोणतीहि आकांक्षा आर्थिक समतेच्या तत्त्वास झुगारून देणारी असेल तर ती न्याय्य मानतां येणार नाहीं, व कम्युनिस्ट तर ती आकांक्षा कधींच पूर्ण करणार नाहींत. सारांश धर्म, संस्कृति, वंश यांचा सारखेपणा, एकजीवपणा हें सोव्हियट यूनियनचें समानबंधन नाहीं. तर

'मार्क्सिस्ट कम्युनिझम्बद्दल निष्ठा बाळगून त्याअनुसार वागणें' हें सर्वांना साधारण असें बंधन आहे. जी. डी. एच्. कोल लिहितो,—

"मार्क्सचा सिद्धांत असें सांगतो कीं, भांडवलशाहींतून कम्युनिझमकडे जातांना कामगारांनीं उत्पन्न केलेल्या संस्थांच्या द्वारा चालणाऱ्या कामगारांच्या मुखत्यारीच्या (डिक्टेटरशिप ऑफ दि प्रॉलेटॅरियट) राज्यकारभारांतून जावें लागतें. राज्यक्रांति रशियांत झाली ती याच पद्धतीनें झाली. १९२३च्या राज्यघटनेंत या तत्त्वाचा फारसा उल्लेख नसला, तरी तिचा हा मूलभूत सिद्धांत आहे. असंतुष्ट सैनिकांच्या साहाय्यानें कामगारांनीं बंड करून क्रांति केली. त्यांनीं ज्या संस्था स्थापल्या त्या सोव्हियट् संस्था म्हणजे 'कामकरी, सैनिक व शेतकरी यांचीं कौन्सिलें' स्थापलीं. कामगारांच्या मुखत्यारीचें साधन कम्युनिस्ट पक्ष हें आहे." (जॅक्सननें घेतलेला उतारा.)

हीं सोव्हियट्स् सर्व सामाजिक, आर्थिक व राजकीय इमारतीचा पाया होत. अगदीं लहान शहरें, खेडीं, कारखाने यांचीं प्राथमिक सोव्हियट आहेत. व यांवरून चढत चढत अगदीं शिखरावर पेट्रोग्रॅडचें कौन्सिल ऑफ् सोव्हियट्स् हें असून तें वरिष्ठ कायदेमंडळ मानलें जातें. वर्षांतून तें एकदां भरतें. याला भिन्न भिन्न राष्ट्रांच्या कौन्सिलांची जोड देऊन त्यांतून मध्यवर्ती कार्यकारी मंडळ ('सेंट्रल एक्झिक्युटिव्ह कमिटी') निवडलें जातें. त्यांतून एक 'प्रेसीडियम्' निवडलें जाऊन तें 'कौन्सिल ऑफ् पीपल्स कॉमिसर्स' म्हणजे मंत्रिमंडळ याचें नियंत्रण करतें. सर्व यूनियनचा अध्यक्ष जो असतो त्याच्या खालोखाल 'कौ. ऑफ् पी. कॉमिसर्स'च्या अध्यक्षाचा दर्जा असतो. लेलिनची याच पदावर स्थापना झाली होती. यूनियनच्या अध्यक्षापेक्षां या कॉमिसर्सच्या अध्यक्षाचा दर्जा कायद्यानें दुय्यम असला तरी राज्यकारभारांतील प्रमुख सूत्रें त्याच्याच हातीं असतात. सोव्हियट्स्ची निवडणूक गुप्त मतदानपद्धतीनें होत नसून जाहीर सभांतून लोकमत सामान्यतः कसें आहे हें अजमावून निवडणुकी केल्या जातात. यामुळें प्रत्येक ठिकाणीं निवडणुकींत इतर ठिकाणांपेक्षां थोडा फार फरक असूं शकतो. "सामान्यतः म्हणजे सोव्हियट्चा अध्यक्ष जाहीर सभा भरवितो, जुन्या लोकांच्या रिकाम्या झालेल्या जागीं कोणास नेमावें त्यांचीं नांवें जाहीर करतो, एक भाषण करून सोव्हियट्नें केलेलें कार्य व भावी धोरण यांचें स्पष्टीकरण करतो, प्रश्नांचीं उत्तरें देतो, आणखी नांवें

.सुचविण्यास सभेला सांगतो, आणि नवीं नांवें जर आलीं नाहींत (बहुधा तीं येत नाहींतच) तर आपण सुचविलेल्या नांवांना हात वर करून मंजुरी द्या असें सुचवितो; आणि बहुमत दिसून आलें म्हणजे हीं नांवें मंजूर झालीं असें जाहीर करतो." (पोस्टवॉर वर्ल्ड) अगदीं प्राथमिक सोव्हियट्चे प्रतिनिधि त्याच्या वरच्या सोव्हियटसाठीं प्रतिनिधि निवडतात. या वरच्याकडून त्याच्या वरच्यासाठीं, याप्रमाणें वरपर्यंत अप्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व अमलांत आहे. प्राथमिक सोव्हियटच्या क्षेत्रापासूनच स्वायत्ततेचाहि आरंभ होतो. यामुळें सामुदायिक जबाबदारी व सार्वराष्ट्रीय हित या दृष्टीनें वैयक्तिक जीवनक्रम आंखण्याची संवय सर्व नागरिकांत वाढत आहे, असें कॉम्रेड मसानी यांनीं रशियांत अगदीं अलीकडे स्वतः हिंडून पाहून आपलें मत दिलें आहे. शेतकऱ्यांपेक्षां कामकऱ्यांना प्रातिनिधिक हक्कांचे बाबतींत पक्षपातानें वागविलें जातें. उदाहरणार्थ मध्यवर्ती सोव्हियट कॉंग्रेसमध्यें सवालाख शेतकऱ्यांना एक प्रतिनिधि मिळतो तर फक्त २५ हजार कामकऱ्यांना एक प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क देण्यांत आला आहे.

कम्युनिस्ट पक्ष

प्राणाची प्राणिशरीरावर जशी सर्वत्र सत्ता असते त्याप्रमाणें या राज्यघटनेवर कम्युनिस्ट पक्षाची सर्वत्र सत्ता आहे. पण राज्यघटनेंत कम्युनिस्ट पक्षाचा कोठेंहि उल्लेख नाहीं. राज्यक्रांतीपूर्वी सोशल डेमोक्रॅटिक पक्ष हें जें मार्क्सिस्ट पक्षाचें नांव होतें तें क्रांति झाल्यानंतर सातव्या पार्टीकॉंग्रेसमध्यें बदलून 'कम्युनिस्टपार्टी' असें नवें नांव ठेवण्यांत आलें. "पार्लमेंटांतून जे निरनिराळे पक्ष विशिष्ट राजकीय धोरणाचीं माणसें तेवढ्यापुरतीं एकत्र येऊन बनलेले असतात तशा अर्थाचा हा पक्ष नाहीं. धर्मप्रसारासाठीं जोग घेतलेल्या धर्मक्रांतिकारकांच्या पूर्वी जशा संघटना असत तशी ही संघटना आहे. पक्षांत येऊं इच्छिणाऱ्या कम्युनिस्टांची निवड अतिशय काळजीपूर्वक केली जाते. मानसिक तयारीचा तपःकाल त्याला घालवावा लागतो आणि शिस्तपालन व साधी राहणी याची त्याला शपथ घ्यावी लागते." १९३४ सालीं पक्षाच्या सभासदांची संख्या २० लक्ष (म्हणजे साधारणतः लोकसंख्येच्या दर ८०स १ कम्युनिस्ट) इतकी होती. या कम्युनिस्ट पक्षाची संघटनाहि अगदीं लहान

मुलापासून केलेली आहे. 'पायोनियर्स' नांवाच्या लहान मुलांच्या संस्था आहेत. १६ वर्षांवरील व २४ वर्षांखालील तरुणांसाठीं 'काम्सोमॉल्स' नांवाच्या संस्था असतात. यांतून बाहेर पडणारे कम्युनिस्ट पक्षांत जातात. पक्षाची शिस्त अत्यंत कडक असते. १९३४पर्यंत पक्षाच्या सभासदांस पगार अगदीं थोडा असे. वैयक्तिक वर्तन व पक्षाच्या कार्यक्रमाची बजावणी यासंबंधीं बंधनें कडक आहेत. प्रत्येक सभासदाचें चरित्र वरचेवर तपासलें जातें व मधूनमधून तत्त्वच्युतीच्या कारणास्तव सभासदांची हकालपट्टी केली जाते. कम्युनिस्ट पक्षाखेरीज इतर पक्षांस अस्तित्वाहि मिळूं शकत नाहीं. "सोव्हियट्सवर कम्युनिस्टांचें वर्चस्व राहावें असा कांहीं कायदा नाहीं. पण तेच खरे स्वार्थत्यागी समाजसेवक असल्यामुळें साहजिकच प्रत्येक सोव्हियट्मध्यें एक दोन तरी कम्युनिस्ट असतातच. उत्तम शिस्त व सेवा हे गुण अंगीं असल्यामुळें कम्युनिस्टांचीच नेमणूक बहुधा अधिकाराच्या जागीं होते. यामुळें रशियांत खरी सत्ता सोव्हियट काँग्रेसच्या हातीं न राहतां कम्युनिस्ट पार्टी-काँग्रेसच्या हातीं राहते. आणि राज्यकारभाराची मुख्य सत्ता सेंट्रल एक्झिक्युटिव्ह कमिटीचे हातीं न राहतां कम्युनिस्ट पक्षाचे चिटणिसाहातीं राहतें." सध्यां स्टॅलिन हा असा चिटणीस असल्यानें तोच रशियाचा मुखत्यार मानला जातो.

स्वायत्त संघटनांचा पसारा

मात्र ही मुखत्यारी एकंदर राज्यकारभाराचें सामान्य धोरण कम्युनिस्ट मतास अनुकूल असावें एवढ्यापुरतीच वापरली जाते. कारभाराच्या तपशीलांत लोकशाहीस मुबलक वाव आहे. खास लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें निर्मिलेल्या कित्येक संस्थांना सोव्हियट यूनियनच्या कारभारांत भरपूर कार्यक्षेत्र आहे. कारखान्यांचें नियंत्रण मॅनेजर अथवा कंपन्यांचे ट्रस्टी यांचे हातून होत असतें. पण कामगार-संघटना इतक्या प्रबळ झाल्या आहेत, कीं मजूरमंत्र्याचें खातें त्यांचेकडे देण्यांत आलें असून त्या राज्यकारभाराच्या एक अवयव झाल्या आहेत. गिऱ्हाइकांच्या सहकारी सोसायट्यांना सगळ्या किरकोळ विक्रीचें नियंत्रण करतां येईल इतकें सामर्थ्य आलें आहे. याहूनहि अधिक महत्त्वाची संस्था म्हणजे 'कलेक्टिव्ह' होय. प्रत्येक कारखान्यांत, खाणींत, वर्कशॉपमध्यें, जहाजावर, मोठ्या शेतांत, कॉलेजांत आणि सर्व सार्वजनिक संस्थांत निवडणुकी-

सारख्या काहीं तरी पद्धतीनें कामगार कमिटी निवडतात. हीच 'कलेक्टिव्ह' कामगारांची शिस्त व ध्येयनिष्ठा याबद्दलहि जबाबदार व खबरदार राहते. 'कलेक्टिव्ह'मधील सभासद कामगार व मॅनेजर यांच्या वर्तनावर टीका करतात, चुकारांची खरडपट्टी काढतात व इमानानें काम करणाऱ्यांची प्रशंसा करतात. कामाच्या पद्धति व परिस्थिति यांत दुरुस्ती सुचवितात. सरकारनें पाठविलेल्या योजनांचें गुणदोष सांगतात. जॅक्सन म्हणतो, " त्यांच्या कार्यक्षेत्राची मर्यादा ठरविणेंच कठिण आहे; आणि यांचें महत्त्व वर्णावें इतकें थोडेंच होईल."

गुप्त पोलीस खातें

ओ. जी. पी. यू. नांवाचें जें गुप्त पोलीस खातें आहे त्याचेकडे गुन्ह्यांचा शोध लावण्याचें काम असतें. संयुक्त सरकारला घटक प्रांतांच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं. पण ओ. जी. पी. यू.ला मात्र कोठेंहि प्रतिबंध नाहीं. या खात्याच्या क्रौर्याचीं भडक वर्णनें रशियांत व बाहेर पसरलेलीं आहेत व अशीं वर्णनें पसरविण्याचें काम हें खातें मुद्दाम आपला दरारा वाढविण्यासाठीं करतें असें ॲलन मंकहौस यानें लिहिलें आहे. खुद्द मंकहौस या खात्याच्या तावडींत सापडला होता; पण त्याला अशा कोणत्याच क्रौर्याचा प्रघात असल्याचें आढळून आलें नाहीं. गुन्हेगार ठरेल त्यास प्रथम एकांतवासाची शिक्षा देतात व मागाहून मजुरीवर लावतात. श्वेतसमुद्राच्या कालव्यावर सुमारें अडीच लक्ष बंद्यांनीं काम केलें आहे.

लेनिनचा मृत्यु

१९२३ची राज्यघटना सुरू होण्यापूर्वी लेनिन कारभारांतून आजारीपणामुळें दूर झाला होता. : त्याची प्रकृति मुळांत चांगली होती व सदा कार्यक्षम राहण्यासाठीं तो नेहमींच शिस्तीनें वागे. पण क्रांति झाल्यापासून त्याच्यावर कामाचा भार वाढला. स्वपक्षांतील भांडणें मिटविण्याच्या कामानें तो अगदीं जेरीस आला. १९१८ सालीं अंगांत शिरलेल्या गोळीनें ताबडतोब मृत्यु आणला नाहीं तरी तीमुळें शरीरशक्ति विकल झाल्यावांचून राहिल्या नाहींत. या सर्व कारणांमुळें १९२२च्या मे-मध्यें त्याला अर्धांगाचा झटका येऊन त्याचें उजवें अंग बधिर झालें. त्यांतून तो बरा झाल्यासारखें दिसलें व

ऑक्टोबरमध्यें तो आपल्या कामावर रुजूहि झाला. पण डिसेंबरमध्यें त्याची प्रकृति पुन्हा बिघडली. यानंतर राज्यकारभार त्यानें बहुतेक सोडला; तरी तो लेखन-वाचन करीत असे. त्याच्या लिखाणांतील कांहीं उत्तम लेख व पत्रकें त्यानें या आजारीपणांत लिहिलीं आहेत. १९२३च्या मार्चच्या ९ तारखेस वाताचा दुसरा मोठा झटका आला. तेव्हांपासून तो मॉस्कोजवळील गोर्कीच्या खेड्यांतील बंगल्यांत जाऊन राहिला. यानंतरहि त्याची प्रकृति सुधारत आहे असें दिसत होतें. पण १९२४च्या जानेवारीच्या २१ तारखेस त्याची प्रकृति अकस्मात् फारच बिघडली व त्याच दिवशीं सायंकाळीं ६ वाजून ५० मिनिटांनीं लेनिन मृत्यु पावला.

थोर माणसें कितीहि जगलीं तरी हवींच असतात. या दृष्टीनें लेनिन आणखी कांहीं वर्षें जगला असता तर रशियाचा निःसंशय फायदा झाला असता. पण तो इतके दिवस जगला हेंहि त्याचें, रशियाचें व सर्व जगाचें भाग्यच होय. आयुष्याच्या सुरुवातीस रशियांत राज्यक्रांति कशी व्हावयाची याचा आराखडा त्यानें आंखला. खोल अंधाऱ्या दरींत शिरून, हातानें ती खणीत जाऊन ती आरपार पोखरावी आणि तींत प्रकाश व वैभव उत्पन्न करावें इतक्या हिमतीनें, कर्तृत्वानें व यशस्वितेनें तो भयंकर प्रतिकूल परिस्थितीशीं झगडला व रशियांत त्यानें आपलें तारुण्यांतलें सुखस्वप्न, नुसती क्रांति करूनच नव्हे तर पुनर्घटनेच्या काळांतील अत्यंत अवघड असे प्रश्न सोडवून व मार्क्सिस्ट कल्पनांच्या पायावर समाजरचना बांधण्यास सुरुवात करून, सत्य सृष्टींत आणलें. लेनिनला यश आलें नसतें तर कार्ल मार्क्स विस्मृतींतून पुन्हा जगापुढें आलाच नसता. अर्थात् मार्क्सचे सिद्धांत कांहींसे अढळ असल्यानें कोणत्या ना कोणत्या 'लेनिन'ला म्हणजे मार्क्सिस्ट क्रांतिकारकाला लवकरच केव्हां तरी यश येऊन मार्क्सच्या शिकवणीनुसार क्रांति झालीच असती. पण त्यावरून लेनिनला केवढें मोठें ऐतिहासिक स्थान आहे, हीच गोष्ट उघड होते. त्याच्या आयुष्यांत त्याला मिळालें एवढें यश जगांत फारच थोड्यांना लाभतें.

अनुयायांतील भांडणें

बोल्शेव्हिक पक्षांत मतभेद होते, भांडणें होतीं हें मागें अनेकदां समजून आलेंच आहे. लेनिनच्या अद्वितीय श्रेष्ठतेमुळें हीं भांडणें दबलीं जात.

त्याच्या वजनामुळें, त्याचे एकादे वेळीं न ऐकणारे अनुयायीहि तेढीस पडत नसत व मागाहून लेनिनचें म्हणणें खरें ठरल्यास आपली चूक कबूल करण्याइतकी नम्रता त्यांचे ठिकाणीं शिल्लक राही. पण लेनिनच्या मृत्यूनें या भांडणावरील नियंत्रण उडालें व त्याचा परिणाम अखेरीस स्टॅलिनच्या हातीं सर्व सूत्रें येऊन ट्रॉट्स्की पदभ्रष्ट होण्यांत झाला. ट्रॉट्स्की, स्टॅलिन, झिनोव्हिफ, कॅमेनेव्ह हे चार पुढारी बोल्शेव्हिक पक्षांत प्रमुख होते. पण लेनिननंतर त्याचे जागीं त्याचेसारखा अद्वितीय पुढारी कोणीच उरला नाहीं. तत्त्वनिष्ठा, कार्यकौशल्य, धडाडी व विद्वत्ता या सर्व गुणांनीं कदाचित् ट्रॉट्स्की या सर्वांत श्रेष्ठ ठरला असता. पण तो कांहींसा गर्विष्ठ व तुसड होता. 'लेनिन आपल्या वर्तनानें जितके मित्र करी तितके ट्रॉट्स्की शत्रु करी.' लेनिन सर्व आयुष्यभर एका पक्षाचा पुढारी होता. पण ट्रॉट्स्की कोणाचाहि पुढारी अथवा अनुयायी राहिला नाहीं. तो एकांड्या शिलेदार म्हणून जगला. १९१७ च्या जुलैंत क्रांतीस जोर चढणार असें दिसतांच तींत येऊन सामील झाला. त्याचा तडफदार चळवळ्या स्वभाव, मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानावर व क्रांतितत्त्वावर त्याची बौद्धिक पकड, सगळ्या युरोपांत अद्वितीय म्हणून गाजलेलें वक्तृत्व व निकराच्या प्रसंगीं अगदीं शिगेस पोंचणारें त्याचें कर्तृत्व वगैरे गुणांनीं १९०५च्या क्रांतींत, १९१७च्या क्रांतींत व नंतर यादवीच्या काळांत त्यानें केलेली कामगिरी लेनिनला करतां आली नसती हें लुनाचार्स्कीचें म्हणणें अतिशय खरें आहे. पण क्रांतिकाळांत लागणारे हे गुण शांततेच्या काळांत अपुरे पडले अथवा फाजील ठरलें. आणि सहकाऱ्यांशीं जमतें घेऊन वागणें या गुणाच्या अभावामुळें लेनिनच्या मृत्यूनंतर ट्रॉट्स्कीस हतप्रभ व पदभ्रष्ट होऊन आतां वनवासांत काळ कंठावा लागत आहे. या बाबतींत सर्वस्वीं अपराध त्याचा नसला तरी आयुष्यभर त्याचें कुणाशींच फारसें पटलें नाहीं ही गोष्ट त्याचा स्वभाव सहकारगुणांचे बाबतींत सदोष असला पाहिजे एवढें सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

स्टॅलिन

झिनोव्हिफ व कॅमेनेव्ह हे ट्रॉट्स्कीचे मानानें सर्वच बाबतींत कमी प्रतीचे; पण स्टॅलिनचें तसें नव्हतें. बोल्शेव्हिक क्रांतीचेपूर्वी वृत्तपत्रांत लिहिण्या-

खेरीज फारसें ठळक कृत्य त्यानें कधीं केलें नव्हतें. पण प्रसिद्धीच्या मार्गें न लागतां सतत चिकाटीनें कोणतेंहि कार्य पार पाडण्याचा गुण त्याच्या ठिकाणीं फार मोठा आहे. तो १८७९त जन्मला. म्हणजे वयानें ट्रॉट्स्की-च्या बरोबरीचा आहे. मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानाचा व क्रांतितंत्राचा त्याचा अभ्यास अतिशय खोल असून आपला प्रतिपाद्य विषय सुगम व निरुत्तरपणें कसा मांडावा हें त्यास फार चांगलें ठाऊक आहे. 'लेनिनिझम्' नांवाचें त्याच्या लेखन-भाषणांचे जे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत व दोन वर्षांपूर्वी एच्. जी. वेल्स यांचेशीं जो स्टॅलिनचा संवाद झाला त्यावरून स्टॅलिनच्या वादपटुत्वाची व प्रतिपादनपटुत्वाची साक्ष उत्तम पटते. विद्वत्तेइतकेंच व्यावहारिक कर्तृत्वहि त्याचे अंगीं आहे. यादवीच्या काळांत झारिट्सिन व पेट्रोग्रॅड या दोन शहरांचें त्यानें मोठ्या शौर्यानें व हिकमतीनें रक्षण केलें. त्याच्या या पराक्रमाबद्दल झारिट्सिनला पुढें स्टॅलिनग्रॅड असें नांव देण्यांत आलें. सैबेरियांत कोल्चॅकशीं तो लढला व डेनिकिनला त्यानें डॉनेट्झ बेसिन-पासून मागें हटविलें. क्रॉन्स्डॅट बेटावरील खलाशांनीं १९२१ सालीं बंड केलें तेव्हां लेनिननें स्टॅलिनलाच बंड मोडण्यास पाठविलें व स्टॅलिननें तें बंड यशस्वितेनें मोडलें. लेनिननें स्टॅलिनचें हें सर्वांगीण कर्तृत्व जाणून त्याची कम्युनिस्ट पक्षाचा चिटणीस म्हणून नेमणूक केली. 'हा पोलादी हाडाचा माणूस आहे' असें लेनिन स्टॅलिनबद्दल म्हणत असे. असा पुरुष ट्रॉट्स्कीसारख्या तुटस माणसाशीं दुय्यम होऊन वागण्यास खुषी असणें हें निदान मनुष्यस्वभावास धरून नव्हतें. आणखी एक स्वभावविरोध या दोघांच्या भांडणास कारण झाला असें वाटतें. स्टॅलिन चढाईच्या धोरणास नेहमीं मागचा पाय किंवा काढतां पाय घेई. फेब्रुवारी व ऑक्टोबर या दोनहि वेळीं कमी-अधिक अंशानें हें खरें ठरलें होतें. उलट चढाई व क्रांति यांबद्दलचा उत्साह ट्रॉट्स्कीच्या रोमरोमांत भरलेला होता. पण क्रांति व यादवी दोनहि पार पडल्यावरचें काम पुनर्घटनेचें म्हणजे धीराचें, चिकाटीचें धीमेपणाचें होतें; चढाईचें नव्हतें. म्हणजे 'सर्व्हायव्हल ऑफ् दि फिटेस्ट' (लायक असेल तोच टिकतो) या न्यायानेंच स्टॅलिन या वेळीं या कामास अधिक लायक ठरला म्हणून अधिकारपदावर टिकला आणि ट्रॉट्स्की लायक न ठरल्यानें पदभ्रष्ट झाला असें म्हणावेंसें वाटतें.

ट्रॉट्स्की पदच्युत झाला

लेनिनच्या मृत्यूपूर्वीपासून आपणास उडवून लावण्याचें कारस्थान स्टॅलिन करीत होता अशी तक्रार ट्रॉट्स्कीनें आपल्या 'आत्मचरित्रां'त केली आहे. १९२४ सालीं तो सर्व वर्षभर मधून मधून ताप येण्यामुळें आजारीच होता. त्या वेळीं झिनोव्हिफ, कॅमेनेव्ह व स्टॅलिन हे तिघे सर्व राज्यकारभार पाहत. १९२५त ट्रॉट्स्की परत कामावर आला तेव्हां युद्धमंत्र्याची जागा त्याला न देतां वीजपुरवठा व शास्त्रीयसंशोधन हें खातें त्यास देण्यांत आलें. त्याहि खात्यांत तो उत्साहानें काम करूं लागला. पण 'न्यू इकॉनॉमिक पॉलिसी' म्हणजे लेनिननें सुरू केलेलें 'नवें आर्थिक धोरण' अतिरेकास चाललें आहे असें वाटून तो स्टॅलिनला विरोध करूं लागला. लेनिननें हें धोरण अमलांत आणलें तेव्हांच तें ट्रॉट्स्कीला मान्य नव्हतें. आतां तर यांतून भांडवलशाहीच येणार अशी त्यास भीति वाटली. कुलकवर्ग धान्य साठवून व तें चढ्या भावानें विकून गबर होऊं लागला होता. या वर्गास स्टॅलिनप्रभृति त्रिकूट उत्तेजन देत असून कम्युनिझमकडे जाण्याऐवजीं रशिया भांडवशाहीकडे ढकलला जात आहे अशी स्टॅलिनवर ट्रॉट्स्कीनें टीका चालविली. शिवाय जागतिक क्रांतीचें धोरण स्टॅलिन सोडीत आहे असा आरोप करून तो कम्युनिस्ट पक्षांत स्टॅलिन-गटाचा प्रतिपक्षी बनला. पक्षांत स्टॅलिनचें बहुमत असल्यानें ट्रॉट्स्कीस १९२७सालीं पक्ष सोडावा लागला. तरी पण त्यानें विरोध सोडला नाहीं. तेव्हां सोव्हियट सत्ता उलथून पाडण्याच्या प्रयत्नाच्या आरोपावरून १९२९च्या फेब्रुवारींत ट्रॉट्स्कीस कॉन्स्टान्टिनोपल येथें हद्दपार करण्यांत आलें. तेव्हांपासून तो आपलीं निवासस्थानें एकसारखीं बदलत असून हल्लीं नॉर्वेमध्यें आहे. या मुदतींत 'रशियन राज्यक्रांतीचा इतिहास' हा प्रचंड ग्रंथ त्यानें लिहिला असून आंतरराष्ट्रीय क्रांतीचें कार्य तो करीत असतो असें म्हणतात. त्यानें लिहिलेला 'रशियन राज्यक्रांतीचा इतिहास' हा ग्रंथ विसाव्या शतकांतील सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे असा त्याचा गुणगौरव होत असून तो अतिशय सार्थ आहे. युरोपांतील नामांकित वक्त्यांत त्याचा नंबर बराच वर असून त्याचें लेखन जितकें शास्त्रशुद्ध तितकेंच उपमा, दृष्टांत, विनोद, उपरोध यांनीं भरलेलें व अत्यंत रसाळ असतें.

'सरकारी भांडवलशाही'

इकडे स्टॅलिननें ट्रॉट्स्कीस हुसकल्यावर मागून झिनोव्हिफ्, कॅमेनेव्ह यांनाहि आपल्या सत्तेच्या चिमट्यांत धरून दूर फेकलें व स्वतः तो निष्कंटक बनला.* तरी पण रशियाची प्रगति त्यानें केली व ती अत्यंत प्रशंसनीय आहे यांत संशय नाहीं. नव्या आर्थिक धोरणांत धनोत्पादक साधनांची खाजगी मालकी मान्य होऊन मोठमोठे ट्रस्ट्स निर्माण झाले. पण गिऱ्हाइकांच्या सार्वराष्ट्रीय संस्था निर्माण झाल्यामुळें गिऱ्हाइकांची पिळवणूक झाली नाहीं व मजूरसंघ संघटित असल्यामुळें मजुरांची पिळवणूक फारशी होऊं शकली नाहीं. खाजगी भांडवलास मान्यता मिळाल्यानें यास 'भांडवलशाही' हें नांव मिळालेंच. तें लेनिनलाहि कबूल होतें. 'नव्या आर्थिक धोरणा'च्या सुरुवातीस त्याचें समर्थन करतांना लेनिन लिहितो—

"कर हे ऐनजिनसी घ्यावयाचे म्हणजे अप्रतिबंध व्यापाराचें तत्त्व ओघानेंच येतें. कर दिल्यानंतर उरलेलें धान्य विकण्यास शेतकऱ्यास हक्कच आहे. हा खरेदीविक्रीचा हक्क म्हणजे भांडवलशाहीचें स्वातंत्र्य. हें आम्ही देत आहों हें मी पुनः सांगतों. मला छपविण्याची इच्छा नाहीं. ...मी याला 'सरकारी भांडवलशाही' म्हणजे 'स्टेट कॅपिटॅलिझम्' म्हणतों. ज्या देशांत भांडवलशाही सत्ताधारी आहे त्या देशांत जमिनींचें बाबतींत अशी भांडवलदारी नांदूं देणें आणि जेथें मजूरसत्ता आहे तेथें ती नांदूं देणें यांत फार अंतर आहे. भांडवलशाहींतली भांडवलदारी ही सरकारमान्य व सरकारनियंत्रित असून मजूरवर्गाविरुद्ध धनिक वर्गाचे हितसंबंध संरक्षीत असते. पण मजूरसत्तेंत भांडवलदारी असली तरी तिनें मजूरवर्गाचा फायदाच होतो व प्रबळ अशा धनिक वर्गापासून मजुरांचें संरक्षण होऊं शकतें."

अशा प्रकारें मजूरसत्तेंत भांडवलदारी आली तरी ती प्रगतिच आहे असें सांगतांना लेनिन म्हणतो—

---

*गेल्या ऑगस्ट २५रोजीं कॅमेनेव्ह व झिनोव्हिफ यांस सोव्हियट सरकारविरुद्ध कट केल्याचे आरोपावरून गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. ट्रॉट्स्कीवरहि हा आरोप आहेच. पण तो परदेशीं असल्यानें बंदुकीच्या टप्प्यांत नाहीं.

"मजूरसत्तेच्या नियंत्रणाखालीं भांडवलदारीचा विकास होणें हें चांगलें आहे. विशेषतः लहान शेतकरी असलेल्या मागसलेल्या व दरिद्री देशांत तर अत्यंत अवश्य आहे. अर्थात् या भांडवलदारीच्या वाढीनें शेतकऱ्यांच्या शेती-पद्धतींत तावडतोब सुधारणा होईल तरच व तीहि कांहीं मर्यादेपर्यंत ही सुधारणा होईल तर, या भांडवलदारीची आवश्यकता आहे. विदेशी व्यापार, प्रचंड धंदे, रेल्वे आणि बँका हे आर्थिक जीवनांतील महत्त्वाचे घटक सरकार जर आपल्या ताब्यांत ठेवील तर मध्यमवर्गांत एकंदर देशांत वाढणाऱ्या भांडवलदारीवर ताबा चालवून तिचें नियंत्रण करणें हें सरकारला सहज शक्य होईल."

भांडवलदारीस लेनिननें दिलेली ही सवलत व त्याची सांगितलेली मर्यादा यांचें स्टॅलिननें मोठ्या कसोशीनें संरक्षण करून रशियांत पुष्कळ आर्थिक प्रगति घडवून आणली. लेनिन हयात असता तर, ही प्रगति झालेली पाहून व आपली चूक कबूल करून ट्रॉट्स्की पुन्हा लेनिनला जाऊन मिळाला असता व त्यानें तसें परत यावें अशी योजनाहि हरप्रकारें लेनिननें केली असती. पण स्टॅलिन व ट्रॉट्स्की यांचे बाबतींत दोघांकडूनहि तें अशक्य होतें व घडलेंहि नाहीं. असो.

कामगारशाहींतील या भांडवलदारीच्या नफ्याची कल्पना मूलतःच वेगळी होती. रशियांतील सोव्हियट पद्धतींत सर्व नफा सरकारचे हवालीं केला जाई व त्यांपैकीं १२½ टक्के नफा 'ट्रस्ट'च्या व्यवहारासाठीं सरकार परत देत असे. बाजारभावांची कल्पनाहि वेगळी असे. मागणी व पुरवठा या बेबंदशाही नियमानें बाजारभाव न ठरवतां अथवा कारखानदारांना आपसांत संगनमत करूं न देतां सरकार स्वतः बाजारभाव ठरवी. कांहीं बाबतींत मूळ खर्चापेक्षांहि किंमती कमी असत तर उलट दुसऱ्या कांहीं मालापासून फायदा मिळविण्यासाठीं सरकार भाव जास्त ठेवी. अशा प्रकारें कांहीं कमी आवश्यक व चैनीच्या मालांच्या द्वारा गिऱ्हाइकांवर ही एक प्रकारची अप्रत्यक्ष करवाढच करण्यांत येई. खुद्द कारखान्यांतून मॅनेजिंग खातें, कलेक्टिव्ह व कम्युनिस्ट पक्षाची कारखान्यांतील शाखा या तिघांच्याहि खबरदारीनें कारखान्यांचें नियंत्रण चाले.

पहिली पंचवार्षिक योजना

रशियांतील नैसर्गिक संपत्तीचा भरपूर उपयोग करून तेथें प्रचंड प्रमाणावरील उत्पादन अमलांत आणल्याखेरीज रशिया जगणार नाहीं अशी लेनिनची खात्री होती. त्यासाठीं रशियांत विजेची शक्ति सर्वत्र फिरविली पाहिजे अशासाठीं १९२० सालीं लेनिननें एक कमिशनहि नेमलें होतें. स्टॅलिननें लेनिनच्या सर्व कल्पना मूर्त करावयाच्या असें ठरविलें. १९२५सालीं सरकारनें प्रत्येक खाणीस, कारखान्यास वगैरे वार्षिक लागणारा कच्चा माल, मालाची निपज, मजुरांची कार्यशक्ति या सगळ्यांची आंकडेवार माहिती जमविण्यास हुकूम सोडले. त्यांची योग्य अधिकाऱ्यांकडून तपासणी, फेरतपासणी दुरुस्ती वगैरे करून मग 'गॉस प्लॅन' नांवाची एक संस्था सर्व राष्ट्रासाठीं आर्थिक उत्पादनाची योजना ठरविण्यासाठीं काढण्यांत आली. या संस्थेकरवीं जगभर प्रसिद्ध पावलेली 'पहिली पंचवार्षिक योजना' स्टॅलिननें आंखविली व १९२८च्या ऑक्टोबर १ रोजीं तिच्या बजावणीस सुरुवात केली. तिचे हेतु तीन होते (१) रशियांत मोठ्या प्रमाणावरील उत्पादन भरपूर वाढवून इतर राष्ट्रांतील भांडवलशाहीच्या हल्ल्यापासून रशियास सुरक्षित करणें. (२) लहान प्रमाणावरील शेतीचे जागीं यांत्रिक व प्रचंड शेतीची सुरुवात करणें, यामुळें उत्पादन वाढेल इतकेंच नव्हे तर कम्युनिझम्चा शत्रु असलेला असा छोटा शेतकरी मोठी शेती करूं लागला म्हणजे त्याचा विरोधहि दूर होईल अशी अपेक्षा होती. (३) साक्षरता व शिक्षण यांचा प्रसार करून रशियन शेतकऱ्यांचें बौद्धिक सामर्थ्य वाढाविणें. ही सर्व योजना पार पाडण्यासाठीं मतप्रसार फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत आला. बोल्शेव्हिक रशियाची पत जगांतील राष्ट्रें मानीत नसल्यानें पंचवार्षिक योजनेस रशियास बाहेर कर्ज मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां मजुरांकडून लहान लहान रकमा घेऊन सोव्हियट सरकारनें कर्ज उभारलें. कोणीं वर्षांतून आठवड्याचा, कोणीं महिन्याचा पगार कर्जासाठीं दिला. रशिया आर्थिक दृष्ट्या मागासलेला असून सर्व जग त्यास खायला उठलें आहे. अशा वेळीं जिवापाड खटाटोप करून आर्थिक उन्नति केली नाहीं तर रशियाचें स्वातंत्र्यहि राहणार नाहीं अशा आशयाचीं व्याख्यानें बोल्शेव्हिक वक्ते कामगारांपुढें देऊन त्यांच्या स्वदेशभक्तीस व कार्यतत्परतेस

तेज चढवीत. देशाचें जें वैभव वाढेल तें तुमचेंच आहे असें बोल्शेव्हिक रशियांत लोकांना सांगणें हें कांहीं भांडवलशाही जगांतल्याप्रमाणें थोतांड नव्हतें. ती केवळ वस्तुस्थिति होती. यामुळें रशियन कामकरी व शेतकरी पंचवार्षिक योजना पार पाडण्यासाठीं चढाओढीनें राबत. जो कुचर असेल त्याला हिणवून, ओढून आपल्याबरोबर आणीत. विशेष मेहनती व कुशल कामगारांना बक्षीस, मानमरातब देण्यांत येई. विदेशी राष्ट्रें प्रथम संशयग्रस्त होतीं. पण विदेशी तज्ज्ञांना मोठे पगार देण्याची लालूच दाखवितांच अमेरिकेंतून व युरोपांतून भांडवलशाहीनें बेकार करून टाकलेले हजारों तज्ज्ञ रशियाकडे धांवले. ड्निप्रॉस्टोई येथें एक सबंध नदी अडवून विजेचें प्रचंड पॉवर हाउस बांधण्यांत आलें. उरल पर्वतांत सुमारें दोन लक्ष कामगारांची वसाहत होईल असें प्रचंड शहर वसविण्यांत येऊन व दीड हजार मैलांवरील खाणींतून कोळसा आणून उरल पर्वतांतील लोखंडाच्या साह्यानें तेथें प्रचंड पोलादी कारखाना उभारण्यांत आला. दरसाल हजारों ट्रॅक्टर उत्पन्न करणारा एक कारखाना स्टॅलिनग्रॅड येथें सुरू झाला. ट्रान्सकॉकेशियामध्यें तेलाच्या धंद्यांत लहान लहान खाणीवाले असल्यानें धंदा मागसलेला होता. तेथें सर्व खाणींचें एकीकरण करून प्रचंड प्रमाणावर खाणींतून निरनिराळीं तेलें काढण्याचा धंदा सुरू करण्यांत आला. कास्पियन समुद्राकांठच्या बाकू येथील खाणींतून काळ्या समुद्राकांठच्या बाटुम बंदरापर्यंत सहाशें मैल नळ टाकून काळ्या समुद्रांतील आरमारास व रशियाच्या अंतर्भागास तेल पोंचविण्याची व्यवस्था करण्यांत आली. बाकू येथें अनादि काळापासून खोपडांतून गचाळपणें राहणाऱ्या स्त्री-पुरुषांना सुंदर उद्यानें, क्रीडांगणें, शाळा, ग्रंथालयें, स्वच्छ घरें व स्वच्छ अन्न अशी राहणी मिळूं लागली. एकंदर पंचवार्षिक योजना चारच वर्षांत पार पडली.

यासंबंधीं आंकड्यांची जी माहिती प्रसिद्ध होत असे ती थोडी अत्युक्त असे. प्रसिद्धिपत्रकांत सांगितल्याइतका माल परिमाणांत भरे तरी गुणांत, नवख्या माणसांनीं घाईनें केलेला असल्यानें, हिणकस ठरे. तरी पण अमेरिका, इंग्लंड, जर्मनी यांसारख्या राष्ट्रांना पूर्वी जें करण्यास एकेक पिढीहि पुरली नाहीं तें सोव्हियट रशियानें या चार वर्षांत करून दाखविलें. याचें कारण प्रत्येक कामगाराला माझ्या श्रमाचीं फळें मला व माझ्या लाडक्यां-

ना मिळणार अशा वस्तुस्थितीची खात्री असल्यामुळें प्रत्येकजण झटला. तसेंच निर्माण झालेलें धन नफ्याच्या हावेनें उबवून ठेवण्याचें नसल्यानें जितकें धन वाढलें तितकें लोकांच्या भोगवट्यास आलें अथवा नवीन धन निर्मिण्याच्या कामीं लागलें.

धनोत्पादनाप्रमाणें वाटणीच्या म्हणजे व्यापाराच्या क्षेत्रांतहि अशीच प्रगति झाली. हा व्यापार लहान लहान खाजगी व्यापाऱ्यांच्या हातीं असे. त्यापासून काढून घेऊन तो मोठ्या प्रमाणावर सामुदायिक करण्याचें सरकारनें ठरविलें. त्यासाठीं सरकारनें तीन उपाय योजिले—(१) गिऱ्हाइकांच्या सहकारी संस्था होत्या; त्यांचा व्यवहार पंचवार्षिक योजनेंत दुप्पट होऊन शेंकडा ५५ या प्रमाणांत किरकोळ माल या संस्थांकडून विकण्यांत येऊं लागला. (२) सरकारी मालकीच्या १९३२ सालीं असलेल्या ७० हजार दुकानांची पांचपट वाढ करण्यांत आली. व (३) तिसरा उपाय म्हणजे कारखान्यांतील कामगारांच्या वखारी. यांत माल सांठवून ठेवून परवानातिकिटाप्रमाणें कामगारांना तो वाटण्यांत येई. या तिन्ही उपायांनीं किरकोळ मालविक्री करणारा व्यापारी निःशेष झाला व गिऱ्हाइकांस माल चोख व कमी किंमतींत मिळून, एकंदर गिऱ्हाईक किती व त्या मानानें माल निपजावा किती याचा हिशेब करणें सुलभ झालें.

विषमतेंतील समतेचें धोरण

मिळकतींत व वागवणुकींत विषमता पुष्कळच होती. पण त्या विषमतेंतील समतेचें धोरण लक्षांत घेण्यासारखें होतें. विदेशी तज्ज्ञांना पगार मोठे असत. त्यांच्यासाठीं निवडक चांगल्या मालाचीं दुकानें व विदेशी चलन मिळण्यासाठीं पेढ्या असत. याचा हेतु विदेशांत रशियाची पत वाढविणें व रशियाच्या योजना पार पाडण्यासाठीं विदेशी तज्ज्ञांची अधिकांत अधिक मदत मिळविणें हा होता. रशियन प्रजेपैकीं शारीरिक काम करणाऱ्या कामगारांना शिधा व मजुरी पुष्कळ मिळे. कामगारसंघाच्या सभासदांना विशेष स्वस्त भावाच्या दुकानांत सवलतीनें माल मिळत असे. बैठ्या कामाच्या नोकरांना पगार कमी मिळे. 'नेपमेन' म्हणजे 'नवीन आर्थिक धोरणा'न्वयें गबर झालेल्यांना चोहोंकडून वाढत्या प्रमाणांत जीवित असह्य करण्यांत येऊं लागलें.

त्यांना सोव्हियटच्या निवडणुकींत मतदानाचा हक्क नसे. सवलतीच्या भावाच्या दुकानांतून त्यांना मज्जाव असे. अधिक चांगलें व कसोशीनें काम करणाऱ्यांना अधिक पगार देण्यांत येई. एकंदर या विषमतेचें धोरणहि सामुदायिक मालकीच्या व सामाजिक समतेच्या तत्त्वास पोषक आणि सामुदायिक उत्पादनाच्या पद्धतीस संवर्धक असें होतें.

सामुदायिक शेती

सामुदायिक शेती हें या 'पंचवार्षिक योजने'चें मोठें वैशिष्ट्य होतें. 'नवीन आर्थिक धोरणा'मुळें खासगी मालकी असलेले शेतकरी फार वाढले. १९२७ सालीं लहान शेतांची संख्या अडीच कोटींवर गेली. हे सर्व कम्युनिस्ट धोरणाचे शत्रु होते. शिवाय लहान शेतीमुळें सर्व आर्थिक घटना कायमची दुर्बल राहण्याची भीति होती. यासाठीं प्रचंड शेतीच्या धोरणास सरकारनें हात घातला. या प्रचंड शेतीचे अनेक प्रकार करण्यांत आले. सोव्हकॉझ (Sovkhoz) हा पहिला प्रकार. हीं सरकारी मालकीचीं प्रचंड शेतें असत व त्यांवर सरकारी यंत्रें घेऊन मजूर राबत. कोल्कहॉझ (Kolkhoz) हा दुसरा प्रकार. यांत खाजगी मालक असलेले शेतकरी, जमीन, हत्यारें व जनावरें यांचा सहकार्यानें उपयोग करून नफा वाटून येत. यामुळें यांत्रिक व शास्त्रीय उपकरणें व उपाय वापरतां येऊन शेतीचें उत्पन्न भराभर वाढत गेलें. यांत नुसती जमीन, नुसतीं हत्यारें अथवा पशु सहकार्यांत आणून बाकीच्या वस्तूंचा खाजगी वापर करणें वगैरे अनेक प्रकार असत. कोल्कहॉझचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठीं व्यवस्थापक मंडळ निवडण्यांत येई व यांत कम्युनिस्ट पक्षाचे सभासद घेण्यांत येत. हीं धोरणें अमलांत आणण्यासाठीं मालक शेतकऱ्यांना, कुलकवर्गाला सहकार्यांत खेचण्यासाठीं जुल्मजबरदस्ती पुष्कळ करावी लागली. पण कांहीं ठिकाणीं अतिरेक झाला तरी होतां होईतों मतपरिवर्तनानें पण नाइलाज होई तेथें सक्तीनें कुलकवर्गास सहकार्यांत ओढावें असें स्टॅलिनचें धोरण होतें. 'नवीन आर्थिक धोरणा'मुळें भांडवलशाही वाढेल वगैरे जी भीति ट्रॉट्स्की वगैरेंना वाटत होती, तिचा स्टॅलिननें या वेळच्या आपल्या धोरणानें अगदीं मूलच्छेद केला. या वेळीं ट्रॉट्स्की व स्टॅलिन यांमध्यें दिलजमाई होण्यास अनुकूल संधि होती. पण वैयक्तिक अडचणींमुळें तें अशक्यच ठरलें. या वेळीं

कुलकवर्गानें इतका भयंकर विरोध केला, कीं त्यास यादवीचें स्वरूप आलें. लक्षावधि गुरें व उभीं पिकें कापून काढून त्यांनीं सरकारला दुष्काळांत कोंडण्याचे प्रयत्न केले. पण आतां परदेशांतून शस्त्रास्त्रें मिळणें शक्य नसल्यानें कुलकवर्गाचें सरकारपुढें कांहीं चाललें नाहीं. शेतीच्या क्षेत्रांत शहरांतल्याप्रमाणें, सिनेमा, बागा, शाळा, बालकगृहें, क्रीडांगणें, आरोग्यकारक सुखसोयी या सर्वांची वाढ होऊं लागली तसतसे गरीब शेतकरी कामगारांप्रमाणें सरकारी धोरणास अनुकूल झाले. यामुळें खालून गरीब शेतकरी व वरून कामगार यांच्या दडपणांत कुलकवर्गाचा विरोध दडपला गेला. त्यांतूनहि ज्या कुलकांनीं सरकारला सतावलें त्यांची सैबेरियांत हकालपट्टी करण्यांत आली. अशा प्रकारें मतपरिवर्तन, सक्ति व शास्त्रीय साधनांचा उपयोग यांनीं पांच वर्षांची आर्थिक योजना चार वर्षांतच सरकारनें तडीस नेली.

शैक्षणिक प्रगति

शैक्षणिक क्षेत्रांतील यश तर आश्चर्यकारक होतें. रशियांत ६० भाषा बोलल्या जातात. इतक्या सर्व भाषांना पूर्ण स्वातंत्र्य देऊन सरकारनें त्यांच्या शाळा काढल्या. एका खार्कोव्ह गांवांत ग्रीक, आर्मेनियन, टार्टर, युक्रेनियन व रशियन इतक्या मातृभाषांच्या शाळा होत्या. १९१४ सालीं शेंकडा ७३ लोक निरक्षर असत. १९३२ सालीं हें प्रमाण ९ टक्क्यांवर आलें. प्राथमिक शाळांतील मुलांची संख्या ७० लक्षांवरून १ कोटि ९० लक्षांवर आली व दुय्यम शाळांतील मुलांची संख्या ५ लक्षांवरून साडेपंचेचाळीस लक्षांवर नेली. दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांना बौद्धिक व विविध धंद्यांचें असें अनेकविध शिक्षण देण्यांत आलें व प्रौढांच्या स्वतंत्र शाळा सर्वत्र काढण्यांत आल्या. विद्यापीठांतून धर्मशिक्षणास चाट मिळाली; तरी पण शेती, भौतिक शास्त्रें इतिहास, अर्थशास्त्र, कला वगैरे सर्व शाखांस उत्तेजन मिळालें. जगांतील कोणत्याहि विद्यापीठांना मिळत नाहीं इतका तनखा विद्यापीठांना देण्यांत आला. साहित्य हें निवळ कलात्मक आहे हा संप्रदाय खणून काढून नष्ट करण्यांत आला व क्रांतिवादी, ध्येयवादी साहित्यालाच फक्त मुभा मिळाली. सर्व विद्या व कला यांचे क्षेत्रांत फक्त मार्क्सिस्ट संप्रदायासच वाव देण्यांत आला. त्यासाठीं आर. ए. पी. पी. नांवाची एक संस्था मार्क्सिस्ट नसणाऱ्या

संप्रदायाची मुस्कटदाबी करण्यासाठीं निर्माण करण्यांत आली. या जुलुमाविरुद्ध रशियांत व बाहेरील जगांत पुष्कळ ओरड झाली. पण रशियन कम्युनिस्टांचें त्याला उत्तर असें होतें, कीं भांडवलशाहींत राजे, सरदार, धनिक व भिक्षुक यांच्या कलेस व चवचालपणास वाव मिळतो आणि बहुसंख्य जनतेच्या कलेचा कोंडमारा होतो. आम्ही बहुसंख्य समाजास उपयोगी अशा विद्या व कला वाढवितों त्यांत रमण्यास व त्या योगें समाजाच्या प्रगतीस मदत करण्यास जुन्या धनिकांनीं तयार व्हावें.

दुसरी पंचवार्षिक योजना

१९३३ सालीं दुसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली. पहिल्या योजनेंत चांगल्या मालाची निपज फार झाली नव्हती. राहण्याच्या इमारती, रेल्वे व सडका यांवर लक्ष पुरविण्यांत आलें नव्हतें. कारखान्यांस व शेतीस लागणारीं यंत्रें वगैरे निर्माण करण्यांत शक्ति फार खर्च झाल्यामुळें भोग्य संपत्ति फारशी निर्माण झाली नाहीं. ही सर्व वाण भरून निघेल अशा प्रकारें दुसरी योजना आंखण्यांत आली. वर्गहीन समाजरचना करण्याचें जें सोव्हियट राज्याचें मुख्य ध्येय त्याकडे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनें (१९३३-३७) बरीच प्रगति होईल अशी सोव्हियट सरकारची अपेक्षा आहे. या दुसऱ्या योजनेचा गोषवारा पुढीलप्रमाणें आहेः—(१) भोग्य संपत्तीची वार्षिक निपज १९३२ च्या तिपटीपर्यंत आणावी. (२) व्यापार अडीचपासून तीनपटीपर्यंत वाढवावा. (३) ३५ ते ४०टक्के बाजारभाव कमी करावे. (४) सामुदायिक भोजनगृहें अडीचपट वाढवावीं. (५) बाजारभाव लक्षांत घेतां खरी मजुरी दुप्पट वाढवावी. (६) सरकारी व सहकारी दुकानें ३७टक्के वाढवावीं. गेल्या अडीच वर्षांत या योजनेची प्रगति आंखणीप्रमाणें होत असून १९२९ पासून आजपर्यंत सगळ्या जगभर आर्थिक मंदीची ओरड सुरू असतां रशिया एकसारखा भरभराटत आहे.

प्रकरण १३ वें

जागतिक कम्युनिस्ट क्रांतीचें भवितव्य



लेनिन व ट्रॉट्स्की या कम्युनिस्ट पुढाऱ्यांचीं जीं अनेक वचनें मागें दिलीं आहेत, त्यांत पुष्कळ ठिकाणीं रशियाप्रमाणें इतर राष्ट्रांतहि कम्युनिस्ट क्रांति घडून यावी हें इष्ट असल्याबद्दलचें त्यांचें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. कम्युनिझमचा आद्यप्रवर्तक कार्ल मार्क्स हा तर आयुष्यभर नेहमीं जागतिक कम्युनिस्ट क्रांतीचीच भाषा बोलत होता. भांडवलशाहीचें युग आतां संपलें असून यापुढें ती जितका अधिक काल नांदेल तितका काल जगावर संकटांमागून संकटें आणील. प्राणहीन झालेल्या शरीरास मोहानें कवटाळून तें कुजल्यामुळें रोगराई पसरण्याचा प्रसंग आणण्यापेक्षां मन घट्ट करून व त्या शरीराची आस सोडून त्यास मूठमाती द्यावी हें जसें योग्य असतें त्याप्रमाणें विकासगुण संपून कुजूं लागलेल्या भांडवलशाहीस मूठमाती देणें व जगभर कम्युनिस्ट समाजघटना स्थापन करणें हेंच अखिल जगांतील मानवी जीवन सुखी, निरोगी व विकासी करण्याचें एकमेव साधन आहे असें मार्क्स, एंजल्स, लेनिन, ट्रॉट्स्की, स्टॅलिन व त्यांचे जगभर पसरलेले अनुयायी यांचें ठाम मत आहे.

कम्युनिस्ट क्रांतीस जागतिक प्रतिकूलता

पण मार्क्सच्या हयातींत त्यास हें मत जगांतील बहुसंख्य लोकांस अथवा कोणत्याहि एका राष्ट्रांतील बहुजनसमाजास अथवा फक्त कामगारवर्गासहि पटवून देतां आलें नाहीं. मार्क्सच्या काळीं कम्युनिस्ट क्रांतीचा प्रयोग कोठेंहि झाला नव्हता यामुळें त्यास लोकमत अनुकूल करून घेणें अवघड होतें असें एक वेळ म्हणतां येईल. पण आज रशियांत कम्युनिस्ट क्रांतीचा प्रयोग १८ वर्षें यशस्वितेनें चालू असूनहि जगांत कोठेंच कम्युनिस्ट क्रांतीस बहुजनसमाजाचा पाठिंबा अथवा नुसत्या कामगारवर्गाचाहि पाठिंबा मिळत नाहीं.

अमेरिकेंत भांडवशाहीची प्रगति होण्याचें आतां बाकी राहिलें नाहीं तरी कम्युनिझम्‌ला लोकमताचा विरोध आहे. इंग्लंडांत शेंकडा ७५ जनता कामगारवर्गांतली असून अतिशय मवाळ असें सोशॅलिस्ट प्रधानमंडळहि निवडून न येतां इरसाल कॉझर्वेटिव्ह व भांडवलवाल्यांचें कट्टें पुरस्कर्तें असें सरकारच इंग्लंडांत पुनः पुनः स्थापन होतें. फ्रान्समध्येंहि कम्युनिझमला कोणी विचारीत नाहीं. जर्मनी व इटाली येथील राज्यकर्त्यांनीं जनतेच्या एकमुखी पाठिंब्याचा देखावा उत्पन्न केला असून जगांतील कम्युनिझम् समूळ उखडून काढण्याच्या प्रतिज्ञा केल्या आहेत. चीनचा अरेराव चँगकैशेक हा चीनमधील कम्युनिझम् नष्ट करण्यासाठीं जपानचें पारतंत्र्य येण्याचा धोका पत्करण्यास तयार झाला आहे. जगांतील एक-षष्ठांश प्रदेशाएवढ्या रशियांत कम्युनिस्ट क्रांति १८ वर्षेपर्यंत जारी होऊनहि जगांत कोठेंहि आज कम्युनिझम्‌ला अनुकूल मत असल्याचें दिसून येत नाहीं.

इतकेंच नव्हे तर कम्युनिझम् हें मानवी संस्कृतीचा विनाश करणारें तत्त्वज्ञान आहे असें सर्वत्र प्रतिपादिलें जात आहे. जगांत आजवर जें जें पवित्र व श्रेष्ठ म्हणून गणलें गेलें तें सर्व या कम्युनिस्टांनीं भ्रष्ट केलें असून निवळ शारीरिक सुखाच्या मागें लागणारें यांचें आसुरी तत्त्वज्ञान आहे असा त्यावर आरोप केला जात आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या दृष्टीनें आपण राजकीय क्षेत्रापुरतेंच बोलावयाचें म्हटलें तरी प्रत्येक राष्ट्रांत भांडवलदार व मजूर, सरंजामदार व गुलाम, जमिनदार व शेतकरी या वर्गांचीं वर्गयुद्धें माजवून प्रत्येक राष्ट्राचीं अनेक शकलें कम्युनिस्ट पाडूं पाहतात हें कांहीं खोटें नाहीं. आणि आजवर ज्या वरिष्ठ वर्गांनीं हजारों वर्षें ऐश्वर्य भोगलें व त्यायोगें उच्च संस्कृति वापरांत ठेविल्यानें तिचें जतन झालें त्यांना त्या ऐश्वर्यशिखरावरून ओढून हलक्या दर्जाच्या मानल्या गेलेल्या बहुसंख्य समाजाच्या पंक्तीस आणून कम्युनिस्टांनीं बसविलें आहे हेंहि तितकेंच खरें आहे. रशियांत त्यांना जर या गोष्टी रक्ताच्या नद्या वाहवल्यावांचून करतां आल्या नाहींत तर बाहेरच्या जगांत तरी हाडामांसाचा खच पडल्यावांचून कम्यूनिझम् कशाचा येतो? त्याशिवाय तो येणार नाहीं हें कम्यूनिस्टहि सांगत असून अशा रक्तपाताची तयारी करा असें हे 'राक्षस' जगांतील जनतेस आवाहनहि देत असतात. पण, आक्षेपकांच्या मतें, एवढें या कम्युनिझम्‌वांचून काय अडलें आहे? ज्या भांडवलशाहीवर या

कम्युनिस्टांचा एवढा राग त्याच भांडवलशाहीनें आगगाड्या, तारायंत्रें, कारखाने, छापखाने वगैरे सुखसोई वाढवून बहुसंख्य समाजास सुख व संस्कृति यांचा लाभ व्हावा अशी संधि आणून दिली ना? मार्क्सच्या वेळची परिस्थिति कशीहि असो, त्याचेनंतर भांडवलशाहीचें स्वरूप पुष्कळ पालटलें असून कामगारांची परिस्थिति पुष्कळच सुधारली आहे. भांडवलवाल्यांची आपसांत स्पर्धा, एकाच राष्ट्रांतील अनेक वर्गांचे कलह हे जे मार्क्सला अपरिहार्यतेनें दृष्टीस पडले ते नाहींसे करण्याची खटपट आज जर्मनीसारख्या देशांत इतकी यशस्वी झाली आहे, कीं कामगारांचा व भांडवलदारांचा, जमिनदारांचा व शेतकऱ्यांचा, सैनिकांचा मध्यम वर्गांचा व इतर सर्व अलबत्यागलत्या नागरिकांचा हिटलर हा एकटा एकच पुढारी आहे ही गोष्ट जर्मन प्रजेनें अनेकदां मतदानें करून सिद्ध केली आहे. यामुळें जर्मनींतील भांडवलशाहींत मार्क्सला दिसलेले सर्व दोष लोपले ना? मग इतरत्र जर्मनीचेंच अनुकरण कां करा ना? हिटलरनें सर्वाधिकारित्व मिळवितांना जुनें कांहींहि मोडलेलें नाहीं. सरंजामदार, जमिनदार, भांडवलदार, शेतकरी, मजूर या सर्वांचीं समाजांतलीं स्थानें, दर्जे व मिळकती त्यानें कायम ठेवल्या आहेत. शिवाय जुन्या काळीं जें जें कांहीं भव्य, सुंदर आणि पवित्र होतें तें तसेंच ठेवलें आहे. म्हणजे कोणतीहि क्रांति आणि फारसा रक्तपात न करतां हिटलरनें आपल्या फॅसिस्ट तत्त्वानुसार भांडवलशाहींतले दोष लुप्त अथवा गुप्त करून टाकले. असे शांतिमय पालट होत गेले तर कोणास नको असतात? जग हें हळूहळू पालटणार हें सर्वांनाच कबूल आहे. पण त्याला हादरे, हिसडे, आचके न देतां तें पालटलें अथवा आपल्याच क्रमानें जगास पालटूं दिलें तर त्यांत काय बिघडलें? रशियांत कम्युनिझम् झाला हें इष्ट कां अनिष्ट हें आतां सोडून देऊं. तेथील ऐतिहासिक सिंहासन कुत्र्यामांजरांनीं लाथाडलें. धर्ममंदिरांची धुळवड झाली. ज्यांच्या पायाचें नख हलक्यासलक्या लोकांना पाहावयाला मिळूं नये त्या उच्च घराण्यांतील स्त्रियांवर मोलमजुरी करण्याचा प्रसंग आला. पण आतां त्याचें काय? झाल्यागेल्या गोष्टी परत येत नाहींत. कदाचित् रशियाचें या कम्युनिस्टांनीं कल्याणहि केलें असेल. पण बाकीच्या जगावर कम्युनिझमचा जुलूम कां? बैलांना कडबा मानवतो. पण माणसांच्या तोंडांत कां कडबा कोंबतां? रशियानें आपलें जंगल जाळून त्याचा कोळसा केला असला तर

त्यांत गैरहि नसेल. पण रशियांत जंगलच फक्त होतें म्हणून त्यांनीं तें जाळलें. बाकीच्या जगानें आपल्या फळबागा व फुलबागा जाळून त्यांची राखुंडी खावी व फुंकावी कीं काय?

जगांत कम्युनिझम् माजविण्याच्या शिकवणीविरुद्ध रशियाबाहेरच्या जगांतील विचारवंतांकडून येणारे हे आक्षेप कम्युनिस्टांना अगदीं हास्यास्पद व विचारहि न करण्याजोगे वाटतील. पण जगांत अजून कम्युनिस्टांचें मत कोणास फारसें पटलेलें नाहीं, तोंवर या व अशा हास्यास्पद आक्षेपांना युक्तिवादानें उत्तर देण्यावांचून कम्युनिस्टांना जगांत कम्युनिस्ट क्रांतीस अनुकूल वातावरण उत्पन्न करतां येणार नाहीं. यासाठीं या प्रकरणांत भांडवलशाहीचें ऐतिहासिक कार्य कसें संपलें आहे व कम्युनिझम्ला भांडवलशाहीनें फॅसिझम् हा जो जबर प्रतिस्पर्धी उत्पन्न केला आहे त्याचें खरोखर स्वरूप काय हें पाहावयाचें आहे. कारण जागतिक कम्युनिस्टक्रांतीचें भवितव्य हें फॅसिझम्चा पराभव होण्या न होण्यावरच अवलंबून आहे.

भांडवलशाहीचें जगावर ऋण कोणतें

भांडवलशाहीचें जें एक ऋण जगांतील सर्व कम्युनिस्ट कबूल करतात, तें हें कीं तिनें माणसाची यंत्रांच्या व शास्त्रांच्या साह्यानें धनोत्पादन करण्याची शक्ति, एरवीं हजारों वर्षांत वाढली नाहीं इतकी, एकदीड शतकांत वाढविली. खालील कोष्टकांत कारखान्यांतील यंत्रांची उत्पादनशक्ति (वाहतुकीच्या यंत्रांची वगळून) दिली आहे. तीवरून भांडवलशाहीनें माणसाचे हवालीं केवढी प्रचंड यंत्रशक्ति एका शंभर वर्षांत दिली याची कांहींशी कल्पना येईल. आंकडे दशलक्ष अश्वशक्तीचे आहेत; १ अश्वशक्ति म्हणजे सहा माणसांची शक्ति असें समजावें.

	इंग्लंड	फ्रान्स	जर्मनी	अमेरिका	बाकीचे देश	एकंदर जग
१८३५	०·३	०·०२	०·०१	०·३	०·०१	०·६५
१८७५	६	३	४	७·८	१·९	२६·५
१९१३	२८·५	१२·५	२१	८६	३१	२११
१९२६	३७	१८·५	३२	१६२	९३	३९०

(फॅसिझम् अॅन्ड सोशल रेव्होल्यूशन— पामी डट्ट)

यावरून इंग्लंडचें उत्पादनसामर्थ्य शंभर पट व साऱ्या जगाचें सहाशें पट ..... वाढलें असें कळून येतें. १९१३ पासून १९२८ हा पंधरा वर्षांचा काळ घेतला तरीहि युरोपची धनोत्पादनशक्ति दीडपट वाढली आहे, आणि अमेरिकेची दुप्पट झाली आहे, आणि युरोप व अमेरिका यांखेरीज इतर प्रदेशांची चौपट वाढली आहे. सर्व प्रकारच्या शक्तींची बेरीज केली तर ती दीड शें कोटि अश्वशक्तिइतकी म्हणजे ९०० कोटि मनुष्यशक्तिइतकी भरेल असें गणित स्टुअर्ट चेसनें केलें आहे. साधारणपणें एक मनुष्य आपल्या श्रमांनीं सरसकट निदान आणखी दोन माणसांस पोसूं शकतो असें मानलें तर या ९०० कोटि मनुष्यशक्तीनें २७०० कोटि माणसांचा सांभाळ सहज होऊं शकेल. वर यंत्रशक्तीचें कोष्टक दिलेंच आहे. शेतीचें उत्पन्न वाढविण्याची शक्ति अशीच अफाट वाढत आहे. १८९० सालीं कानडामध्यें दर माणशीं १३½ बुशेल गहूं निघे तेथें १९२१ सालीं ७० बुशेल निघूं लागला. १९००-१९२८ या काळांत कानडाचें पीक दरसाल दुप्पट येऊं लागलें; अर्जेंटाइनमध्यें पावणे-तीनपट व कानडामध्यें सव्वाचारपट येऊं लागलें. १९१३-१९२८ या काळांत जगांतील धान्य निर्यात करणाऱ्या राष्ट्रांची निर्यात दीडपट वाढली. याच काळांत लोकसंख्या मात्र फक्त साडेअकरा टक्के म्हणजे जेमतेम नवमांश वाढली. राष्ट्रसंघाच्या आर्थिक शाखेनें अशी माहिती दिली आहे कीं, १९१३ ते १९२८ या काळांत जगांतलीं अन्नद्रव्यें १६ टक्के वाढलीं, कच्चा माल ४० टक्के वाढला आणि लोकसंख्येची वाढ १० टक्के होईल असा अंदाज होता, ती वर सांगितल्याप्रमाणें साडे-अकरा टक्के वाढली. जगांतील मालाचा सांठा १९२३-२५ या काळांत होता तो १०० असें मानलें तर १९२६ अखेर १३४, १९२८ अखेर १६१, १९२९ अखेर १९२, १९३० अखेर २३५, १९३१ अखेर २६४ आणि १९३२ अखेर (बाजारांत खपेना म्हणून पुष्कळशा मालाचा विध्वंस केला गेला तरी) २६५ होता. कारखान्यांतील मालाची शिल्लक या प्रमाणांत वाढली नाहीं. पण त्याचें कारण माल खपेना म्हणून मजुरांची नोकरीवरून हकालपट्टी होऊं लागली व उत्पादन खुंटलें हें होय.

ऋणाच्या ओझ्याखालीं माणूस चिरडला

सारांश, मांडवलशाहीनें माणसाची उत्पादनशक्ति वाढवून माणसास

त्यांत गैरहि नसेल. पण रशियांत जंगलच फक्त होतें म्हणून त्यांनीं तें जाळलें. बाकीच्या जगानें आपल्या फळबागा व फुलबागा जाळून त्यांची राखुंडी खावी व फुंकावी कीं काय?

जगांत कम्युनिझम् माजविण्याच्या शिकवणीविरुद्ध रशियाबाहेरच्या जगांतील विचारवंतांकडून येणारे हे आक्षेप कम्युनिस्टांना अगदीं हास्यास्पद व विचारहि न करण्याजोगे वाटतील. पण जगांत अजून कम्युनिस्टांचें मत कोणास फारसें पटलेलें नाहीं, तोंवर या व अशा हास्यास्पद आक्षेपांना युक्तिवादानें उत्तर देण्यावांचून कम्युनिस्टांना जगांत कम्युनिस्ट क्रांतीस अनुकूल वातावरण उत्पन्न करतां येणार नाहीं. यासाठीं या प्रकरणांत भांडवलशाहीचें ऐतिहासिक कार्य कसें संपलें आहे व कम्युनिझम्ला भांडवलशाहीनें फॅसिझम् हा जो जबर प्रतिस्पर्धी उत्पन्न केला आहे त्याचें खरोखर स्वरूप काय हें पाहावयाचें आहे. कारण जागतिक कम्युनिस्टक्रांतीचें भवितव्य हें फॅसिझम्चा पराभव होण्या न होण्यावरच अवलंबून आहे.

भांडवलशाहीचें जगावर ऋण कोणतें

भांडवलशाहीचें जें एक ऋण जगांतील सर्व कम्युनिस्ट कबूल करतात, तें हें कीं तिनें माणसाची यंत्रांच्या व शास्त्रांच्या साह्यानें धनोत्पादन करण्याची शक्ति, एरवीं हजारों वर्षांत वाढली नाहीं इतकी, एकदीड शतकांत वाढविली. खालील कोष्टकांत कारखान्यांतील यंत्रांची उत्पादनशक्ति (वाहतुकीच्या यंत्रांची वगळून) दिली आहे. तीवरून भांडवलशाहीनें माणसाचे हवालीं केवढी प्रचंड यंत्रशक्ति एका शंभर वर्षांत दिली याची कांहींशी कल्पना येईल. आंकडे दशलक्ष अश्वशक्तीचे आहेत; १ अश्वशक्ति म्हणजे सहा माणसांची शक्ति असें समजावें.

	इंग्लंड	फ्रान्स	जर्मनी	अमेरिका	बाकीचे देश	एकंदर जग
१८३५	०·३	०·०२	०·०१	०·३	०·०१	०·६५
१८७५	६	३	४	७·८	१·९	२६·५
१९१३	२८·५	१२·५	२१	८६	३१	२११
१९२६	३७	१८·५	३२	१६२	९३	३९०

(फॅसिझम् ॲन्ड सोशल रेव्होल्यूशन— पामी डट्ट)

यावरून इंग्लंडचें उत्पादनसामर्थ्य शंभर पट व साऱ्या जगाचें सहाशें पट वाढलें असें कळून येतें. १९१३ पासून १९२८ हा पंधरा वर्षांचा काळ घेतला तरीहि युरोपची धनोत्पादनशक्ति दीडपट वाढली आहे, आणि अमेरिकेची दुप्पट झाली आहे, आणि युरोप व अमेरिका यांखेरीज इतर प्रदेशांची चौपट वाढली आहे. सर्व प्रकारच्या शक्तींची बेरीज केली तर ती दीड शें कोटि अश्वशक्तिइतकी म्हणजे ९०० कोटि मनुष्यशक्तिइतकी भरेल असें गणित स्टुअर्ट चेसनें केलें आहे. साधारणपणें एक मनुष्य आपल्या श्रमांनीं सरसकट निदान आणखी दोन माणसांस पोसूं शकतो असें मानलें तर या ९०० कोटि मनुष्यशक्तीनें २७०० कोटि माणसांचा सांभाळ सहज होऊं शकेल. वर यंत्रशक्तीचें कोष्टक दिलेंच आहे. शेतीचें उत्पन्न वाढविण्याची शक्ति अशीच अफाट वाढत आहे. १८९० सालीं कानडामध्यें दर माणशीं १३½ बुशेल गहूं निघे तेथें १९२१ सालीं ७० बुशेल निघूं लागला. १९००-१९२८ या काळांत कानडाचें पीक दरसाल दुप्पट येऊं लागलें; अर्जेंटाइनमध्यें पावणे-तीनपट व कानडामध्यें सव्वाचारपट येऊं लागलें. १९१३-१९२८ या काळांत जगांतील धान्य निर्यात करणाऱ्या राष्ट्रांची निर्यात दीडपट वाढली. याच काळांत लोकसंख्या मात्र फक्त साडेअकरा टक्के म्हणजे जेमतेम नवमांश वाढली. राष्ट्रसंघाच्या आर्थिक शाखेनें अशी माहिती दिली आहे कीं, १९१३ ते १९२८ या काळांत जगांतलीं अन्नद्रव्यें १६ टक्के वाढलीं, कच्चा माल ४० टक्के वाढला आणि लोकसंख्येची वाढ १० टक्के होईल असा अंदाज होता, ती वर सांगितल्याप्रमाणें साडे-अकरा टक्के वाढली. जगांतील मालाचा सांठा १९२३-२५ या काळांत होता तो १०० असें मानलें तर १९२६ अखेर १३४, १९२८ अखेर १६१, १९२९ अखेर १९२, १९३० अखेर २३५, १९३१ अखेर २६४ आणि १९३२ अखेर (बाजारांत खपेना म्हणून पुष्कळशा मालाचा विध्वंस केला गेला तरी) २६५ होता. कारखान्यांतील मालाची शिल्लक या प्रमाणांत वाढली नाहीं. पण त्याचें कारण माल खपेना म्हणून मजुरांची नोकरीवरून हकालपट्टी होऊं लागली व उत्पादन खुंटलें हें होय.

ऋणाच्या ओझ्याखालीं माणूस चिरडला

सारांश, भांडवलशाहीनें माणसाची उत्पादनशक्ति वाढवून माणसास

ऋणी करून ठेविलें ही गोष्ट कोणीहि अमान्य करणार नाहीं. युरोप, अमेरिका इतक्या लांब लांब नजर न टाकतां गरीब महाराष्ट्रांतल्या पुण्यासारख्या शहरांत १५ वर्षांपूर्वी ज्यांनीं चक्कर मारली असेल त्यांनीं आज पुन्हा एकदां फिरून पाहिल्यास गेल्या पांचशें वर्षांत बांधल्या गेल्या नसतील इतक्या नव्या इमारती आणि पूर्वीहून कितीतरी मजबूत, बांधेसूद व देखण्या बांधल्या गेल्या आहेत हें त्यांच्या सहज लक्षांत येईल. पण ही गांव, राष्ट्र, देश अशी गालफुगीची मनुष्यनिरपेक्ष भाषा सोडून जगांतील व्यक्तिमात्राच्या सुखांत, संतोषांत किती भर पडली आहे याचा विचार करतां भांडवलशाहीचें वर आपण जें ऋण म्हणून कबूल केलें त्या ऋणाच्या ओझ्याखालीं जगांतील व्यक्ति हिंदी शेतकऱ्यांप्रमाणें चिरडून गेल्या आहेत असें दिसून येतें. आणि हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांताच्या कायदेमंडळांत एकेक कायदा करून अगदीं कायदेशीर मार्गांनीं हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या कर्जाचे दस्तैवज येत्या शिमग्याच्या सणांत मुलांच्या हवालीं करणें जसें निकडीचें झालें आहे तसेंच जगांतील बहुसंख्य जनतेच्या शिरावरचें भांडवलशाहीच्या ऋणाचें ओझेंहि उतरणें अवश्य झालें आहे. माणसाची उत्पादनशक्ति भांडवलशाहीनें वाढविली खरी, पण ती अजून भांडवलवाल्यांचें जनतेवरचें ऋण या स्वरूपांतच आहे. तिचें मालकीचें धन कांहीं कोणाला करतां येत नाहीं.

जगाकडे व स्वतांच्या भोंवतालीं सहज नजर टाकल्यास हें उघड होतें. अमेरिकेची धनोत्पादनशक्ति वाढली, तेथें १२ कोटि लोकसंख्येपैकीं एक कोटि लोक बेकार होऊन उपास काढतात. म्हणजे त्यांच्यावर अवलंबणाऱ्यांसुद्धां सुमारें ३ कोट उपाशी राहतात. इंग्लंडची उत्पादनशक्ति वाढली, तेथें ३० लक्ष लोक बेकार म्हणजे ४ कोटींपैकीं १ कोट प्रजा उपाशी राहते. जर्मनींत ६ कोटींपैकीं ६० लक्ष बेकार म्हणजे २ कोट उपाशी राहतात. (जर्मनींत व इतर देशांत शस्त्रास्त्रांचे कारखाने वाढल्यानें बेकारी बरीच हटली आहे. पण यापेक्षां देशांतल्या देशांत निम्या निम्या प्रजेनें दोन पक्ष करून यादवी माजविल्यास बेकारी मुळींच राहणार नाहीं.) एक रशिया सोडला तर जगांत कोठेंहि प्रचंड प्रमाणांत बेकारी नाहीं असें नाहीं.

जे रोजगारी आहेत, धंदेवाले आहेत त्यांचीहि अशीच दीन दशा आहे. मजुरांतील चढाओढीमुळें मजुरी कमी होत आहे. माल कितीहि स्वस्त केला

तरी खपत नाहीं म्हणून दुकानदार ओरडतो आहे, आणि स्वस्त मालाच्या राशी डोळ्यांनीं पाहाव्या. पण त्या खरीदण्यास खिशांत दाम असूं नये म्हणून गिऱ्हाईक त्या मालावर आंसवें गाळीत आहे. १९२५ सालीं १०० मानलेला जगांतील मालाचा सांठा १९३२ सालीं २६४ झाला असें आपण वर पाहिलें. पण याच नेमक्या काळांत उपासमारीची भयंकर सांथ पसरावी काय? माझ्या घरीं मूळच्या १०० खंडी धान्याच्या शिलकेंत आणखी १६४ खंडींची भर पडली तर माझी उपासमार उलट वाढावी हा चमत्कार नव्हे काय? भांडवलशाहीच्या एका अंगभूत दोषामुळें हा मनुष्यघातक चमत्कार घडून येतो. अगदीं प्रथम कार्ल मार्क्सनें या दोषाचा शोध लावला व तो कसा काढून टाकावा याचें शास्त्रहि सांगितलें. हें शास्त्र म्हणजेच कम्युनिझम् होय. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावला त्यापेक्षां मार्क्सच्या या शोधाची योग्यता सहस्रपट मोठी आहे. अमेरिकेच्या शोधानें लक्षावधि रेड इंडियनांना म्हणजे अमेरिकेंतल्या मूळच्या रहिवाशांना गोऱ्या लोकांच्या घोड्याखालीं, गाड्याखालीं, बंदुकांखालीं, तोफाखालीं किड्यांसारखें मरावें लागलें. मार्क्सच्या शोधानें भांडवलशाहीच्या जुलुमांतून सुटण्याची किल्ली जगांतील बहुसंख्य समाजास आपल्या हातीं मिळाली आहे. मार्क्सचा शोध पुष्कळांना पटत नाहीं, तरी पण त्याचें कारण जगांतील बहुसंख्य जनतेला जगाच्या खऱ्या व्यवहाराचें शिक्षण न मिळाल्यानें ती अजाण आहे व भांडवलशाही गेल्यानें ज्यांचें नुकसान होणार असें मूठभर आपमतलबी लोक खऱ्या ज्ञानाचीं साधनें जनतेपासून लपवून ठेवून त्यांना भुरळ पाडतात हें आहें. आणि मतप्रसाराचीं सर्व साधनें भांडवलदारांपाशींच फक्त असल्यानें कम्युनिझम्ला अनुकूल लोकमत करून घेण्यास संधिच मिळत नाहीं. असो.

भांडवलशाहीचा अंगभूत दोष

भांडवलशाहीचा हा अंगभूत दोष कोणता हें येथें थोडक्यांत सांगतों. या विषयाची चर्चा 'समाजवादाचा ओनामा' या पुस्तकांत विस्तारानें केली आहे. पण भांडवलशाहीवरील सर्व आक्षेपांचा तो मूळ पायाच असल्यानें त्याची येथें संक्षेपतः पुनरुक्ति करतों.

आपण ज्या ज्या वस्तुजातास 'धन' असें म्हणतों त्याचे स्थूलतः दोन

प्रकार होतात, एक 'भोग्य धन'. उदाहरणार्थ आपण डाळ-तांदूळ खातों, पुस्तकें वाचतों, कपडे अंगांत घालतों, सिनेमा पाहतों; हें जें भोगकार्य आपण करीत असतों तेथें तें तें धन 'भोग्य धन' असें म्हणावें लागतें. पण आपण पुढील सालच्या बियासाठीं कांहीं धान्य बाजूस काढून ठेवतों, शेतकरी सुतारापासून नांगर, कुळव करून घेतो, त्यासाठीं बैल विकत घेतों, छापखानेवाला छापखान्याचें साहित्य आणतो, गिरणीवाला कारखान्याचीं यंत्रें बनवितो वगैरे हा सर्व धनप्रकार म्हणजे 'धनोत्पादक धनप्रकार' अथवा संक्षेपानें 'उत्पादक धन' या सदरांत पडेल. आगगाड्यांतून कांहीं लोक चैनीनें प्रवास करतात. तर दुसरे कांहीं लोक आगगाड्यांचा उपयोग धनोत्पादनाकडे करतात. म्हणून कांहीं धन हें 'भोग्य' व 'उत्पादक' या दोनहि सदरांखालीं पडेल. पण एकंदरींत सर्व धनाचे वरीलप्रमाणें स्थूलतः दोन प्रकार कल्पिण्यास त्यानें कांहीं बाध येत नाहीं. यांपैकीं भोग्य धन हें नेहमीं भोगलें जाऊन संपत राहणार व उत्पादक धनाच्या साहाय्यानें पुनःपुन्हा जें उत्पादक व भोग्य या दोनहि प्रकारचें धन निर्माण होत राहील त्यांतील भोग्य धन पूर्वी भोगून संपलेल्या धनाची जागा भरून काढणार. तसेंच उत्पादक धनहि वापरून संपत जाणार व त्याची जागा नवीन उत्पन्न होणारें उत्पादक धन भरून काढणार. जगाचा आर्थिक व्यवहार सुरळीत चालावयाचा म्हणजे उत्पादक धनानें भोग्य धन निर्मून माणसाच्या मुखीं घालावें व माणसानें उत्पादकधनाच्या साह्यानें भोग्य धन व उत्पादकधन पुनः पुन्हा गरजेप्रमाणें उत्पन्न करावें हें इष्ट होय. असें चालूं असतां माणसास उत्पादन साधनांच्या साह्यानें, त्यांची सुधारणा झाल्यामुळें, जर पूर्वीपेक्षां अधिक धन निर्माण करतां येऊं लागलें तर त्यानें वाटल्यास दुप्पट उपभोग घ्यावा किंवा वाटल्यास कामाचा वेळ निमा करावा. गेल्या वर्षी माझ्या शेतांत शंभर मण धान्य पिकलें, पण यंदा मीं खतांत सुधारणा केल्यामुळें व यांत्रिक नांगर वापरल्यामुळें २००मण धान्य पिकलें, तर गेल्या वर्षापेक्षां दुप्पट माणसें मला पोसतां येतील किंवा एक वर्षभर मी शेताची मशागत बंद ठेवीन; हें गणित ध्यानांत घेतलें असतां गेल्या १५।२० वर्षांत माणसाचें उत्पादनसामर्थ्य जें सरसकट दुप्पट झालें आहे त्यामुळें माणसाची सुबत्ता दुप्पट वाढली असली पाहिजे अथवा कामाचे तास निमे कमी झाले असले पाहिजेत. पण असें न होतां कोट्यवधि अधिक लोक रोजगारधंदा नाहीं

म्हणून उपाशीच राहत आहेत हें आपणांस दिसून येतें. असें हें गणित कां चुकावें ? 'बेकारी कां वाढली ?' असा प्रश्न भांडवलवाल्यांना केला कीं, ते म्हणतात, 'बाजारांत मालास गिऱ्हाईक नाहीं म्हणून माल पडून राहतो, म्हणून नवीन निर्माण करणें शक्य होत नाहीं, म्हणून मजूर कमी करावे लागतात व बेकारी वाढते.' 'पण बाजारांत माल पडून कां राहतो ?' असा प्रश्न विचारला असतां अर्थशास्त्रज्ञ सांगतात कीं, 'बेकारी व कमी रोजगारी यांमुळें लोकांजवळ माल खरेदी करण्याची शक्ति नाहीं, म्हणून माल पडून राहणारच.' तेव्हां माल खपत नाहीं म्हणून बेकारी माजते व बेकारी माजते म्हणून माल पडून राहतो असें हें वेडसर उत्तर आपल्या हातीं लागतें. पण या वेडांतच आपणांस हव्या असणाऱ्या शहाण्या उत्तराची किल्ली आहे. कशी तें पहा. एकदां जो पैसा-अडका मजुरी, पगार हें रूप धारण करून माल उत्पन्न करण्याचें काम करणाऱ्याच्या हातीं येतो तोच पुनः माल खरेदी करणाऱ्याची शक्ति या रूपानें मजुरांकडून, कारकुनांकडून माल विकणाऱ्या मालाच्या मालकाकडे जातो. दरम्यान अधले मधले लोक पुष्कळ असतील. पण माल निर्माण करणारा मजूर-कारकूनवर्ग मालाच्या मालकांपासून जी मजुरी, पगार मिळवितो तीच परत त्यास देऊन तो माल खरेदी करतो असें स्थूलमानानें म्हणण्यास हरकत नाहीं. मालाचा मालक सर्वच निर्माण झालेला माल विकावयास काढीत नाहीं. वर वर्गीकरण केल्याप्रमाणें मालाचा जो 'उत्पादक' प्रकार असेल तो पुढील उत्पादनासाठीं राखून ठेवून 'भोग्य' प्रकार असेल तेवढाच गिऱ्हाइकांपुढें मांडील. हा 'भोग्य' माल सगळा खपेल तरच नवीन माल उत्पन्न करणें मालाच्या मालकांस शक्य होईल हें खरें. पण तो मालाचा मालक मजूर-कारकुनांस बाजारांत उद्यां मांडल्या जाणाऱ्या भोग्य मालाच्या किंमतीइतकी मजुरी देईल तरच मजूर-कारकून गिऱ्हाईक या नात्यानें त्या सर्व मालाची खरेदी करील. यावरून मजुरी अथवा पगार श्रम करणाऱ्यांना किती मिळावा याचें माप ठरतें. श्रम करून भोग्य व उत्पादक माल निर्माण करणाऱ्यांना त्यांपैकीं भोग्य मालाची खरेदी करण्याइतकी मजुरी अथवा पगार मिळणें अवश्य आहे. उत्पादक व भोग्य माल निर्माण करणाऱ्यांची मजुरी व भोग्य मालाची किंमत हीं सारखीं असलीं पाहिजेत असें हें मजुरीचें

प्रकार होतात, एक 'भोग्य धन'. उदाहरणार्थ आपण डाळ-तांदूळ खातों, पुस्तकें वाचतों, कपडे अंगांत घालतों, सिनेमा पाहतों; हें जें भोगकार्य आपण करीत असतों तेथें तें तें धन 'भोग्य धन' असें म्हणावें लागतें. पण आपण पुढील सालच्या बियासाठीं कांहीं धान्य बाजूस काढून ठेवतों, शेतकरी सुतारापासून नांगर, कुळव करून घेतो, त्यासाठीं बैल विकत घेतों, छापखानेवाला छापखान्याचें साहित्य आणतो, गिरणीवाला कारखान्याचीं यंत्रें बनवितो वगैरे हा सर्व धनप्रकार म्हणजे 'धनोत्पादक धनप्रकार' अथवा संक्षेपानें 'उत्पादक धन' या सदरांत पडेल. आगगाड्यांतून कांहीं लोक चैनीनें प्रवास करतात. तर दुसरे कांहीं लोक आगगाड्यांचा उपयोग धनोत्पादनाकडे करतात. म्हणून कांहीं धन हें 'भोग्य' व 'उत्पादक' या दोनहि सदरांखालीं पडेल. पण एकंदरींत सर्व धनाचे वरीलप्रमाणें स्थूलतः दोन प्रकार कल्पिण्यास त्यानें कांहीं बाध येत नाहीं. यांपैकीं भोग्य धन हें नेहमीं भोगलें जाऊन संपत राहणार व उत्पादक धनाच्या साहाय्यानें पुनःपुन्हा जें उत्पादक व भोग्य या दोनहि प्रकारचें धन निर्माण होत राहील त्यांतील भोग्य धन पूर्वी भोगून संपलेल्या धनाची जागा भरून काढणार. तसेंच उत्पादक धनहि वापरून संपत जाणार व त्याची जागा नवीन उत्पन्न होणारें उत्पादक धन भरून काढणार. जगाचा आर्थिक व्यवहार सुरळीत चालावयाचा म्हणजे उत्पादक धनानें भोग्य धन निर्मून माणसाच्या मुखीं घालावें व माणसानें उत्पादकधनाच्या साह्यानें भोग्य धन व उत्पादकधन पुनः पुन्हा गरजेप्रमाणें उत्पन्न करावें हें इष्ट होय. असें चालूं असतां माणसास उत्पादन साधनांच्या साह्यानें, त्यांची सुधारणा झाल्यामुळें, जर पूर्वीपेक्षां अधिक धन निर्माण करतां येऊं लागलें तर त्यानें वाटल्यास दुप्पट उपभोग घ्यावा किंवा वाटल्यास कामाचा वेळ निमा करावा. गेल्या वर्षी माझ्या शेतांत शंभर मण धान्य पिकलें, पण यंदा मीं खतांत सुधारणा केल्यामुळें व यांत्रिक नांगर वापरल्यामुळें २००मण धान्य पिकलें, तर गेल्या वर्षापेक्षां दुप्पट माणसें मला पोसतां येतील किंवा एक वर्षभर मी शेताची मशागत बंद ठेवीन; हें गणित ध्यानांत घेतलें असतां गेल्या १५।२० वर्षांत माणसाचें उत्पादनसामर्थ्य जें सरसकट दुप्पट झालें आहे त्यामुळें माणसाची सुबत्ता दुप्पट वाढली असली पाहिजे अथवा कामाचे तास निमे कमी झाले असले पाहिजेत. पण असें न होतां कोट्यवधि अधिक लोक रोजगारधंदा नाहीं

म्हणून उपाशीच राहत आहेत हें आपणांस दिसून येतें. असें हें गणित कां चुकावें? 'बेकारी कां वाढली?' असा प्रश्न भांडवलवाल्यांना केला कीं, ते म्हणतात, 'बाजारांत मालास गिऱ्हाईक नाहीं म्हणून माल पडून राहतो, म्हणून नवीन निर्माण करणें शक्य होत नाहीं, म्हणून मजूर कमी करावे लागतात व बेकारी वाढते.' 'पण बाजारांत माल पडून कां राहतो?' असा प्रश्न विचारला असतां अर्थशास्त्रज्ञ सांगतात कीं, 'बेकारी व कमी रोजगारी यांमुळें लोकांजवळ माल खरेदी करण्याची शक्ति नाहीं, म्हणून माल पडून राहणारच.' तेव्हां माल खपत नाहीं म्हणून बेकारी माजते व बेकारी माजते म्हणून माल पडून राहतो असें हें वेडसर उत्तर आपल्या हातीं लागतें. पण या वेडांतच आपणांस हव्या असणाऱ्या शहाण्या उत्तराची किल्ली आहे. कशी तें पहा. एकदां जो पैसा-अडका मजुरी, पगार हें रूप धारण करून माल उत्पन्न करण्याचें काम करणाऱ्याच्या हातीं येतो तोच पुनः माल खरेदी करणाऱ्याची शक्ति या रूपानें मजुरांकडून, कारकुनांकडून माल विकणाऱ्या मालाच्या मालकाकडे जातो. दरम्यान अधले मधले लोक पुष्कळ असतील. पण माल निर्माण करणारा मजूर-कारकूनवर्ग मालाच्या मालकांपासून जी मजुरी, पगार मिळवितो तीच परत त्यास देऊन तो माल खरेदी करतो असें स्थूलमानानें म्हणण्यास हरकत नाहीं. मालाचा मालक सर्वच निर्माण झालेला माल विकावयास काढीत नाहीं. वर वर्गीकरण केल्याप्रमाणें मालाचा जो 'उत्पादक' प्रकार असेल तो पुढील उत्पादनासाठीं राखून ठेवून 'भोग्य' प्रकार असेल तेवढाच गिऱ्हाइकांपुढें मांडील. हा 'भोग्य' माल सगळा खपेल तरच नवीन माल उत्पन्न करणें मालाच्या मालकांस शक्य होईल हें खरें. पण तो मालाचा मालक मजूर-कारकुनांस बाजारांत उद्यां मांडल्या जाणाऱ्या भोग्य मालाच्या किंमतीइतकी मजुरी देईल तरच मजूर-कारकून गिऱ्हाईक या नात्यानें त्या सर्व मालाची खरेदी करील. यावरून मजुरी अथवा पगार श्रम करणाऱ्यांना किती मिळावा याचें माप ठरतें. श्रम करून भोग्य व उत्पादक माल निर्माण करणाऱ्यांना त्यांपैकीं भोग्य मालाची खरेदी करण्याइतकी मजुरी अथवा पगार मिळणें अवश्य आहे. उत्पादक व भोग्य माल निर्माण करणाऱ्यांची मजुरी व भोग्य मालाची किंमत हीं सारखीं असलीं पाहिजेत असें हें मजुरीचें

आवश्यक माप आहे. ही किंमत व ही मजुरी सारखीं असतील तर बाजारांत माल पडून राहिला म्हणून बेकारी वाढली व बेकारी वाढली म्हणून बाजारांत माल पडून राहिला असें वेडसर बोलणें बोलण्याची: गरज राहणारच नाहीं. असें बोलावें लागतें याचें कारण बाजारांत येणाऱ्या भोग्य मालाच्या किंमती-पेक्षां मजुरां-कारकुनांस मजुरी कमी मिळते हेंच होय.

सर्प्लस व्हॅल्यू अथवा वाढावा कसा उत्पन्न होतो

भोग्य मालाच्या किंमतीपेक्षां मजुरी जितकी कमी मिळते म्हणजे किंमतीं-तून मजुरी उणें करतां जी बाकी राहते त्यास कम्युनिस्ट शास्त्रज्ञ 'वाढावा' (सर्प्लस व्हॅल्यू) म्हणतात. खुल्या बाजारांत मालाची जी खरेदी-विक्री होते, तेथें गिऱ्हाइक व दुकानदार हे दोघे क्रयविक्रयास पूर्ण स्वतंत्र असतात व एकमेकांस सारखेच अडवूं शकतात. यामुळें माल व किंमत यांची सारखेपणानें अदलाबदल होते असें भांडवलशाही अर्थशास्त्रज्ञांचें मत असतें. मजुरांच्या बाजारांत मजूर व भांडवलदार हे एकमेकांपुढें दुकानदार व गिऱ्हाईक म्हणून उभे राहतात. मजुरांची मजुरी ही त्यांनीं निर्माण केलेल्या मालापैकीं भोग्य मालाच्या किंमतीइतकी असली पाहिजे असें आपण आतांच सिद्ध केलें. पण ती तशी असत नाहीं कमी असतें हेंहि आपण पाहिलें. मग मजुरीचा करार करण्यास बाजारांत स्वतंत्र असलेला मजूर ही कमी मजुरी कां पत्करतो, असा प्रश्न उद्भवतो. त्याचें उत्तर असें आहे, कीं भांडवलदार जेव्हां मजुरापुढें त्यास नेमून घेण्यास उभा असतो त्या वेळीं त्याच दिवशीं मजूर नेमला गेला नाहीं तरी भांडवलदाराचें चालण्यासारखें असतें. तो सधन असतो. भांडवलदारास योग्य वाटणाऱ्या मजुरीवर मजूर न आल्यास तो पगडी डोईवर ठेवून घरीं चालता होतो. पण मजूर कफल्लक असतो. त्यास त्या दिवशीं मजुरी नसल्यास फाके पडण्याची भीति असते; म्हणून तो अमुक एक मजुरी घ्याच असा हट्ट धरूं शकत नाहीं. त्या त्याच्या अडलेल्या परिस्थितीचा फायदा भांडवलदार घेऊन भावी भोग्य मालाच्या किंमतीपेक्षां कमी मजुरीवर तो मजुरास नेमतो. बाजारांत क्रयविक्रयाचें उभयपक्षांचें मानीव स्वातंत्र्य प्रत्यक्ष व्यवहारांत फक्त येथें भांडवलदारांसच राहतें मजुरास राहत नाहीं. भांडवलशाहींतील विषमतेस येथून सुरुवात होते.

बरें, भांडवलदार तरी योग्य मालाच्या किमतीहून मजुरास कमी मजुरी देऊन आपला सर्व माल खपविण्याची तजवीज कशी करतो? कारण हीच मजुरी जर खरेदीशक्ति म्हणून बाजारांत येणार तर ती सर्व माल खरेदी करूं शकणार नाहीं हें भांडवलदारांस कळत नाहीं काय? याचें उत्तर भांडवलशाहीच्या इतिहासांत सापडतें. भांडवलशाहीच्या जन्मकाळीं निरनिराळ्या धंद्यांचे संघ असत. त्यांचीं उत्पादनाचीं साधनें व संघटना मागासलेलीं होतीं. भांडवलवाल्यांनीं निरनिराळ्या मजुरांत सहकार्य सुरू करून व पुढें यंत्रें उत्पन्न करून उत्पादनसाधनें व संघटना याचें सामर्थ्य वाढविलें. यामुळें पूर्वीच्या उत्पादन-खर्चांतच अधिकाधिक उत्पन्न होऊं लागलें. यामुळें भांडवलदाराचा माल स्वस्त पडूं लागला व जुन्या धंदेवाल्यांचें गिऱ्हाईक भांडवलदारांस मिळूं लागलें. याचा परिणाम असा झाला, कीं भांडवलदारांचा भोग्य माल त्यांच्याच मजुरांनीं त्यांना मिळणाऱ्या कमी मजुरीनें अंशतः खरेदी केला तरी उरलेल्या मालास मागासलेल्या धंदेवाल्यांचें गिऱ्हाईक मिळालें, व या नव्या गिऱ्हाइकांकडून किंमतरूपानें मिळणारा पैसा भांडवलदारांस नफा म्हणून मिळूं लागला. अर्थात् तितक्या प्रमाणांत जुने धंदेवाले बुडाले व मजुरांची संख्याहि वाढली. मजूर अर्थातच चरितार्थ भागेल याहून कमी मजुरीवर कामास येणें अशक्य होतें. तेवढी मजुरी त्यांनीं घेतलीच; पण भांडवलदारानें उत्पादन-परिस्थितीच्या केलेल्या संघटनेमुळें व सुधारलेल्या उत्पादन-साधनांमुळें मजुराची उत्पादनशक्ति त्याला चरितार्थास लागेल त्याहून पुष्कळच अधिक धन निर्माण करण्याइतकी वाढली. उत्पन्न झालेल्या भोग्य धनांतून मजुरानें आपल्या चरितार्थापुरतेंच खरेदी केल्यावर (कारण त्याची मजुरी म्हणजे खरेदीशक्ति चरितार्थसंपादनापुरतीच आहे) जें उरलें (वाढावा) तें भांडवलदारानें मागसलेल्या धंदेवाल्यांच्या गिऱ्हाइकांस विकलें व या वाढाव्याची किंमत हा भांडवलवाल्यांचा नफा राहिला. या नफ्याचे जोरावर भांडवलदारानें बुडालेल्या धंद्यांतले मजूर आणखी नेमले व प्रत्येक वेळीं वाढावा विकण्यासाठीं दूरदूरचे मागसलेले धंदे बुडवून नवे नवे गिऱ्हाईक मिळविलें. हें नवें नवें गिऱ्हाईक जोंवर मिळत होतें तोंवर वाढाव्याचा माल खपत राहिला व म्हणून नवीन निर्माण होत राहिला. निरनिराळ्या भांडवलदारांची व निरनिराळ्या भांडवलदार राष्ट्रांची या कामीं स्पर्धा सुरू झाली व हें बाहेरचें

गिऱ्हाईक कायमचें आपणांसच मिळावें, म्हणून त्यांचीं युद्धें झालीं. वाढावा विकण्यासाठीं हें बाहेरचें गिऱ्हाईक मिळत राहिलें तोंवर माल पडून राहण्याचें संकट कधींच फार काल टिकलें नाहीं. पण आतां जगांत अशी वेळ आली आहे कीं, सर्व राष्ट्रांत व साऱ्या जगांत धनोत्पादक साधनांचे मालक म्हणजे भांडवलदार व त्यावर ठरलेल्या मजुरीनें राबणारे मजूर अशी जवळ जवळ साऱ्या जगांतील मानवजातीची वाटणी झाली आहे. जगांतील भांडवलदारांचा जो भोग्य माल बाजारांत येतो त्याला आतां त्यांच्या जगांतील मजुरांबाहेरचें गिऱ्हाईक उरलें नाहीं. हे मजूर त्यांना भोग्य मालाच्या किंमतीहून कमी अशी जी मजुरी मिळते तिच्याइतकाच माल खरेदी करूं शकतात. बाकीचा माल पडून राहतो. तो खपत नाहीं म्हणून नवीन निर्माण होत नाहीं व बेकारी वाढते. म्हणून परत माल खपत नाहींसा होतो व परत बेकारी वाढते आणि या भोंवऱ्यांतून मानवजात बाहेर पडूं शकत नाहीं. यासाठीं भांडवलदार राष्ट्रें दुसऱ्यांच्या प्रदेशांवर हल्ले करून दुसऱ्याचें गिऱ्हाईक मिळविण्यासाठीं झटतात व त्याचा परिणाम युद्धांत होतो. याला भोग्य मालाच्या किंमतीइतकी मजुरी देणें व भांडवलदारानें नफा मिळविण्याचें बंद करणें हाच उपाय आहे हें साध्या गणितानें कळतें. पण धनोत्पादक साधनांचा म्हणजे यंत्रें, कारखाने, जमिनी यांचा मालक जो भांडवलदार तो नफा मिळणार असल्याशिवाय या साधनांचा वापरच करूं देणार नाहीं; एखादी गोष्ट गणितानें सिद्ध होते म्हटल्यानें तो ऐकणार नाहीं. म्हणून त्याचीं धनोत्पादक साधनें समाजानें कायदेशीरपणें जप्त करणें हें सरकारचें कर्तव्य ठरतें असें कम्युनिस्टांचें म्हणणें आहे.

सारांश नफ्याच्या लोभानें भांडवलदारानें यंत्रें व शास्त्रें यांचा उपयोग करून माणसाची उत्पादनशक्ति वाढविली हें खरें. त्यामुळें मानवसमाजाचा फायदा झाला हेंहि निःसंशय. पण आज नफा मिळणें बंद होतांच भांडवलदार उत्पादक साधनें अडवून ठेवून बेकारी वाढवीत आहेत, लोकांना खायला अन्न व पांघरायला वस्त्र नसतांहि मालाची नासधूस करीत आहेत यामुळें भांडवलशाहीची विकासक्षमता संपली असून मागें दिलेल्या (पृ. ६४-६६) मार्क्सच्या 'मतसूत्रा'नुसार यापुढें भांडवलशाहींत मानवसमाजाचा विकास न होतां पीछेहाट, ऱ्हास होणार असल्यानें भांडवलशाहीचें कवच फोडून मानवसमाजानें

बाहेर पडलें पाहिजे हें मत कम्युनिझमचें सार आहे. कोंबडीच्या अंड्याचें कवच आंतल्या पिलाच्या वाढीस पुष्कळ काल अवश्य असतें. पण अंड्यांत होण्यासारखी वाढ होऊन गेल्यावर स्वतः विकास न पावणाऱ्या अंड्यांत तें पिलूं राहिल्यास तें मेल्यावांचून राहणार नाहीं; म्हणून पिलाच्या विकासासाठीं अंडें फोडून त्यास बाहेर काढावें लागतें. याच न्यायानें मानवजातीच्या विकासासाठीं त्यावरील भांडवलशाहीरूपी कवच फोडण्याची वेळ आतां आली आहे.

पण भांडवलशाही मरूं इच्छीत नाहीं

पण अंड्याचें कवच जसें निर्जीव, अप्रतिकारी असतें तशी भांडवलशाही नाहीं. तिचें इतिहासांतलें कार्य संपलें आहे व आतां तिच्या अस्तित्वापासून जगाचें नुकसान होणार आहे, पण याची भांडवलवाल्यांना पर्वा नाहीं. भांडवलवाल्यांच्या हातून आपाततः इतिहासाचें कार्य घडलें असलें—त्यांच्या हातून माणसाचें धनोत्पादनसामर्थ्य वाढलें असलें–तरी त्यांनीं हें सर्व कर्तृत्व मानवजातीची सेवा करण्याचे हेतूनें केलें नव्हतें तर नफ्यासाठीं केलें होतें. हा नफा मिळविण्यासाठीं मानवजातीच्या उत्पादनसामर्थ्याची खच्ची करण्यास ते मागेंपुढें पाहणार नाहींत, अथवा भांडवलशाहीचा शेवट करण्यासाठीं ज्यांनीं भांडवलशाहीवर हल्ला चढविला असेल त्यांच्याशीं झगडतांना मरतां मरतांहि जगाची होळी केल्यावांचून राहणार नाहींत. गेल्या महायुद्धानंतरच्या सर्व काळांत भांडवलशाही आपल्या मृत्यूशीं झगडत असून या झगड्यांत तिनें केवढें भयंकर स्वरूप धारण केलें आहे व तरीहि तिला अपयश कसें आलेलें आहे हें या काळाचें थोडेसें सिंहावलोकन केल्यास सहज समजून येतें.

वाढावा खपविण्यासाठीं बाहेरचें गिऱ्हाईक मिळविण्याच्या भांडवलवाल्यांच्या स्पर्धेंतच गेलें जगड्व्याळ महायुद्ध उद्भवून बहुसंख्य जनतेच्या दुःखाचा कळस झाला. या युद्धानंतर भांडवलशाही दोन प्रकारच्या संकटांशीं अहर्निश झगडली. महायुद्धामुळें संपत्तीचा विध्वंस इतका प्रचंड झाला होता कीं थोड्याच काळांत अन्न, वस्त्र व आश्रय यांवाचून पुष्कळशीं माणसें मृत्युमुखीं पडणार, भयंकर रोगराई पसरणार अशी भीति वाटूं लागली होती. याच वेळीं

व कांहीं अंशीं याच कारणामुळें व रशियन क्रांतीच्या स्फूर्तीनें मध्य व पूर्व युरोपांत कम्युनिझम्चें वादळ उठलें. हंगेरीमध्यें तर कम्युनिस्ट सरकारहि स्थापन झालें होतें. सारांश (१) भांडवलशाहीची नासाडी आणि (२) कामगारवर्गाचा असंतोष व उठाव अशीं भांडवलशाहीवर दोन संकटें आलीं होतीं. या दोनहि संकटांवर भांडवलवाल्यांनीं निकराचा हल्ला चढविला. पण दोनहि बाबतींत त्यांस अखेर यश आलेलें नाहीं.

कामगारांच्या असंतोषाचें संकट

रशियांत कम्युनिस्ट सरकार स्थापन झाल्यापासून कामगारवर्गाच्या असंतोषास भरतें येणार ही गोष्ट भांडवलवाल्यांस दिसून येऊं लागली होती. कांहीं अंशीं महायुद्ध आवरतें घेण्यास भांडवलवाल्यांच्या मनांतील कामगारांच्या असंतोषाची भीतिच कारण झाली होती. १८७०च्या फ्रँको-जर्मन युद्धांत फ्रान्सचा पराभव झाल्यानंतर जर्मन चॅन्सेलर प्रिन्स बिस्मार्क यानें पॅरिसमधून जर्मन सैन्याची मिरवणूक काढून फ्रेंच सैन्यापुढें नाक खाजविलें होतें. याचें उट्टें काढण्यासाठीं आतां फ्रेंच सैन्याची मिरवणूक बर्लिनमधून काढूं असे बेत फ्रेंच प्रधान क्लेमेंको हा करीत होता. कैसरला गिरफदार करून नेपोलियनप्रमाणें त्याची तरवार काढून घेऊं (नेपोलियनच्या तरवारीस खरोखर हात घालण्याची छाती अखेर कोणाहि इंग्रजास झाली नाहींच!) व एकाद्या 'सेंट हेलेना' बेटांत त्यास कैदेंत ठेवूं अशा बढाया लॉर्ड कर्झन, लॉईड जॉर्ज वगैरे मुत्सद्दी मारीत होते. पण जर्मनींत कैसरविरुद्ध बंड झालेलें पाहतांच तेथें कम्युनिझम् माजेल व त्याची आग पश्चिम युरोपांत भडकेल ही भीति फ्रेंच व ब्रिटिश भांडवलवाल्यांना वाटली व जर्मन सेनापतींच्या युद्धतहकुबीच्या मागणीस त्यांनीं फारशी घासाघीस न करतां संमति देऊन टाकली. (पुढें व्हर्सेल्स-तहानें त्यांनीं जर्मनीच्या नाड्या आवळल्या तो भाग वेगळा.) रशियाचीं शकलें पाडून भांडवलवाल्या राष्ट्रांनीं त्यांतील अफाट भौमिक धन लुटावें अशी जर्मनीची व उलट संयुक्तांचीहि युद्धाचे आरंभापासून मनीषा होती. पण युद्ध थांबण्याचे आधीं एक वर्ष रशियांत कम्युनिस्ट क्रांति होऊन कम्युनिस्टांनीं आपलें आसन बळकट करण्यास प्रारंभ केला. यामुळें रशिया वाटून खाण्यास मिळण्याऐवजीं रशियांतून कम्युनिझम्चें वादळ युरोपभर पसरणार ही नवी भीति संयुक्तांना

वाटली व त्यांनीं पैसा, दारूगोळा व सैन्य यांची मदत कम्युनिस्ट सरकार-विरुद्ध बंड करून उठलेल्या कोल्चॅक, डेनिकिन, युडेनिच्, रँगल वगैरे सेनापतींस दिली ही हकीकत मागें आलीच आहे. पण लवकरच रशियाची लांडगेतोड करण्याचें धोरण संयुक्तांनीं म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे राष्ट्रांनीं सोडलें. याचें एक कारण युरोपियन राष्ट्रांत बोल्शेव्हिझम्चें पिशाच्च भयंकरपणें रणकंदन करूं लागलें व त्यास गाडण्यासाठीं संयुक्तांना आपलें सामर्थ्य युरोपांत गुंतवावें लागलें हें होतें. रशियांत कम्युनिस्ट सरकार यशस्वी होणार असलेंच तर होवो, पण युरोपांतून ही ब्याद प्रथम गेली पाहिजे हें धोरण संयुक्तांनीं स्वीकारलें. अमेरिकेनें त्या वेळीं युरोपला जी मदत केली तिचा हेतु विशद करतांना हूव्हर लिहितो, "युद्धतहकुबी झाल्यानंतर अमेरिकेनें युरोपला जी शक्य ती सर्व मदत केली तिचा हेतु युरोपांत सैन्यानें बजबजपुरी माजवूं नये अथवा तेथें बोल्शेव्हिझम् माजूं नये हा होता." १९२५ सालीं युरोपच्या पुनर्घटनेसंबंधीं लिहितांना १९१९–१९२१ या कालांतील युरोपचें वर्णन एक ब्रिटिश लेखक सर विल्यम गूड यानें पुढीलप्रमाणें केलें आहे;—

"युरोपांत घाईघाईनें जीं नवीन राज्यें आम्हीं निर्माण केलीं तीं तगून राहण्यास भाकरीचा पुरवठा एवढें एकच साधन उपयोगीं पडलें.....निम्मा युरोप बोल्शेव्हिझम्च्या सरहद्दीवर पोंचला होता. मध्य व पूर्व युरोपला त्या वेळीं जे पावणे चौदा कोटि पौंडांचें कर्ज आम्ही देऊं शकलों तें नसतें तर अन्न व कोळसा आणि वाहतुकीचीं साधनें हीं १९१९–१९२१ या काळांत युरोपांत मुळीं उरलींच नसतीं. आणि ऑस्ट्रिया व इतर कित्येक राष्ट्रें बोल्शेव्हिक झालीं असतीं. युद्धतहकुबीनंतर या प्रदेशांत बोल्शेव्हिझम्ची कंबर मोडण्यास तब्बल अडीच वर्षें लागलीं. या कामीं जे पावणे चौदा कोटि पौंड खर्च झाले इतका पैशाचा सद्व्यय इतिहासांत कधींहि झाला नसेल."

(फॅसिझम् अँड सोशल रेव्होल्यूशन'मध्यें घेतलेला उतारा)

पण अशा प्रकारें नुसते भाकरीचे तुकडे लोकांपुढें फेकूनच बोल्शेव्हिझम् गाडण्यांत आला असें नव्हे तर फिन्लंड, हंगेरी, पोलंड या देशांत युद्धांतून परत आलेल्या व अन्न-वस्त्र नाहीं म्हणून वैतागलेल्या हजारों शेतकरी, कामकरी व सैनिक यांच्या रक्ताच्या नद्या अधिकाऱ्यांनीं वाहवून त्यांत बोल्शेव्हिझम्ची भीति बुडवून टाकली.

अर्थातच कामगारांचा असंतोष शमविण्यास दडपशाही हें एकांगी हत्यार पुरें पडणारें नव्हतें; म्हणून सोशल डेमोक्रॅटिक पुढाऱ्यांना झुलवून त्यांची मदत कामगारांचा असंतोष शमविण्यास भांडवलवाले व जमिनदार यांनीं घेतली. या धोरणानुसार सोशल डेमोक्रॅटिक म्हणजे मवाळ समाजवादी पुढाऱ्यांचा कांहीं युरोपियन राष्ट्रांतून मंत्रिमंडळांत प्रवेश झाला. कामगारांना अमुक देऊं, तमुक देऊं अशा त्यांनीं लांब लांब बाता झोकल्या व शेवटीं एकहि वचन न पाळतां फॅसिझम्चा बडगा कामगारांच्या अंगावर येऊं देण्याचे कामीं सोशल डेमोक्रॅटांनीं आपला चांगलाच उपयोग होऊं दिला.

कामगारांच्या असंतोषाच्या संकटाप्रमाणें या युद्धांत भांडवलशाहीच्या विध्वंसाचें संकट मोठें होतें. तें निवारण्यासाठीं युरोपियन सत्ताधाऱ्यांनीं अमेरिकन भांडवलवाल्यांच्या धनलोभास आळवून कोट्यवधि डॉलरांचें कर्जरूपी भांडवल युरोपांत आणलें व हळूहळू कामगारवर्गाचे तोंडांत या भांडवलाचा तोबरा अथवा लगाम घालून युरोपच्या भांडवलशाहीची घडी युद्धपूर्व काळाइतपत बसविल्याचा देखावा उत्पन्न केला. या युद्धोत्तर काळांत युरोपचें उत्पादनसामर्थ्य किती प्रचंड प्रमाणांत वाढत गेलें यांची माहिती वर दिलीच आहे. युद्धोत्तर काळांत अमेरिकेच्या कर्जाच्या पायावर युरोपची जी भरभराट झाली तिनें युरोप व अमेरिकेंतले सर्व मुत्सद्दी केवळ हुरळून जाऊन लहान मुलांप्रमाणें नाचूं लागले. प्रो० कीन्स हा ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ १९२५सालच्या एका व्याख्यानांत सांगतो,

"पंधराव्या व सोळाव्या शतकांपर्यंत जगांत सर्वत्र धनाची टंचाई (स्केअर्सिटी) होती. पुढें एकोणिसाव्या शतकाअखेर धन दुथड्यांनीं वाहूं लागलें (अबंडन्स). आतां हे दोन्हीं अतिरेक संपून सांपत्तिक स्थैर्याचा तृतीय कालखंड सुरू झाला आहे. कम्युनिझम्पेक्षां हीच परिस्थिति समाजस्थैर्यास व भरभराटीस उपयुक्त आहे."

भांडवलशाही ही मरूं घातलेली आहे हें सर्व बहुधा सोशॅलिस्टांचें ठाम मत असतें. पण ब्रिटिश सोशॅलिस्ट स्नोडन हे भरभराटीच्या देखाव्यानें इतके अंध झाले कीं, भांडवलशाही मरत आहे हें सोशॅलिस्टांचें मत आपणांस मान्य नाहीं असें त्यांनीं जाहीर केलें आणि विद्युत् व रसायन यांनीं जगाची जोरकस भरभराट होईल असा जगास आशीर्वाद देऊन टाकला. अमेरिकेंतील

सामान्य जनतेची नेहमीं कड घेणारें पत्र 'नेशन' यानें ईश्वरकृपेनें लवकरच मानवजातीचें दारिद्र्य हें पूर्णतेनें लयास जाईल अशी ईश्वराची करुणा भाकली.

भांडवलशाही धंद्यांची घडी बसली नाहीं

पण काळाच्या उदरांत वेगळेंच होतें. युरोपची उत्पादनशक्ति वाढली, अमेरिकेची उत्पादनशक्ति वाढली, युद्धानंतर जागृत झालेल्या मागसलेल्या राष्ट्रांनीं आपली उत्पादनशक्ति वाढविली व प्रत्येक राष्ट्रानें बाहेरच्या भांडवलवाल्यांचा वाढावा आपल्या देशावर चाल करून येऊं नये व स्वतांच्या देशांतील गिऱ्हाईक स्वदेशी भांडवलदारांसच राहून उलट आपल्या वाढाव्याचा माल मात्र परदेशीं विकण्यास जावा यासाठीं जकातीचे तट उभारले. मागसलेल्या राष्ट्रांप्रमाणें पुढारलेल्या राष्ट्रांनींहि जकाती उभारल्या. या सर्वांचा परिणाम मात्र असा झाला, कीं मजुरांस कमींत कमी वेतन देऊन उभ्या केलेल्या मालाच्या राशींनीं बाजार तुडुंब भरले. हा माल खपेना तेव्हां अमेरिकेचें कर्ज युरोपकडून फिटण्याची निराशा झाली व १९२९ सालीं अमेरिकन सराफकट्ट्यावर युरोपांत गुंतलेल्या अमेरिकन कर्जाच्या रोख्यांचे भाव एकदम भयंकरपणें उतरून अमेरिकन सावकारांचें कोट्यवधि डॉलरांचें एका क्षणांत दिवाळें वाजलें. अशा प्रकारें जत्रेंत घेतलेल्या लहान मुलांच्या रबरी फुग्याप्रमाणें युद्धोत्तरकालीन युरोप व अमेरिका येथील भरभराटीचा रंगीत फुगा फुगतां फुगतां अखेर तडकून फुटला व जगांतल्या भांडवलवाल्यांची फे फे उडाली. ए. एल्. रोझी या ब्रिटिश सोशॅलिस्ट लेखकास १९३१पर्यंतहि भांडवलशाहीची भरभराटच होत आहे असें वाटत होतें. भांडवलवाल्यांनीं सोशॅलिस्टांस राज्यपदावर आरूढ करून (इंग्लंडांत या वेळीं मॅक्डोनल्ड हे 'सोशॅलिस्ट'प्रधान होते) त्यांच्या सहकार्यानें आपली भरभराट करून घेतली याबद्दल रोझीनें त्यांचें कौतुक करून आतां अगदींच सहज व हळूच सोशॅलिस्ट हे भांडवलवाल्यांच्या सत्तापदावर पूर्णपणें आरूढ होतील असें भाकित केलें. भांडवलशाहीची भरभराट होत आहे हें सिद्ध करण्यासाठीं त्यानें जगप्रसिद्ध व जगभर जिच्या शाखा पसरल्या होत्या त्या स्वीडिश 'क्रूजर ॲन्ड टोल' या कंपनीच्या अहवालांतील माहितीचा हवाला दिला होता. या कंपनीचा एक संस्थापक व मालक क्रूजर हा कंपन्या काढणें व त्या धडाडीनें चालविणें या

कार्यांत 'भयंकर' यशस्वी झाला होता. आगकाड्यांच्या पेट्या हा याचा मुख्य धंदा होता. क्रूजर विश्वसंचारी होता. स्वीडनमध्यें त्याचें घर व कंपनीचें मुख्य ठाणें होतें. इंग्लंड व फ्रान्स येथें त्याचा बँकिंगचा व्यवहार होता. तो स्वतः अविवाहित असून विलासासाठीं त्यानें अमेरिकेंत कित्येक महाल बांधले होते, तेथें फुरसतीच्या वेळीं तो राहण्यास जात असे. याच्या कर्तृत्वाचे गोडवे गाणें हा जगांतल्या प्रधानमंडळांचा व भांडवलवाल्यांचा प्रघातच झाला होता. रोझीनें या प्रघातानुसार आपल्या ग्रंथांत क्रूजरचा जयजयकार केला. पण त्यानंतर दहा महिन्यांचे आंत पॅरिसमधील एका हॉटेलांत क्रूजरनें पिस्तुलानें आपलें डोकें फोडून घेतलें. या पिस्तुलाच्या आवाजानें जग बधिर व स्तंभित झालें. क्रूजरचे बहुतेक हस्तक तुरुंगांत गेले. नंतर क्रूजरच्या धंद्याची चौकशी झाली. तेव्हां त्याच्या यशाचा 'भयंकर'पणा उघडकीस आला. बाहेरून दिसणारें हें यश आंतून लांड्यालबाड्या व खोटे दस्तैवज या दारूखान्यानें ठासून भरलेलें होतें. त्यावर एक दिवस आगकाड्याच्या धंद्यांतली एक काडी पडली व जो भडका झाला, त्यांत क्रूजर मेला, त्याच्या सग्यासोयऱ्यांची अब्रू जळून खाक झाली, कोट्यवधि गोरगरिबांनीं आपले घामाचे पैसे देऊन कंपनीचे रोखे घेतले होते ते त्यांच्या पेटींतल्या पेटींत राख झाले आणि 'रोझी'चा सगळा 'गुलाब' काळवंडून त्याची करपट त्याचे हातीं पडली. फ्रान्समध्यें स्टॅव्हिस्कीनें बँकेच्या व्यवहारांत अफरातफर करून लक्षावधि गोरगरीब बुडविले. शेवटीं त्यानेंहि क्रूजरप्रमाणेंच डोकें फोडून घेतल्यावर पोलिसच्या हातीं त्याचें सर्व प्रकरण गेलें, तेव्हां प्रधानमंडळांतलीं बडीं बडीं धेंडेंहि स्टॅव्हिस्कीला सामील झाल्याचें आढळून आलें. भांडवलवाल्यांची बेअब्रू झाकण्याच्या दृष्टीनें फ्रेंच सरकारनें, पोलीसनें व कोर्टांनीं किती आटापीट केली हा इतिहास अगदींच ताजा आहे. १९२९ पासून आजतागायत मंदीच्या काळांत भांडवलवाल्यांच्या पुढाऱ्यांनीं जेवढे भयंकर गुन्हे केले व जितक्या जनतेला लुटलें तितके गुन्हे व तितकी लूट करणें मागसलेल्या हत्यारांनीं लुटालूट करणाऱ्या जगांतल्या साऱ्या दरवडेखोरांनाहि साधलें नसेल.

महायुद्धानंतर भांडवलशाहीची घडी पुनः बसविण्यासाठीं भांडवलवाल्यांनीं यंत्रांची सुधारणा व शास्त्रांची वाढ यांनीं माणसाची उत्पादनशक्ति वाढविली; पण त्याचा परिणाम फक्त वाढाव्याचा माल बाजारांत ढिगांचे ढीग

कुजत पडण्यांत झाला. यामुळें बेकारी व दारिद्र्य वाढलें, भांडवलवाल्यांचीं दिवाळीं वाजलीं. यांवर उपाय एक होता. तो हा कीं, विक्रीस येणाऱ्या मालाच्या किंमतीइतकी मजुरी श्रमजीवी वर्गास वाटावी, त्यासाठीं नफेबाजी बंद करावी व त्यासाठीं उत्पादनसाधनें हीं सरकारी मालकीचीं करावीं. पण सर्व भांडवलशाही देशांत सरकारें हीं भांडवलवाल्यांचीं आणि त्यांची लाळ घोटून राहणाऱ्या मवाळ सोशॅलिस्टांचीं राहिल्यानें सरकारनें स्वतां अशा प्रकारें भांडवलवाल्यांची धनसत्ता हिरावून घेऊन 'कम्युनिझम्' माजविणें अशक्यच होतें. भांडवलशाही राजवटीस कामगारवर्गाचा पाठिंबा मिळावा म्हणून ज्या मॅक्डोनल्ड, स्नोडन वगैरे सोशल डेमोक्रॅटिक (मवाळ सोशॅलिस्ट) पुढाऱ्यांना भांडवलवाल्यांनीं हातीं धरलें व राज्यसत्तेचे भागीदार केले त्यांनीं समाजवादाकडे सरकारी धोरणाचा कल ठेवला नाहीं इतकेंच नव्हे तर भांडवलशाहीची भरभराट खुंटणार हें दिसून येतांच भांडवलवाल्यांनीं मजूरवर्गाच्या दडपशाहीचें जें नवें धोरण फॅसिझम् या नांवाखालीं स्वीकारलें त्याचें बाल्यावस्थेंत या सोशल डेमोक्रॅट पुढाऱ्यांनीं पोषण व संवर्धनच केलें.

फॅसिझम् कसा पुढें आला

जर्मन चॅन्सेलर हिटलर, इटालियन मुख्य प्रधान मुसोलिनी, हे मध्यमवर्गीय असले तरी त्यांना बँकवाल्यांनीं व भांडवलवाल्यांनीं त्यांच्या फॅसिस्ट तत्त्वास उचलून धरण्याचें ठरविल्यावरच यश आलें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. या बँकवाल्यांना युद्धोत्तर कालांत भांडवलशाहीची संघटना कशी मजबूत राहील याची काळजी होती. मालाचे ढिगारे संपत नाहींत म्हणून नफा आटत चालला होता. बेकारी, रोजगारीची अनिश्चिति आणि मजुरीची घट यांनीं कामगारांचा असंतोष भडकत होता. आणि रशियन क्रांतीचें उत्तेजन व कम्युनिस्ट पुढाऱ्यांचें संघटनासामर्थ्य यांनीं कामगारांत संघटना व लढाऊ सामर्थ्य वाढत होतें. या कामगारांना झोडपून काढतां येईल असें एकादें राज्यतंत्र बँकवाल्यांना हवें होतें. शास्त्रीय व यांत्रिक शोध जसे शास्त्रज्ञांनीं व कामगार-कारागिरांनीं लावले आणि भांडवलवाल्यांनीं फक्त त्यांवर नफा मिळविला त्याप्रमाणें कामगारांना दडपून क्रांतीचा बीमोड करण्याचें फॅसिस्ट तत्त्व मध्यमवर्गीय पुढाऱ्यांनीं या बँकवाल्यांना दिलें व त्याचा त्यांनीं उपयोग

करून भांडवलशाही मजबूत करण्याचा प्रयत्न केला. जर्मनींत हिटलरच्या नाझी ऊर्फ फॅसिस्ट पक्षास मदत कां करावी याचा खुलासा करण्याकरितां जर्मन बँकवाल्यांनीं एक गुप्त पत्रक सर्व जर्मन कारखानदारांकडे पाठविलें होतें. त्यावरून फॅसिझम्‌ची फलश्रुति, भांडवलवाल्यांनीं त्याला पाठिंबा देण्याचें कारण व मवाळ सोशॅलिस्टांचा भांडवलवाल्यांना होणारा उपयोग हीं स्पष्ट होतात. म्हणून पामी डट्ट यांनीं 'फॅसिझम् ॲन्ड सोशल रेव्होल्यूशन' या आपल्या ग्रंथांत या पत्रकांतले जे उतारे दिले आहेत त्यांतले कांहीं येथें देतों.

सोशल डिमॉक्रसी व फॅसिझम् यांचा भांडवलशाहीस उपयोग

सदर पत्रकाचा लेखक लिहितो, "आजच्या युद्धोत्तर काळांत जर्मन भांडवलवाल्यांची पुनर्घटना करावयाची असेल तर त्यासाठीं कामगार-चळवळींत फूट पाडली पाहिजे. कारण समाजाच्या खालच्या थरांतून जी कामगार-चळवळ वर येते ती एकजूट राहिल्यास केवळ्याहि लष्करी बळाच्या जोरावर भांडवलवाल्यांस राज्य करतां येणार नाहीं.

"युद्धोत्तर कालीन जर्मनींत जे भांडवलवाले आहेत ते केवळ स्वतःच्या बळावर देशांतील आर्थिक संघटना तोलून धरण्यास असमर्थ आहेत. या आर्थिक संघटनेचें नियंत्रण सैन्यबलावर ते करूं म्हणतील तर त्यांत फारच धोका आहे. यासाठीं भांडवलदारांनीं असा एक थर, आपल्या वर्गांतला नव्हे तर इतर वर्गांतला, आपल्या मदतीस मिळविला पाहिजे, कीं जो सामान्य जनतेंत भांडवलशाहीचें चाक बसवून व आपल्या मानेवर भांडवलशाहीच्या गाड्याचें जोखड घेऊन तें ओढील.

"युद्ध संपल्याबरोबर जर्मनींत जी पुनर्घटना झाली त्या वेळीं देखाव्याचे राज्यकर्ते म्हणजे भांडवलशाहीचें जोखड वाहणारे प्रमुख असें 'सोशल डेमोक्रॅट्स्' हेच होते..... १९२४–१९३० या कालांत कामगारचळवळींत जी फूट पाडतां आली ती सोशल डेमोक्रॅटांच्या पगारवाढीच्या व सामाजिक सुधारणेच्या धोरणामुळेंच पाडतां आली. याच मार्गांनीं 'सोशल डेमोक्रॅट' पुढाऱ्यांनीं कामगारक्रांति दडपून टाकली. 'सोशल डेमोक्रॅट्स्' हे मूळचे कामगारपुढारी; यामुळें त्यांचा नुसता राजकीय दृष्ट्याच आपणास उपयोग झाला असें नव्हे तर संघटित कामगारवर्गाचा टिकाऊ व बहुमोल पाठिंबा

त्यांनीं भांडवलवाल्यांच्या राज्यसत्तेस मिळवून दिला. त्यांनीं क्रांतीचें वादळ शमविलें इतकेंच नव्हे तर कामगारवर्गास भांडवलशाही राज्ययंत्रास कायमचें जखडून टाकलें."

या धोरणानें कामगारचळवळींत फूट कशी पडली तें सांगतांना हा लेखक म्हणतो, "मजुरीची वाढ व सामाजिक सुखसोईंची वाढ यांचा मजुरांच्या बाजारांत माजलेल्या मंदींत व बेकारींत धरणाच्या बांधासारखा उपयोग झाला. जे रोजगारीवर असणारे संघटित कामगार होते त्यांना वाढत्या दराच्या मजुरीची मेजवानी मिळे. जे पूर्ण बेकार अथवा अनिश्चितपणें रोजगारी मिळणारे बेकार असत त्यांना अशी सुखकारक परिस्थिति नव्हती."

संघटित रोजगारवाले साहजिकच या भणंग बेकारांना तुच्छ लेखून त्यांपासून फटकून राहत. यामुळें कामगारांचा संघटित विरोध भांडवलशाहीस कधींच झाला नाहीं. कामगारांतील ही बेकी मोडणें हें कम्युनिस्टांचें ध्येय होतें. पण त्यांस सोशल डेमोक्रॅट पुढाऱ्यांनीं तें कधींच साधूं दिलें नाहीं असें सर्टिफिकेट हा लेखक या पुढाऱ्यांस देतो. हें पत्र १९३२ सालीं लिहिलें आहे. त्या वेळीं भांडवलशाहीचें संकट निकरावर आलें होतें. कांहीं मजुरांना वाढता पगार देऊन कामगार संघटनेचीं शकलें करणें येथवर शक्य झालें तरी यापुढें तें न चालून सर्वच मजुरांचे पगार कमी करणें भाग होतें. यामुळें कम्युनिझमची भीति पुन्हा उद्भवली व आतां त्यावर वेगळा उपाय सुचविणें जरूर झालें. त्यासंबंधीं हा लेखक सदर पत्रकांत पुढें लिहितो,

"ज्या आर्थिक संक्रमणांतून हल्लीं आपण चाललों आहों त्यांतील आर्थिक मंदीमुळें पगारवाढ व सुखसोई कोणाहि कामगारांना देणें अशक्यच आहे... यामुळें कामगारांतील बेकी मोडून—त्यांचेमधील धरण फुटून—त्यांचें ऐक्य होईल व कम्युनिझम् दडपण्यासाठीं भांडवलवाल्यांना लष्करशाही माजवावी लागेल. पण लष्करशाहीच्या वर्चस्वाचा रोग भांडवलशाहीच्या अंगांत शिरला कीं तो नाहींसा होणारच नाहीं. म्हणून या संकटांतून निभावण्यासाठीं पुन्हा कामगारांत फूट पाडणें हाच उपाय आपणांस करणें इष्ट असून ही बेकी प्रत्यक्षपणें घडवून आणणारें एकादें राज्यतंत्र हातीं घेतलें पाहिजे."

या ठिकाणीं भांडवलवाल्यांना लष्करशाहीचा किती तिटकारा असतो हें दिसून येते. कामगारांना दडपण्यासाठीं सैनिकांची त्यांना गरज असते. पण

भांडवलशाहीच्याच डोकीवर लष्करशाहीनें मिरे वाटावे हें त्यांस योग्य वाटत नाहीं. लष्करशाही व भांडवलशाही यांमधील या इतिहासप्रसिद्ध दुहीचा फायदा कामगारवर्ग संघटित असल्यास त्यास उत्तम प्रकारें घेतां येतो. युद्धतहकुबीनंतर जर्मन लष्करशाहीनें राज्यसत्ता बळकावण्याचा डाव योजला होता. पण कामगारांनीं संप करून व वाहतूक बंद पाडून सैनिकांचा प्रयत्न गर्भांत असतांच ठार केला. पण पुढें भांडवलवाल्यांचें जोखड मात्र कामगारांस झुगारून देतां आलें नाहीं. रशियांत केरेन्स्कीविरुद्ध कॉर्निलोव्हनें बंड केलें तें कामगारांनीं मोडून पाडलें. पण रशियन कामगार संघटित असल्यानें त्यांनीं ज्या हत्यारांनीं कॉर्निलोव्हचें मनोराज्य पोखरून धुळीस मिळविलें त्याच हत्यारांनीं पुढें केरेन्स्कीचें सिंहासनहि पोखरून ठेवलें व शेवटीं वेळ येतांच तें फुंकरासरशीं मोडून पडून केरेन्स्कीचा हिरमोड झाला; असो.

वर दिलेल्या परिच्छेदाशेवटीं कामगारसंघटना दुभंगण्यासाठीं नवें राज्यतंत्र हवें असें त्या लेखकानें म्हटलें आहे. तें कोणतें तें तो पुढीलप्रमाणें सांगतो. तो म्हणतो,

"हें कार्य नॅशनल सोशॅलिस्ट (नाझी अथवा फॅसिस्ट) पक्ष घडवून आणील. ...नोकरशाहीशीं म्हणजे राज्यसंस्थेशीं सोशल डेमॉक्रसीला जुंपण्यास पार्लमेंट जिवंत ठेवणें अवश्य असतें... पण पार्लमेंट ठेवावयाचें तर कामगारांचे वाढते पगार व सुखसोई कायम ठेवल्या पाहिजेत. त्या बंद करणें तर आतां भाग आहे, म्हणून मग पार्लमेंटहि बंद केलें पाहिजे व त्यासाठीं सोशल डेमॉक्रसीचा नाद सोडला पाहिजे."

पार्लमेंट व सोशल डेमॉक्रसी हाणून पाडणें, कामगारसंघ दडपून टाकणें हें सोशल डेमोक्रॅट म्हणजे नाझी ऊर्फ फॅसिस्ट पक्षाचें ध्येय असल्यानें याच पक्षाचा आतां आपण उपयोग करून त्याचे मानेवर भांडवलशाहीचें जोखड ठेवलें पाहिजे असें या लेखकाचें म्हणणें आहे. अर्थात् काळ बदलल्यामुळें यापुढें सोशल डेमॉक्रसी उपयोगी पडणार नसली तरी आज फॅसिझमनें जें साधणार आहे तेंच सोशल डेमॉक्रसीनें यापूर्वी साधलें असें हा लेखक कृतज्ञतापूर्वक पुढील उताऱ्यांत सांगतो आहे. तो म्हणतो,

"सोशल डेमोक्रॅट्स् व फॅसिस्ट या दोन्ही पक्षांच्या कर्तृत्वाचें समांतरत्व (पॅरलेलिझम्) खरोखर चित्तवेधक आहे. १९१८ ते १९३० पर्यंत सोशल

डेमोक्रॅटांनीं पूर्वीची समाजव्यवस्था (कैसरशाही-भांडवलशाही) खणून काढली—तशीच आजचे नॅशनल सोशॅलिस्ट त्यांचेपूर्वीची समाजव्यवस्था (सोशल डेमॉक्रसी—भांडवलशाही) खणून काढीत आहेत. पण सोशल डेमोक्रॅट् पक्षानें जुनी समाजव्यवस्था खणून काढल्यावर कामगारांना वचन देऊन जाहीर केलेली क्रांति घडवून न आणतां भांडवलशाही राज्याची पुनर्घटना केली त्याप्रमाणें हा नॅशनल सोशॅलिस्ट पक्षहि आज बोलत असलेली क्रांति घडवून न आणतां भांडवलशाही राज्यसंस्थेची पुनर्घटनाच करणार आहे. सोशल डेमोक्रॅट् पक्षाचा पुढारी एबर्ट व नॅशनल सोशॅलिस्ट पक्षाचा पुढारी हिटलर या दोघांत साम्य दाखविण्याचा जो प्रयत्न होतो तो कांहीं उगीच नव्हे. दोघांनींहि भांडवलशाहीच्या गुलामगिरींतून सुटण्याच्या भावनेची री ओढली. दोघांनींहि 'सामाजिक' (सोशल) अथवा 'राष्ट्रीय' (नॅशनल) लोकसत्तेचें वचन दिलें. आणि सोशल डेमोक्रॅट् पक्षानें अखेर ज्याप्रमाणें जर्मनींत भांडलवाल्यांचें राज्य उचलून धरलें त्याप्रमाणें नॅशनल सोशॅलिस्ट ऊर्फ फॅसिस्ट-पक्षहि भांडवलशाही सत्तेलाच उचलून धरणार आहे."

भांडवलशाहीला उचलून धरण्याचे सोशल डेमोक्रॅट् पक्षाचे व नॅशनल सोशॅलिस्ट ऊर्फ फॅसिस्ट पक्षाचे मार्ग एकच नसतात हें खरें आहे. फॅसिस्ट पक्ष कामगारसंघटनांवर सरळ हल्ला करून ती नेस्तनाबूत करतो व सर्व राष्ट्र हें एकमुखी असलें पाहिजे ही घोषणा जनतेपुढें मांडतो. उलट सोशल डेमोक्रॅट पक्ष स्वतंत्रपणें कामगारसंघटना करतो, कार्ल मार्क्सचें कामगारक्रांतीचें ध्येय कामगारांपुढें ठेवतो, कामगारसंघटनांना एका शिस्तींत संभाळतो, पण या शिस्तीचा उपयोग भांडवलशाही जगवून कामगारांना लढाऊ चळवळीपासून परावृत्त करण्याचे कामीं करतो. " यामुळें साधनांत भिन्न असलेले हे दोन पक्ष मक्तेदारी भांडवलशाहीचे सारखेच हस्तक बनतात. दोघेहि कामगारचळवळ दुर्बल करून कामगार व भांडवलदार यांचे दरम्यानचा वर्गकलह दडपून टाकतात."

सोशल डेमोक्रॅट पक्षानें काय केलें

फॅसिस्ट धोरणाचें सोशल डेमोक्रॅट पक्षांनीं म्हणजे मवाळ सोशॅलिस्टांनीं युद्धोत्तर काळांत पोषण व संवर्धन केलें या म्हणण्यास युरोपीय सोशल डेमोक्रॅटिक पक्षांचा युद्धोत्तर इतिहास हाच साक्ष आहे. भांडवलशाहीमागून

कामगारसत्ताक लोकशाही निर्माण व्हावी हें मार्क्सचें तत्त्व त्यांनीं सोडलें नव्हतें. पण त्यासाठीं भांडवलशाहीचा नाश प्रथम केला पाहिजे हें मार्क्सचें तत्त्व मात्र त्यांनीं सोडलें. उलट भांडवलशाहीशीं कामगारवर्गाचे हितसंबंध अभेद्य आहेत व भांडवलशाहीच्या नाशांत कामगारांचाहि नाश होईल असें प्रतिपादन त्यांनीं सुरू केलें. याही पुढें जाऊन "भांडवलदारांचें धनरूपी भांडवल व कामगारांचें श्रमरूपी भांडवल यांच्या सहकार्यानेंच भांडवलशाही उभारली आहे" असें गोंडसपणें म्हणणारे व भांडवलशाही ही भांडवलदार व कामगार यांची एक सहकारी संस्था आहे असें सुचविणारे जनतेचे पुढारी हिंदुस्तानांत आहेत याची वाचकांस येथें आठवण होईल. पण तें असो. आपण हिंदुस्तानाखेरीज बाकीच्या जगासंबंधीं बोलत आहों. एक जर्मन सोशल डेमोक्रॅट पुढारी सांगतो,

"कामगारवर्ग भांडवलशाहीचाच एक अवयव आहे हें कधींहि विसरतां कामा नये. भांडवलशाही उलथून पडली तर तीबरोबर मजूरवर्गहि कोलमडून पडल्यावांचून राहणार नाहीं." पण भांडवलशाही जर उलथून पाडावयाची नाहीं तर एकंदर जनतेची प्रगति कशी होणार? या शंकेचें उत्तर हा लेखक लगेच देतो. तो सांगतो,

"आणि म्हणून कामगारांचें ऐतिहासिक कर्तव्य हें, कीं त्यांनीं भांडवलशाहीच्या व्यवस्थेंतच आपली जागा आंखून घ्यावी व त्या योगें सर्व समाजघटनेची सुधारणा करावी. भांडवलशाहीची सुधारणा होत असतां कामगारवर्गाचीहि सुधारणा होतच असते."

कावळा मोराचीं पिसें लावून आपण मोर झाल्याचा डौल मिरवितो त्याप्रमाणें भांडवलवाल्यांनीं सोशॅलिस्ट मंत्र्याकरवीं घडविलेल्या कोणत्याहि योजनेस 'सोशॅलिस्ट' म्हणून मिरविण्याची सोशल डेमोक्रॅट पुढाऱ्यांची रीति असते. संपत्तिसाधनें 'सरकारी' मालकीचीं करणें हें सोशॅलिस्टांचें ध्येय आहे. पण तें 'सरकार' पूर्ण लोकशाहीप्रधान म्हणजे शेतकरी-कामकरी यांचें असलें पाहिजे. हिंदुस्तानांतल्या एकाद्या संस्थानिकानें त्या संस्थानांतले कारखाने सरकारी मालकीचे केले तर त्याला सोशॅलिझम् म्हणतां येईल काय? सरकार पूर्णपणें भांडवलवाल्यांचे हातीं ठेवून भांडवलवाल्यांनीं आपसांतील चढाओढ थांबवावी व मोठमोठ्या धंद्यांचे ट्रस्ट करून ते सरकारच्या

म्हणजे भांडवलवाल्या वर्गाच्या नियंत्रणांत किंवा मालकींत आणावे हे सध्यांच्या साम्राज्यशाही काळांतलें भांडवलवाल्यांचें मुख्य धोरण असतें. फॅसिझम्चें तर तें एक प्रमुख सूत्र आहे. भांडवलवाल्यांच्या या धोरणानुसार इंग्लंडांत मॅक्डोनल्ड यांचें मजूर मंत्रिमंडळ अस्तित्वांत असतां लंडन पॅसेंजर ट्रॅन्स्पोर्ट बिल पार्लमेंटांत आलें. लंडनमधील प्रवासांच्या साधनांची संघटना करून ठराविक दरानें त्यांची ने-आण करावी व सरकारनें या साधनांची वहिवाट करावी अशा आशयाचें हें बिल होतें. त्या वेळचे मजूर वाहतूकमंत्री मि. मॉरिसन हे 'हा आम्हीं सोशॅलिझम् आणला पाहा' म्हणून मजूर सभासदांस फुशारकीनें सांगत होते व भांडवलवाल्यांना खिजवीत होते. पण भांडवलवाले गालांतल्या गालांत हसले. हें बिल निकालांत निघण्यापूर्वी मजूर मंत्रिमंडळ गडगडलें. मॅक्डोनाल्डनीं टोपी उपडी करून तींतून 'राष्ट्रीय' सरकार बाहेर काढलें. आणि या 'राष्ट्रीय' ऊर्फ कॉंझर्वेटिव्ह सरकारनें मॉरिसन यांचें 'सोशॅलिस्ट' बिल पास केलें. त्या वेळीं लंडन टाइम्स लिहितो " वाहतुकीची वहिवाट चालविणें व दर ठरविणें याचा कायदेशीर मक्ता सरकारकडे आला हें खरें. त्या दृष्टीनें पार्लमेंटचें थोडेंसें नियंत्रण धंद्यावर येणार हेंहि खरें. पण धंद्यांची मालकी पूर्णपणें खाजगीच आहे सार्वजनिक नाहीं. मिळणाऱ्या नफ्यांतून सरकारनें कारभारखर्च घ्यावा व उरलेला नफा डायरेक्टर बोर्डाकडे पाठवावा अशी केवळ हमाली करण्याचें काम सरकारनें लोकांच्या सोईसाठीं आपणाकडे घेतलें होतें." आणि या हमालीस मॉरिसन सोशॅलिझम् म्हणत होता. याच अर्थानें भांडवलशाही अंशतः मजुरांच्या मालकीची होऊं शकेल हें सरळच आहे. या अर्थानें गांवांतले म्युनिसिपालिटीचे रस्तेहि कचरा काढणाऱ्या महारांच्या मालकीचे असतात.

१९१८च्या जानेवारींत जर्मनींत कामगारांनीं संप केले तेव्हां सोशल डेमोक्रॅट पुढाऱ्यांनीं संपवाल्यांचें पुढारीपण स्वतःकडे घेऊन संपफोड्यांचें काम केलें अशा एबर्ट व शीडमॅन यांनींच मागून कबूल्या दिल्या. इंग्लंडांतील १९२६च्या सार्वत्रिक संपाची रडकथा अशीच आहे. " सार्वत्रिक संप झाला नसता तरी अनेक अनधिकृत संपांनीं धंदे मोडकळीला आलेच असते "

असें मॅक्डोनल्डनें या सार्वत्रिक संपाचें मागाहून समर्थन केलें. हा संप करूं नये असें जे. एच्. थॉमस याचें मत होतें. "पण तरीहि तुम्ही संपकमिटीवर कां राहिला?" असा प्रश्न त्यास मागाहून विचारण्यांत आला. "मी कमिटीवर राहण्यानेंच अधिक फायदा होईल" असें त्यानें उत्तर दिलें. शेवटीं हा संप कां फसला याची चिकित्सा करतांना कॉझर्वेटिव्ह सरकारचा गृहमंत्री जॉन्सन हिक्स यानें सोशॅलिस्ट पुढाऱ्यांची पाठ थोपटून सांगितलें, कीं "जबाबदार कामगारसंघ-पुढाऱ्यांनीं आपलें वजन संपवाल्यांवर कायम ठेविलें आणि सार्वत्रिक संप हा बेकायदेशीर आहे ही गोष्ट मान्य करून सनदशीरपणा संभाळण्यासाठीं संप थांबविला." १९२४ सालीं झिनोव्हिफच्या सहीचें खोटेंच पत्र इंग्लंडमध्यें प्रसिद्ध करून कॉझर्वेटिव्हांनीं मजूरसरकार बोल्शेव्हिझम् माजविणार अशी इंग्लंडांत हूल उठविली. बोल्शेव्हिझम्च्या प्रसाराचा 'घाणेरडा' आरोप मॅक्डोनल्ड कसा स्वीकारणार? त्यानें चवताळून जाहीर केलें "बोल्शेव्हिझम्च्या प्रतिकारार्थ लिबरलांनीं अथवा टोरींनीं कांहींहि केलें नाहीं. सगळें कार्य मजूर-पुढाऱ्यांनींच केलें आहे." खरेंच, हिंदुस्तानांतील शेतकऱ्यांची व मध्यम वर्गाची राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ ज्या मॅक्डोनल्डनें दंडुक्यांनीं बंडविली, ज्यानें भांडवलशाहीच्या रक्षणासाठीं, आयुष्यभर जपलेली सोशॅलिझमची जपमाळ तोडून टाकून, बाल्डविनच्या गळ्यांत मिठ्या मारल्या तो मॅक्डोनल्ड बोल्शेव्हिझमचा पुरस्कार करील हें शक्य आहे काय? त्याच्या सुदैवानें पुढें झिनोव्हिफचें पत्र खोटें ठरून मॅक्डोनल्ड याचें तोंड उजळ झालें. पामी डट्ट लिहितो,

"या प्रकारें कामगारचळवळ पुनः पुन्हा व ठळकपणें आंतून फोडून काढून सोशल डेमोक्रॅट् पुढारी ती दुर्बल करतात. लढाऊ कार्यक्रमाचे बाबतींत कामगारांना नाउमेद करतात. यामुळें फॅसिझम्चा रस्ता मोकळा होतो. .....कामगार-संघटना मोडावी, संप फोडावे, वर्गयुद्धाचा धिक्कार करावा, कायद्यानें चाला व भांडवलवाल्यांवर विश्वास ठेवा असें कामगारांना शिकवावें, लढाऊ कामगारांना व पुढाऱ्यांना शिस्तीच्या नांवाखालीं संघटनेंतून हाकून लावावें, कामगारसंघ, कामगारसंघटना मोडून टाकाव्या;—या मार्गांनीं सोशल डेमोक्रॅट्स हे फॅसिस्टांना राज्यावर आणतात. .....युद्धोत्तर काळांत भांडवलशाहीची वाढ जसजशी होत गेली तसतशी भांडवलशाही राज्ययंत्रास

व भांडवलशाहीच्या अनियंत्रित सत्तेस सोशल डेमोक्रॅट पुढाऱ्यांनीं अधिकाधिक बळकटी आणली." (फॅसिझम् ॲन्ड सोशल रेव्होल्यूशन)

हंगेरी, बल्गेरिया, पोलंड, स्पेन या सर्व देशांत सोशल डेमोक्रॅट पक्षांनीं लष्करशाही-भांडवलशाही-सरंजामशाही अशा मिश्र प्रधानमंडळांत जागाहि मिळविल्या व सरकारचें प्रतिक्रांतिकारक धोरणच पुढें चालविलें. स्पेनमधील शेतकरीकामगाऱ्यांचा पुढारी काबारेल्लो हा सोशल डेमोक्रॅट पुढारी असून प्रायमो डी रिव्हेराच्या सुलतानी कारकीर्दीत त्याचा प्रिव्ही कौन्सिलर झाला होता अशी माहिती पामी डट्ट देतो. गेल्या जुलैच्या फॉरिन अफेअर्समधील स्पेनसंबंधींच्या लेखांत काबारेल्लो हा मवाळ असून, कामगार आपल्या वर्चस्वाखालून जातील एवढ्या भीतीनेंच त्यांच्या चढाईच्या धोरणास पाठिंबा देतो असें म्हटलें आहे. पण हल्लीं येणाऱ्या बातम्यांवरून काबारेल्लो कामगारांचें पुढारीपण चांगल्या प्रकारें करीत असल्याचें दिसत असून स्वतः कम्युनिस्ट नसतांहि सोशल डेमॉक्रसीचीं तत्त्वें इमानेंइतबारें पाळून तो कामगारचळवळीची हळू हळू सोशॅलिझमकडे प्रगति करीलहि. युरोपांतल्या इतर सोशल डेमोक्रॅट्सनीं जाणून अथवा न जाणून चूक केली ती ही, कीं भांडवलशाहीच्या अमदानींत यापुढें मानवजातीचा विकास होणें अशक्य आहे असें मानलें नाहीं, भांडवलशाही हळूहळू मोडून का होईना, पण कामकरी व शेतकरी यांच्या हातीं राज्यसत्ता व धनसत्ता न देतां, म्हणजे धनोत्पादक साधनें हळूहळू सार्वजनिक मालकीचीं न करतां नफेबाजी म्हणजे भांडवलशाही जगविण्यासाठीं कामगारांना दडपून टाकण्यास भांडवलशाहीस मदत केली व तेंच कार्य फॅसिस्टांना अधिक निकरानें पुढें चालवूं दिलें. राज्यसत्ता व धनसत्ता यांचें केंद्र भांडवलदारांकडून कामकरीशेतकऱ्यांकडे खेचण्याचें कार्य न करतां सोशल डेमोक्रॅट्स हे प्रधानमंडळांत राहतील तर त्यांस फॅसिझमला वाट करून देण्यावांचून गत्यंतर कसें राहत नाहीं हें युरोपचा हा युद्धोत्तर इतिहास व रशियाचा १९१७च्या फेब्रुवारी ते ऑक्टोबर या काळांतला इतिहास स्पष्टपणें शिकवितो.

मुसोलिनीची जगास देणगी

युद्धोत्तर काळांत १२ वर्षेपर्यंत कामगारचळवळ दडपण्यास मदत करून ज्या सोशल डेमोक्रॅट पक्षांनीं फॅसिस्टांना उत्तेजन दिलें त्या फॅसिस्टांनीं जनतेला

काय देऊं केलें व काय दिलें तें पहा. फॅसिझमचा मूळ आचार्य इटालीचा मुख्य प्रधान मुसोलिनी. याचा फॅसिस्ट कार्यक्रम काय होता तें मुसोलिनीचा एक हस्तक व फॅसिझमचा अधिकृत प्रचारक पुढीलप्रमाणें सांगतो—

राजाची सत्ता, वरिष्ठ कायदे-मंडळ म्हणजे सीनेट, व सरदारवर्ग रद्द करणें.
प्रजासत्ताक स्थापणें; त्यासाठीं सार्वत्रिक मताधिकाराच्या तत्त्वावर कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली म्हणजे घटना-परिषद बोलाविणें. ही घटना-परिषद आंतरराष्ट्रीय जागतिक घटनापरिषदेचा एक विभाग आहे असें मानणें.
जागतिक शस्त्रसंन्यास; सक्तीचें लष्करी शिक्षण रद्द करणें.
युद्धांतील नफा जप्त करणें. भांडवलावर भारी कर लादणें.
धर्ममंदिरांची मिळकत रद्द करणें.
रोख्यांचा सराफकट्टा बंद करणें. मर्यादित भांडवलाच्या कंपन्या बंद करणें.
शेतकऱ्यांना जमिनी देणें.

आतां यांतला कार्यक्रम मुसोलिनीनें किती अमलांत आणला आहें पहा. राजा शिल्लक आहेच. प्रजासत्ताक, सार्वत्रिक मताधिकार, घटनापरिषद वगैरे कांहींहि अमलांत आलेलें नाहीं. सक्तीची लष्करी नोकरी जारी असून शास्त्रास्त्रांची वाढच झाली आहे. धर्ममंदिरांची मिळकत कायम आहे. युद्धांतला नफा जप्त झाला नाहीं. रोखेबाजार व मर्यादित भांडवली कंपन्याहि आहेत. शेतकऱ्यांना जमिनी द्यावयाच्या म्हणजे दुसऱ्या कोणाच्या तरी काढून घेतल्या पाहिजेत. पण इटालियन जमिनदार कांहीं जमिनी सोडावयास तयार नाहींत. यामुळें हबसाण जिंकून घेतला असून तेथल्या जमिनी शेतकऱ्यांना देण्याचा विचार चालू आहे. कारखान्यांची वहिवाट कामगारांकडे आली नसून भांडवलवाल्यांच्या संघाच्या हातीं आहे. लोकमतास आकर्षक वाटेल असा कार्यक्रम प्रथम मुसोलिनीनें आंखला. महायुद्धानंतर इटालींत कामगारांत भयंकर असंतोष माजून कम्युनिझमची भीति उत्पन्न झाली. त्या वेळीं वर दिलेला कार्यक्रम मुसोलिनी आपल्या पत्रांतून पुकारूं लागला. १९२२च्या ऑक्टोबर १० रोजीं त्यानें कांहीं स्वयंसेवक व सहा लष्करी अधिकारी यांचेसह रोमवर 'चाल' केली व राज्यसत्ता आपण जिंकणार आहों असें जाहीर केलें. सेनापतींनीं लष्करी कायदा पुकारून हें बंड दडपून टाकण्याची राजा व्हिक्टर इमॅन्युअल याजकडे परवानगी मागितली. इटालीचा

हा राजा फारच धूर्त व चाणाक्ष आहे असें त्याच्या या वेळच्या वर्तनावरून आज लक्षांत येतें. मुसोलिनी मूळचा सोशॅलिस्ट, उत्तम वक्ता व लेखक होता. युद्धांत तो शौर्यानें लढला होता हें सर्व राजास माहीत होतें. पण त्याचा सोशॅलिझम् बेताबाताचा आहे हें राजानें ताडलें व या कर्तबगार पुरुषास चंडखोर ठरविण्यापेक्षां मुख्य प्रधानच करावें असें ठरवून त्यानें त्याला भेटीस बोलाविलें व प्रधानकीचीं वस्त्रें त्याचे अंगावर घातलीं. राजाच्या अंदाजाप्रमाणें मुसोलिनीनें आपला सर्व कार्यक्रम केराच्या टोपलींत टाकला व कामगारांचा असंतोष दडपून टाकण्यासाठीं सगळी लष्करशाही कामगारांच्या अंगावर घातली. तेव्हांपासून गेलीं १३ वर्षें मजुरांस भरडून काढून फक्त साम्राज्यवाढीच्या तयारींत तो आहे. त्याप्रमाणें ऑक्टोबर (१९२५) पासून मे १९३६पर्यंत त्यानें इटालीच्या तिप्पट मोठा असा अबिसीनिया घशाखालीं घातला आहे. साम्राज्यशाही वाढविणें हेंच त्याचें ध्येय आहे. साम्राज्यशाहीनें जगावर आजच केवढें संकट आणलें आहे हें ज्यांना समजतें त्यांची, यापुढें हें फॅसिस्ट दैत्य काय काय आकांत करतील याला अंत नाहीं अशी, खात्री झाली आहे. बहुसंख्य समाजास पिळून थोड्यांनीं गबर व सुसंस्कृत व्हावें असें ज्यांना वाटतें असे जगांतील व हिंदुस्तानसारख्या गुलाम राष्ट्रांतीलहि खुशालचेंडू मुसोलिनीचें कौतुक करीत असतात. पण एकादा 'मुसोलिनी' कदाचित् आपलाच फुटबॉल करील हें या भोळपटांना कळत नाहीं.

येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं मुसोलिनीस भांडवलशाहीचा एकहि दोष दूर करतां आला नाहीं. इटालींत बेकारी कायम आहे. कांहीं भांडवलदारांजवळ धनाच्या राशी असतां बाकीच्या जनतेंत अन्नान्नदशा आहेच. शस्त्रास्त्रांचे कारखाने वाढले व अबिसीनियांत सैन्य पाठविलें त्यामुळें बेकारी थोडी हटली. आतां साम्राज्य वाढलें म्हणून राष्ट्रीय दारिद्र्य कदाचित् थोडें कमी होईल. पण हें साम्राज्य भरभराटण्यास भांडवल मिळण्याचीहि मुष्कील आहे. इंग्लंड-अमेरिकेसारख्या साम्राज्यशाही राष्ट्रांत बेकारी हटत नाहीं हें लक्षांत घेतां अबिसीनिया भरभराटला तरी बेकारी हटेल असेंहि नाहीं. याहिपेक्षां महासंकट म्हणजे मुसोलिनीच्या व त्याच्या इतर राष्ट्रांतील अनुयायांच्या धोरणानें भावी महायुद्ध जवळ येत आहे; त्यांतून भांडवलशाही व फॅसिझम् कशीं काय निभणार हा प्रश्नच आहे. तूर्त जगांतील सामान्य जनतेस परस्परविरुद्ध राष्ट्रांच्या तोफांपुढें

उभें करण्यांत आलें आहे एवढें खरें. सगळ्यांचेच डोळे बांधले आहेत. केव्हां धुडुमधाड होईल याचा नेम नाहीं. ही काय ती मुसोलिनीची जगास एकंदरीनें देणगी मिळाली आहे.

हिटलरनें कशी फसवणूक केली

आतां मुसोलिनीच्या पावलावर पाऊल टाकून चालणारा जर्मन नाझी ऊर्फ फॅसिस्ट चॅन्सेलर हिटलर याच्या कार्यक्रमाकडे पाहूं. हा कार्यक्रम १९२० सालीं तयार झाला असून १९२६सालीं नाझी परिषदेंत तो मंजूर झाला होता. या कार्यक्रमांत कधींहि बदल होणार नाहीं असें त्या वेळीं ठरविण्यांत आलें होतें. त्यांत २५ कलमें आहेत. त्यांपैकीं महत्त्वाचीं कलमें पुढीलप्रमाणें आहेत,—

अश्रमार्जित उत्पन्न खालसा करणें, 'व्याजाची गुलामगिरी' थांबविणें. (११)

युद्धांतला नफा खालसा करणें. (१२)

सर्व कारखान्यांचें ट्रस्ट खालसा करणें. (१३)

मोठ्या धंद्यांच्या नफ्यांत सरकारला भागी मिळविणें. (१४)

नुकसानभरपाई न देतां सार्वजनिक कार्यासाठीं जमिनी जप्त करणें. (१५)

सावकारी व नफेबाजी करणाऱ्यास मृत्यूची शिक्षा देणें. (१६)

या कार्यक्रमाचा अर्थ खुद्द नाझी पक्षाच्या अनुयायांनाहि कळत नसे. पक्षांतील दोघा विद्यार्थ्यांनीं 'व्याजाची गुलामगिरी थांबविणें म्हणजे काय?' असा प्रश्न हिटलरचा प्रचारक-अधिकारी डॉ. गोबल्स यास विचारला. तेव्हां 'हा विषय समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचीं टाळकीं सडकण्यांत येतील' असें त्यानें उत्तर दिलें. पण पक्षाच्या सभासदांना टाळकीं सडकण्याचा धाक घालणें सोपें असलें तरी धनिक वर्गापुढें तरी अखेर जाब द्यावा लागलाच. जमिनदार, भांडवलदार या सर्वांकडे हिटलरनें पाठिंब्याची याचना केली. त्यावर कांहीं जमिनदारांनीं जमिनी विनाभरपाई खालसा करण्याच्या कार्यक्रमाचें (१७व्या कलमाचें) कसें काय? असा खोचदार प्रश्न विचारला. तेव्हां १९२६ सालीं 'कधींहि न बदलणारा' म्हणून ठरविलेल्या कार्यक्रमास पुढील पुस्ती जोडण्यांत आली—

" आमचे शत्रु कलम १७ चा 'विपरीत' अर्थ करतात त्यांना उत्तर दिलें पाहिजे. तें उत्तर असें, कीं 'नॅशनल सोशॅलिस्ट जर्मन कामगारपक्ष' हा खाजगी

स्थळ प्रत
सं.
ता.

मिळकतीचें तत्त्व मान्य करीत असल्यानें 'विनाभरपाई जप्ती' याचा अर्थ राष्ट्रहितास विरोधक रीतीनें वापरणाराची जमीन अथवा बेकायदा मार्गांनीं मिळविलेली जमीन जरूर तर कायदेशीर मार्गांनीं खालसा करण्याचा सरकारचा हक्कच आहे. विशेषतः जमीनींची सट्टेबाजी करणाऱ्या ज्यूंच्या जमिनींस उद्देशून हें कलम लिहिलें आहे." वास्तविक भांडवलशाहीच्या कायद्यास न जुमानतां मिळविलेली जमीन खालसा करण्यास सोशॅलिझम कशाला हवा? खरा मुद्दा असा, कीं कामगारांना फसविण्यासाठीं 'सोशॅलिझम्' हें नांव, पण जमिनदारांशीं बोलतांना त्याचा अर्थ असा पाण्यापेक्षां पातळ करून टाकावयाचा. कांहीं भांडवलवाले आपल्या इस्टेटी हे सोशॅलिस्ट जप्त करणार म्हणून भ्याले व मदत देण्यास कांकूं करूं लागले. त्यांच्या समाधानार्थ पुढील गुप्त पत्रक काढण्यांत आलें होतें.

"आमच्या जाहिरातींतील भाषेनें असें एकसारखें बावरून जाऊं नका... 'भांडवलशाहीचा पाडाव करा' अशा आकर्षक घोषणा आमच्या कार्यक्रमांत आहेत. पण त्यांची गरज आहेच आहे. नुसतें 'जर्मन राष्ट्र' म्हणून आमचें ऐकणार कोण? चिडीला पेटलेल्या सोशॅलिस्ट कामगारांची भाषा आम्हांस वापरलीच पाहिजे...नाहीं तर त्यांना आम्हांबद्दल आपलेपणा वाटणार नाहीं. आम्ही आमचा खरा कार्यक्रम जाहीर करीत नाहीं यांत मुत्सद्देगिरी आहे."

कायदेमंडळांच्या निवडणुकी, त्यांचे पक्ष, त्यांचीं वचनें व त्यांचे अर्थ यांच्या लफंगेगिरीचा इतका उत्कृष्ट नमुना पाहायला मिळणार नाहीं. जगभर भांडवलशाहींत सगळ्याच निवडणुकांची ही रीत असते. भांडवलवाले एकमेकांच्या कानांत जें बोलतात तें असें कोणीं तरी बाहेर काढलें म्हणजे कपट उघडकीस येतें. सर्वत्र चांदीच्या मुलाम्याचें कथली भांडेंच आहे. कोणी तरी मध्येंच ओरखडा काढून, अशी चांदी खरडून कथील जगाला दाखवितो.

धूर्त जर्मन भांडवलवाल्यांना हिटलर सोशॅलिझम् मुळींच आणणार नाहीं हें हळूहळू कळून आलें. तेव्हां कामगारांना झुलविण्यासाठीं भडक शब्दांत रंगविलेला कार्यक्रम बदलण्याचा आग्रह पुढें त्यांनीं धरलाच नाहीं. हिटलरनें मुसोलिनीप्रमाणें बर्लिनवर चाल करण्याचा १९२३ सालीं प्रयत्न केला. पण त्यास त्या वेळीं कोणी मुख्य प्रधान हो, म्हटलें नाहीं. १९२४ सालीं हिटलर व त्याचा सहकारी सेनापति लुडेंडॉर्फ यांजवर खटला चालून त्यांना थोडी

थोडी शिक्षा देण्यांत आली. हिटलर हा मूळचा इमारतकामांतील रंगारी होता. महायुद्धांत तो मोठ्या शौर्यानें लढला व जखमी झाला. युरोपांत ज्यू जातीचा सर्व खिस्ती लोक द्वेष करीत असून ज्यू लोक हे मोठमोठे बँकर असतात व त्यांच्या इस्टेटी खालसा करण्याची भाषा बोलले कीं, लोक झुलूं लागतात. कार्ल मार्क्स हा ज्यू आईबापांचा पुत्र होता, आणि मार्क्सनें प्रत्येक राष्ट्रांत वर्गकलह माजविण्याची शिकवण दिल्यानें देशाभिमानी हिटरलला त्याचा द्वेष फार. त्यानें मार्क्स ज्यू होता म्हणून ज्यू म्हणजे कम्युनिस्ट, ज्यू म्हणजे बँकर, अशी कांहीं तरी विचाराची अथवा अविचाराची मेळ करून पराभवानें व दारिद्र्यदुःखानें त्रस्त झालेल्या जर्मन जनतेपुढें वाढली. कम्युनिस्टांना दडपण्याचें व कामगारसंघटना मोडण्याचें कार्य सोशल डेमोक्रॅट पुढाऱ्यांनीं यशस्वितेनें केलें होतें. पण मागें दिलेल्या गुप्त पत्रकांत भांडवलवाल्यांनीं म्हटल्याप्रमाणें सोशल डेमोक्रॅट पक्षास मागें सारून नॅशनल सोशॅलिस्टांस पुढें आणण्याची वेळ आली. तेव्हां मोठमोठे बँकवाले व भांडवलवाले हिटलरला पैसा पुरविण्यास धावले. हेतु हा कीं, जर्मनींत कम्युनिझम् आल्यास साऱ्या युरोपांत कम्युनिझम् पेटेल, त्यापेक्षां कामगारसंघटनांना दडपून टाकणारा फॅसिझम् पुरवला.

हिटलरचे पाठीराखे कोण आहेत

१९२४ नंतर हिटलरला मदत करण्यांत कारखानदार, मॅनेजर वगैरे अनेकांची गर्दी झाली. विदेशी मदतगारांत डिटर्डिंग, क्रूजर, फोर्ड यांसारखे कुबेर होते. जगप्रसिद्ध जर्मन भांडवलवाला थायसेन यानें रूहर प्रांतांतल्या लोखंड व कोळसा यांच्या धंद्यांतील कामगारांकडून वैयक्तिक कर वसूल करून हिटलरच्या निवडणूकफंडाची वेळोवेळीं भर केली. १९३२च्या निवडणुकींत थायसेननें थोड्याच दिवसांत नॅशनल सोशॅलिस्ट पक्षाच्या निवडणुकीसाठीं ३० लक्ष मार्क उधळले. नाझी सरकार स्थापन झाल्यावर जें प्रोव्हिजनल सुप्रीम इकॉनॉमिक कौन्सिल स्थापन झालें त्यांत सभासद कोण होते एवढें पाहिलें म्हणजे या नाझींचा 'नॅशनल सोशॅलिझम्' कसा काय आहे तें कळून येतें.

त्यांतील कांहीं ठळक सभासद येणें प्रमाणें.—

हर क्रप फॉन बोहेनः—शस्त्रास्त्र कारखानदार, खाजगी दौलत ६० लक्ष पौंड, धंद्यांतील भांडवल दीड कोटि पौंड.

हर फ्रिड्झ थायसेनः—पोलाद कारखानदार, खाजगी दौलत, ६० लक्ष पौंड, जर्मन स्टील ट्रस्टमधील भागीचें भांडवल ५४ कोटि पौंड.

हर एफ्. सी. फॉन सिमेन्सः—वीज कारखानदार, खाजगी दौलत ६५ लक्ष पौंड, धंद्यांतील भांडवल सवा कोटि पौंड.

प्रो० कार्ल बोचः—डाय ट्रस्टमधील क्रोडोपति, खाजगी दौलत २० लक्ष पौंड, धंद्यांतील भांडवल साडेपांच कोटि पौंड.

डॉ० ए. व्हॉग्लरः—जर्मन स्टील ट्रस्टमधील भागीदार, खाजगी दौलत ६० लक्ष पौंड, धंद्यांतील भाडवल चार कोटि पौंड.

हर ए. डीन्हः—पोटॅश सिंडिकेटचा एक डायरेक्टर, धंद्यांतील भांडवल १ कोटि पौंड.

हर बोच्रिंजरः—मॅक्झिमिलियन स्टील वर्क्सचा एक डायरेक्टर, धंद्यांतील भांडवल १५ लक्ष पौंड.

कल्पनाशक्ति फाटेपर्यंत फुगविली तरी यांच्या धनाचें पूर्ण आकलन होणें कठीण. 'नॅशनल सोशॅलिस्ट' सरकारचे हे आर्थिक सल्लागार. यांनीं खासा सोशॅलिझम् केला. १९३४ सालीं यांनीं जर्मनींतील सर्व धंद्यांचें अवघ्या १२ धंद्यांत एकीकरण केलें व क्रप फॉन बोहेन याला सर्वांचा अधिपति नेमले. अर्थात् मॅक्डोनल्ड व मॉरिसन यांना यांतहि सोशॅलिझम् दिसण्यास कांहींच हरकत नाहीं.

हिटलरनें अधिकारावर येतांच व्हर्सेल्स-तह उधळून लावण्याचें एकच व्रत अंगिकारलें आहे. पराभूत राष्ट्राच्या तोंडावरचा पराभवाचा कलंक धुऊन काढण्याच्या या सत्कार्यार्थ त्यास शतशः धन्यवाद असोत! पण बाकी काय? जर्मनदारांच्या जमिनी, भांडवलवाल्यांचें भांडवल व बँकवाल्यांच्या बँका सुरक्षित आहेत. चवताळलेल्या सापापुढें त्याच्या दातांची रग शमविण्यासाठीं काठी टाकतात त्याप्रमाणें पराभव व दारिद्र्य यांनीं क्षुब्ध झालेल्या जनतेच्या क्षोभास ज्यू लोक बळी देण्यांत येत आहेत. कामगारांना संघटनास्वातंत्र्य मुळींच नाहीं. पार्लमेंट खलास आहे. भांडवलवाले परदेशांत माल स्वस्त विकतां यावा

थोडी शिक्षा देण्यांत आली. हिटलर हा मूळचा इमारतकामांतील रंगारी होता. महायुद्धांत तो मोठ्या शौर्यानें लढला व जखमी झाला. युरोपांत ज्यू जातीचा सर्व खिस्ती लोक द्वेष करीत असून ज्यू लोक हे मोठमोठे बँकर असतात व त्यांच्या इस्टेटी खालसा करण्याची भाषा बोलले कीं, लोक झुलूं लागतात. कार्ल मार्क्स हा ज्यू आईबापांचा पुत्र होता, आणि मार्क्सनें प्रत्येक राष्ट्रांत वर्गकलह माजविण्याची शिकवण दिल्यानें देशाभिमानी हिटरलला त्याचा द्वेष फार. त्यानें मार्क्स ज्यू होता म्हणून ज्यू म्हणजे कम्युनिस्ट, ज्यू म्हणजे बँकर, अशी कांहीं तरी विचाराची अथवा अविचाराची मेळ करून पराभवानें व दारिद्र्यदुःखानें त्रस्त झालेल्या जर्मन जनतेपुढें वाढली. कम्युनिस्टांना दडपण्याचें व कामगारसंघटना मोडण्याचें कार्य सोशल डेमोक्रॅट पुढाऱ्यांनीं यशस्वितेनें केलें होतें. पण मागें दिलेल्या गुप्त पत्रकांत भांडवलवाल्यांनीं म्हटल्याप्रमाणें सोशल डेमोक्रॅट पक्षास मागें सारून नॅशनल सोशॅलिस्टांस पुढें आणण्याची वेळ आली. तेव्हां मोठमोठे बँकवाले व भांडवलवाले हिटलरला पैसा पुरविण्यास धावले. हेतु हा कीं, जर्मनींत कम्युनिझम् आल्यास साऱ्या युरोपांत कम्युनिझम् पेटेल, त्यापेक्षां कामगारसंघटनांना दडपून टाकणारा फॅसिझम् पुरवला.

हिटलरचे पाठीराखे कोण आहेत

१९२४ नंतर हिटलरला मदत करण्यांत कारखानदार, मॅनेजर वगैरे अनेकांची गर्दी झाली. विदेशी मदतगारांत डिटर्डिंग, क्रूजर, फोर्ड यांसारखे कुबेर होते. जगप्रसिद्ध जर्मन भांडवलवाला थायसेन यानें रूहर प्रांतांतल्या लोखंड व कोळसा यांच्या धंद्यांतील कामगारांकडून वैयक्तिक कर वसूल करून हिटलरच्या निवडणूकफंडाची वेळोवेळीं भर केली. १९३२च्या निवडणुकींत थायसेननें थोड्याच दिवसांत नॅशनल सोशॅलिस्ट पक्षाच्या निवडणुकीसाठीं ३० लक्ष मार्क उधळले. नाझी सरकार स्थापन झाल्यावर जें प्रोव्हिजनल सुप्रीम इकॉनॉमिक कौन्सिल स्थापन झालें त्यांत सभासद कोण होते एवढें पाहिलें म्हणजे या नाझींचा 'नॅशनल सोशॅलिझम्' कसा काय आहे तें कळून येतें.

त्यांतील कांहीं ठळक सभासद येणें प्रमाणें.—

हर क्रप फॉन बोहेनः—शस्त्रास्त्र कारखानदार, खाजगी दौलत ६० लक्ष पौंड, धंद्यांतील भांडवल दीड कोटि पौंड.

हर फ्रिड्झ थायसेनः—पोलाद कारखानदार, खाजगी दौलत, ६० लक्ष पौंड, जर्मन स्टील ट्रस्टमधील भागीचें भांडवल ५४ कोटि पौंड.

हर एफ्. सी. फॉन सिमेन्सः—वीज कारखानदार, खाजगी दौलत ६५ लक्ष पौंड, धंद्यांतील भांडवल सवा कोटि पौंड.

प्रो० कार्ल बोचः—डाय ट्रस्टमधील क्रोडोपति, खाजगी दौलत २० लक्ष पौंड, धंद्यांतील भांडवल साडेपांच कोटि पौंड.

डॉ० ए. व्हॉग्लरः—जर्मन स्टील ट्रस्टमधील भागीदार, खाजगी दौलत ६० लक्ष पौंड, धंद्यांतील भाडवल चार कोटि पौंड.

हर ए. डीन्हः—पोटॅश सिंडिकेटचा एक डायरेक्टर, धंद्यांतील भांडवल १ कोटि पौंड.

हर बोत्रिंजरः—मॅक्झिमिलियन स्टील वर्क्सचा एक डायरेक्टर, धंद्यांतील भांडवल १५ लक्ष पौंड.

कल्पनाशक्ति फाटेपर्यंत फुगाविली तरी यांच्या धनाचें पूर्ण आकलन होणें कठीण. 'नॅशनल सोशॅलिस्ट' सरकारचे हे आर्थिक सल्लागार. यांनीं खासा सोशॅलिझम् केला. १९३४ सालीं यांनीं जर्मनींतील सर्व धंद्यांचें अवघ्या १२ धंद्यांत एकीकरण केलें व क्रप फॉन बोहेन याला सर्वांचा अधिपति नेमले. अर्थात् मॅक्डोनल्ड व मॉरिसन यांना यांतहि सोशॅलिझम् दिसण्यास कांहींच हरकत नाहीं.

हिटलरनें अधिकारावर येतांच व्हर्सेल्स-तह उधळून लावण्याचें एकच व्रत अंगिकारलें आहे. पराभूत राष्ट्राच्या तोंडावरचा पराभवाचा कलंक धुऊन काढण्याच्या या सत्कार्यार्थ त्यास शतशः धन्यवाद असोत! पण बाकी काय? जमीनदारांच्या जमिनी, भांडवलवाल्यांचें भांडवल व बँकवाल्यांच्या बँका सुरक्षित आहेत. चवताळलेल्या सापापुढें त्याच्या दाताची रग शमविण्यासाठीं काठी टाकतात त्याप्रमाणें पराभव व दारिद्र्य यांनीं क्षुब्ध झालेल्या जनतेच्या क्षोभास ज्यू लोक बळी देण्यांत येत आहेत. कामगारांना संघटनास्वातंत्र्य मुळींच नाहीं. पार्लमेंट खलास आहे. भांडवलवाले परदेशांत माल स्वस्त विकतां यावा

म्हणून मजुरांना पिळून चिपाड करीत आहेत. इटालीनें हबसाण जिंकला तसा एखादा प्रदेश जिंकण्यास जर्मनीस अनुकूलता नाहीं. रशियावर स्वारी करून कच्च्या मालाचे प्रदेश मिळविण्याचा हिटलरचा हिय्या आहे. पण तसा प्रसंग आल्यास रशियाचा मुखत्यार स्टॅलिन यानें आंतरराष्ट्रीय आर्थिक व राजकीय संबंध असे कौशल्यानें जोडून ठेवले आहेत, कीं जर्मनीनें रशियावर स्वारी करतांच जागतिक युद्ध उद्भवून सगळ्या जगांतल्या भांडवळशाहीची होळी होईल.

भांडवलशाहींत युद्धें अपरिहार्य आहेत

पण हिटलरला युद्धावांचून मार्ग नाहीं; कोठल्याच जगांतल्या भांडवलवाल्यांना त्यावांचून मार्ग आहे असें दिसत नाहीं. स्वदेशांतील मजुरांना पिळून जो नफा मिळविला जातो तो मागसलेल्या प्रदेशांत मजुरांची राहणी गरीबीची असल्यानें तेथें गुंतविला जातो. पण असें करतां करतां अखेर न खपणारा वाढावा उरतोच व तो सत्तेनें खपविण्यासाठीं जगांतील प्रदेश जिंकण्याची स्पर्धा सुरू होऊन युद्धें होतात. भांडवलवाल्यांची संचित संपत्ति (म्हणजेच वाढावा ऊर्फ सर्प्लस व्हॅल्यू) हीच आंतरराष्ट्रीय युद्धास कशी कारण होते हें सांगतांना प्रो० एच्. जे. लास्की 'दि स्टेट इन् थिअरी ॲन्ड प्रॅक्टिस' या ग्रंथांत म्हणतो—

"ज्यांची आर्थिक संघटना सुधारलेली असते अशा राष्ट्रांत धनसंचय होत असतो. हें धन स्वदेशांत नफा मिळविण्याची संधि कमी झाल्यानें परदेशीं जातें. तसें तें गेल्यावर त्याचें रक्षण करण्याची जबाबदारी सरकारनें घ्यावी अशी सहजच त्यांची अपेक्षा असते. ...(यामुळें भांडवलाबरोबरच या पुढारलेल्या देशाचें साम्राज्य अथवा वर्चस्व भांडवल जाणाऱ्या प्रदेशावर जाते.) या आर्थिक साम्राज्यशाहीमुळें इतर अनेक लाभ दिसूं लागतात. व्यापार-धंदा म्हटला, कीं व्यवस्थित प्रकारें वसाहत केलेला प्रदेश हवाच. त्यासाठीं लष्करी व मुलकी नोकरशाहीची गरज उद्भवते. या प्रकारें अगदीं ठळक उदाहरणेंच घेतलीं तरी हिंदुस्थान, इजिप्त, आफ्रिका वगैरे देशांत मध्यम व वरिष्ठ वर्गांतल्या गृहस्थांच्या चिरंजीवांना मोठ्या हुद्द्याच्या व लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळतात. यापासून महत्त्वाचे परिणाम झाले आहेत. हे नोकर

या प्रदेशांतील लोकांच्या स्वायत्ततेच्या आकांक्षांचे वैरी होतात. ...त्यामुळें येथें राज्यकर्त्यांच्या लष्करशाहीची वाढ व्हावी लागते. कारण ज्यांचें भांडवल व ज्यांचे चिरंजीव परदेशांत गेले आहेत ते भांडवलदार व वृद्ध पिताजी आपल्या भांडवलाचें व पुत्रांचें रक्षण करण्यास सरकारला गळ घालीत असतात. ..... राष्ट्राराष्ट्रांतील उत्पादनक्षमता कमी अधिक असते यामुळें कमी उत्पादक राष्ट्रें जकाती उभारतात, तर नवीं अधिक उत्पादक राष्ट्रें पूर्वीच्या भांडवलवाल्यांचा बाजारांत पराभव करतात. उदाहरणार्थ हिंदुस्थानांत व चीनमध्यें जकाती वाढल्या तर जपाननें लँकाशायरला व्यापारांत ठोकून काढलें. ..... चोहोंकडे जकातीचें धोरण माजलें, कीं बाजारमंदी येऊन १९२९ सारखीं आर्थिक संकटें उद्भवतात. अशा परिस्थितींत निरनिराळ्या राष्ट्रांचे हितसंबंध परस्परविरोधी होऊन शेवटीं कांहीं तरी अनर्थांत त्यांचा अंत होतो. ..... अशा जिकिरीच्या परिस्थितींत नांदणाऱ्या राज्यसंस्थेस युद्ध हेंच आपली सार्वभौमसत्ता सिद्ध करण्याचें एकमेव साधन आहे असें वाटूं लागतें. मुत्सद्द्यांना युद्ध नको असेल. पण परिस्थिति त्यांना दुसरा मार्गच ठेवीत नाहीं. कारण युद्ध न करावें तर भांडवलशाहीचें सारसर्वस्व जी नफेबाजी ती थांबवावी लागते" म्हणून आंतरराष्ट्रीय युद्ध थांबवावयाचें तर ही नफेबाजी थांबविली पाहिजे असें प्रो. लास्कीचें म्हणणें आहे.

पण ही नफेबाजी थांबवावी कशी ? भांडवलवाले सुखासुखी त्यास तयार होत नाहींत हा इतिहास आहे. लेनिन, ट्रॉट्स्की वगैरे कम्युनिस्टांनीं यासाठीं वर्गयुद्ध सुचविलें असून स्वदेशांत श्रमजीवी वर्गांनीं भांडवलवाले व जमिनदार यांच्यांशीं झगडा करून त्यांना जिंकावें व त्यांचीं धनोत्पादक साधनें सार्वजनिक मालकींत आणून गिऱ्हाइकांसाठीं निर्माण झालेला माल त्यास खरेदी करतां येईल असें वेतन श्रमजीवी वर्गाला द्यावें असें सुचविलें आहे. पण हिटलरसारख्या फॅसिस्टांना राष्ट्र हें ईश्वरासारखें अद्वैत मानणेंच इष्ट वाटतें. तेव्हां त्यास परराष्ट्रांशीं युद्ध करण्याची पाळी येते. पण त्यामुळें तरी राष्ट्रीय अद्वैत कायम राहील हें कशावरून? पिळणारे व पिळले जाणारे असे परस्पर शत्रुवर्ग प्रत्येक देशांत आहेत. मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय युद्ध सुरू झालें, कीं पाठोपाठ प्रत्येक राष्ट्रांत पिळणारे व पिळले जाणारे यांचे दरम्यान यादवी माजणार अशीं प्रखर दुश्चिन्हें आज जगांतील सर्व भांडवलवाल्यांना दिसत

आहेत. म्हणूनच ते आंतरराष्ट्रीय युद्ध अपमान सोसूनहि टाळूं पाहत आहेत. पण भांडवलशाही देशांत भांडवलवाल्यांची नफेबाजी थांबत नाहीं तोंवर आंतरराष्ट्रीय युद्ध टळत नाहीं व पाठीमागून भांडवलशाही राष्ट्रांत यादवीहि आल्यावांचून राहणार नाहीं.

पण आंतरराष्ट्रीय महायुद्ध व यादवी जशी दूर लोटल्यानें दूर जाईल असें नाहीं त्याप्रमाणें तीं जवळ ओढूं म्हटल्यास बटन दाबून जवळ आणणेंहि शक्य नाहीं. यामुळें कोणत्याहि देशांत एकदां फॅसिस्ट राज्यसत्ता उत्पन्न झाली म्हणजे जनतेच्या आकांक्षा व चळवळी दंडशक्ति आणि लाचलुचपत यांच्या बळावर दंडपल्या जाऊन अनियंत्रित राज्यसत्तेस सीमाच राहत नाहीं. युद्ध चालू नसल्यानें अथवा शक्य नसल्यानें फॅसिस्टांच्या सत्तेवर बाहेरचें नियंत्रण नसतें व लष्करी-सत्ता आणि धनसत्ता फॅसिस्ट सरकारच्या हातीं असून प्रजेंतील सर्व संघटना मोडून टाकणें हें त्याचें व्रतच असल्यानें, खाटकापुढें मेंढरासारखी या फॅसिस्टां-पुढें प्रजा दीन झालेली असते. अशा असहाय प्रजेवर मग फॅसिस्टांचे आर्थिक प्रयोग सुरू होतात.

उत्पन्न मालाचा विध्वंस

कामगारवर्गास पिळून काढून वाढावा साठवावयाचाच पण कामगारांची मजुरी सर्व विक्रीचा माल खरेदी करण्याइतकी करून त्यांची माल-खरेदी-शक्ति वाढवावयाची नाहीं हें भांडवलशाहीचें तत्त्व ठरल्यानंतर शिल्लक मालाच्या संकटांतून सुटण्यासाठीं भांडवलशाही मालाची निपज तोडूं लागते व उत्पन्न-मालाचा विध्वंस करते. अमेरिकेचा हल्लींचा अध्यक्ष रूझवेल्ट हा व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांचा पुरस्कर्ता असून त्यास फॅसिझम् मुळींच मान्य नाहीं अशी त्याची ख्याति आहे. त्यानें आपल्या अमदानींत कामगारसंघटना मजबूत करविल्या हेंहि कांहीं खोटें नाहीं. पण भांडवलशाही जगविण्यासाठीं, जगांतील कोट्यवधि माणसें उपाशी असतां, उत्पन्नसंपत्तीचा विध्वंस करणें अथवा संपत्तीची निपज कमी करणें हा रानटी उपायच त्यांस योजावा लागत आहे. रूझवेल्ट अध्यक्षपदीं आल्यानंतर सात महिन्यांनीं —

"न्यू यॉर्क शहरांत स्त्री-पुरुष भुकेनें जळत असतां आयोवांतील कोंड-वाड्यांतील हजारों डुकरें सरकारी हुकुमानें ठार मारून नाहींशीं केलीं जात

आहेत आणि कॅन्सस व नेब्रास्का येथील शेतकरी धान्य जाळून टाकीत आहेत."

असें कां ? तर उपाशी मरणाऱ्यांना हा व असा शिल्लक पडणारा माल खरेदी करण्याइतकी मजुरी मिळूं शकली नाहीं म्हणून. ज्यांच्याजवळ डुकरें होतीं त्यांना गिऱ्हाईक नसल्यानें तीं उगीच पोसत ठेवणें नुकसानीचें झालें. ज्यांचें धान्य खपत नव्हतें त्यांचें तें ढिगांचे ढीग धान्य किडून, कुजून आरोग्य बिघडवील या भीतीनें जाळून टाकण्यांत आलें. संपत्तीचा विध्वंस व निपजेचें नियंत्रण यासाठीं रूझवेल्ट यानें १९३३ सालीं म्हणजे आपल्या अमदानीच्या पहिल्याच सालीं खालीलप्रमाणें खर्च केला—

उगवलेलें कापसाचें पीक परत जमिनींत नांगरून टाकलें; ११ कोटि डॉलर्स;

१९३४ सालीं किती कापूस कमी निपजावयाचा; १५ कोटि डॉलर्स;

डुकरांचा संहार; ३ कोटि ३० लक्ष डॉलर्स;

गव्हाची निपज किती कमी; १० कोटि २० लक्ष डॉलर्स;

तंबाखू निपज किती कमी; २ कोटि १० लक्ष डॉलर्स.

दक्षिण हिंदुस्थानांतील एक संस्थानिक शिकारीसाठीं रानडुकरें पाहिजेत म्हणून तीं प्रजेच्या शेतांतून ठेवी व त्यामुळें प्रजेच्या शेतांचा विध्वंस होऊन प्रजा उपाशी मरे. यासाठीं आपण या 'मूर्ख' व 'आततायी' राजास हसत होतों. लक्षावधि लोक अमेरिकेंत बिनरोजगारी म्हणून उपाशी असतां तेथें धनाचा विध्वंस केला जात आहे अथवा त्यांचें उत्पन्नच हटविण्यांत येत आहे. या रानटीपणाला आतां काय नांव ठेवावें ? हा मूर्खपणा आणि आततायीपणा म्हणावा तर विद्वान् अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्यानें सुधारलेलें सरकार कायदेशीरपणें या गोष्टी करीत आहे. बेकारीचें कारण माल खपत नाहीं, म्हणून धंदे चालत नाहींत हें आहे. विक्रीस येणारा भोग्य माल सर्व खरेदी करण्याइतकी खरेदीशक्ति मजुरीच्या रूपानें मजुरांना वाटल्यास माल खपेल, नवीन निपजाचें काम सुरू होईल व बेकारी जाईल हें रूझवेस्ट याला कळत नसेल असें नाहीं. पण त्यासाठीं नफापद्धति बंद केली पाहिजे म्हणजे भांडवलवाल्यांशीं कामगारांनीं यादवी युद्ध करून त्यांची धनोत्पादक साधनें हिरावून घेऊन सार्वजनिक मालकीचीं केलीं पाहिजेत. भांडवलवाल्यांचा

आहेत. म्हणूनच ते आंतरराष्ट्रीय युद्ध अपमान सोसूनहि टाळूं पाहत आहेत. पण भांडवलशाही देशांत भांडवलवाल्यांची नफेबाजी थांबत नाहीं तोंवर आंतरराष्ट्रीय युद्ध टळत नाहीं व पाठीमागून भांडवलशाही राष्ट्रांत यादवीहि आल्यावांचून राहणार नाहीं.

पण आंतरराष्ट्रीय महायुद्ध व यादवी जशी दूर लोटल्यानें दूर जाईल असें नाहीं त्याप्रमाणें तीं जवळ ओढूं म्हटल्यास बटन दाबून जवळ आणणेंहि शक्य नाहीं. यामुळें कोणत्याहि देशांत एकदां फॅसिस्ट राज्यसत्ता उत्पन्न झाली म्हणजे जनतेच्या आकांक्षा व चळवळी दंडशक्ति आणि लाचलुचपत यांच्या बळावर दंडपल्या जाऊन अनियंत्रित राज्यसत्तेस सीमाच राहत नाहीं. युद्ध चालू नसल्यानें अथवा शक्य नसल्यानें फॅसिस्टांच्या सत्तेवर बाहेरचें नियंत्रण नसतें व लष्करी-सत्ता आणि धनसत्ता फॅसिस्ट सरकारच्या हातीं असून प्रजेंतील सर्व संघटना मोडून टाकणें हें त्याचें व्रतच असल्यानें, खाटकापुढें मेंढरासारखी या फॅसिस्टां-पुढें प्रजा दीन झालेली असते. अशा असहाय प्रजेवर मग फॅसिस्टांचे आर्थिक प्रयोग सुरू होतात.

उत्पन्न मालाचा विध्वंस

कामगारवर्गास पिळून काढून वाढावा साठवावयाचाच पण कामगारांची मजुरी सर्व विक्रीचा माल खरेदी करण्याइतकी करून त्यांची माल-खरेदी-शक्ति वाढवावयाची नाहीं हें भांडवलशाहीचें तत्त्व ठरल्यानंतर शिल्लक मालाच्या संकटांतून सुटण्यासाठीं भांडवलशाही मालाची निपज तोडूं लागते व उत्पन्न-मालाचा विध्वंस करते. अमेरिकेचा हल्लींचा अध्यक्ष रूझवेल्ट हा व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांचा पुरस्कर्ता असून त्यास फॅसिझम् मुळींच मान्य नाहीं अशी त्याची ख्याति आहे. त्यानें आपल्या अमदानींत कामगारसंघटना मजबूत करविल्या हेंहि कांहीं खोटें नाहीं. पण भांडवलशाही जगविण्यासाठीं, जगांतील कोट्यवधि माणसें उपाशी असतां, उत्पन्नसंपत्तीचा विध्वंस करणें अथवा संपत्तीची निपज कमी करणें हा रानटी उपायच त्यांस योजावा लागत आहे. रूझवेल्ट अध्यक्षपदीं आल्यानंतर सात महिन्यांनीं —

"न्यू यॉर्क शहरांत स्त्री-पुरुष भुकेनें जळत असतां आयोवांतील कोंड-वाड्यांतील हजारों डुकरें सरकारी हुकुमानें ठार मारून नाहींशीं केलीं जात

आहेत आणि कॅन्सस व नेब्रास्का येथील शेतकरी धान्य जाळून टाकीत आहेत."

असें कां ? तर उपाशी मरणाऱ्यांना हा व असा शिल्लक पडणारा माल खरेदी करण्याइतकी मजुरी मिळूं शकली नाहीं म्हणून. ज्यांच्याजवळ डुकरें होतीं त्यांना गिऱ्हाईक नसल्यानें तीं उगीच पोसत ठेवणें नुकसानीचें झालें. ज्यांचें धान्य खपत नव्हतें त्यांचें तें ढिगांचे ढीग धान्य किडून, कुजून आरोग्य बिघडवील या भीतीनें जाळून टाकण्यांत आलें. संपत्तीचा विध्वंस व निपजेचें नियंत्रण यासाठीं रूझवेल्ट यानें १९३३ सालीं म्हणजे आपल्या अमदानीच्या पहिल्याच सालीं खालीलप्रमाणें खर्च केला—

उगवलेलें कापसाचें पीक परत जमिनींत नांगरून टाकलें; ११ कोटि डॉलर्स;

१९३४ सालीं किती कापूस कमी निपजावयाचा; १५ कोटि डॉलर्स;

डुकरांचा संहार; ३ कोटि ३० लक्ष डॉलर्स;

गव्हाची निपज किती कमी; १० कोटि २० लक्ष डॉलर्स;

तंबाखू निपज किती कमी; २ कोटि १० लक्ष डॉलर्स.

दक्षिण हिंदुस्थानांतील एक संस्थानिक शिकारीसाठीं रानडुकरें पाहिजेत म्हणून तीं प्रजेच्या शेतांतून ठेवी व त्यामुळें प्रजेच्या शेतांचा विध्वंस होऊन प्रजा उपाशी मरे. यासाठीं आपण या 'मूर्ख' व 'आततायी' राजास हसत होतों. लक्षावधि लोक अमेरिकेंत बिनरोजगारी म्हणून उपाशी असतां तेथें धनाचा विध्वंस केला जात आहे अथवा त्यांचें उत्पन्नच हटविण्यांत येत आहे. या रानटीपणाला आतां काय नांव ठेवावें ? हा मूर्खपणा आणि आततायीपणा म्हणावा तर विद्वान् अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्यानें सुधारलेलें सरकार कायदेशीरपणें या गोष्टी करीत आहे. बेकारीचें कारण माल खपत नाहीं, म्हणून धंदे चालत नाहींत हें आहे. विक्रीस येणारा भोग्य माल सर्व खरेदी करण्याइतकी खरेदीशक्ति मजुरीच्या रूपानें मजुरांना वाटल्यास माल खपेल, नवीन निपजाचें काम सुरू होईल व बेकारी जाईल हें रूझवेस्ट याला कळत नसेल असें नाहीं. पण त्यासाठीं नफापद्धति बंद केली पाहिजे म्हणजे भांडवलवाल्यांशीं कामगारांनीं यादवी युद्ध करून त्यांची धनोत्पादक साधनें हिरावून घेऊन सार्वजनिक मालकीचीं केलीं पाहिजेत. भांडवलवाल्यांचा

प्रतिनिधि रूझवेल्ट हा ही गोष्ट कशी व कां करणार? अर्थात् धनाचा विध्वंस व त्याच्या उत्पत्तीचें नियंत्रण म्हणजे एक प्रकारें जनतेशीं युद्ध करून त्यांच्यासमोरचें भरलेलें ताट हिसकून घेणें व तिला उपाशी मारणें हा रानटीपणा रूझवेल्टला करणें भागच पडतें.

सर्व 'सुधारलेल्या' जगांत हा रानटीपणा आतां अगदीं रूढ झाला आहे. १९३३ सालीं डेन्मार्कमध्यें सोशल डेमोक्रॅटिक सरकारनें, मांस 'खरेदी करण्याची शक्ति' नसणारे लोक मांसन्नावांचून उपाशी असतां चांगली धष्ट-पुष्ट जनावरें पोसण्याचा खर्च वाढतो व गुरांना गिऱ्हाईक नाहीं म्हणून आठवड्यास ५००० या प्रमाणांत गुरें ठार केलीं व पुढें त्यांचें मांस खपत नाहीं व तें कुजूं नये म्हणून तें सर्व जाळून टाकण्यांत आलें. तपेल्यांत अडकलेली वासराची मान सोडविण्यासाठीं प्रथम ती मान कापून धड वेगळें सोडवून घ्या व मग मुंडकें बाहेर काढण्यासाठीं तपेलें फोडा असें सांगणारा 'उंटावरचा शहाणा' लहान मुलांनाहि माहीत असतो. पण मोटारींत बसणाऱ्या या सोशल डेमोक्रॅटिक शहाण्यांचें शहाणपण कळायला साऱ्या जगांतली अक्कल अपुरी पडत आहे. असो. इंग्लंडांत १९३४ सालापासून कोळशाची निपज कमी करण्यासाठीं कायदा करण्यांत आला. पण शेगडी नाहीं म्हणून थंडीनें कुडकुडणारीं मुलें-माणसें थेम्स नदीच्या पार्लमेंटासमोरच्या पलीकडील तीरावर शेंकडों होतीं. १९३३सालीं इंग्लंडांतील लोकरीच्या कांहीं गिरण्या बंद करण्यासाठीं संस्था स्थापन झाली. जगांतील दोनतृतीयांश कॉफीचा पुरवठा करणाऱ्या ब्राझिलमध्यें १९३३ अखेर सवादोन कोटि पोतीं कॉफी जाळण्यांत आली. हा जाळण्याचा खर्च करण्यासाठीं निर्यात होणाऱ्या कॉफीवर कर बसविण्यांत आला होता. १९३३ सालीं अमेरिकेंत कापसाचें पीक नष्ट करण्यासाठीं सरकारनें दर एकरीं ७ ते २० डॉलर मदत देऊं केली. भावि महायुद्धाचे वेळीं प्रत्यक्ष माणसाची कत्तल होईल तोंपर्यंत तूर्त ही धनाची कत्तल सुरू राहावयाची आहे. हें सर्व अर्थशास्त्राच्या सिद्धांतानुसार चाललें आहे. 'कंट्रोल अॅन्ड कर्टेलमेंट ऑफ् ओव्हरप्रॉडक्शन' असें जाडें नांव या प्रकारास देण्यांत आलें आहे. जणूं कांहीं नांव लठ्ठ असलें, इंग्रजींत असलें कीं कोणत्याहि गोष्टीचें समर्थन होतें.

उत्पादन-सामर्थ्याची खच्ची

भांडवलशाहीच्या या विध्वंसक धोरणानें याहिपुढें मजल मारली आहे. गेल्या शंभर वर्षांत भांडवलशाहीनें कोणतें मोठें कर्तृत्व केलें? यंत्र व शास्त्र यांच्या साह्यानें माणसाची धनोत्पादनशक्ति वाढविली. पण त्या धनाची यथायोग्य वाटणी करण्यासाठीं नफेबाजी बंद करायला पाहिजे ती कांहीं भांडवलशाही करीत नाहीं. यामुळें बहुसंख्य समाजांत बेकारी व असंतोष वाढला. उत्पन्न झालेलें धन खपत नाहीं म्हणून नष्ट करणें व असंतुष्ट व चवताळणाऱ्या बहुसंख्य समाजास झोडपून काढणें हा एक नवाच उपद्व्याप उत्पन्न झाला. तेव्हां या संकटाचें कारण माणसाचें वाढलेलें धनोत्पादन सामर्थ्य हेंच आहे असें ठरवून भांडवलवाल्यांनीं आतां यंत्रें व शास्त्रें यांचा त्याग करून जुन्या हातधंद्यांकडे माणसांनीं वळावें असा मतप्रचार सुरू केला आहे. माणसाचें उत्पादनसामर्थ्य वाढविलें हीच चूक झाली आतां तें खच्ची करा असे ते म्हणूं लागले आहेत. इंग्लंडांतील 'संडे एक्सप्रेस' हें पत्र बड्या बँकवाल्यांचें मुखपत्र आहे. सगळ्या जगाला खरोखरी या ब्रिटिश बँकवाल्यांनीं गवसणी घातली आहे. पण आतां त्यांना लहान धंद्यांचा पान्हा फुटला आहे, 'संडे एक्स्प्रेस'चे संपादक लिहितात—

"एकेक स्वयंपूर्ण शेत हें राज्यसंस्थेचा घटक असावें. या शेतकऱ्यानें पहिली काळजी स्वावलंबी होण्याची करावी, मग बाजारांत माल नेण्याचा विचार करावा. हा बाजारसुद्धां घराशेजारचा असावा. शेतकऱ्याला लागणारा (नांगर, कुदळ वगैरे) माल पुरविणाऱ्या हस्तव्यवसायिकांनाच फक्त त्यानें आपला शेतीचा माल विकावा. मानवसमाजाचें धन व आरोग्य यांचें रक्षण व्हावें यासाठीं शेतकरी व कारागीर यांच्या सहकार्याची साधी, खेडवळ समाज-व्यवस्था उत्पन्न व्हायला पाहिजे... आपण तिचा पुनरुद्धार करूं या."

(पामी डट्ट यांनीं घेतलेला उतारा.)

खरोखर इंग्लंडांतले हे बँकवाले इंग्लंडांतच हा हातधंद्याचा प्रयोग करतील तर इंग्लंडचें कापड, इंग्लंडच्या आगबोटी, इंग्लंडचीं विमानें, इंग्लंडच्या तोफा व बाँब गोळे, इंग्लंडचे सिव्हिल सर्व्हंट व गव्हर्नर या सर्व अरिष्टांपासून जगाची एका क्षणांत मुक्तता होईल. पण तसें ते करणारच नाहींत. साऱ्या जगाला गाढ

झोप लागावी ही चोराची 'सदिच्छा' असली तरी त्याला स्वतांलाहि तशीच गाढ झोप लागावी हें त्याला नको असतें.

लॉर्ड यूस्टेस पर्सी हे एक तरणेबांड काँझर्वेटिव्ह लेखक व मुत्सद्दी आहेत. जगाचें आतां कसें होईल ही काळजी त्यांनाहि लागली आहे. त्यांनीं जगांतील अनर्थांचें संशोधन करून 'यंत्रपूर्वकालीन समाजव्यवस्थेकडे आपण गेलें पाहिजे' असा सिद्धांत काढला आहे.

जर्मनींतहि यंत्राविरुद्ध मोहीम जोरांत सुरू आहे. दिव्यावरच्या कांचा करण्याच्या कारखान्यांत कांचेच्या रसांत नळींतून तोंडानें हवा फुंकून त्या कांचेची पोकळी उत्पन्न करावी लागते हें पुष्कळांनीं पाहिलें आहे. या फुंकण्यानें फुप्फुसांना अतिशय ताण बसून त्यामुळें कांहीं दिवसांनी शरीरास व्याधि जडतात हें आतां इकडेहि माहीत झालें आहे. तोंडानें कांच फुंकून फुगविण्याऐवजीं तें काम पोलादी यंत्रानें करण्याची सोय हल्लीं झाली आहे. पण त्यामुळें मालाची निपज फार होते म्हणून जर्मनींत कांहीं कारखान्यांत हीं यंत्रें वापरण्यास सरकारनें बंदी केली असून तोंडानेंच कांचा फुगविण्यांत येतात. 'ॲन्टहूर अबेन्डब्लॅट' हें सरकारजमा जर्मन पत्र काच फुगविण्याचें पोलादी यंत्र बंद करण्याच्या या सरकारी धोरणाचें अभिनंदन करून लिहितें—

"हा कृत्रिम यांत्रिक हात तोडून टाकण्याचें सरकारचें हें पहिलेंच सत्कृत्य आहे. हजारों माणसें आपल्या शारीरश्रमानें खपून पोट भरीत होतीं त्यांचें अन्न या पोलादी हातांनीं तोडलें होतें व त्यांवर उपासमारीचें संकट आणलें होतें."

जणूं कांहीं माणसांची भाकरी आतां यंत्रच खाऊन फस्त करीत होतें; भांडवलवाला ती खात नव्हता. पण येथेंहि हेंच कीं, यंत्रानें काम सुलभ झाल्यास मजुरांचे पगार न तोडतां अथवा त्यांची संख्या कमी न करतां कामाचे तास कमी करावे व उत्पन्न होऊन विक्रीस येणारा माल खरेदी केला जाईल इतकी मजुरी कामगारांस द्यावी व त्यासाठीं नफेबाजी बंद करावी हें भांडवलदारांस पटणार नाहीं. त्यापेक्षां माणसाचें शारीरिक व मानसिक दुःख व यातायात कमी करणारीं यंत्रें मोडून माणसास जनावरांप्रमाणें नांगरास जुंपावें हेंच भांडवलवाल्यास अधिक परवडतें.

अगदीं लहान स्वयंपूर्ण शेती आणि यंत्रांचा व शास्त्रांचा त्याग यांच्या अतिरेकाचा परिणाम अखेर काय होईल याचें स्कॉट नियरिंग यानें आपल्या 'फॅसिझम्' या पुस्तकांत मोठें मजेदार चित्र काढलें आहे. नियरिंग लिहितो, " स्वयंपूर्ण आर्थिक घटकाचा शोध करण्याच्या फॅसिस्टांच्या प्रयत्नानें, खेडें, शेतांतली वाडी व जवळच्या शहरचा बाजार या प्राचीन व्यवस्थेप्रत मनुष्य-समाजास जावें लागेल. खेडें हें जवळ जवळ स्वयंपूर्ण असतें... तसें स्वयंपूर्ण होण्याच्या खटाटोपांत प्रचंड उत्पादन बंद होईल. त्याबरोबर यंत्रेंहि बंद होतील. हात-शेती व हातकारागिरी यांवर शेती अवलंबून राहील. आगगाड्या बंद होतील. चिखलांतल्या पाउलवाटा हे रस्ते होतील. मोटारी जातील. पूल मोडून जातील. नद्यांतून आणि ओढ्यांतून ओझ्याचीं गाढवें व उंट यांच्या द्वारा मालाची ने-आण करावी लागेल. रस्ते इतके अरुंद असतील, कीं अशा प्राण्यांची एकेकाची लांबच लांब रांग चालवावी लागेल... माणसांची राहणी मेक्सिको, चीन, ऑस्ट्रिया, रुमानिया येथल्यासारखी जगभर दरिद्री राहील ...दरसाल शेतकरी शेतें पेरतील, पावसासाठीं आभाळाकडे पाहत बसतील आणि पाऊस न पडला म्हणजे दुष्काळांत जागच्या जागीं माशांप्रमाणें मरून जातील. जगभर माणसें दरसालचीं पिकें काढून लुटारू व बेकार सैनिक यांपासून छपवून ठेवतील. माणसें आपल्या चिमुकल्या शेकोटीशेजारीं एकमेकांस धरून कुडकुडत बसतील आणि फावल्या वेळांत घरगुती हत्यारें व गाडगींमडकीं दुरुस्त करीत बसतील." पण ही अवस्था तरी मांडवलशाही काळांतल्यापेक्षां किंवा अगदीं कम्युनिस्ट समाजापेक्षां कमी सुखकारक आहे असें म्हणायला पुरावा काय?

बर्ट्रंड रसेल हा पेंकिंगमध्यें कांहीं दिवस मानसशास्त्राचा व तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर म्हणून राहिला होता. तेथें चिनी लोक नागडे-उघडे भटकतात, झोप आली कीं, झाडाच्या बुंध्याला डोईं देऊन निजतात व रिकामटेकडा वेळ खूप घालवितात; हें पाहून त्याला पाश्चिमात्य यांत्रिक प्रगतीचा तिटकारा आला, व चिन्यांचे जीवित त्यास स्पृहणीय वाटूं लागलें असें मत त्यानें आपल्या 'प्रॉस्पेक्ट्स ऑफ इंडस्ट्रिअल सिव्हिलिझेशन' या ग्रंथांत दिलें आहे. रसेलनें औद्योगिक संस्कृतीचे कांहीं दोष ठळकपणें दाखविण्यासाठीं कांहींशा

उपरोधिकपणें चिनी जीवनाची ही प्रशंसा केली आहे असें संदर्भावरून वाटतें. पण यंत्रपूर्वकालीन जिणें हें खरेंच सुखकर होतें असें मानलें तरी तो मनुष्यसमाज आत्मसंरक्षणक्षम नव्हता हें हिंदुस्तान, चीन वगैरे प्राचीन देशांच्या प्राचीन इतिहासापासून तों कालपरवां इटालीनें तुडविलेल्या अबिसीनियाच्या ताज्या इतिहासापर्यंत प्रत्ययास आलें आहे. कोणतीहि संस्कृति इतर कोणत्याहि गुणांनीं कितीहि श्रेष्ठ असो-नसो; आत्मसंरक्षण-क्षमता हें तिच्या चांगुलपणाचें प्रथम लक्षण मानलें पाहिजे यांत संशय नाहीं. कारण राजकीय व आर्थिक पारतंत्र्य प्राप्त झालें, कीं इतर दृष्टींनीं केवढीहि थोर असलेली संस्कृति नष्ट झाल्यावांचून राहात नाहीं. असो.

शस्त्रास्त्रें मात्र यंत्रपूर्वकालीन नकोत

पण अशा या प्राचीन संस्कृतीकडे तरी फॅसिस्ट राज्यकर्ते मानवजातीस सुखा-समाधानानें जाऊं देणार आहेत काय? कापड, काच, शेती या क्षेत्रांत ते यंत्र व शास्त्र यांस मज्जाव करून यंत्रपूर्वकालीन परिस्थितींत नेऊन ठेवीत आहेत व यासंबंधींची मतें हिंदुस्तानांतहि 'हें अमेरिकेचें व जर्मनीचें सुधार-लेलें शहाणपण पहा' म्हणून आम्हांस प्रफुल्लचंद्र रॉयसारख्यांकडून चारलीं जात आहेत. पण हे फॅसिस्ट लोक शस्त्रास्त्रें व युद्धकला म्हणजे मानवसंहाराचीं साधनें या बाबतींत यंत्रपूर्वकालीन समाजाकडे जावयास तयार नाहींत ही गोष्ट प्रफुल्लचंद्र विसरतात. आज जर्मनींत, इंग्लंडांत, अमेरिकेंत, इटालींत जे शस्त्रास्त्रांचे कारखाने निघाले आहेत, ते गोफणी, तिरकमठे, परशु, गदा यांचे निघालेले नाहींत. मुसोलिनीनें परशुरामाप्रमाणें परशूनें युद्ध करून रास तफारीस जिंकलें नाहीं. मानवजातीचा संहार करण्याची भयंकर-कल्पनातीत भयंकर शस्त्रास्त्रें अबिसीनियांत वापरण्यांत येऊन रास तफारीस धुळीस मिळविण्यांत आलें आणि रोज अधिकाधिक प्रखर अशीं शस्त्रास्त्रें या फॅसिस्टांच्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांतून निघत असून त्यांनीं मानवजातीच्या सर्व आधुनिक संस्कृतीचा संहार केल्यावर मग स्कॉट नियरिंग यानें वर्णिलेल्या समाजव्यवस्थेप्रत—या कोलाहलांतून जे जगतील त्यांना—जातां येणार आहे. बर्ट्रंड रसेल म्हणतो, "भावी महायुद्धानें आधुनिक संस्कृति व जीवित-साधनें इतकीं नष्ट होतील कीं, युरोपीय लोक अमेरिका विसरून जातील व

पुन्हा एकादा कोलंबस अमेरिका शोधून काढण्यासाठीं जन्मास यावा लागेल." (प्रास्पक्टेट्स् ऑफ इंडस्ट्रिअल सिव्हिलिझेशन)

असा हा आसुरी फॅसिझम् फक्त जर्मनी व इटाली येथेंच आहे, असा एक समज आहे. पण आतांपर्यंत इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांतलीं जीं उदाहरणें दिलीं त्यावरून फॅसिस्ट प्रवृत्ति सर्वत्र वाढत आहे असें दिसून येईल. नफेबाजी हा जो भांडवलशाहीचा मुख्य दोष त्यामुळें आज भांडवलशाहीची प्रगति खुंटली आहे. यामुळें एक तर नफेबाजी बंद करून सोशॅलिझम् जगानें पत्करला पाहिजे अथवा प्रगति खुंटलेल्या भांडवलशाहींत कोंडमारा झाल्यानें तिजवर हल्ला करणाऱ्या श्रमजीवी वर्गास दडपण्यासाठीं भांडवलशाहीनें फॅसिस्ट बनलें पाहिजे.

फॅसिझम्संबंधींचें भविष्य

पुष्कळ लोकांचा असा समज असतो, कीं मुसोलिनी, हिटलर, यांच्यासारख्या अजब कर्तृत्वाच्या कांहीं व्यक्तींनीं ही फॅसिस्ट पद्धति शोधून काढली आहे, हीं माणसें झालीं नसतीं तर फॅसिझम्हि झाला नसता. पण फॅसिझम्चा हा वैयक्तिक खुलासा व्यर्थ आहे. साम्राज्यशाहीची वाढ होतां होतां कामगारांना पिळून काढून मिळविलेला वाढावा खपविण्यास जग उरलें नाहीं म्हणजे प्रगति खुंटलेल्या भांडवलशाहींत कोंडलेलें जग भांडवलशाहीवर उलटेल व युद्धकालीं सत्ता एकमुखी करावी त्याप्रमाणें भांडवलशाहीचीं सूत्रें तिच्या रक्षणासाठीं एका माणसाच्या हातीं द्यावीं लागतील; अथवा मागें दिलेल्या जर्मन बँकवाल्यांच्या गुप्त पत्रकांतील भाषेप्रमाणें बोलावयाचें तर सामान्य जनतेंत जो आपले पाय रोवील त्या पक्षाच्या पुढाऱ्याच्या मानेवर भांडवलशाहीचें जोखड द्यावें लागेल ब्रिटिश हें भांडवलवाल्यांनाहि फार पूर्वी दिसलें होतें. लॉर्ड मिल्नर यानें ३० वर्षांपूर्वी लेडी सेसिलला लिहिलेल्या पत्रांतला एक उतारा पामी डट्ट यांनीं दिलेला आहे. तो हिटलर, मुसोलिनी व त्यांचे भगत यांना त्यांचें प्रतिबिंब दाखविणाऱ्या आरशासारखा वाटेल. मिल्नर लिहितो—

" कदाचित् एकादा बडा ढोंगी, विदूषक, थापाड्या पण उत्तम वक्ता व इतर दृष्टींनीं लोकप्रिय असूनहि चाणाक्ष असा एखादा मुत्सद्दी पुरुष पुढेंमागें

उत्पन्न होईल; तो लोकप्रिय कृत्यें करून सत्ताधीश होईल व आपल्या सत्तेचा 'राष्ट्रहिता'स उपयोग करील. असें घडण्याचा संभव आज तुरळक वाटला तरी मला दुसरा मार्ग दिसत नाहीं."

मिल्नर हा कट्टा साम्राज्यवादी होता हें प्रसिद्ध आहे. अर्थात् त्याची 'राष्ट्रहिता'ची कल्पना हिटलर व मुसोलिनी यांच्याशीं जुळतीच आहे. पण मिल्नरनें भविष्यकाळीं उदयास येणाऱ्या हिटलरला व मुसोलिनीला ढोंगी, विदूषक व थापाड्या म्हटलें आहे हें त्यांस कसें काय आवडेल कोण जाणे. या वीरांनीं आपण जाहीर केलेले कार्यक्रम मागून आपणच कसे फेंकून दिले, लोकांना भांडवलशाही बुडविण्याच्या थापा देऊन कसें झुलविलें व विदूषकांप्रमाणें लोकांच्या भावनांना गुदगुल्या करून सत्ताशिखर कसें गांठलें हें पाहिलें म्हणजे मिल्नर बोलला तेंच खरें ठरलें असें इतरांना मात्र वाटल्यावांचून राहत नाहीं.

विल्यम मॉरिसनें आपल्या 'न्यूज फ्रॉम नोव्हेअर' या नवलकथेंत भावी काळांत फॅसिझम्सारखा कांहीं तरी प्रकार येणार व त्यासाठीं जनतेला भयंकर यादवीस तोंड देऊन फॅसिझम् मोडावा लागणार हें अंदाजून त्याचें आगाऊ वर्णन करून ठेवलें आहे. त्यासंबंधींचा पामी डट्ट यांनीं दिलेला उतारा येथें देतों. "सरकारनें लष्करी कायदा पुकारला व एका प्रसिद्ध सेनापतीची सर्वाधिकारी म्हणून नेमणूक केली. त्यानें अगदीं सुधारलेला तोफखाना वापरून निःशस्त्र प्रजेची फार मोठी कत्तल पार पाडली. ही बातमी वृद्ध हॅमंडनें मूळ गोष्ट सांगणाऱ्याला येऊन सांगितली. तेव्हां तो म्हणतो, 'केवळ कत्तल करण्यानें या सेनापतीस एवढा मद यावयाचें आश्चर्य वाटून मीं म्हटलें, काय हो, काय भयंकर गोष्ट ही! तर मग एवढ्या कत्तलीनें सगळी क्रांति कायमची मोडली असेल?' 'छे-छे' हॅमंड म्हणाला, 'या कत्तलीनें फक्त यादवीला सुरुवात झाली.'

"या यादवीमुळें कायदेशीरपणाची आस्था, निमूटपणें हाल सोसण्याची प्रवृत्ति चटसारी जनतेंतून जळून खाक झाली. आतां फक्त यादवीचा कायदा सुरू झाला आहे, हें नागडें सत्य लोकांना दृष्टीस पडलें. अखेर जनतेचा विजय होऊन ही यादवी थांबली." आज स्पेनमध्यें कांहींसा हा इतिहास घडत आहे.

फॅसिझम् ही मध्यम वर्गीय क्रांति आहे काय ?

हा आसुरी फॅसिझम् ही मध्यम वर्गाची क्रांति आहे भांडवलशाहीपासून मानवसमाजाचें रक्षण करणारें पण भांडवलवाल्याप्रमाणें मालकी हक्क शाबूत ठेवणारें एक राज्यतंत्र व समाजतंत्र आहे असें त्याचें समर्थन केलें जातें. फॅसिस्टांनीं बहुसंख्य समाजाच्या मानेभोंवतीं भांडवलशाहीचे पाश कसे घट्ट आवळून ठेवले आहेत व प्रथम युद्धाकडे व मागून रानटी व दुर्बल समाज-व्यवस्थेकडे मानवसमाजास कसें खेचलें आहे याचें विवेचन आतांपर्यंत केलेंच आहे. आतां ही मध्यम वर्गाची क्रांति आहे असें कां वाटतें हें थोडक्यांत सांगतों. 'मध्यमवर्ग' या शब्दाचा अर्थ इतिहासांत एकसारखा बदलत आहे. भांडवलशाहीच्या आरंभीं सरदारवर्ग व कामगारवर्ग यांचे दरम्यान भांडवलदार वर्ग असे. म्हणून त्यास मध्यमवर्ग म्हणत. पुढें प्रचंड भांडवलदारवर्ग व काम-गारवर्ग यांचे दरम्यान असलेला लहान शेती मालकीनें करणारा वर्ग याचा 'मध्यम वर्ग' या शब्दांत समावेश होऊं लागला. हल्लींहि हा अर्थ रूढ आहेच. पण हल्लीं मुख्यतः मोठमोठ्या कारखान्यांतले लठ्ठ पगारांचे असंख्य एंजीनियर, मॅनेजर, कारकून, बडे पगार असलेले कसबी मजूर, वकील, डॉक्टर, प्रोफेसर, मास्तर, भिक्षुक, सरकारी नोकर, दुकानदार, लहान व्यापारी वगैरे ज्यांना बुद्धिजीवी वर्ग म्हणतां येतें अथवा असें म्हणून घेण्यांत भूषण वाटतें अशा वर्गाचा मध्यमवर्गांत समावेश होतो. 'कामगारवर्ग' अथवा 'भांडवलदारवर्ग' अशी शब्दयोजना करतांना या वर्गांतील घटकांचें सुखदुःख साधारण असतें असा अर्थ अभिप्रेत असतो. पण वर उल्लेखिलेला मध्यम 'वर्ग' हा एकजीव नसून फुटकळ व्यक्तींचा गळाठा असतो. हे 'बुद्धिजीवी' नामक वर्ग बुद्धीच्याच बाबतींत नेमके आंधळे असतात. जगांतील बहुतेक तत्त्वज्ञ व क्रांतिकारक पुढारी या वर्गांतून येतात खरे; पण ते आपल्या वर्गबांधवांशीं हजारांत एक या प्रमाणांत असून आपल्या वर्गांतून मनानें फुटून निघालेले असतात. बाकीचा सारा वर्ग सामुदायिक जीवनाबद्दल बेफिकीर असतो. समाजावर मोठेंच संकट कोसळतेंसें दिसलें, आणि त्यामुळें यांच्या पायांखालची वाळू निसटतीसें वाटलें म्हणजे यांची धावपळ सुरू होते व यांतील प्रत्येक व्यक्ति जें हाताला लागेल त्याचा आसरा घेते. प्रचंड जहाजांत आपापल्या केबिनमध्यें क्रीडा करीत असलेले उतारू एकदम

जहाज बुडूं लागल्याचें कळलें म्हणजे जसे गर्भगळित होतात तसा हा मध्यम वर्ग आहे. महायुद्धानंतर दारिद्र्य व पराभव यांनीं जर्मन कामगार, इटालियन कामगार त्रस्त झाले, व रशियांतल्याप्रमाणें राज्यसत्ता काबीज करण्यासाठीं झटूं लागले; पण 'बुद्धिजीवी' मध्यम वर्गास 'निवळ हमाली करणाऱ्या कामगार-वर्गा'चा मोठा तिटकारा. कामगारांनीं राज्यसत्ता काबीज केल्यास आपला दर्जा कमी होईल, आपले लठ्ठ पगार व ऐषआरामी यांत अंतर पडेल व आर्थिक घडी विस्कटेल अशी या मध्यमवर्गास मोठी भीति वाटते. भांडवलवाल्यांच्या बँकांतून पैसा गुंतवून दिनाश्रमानें श्रीमान होण्याची चटक या वर्गाला फार. पण मजुरांचें राज्य झाल्यास बँक जाणार, नोकरी जाणार आणि पिढीजात 'मूर्ख' असणाऱ्या कामगारांच्या हातीं कारखाने जाऊन मूर्खांचा धनी सुद्धां होऊं नये म्हणतात तेथें नोकर व्हावें लागणार हीहि भीति यांना उत्पन्न होते. मग ते भांडवलशाहीच्या प्राण निघून चाललेल्या कुडींत पुनः प्राण भरण्याची कोणीं अशा दाखविली, कीं त्याला येऊन बिलगतात. हिटलर व मुसोलिनी अशा या वर्गांतले पुढारी आहेत. जर्मनींत, इटालींत, अमेरिकेंत प्रचंड कारखानदारी-बरोबर हा वर्ग वाढत आहे. पण या वर्गाची बेकारी भांडवलशाहीनें कोठेंच दूर केलेली नाहीं. तरी पण बँका जप्त करणाऱ्या रांगड्या कामगारवर्गाशीं एकरूप होण्यापेक्षां भांडवलवाल्या वर्गाशीं एकरूप होण्यांत व त्यास साम्राज्य-वाढीस मदत करून आपल्या नोकऱ्यांची सोय करण्यांत या मध्यम वर्गास सुरक्षितपणा वाटतो.

परतंत्र राष्ट्रांतील फॅसिझम्‌चें स्वरूप

जर्मनीसारख्या स्वतंत्र राष्ट्रांत फॅसिझम् हा राष्ट्रीय स्वातंत्र्यवादी तरी असतो. पण परतंत्र राष्ट्रांतील फॅसिझम् साम्राज्यशाहीचें जोखड स्वदेशाच्या मानेवर दाबून ठेवण्यास साहाय्य करतो. कारण परतंत्र राष्ट्रांत साम्राज्यवादी राष्ट्राचें सैन्य व सत्ता हीं प्रबळ असून परतंत्र राष्ट्रांतील भांडवलवाले, जमिनदार वगैरे धनिक वर्गांच्या धनसत्तेचें रक्षण बहुसंख्य समाजापासून परकी सत्ता करीत असते. यामुळें ते वर्ग स्वदेशी जनतेला दडपून टाकणाऱ्या परकी सत्तेस बिलगून असतात. आणि नोकरीसाठीं धनिकांवर अवलंबून असणारा मध्यमवर्ग हा परकीय व स्वकीय धनिकांना बिलगून राहतो. या सर्व स्वदेशी वर्गांची परकी

सत्तेनें कुचंबणा होतेंच. पण समाजवादाच्या प्रसाराच्या हल्लींच्या काळीं जनतेला दडपणाऱ्या परकी सत्तेचा आश्रय त्यांना सोडवत नाहीं व परकी सत्ता आपली सत्ता टिकविण्यासाठीं स्वदेशी धनिक वर्ग प्रजेस स्वतंत्रपणें दडपूं शकतील इतकें त्यांना प्रबळ होऊं देत नाहीं. यामुळें स्वदेशी धनिक व मध्यमवर्ग जनतेविरुद्ध फॅसिस्ट बनून परकी सत्तेस दडपशाहीचे कामीं मदत करतात. म्हणून परतंत्र राष्ट्रांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळहि फॅसिझम्‌विरोधी, साम्राज्यशाहीविरोधी व म्हणून भांडवलशाही मोडणारी व्हावी लागते. असो.

फॅसिझम् म्हणजे सर्वनाश

आजच्या प्रचंड धनोत्पादनाच्या काळांत लष्करी वर्गाला केवळ एकट्याच्या बळावर राज्यसत्ता आवरणें शक्य नसल्यानें भांडवलवाले व मध्यमवर्ग यांच्याशीं लष्करी वर्ग एकजूट होतात. लहान लहान शेतकरी शेतीची भालकी संभाळण्याच्या दृष्टीनें या त्रिकूटास बिलगून असतात व सर्वजण मिळून कामगारवर्गास बडवितात. याचें नांव फॅसिझम् आहे. यांत भांडवलशाही नष्ट न होतां अधिक संघटित होते, अधिक साम्राज्यलोभी होते, अधिक क्रूर होते, धन मिळविणें, युद्ध करणें व जगांतील बहुसंख्य समाजास गुलाम करणें हा मानवजातीचा धर्म बनविते व जाणून अजाणून मानवजातीची संस्कृति, संपत्ति या सर्वांची चिता रचून ठेविते. ही चिता पेटूं न देऊन हजारों वर्षें साचविलेली संस्कृति, संपत्ति व शहाणपण जाळून टाकावयाचें, कीं भांडवलशाहीशीं घनघोर सामना देऊन व तिचा पाडाव करून मानवजातीच्या संस्कृतीचा व संपत्तीचा या राक्षसांपासून सांभाळ करावयाचा हा प्रश्न आज एका देशापुढें नव्हे, एका खंडापुढें नव्हे, तर अखिल मानवजातीपुढें निकडीनें उत्तर मिळवण्यासाठीं उभा आहे.

फक्त रशियानें प्रश्न सोडविला

आज जगांत फक्त रशियानें म्हणजे 'सोव्हियट यूनियन'नें या प्रश्नाचें खडखडीत व नमुनेदार उत्तर दिलें आहे.

फॅसिस्टांनीं भांडवलशाहीची नफेबाजी बंद न करतां भांडवलशाही अधिक संघटित व बलिष्ठ केली. यामुळें सगळ्या जगावर आज युद्ध व उपासमार यांचें संकट आलें आहे. उलट सोव्हियट रशियानें ही नफापद्धति

बंद करून धनोत्पादक साधनें सरकारच्या मालकीचीं केलीं आहेत. यामुळें तेथें बाजारांत विक्रीस येणारा माल कामकरी-शेतकऱ्यांनीं खरेदी करून भोगावा इतकें पुरेसें वेतन त्यांना देण्यांत येत आहे. माल तुंबून पडत नसल्यानें नवीन उत्पादनास मागणी आहे व नोकरीधंद्यांस मागणी आहे. फॅसिस्टांप्रमाणें माणसाची उत्पादनशक्ति न खुंटवितां ती वाढवून धनोत्पादन रशियांत वाढविण्यांत येत आहे. या वाढत्या धनानें जास्ती जास्ती समाजास वाढता सुखलाभ व वाढता संस्कृतिलाभ मिळत असून यंत्रांची उत्पादनक्षमता वाढल्यामुळें माणसांची फुरसत वाढली आहे व संस्कृतिविकासाचे कामीं या फुरसतीचा उपयोग केला जात आहे. कोणास माणसाची आध्यात्मिक उन्नति हीच श्रेष्ठ आहे असें म्हणावयाचें असलें तर त्यानें हें लक्षांत ठेवावें कीं त्यासाठीं रशियाइतकी उत्तम अनुकूल भौतिक परिस्थिति जगांत कोठेंहि नाहीं. बाहेरच्या जगांतून रशियांत आज पुष्कळ माल जातो व रशियाचा बाहेर येतो. पण साम्राज्यवाद्यांना आपला माल पुष्कळ किंमतींत विकून परदेशाचा माल मात्र जवळ जवळ फुकटांत घेण्यासाठीं अंकित प्रदेश हवे असतात. तसे ते रशियास नको आहेत. आपण उत्पन्न केलेल्या मालापैकीं कांहीं अंश रशियन लोक सरकारमार्फत बाहेर पाठवितात व त्याच्या मोबदल्यांत आपणास हवा असणारा माल स्वदेशांत आणतात. यामुळें रशियाला साम्राज्यें वाढविण्याची गरज नाहीं व त्यासाठीं आंतरराष्ट्रीय युद्धें माजविण्याची गरज नाहीं. लेनिननें 'नवें आर्थिक धोरण' सुरू करून भांडवलशाही वाढूं दिली व अलीकडेहि कांहीं खाजगी मालकीचे प्रकार सुरू करण्यांत येत आहेत असें सांगतात. पण त्यामुळें भांडवलशाही समाज अथवा नफेबाजी रशियांत सुरू झाली असें म्हणणें हा भ्रम आहे. हिरव्यागार गवताच्या रानांत खुंट्याला बांधलेली लांब दोरी गळ्यांत अडकवून वासराला चरायला सोडतात, तसें हें आहे. चरण्याला व बागडण्याला वासराला वाव पुष्कळ आहे; पण तें दुसऱ्याच्या गवतावर जाईल अथवा पळून जाऊं म्हणेल तर मानेला सटका बसल्यावांचून राहणार नाहीं. बँका व आयात-निर्यात व्यापार अगदीं पहिल्यापासून निरपवादपणें सरकारचे हातीं आहे. आणि रोखेबाजार मुळींच नाहीं. यामुळें चलनव्यवहारांत चेक-हुंड्यांच्या द्वारा घोटाळा करून, परराष्ट्रांत भांडवल गुंतवून, परराष्ट्रांतून रशियांत भांडवल आणून किंवा

कर्जरोख्यांचे सट्टे करून आर्थिक अराजकता उत्पन्न करणें कोणाहि खाजगी माणसास शक्य नाहीं. थोड्याफार नफ्याची सवलत कांहींजणांस मिळाली तरी हा नफा सांचवून व त्याच्या बळावर धनोत्पादक साधनें अडवून, मजुरांत चढाओढ लावून व त्या जोरावर मजुरीचा दर उतरवून वाढावा वाढविण्याची संधि मुळींच राहिलेली नाहीं. कारण विक्रीस येणाऱ्या मालाचे भाव व मजुरीचे दर यांचें समीकरण करण्याचे सरकारचे एकसारखे यत्न सुरू आहेत. यासाठीं अधिक मिळकतवाल्यांना मालाचे भाव अधिक व कमी मिळकतवाल्यांना मालाचे भाव स्वस्त असा पक्षपातहि रशियांत करण्यांत आला आहे. यामुळें मालाचा उठाव होऊन नवीन उत्पादनास मागणी सारखी चालू राहते. श्रम करणाऱ्यास काम देणें व अनाथ, असमर्थ यांस पोसणें ही जबाबदारी सरकारनें पत्करली आहे. यामुळें कोणाहि व्यक्तीस रोजगार मिळविण्यासाठीं दुसऱ्याच्या कैचींत सांपडावें लागत नाहीं. अर्थात् समाजाची ही नवी घडी नीट चालण्यासाठीं कामगारवर्गानें आपल्या पुढऱ्यांकरवीं आपल्या हातीं राज्यसत्ता ठेवली आहे हें सरळच आहे. नफेबाजी चालूं राहण्यासाठीं भांडवलवाले जर आपल्याच हातीं सत्ता ठेवतात तर नफेबाजीचा शेवट करण्यावरच ज्या वर्गाचें स्वातंत्र्य, संरक्षण व संवर्धन अवलंबून आहे त्या वर्गानें नफेबाजी हळूच कोठून तरी येऊं नये यासाठीं राज्यसत्ता हातीं ठेवावी व जरूर तितक्या निष्ठुरपणें तिची बजावणी करावी यांत गैर कांहींच नाहीं.

आंतरराष्ट्रीय क्रांतीचा प्रश्न

पण जगाच्या एकषष्ठांशाएवढ्या रशियानें अशा प्रकारें वर सांगितलेला प्रश्न सोडविला असला तरी उरलेल्या बाकीच्या पांचषष्ठांश जगाचें काय होणार हा प्रश्न क्षुल्लक नव्हे; किंबहुना रशियाबाहेरच्या बहुसंख्य समाजास भांडवलवाल्यांची धनोत्पादक साधनें हीं जशीं आकाशांतल्या चांदोबाप्रमाणें रमणीय पण अलभ्य झालीं आहेत त्याचप्रमाणें रशियाची प्रगतिशील समाजवादी घटनाहि रमणीय पण अलभ्य झाली आहे. फॅसिझम् ही भांडवलशाहीची प्रगति खुंटल्यावरची, मरणकाळची झटापट आहे हें खरें. पण पुढें पळून जाण्यास मार्ग नाहींसा झाल्यावर काळवीट जसा शिकाऱ्यावर उलटून भयंकर रूप धारण करतो त्याप्रमाणें भांडवलशाहीनें आज भयंकर उग्र रूप

धारण केलें असून जमिनींतून वर येऊं पाहणारे प्रचंड वृक्षांचे कोवळे अंकुर बुटाच्या ठोकरीनें तुडवावे त्याप्रमाणें कामगारचळवळीस आज कोठेंहि फॅसिझम् जरा सुद्धां वर डोकें वर काढूं देत नाहीं. तेव्हां कामगार चळवळीचा प्रचंड वटवृक्ष होऊन तो आपल्या पारंब्यांनीं भांडवलशाहीचा किल्ला पाडून टाकील ही आशा आज नष्टच झाली आहे. कोणत्याहि देशांतले कामगार व शेतकरी आज केवळ स्वतांच्या बळावर राज्यसत्ता काबीज करतील ही आशा उरलेली नाहीं. रशियांत कम्युनिस्ट क्रांति होतांच बाहेरच्या जगांतहि कम्युनिस्ट क्रांति करूं अशा रशियन क्रांतिकारकांच्या प्रतिज्ञा होत्या. बाहेरच्या जगांत कम्युनिस्ट क्रांति वाढत राहिल्याशिवाय व भांडवलवाल्यांच्या राष्ट्रांतील भांडवलशाही तेथल्या मजुरांनीं वेळींच उलथून पाडल्याशिवाय भांडवलशाही राष्ट्रांची स्वारी कम्युनिस्ट रशियावर होण्याची भीति नष्ट होणार नाहीं असें रशियन पुढाऱ्यांना एके काळीं वाटत होतें. पण आज त्यांचें मत बदललेलें दिसतें. गेल्या महायुद्धानंतर भांडवलशाही राष्ट्रें कामकऱ्यांच्या अंतर्गत विरोधानें जेरीस आलीं असून नवीन उदयास आलेल्या इटाली, जपान यासारख्या राष्ट्रांचे व जर्मनीसारख्या पुनरुज्जीवित राष्ट्रांचें इंग्लंड-फ्रान्ससारख्या जुन्या राष्ट्रांशीं हाडवैर माजलें आहे. हें वैर शमेपर्यंत कोणासहि रशियाची खोडी काढण्यास फुरसत नाहीं. उलट रशियांत माल खपवून गबर होण्याची संधि प्रत्येकजण साधत आहे. रशियांत अंतर्गत समाजवादी पुनर्घटना रोज नव्या जोमानें वाढत असून भांडवलशाही राष्ट्रांतली दुही कायम ठेवतां आल्यास आंतरराष्ट्रीय शांतता ठेवतां येऊन अंतर्गत समाजवादी घटना करण्याचें कार्य यशस्वितेनें करतां येईल अशी आजच्या रशियन राज्यकर्त्यांची खात्री झाल्यासारखी दिसते. म्हणून आज 'आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट क्रांति' हा दहा वर्षांपूर्वी रशियांतून येणारा घोष मंदावला असून 'युद्धविरोध व आंतरराष्ट्रीय शांति' हा घोष ऐकूं येत आहे. तिसऱ्या इंटरनॅशनलची जागतिक चळवळ मंदावली असून मॅक्झिम लिट्व्हिनॉफ यांच्या परराष्ट्रीय राजकारणाचें ढोल आज मोठमोठ्यानें ऐकूं येत आहे. जागतिक शांततेची घोषणा आज त्यांच्याइतकी मोठ्यानें कोणीच करीत नाहीं. एक काळ असा होता, कीं ब्रिटिश साम्राज्य हें जगांतील व विशेषतः रशियांतील कम्युनिस्टांचें कट्टे वैरी होतें. आतां हा मनु पालटला आहे. दीड वर्षांपूर्वी एक ब्रिटिश मंत्री कॅप्टन एडन हे रशियाचे भेटीस गेले

स्थळ प्रत
ता.

तेव्हां मॅक्झिम् लिट्व्हिनॉफ यांनीं त्यांचे स्वागतार्थ ब्रिटिशांचें सष्ट्रगीत गाऊन दाखविलें व कम्युनिस्टांच्या भूमींत ब्रिटिश साम्राज्याच्या बादशहांचा जय-जयकार करून एडन यांचेसमवेत यथेच्छ सुरापानांहि केलें. रशियन पुढाऱ्यांच्या संदेशाप्रमाणें वागून ज्यांनीं हालअपेष्टा सोसल्या अशा रशियाबाहेरच्या कम्युनिस्टांना हें गाणें-बजावणें पाहून थोडा वेळ तिरमिरी आल्यावांचून राहिली नाहीं. जो राष्ट्रसंघ एके काळीं चोरांचा दरबार म्हणून रशियानें बहिष्कारला होता त्यांत आज मॅक्झिम लिट्व्हिनॉफ इतमानानें प्रविष्ट झालेले असून, राष्ट्रसंघास लाथ मारून इटालीनें अबिसीनिया खाल्ला व पुनः राष्ट्र-संघांत तो लिट्व्हिनॉफ यांच्या पंक्तीस बसला आहे, तरी एकाद्या सनातनी भिक्षुकास मांसभक्षक यजमानाच्या घरचें यजमानकृत्य व त्याच्या पंक्तीचें जेवण भुकेपायीं सोडवत नाहीं, त्याप्रमाणें आंतरराष्ट्रीय शांततेस भुकेलेल्या लिट्व्हिनॉफला इटालीची व राष्ट्रसंघाची पंगत सोडवत नाहीं. पण या आंतर-राष्ट्रीय शांततेच्या धोरणांत आंतरराष्ट्रीय क्रांतीची गल्लत झाली त्याची वाट काय ?

रशियावर आज जर्मनी वगैरे भांडवलशाही राष्ट्रांनीं स्वारी केल्यास व व रशियाचा पराभव झाल्यास रशियांतील समाजवाद लयास जाऊन हजारों वर्षांच्या गतेतिहासानंतर समाजव्यवस्थेची एक उत्कृष्ट ठेव मानवजातीच्या हातीं सापडली आहे ती नष्ट होईल. त्यासारखें दुसरें नुकसान कोणतेंहि नाहीं व रशियानें त्यासाठीं आंतरराष्ट्रीय शांततेवर भर द्यावा यांतहि कांहीं गैर नाहीं. त्यामुळें आंतरराष्ट्रीय क्रांतीचें धोरण रशियानें तूर्त ढिलें केलें तरी तें क्षम्य आहे असेंहि आतां बाहेरच्या कम्युनिटांनीं समजावें हें बरें. अर्थात् त्याबरोबरच आपापल्या राष्ट्रांत समाजवाद निर्माण करण्याच्या धोरणांचीं सूत्रें यापुढें रशियाबाहेरच्या कम्युनिस्टांनीं रशियांतून चाळवून घेऊं नयेत ही गोष्ट येथें लक्षांत ठेवणें महत्त्वाचें आहे. अमेरिकेच्या, इंग्लंडच्या अथवा फ्रान्सच्या साम्राज्यांतील प्रजेचें आपल्या वरच्या साम्राज्यशाहीशीं वैर असणें साहजिक आहे. यापैकीं एक अथवा सर्व राष्ट्रांच्या बाजूनें रशियाला जपान, जर्मनी व इटाली या फॅसिस्ट राष्ट्रांशीं लढावें लागणार असा संभव दिसूं लागला तर अशा वेळीं रशियन कम्युनिस्ट वरील साम्राज्यांच्या अंकित राष्ट्रांतील कम्युनिस्टांना हीं साम्राज्यें संकटांत आणावीं असा सल्ला

देतील हें असंभवनीय आहे. या बाबतींत रशियन सरकार व कम्युनिस्ट इंटरनॅशनल यांचीं धोरणें वेगळीं असतील असें मानण्यास कांहींच आधार नाहीं.

कम्युनिस्ट क्रांति करण्यासाठीं रशियाची मदत होणार नाहीं अथवा फॅसिझम्‌चा सध्यांच पाडाव करणें अशक्य आहे असें दिसत असल्यामुळ जगांतील कम्युनिस्टांना वाटाड्याशिवायच मार्ग काढला पाहिजे हेंहि उघड आहे. स्वतः लेनिन व ट्रॉट्स्की यांनाहि अगदीं अखेरपर्यंत किती तरी अपयशांशीं टक्कर द्यावी लागली. त्यांना इतिहासाचा आदर्शहि नव्हता. आज रशियाचा इतिहास हा आदर्श कम्युनिस्टांच्या हातीं आहे हें त्यांचें भाग्य होय. अर्थात् इतिहास हें वेदवाक्य नव्हे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. उभय पक्षांनीं टाळण्यासारख्या किती तरी गोष्टी रशियाचा इतिहास शिकवितो. कम्युनिझम्, कम्युनिस्ट क्रांति हे शब्द ऐकून लोकांच्या कानठळ्या बसतात. पण कम्युनिझम् म्हणजे अत्याचार अथवा बेबंदशाही नसून अखिल मानवजातीचें कल्याण करूं पाहणारी ती एक श्रेष्ठ समाजव्यवस्था आहे हें लोकांना शिकविण्याचें—पढविण्याचें काम जितकें कसोशीनें होईल तितका अजाणपणानें व भित्रेपणानें होणारा मध्यम वर्गाचा, शेतकऱ्यांचा, कांहीं सदिच्छ सरकारी अधिकाऱ्यांचा व धनिक वर्गांचाहि विरोध आज होतो तो कमी होईल. कम्युनिझम् म्हणजे बंड, कम्युनिझम् म्हणजे अत्याचार असें अनुमान रशियांतील इतिहासावरून काढणें चुकीचें आहे. श्रमजीवी वर्गास विक्रीसाठीं बाजारांत येणारा माल खरेदी करण्याइतकी मजुरी देणें, मनुष्याची उत्पादनक्षमता वाढवून व तिचा मनुष्याच्या सेवेसाठीं उपयोग करून बहुसंख्य समाजास सुख व संस्कृति यांचा लाभ होईल अशी परिस्थिति उत्पन्न करणें हें कम्युनिझम्‌चें अर्थशास्त्र आहे. यासाठीं संपत्तिसाधनें सार्वजनिक मालकीचीं करावीं लागतात व नफेबाजी बंद करावी लागते. हें कार्य कामगारवर्गच करूं शकतो. म्हणून कामगारांचे हातीं राज्यसत्ता देणें इष्ट असतें, हें कम्युनिस्टांचें राज्यशास्त्र आहे. रशियांत कामगारसत्ता स्थापण्यासाठीं कामगारांनीं बंड केलें. पण स्पेनमध्यें कामगारांस अनुकूल अशी सत्ता जाहीर व कायदेशीर निवडणुकीनें मिळाली. कायदेशीर मार्गांनीं असें अर्धें यश लाभलें तर बंडच केलें पाहिजे असा कम्युनिस्टांचा आग्रह नसतो. त्यांनाहि युक्तायुक्त व शक्याशक्य

विचार सुचूं शकतात हें इतरांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. मात्र कायदेशीर मार्गांनीं स्थापन झालेल्या लोकशाहीवर लोकशाहीचे विरोधकच बेकायदा हल्ला करतात हेंहि स्पेनच्या चालू इतिहासानें सिद्ध केलें आहे.

रशियन क्रांतीच्या इतिहासाचें कांहीं सार असेल तर तें हें, कीं आजच्या, औद्योगिक भांडवलशाही शिखरास पोंचलेल्या काळांत, तिचा पाडाव करण्यासाठीं मुख्यतः तिचे आधारस्तंभ जे कामगार त्यांची संघटना केली पाहिजे व त्यांना शेतकरी व मध्यमवर्ग यांचा पाठिंबा मिळविला पाहिजे. आणि हें करण्यासाठीं धंदेवाईक राजकीय कार्यकर्त्यांची प्रबळ संघटना पाहिजे. समाजवादी घटना एका रात्रींत निर्माण होईल अशी आशा अथवा भीति कोणींच बाळगूं नये. रशियांत कामगारसत्ता आली तरी १८ वर्षांत अजून पूर्ण समाजवादी घटना झाली नाहीं. स्पेनमध्यें तर कामगारसत्ताहि नाहीं. कायदेशीर मार्गांनीं लोकशाहीस्वरूपाचें राज्य तेथें निर्माण झालें 'आहे'. हें पुस्तक छापून होईपर्यंत तेंहि 'होतें' म्हणण्याची पाळी येईल कीं काय कोण जाणे. लिट्व्हिनॉफ् यांचें आंतरराष्ट्रीय शांततेचें धोरण रशियाचे दृष्टीनें ठीक आहे. पण जर्मनी व इटाली येथील फॅसिस्ट राज्यकर्त्यांनीं अंतर्गत विरोध दडपून टाकला असून परचक्राखेरीज त्यांची कंबर मोडणें अशक्यच झालें आहे. हे फॅसिस्ट सुलतान आज स्पेनमधील फॅसिस्ट बंडखोरांना मदत करीत असून स्पेनमधला बाल्यावस्थेतील लोकशाहीचा अंकुर खुडला जाणार अशी भीति वाटूं लागली आहे. रशियाच्या आंतरराष्ट्रीय शांततेच्या धोरणाचें समर्थन करतांना पामी डट्ट यांनीं आपल्या 'वर्ल्ड पॉलिटिक्स' या अगदीं नव्या पुस्तकांत म्हटलें आहे कीं, " कामगारांनीं आपापल्या राष्ट्रांतील भांडवली सत्ता उलथून पाडली नाहीं तर महायुद्ध अटळच आहे.....पण अजूनहि महायुद्ध पेटण्यापूर्वी निरनिराळ्या राष्ट्रांत क्रांति होईल अशीं चिन्हें दिसत आहेत." यामुळें जगाची पुनर्घटना करून 'दुसरें महायुद्ध' टाळतां येईल असें डट्ट यांना वाटतें. पण स्पेनचा जो अनुभव येत आहे त्यावरून वाटतें कीं जर्मनी व इटाली वगैरे देशांतील फॅसिस्टांची कंबर आंतरराष्ट्रीय युद्धांत मोडल्याशिवाय ते बाहेरील देशांत कम्युनिझम्च काय पण लोकशाहीहि नांदूं देणार नाहींत. स्पेनमधील सरकारचा आज विजय झाला तरी त्याला शेजारचे फॅसिस्ट स्वस्थता मिळूं देणार नाहींत. आणि इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स

यांचीं शस्त्रास्त्रें वाढत असल्यानें युद्ध नाहीं तोंवर या शस्त्रास्त्रांचा उपयोग चळवळ्या प्रजेविरुद्ध खासा होऊन तेथेंहि फॅसिझम् नंगा नाच घालूं लागेल. अशा असहाय परिस्थितींत मुख्यतः कामगारवर्गाची संघटना करून त्यास शेतकरी व मध्यमवर्ग यांचा पाठिंबा मिळवावा, समाजवादी विचार-सरणीला व समाजघटनेला लोकमत अनुकूल करावें, व भांडवलशाही सत्ता-धाऱ्यांशीं कामकऱ्यांच्या नेतृत्वाखालीं शेतकरी व मध्यमवर्ग यांचा झगडा सतत चालू ठेवावा हाच रशियन इतिहासाचा राजकीय आघाडीवरील संघटित पक्षांना संदेश आहे. कारण प्रचंड लोकमताचा स्वानुभवसिद्ध ज्ञानानें दृढ झालेला असा सक्रिय पाठिंबा मिळाल्याशिवाय जगांत कोणच्याहि तत्त्वाचा विजय होऊं शकत नाहीं. जगांत कम्युनिझमला असा पाठिंबा आज कोठेंहि नाहीं हें कटु असलें तरी सत्य आहे. अशा स्थितींत कम्युनिस्टांचें कर्तव्य स्पष्ट आहे. ४ एप्रिल १९१७ या इतिहासप्रसिद्ध दिवशीं बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक यांच्या संयुक्त-परिषदेंत लेनिन सांगतो,—

"आम्ही कांहीं ढोंगी पुढारी नव्हे. जनतेची जागृति ज्या मानानें असेल त्याच मानानें आपण कार्यक्रम हातीं घेतला पाहिजे. कांहीं काल (लोकांस आपलीं मतें पटेपर्यंत) अल्पसंख्य म्हणून रहावें लागलें तरी चालेल. कांहीं वेळ पुढारीपण सोडून देणें चांगलें असतें. अल्पसंख्य म्हणून राहण्यांत भिण्याचें कांहींहि कारण नाहीं..... आपला पक्ष अल्पसंख्य आहे. अशा वेळीं काय करतां येईल? आपण इतकेंच करूं शकतों कीं, धीरानें, आग्रहानें व शिस्तशीर-पणें बहुमतास त्याचें कोठें चुकतें तें सांगूं. अल्पसंख्य आहों तोंवर कपटजालांतून लोकांना सोडविण्यासाठीं त्यांना वस्तुस्थितीची फोड करून सांगूं. आम्ही म्हणतों म्हणून लोकांनीं आमचें म्हणणें मानावें असें नाहीं. आम्हांला ढोंग करावयाचें नाहीं. अनुभवांनीं शहाणे होऊन लोकांनीं आपल्या चुका सुधारल्या पाहिजेत. अखेर आमची विचारसरणीच लोकांना खरी वाटेल. .....त्यांना दुसरी गतिच नाहीं."

माझे प्रकाशन

१ वळवांचे पाऊस (कथासंग्रह) किं. १। रुपया.
*२ पुनर्भेट भाग २ रा (कथासंग्रह) किं. १ रुपया.
३ पुनर्भेट भाग ३ रा (कथासंग्रह) किं. १। रुपया.
४ कणसाचे दाणे (कथासंग्रह) किं. १ रुपया.
*५ दुर्दैवी मोहरे (ऐतिहासिक चरित्रें) किं. १ रुपया.
६ पैसाच पैसा (सचित्र नाटक) किं. १ रुपया.
७ जीवन-पथ (कथासंग्रह) किं. १ रुपया.
८ आवडत्या गोष्टी (६१ लेखकांचा कथासंग्रह) किं. ३ रु.
*९ चित्तरंजन किं. १। रुपया.
१० फुलबाग (कविता) किं. १ रुपया.
११ बायफळांचा मळा किं. २॥
१२ वाहते वारे (कथासंग्रह) किं. १२ आणे.
१३ गारांचा वर्षाव (कथासंग्रह) किं. १। रुपया.
१४ सोनेरी नागीण (कादंबरी) किं. १ रुपया.
१५ हायस्कूल विद्यार्थी (कादंबरी) ८ आणे.
१६ संराक (विडंबनात्मक कवितांचा संग्रह) किं. १ रुपया.
१७ खेड्यांतील स्वभावचित्रें (ले. मो. गो. सोमण, बी. ए.) किं. १। रुपया.

शिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें ऑर्डरप्रमाणें पाठविलीं जातील.

प्रकाशक—यशवंत गोपाळ जोशी,
७२३ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

* मुंबई इलाखा शाळाखात्यांत लायब्ऱ्यांकरिता व बक्षिसाकरितां मंजूर.

चरित्र-माला

दुर्दैवी मोहरे

(ऐतिहासिक चरित्रें)

[सर्जेराव घाडगा व त्रिंबकजी डेंगळा]

लेखक—वि. गं. लेले

प्रस्तावनालेखक—इतिहाससंशोधक, द. वि. आपटे

किंमत १ रुपया

शि.म. परांजपे चरित्र : व आठवणी

लेखक—ओगले-बर्वे. किंमत १ रुपया.

बिहारचे प्रख्यात बंडवाले

कुंवरसिंह

यांचें चरित्र

लेखक—श्री. गणेश सीताराम जोशी, बी. ए.

शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

नोव्हेंबर १९३६ मध्यें प्रसिद्ध होईल.

REFBK-0005489